
# ॥ आत्मनिवेदन ॥



95, 97, 99, 97-102, 111, 112-113
119, 114, 115 Anagha Moghe

श्री सद्‌गुरुनाथ दादा
संस्थापक

# श्री साई स्वाध्याय मंडळ (गोवा)

यांचे

# ॥ आत्मनिवेदन ॥

[ खासगी वितरणासाठी ]

या पुस्तकाचे कोणत्याही भाषेतील भाषांतर (अनुवाद) हे 'श्री साई स्वाध्याय मंडळ', पर्वरी, गोवा; यांच्या परवानगीशिवाय करता येणार नाही.

❀ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ❀

गुढी पाडवा
श्री साई शक १७
गुरुवार दिनांक १८-३-१९९९

❀ दुसरी आवृत्ती ❀

मुद्रक :
प्रतिक ऑफसेट
खाडीलकर रोड, गिरगांव,
मुंबई - ४०० ००४
फोन : ५६३५ ४८६६/६५,५६२१ ७१७६
टेली फॅक्स : २३८५२५३२

प्रकाशक:
श्री साई स्वाध्याय मंडळ
'साई-धाम', ४७, डिफेन्स कॉलनी,
अल्तो पर्वरी, बारदेश,
गोवा - ४०३ ५२१
फोन : ०८३२-४१२५७१



# अनुक्रमणिका


- पुण्याहवाचन, गुरुवाणी — १
- नांदी — २-६
- श्रीमंगलाचरण — ७
- श्री गणेशवंदना, श्री सरस्वतीवंदना, पसायदान — ८
- दैनंदिन प्रार्थना — ९
- श्री शक्तिपीठ प्रार्थना — १०


## ॥ अध्याय ॥


१. जीवन व जीवनारंभ — ११-१६
२. मिलिटरीत भरती, श्री भैरवनाथांचा आदेश, प.पू. बाबांची सेवा, संचार अवस्था — १७-२४
३. श्रीक्षेत्र औदुंबर - सेवा — २५-२८
४. 'इन्सान जाग उठा!' — २९-३१
५. साधक अवस्था - हाजी मलंगबाबांचे मार्गदर्शन — ३२-३४
६. ज्योतिष्मती - 'श्री गुरुचरित्र' - विमोचन साधन - श्री शक्तिपीठ कार्ययोजना — ३५-४०
७. मानवी जीवन - वंशविमोचन — ४१-४४
८. कर्मविमोचन - गुरुअंशप्राप्ती — ४५-४९
९. साधकाचे कर्तव्य - कर्मविमोचन — ५०-५६
१०. मानवी जीवन - पाच ऋणानुबंध — ५७-५९
११. प.पू. महंमद जिलानी बाबांचे आगमन - मरणोत्तर जीवन, कर्म — ६०-६५
१२. जीवन - एकोणीस माध्यमे — ६६-७०
१३. गुरुमार्ग - साधनपद्धती — ७१-७७
१४. गुरुमार्ग - दीक्षा — ७८-८१
१५. गुरुमार्ग - गुरुचरित्र — ८२-८५
१६. गुरुमार्गदर्शन — ८६-९०
१७. ॐकार साधना - अंगे — ९१-९८

१८. चांदण्यातील इंद्रधनुष्य ९९-१०१
१९. साधनेतील विष - विमोचन संकल्पसिद्धी १०२-१०८
२०. संकल्पाची भूमिका, साधना मार्ग, उपासना मार्ग १०९-११२
२१. परलोकमार्ग ११३-१२६
२२. औदुंबर सेवेची सांगता - 'स्वगृही' गमन १२७-१३२
२३. श्री साई अध्यात्मिक समितीची श्री साईनाथ महाराज व पाच पीर यांच्याकडून स्थापना व विजयादशमीस कार्यारंभ १३३-१४०
२४. विमोचने, दीक्षा, महारुद्र स्वाहाकार १४१-१४७
२५. ॐकार सिद्धतेची वाटचाल - श्री पंतमहाराज यांची भेट १४८-१५३
२६. करणी, बाधा, ताह्मन १५४-१५६
२७. कार्याचा प्रचार - गोवा येथे कार्यारंभ १५७-१६५
२८. घालीन लोटांगण, वंदीन चरण, डोळ्यानी पाहीन रूप तुझे १६६-१६८
२९. लंडन येथे कार्य करण्याची आज्ञा व लंडन येथील कार्य १६९-१८५
३०. हिंदुस्थानात पुनरागमन व पुनश्च कार्यास सुरुवात; पुढील कार्यासाठी प. पू. बाबांचे मार्गदर्शन १८६-१९०
३१. ॐकार साधनसिद्धता - श्री नृसिंह सरस्वती यांचे मार्गदर्शन १९१-१९५
३२. ॐकार - 'अ' तत्त्व सिद्धता १९६-२००
३३. 'उ' तत्त्वाची सिद्धता, शिरोडा येथील ज्ञानयज्ञ, 'श्रीसाई शक' प्रतिमा २०१-२०४
३४. शक्तिपीठ स्थापनेचा आरंभ - 'उ' तत्त्वात गजाननाची प्राप्ती २०५-२१०
३५. 'कर्म-आधीन' अवस्थेची प्राप्ती २११-२१४
३६. साधनेतील बदल २१५-२२२
३७. साधनेचा अर्थ, इहजन्माचे गणित, सत्कर्म २२३-२२८
३८. अवधान, ध्यान, चिंतन अवस्था २२९-२३६



३९. श्री साई स्वाध्याय मंडळ, मारुती स्तोत्र २३७-२४२
४०. शुभ ताऱ्याचे आगमन, महाकारण दिशा, बीज दीक्षा २४३-२४६
४१. श्री साईनाथ महाराजांनी स्पष्ट केलेले ॐकार साधनेचे कार्य २४७-२५३
४२. सुज्ञ भक्तानो जागे व्हा! २५४-२५७
४३. श्री शेषपंचमी, ज्योतिष्मती अवस्था, हिरण्यगर्भ अवस्था २५८-२६२
४४. गुरुमार्ग - सेवकाचे कर्तव्य २६३-२६७
४५. गुरुमार्ग - कुलधर्म - कुलाचार २६८-२७१
४६. प्रतिमा - श्रीसाईशक (ज्ञान), कारण (भक्ती), महाकारण (सेवा), नारायणी (जीवनसार्थकता) २७२-२८४
४७. कर्मयज्ञ - धर्मयज्ञ - मानवता २८५-२८९
४८. श्री सद्‌गुरुकृपाशीर्वादाचे बीज रुजविणारे श्री साईनाथ महाराजांचे कार्य २९०-२९५
४९. श्रीसाई शक ७ चैत्र प्रतिपदा, शक्तिपीठ व नारायणी संगम, श्री पंतमहाराजांकडे कार्यार्थ आशीर्वाद, कुंडलिनी विज्ञान २९६-३००
५०. विमोचन साधना - इहलोक व परलोकाचा विचार ३०१-३०५
५१. वाणी - जीव, जीवात्मा, आत्मा - प्रज्ञा अवस्था - श्री साईनाथ महाराजांचा आशीर्वाद! ३०६-३१०
५२. श्री साईनाथ महाराजांच्या कृपाशीर्वादाची प्रेरणा - परमार्थ युगाचा उदयकाल - 'श्रीसाई शक'! ३११-३१६

"गुरुमार्गातील 'श्रीगणेशा' हा जीवनारंभ आहे. यात अनेक विचारांना उत्तर शोधावे लागते. यासाठी निष्ठा अपरंपार पाहिजे. ह्या मार्गातून जाताना अधिक क्षण दु:खाचेच असतात; पण त्यामुळे निराश होऊन चालणार नाही. ज्या सुखाबद्दल आपण दु:खी असू ते दु:ख नाही; ती घटना आहे. ती जिंकण्यासाठी गुरुमार्ग आहे."

**— श्री सद्गुरुनाथ दादा —**

"जीवनात दु:खाचे क्षण फारच थोडे आहेत; पण अज्ञानाचे तास अधिक असल्याने, दु:खाचे क्षण दिवस बनतात; व कालांतराने ह्याचीच वर्षे बनतात. वास्तविक जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या सुखाची तरतूद परमेश्वराने केलीच आहे. सुगंधित फुलाचा काटा लागणे हा फुलाचा दोष नाही; पण जरी लागला तरी तो सहन केला पाहिजे; कारण आपण सुगंधाचे भोक्ते आहोत."

# पुण्याहवाचन
# गुरुवाणी

।। श्री गणेशाय नम: ।।

।। श्री जगद्गुरु साईनाथ महाराज,
नवनाथ आदी पुण्य विभूती ।।

यांच्या कृपाशीर्वादाने साधना मार्गात त्यांच्या आज्ञेने जे काही अमृतानुभव अनुभवले ते भक्तगणांना ज्ञात व्हावेत म्हणून त्यांच्याच कृपाशीर्वादाने हे 'आत्मनिवेदन' लिहिण्याची प्रेरणा मला प्राप्त झाली. त्या थोर विभूतींच्या चरणी हे 'आत्मनिवेदन' समर्पण.

आपला सेवक,

**दादा भागवत**

।। श्री साईनाथ ।।

# 卐 नांदी 卐

卐

**श्री साई शके १७**
**गुढीपाडवा १८-३-१९९९**

श्री सद्‌गुरुनाथ दादा यांनी शब्दब्रह्मांकित केलेले हे आत्मनिवेदन म्हणजे गुरुभक्तांसाठी एक महापर्वणी आहे. श्री सद्‌गुरुनाथ दादा हे अवतारी पुरुष होते. त्यांच्या जन्माआधीच किंबहुना त्यांच्या वडिलांचे लग्न होण्याआधीच, पीरवाडीच्या महाराजांनी त्यांचे वडील श्री. भास्करराव यांना श्रीफल देऊन सांगितले होते की, ''तुला पहिला मुलगा होईल; त्याचे नाव 'दत्तात्रेय' ठेव''. याप्रमाणे वं. दादांचा जन्म झाला; आणि विश्वातील तीनही तत्त्वे पूर्णांशाने श्री दादांच्या रूपात प्रकट झाली. श्री साईनाथमहाराजांच्या आज्ञेनुसार, लोककल्याण व विश्वशांती यासाठी वं. दादांनी जे अफाट श्रम घेऊन, कार्यारंभ करून, कार्याची सांगता केली; हे कार्य म्हणजे श्री दत्तांच्या (श्री साईनाथमहाराज) आज्ञेनुसार, श्री दत्तांनीच (वं. दादा) केलेले अविश्रांत, अविस्मरणीय असे शाश्वत गुरुकार्य होय.



महाशिवरात्रीच्या दिवशी पंढरपूर येथे मुक्काम असताना, वं. दादा श्री विठ्ठलांच्या दर्शनाला गेले असता, त्यांना श्री विठ्ठलांचा आदेश झाला की, ''आजपर्यंत जे संतमहात्मे होऊन गेले, त्यांनी परमार्थाची वाटचाल करीत असताना, त्यांना जे अनुभव आले ते भक्तजनाकडे प्रकट केले नाहीत. त्यामुळेच परमार्थ हा विषय गूढ राहिला. परंतु आता, परमार्थातील साधना करीत असताना, आपणास आलेले अनुभव आपण भक्तभाविकांसमोर प्रकट करावेत; म्हणजे परमार्थ हा विषय गूढ न राहता, भक्ताना त्याचे ज्ञान होऊन, त्यांचा कल परमार्थाकडे राहील.'' या आज्ञेनुसार गुरुमार्गातील साधनसिद्धता करीत असता, श्री दादांना गुरुआज्ञेने आलेले अनुभव, त्यांनी आपल्या 'आत्मनिवेदनात' भक्तभाविकांसमोर प्रकट केले आहेत. श्री दादांनी प्रकट केलेले हे परमार्थातील परम अनुभव, प्रत्यक्ष श्री विठ्ठलांच्या म्हणजेच श्री विष्णूंच्या आदेशानुसार, गुरुआज्ञेने आणि गुरुप्रेरणेनुसार भक्तभाविकाना ज्ञानी करून, त्याना जन्मकारण उमजावे व त्यांच्या जीवनाचे सार्थक व्हावे, ह्या हेतूने शब्दब्रह्मांकित केले गेले आहेत. श्री दादांनी आयुष्यभर इतरेजनासाठी कार्य केले. स्वत:साठी काही न मागता, त्यांनी विश्वकल्याणासाठी श्रीगुरूंच्याकडे याचना केली. स्वत: कष्ट सोसून, सिद्ध केलेल्या सिद्धसिद्धांत पद्धती व साधना त्यांनी सेवकांकडे सुपूर्द केल्या; जेणेकरून विश्वकल्याण व विश्वशांतीचे कार्य अविरत चालू राहील. शिरोडा येथे आठ संमेलनात त्यांना प्राप्त झालेल्या गुरुदक्षिणेचे धन, त्यांनी स्वाध्याय मंडळाला देऊन, त्याचा उपयोग त्यांनी जनकल्याणासाठी केला; जेणेकरून गरजवंतांची गरज आशीर्वादरूपी धनाने पूर्ण करण्याची निरंतर तरतूद त्यांनी करून ठेवली. अशा रीतीने नि:संगपणे त्यांनी त्यांची ऐहिक व पारमार्थिक ठेव, विश्वकल्याणासाठी भक्तभाविकांकडे सुपूर्द केली. 'गुरुप्रसाद' व 'आत्मनिवेदन' या ग्रंथांमधील परमार्थातील सर्वोच्च ज्ञानानुभवांचे सर्वाधिकार श्रीदादांनी त्यांच्या गुरूंना अर्पण केले; व म्हणूनच या गुरुशक्तीला हृदयात धारण करणाऱ्या प्रत्येक भक्तभाविकाला, या ज्ञानानुभवांचे सर्वाधिकार आपोआपच प्राप्त होतात. श्रीज्ञानेश्वरांनी विश्वात्मक देवाकडे मागितलेले 'पसायदान', अशा रीतीने विश्वकल्याण व विश्वशांती यासाठी भक्ति-प्रेम-ज्ञानातून श्रीदादांनी कार्यान्वित केले आहे. मुंबई येथे

साधनासंमेलनामध्ये, 'आत्मनिवेदनाचे' वाचन व त्यावर मुलाखती वं. दादांनी घेतल्या. ह्या साधनासंमेलनात, शेवटच्या दिवशी 'गुरुप्रसाद' व 'आत्मनिवेदन' हे दोन ग्रंथ भक्तभाविकाकडे सुपूर्द करताना ते म्हणाले, "हे दोन ग्रंथ म्हणजे परमार्थातील ज्ञानाचा परमोच्च ठेवा आहे. हा ठेवा पुढील पिढयाना प्राप्त होऊन, त्यांची ऐहिक व पारमार्थिक प्रगती व्हावी; म्हणून मी आज हे दोन्ही ग्रंथ आपण भक्तभाविकाकडे ठेव म्हणून सुपूर्द करीत आहे. हा अमोलिक ठेवा आपण प्राणापलीकडे जतन करा; जेणेकरून पुढील पिढयाना त्याचा जीवनकल्याणार्थ उपयोग होईल."

आत्मनिवेदन या शब्दाचे दोन अर्थ संभवतात. एक म्हणजे स्वत:ला आलेल्या अनुभवांचे निवेदन; किंवा दुसरे म्हणजे स्वत:च्या आत्म्याला आलेल्या अनुभवांचे निवेदन. हे दोन्ही अर्थ श्री दादांच्याबाबतीत तंतोतंत लागू पडतात; कारण वं. दादा हे काया-वाचा-मनाचे एकरूपत्व झालेले परमात्मस्वरूप होते. अशा या परमात्म्याच्या परमार्थ अनुभवांचे निवेदन म्हणजे परमार्थाचे परिपूर्ण ज्ञान आहे. एक थोर ज्ञानयज्ञ आहे. या अनुभवांचे श्रीदादांनी केलेले कथन, म्हणजे भक्तिरसाने सुशोभित झालेला 'वाग्यज्ञ' आहे. शब्दब्रह्माचे तेजस्वरूप आहे! वेदनेशिवाय सृजन नाही; त्याचप्रमाणे वेदनेशिवाय निवेदन नाही. एका अवतारी पुरुषाने इतरेजनांच्या कल्याणासाठी, त्यांच्या जीवनाचे सार्थक करताना व त्याना वेदनामुक्त करताना, ज्या वेदना कार्यसिद्धी करताना स्वत: सहन केल्या, व त्याचा इतरापाशी उच्चारही केला नाही, त्या वेदनेद्वारे त्यांच्या आत्म्याने केलेले परमार्थप्रकटीकरण, म्हणजेच श्री दादांचे 'आत्मनिवेदन'!

निवेदन या शब्दात नि-वेद-न अशी चार अक्षरे आहेत. त्याचा अर्थ म्हणजे वेदांनाही न आकळलेल्या (वेद-न) ज्ञानाचे निरूपण. वेद जिथे 'नेति' 'नेति' म्हणतात, त्यापलीकडे अवधूत म्हणजे गुरू, भक्ताचे बोट धरून भक्ताला घेऊन जातात; व त्याला ज्ञानी करतात. 'आत्मनिवेदन' म्हणजे श्रीगुरूंनी भक्ताला दिलेले वेदांच्या पलीकडले ज्ञान होय. 'गुरुप्रसाद' व 'आत्मनिवेदन' हे श्री दादांचे दोन दिव्य ग्रंथ आहेत. यात पिंड-ब्रह्मांडाचे परिपूर्ण ज्ञान आहे. प्रपंच-परमार्थाचे 'पूर्णात् पूर्णमिदं' असे सुबोध व रसाळ विवेचन आहे. 'गुरुप्रसाद' म्हणजे 'गुरुगीता' होय, व 'आत्मनिवेदन' म्हणजे 'गुरुचरित्र' होय. 'गुरुप्रसाद' ग्रंथाचे पारायण व त्याची जीवनात अखंड धारणा, म्हणजेच श्रीगुरूंच्या कृपाप्रसादाची प्राप्ती होय! त्याचप्रमाणे 'आत्मनिवेदनाचे' पारायण व त्यातील गुरुज्ञानाचा आपले चरित्र घडविण्यासाठी विनियोग, म्हणजे श्रीगुरूंच्या चरणांशी भक्ताचे निरंतर अढळ स्थान होय! श्रीगुरूंचा कृपाप्रसाद प्राप्त होणे व त्यांच्या चरणी अढळ स्थान प्राप्त होणे; यापरता ईश्वरी साक्षात्काराचा दुसरा 'परम-अर्थ' कोणता? श्रीगुरू, गुरुमार्ग, गुरुशक्ती व तिचा आविष्कार, यांचा पाया म्हणजे ग्रंथ 'गुरुप्रसाद'! व यांचा कळस म्हणजे 'आत्मनिवेदन'! अशा या गुरूंच्या ज्ञानमंदिरात भक्तीने तृषार्त झालेला गुरुभक्त जेव्हा प्रवेश करील, त्यावेळी ज्ञान आणि प्रेम यानी परिपूर्ण होऊन, 'सेवक' अवस्थेचा तो अंगीकार करील हे नि:संशय!

आज श्रीदादांचे 'आत्मनिवेदन' प्रकाशित होऊन, इतराना ते प्रकाशित करीत असता, श्रीगुरूंच्या अनेक आठवणी हृदयात उचंबळून येत आहेत. अशा प्रेमळ, ज्ञानी व अवतारी गुरूंचे सान्निध्य व कृपाशीर्वाद लाभणे म्हणजे, 'काय पुण्य मी केले नकळे अवधूत भेटला'; असेच म्हणण्यासारखे आहे. या परमगुरूंच्या भेटीचे वर्णन केवळ श्रीगुरूच करू शकतील. म्हणूनच श्रीपंतमहाराजांच्याच शब्दात गुरुभेटीचे व गुरुमहिमेचे खालील वर्णन करतो,

"सद्गुरू मिळणे फार कठीण. अपार पूर्वसुकृत असल्याशिवाय गुरूंची गाठ नाही. ब्रह्मांडांची ब्रह्मांडे तराजूच्या एका पारडयात घालून सद्गुरुदर्शनलाभाचे पुण्य दुसऱ्यात घातले असता, दर्शनलाभाचे पारडे अचलच राहील व किंचितही जागा सोडणार नाही. सद्गुरुदर्शनमहिमा असा आहे. सद्गुरुदर्शन दिवस हा अनंत जन्मातील एक सुदिन पर्वकाळ व दिव्ययोग घटिका आहे. सद्गुरुदर्शनच बुद्धिसूर्याचे उत्तरायण, स्वर्गद्वाराचे, मुक्तिद्वाराचे उद्घाटन व भाग्योदय महायोग, सर्व तीर्थाटणे, सर्व व्रते, सर्व साधने, सर्व उपासना, सर्व जप-तप-अध्ययन, सर्व सत्कर्मे, सर्व परोपकार ही एकाच काळी, एकाच क्षणी सद्गुरुदर्शनयोगे फळतात. 'काशीक्षेत्रं तन्निवासं जान्हवी चरणोदकम्' या वचनाची सद्गुरुदर्शनाने सार्थ सिद्धी होते. याहून श्रेष्ठ लाभ होणे नाही. 'धन्य

साधनासंमेलनामध्ये, 'आत्मनिवेदनाचे' वाचन व त्यावर मुलाखती वं. दादांनी घेतल्या. ह्या साधनासंमेलनात, शेवटच्या दिवशी 'गुरुप्रसाद' व 'आत्मनिवेदन' हे दोन ग्रंथ भक्तभाविकाकडे सुपूर्द करताना ते म्हणाले, "हे दोन ग्रंथ म्हणजे परमार्थातील ज्ञानाचा परमोच्च ठेवा आहे. हा ठेवा पुढील पिढयाना प्राप्त होऊन, त्यांची ऐहिक व पारमार्थिक प्रगती व्हावी; म्हणून मी आज हे दोन्ही ग्रंथ आपण भक्तभाविकाकडे ठेव म्हणून सुपूर्द करीत आहे. हा अमोलिक ठेवा आपण प्राणापलीकडे जतन करा; जेणेकरून पुढील पिढयाना त्याचा जीवनकल्याणार्थ उपयोग होईल."

आत्मनिवेदन या शब्दाचे दोन अर्थ संभवतात. एक म्हणजे स्वत:ला आलेल्या अनुभवांचे निवेदन; किंवा दुसरे म्हणजे स्वत:च्या आत्म्याला आलेल्या अनुभवांचे निवेदन. हे दोन्ही अर्थ श्री दादांच्याबाबतीत तंतोतंत लागू पडतात; कारण वं. दादा हे काया-वाचा-मनाचे एकरूपत्व झालेले परमात्मस्वरूप होते. अशा या परमात्म्याच्या परमार्थ अनुभवांचे निवेदन म्हणजे परमार्थाचे परिपूर्ण ज्ञान आहे. एक थोर ज्ञानयज्ञ आहे. या अनुभवांचे श्रीदादांनी केलेले कथन, म्हणजे भक्तिरसाने सुशोभित झालेला 'वाग्यज्ञ' आहे. शब्दब्रह्माचे तेजस्वरूप आहे! वेदनेशिवाय सृजन नाही; त्याचप्रमाणे वेदनेशिवाय निवेदन नाही. एका अवतारी पुरुषाने इतरेजनांच्या कल्याणासाठी, त्यांच्या जीवनाचे सार्थक करताना व त्याना वेदनामुक्त करताना, ज्या वेदना कार्यसिद्धी करताना स्वत: सहन केल्या, व त्याचा इतरापाशी उच्चारही केला नाही, त्या वेदनेद्वारे त्यांच्या आत्म्याने केलेले परमार्थप्रकटीकरण, म्हणजेच श्री दादांचे 'आत्मनिवेदन'!

निवेदन या शब्दात नि-वेद-न अशी चार अक्षरे आहेत. त्याचा अर्थ म्हणजे वेदांनाही न आकळलेल्या (वेद-न) ज्ञानाचे निरूपण. वेद जिथे 'नेति' 'नेति' म्हणतात, त्यापलीकडे अवधूत म्हणजे गुरू, भक्ताचे बोट धरून भक्ताला घेऊन जातात; व त्याला ज्ञानी करतात. 'आत्मनिवेदन' म्हणजे श्रीगुरूंनी भक्ताला दिलेले वेदांच्या पलीकडले ज्ञान होय. 'गुरुप्रसाद' व 'आत्मनिवेदन' हे श्री दादांचे दोन दिव्य ग्रंथ आहेत. यात पिंड-ब्रह्मांडाचे परिपूर्ण ज्ञान आहे. प्रपंच-परमार्थाचे 'पूर्णात् पूर्णमिदं' असे सुबोध व रसाळ विवेचन आहे. 'गुरुप्रसाद' म्हणजे 'गुरुगीता' होय,



व 'आत्मनिवेदन' म्हणजे 'गुरुचरित्र' होय. 'गुरुप्रसाद' ग्रंथाचे पारायण व त्याची जीवनात अखंड धारणा, म्हणजेच श्रीगुरूंच्या कृपाप्रसादाची प्राप्ती होय! त्याचप्रमाणे 'आत्मनिवेदनाचे' पारायण व त्यातील गुरुज्ञानाचा आपले चरित्र घडविण्यासाठी विनियोग, म्हणजे श्रीगुरूंच्या चरणांशी भक्ताचे निरंतर अढळ स्थान होय! श्रीगुरूंचा कृपाप्रसाद प्राप्त होणे व त्यांच्या चरणी अढळ स्थान प्राप्त होणे; यापरता ईश्वरी साक्षात्काराचा दुसरा 'परम-अर्थ' कोणता? श्रीगुरू, गुरुमार्ग, गुरुशक्ती व तिचा आविष्कार, यांचा पाया म्हणजे ग्रंथ 'गुरुप्रसाद'! व यांचा कळस म्हणजे 'आत्मनिवेदन'! अशा या गुरूंच्या ज्ञानमंदिरात भक्तीने तृषार्त झालेला गुरुभक्त जेव्हा प्रवेश करील, त्यावेळी ज्ञान आणि प्रेम यानी परिपूर्ण होऊन, 'सेवक' अवस्थेचा तो अंगीकार करील हे नि:संशय!

आज श्रीदादांचे 'आत्मनिवेदन' प्रकाशित होऊन, इतराना ते प्रकाशित करीत असता, श्रीगुरूंच्या अनेक आठवणी हृदयात उचंबळून येत आहेत. अशा प्रेमळ, ज्ञानी व अवतारी गुरूंचे सान्निध्य व कृपाशीर्वाद लाभणे म्हणजे, 'काय पुण्य मी केले नकळे अवधूत भेटला'; असेच म्हणण्यासारखे आहे. या परमगुरूंच्या भेटीचे वर्णन केवळ श्रीगुरूच करू शकतील. म्हणूनच श्रीपंतमहाराजांच्याच शब्दात गुरुभेटीचे व गुरुमहिमेचे खालील वर्णन करतो,

"सद्गुरू मिळणे फार कठीण. अपार पूर्वसुकृत असल्याशिवाय गुरूंची गाठ नाही. ब्रह्मांडांची ब्रह्मांडे तराजूच्या एका पारडयात घालून सद्गुरुदर्शनलाभाचे पुण्य दुसऱ्यात घातले असता, दर्शनलाभाचे पारडे अचलच राहील व किंचितही जागा सोडणार नाही. सद्गुरुदर्शनमहिमा असा आहे. सद्गुरुदर्शन दिवस हा अनंत जन्मातील एक सुदिन पर्वकाळ व दिव्ययोग घटिका आहे. सद्गुरुदर्शनच बुद्धिसूर्याचे उत्तरायण, स्वर्गद्वाराचे, मुक्तिद्वाराचे उद्घाटन व भाग्योदय महायोग. सर्व तीर्थाटणे, सर्व व्रते, सर्व साधने, सर्व उपासना, सर्व जप-तप-अध्ययन, सर्व सत्कर्मे, सर्व परोपकार ही एकाच काळी, एकाच क्षणी सद्गुरुदर्शनयोगे फळतात. 'काशीक्षेत्रं तन्निवासं जान्हवी चरणोदकम्' या वचनाची सद्गुरुदर्शनाने सार्थ सिद्धी होते. याहून श्रेष्ठ लाभ होणे नाही. 'धन्य

दर्शने जाहलो। अन्य सर्व विसरलो।।' ग्रंथावर ग्रंथ वाचून उलथे केले, नि:शेष केले, तरी मनाच्या जाळ्यात, कल्पना प्रवाहात मनुष्य अडकलेला असतो. मनाच्या व शब्दाच्या पलीकडे त्यास जाता येणार नाही. तेव्हा या ठिकाणी त्यास हात देऊन, मोक्षकपाटद्वारे उघडून, उन्मनी मंदिरी उचलून नेऊन, सायुज्य देऊन, प्रेमामृतपान करविणे; ही सद्गुरूचीच लीला आहे. येथे गुरूच पाहिजे. अन्य कोणाचे, देवाधिदेवाचेसुद्धा काही चालत नाही. ही अखंड सौभाग्यदेणगी एका सद्गुरूचीच. त्याचा हा सहज खेळ आहे. 'मौज पहा ही सद्गुरुघरची आनंदाची स्थिती ही साची' असा सद्गुरुमहिमा अपार आहे.''

आत्मनिवेदनाची ही नांदी म्हणजे श्रीगुरूंनी गाईलेली गुरुशक्तीची महती आहे. प्रेरणा, शब्द व अर्थ हे त्यांचेच आहेत. त्यांची सेवा करण्याची संधी त्यांनीच दिली; याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. अशीच सेवा करण्याची संधी वारंवार व निरंतर मिळावी, ही त्यांच्या चरणी प्रार्थना! 'हेचि ज्ञान देगा देवा तुझा विसर न व्हावा'; ही जन्मोजन्मी श्रीगुरूंशी याचना करणारा -

- एक विनम्र सेवक.



# श्री मंगलाचरण

स जयति सिंधुरवदनो देवो यत्पादपंकजस्मरणम् ।
वासरमणिरिव तमसां राशीन्नाशयति विघ्नानाम् ।।१।।

या कुन्देंदुतुषारहार धवला या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावरदंडमंडितकरा या श्वेतपद्मासना ।।

या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वंदिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती नि:शेषजाडयापहा ।।२।।

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वंदे परमानंद माधवम् ।।३।।

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ।।४।।

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।
देवकीपरमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ।।५।।

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुरेव परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।६।।

श्रोता वक्ता श्रीपांडुरंगः समर्थः ।
पुंडलीकवरदा हरि विठ्ठल ।
पार्वतीपते हर हर महादेव ।
सीताकांतस्मरण जय जय राम ।।

सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज की जय ।।
श्री गुरुदेव दत्त - सदानंदाचा येळकोट ।।
सच्चिदानंद सद्गुरू श्रीपंतमहाराज की जय ।।

।। श्रीगुरुदेवदत्त ।।

# श्री गणेश वंदना - श्री सरस्वती वंदना

श्री गणेशायनमः । ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या । जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥
देवा तूंचि गणेशु । सकलमतिप्रकाशु । म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो जी ॥ अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल । मकार महामंडल । मस्तकाकारे ॥ हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म प्रगटले । ते मियां श्रीगुरुकृपा नमिले। आदिबीज ॥
आता अभिनववाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी । ते श्रीशारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ॥

## ॥ पसायदान ॥

आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे । तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥ जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परे पडो । मैत्र जीवाचे ॥ दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो । जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥ वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥ चलां कल्पतरूंचे आरव । चेतनाचिंतामणीचे गाव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिही लोकी । भजिजो आदिपुरुखी । अखंडित ॥ आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकी इये । दृष्टादृष्ट विजये । होआवे जी ॥ तेथ म्हणे श्री विश्वेशरावो । हा होईल दान पसावो । येणे वरे ज्ञानदेवो । सुखिया झाला ।

॥ शुभं भवतु ॥



॥ ॐ ॥

# दैनंदिन प्रार्थना

हे भगवंता नारायणा, आमच्या कुटुंबाच्या उद्धाराकरिता ज्या दिव्य, पुण्य विभूती, स्वतःला अनेक तऱ्हेचा त्रास सोसून देखील अहर्निश झटत आहेत, त्यांच्या उपदेशाप्रमाणे आणि आज्ञेप्रमाणे, आम्हा सर्वाकडून यथोचित वर्तन घडू दे. आमच्या हातून घडलेल्या पातकांची व प्रमादांची, या क्षणापासून तरी पुनरावृत्ति न होवो. बिकट आर्थिक आणि इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे वैतागून जाऊन आणि क्षुद्र मनोविकाराना किंवा कोत्या समजुतीना बळी पडून, आळसामुळे अथवा अज्ञानामुळे, आमच्या मनात त्यांचेविषयी जे काही अनुदार विचार आले असतील; अथवा अनुदार उद्‌गार तोंडावाटे निघाले असतील; किंवा त्यांच्या उपदेशाविरुद्ध कृति घडली असेल, त्या सर्वाबद्दल मी तुझी व त्या सर्वांची अनन्य भावाने क्षमा मागतो. आमच्या कुटुंबात सदैव सुख, शांति, समाधान व परस्पराविषयी जिव्हाळ्याचे प्रेम आणि भरपूर आनंद, ही नित्य वास करोत; व तसेच तुझे विषयीची अचल निष्ठा, आमचेपैकी प्रत्येकाचे अंतःकरणात सदैव जागृत राहो. आमच्या राहिलेल्या आयुष्यात, आमच्या हातून त्यांनी योजिलेले महत्कार्य, अत्यंत उत्साहाने आणि यशस्वीरित्या पार पडो; व इतरहि अनेक सत्कृत्ये प्रत्यही घडत राहोत; तेणेकरून त्या दिव्य, पुण्य विभूती आम्हावर सदैव संतुष्ट राहोत; व तुझीहि आमच्या कुटुंबावर अशीच अखंड कृपादृष्टि राहील; असे घडून येवो.

हे प्रभो, आमच्या कुटुंबातील सर्व व्यक्तीना आपापले कर्तव्यकर्म अहोरात्र पाळण्याची सुबुद्धि दे. पूर्वीच्या सत्कर्मानुसार आम्हापैकी काही व्यक्ति, आज जरी सुख भोगित असू, तथापि, 'पुढील जन्मांची तरतूद मनुष्याने याच जन्मी अतिप्रयत्नाने करावी', अशा तऱ्हेच्या तुझ्या नित्य शुद्ध वाचेने, तू जगाला जो धडा घालून दिला आहेस त्याला अनुसरून; आणि उपकाराची फेड अपकाराने न होईल, अशीच बुद्धि, हे दयाघना, कुटुंबातील सर्व व्यक्तीना तू दे, एवढीच मागणी तुझ्या चरणी अत्यंत लीन होऊन मी मागत आहे.

# श्री शक्तिपीठ प्रार्थना

## ।। श्री साईनाथ ।।

आम्ही गुरुभक्त, श्री जगद्गुरु साईनाथ महाराज यांचे चरणी, भक्तिभावनेने आज अशी प्रार्थना करीत आहोत की, आपण कृपावंत होऊन, जगत्कल्याणासाठी गुरुशक्तिपीठाची स्थापना करून दिली आहे. त्या शक्तिपीठाची सेवा विनम्र भावनेने, श्रद्धा, भक्ति, निरपेक्ष, निःस्वार्थ बुद्धीने करून, जे कोणी ह्या जगतात दुःखीकष्टी आहेत, त्यांची सेवा काया-वाचा-मनाने करू.

जगतात आम्हा मानवाना, प्राप्त झालेल्या जन्मातील कर्तव्याची जाणीव व्हावी; व जगतात सर्व मानवाला सुख, शांति, समाधानाचा लाभ होऊन, जगतात मानवी धर्माचा उदय होऊन, मानवी जीवन ईश्वरमय व्हावे, अशी आपल्या चरणी प्रार्थना.

**।। शुभं भवतु ।।**



# १. जीवन व जीवनारंभ

आज ह्या वर्षी ६ फेब्रुवारीला मला ६४ वर्षे पूर्ण झाली. त्यादिवशी सर्व भक्तभाविकानी शुभेच्छा प्रकट करून, माझा गौरव केलात. पण माझे जीवन म्हणजे काय? व कसे होते? याचा बोध झाला तर भवितव्यात हे जीवन प्रत्येकाला उपयोगी पडेल. नुसती स्तुती करून चालणार नाही. मनुष्य जन्माला आल्यावर जीवन जगण्यासाठी त्याला 'पैसा' ह्याची गरज भासतेच, पण त्यासाठी 'शिक्षण' हे आवश्यक आहे. ह्या कर्तव्यात एक 'ज्ञान' व दुसरे 'शिक्षण' असून, शिक्षणाने जीवनाचा प्रश्न सुटतो; पण फक्त खाणे व पिणे यासाठीच शिक्षणाचा विचार केला तर जीवन हे का प्राप्त झाले? ह्याचा बोध कुणालाही होत नाही. दुसरी बाजू 'ज्ञान'; ज्ञानाने मनुष्य 'आपण जन्माला का आलो'? हा प्रश्न कसा सोडविता येईल? अशा विचाराप्रत जाईल; व मग त्याला जन्माला येणे ह्यामागे काय कारण आहे? हे समजू लागेल, व 'कारण' समजले म्हणजे तो आपले तन, मन कार्याच्या मागे लावेल. मग जीवनाचे मूल्य किती आहे? हे समजून, नंतर प्रत्येक क्षणी जीवनाचा विनियोग कारणासाठी व्यतीत होणे, असे जीवन उदयाला येते. केवळ जन्माला आल्यानंतर पोट भरणे, पैसा मिळविणे, नावलौकिक प्राप्त करणे, ह्याहीपेक्षा 'नावारूपाला येणे' हे जीवन आहे, याचा बोध होणे आवश्यक आहे. पण याचा लाभ जीवनात प्राप्त होणे, यासाठी गुरुकृपेची आवश्यकता आहे; व 'गुरुप्राप्ती' झाल्यावर ह्या समस्या सहज सुटू लागतात. म्हणून बाराव्या वर्षी केवळ शिक्षण घेण्यापेक्षा, ज्ञानाचा लाभ कसा होईल? याची वाट पहात मी राहिलो.

जीवनारंभी ज्यांची भेट झाली ते 'माझे गुरू'; असे म्हणता येण्यासारखे नव्हते. कारण त्यांची-माझी भेट झाल्यावर ते जे बोलत होते ते 'ज्ञान' होते, पण माझी पात्रता नसल्याने, मला त्या शब्दांचा बोध पन्नास वर्षांनी झाला, तेव्हा ते 'गुरू' होते, असे मी आता म्हणू लागलो. 'गुरू' ह्याचा अर्थ जीवनात 'स्थित्यंतर' होणे. केवळ शब्दानी गुरू करता येत नाही. त्यावेळी माझे वय लहान होते. त्यामुळे जरी गुरू भेटले

तरी 'गुरू' ह्या शब्दाचा अर्थ समजत नसल्याने, केवळ पित्याच्या आज्ञेचे पालन करण्याव्यतिरिक्त कर्तव्य मी मानत नव्हतो. कारण वडिलांना ही जाणीव होती की, ज्या गुरूंची मी सेवा करतो आहे ती व्यर्थ जाणार नाही. पुढे ह्या गुरूंचे 'गमन' झाल्यावर मला असे वाटू लागले की, आपण जीवनात एकटे राहिलो आहोत. जीवनाला जो एक आधार वाटत होता तो गेला आहे. पुन्हा काही तो आधार मिळणारा नाही. अशाच स्थितीत काही दिवस गेल्यावर, वडिलांना श्री भैरवनाथांचा दृष्टांत झाला; "मी अंधारात आहे, मला प्रकाशात येण्याची इच्छा आहे." ही आज्ञा वडिलांनी मला सांगितली; एवढेच नव्हे तर ते मला घेऊन चैत्र पौर्णिमेस श्रीभैरवनाथ मंदिराकडे डोंगरावर गेले. त्या दिवशी वडिलांनी पणती लावून, श्रीभैरवनाथ मंदिरात प्रकाश केला; व मला पुढे बोलावून, "रोज नियमाने तू येऊन, ह्या देवळातील पणतीत तेल घालून, प्रकाश करीत जा," असे सांगितले. या नियमाप्रमाणे मी नित्यनियमाने ह्या मंदिरात जाऊन, तेल घालून, दिवा लावीत असे; पण त्यावेळी "प्रकाश करीत जा"; ह्या आज्ञेचा बोध झाला नाही. हे स्थान किती पवित्र व स्वयंभू आहे, ह्याची प्रचिती एका पौर्णिमेला आली. मी सकाळी रामभाऊबरोबर पूजासाहित्य घेऊन दर्शनार्थ गेलो असता व हळूहळू डोंगर चढताना, शिटीचा आवाज ऐकू येऊ लागला. समोर जे दृष्टीस पडले ते पाहून, भयभीत होऊन, मी व रामभाऊ यांनी लोटांगण घातले. त्याक्षणी शिटीचा आवाज बंद झाला. समोर श्रीशेष, श्रीभैरवनाथांचे जवळ बसले आहेत; असे दृष्य पाहिले. हा चमत्कार आहे की सत्य आहे? ह्या संभ्रमात मी कैक दिवस होतो. कारण त्या दिवसापासून एक वेगळाच अनुभव मी घेत होतो. हा प्रकार काय आहे हे तरी विचारणार कोणाला? शेवटी वडिलांना सर्व हकीगत निवेदन केली. त्यावेळी "श्रीशेषाचे दर्शन झाले तो भास किंवा चमत्कार नसून, प्रत्यक्ष श्रीशेषांनी दर्शन दिले आहे", असे वडिलांनी निवेदन केले. त्यामुळे 'देव आहे'; ही बाजू दृढ होऊन, मी शंभर टक्के आस्तिक होऊन, त्यापुढील आयुष्यात नुसता चमत्कार किंवा दृष्टांत झाला, म्हणून ईश्वरावर विश्वास ठेवून गप्प बसलो नाही, तर ह्या सर्व घटना काय घडतात? व त्यामागे काय कारण आहे? याचा शोध लावून, जगाला सांगणे आपले इष्टकर्तव्य आहे; याची शास्त्रीय मीमांसा त्यांच्याच कृपेने शोधावी, असा संकल्प विचारात घेतला. ही बाजू देवाची झाली; पण वडील ज्यांना मानीत होते, ती व्यक्ति सामान्य दिसत असूनही ती असामान्य आहे; हे कसे पटावे?

एके दिवशी वडिलांची व त्यांची भेट रस्त्यात झाली असताना, "मला जेवू घालीत जा", असे हाक मारून त्यांनी वडिलांना सांगितले. ताबडतोब वडिलांनी घरी येऊन, माझ्या आईला जेवण करण्यास सांगितले. जेवणात फक्त भाकरी व मेथीची भाजी होती. ती घेऊन वडील गेले. तोपर्यंत ते सत्पुरुष त्यांच्या घरी पोहोचले होते. वडील जेवणाचा डबा तिथे घेऊन गेले असता, "मला जेवण पाहिजे आहे; पण तुझ्याकडून नको. तुझ्या मोठया मुलाला पाठवून दे. तरच मला जेवण आण, नाहीतर नको"; असे ते म्हणाले. वडील घरी आले व मला म्हणाले, "तुला तेलीमहाराज माहीत आहेत का?" मी "होय" म्हणालो. तर "त्यांनी हा डबा घेऊन तुलाच बोलावले आहे; नाहीतर मला जेवण नको आहे, असे ते म्हणाले. तेव्हा तू घेऊन जा." त्याप्रमाणे मी महाराजांना डबा घेऊन गेलो. डबा पाहताच म्हणाले, "त्या फळीवर ठेव व दुसरा डबा इकडे आण." त्याप्रमाणे मी केले, पण मी नेलेला डबा त्यांनी त्यादिवशी खाल्ला नाही. असा नित्यक्रम चालू होता. पुढे वार्षिक परीक्षा जवळ येऊ लागली व माझा दररोज डबा नेण्यात अर्धा दिवस जाऊ लागला. शेवटी मन घट्ट करून महाराजांना विचारले, "बाबा, माझी परीक्षा आता जवळ येऊ लागली आहे व अभ्यासास वेळ पुरत नाही; तर काय करू?" ज्या वर्गात मी शिकत होतो, त्यापूर्वीच्या परीक्षेत मला सत्त्याऐंशी टक्के गुण मिळाले होते. पुढे काय होणार? म्हणून बाबांना विचारताच त्यांनी माझे केस धरून सांगितले, "शिकून जगाला आग लावू नकोस. आग लागली आहे ती विझव." मला काही अर्थ समजला नाही. पुढील परीक्षा झाली; व परीक्षेचा रिझल्ट लागून, मला तेहेत्तीस टक्के गुण मिळाले. मी अतिशय निराश झालो. वडिलांनी सांगितले की, "पुन्हा अभ्यास कर". त्याप्रमाणे मी अभ्यास करू लागलो तर महाराज म्हणाले, "शीक, शीक, कसा आग लावतोस ते बघतो मी." पुन्हा परीक्षा झाल्या व शेवटी मी नापास झालो. आणखी मनाने खचलो. पुढे काय

करावे? घरातला वडील मनुष्य, भवितव्यात शिक्षण नाही, उभा तरी कसा राहणार? ह्या विचारानी काहूर माजले. शेवटी वडिलांना विचारले, ''आता पुढे काय करू?'' वडिलांनी सांगितले, ''महाराजांची आज्ञा होईल तसे कर.'' जगतातील लोक आपली मुले पास व्हावीत म्हणून महाराजांचा आशीर्वाद घेत आहेत हे मी पाहिले असताना, मला नापास करताना हे वाक्य बोलताना मी ऐकलेले होते; ''शीक, शीक, कसा आग लावतोस ते मी बघतो.'' शेवटी मी महाराजांकडे गेलो. ''आता पुढील आयुष्यात काय करू?'' मी त्यांना सर्व परिस्थिती निवेदन केली. त्यावेळी माझ्याकडे पाहून असे उद्गार काढले, ''देवासारखा देव असून रडतोस काय? जन्माला येणारा मनुष्य कर्माला रडतो. तूच तर देव आहेस. मी गेल्यावर ही प्रचिती अनुभवाला येईल, पण मी नसणार! शहाणा हो; व भैरवनाथांनी 'प्रकाश लाव'; असे सांगितले आहे, त्या वाक्याचा अर्थ ब्रह्म म्हणून विचार कर. जास्त खोलात जाऊ नकोस, नाहीतर बुडून मरशील.'' त्यावेळी शब्दाचा अर्थ असतो हे कळले, तो म्हणजे एक व्यावहारिक व दुसरा तात्त्विक. आता माझा मीच विचार केला की, जगाचे भवितव्य ज्यांना कळते त्यांना माझे भविष्य सांगावयाचे नव्हते; पण घडवावयाचे होते, ते त्यांना घडवू देत. असे ज्ञान होताच, 'आज्ञा' समजून गप्प बसलो. पुढे नियमित श्रीभैरवनाथाला जाऊ लागलो. आता शाळेला 'श्री' म्हटले होतेच; त्यामुळे वेळ भरपूर होता. मनाला स्थिरता लाभून, मन हे काबूत राहिले पाहिजे; यासाठी ''सकाळी रोज 'गुरुचरित्र' वाचत जा''; असे वडिलांनी सांगितले. ही आज्ञा शिरसावंद्य मानून, योग्य दिवस विचारून, वडिलांच्या हस्ते श्रीगुरुचरित्राची पोथी घेऊन, वाचनास आरंभ केला. पुढे एके दिवशी श्रीभैरवनाथांच्या मंदिरात गेलो होतो, त्यावेळी एक गुराखी येऊन माझी विचारपूस करू लागला. त्याने सांगितले, ''येथून एका फर्लांगावर एक पाण्याचा झरा आहे; व जिवंत पाणी आहे. नुसती पणती काय लावतोस? स्नान कर, मग देव काय म्हणतोय ते पहा.'' मी ह्या सांगण्याकडे दुर्लक्ष केले. पुढे तो गुराखी पुन्हा भेटला नाही; तेव्हा मीच झरा कोठे आहे? याचा शोध घेतला. तर खरोखरच देवळापासून एका फर्लांगावर पाण्याचा झरा वाहत असताना दिसला. पहिल्या दिवशी त्या झऱ्याचे पाणी ओंजळीने



प्राशन केले. ह्यामुळे तरतरी येऊन बरे वाटले. मग मंदिराकडे पणती लावण्यासाठी गेलो. नेहमीपेक्षा पणतीचा प्रकाश वेगळा पडला असून, चांदण्याचा प्रकाश असतो तसा भास झाला. त्याच रात्री असे वाटू लागले की, श्रीभैरवनाथांनी जो वडिलांना दृष्टांत दिला होता ''मला प्रकाशात ठेव''; त्याची साक्ष पटली.

अशा तऱ्हेने माझी श्रीभैरवनाथांची सेवा सुरू असताना, एक दिवस सायंकाळी नेहमीप्रमाणे पूजा करून, डोळे मिटून बसलो असताना, ध्वनि ऐकू येऊ लागला. त्याबरोबर मी उठून, कपडे घेऊन पळत सुटलो; व घरी आल्यावर वडिलांना म्हणालो, ''यापुढे भैरोबाकडे मला पाठवू नका. आज सायंकाळी ध्यान करीत असताना, मी भूताचा आवाज ऐकला.'' वडिलांनी शांतपणे ऐकून घेतले व ते हसू लागले. पण मग मला म्हणाले, ''अरे, ते स्थान पवित्र व स्वयंभू आहे. या ठिकाणी भूत येणे शक्य नाही. तुला काहीतरी भास झाला आहे. मी येतो तुझ्याबरोबर.'' आम्ही दोघे डोंगरावर गेलो. कुणीही मनुष्य नव्हते. नेहमीप्रमाणे स्नान केले व पूजा करून ध्यान करू लागताच, पुन्हा तो ध्वनि ऐकू येऊ लागला. मी पुन्हा घाबरलो. वडील बरोबर होतेच. ते म्हणाले, ''बाबा, नीट ध्वनि ऐक. हा ध्वनि भूताचा नाही.'' असे म्हटल्यावर मी शांतपणे बसून ऐकू लागलो. तेव्हा ते म्हणाले, ''ह्या ध्वनीला 'सिंहनाद' म्हणतात. जेव्हा देव प्रसन्न होतो, तेव्हाच असा नाद निर्माण होतो. हा ध्वनि नसून ॐ कार आहे. तू जन्माला का आलास हे गूढ होते; ते मला आज समजले. आपण शांतचित्ताने घरी जाऊ. आता तुझी भीति होती की, 'भूत' आहे; तेही बरोबर आहे. भूत याचा अर्थ, एखादी व्यक्ति मृत झाल्यावर त्यांची जी वासना, इच्छा शिल्लक राहते, तेव्हा तो आत्मा इच्छावासनेने ह्या जगात हिंडत असतो. एखादी चांगली गोष्ट गतकाळात घडते व त्याची पुनरावृत्ती व्हावी म्हणून निसर्गसुद्धा भूतकाळाची जाणीव आम्हा मानवाना देतो. पण ज्ञानाच्या अभावी तो निसर्गाच्या कृपेला पात्र होत नाही. जर तू 'भूत' म्हणत राहून श्रीभैरवनाथांकडे आला नसतास, तर जो ध्वनि आता ऐकलास, त्याला मुकला असतास. आता तुझी भीति गेली आहे. भवितव्यात कशाकशाचा लाभ होतो आहे? याचा विचार कर. सर्व जग

भूत, भविष्य व वर्तमान ह्या तिन्ही काळावर विश्वास ठेवून जगत आहे. परंतु ज्यामुळे लाभ निश्चित होणार आहे, त्या देवावर विश्वास ठेवत नाही.''

त्याकाळी मी शाळेत शिकत असताना गाणे हा विषय होता; त्यामुळे श्रीभैरवनाथांचा ध्वनि म्हणजे काय हे समजू शकलो. साधारणपणे संगीतामध्ये एक सप्तक म्हणजे खालील 'सा' पासून वरील 'सा' पर्यंत असते. ह्या क्रमाने एक वर्षात हा ॐकार संथेने शिकविला. पुढे हीच नित्य साधना करू लागलो. या उपासनेत कोणतीही देवदेवता यांचा संबंध किंवा आजपर्यंत जेवढे 'अवतारी पुरुष' म्हणून जे जन्माला आले, त्यांना 'गुरू' म्हणून मानणे, इत्यादी कशाचीही गरज पडली नाही. त्यामुळे जी ॐकार साधना दिली होती, तिचे पूर्णत्व प्राप्त झाले. पुढे चरितार्थासाठी काही मिळवावे, अशी इच्छा झाल्यामुळे पुण्यास आलो. आल्यावर काही नोकरीचा प्रयत्न केला, पण त्यात यश आले नाही. ह्या काळात नोकरीच्या संबंधाने ज्या व्यक्तींशी संबंध आले, त्याच व्यक्ति पुढे कालांतराने मला भेटून, 'स्वत:चे व धंद्याचे भवितव्य काय आहे?' याबद्दल विचारणा करत्या झाल्या, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

ह्या प्रयत्नात एक अनुभव निश्चित झाला, तो म्हणजे आपण प्रयत्न करूनही ज्याअर्थी यश आपल्याला प्राप्त होत नाही, याचा अर्थ 'परमेश्वराची इच्छा नाही'; असे समजून गप्प बसणे हिताचे आहे.



# २. मिलिटरीत भरती, श्रीभैरवनाथांचा आदेश, प.पू. बाबांची सेवा, संचार अवस्था

ह्या काळात जागतिक लढाई सुरू झाली. महागाई हळूहळू वाढू लागली; व ड्रॉईंगचे कामही महाग झाले. कालांतराने त्यासाठी लागणाऱ्या वस्तू बाजारात मिळेनाशा झाल्या. आता पुढे काय करावे? एक दिवस उठलो व संपूर्ण दिवस विचार करण्यासाठी विठ्ठलवाडीला जाऊन बसलो. तरी निश्चित विचार ठरविणे कठीण होऊन बसले. शेवटी निर्णय असा घेतला की, आपण मिलिटरीमध्ये जावे. येथे बसण्यापेक्षा नोकरीचा लाभ होऊन, बाहेरचे जग पहावयास मिळेल. याप्रमाणे पुढे काय होणार आहे? हा विचार पुन्हा मागे ओढू लागला. आपल्याला श्रीभैरवनाथांनी ॐकार साधना शिकविली आहे, तिचा लाभ कसा होईल? पुढे जर ही साधना करता आली नाही तर तिचा लाभ जगताला कसा देता येईल? एका बाजूला परमार्थ व दुसऱ्या बाजूला प्रपंच अशी अवस्था झाली. त्यावेळी मी माझ्या मामांच्याकडे रहात होतो. त्यांना विचारले, तर ते तरी काय सांगणार? 'जशी देवाची इच्छा असेल तसे घडेल', असा विचार करून शेवटी मी मिलिटरीत भरती झालो.

प्रथमत: काय सांगावे? हजारो लोक भरती होऊन आले, मी पण होतो. त्यावेळी भरती झाल्यावर एक वरिष्ठ अधिकारी प्रत्येकाला "तुला काय काम येते?" असे विचारू लागला. त्याप्रमाणे माझा नंबर आला. त्यानी विचारणा करताच मी म्हणालो, "मला मोटारचे काम येते". त्यानी माझी रवानगी टेस्टसाठी केली. संध्याकाळपर्यंत मी वर्कशॉपमध्ये वेगवेगळे काम केले. ते काम पाहून दुसरे दिवशी मला असे सांगण्यात आले की, "सहा महिने तुला वर्कशॉपमध्ये शिकण्यासाठी पाठविण्यात आले आहे. सहा महिन्यानंतर तुझी ग्रेड व रँक मिळेल." त्याप्रमाणे सहा महिन्यानंतर मला 'सुपरवायझरची' पोस्ट मिळाली; व नोकरीमध्ये वॉरंट-ऑफीसर II अशी बढती मिळाली. ज्या कामामध्ये माझी परीक्षा घेतली होती ते काम घरी असताना, आमच्या वडिलांचा वर्कशॉप होता व गाडया होत्या, तिथे मी केव्हा केव्हा पाहत असे. जेव्हा मी मिलिटरीत

आलो तेव्हा तेथील तेच काम पाहिल्यावर, माझी स्थिती 'एकीकडे आड, दुसरीकडे विहीर' अशी झाली. आता कसे जगायचे? पण ईश्वर पाठिशी असतो. त्याप्रमाणे भरती झाल्यावर आठ दिवसात एवढा मान मिळाला. वरिष्ठानी जेव्हा विचारले की, "तुला काय काम येते?" त्यावेळी माझ्या तोंडून हे सांगितले गेले की, "मला मोटारचे काम येते". ही सद्‌बुद्धी त्यावेळी सुचली म्हणून पुढचे कार्य घडले. अशा तऱ्हेने पाच वर्षे मी मिलिटरीत राहिलो. कामाव्यतिरिक्त जो वेळ मिळे, त्यात मी साधना करीत असे. वय लहान म्हणता येणार नाही, पण ह्या नोकरीमुळे जगाचा संबंध तुटला. पाच वर्षे बाहेर होतो. त्यामुळे विचार करून आपली दिशा पुढे ठरविता आली. पुढे हिंदुस्थानात जरी मी हिंडलो असतो तरी ते खर्चाचे होते. मिलिटरीमध्ये जाण्याने बगदाद व करबला येथील पवित्र स्थाने मला पहावयास मिळाली. पुढे हिंदुस्थानात परत आल्यावर मी डिस्चार्ज घेतला व पुन्हा घरी आलो. त्यावेळी वडील खूप थकले होते. त्यांनी सांगितले, "आता कोठेही जाऊ नकोस. जी तुला साधना दिली आहे ती सुरू कर". तेव्हा मी म्हणालो, "गेल्या पाच वर्षात मी झोपण्यापूर्वी नित्य साधना करतो आहे. त्यात एखादे वेळीच खंड पडला असेल, नाही तर मी सेवा अखंड करीत आहे." ते ऐकून त्यांना अतिशय आनंद झाला. पुढे नोकरीसाठी पुण्याला येण्यापूर्वी, श्रीभैरवनाथांच्या दर्शनास गेलो; व जोपर्यंत घरी सातारला होतो त्यावेळी नित्यदर्शनासाठी जात असे. एके दिवशी "परमपूज्य साईबाबांचे नाव ऐकले आहेस का?" असा ध्वनि आला. मी म्हणालो, "नाव ऐकले आहे." असे उत्तर माझ्या तोंडून निघताच श्रीभैरवनाथांनी सांगितले, "भवितव्यात त्यांची सेवा कर व आज्ञापालन कर, त्यात तुझे व इतरांचे कल्याण होईल."

पुढे पुण्याला आलो; व सरकारी नोकरी करू लागलो. पण श्रीभैरवनाथांच्याकडे जाऊन आल्यावर "प.पू. बाबांची सेवा कर"; अशी जी आज्ञा झाली होती, त्याप्रमाणे मी प.पू. बाबांचा लहान फोटो आणून, त्यांची सेवा सुरू केली. त्यामुळे हळूहळू भूत-भविष्य समजू लागले. हे सांगण्यामागे कोण आहे हे ही समजू लागलो. कोणत्याही शास्त्राचा आधार घेतला नाही. पुढे काही दिवसानी प.पू. साईबाबांची सेवा चालू असताना तळमळ ही होती की, प.पू. बाबांचे दर्शन घडावे. एके दिवशी पूजनासाठी बसलो असताना, मन एकाग्र झाले व डोळे मिटले; परंतु काही समजू शकलो नाही. अशा अवस्थेत काही दिवस गेले. "हा आपल्याला भास होत आहे की खरे आहे?" असा विचार करू लागलो. पण ज्या वस्तुस्थितीचा अनुभव मी घेतला तो खोटा नव्हता. मग असे का व्हावे? हे समजेना. पुढे एका गुरुवारी सायंकाळी मी पूजनासाठी बसलो. बराच वेळ गेला तरी उठू नये, असे वाटू लागले. साधारण रात्रीचे अकरा वाजले असतील. धड जाग नाही व झोप नाही; अशा अवस्थेत मी बसून राहिलो. निदान अजूनही ती अवस्था मला सांगता येत नाही. पण अनुभव हा विलक्षण होता हे मात्र खरे! अशा अवस्थेत मी बसून असताना, माझ्या डोक्यावर कोणीतरी हात ठेवला आहे असा भास झाला. तो हात कसा होता? तर अतिशय मऊ; व हाताच्या स्पर्शाने जी जाणीव झाली ती म्हणजे 'माया'. आता 'माया' याचा अर्थ आपण लावतो तो नसून, 'माया + आई = गुरुचे प्रेम' असा आहे. पण त्याक्षणी काय मागावे? काय बोलावे? याचाही विसर पडला व तो पडतोही! मी एवढेच मागितले, "माझ्या हातून ह्या जगाची पूर्ण सेवा घडू दे. आपण सद्‌गुरूंच्या ठिकाणी आहात. हे जग भवितव्यात कसे सुखी होईल? ही तळमळ लागली आहे." त्यांनी सुखाची गुरुकिल्ली आपल्या नावामध्ये आहे असे सांगितले. "अजून मला आपले स्मरण, नामस्मरण करता येत नाही. श्रीभैरवनाथांनी आज्ञा दिली आहे की, भवितव्यात हे जग तुमच्याशिवाय जगू शकणार नाही. म्हणून आपण जी आज्ञा कराल, त्याप्रमाणे वागेन. इच्छा शिकण्याची खूप होती, पण "शिकून जगाला आग लावू नकोस. लागलेली आग शांत कर;" असे तेलीमहाराज म्हणत होते. त्याचा अर्थ म्हणजे वेदान्त आहे. तेव्हा माझ्या काया, वाचा, मनाला ज्ञान द्या; एवढीच प्रार्थना." एवढे म्हणून मी आडवा झालो. सकाळी साडेपाच वाजता जाग आली, तर जगात जिवंत असून नसल्यासारखे वाटू लागले. म्हणजे जग अस्तित्वात आहे; पण कशाची तरी उणीव आहे; हे वाटू लागले. ही उणीव भरून काढणे शक्य आहे की, अशीच उणीव जगाच्या अंतापर्यंत वाढत जाणार?

अशा तळमळीने बाबांची सेवा जास्त मन लावून करू लागलो. पुढेपुढे प्रश्नावर प्रश्न उपस्थित होऊ लागले; व त्यांची उत्तरे आपोआप मिळू लागली. त्यावेळी जरी उत्तरे मिळाली तरी ज्या प्रश्नासंबंधी विचारणा होती, त्याचे प्रात्यक्षिक अनुभवास येण्यास वेळ लागला; एवढेच नव्हे तर काही तपे लागली. त्यावेळी मुख्य प्रश्न असे होते. विद्यानाश, धननाश, संततिनाश या दोषांचे निवारण गुरुकृपेने करता येईल किंवा नाही? हा प्रश्न नेहमी विचारत असता बाबा म्हणाले, "लहान तोंडी मोठा घास एकदम घेऊ नको. घास तसाच राहील व तोंड मात्र फाटेल!" हे उत्तर मिळाले, तेव्हा आपली चूक कोठे आहे हे कळले. कारण ज्या प्रश्नांची विचारणा केली होती, ती प्राप्ती जरी झाली होती तरी पात्रता त्यावेळी नव्हती. यासाठी "योग्यवेळी जेव्हा आज्ञा होईल तेव्हाच त्यांच्या कृपेने ह्या प्रश्नाचे उत्तर मिळेल;" अशा विचाराने सेवा चालू होती. लोकांची कामकाजे होत होती. कामानिमित्त येणाऱ्या भक्तभाविकांची संख्या वाढू लागली. त्यावेळेस प्रामुख्याने सिनेमा धंद्यातील लोक कामानिमित्त येत होते. ह्या लोकांचे आगमन होत असताना, त्यांच्या येण्या-जाण्याने गुरूंवर निष्ठा आहे की, यांचा लोभ जास्त वाटून त्या लोभाबरोबर वाहत चाललो आहे, अशा परीक्षेचा काळ होता. पैसा, व्यसने, कनक व कांता ह्या सर्व गोष्टी हात जोडून हजर होत्या. काय करावे? हे ठरविता येईना. कारण घरची परिस्थिती बिकट, घरात आठवडयाला रेशन आणायला पैसे नाहीत. ती परिस्थिती क्षणात बदलता आली असती. मी जर ह्या लोकांची मनधरणी केली असती तर! शेवटी निर्णय असा घेतला की, पैसा काही उपयोगी पडणार नाही. शेवटी 'गुरू' हेच साधन. ते 'जोडणे' हे पूर्वपुण्याईने प्राप्त होते. केवळ पैशासाठी ते 'तोडता' कामा नये. असा निर्णय घेतला की, एकवेळ उपाशी राहू, पण 'गुरूंना' अंतर द्यावयाचे नाही. नंतर जरी मी ह्या लोकाना भेटावयाचे बंद केले, तरीही हे लोक येतच होते. त्यावेळी मी नोकरीत होतो. नोकरी करून लोकाना भेटणे चालू होते. पण अशावेळी लोकाना भेटण्यासाठी घरी बोलवित नसे. याप्रमाणे दोन वर्षांचा काळ लोटला. त्यावेळी ज्या लोकांची ओळख झाली होती, त्यांच्यामुळे प्रचार झाला होता; व चांगले अनुभव लोक येऊन सांगत होते.



अशावेळी एक घटना घडली; ती म्हणजे शनिवारी व रविवारी मी मुंबईस जाऊ लागलो. ज्यांच्या घरी जात असे त्यांचा घरकामाला ठेवलेला नोकर गुजरातचा होता. पण लहानपणी त्याच्यासाठी त्याच्या आईवडिलानी काय नवस केला होता हे त्याला माहीत नव्हते. वयात आल्यावर तो नोकरीसाठी मुंबईला आला होता. तोच नोकर मुंबईला मी ज्या खोलीत राहत असे, ती खोली साफ करण्यासाठी आला असता, एकदम माझ्या खोलीतील प.पू. बाबांचा पूजेतला फोटो बघताच, त्याच्या अंगात काय आले हे न समजताच, धाडकन् पडून ओरडू लागला. त्यावेळी मी त्यांच्या स्टुडिओत गेलो होतो. दुसरा एक नोकर पळत येऊन सांगू लागला, "बाबूच्या अंगात भूत आले आहे व तो ओरडत आहे. तेव्हा तुम्हाला बोलावले आहे." तो काही बोलत होता, पण ते भूत नव्हते. त्यासाठी एका गुजराती माणसाला बोलावले.

अंगात आलेल्या व्यक्तीने सर्व खुलासा सांगितला; "मी भूत नसून देवी आहे. ह्या मुलाला लहानपणी त्याच्या आईवडिलानी मला वाहिला होता. तो आपल्या गावात राहून जे लोक अडीअडचणीत आहेत, त्याना मार्गदर्शन करावयाचे सोडून, इथे मुंबईला आला आहे. ज्या गोष्टी पालन करावयास पाहिजेत, त्या करीत नाही. म्हणून पूर्वी ह्या प्रकाराबद्दल मी त्याला ताकीद दिली होती. लहानपणी गावातील सगळे लोक ह्याला 'देवीभक्त' म्हणून ओळखत होते; व लोकानाही ह्याच्या सांगण्याचा गुण येत होता. पण मोठा झाल्यावर आज्ञापालन न केल्याने, मी ह्याची वाचा बंद केली आहे. नाहीतर पूर्वी हा बोलत असे. आता मुका असून, फक्त सांगितलेली कामे करतो. पण आज ही खोली साफ करण्याच्या निमित्ताने हा इथे आला; व प.पू. बाबांचा फोटो पाहून मी पुन्हा अंगात आले आहे. तेव्हा ह्या व्यक्तीला सांगा की, आपल्या गावी जा. अजूनही लोक वाट पाहत आहेत. त्यातच त्याचे कल्याण आहे." एवढे सांगून देवीचा संचार बंद झाला. मग मी जो खुलासा देवीने केला होता, तो त्यावेळी ज्या माणसाला बोलावले होते, त्याला सांगितला. त्याने गुजरातीमध्ये सर्व सांगितले; व यापुढे "ह्या महिना अखेरीस गावी जाईन", असे त्याने मला आश्वासन दिले.

पुढे तो गावी गेला. दोन महिने राहिल्यावर देवीने त्याला येऊन सांगितले, ''साईबाबांच्या भक्ताला ताबडतोब भेट. मला सुटका पाहिजे आहे. तू पालनपोषण करू शकणार नाहीस. मी येणाऱ्या नवरात्रीपूर्वी तुला सोडवणूक देणार आहे.'' त्याप्रमाणे तो पुन्हा मुंबईला आला; व प्रथम ज्यांच्याकडे नोकरी करीत होता, त्यांच्याकडे जाऊन सर्व सांगितले. त्यांच्याकडून मला निरोप आला की, बाबू मुंबईस आला आहे; व त्याच्याकडील देवीने मला बोलाविले आहे. त्याप्रमाणे मी मुंबईस गेलो. मुंबईस ज्या घरी बाबू राहत होता, तेथे गेल्यावर दुसरे दिवशी सकाळी पूजा, आरती झाल्यावर देवीचा संचार झाला. मी नमस्कार करून, ''काय सांगणे आहे?'' म्हणून देवीस विचारणा केली. तेव्हा त्या देवीने स्पष्ट खुलासा केला, ''ज्या कुटुंबात मी आज आहे, त्याला शंभर वर्षे झाली. गावाचा सांभाळ करावयाचा आहे; व ह्या कुटुंबाचा सांभाळ गावातील जे देवीभक्त आहेत ते करतील. पण आता मात्र हे लोक मला मानून सेवा करावयाची, ती सोडून पैसे मिळविण्यासाठी शहरात जातात. जी श्रेष्ठ गोष्ट वंशपरंपरेने मिळाली आहे, त्यापेक्षा त्याना पैसे अधिक श्रेष्ठ वाटत आहेत. त्यामुळे ह्या लोकानी आपला 'मान' होता, तो सोडून दिला आहे. यापुढे तुला माझी कार्यार्थ मदत हवी असेल, तर माझा आशीर्वाद तू घे''; असे म्हटल्यावर मी आनंदाने कबूल केले. यावेळी मला संचार म्हणजे काय? व कसा होतो? त्याची शास्त्रीय मीमांसा काय आहे? हे माहीत नव्हते. पुढे श्रावण महिना आला व त्यात तो अधिक! ज्येष्ठ महिन्यात ही घटना घडली. श्रावण महिना सुरू झाला व माझे अंग लटलट हलू लागले. हळूहळू विस्मरण होऊ लागले. समोरच्या व्यक्ति दिसेनाशा होऊ लागल्या. आजूबाजूचे लोक म्हणू लागले की, 'संचार होतो आहे'. मी मात्र ही अवस्था म्हणजे काय? याचा खुलासा बघत होतो. पण त्यावेळी ती अवस्था काय असू शकते? हे मात्र कळले नाही. आज जरी मी त्याचे स्पष्टीकरण सांगू शकतो आहे; किंवा दुसऱ्याने शंका विचारली असता, त्याला शास्त्रीय उत्तर देऊ शकतो आहे, तरी त्याक्षणी जी भूक लागली होती, त्याला उत्तर मिळत असे; ''सबूर''! ह्यामुळे जी अवस्था मी त्यावेळी अनुभविली, त्याचे उत्तर आता मिळत आहे. ह्याचा अर्थ असा की, मी जे जे काही प्रश्न प.पू. बाबांना विचारीत असे, त्याचे उत्तर देण्यास 'बाबा' काही असमर्थ होते असे नव्हे. 'साधक' अवस्थेत साधकाला कुतूहल वाटणे अगदी स्वाभाविक आहे. पण एकदा आपले नामी तत्त्व निश्चित झाले की, विचारलेल्या प्रश्नाचे समर्थन होईपर्यंत, साधकाने शांत राहणे हिताचे आहे.

पुढे श्रावण अधिक महिना आला. प्रत्येक मंगळवार व शुक्रवार, सकाळी व संध्याकाळी हा संचार होऊ लागला. येणारे भक्तभाविक त्याचा लाभ घेऊ लागले. अशावेळी शेवटच्या शुक्रवारी घरमालकाना हे आवडले नाही. त्यानी प्रथमपासून मला पाहिले असल्याने, ही अवस्था एकदम कशी प्राप्त होते? याबद्दल चर्चा सुरू झाली; व ''हे केवळ ढोंग असून, लोकाना नादी लावण्याचा हा प्रयोग आहे''; अशी चर्चा, त्यांची बायको व सुना उघडपणे करू लागल्या. शेवटच्या शुक्रवारी संचार झाला असताना, देवीने ह्या बाईना बोलावणे केले. त्याप्रमाणे त्या आल्या पण नमस्कार करण्यास तयार होईनात. इतर भक्तांनी सांगितले, ''दैवी संचार आहे, तुमचा विश्वास नसला तरी नमस्कार करण्याने आपले काही नुकसान होणार नाही''. त्यावर त्या बाई म्हणाल्या, ''मी देवीचा संचार बघितलेला आहे. हे केवळ ढोंग आहे. लोकाना जमविण्यासाठी हा संचार हे निमित्त आहे''. असे उद्गार त्या बाईनी काढल्यावर, ह्या देवीचा संचार शांतपणे म्हणाला, ''संकटाला आमंत्रण करू नकोस. मला फक्त कुंकू लाव व क्षमा माग''. पण त्या बाई ह्या संचाराला मानण्यास तयार होईनात. शेवटी देवी असे म्हणाली, ''तुला माझे सामर्थ्य पहायचे आहे का? घराचा खांब मी तीन दिवसात हलवीन''. असे म्हणून संचाराचे गमन झाले; व तिसऱ्या दिवशी त्या बाईचा मुलगा मरण पावला. ज्या रात्री ही घटना घडली, तेव्हा मी राहत्या घरून एका भक्ताच्या घरी रहावयास गेलो. तीन दिवस मला चैन पडेना. ही घटना हा योगायोग होता काय? काय व कसे घडले? भवितव्यात अशी घटना घडली तर कसे करावे? जग आज नास्तिकवादात आहे. खरे व खोटे हा वाद आहे. त्यातून मार्ग किती कठीण आहे. अजून कार्याला आरंभ

झाला नाही आणि हा संचार! त्याची प्रखरता केवढी आहे! अशा सर्व विचारात एक महिना सकाळी आरती झाल्यावर, मी विठ्ठलवाडीला जाऊन बसत असे, व विचार करीत असे की, भवितव्यात जगाला काय सांगावे?

पुढे एके दिवशी मला दृष्टांत झाला की, 'बहुचराई' देवीचे देऊळ इथून जवळ आहे. तेव्हा ह्या देवळात मी दर्शनासाठी गेलो; व पुढेही नित्य दर्शनासाठी जाऊ लागलो. पुढे देवीची आज्ञा झाली की, "माझी प्रतिष्ठापना तुझ्या नित्य साधनेत तू करीत जा." त्याप्रमाणे नित्याच्या पूजेत देवीचा टाक तयार करून, त्याची स्थापना केली. तेव्हा मुख्य प्रश्न जो संचार होण्यासंबंधी होता, त्याचे कृपाशीर्वादाने निवारण झाले.



# ३. श्रीक्षेत्र औदुंबर-सेवा

याप्रमाणे कामकाज होऊ लागले. परंतु ज्या मुख्य प्रश्नासंबंधी प. पू. बाबांना विचारणा केली होती, तो प्रश्न व त्याचे निराकरण बाकी होते. एके दिवशी प. पू. बाबांनी सांगितले, "जो प्रश्न मला विचारला होतास, त्या प्रश्नासंबंधी माझा आशीर्वाद आहे. पण तुला साधना करावयास पाहिजे. त्याबद्दल नीट विचार कर. गुरुमार्गात एकदा उचललेले पाऊल म्हणजे शीळेवरची रेघ! त्याप्रमाणे वागावयास पाहिजे. नाहीतर आज होकार देशील व मागाहून मला मार्ग झेपत नाही; असे म्हणशील. पण असे म्हणून चालणार नाही. तेव्हा अगोदर विचार कर". मी विचार करून शेवटी म्हणालो, "माझे हित कशात आहे? हे आपल्याला जास्त माहीत आहे; तेव्हा आपण आज्ञा कराल त्याप्रमाणे मी वागेन". एके दिवशी प. पू. बाबांनी सांगितले, "तू नोकरी एकाचीच कर. नोकरी एकाची व भाकरी दुसऱ्याची, अशी अवस्था असून चालणार नाही". याचा अर्थ असा होता की, यापुढे मी नोकरी करणे हिताचे नाही. त्याप्रमाणे मी नोकरीचा राजीनामा दिला; व घरी येण्यापूर्वी प. पू. बाबांची आज्ञा घेतली. पुढे काय होणार? त्यावेळी माझे लग्न झालेले होते; व चि. विजय एक वर्षाचा होता. अशा अवस्थेत तीन माणसांचे संगोपन कसे करावयाचे? हा प्रश्न पुढे होता. शेवटी आज्ञा अशी झाली, "क्षेत्र औदुंबरला जा. तेथे राहून दत्ताची सेवा कर. जे प्रश्न तू विचारले होतेस ते तसे विचारणा करून निवारण होणार नाहीत. प्रथम दोन साधना सिध्द व्हावयास पाहिजेत; निराकरण व निवारण. ह्या दोन्हीसाठी जी सेवा करावयाची आहे, त्यासाठी तुझा संकल्प तयार पाहिजे. ज्या प्रश्नांची विचारणा आहे, त्यांचा समावेश ह्या संकल्पात होऊन, त्यांचा उच्चार केला गेला पाहिजे; आणि हे सर्व जर सिद्ध करावयाचे असेल तर पुढील आज्ञा होईतोपर्यंत गुरुचरित्राची पारायणे कर. रोज पाच घरी माधुकरी माग; व वास्तव्य श्रीक्षेत्र औदुंबर इथे कर." ही आज्ञा ऐकायला अगदी सोपी आहे; पण ही साधनसिद्धता कृपेशिवाय होणार नाही. यापेक्षा मरण बरे वाटू लागले. शेवटी निर्णय घेतला की, "जगायचे कोणासाठी? देवासाठी! मग मरण आले तरी

ते देवासाठी येऊ दे. यातच पुरुषार्थ आहे. पण साधना पूर्णत्वाला नेणे हे माझे कर्तव्य आहे.'' असे म्हणून श्रीक्षेत्र औदुंबरला प्रयाण केले. यापूर्वी अनेकवेळा वडिलांचे बरोबर गेलो होतो. त्याठिकाणी वास्तव्य करणारे सेवक पाहिले होते. पण 'सेवेकरी' याचा अर्थ आज समजला. ''तू माझी सेवा कर''; ही 'आज्ञा' म्हणजे एक दिव्य आहे. यापूर्वी अनेक लोक 'सेवेकरी' म्हणून भेटले, पण 'आज्ञा' याचा अर्थ त्याना समजला नाही. एकदा आज्ञेप्रमाणे सेवेस आरंभ केला की, कंटाळून चालत नाही. पुनश्च ''सेवा बंद कर''; अशी आज्ञा होईतोपर्यंत थांबावे लागते. अशी ही कठीण सेवा आहे. मध्यंतरी सेवा सोडावी लागली, तर त्या सेवेचे इष्ट फल मिळणे अत्यंत कठीण आहे. स्वत:ला व इतराना लाभ होण्यासाठी केलेली सेवा, साधनेची सिद्धता पूर्णत्वाला न जाण्यामुळे, बहुतांशी साधक या सेवेला दुरावतात. यासाठी सुखकर मार्ग असा की, गुरुभेटीपर्यंत वाट पहावी हेच उत्तम! म्हणूनच गुरुमार्गाचा अवलंब करणे व प्राप्त करणे, कठीण आहे. परंतु परमेश्वराचे हे कार्य माझ्या माध्यमातून सुरू व्हावे, अशी त्याची इच्छा होती; म्हणून ज्या ज्या वेळी त्याची गरज लागली त्या त्या वेळी परमेश्वर संकटसमयी धावून आला. नाहीतर हे कार्य मी करणे सहज सोपे नाही. आता तुम्हाला सेवक म्हणून नियुक्त केले असता, तुम्ही इतरांचे कल्याण करू शकता. ही जर त्यांची इच्छा नसती तर तुम्ही इतरांचे काय, पण स्वत:चेसुद्धा कल्याण करू शकला नसता.

ज्या सेवेचा अंगीकार केला होता, त्यामध्ये प्रामुख्याने तीन विषय होते; व त्या विषयांची सिद्धता करावयाची होती; नुसता देव प्रसन्न करून घेणे, हेच इष्टकर्तव्य नव्हते. अनेक साधक ह्या मोहाला बळी पडतात; पण विषय न समजल्यामुळे, त्यांच्या जीवनातील बहुमोल आयुष्य व्यर्थ खर्ची पडते. त्यासाठी 'साधक' ह्या अवस्थेचा स्वीकार करण्यापूर्वी, जो विषय आपल्या नामी तत्त्वाने सिद्ध करावयाचा असतो, तो विषय (किंवा सिद्धता) निश्चित करावा लागतो. एकदा हा विषय ठरविला की, केव्हा सिद्ध होईल हे सांगता येत नाही. कदाचित एक वर्षात सिद्ध होईल किंवा सिद्ध होण्यास बारा वर्षे लागतील. म्हणून सेवा करण्यामागे दोन संकेत असतात: १) साधनेतला आपला विषय आपण ठरविणे,



२) साधनेचा विषय देवाने ठरविणे. बहुतेक साधकाना देवाने काय दिले ह्याचे स्पष्टीकरण सांगता येत नाही. फक्त एवढेच सांगता येते की, देवाने काहीतरी दिले; पण काय दिले? हा प्रश्न शेवटी गूढच राहतो. बहुतेकाना त्याचे स्पष्टीकरण शास्त्रपरत्वे सांगता येत नसल्याने, त्याना प्रश्न विचारणाऱ्याचे समाधान करता येत नाही. म्हणून लोकाना हा मार्ग म्हणजे बुवाबाजीचा मार्ग वाटतो. वास्तविक, ह्या मार्गासारखा दुसरा श्रेष्ठ मार्ग नाही. पण साधकाला हे न समजल्यामुळे, त्याचा दोष ह्या मार्गाला लागतो. याशिवाय संकल्प निश्चित नसेल, तर साधना करण्यामध्ये, साधकाला प्राप्त झालेल्या बहुमोल जीवनाचा अपव्यय होत असतो. हे जीवन अत्यंत बहुमोल व दुर्लभ आहे. प्रत्येक क्षणाचा जो अपव्यय होईल तो क्षण परत येणारा नाही; व मृत्यु हा कोणासाठी थांबणारा नाही; म्हणून प्राप्त जन्मातील प्रत्येक क्षणाचा विनियोग सत्कारणी होणे आवश्यक आहे.

जे देहिक माध्यम आपल्याला प्राप्त झाले आहे, ती ईश्वराची देणगी आहे. आपल्या बुद्धिमाध्यमाची प्रथम मालकी ईश्वराची आहे. तेव्हा या बुद्धीतून कोणता विषय प्राप्त करावयाचा हे त्यानेच ठरविणे योग्य असते. हा विषय जर आपण ठरविला तर बुद्धीमध्ये 'देवा' ऐवजी 'हेवा' याची धारणा होते. आज जगतात सर्वत्र जी अशांतता आहे, तिचे कारण हेच आहे. प्राप्त करावयाच्या संकल्पाचा विषय जर गुरुतत्त्वाने निश्चित केला तर त्यात शंभर टक्के यश असते. कारण त्या संकल्पसिद्धतेसाठी आवश्यक असणारे पथ्य व स्थळ-काळ-वेळ यांचे बंधन, याबाबतचे मार्गदर्शन आपल्या गुरुतत्त्वाकडून होत असते. कार्यारंभापासून ज्या ज्या साधनांची सिद्धता झाली, ते संकल्प प.पू. बाबांनी सूचित केलेले होते. आरंभी मी फक्त एकच संकल्प केला; ''प्राप्त झालेले जीवन हे श्रीसद्गुरुचरणी वाहिलेले आहे, त्याचा विनियोग जगत्कल्याणासाठी त्यांच्याकडून व्हावा.'' ह्या संकल्पपरत्वे पुढील जीवन मी त्यांच्या आज्ञेने व्यतीत केले; व प्रत्येक दिवस उजाडल्यानंतर 'हा आपल्या आयुष्यातील शेवटचा दिवस आहे'; ह्या जाणीवेने जगलो. म्हणूनच पस्तीस वर्षामध्ये तीनशेपन्नास वर्षाइतके कार्य झाले.

एक महत्त्वाची आठवण सांगणे राहून गेले. प.पू. तेलीमहाराजांची सेवा चालू असताना, एक दिवस घरच्या परिस्थितीला वैतागून - 'वैतागून' म्हणता येणार नाही, कारण वैतागून काही परिस्थितीत बदल होत नाही. बदल होण्यास फक्त 'गुरुकृपा' व्हावयास पाहिजे; व दुसरे म्हणजे कर्म अनुकूल पाहिजे. कर्म अनुकूल असते, तर गुरुमार्गाच्या वाटेला गेलो नसतो. त्याअर्थी कर्माने वाटेला लावले, म्हणून गुरूंची आठवण झाली. निदान ह्या जन्मात 'गुरूंची' आठवण होणे काही कमी नाही. कर्माला वैतागून शिव्या देण्यापेक्षा, त्या कर्माचे आभारी होणे हितावह आहे; असे मानायला लागून, जोपर्यंत कर्मात बदल होत नाही तोपर्यंत गुरुसेवा चालू ठेवावी, असा दृढ विश्वास केला. पुष्कळ लोकाना 'गुरुभक्ती' हा शब्द उच्चारण्यास खूप सोपा आहे असे वाटते. पण गुरुभक्तीची वेळ येईल, तेव्हा 'चणे खावे लोखंडाचे'; अशी अवस्था वाटयाला येईल; व मग गुरुभेट व मग भक्ती!

अशाप्रकारे गुरुसेवा चालू होती. एक दिवस मी श्रीबाबांना विचारले, "बाबा, एक प्रश्न विचारू का?" लगेच म्हणाले, "तुझे डोंबल! अक्कल आहे का प्रश्न विचारण्याची? सगळं जग नक्कल करीत आहे. त्याचा पाढा तू वाचू नकोस. आधी अक्कल मागून घे, मग विचार करायला शीक; व मग प्रश्न विचार. वास्तविक प्रश्न असतो देवाला. जन्माला येणाऱ्याला अन्न, वस्त्र, निवारा कसा मिळेल? ही चिंता असते देवाला. मनुष्य जन्माला येतेवेळी बरोबर फक्त 'चिंता' घेऊन येतो; व 'चिंता' बरोबर नेतो". मग म्हणाले, "विचार". मी म्हणालो, "भवितव्यात माझे काय होईल? कारण मला शिक्षण नाही. शिवाय काही कला पण येत नाही." बाबा म्हणाले, "तू फक्त उभा आहेस व सर्वजण आडवे झाले आहेत. शिक्षण नाही व कला नाही याची चिंता देवाला. तू विचार करू नकोस. पुढील काळात जगाला तुला चारा द्यावयाचा आहे; व त्यासाठी 'कलाकला'ने घे. शेवटी एक दिवस पौर्णिमा होईल. हीच गुरुपौर्णिमा तुझ्या जीवनात येणार आहे." याचा अर्थ जगाला उजेडात आणणे, म्हणजे ज्ञान होणे; पण याचा अर्थ मी आज समजू लागलो.



# ४. 'इन्सान जाग उठा'!

माझ्या लहानपणी आमच्या घरी वडिलांचा बसचा धंदा होता. त्यावरील ड्रायव्हर बहुतेक मुसलमान होते. मी तीन वर्षाचा असताना, वडिलांनी मला 'फकीर' केले होते. ही 'फकिरी' म्हणजे एक प्रकारची दीक्षाच होय. पुढे ही फकिरी मी बारा वर्षे केली. दरवर्षी मोहरम महिन्यात दहा दिवस ताबूत बसविण्यात येतात. विसर्जनाच्या आदल्या दिवशीची रात्र 'कतल की रात' असते. हा विधी मुसलमान धर्माप्रमाणे करण्यासाठी वडील मला घेऊन जात असत. त्याकाळी हिंदू-मुसलमानात वैमनस्य नसल्याने, एकत्र सण साजरे होत. 'ताबूत' मुसलमानांचा व 'गणपती' उत्सव हा हिंदूंचा, असा भेदभाव नव्हता. त्यामुळे दोन्ही विधी आनंदाने होत होते. भावना अशी होती की, 'परमेश्वर एकच आहे'. कोणीही प्रार्थना केली तरी त्याचा उद्देश 'जगाला सुख लाभावे', असाच होता. त्यामुळे ह्या दहा दिवसात, सर्व ताबूत व गणपती उत्सव, आनंदात साजरे करीत असत. 'सत्कर्मयोगे वय घालवावे'; या संतवचनाप्रमाणे निदान काहीतरी सत्कर्म आपल्या हातून घडावे, याची जाणीव सर्वांच्या ठायी होती. ह्या दिवशी भिक्षा मागण्यासाठी, कटोरा घेऊन बरेच फकीर जमत असत. त्यांच्या दुसऱ्या हातात मोर्चेल असे. ते अंगावरून फिरवत व तोंडाने म्हणत असत, "दिया उसका भला, न दिया उसका भी भला। खुदा जिसने दिया तांबेका पैसा, उसको दे तू सोनेका पैसा। बारा इमाम तुम्हारा भला करेगा। खाली पाँच इमाम को याद करो। अल्ला! अल्ला!!" त्यावेळी फकीर म्हणत असत, "पाँच पीर इस दुनियाको संभालनेवाले है।" पण त्यावेळी ज्या नावांचा उच्चार करीत असत ती नावे भूगोलातसुद्धा शिकलो नव्हतो. (अजमेर, गुलबर्गा, कल्याण वगैरे). पुढे ह्या पीरांचा संबंध आपल्या कार्यासाठी काय आहे? याची जाणीव नव्हती. पुढे प.पू. बाबांच्या आज्ञेप्रमाणे श्रीदत्तक्षेत्र औदुंबरी गेलो. आज्ञापालन जास्तीतजास्त काटेकोरपणे करावयाचे, हेच व्रत स्वीकारले. एके दिवशी पहाटे स्वप्न पडले. स्वप्नात पाच समाध्या अर्थात् पाच पीर दिसू लागले. हा काय चमत्कार? असे मनाला विचारले; तरी उलगडा होईना; कारण आज्ञा मिळाली होती, "औदुंबरला जा,

गुरुचरित्र वाच व पाच घरी माधुकरी माग''; व स्वप्नात तर पाच पीर दिसू लागले. ह्या संभ्रमात मी सेवा करीत होतो. काही दिवसानी पुन्हा स्वप्न पडले. त्या रात्री प्रथमत: डोंगर दिसू लागला. हळूहळू त्या डोंगरावर एक भव्य दर्गा दिसू लागला. पूर्वी आपण पाहिलेला नाही असा. फक्त आवाज आला, ''पूर्वजन्मी मुसलमान होतास, त्याकाळात फकीर होतास. इतनी याद बहोत है। और ज्यादा खोजमे मत जाना।'' हे ऐकून जाग आली. झोपण्यासाठी कांबळे होते, त्यावर बसून प्रार्थना केली. कानात हळूहळू आवाज आला, ''इन्सान जाग उठा। अपना काम हो गया। इन्शाअल्लाह!''

पुढे काही दिवसानी सेवेचा लाभ कसा करून घेता येईल ही शंका आली, पण विचारणार कोणाला? पूर्वी घरी असताना काही शंका आली तर वडिलांना विचारत असे; पण आता आज्ञापरत्वे औदुंबरला आल्यावर, सीमा ओलांडणे उचित नव्हते. एके दिवशी महापूजा झाली. आरती व मंत्रपुष्पांजली सर्वजण म्हणत होते. मी पण डोळे बंद करून, ।।श्रीगुरुदेवदत्त।। असे स्मरण करीत होतो. त्यावेळी एक म्हातारा काठी टेकीत टेकीत माझ्या बाजूला येऊन उभा राहिला; व पाच खारका हातावर ठेवून म्हणाला, ''हा प्रसाद दत्ताचा आहे. या व चार जिनसा ज्यांचा आरंभ 'ख' ने होतो, त्यांची प्राप्ती अजून करावयाची आहे; ती झाली की, कार्याला आरंभ कर.'' हा म्हातारा काय म्हणतो आहे हे मला कळण्याच्या आत तो दिसेनासा झाला. फक्त हातामध्ये पाच खारका होत्या. तो प्रसाद आहे असे समजून, मी माझ्या ओवरीत (राहण्याची जागा) ठेवून, माधुकरीसाठी गेलो. त्या दिवशी कोण्या एका भक्ताने नवस केला होता. तो फेडण्यासाठी एक मण प्रसाद वाटावयास पुजाऱ्याकडे दिला होता. त्याचे नाव 'पंचखाद्य'. हा प्रसाद मलासुद्धा ओंजळभर मिळाला. त्यावेळी जो म्हातारा भेटला होता, त्याने सांगितले होते की, ''चार जिन्नस मिळाले की, कार्याला प्रारंभ कर''. आता हे चार जिन्नस कोठून येणार? व भवितव्यात तरी कोण देणार? असा विचार करता करता रात्र झाली. झोपण्यापूर्वी रोज अकराशे वेळा गुरुनामस्मरण करीत असे. साधारण रात्रीचे आठ वाजले असतील. देऊळ बंद झाले होते. त्याचवेळी दर्शनासाठी एक भक्त त्याची तीन मुले घेऊन आला. दर्शन



करून अंगारा लावल्यावर मुले म्हणू लागली, ''आम्हाला प्रसाद म्हणून नुसता अंगारा नको. खारका पाहिजेत''. ''पण आता रात्री आणणार कोठून?'' हा संवाद मी ऐकला, व पुढे होऊन सकाळी त्या म्हाताऱ्याने दिलेल्या पाच खारकामधील तीन खारका त्या मुलांना व एक त्यांच्या वडिलांना दिली; व आता एकच माझ्यापाशी शिल्लक राहिली. ती मुले निघून गेली असे वाटले, पण मग खारका खाल्ल्या कुणी? हा प्रश्न पडला! नंतर आठवले तरी ती अवस्थाच अशी असते की, संभ्रम होतो. पुढयात असून दिसत नाही. ह्याचा अर्थ सेवेचा लाभ स्वत:ला घ्यावयाचा नसून, ती सेवा देवाला परत करावयाची असते. हा त्याचा अर्थ होता; तो समजावा म्हणून काही जिन्नस हे 'माध्यम' म्हणून लागतात. म्हणून पाच खारका त्यांनी दिल्या व चार घेऊन गेले, एक शिल्लक राहिली. झोपण्यापूर्वी मी ती खारीक मनोभावे खाल्ली. अशी खारीक मी पुन्हा कधी खाल्ली नाही. खाताना कानाशी शब्द आले, ''अरे ही खारीक कुठली आहे? अरबस्तान!'' ती खारीक खाल्ल्याच्या दुसऱ्या दिवसापासून, औदुंबर हे नंदनवनासारखे दिसू लागले. मन म्हणू लागले, ''स्वर्गात तरी अधिक काय आहे? जे जगात नाही ते इथेच या पायांजवळ आहे'', म्हणून शांत झोपी गेलो.

# ५. साधक अवस्था - हाजी मलंगबाबांचे मार्गदर्शन

“साधक अवस्थेत दिनचर्या कशी काय असते हे ‘साधक’ झाल्याशिवाय समजणार नाही. जगात गावोगावी ‘बाधक’ नको तेवढे आहेत. बाधक होणे हीसुद्धा एक अवस्था आहे. ते जर जन्माला आले नसते तर साधक अवस्थेला किंमत शून्य! साधक होण्यामागचा मूळ हेतू साधकाला कळला पाहिजे. आपल्या सभोवार असणारे जग कशाप्रकारे जीवन व्यतीत करीत आहे? त्या जगात कशाची कमतरता आहे? व काय अधिक आहे? ह्या दोन विषयांचा विचार केला पाहिजे; कारण जगात एक वर्ग असा आहे की, डोळे असून नसल्यासारखे; आणि दुसरा वर्ग - डोळे फाडफाडून आता फाटतील की काय अशी भीति वाटते, अशा अवस्थेत आहे. पहिल्या वर्गाने ज्या मार्गाचा अवलंब करावयाचा त्याचा प्रथमतः अभ्यास केला पाहिजे. नुसते वाडवडील करीत आले, म्हणून तेच तेच करणारे बहुसंख्य लोक आहेत. त्यामध्ये ‘चर्चा’ हा बहुतेकांचा विषय असतो. पण अनुभव मात्र ‘शून्य’ असे म्हणता येईल. वास्तविक शून्यालासुद्धा जेवढी किंमत आहे तेवढी ह्या जगाला नाही; हा माझा स्वतःचा अनुभव आहे. ‘देव’ हा एक स्वतंत्र विषय आहे, हे लोक विसरतात. ‘मानव व त्याची जीवनमीमांसा’ व ‘देव आणि त्याचे कार्य’, हे दोन भिन्न विषय आहेत. त्यापैकी आपले जीवन हेच ज्याला समजत नाही, त्याला देव व त्याचे कार्य सांगणे अत्यंत कठीण आहे. सर्वसाधारणपणे आज लोक देवाचा विचार केवळ आपल्याला आलेल्या अडीअडचणी निवारणार्थ करतात; व त्यासाठी देवाला प्रसन्न करून घेणे, हाच आपल्या नित्य साधनेचा विषय ठेवतात. पण साधनेचा खरा अर्थ आजपर्यंत कोणीतरी सांगितला आहे काय? ज्याप्रमाणे एखादा डोंबारी अंग उलटसुलट करून रस्त्यावर खेळ करतो, त्याला आपण ‘सर्कस’ म्हणतो; पण त्याला ‘व्यायाम किंवा प्राणायाम’ म्हणता येणार नाही; कारण ही शास्त्रे असून, त्यांचा अभ्यास गुरुमार्गदर्शनाप्रमाणे जर केला नाही तर त्यांचा उपयोग होत नाही. त्याचप्रमाणे ‘साधना’ हा विषय गहन आहे. तो देवाला उद्देशून किंवा त्याला प्रसन्न करून घेण्यासाठी नाही. जरी ‘साधना’ हा तीन अक्षरी शब्द आहे तरी त्या



शब्दाचा अर्थ प्रथम माहीत होणे आवश्यक आहे. ‘साधक’ व ‘साधना’ हे दोन शब्द जरी बरोबर वाटले तरी पहिल्या शब्दात ‘क’ आहे व दुसऱ्या शब्दात ‘ना’ आहे. ह्या दोन शब्दांची उपपत्ती सोपी नाही; जर गुरुभेट झाली नाही तर हेच दोन शब्द जन्माला पुरून उरतील”.

वरील संभाषण किंवा मार्गदर्शन हे प.पू. हाजीमलंग बाबांनी केले; परंतु त्यांची बोलण्याची भाषा उर्दू होती. त्याकाळात मला फक्त मराठी भाषा येत होती व आज्ञा अशी होती की, औदुंबरची सीमा सोडावयाची नाही. इतर सेवेकरी जे माझ्यासारखेच होते, त्यानाही फक्त मराठी येत होती. जी भाषा प.पू. हाजीमलंग बाबा बोलत होते, त्यातील निश्चित अर्थ जर समजला तर काही उपयोग होईल; म्हणून शेवटी मी प्रार्थना केली, “निदान मला या भाषेचे ज्ञान द्या”. त्यावेळी मार्गदर्शन असे झाले, “जेव्हा तुझ्या पारायणाची सात दिवसानी समाप्ती होईल तेव्हा एक दिवस पारायण करू नकोस; व पुढील पारायणाला सुरुवात करण्याआधी, फक्त एक दिवस तू तुझ्या मामांना जाऊन भेट. त्याना मी बोलतो ती भाषा अवगत आहे. म्हणजे मला तुला जे मार्गदर्शन करावयाचे आहे ते समजेल; व पुढे भाषा पण बोलता येईल. माझे आगमन मी तुझ्या ठिकाणी करणार आहे; परंतु त्यासाठी एक वर्ष थांबावे लागेल. ही जी साधना आहे, तिला ‘परकाया प्रवेश’ असे म्हणतात. बहुतेक लोक ह्या अवस्थेला ‘संचार’ असे म्हणतात, पण भिण्याचे कारण नाही. प्रथमतः माझे आगमन म्हणजे काय? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. जोपर्यंत शास्त्र समजणार नाही तोपर्यंत जसे जग चालले आहे, त्याप्रमाणे तूही म्हणशील की, माझे आगमन होणार म्हणजे ‘भूताचा संचार’! पण ही अवस्था तशी नाही. माझे वास्तव्य सातव्या लोकात आहे; आणि बाकीच्या विभूती पण तेथे आहेत. तेथून ह्या विभूती आपल्या भक्तांचा योगक्षेम करीत असतात. ज्याप्रमाणे सूर्य हा अनेक योजने दूर आहे; पण त्याचा प्रकाश जसा जगाला दिसतो, पण सूर्य कदापीहि खाली येत नाही. त्याप्रमाणे आम्ही थोर विभूती पुनश्च भूतलावर येत नाही. आम्ही त्या काळात जी साधना करीत होतो, त्या साधनेतून जी शक्ति प्राप्त केली आहे, तिचा वापर ‘परकाया प्रवेश’ करण्यासाठी करीत असतो. पण त्यासाठी जो माध्यम लागतो तो मिळाला पाहिजे.

अशा माध्यमाची ह्या जगात कमतरता आहे. आम्हाला पोषक असे माध्यम देव जन्माला पाठवतो; पण हा 'प्रसाद' देवाचा असूनही, जोपर्यंत त्याला साधकाकडून 'साद' मिळत नाही तोपर्यंत हा माध्यम जन्माला येऊनसुद्धा आम्हाला मेलेला आहे, हे ऐकून रागावू नकोस''.

''मानव जन्माला येतो, पण जन्म घेणे सोपे नाही. जन्माला येण्याचे कारण दोन प्रकारानी कार्यान्वित होते. एक जन्म कर्मामुळे येतो; व दुसरा जन्म आत्म्याला ह्या कर्मबंधनातून मोकळे व्हावयाचे असते, म्हणून येतो. ह्या दोन्ही अवस्थेत जर जन्माचे कारण समजले तर मनुष्याची ह्या जन्मातून सुटका होते, नाहीपेक्षा जन्माला न येणे हितावह आहे. कारण जन्माला आल्यावर कर्म व आत्मा यांचे कार्य, हे दोघांच्या हिताचे असावे लागते. पण जगात आत्म्याला जन्म घेण्याची प्रवृत्ती होणे, असे आत्मे फारच थोडे असतात. असा आत्मा जरी जन्माला आला तरी त्याची भावना उपभोगण्यासाठी नसून, प्राप्त झालेल्या जन्मातून आपली सुटका कशी करून घेता येईल? याचा विचार जन्म प्राप्त होऊनही चालू असतो. याउलट जे आत्मे कर्माने जन्माला येतात, ते कर्मातून आपली सुटका न करून घेता, सभोवार जे जग दिसते, त्याचा भोग जास्तीत जास्त मला कसा प्राप्त होईल? या विवंचनेत असतात; व अशा आत्म्याना सुटका करून घेणे अतिशय अवघड आहे. समजा एखाद्याला पूर्वकर्मानुसार गुरुमार्गाचा लाभ झाला, तरी बहुतेक लोक याला 'दुःख' असे म्हणतात; कारण पूर्वकर्मानुसार जन्म घेण्यात जरी आपली चूक झाली असेल तरी त्याची जाणीव आत्म्याला होते; पण कर्माला होत नाही. ही जाणीव व्हावी व जो जन्म प्राप्त झाला आहे त्यातून सुटका होण्यासाठी एखादे कर्म, संकट निर्माण करून, त्या मानवाला मार्गी लावण्याचा प्रयत्न करीत असते. वास्तविक जे कर्माने निर्माण केलेले संकट आहे ते देहाला 'संकट' वाटते; पण ते कर्म आत्म्याची 'संकष्टी' असते. आपल्या सभोवार जे जग आहे ते कर्मानेच निर्माण झालेले आहे. ते मार्गी होणाऱ्या कर्माला दाद देत नाही; म्हणजे मार्गी होऊ देत नाही. अशी स्थिती जगाची आहे. जरी मार्ग दिसला किंवा गुरुभेट झाली तरी हे लोक गुरूंचे गुरू असतात; व मार्ग शोधण्यापेक्षा गुरूला मार्गी लावतात''.



# ६. ज्योतिष्मती - 'श्रीगुरुचरित्र' - विमोचन साधन - श्री शक्तिपीठ कार्ययोजना

जीवनाबद्दलच्या तत्त्वज्ञानाचा मला जेव्हा 'श्रीगणेशा' म्हणून प्राप्त झाला, त्यावेळी मी स्वतःला धन्य समजू लागलो. याचा अर्थ तेव्हा समजला जेव्हा प.पू. बाबांनी एके दिवशी झोपेतून जागे केले. त्यावेळी पहाटेचे चार वाजले होते. गुरुआज्ञेप्रमाणे सहा महिने नित्य श्रीगुरुचरित्र-पारायण, माधुकरी इत्यादी सेवा चालू होती. तो पंधरवडा अमावास्येचा होता. सर्वत्र काळोख होता; पण कोणीतरी हाक मारली. शब्द आले, ''मुला, उठ''. म्हटल्यावर उठलो. त्यावेळी वास्तविक अंधार होता, पण जेव्हा हाक मारली व उठलो त्यावेळी चांदण्याचा प्रकाश दिसू लागला. मी नदीवर जाऊन तोंड धुतले. विचार करू लागलो, चार दिवसानी अमावास्या आहे व आज पहाटे चंद्र दिसत नाही; पण प्रकाश तर सर्वत्र पडला आहे. हा काय चमत्कार आहे? हाक मारली हे स्पष्ट आठवत आहे निश्चित ही हाक प.पू. बाबांची आहे. पण चांदणे नसून, प्रकाश स्पष्ट दिसत आहे. शेवटी प.पू. बाबांनी सांगितले, ''बाबा, ह्याला आत्मा अधिक प्रकाश म्हणजेच 'ज्योतिष्मती' असे म्हणतात.'' पहिली आज्ञा अशी की, ''औदुंबरला जा, श्रीगुरुचरित्र वाच, माधुकरी माग''. याचा अर्थ काय? तर विहार, विचार व आहार यांचे एकरूपत्व होऊन, जीवन प्रकाशमान व्हावे. लहानपणी भैरवनाथांनी ''मला प्रकाशात आण''; असे सांगितले, त्यावेळी पणती लावली; पण पणती किंवा निरंजन यांचा अर्थ, वात लावण्याचे भांडे नव्हे, तर 'निरंजन' याचा अर्थ, ज्याला तीन लोकांचे स्वामित्व समजते! या अवस्थेचा लाभ घेण्यासाठी मला औदुंबरला आणले, ते जगाचा उपद्रव होऊ नये म्हणून! जे सेवेकरी येथे बसून 'गुरुचरित्र' वाचतात ते जरी पहिल्यांदा मी वाचत होतो तरी ''यापुढे तुला हे गुरुचरित्र वाचावयाचे नसून, तुला जिवंत गुरुचरित्र वाचावयाचे आहे. म्हणजे मनुष्य इहजगतात का जन्माला येतो? त्याची सुटका जन्ममरणातून कशी करता येईल? हे ज्ञान जगात नाही; ते तुला इथे बसून गुरू सांगतील, ते ऐकावयाचे आहे. याचा अर्थ

'श्रीगुरुचरित्र'! या जगाची जी अवस्था उत्पत्ती, स्थिती, लय ही तुला समजली पाहिजे. यासाठी आज तुला प्रकाश दाखविला. यापुढे जग पाहण्यासाठी दुसऱ्या प्रकाशाची गरज नाही.''

साधकाला जेव्हा काही इष्ट कार्य करावयाचे असते, त्यावेळी त्याला 'साधना' हा विषय ठरवावा लागतो. कारण कार्यार्थ जेव्हा साधक अवस्थेत तो नावारूपाला येतो, तेव्हा जगाची उपस्थिती 'भाऊगर्दी' म्हणून जमा होते. त्यापैकी शिल्लक किती? याचा अर्थ जमा किती झाले व शिल्लक किती राहिले? त्यावरून असे कळते की, नुसती गर्दी होऊन चालत नाही. जे शिल्लक राहिले याचा अर्थ ह्या विषयाबद्दल त्याना सहानुभूति आहे; व 'आपल्याला ह्या मार्गाने काही प्राप्त करावयाचे आहे', ह्या विचाराने ते शिल्लक राहिले. बाकी 'साधना' हा विषय एवढा विराट आहे की, आपले आयुष्य जरी संपले तरी विषय संपत नाही. बाकीच्याना हा विषय 'विषा'प्रमाणे वाटतो. त्यामुळे त्या विषयात अर्थ नाही म्हणून ते पलायन करतात. तेही बरोबर आहे. कारण प्रत्येकाची 'पात्रता' असावयास पाहिजे. जन्माला आलेले सगळेच पात्र आहेत असे प्रत्येकाला वाटते. हे जग पाहिले की, 'पात्रता' किती व 'पात्रे' किती? याचा पत्ताही लागत नाही. आले काय! गेले काय! जन्माला मनुष्य येतो; पण जाण्यापूर्वी 'स्मरणात' किती राहतात? फारच थोडे! जवळ जवळ नाहीतच! जर त्या व्यक्तीने पैसे, घरदार मागे ठेवले असेल तर मुले, नातेवाईक स्मरण ठेवतात; पण ते त्या व्यक्तीचे नव्हे तर मागे ठेवलेली जी ठेव असते तिचे! हा विषय येथे सांगितला; कारण पुढे विषयामध्ये जीवनाबद्दलची मीमांसा महत्त्वाची आहे; व साधना हा विषय म्हणजे जीवनाबद्दलचे तत्त्वज्ञान. म्हणून साधना हा विषय पंचवीस टक्के ईश्वराला उद्देशून आहे व पंचाहत्तर टक्के जे जग आपल्या सभोवार आहे; त्याचा अभ्यास करणे इष्ट आहे.

मनुष्याला जेव्हा जन्म प्राप्त होतो त्यावेळी 'चेतना' ही मूळ शरीरात धारण होते; म्हणूनच मनुष्याला चालता, बोलता येते. याचा अर्थ, तेव्हा मनुष्याच्या शरीरात चेतना असते. पण केवळ वासनापूर्ततेसाठी ही चेतना जन्माला येते, त्यावेळी ती 'जीव' म्हणून जन्माला येते. ह्याचे कारण



वासनेमुळे मूळ अवस्था प्राप्त होऊनसुद्धा, कमी प्रतीचा जन्म मिळतो. जर 'वास' असेल, म्हणजे आपल्या हातून जन्मप्राप्तीनंतर सत्कर्म जर घडणार असेल तर ही 'चेतना' जन्म घेतेवेळी 'जीवात्मा' म्हणून जन्माला येते; व पुढे जन्मप्राप्तीनंतर साधनेचा लाभ घेता आला, तर जीवात्मा 'आत्मा' म्हणून उदयास येतो. या अवस्थेत चेतना असते, पुढे पंचवीस टक्के साधना केल्यामुळे, 'चैतन्य' ही अवस्था प्राप्त होते. म्हणजे हा मनुष्य, 'मानव' ही संज्ञा प्राप्त करता होतो. याचा अर्थ ज्याला काया, वाचा, मन ह्या अवस्थेचा लाभ होतो व ज्याला मन आहे, तो 'मानव'! जर ही पंचवीस टक्के साधना प्राप्त होऊनसुद्धा मनुष्यामध्ये स्थित्यंतर झाले नाही तर त्या मानवाला प्रत्येकापुढे मान 'डोलवावी' लागते; किंवा अज्ञानामुळे ह्या मनुष्याची मान उंचावली आहे असे वाटते. म्हणून म्हण आहे की, 'विद्या विनयेन शोभते'; म्हणजे ज्ञानामुळे सगळे जगात मान देतात. म्हणजेच जगतात 'पात्र' पुष्कळ आहेत, परंतु 'पात्रता' असणारे विरळाच!

वरील विषय हा सांगण्याचे प्रयोजन असे की, पुढे 'विमोचन' हे साधन सिद्ध करावयाचे आहे. तत्पूर्वी ह्या साधनाचे महत्त्व काय आहे? कारण भविष्यकाळात जे भक्त ह्या कार्याचा लाभ घेण्यासाठी येतील, त्याना हे साधन व त्याचे जीवनात महत्त्व काय आहे हे समजले पाहिजे. नुसते संकटात लोक आहेत व गुरुकृपेने त्या संकटाचे निरसन व्हावे; हा हेतू कार्य करीत असताना नव्हता. जर येणाऱ्या लोकाना दुःखाचे ज्ञान असते तर त्याचा उपाय शोधून, दुःख निवारण व्हावे असा प्रयत्न त्यानी केला असता. पण जीवनात आज होणारे दुःख खरोखरीच दुःख आहे का? हे कोणालाही समजत नाही. कारण दुःख, एक कर्माने होते व दुसरे अज्ञानी होण्याने; व तेच बहुसंख्य भक्ताना भोगावे लागते. अशा दोन्ही प्रकारात दुःख आहे. दुःख हे कोणत्या प्रकारचे हे साधकाला समजत नाही; त्यामुळे भक्त येताना दुःख घेऊन जरी आला व साधकाला भक्तांच्या दुःखाचे कारण समजले नाही, तर निराकरण करता येत नाही. कारण मूळ जो विषय दुःखाचा आहे, ह्याची समज गुरुमार्गी होणाऱ्या साधकाला होत नाही; त्यामुळे दोघांची दिशा चुकीची होण्याने, ह्या दोघांची 'युती' केव्हा व कशी होणार?

यासाठी देव व भक्त याना भेटण्यासाठी 'युक्ती' असावी लागते. गुरुमार्गात 'गुरू' हे माध्यम आहे. त्यांचा वापर कसा करावयाचा? याचे ज्ञान पाहिजे. 'गुरू' हा एक विषय व 'मार्ग' हा दुसरा विषय. गुरू हा विषय प्रथमपासून शेवटपर्यंत तोच असतो; पण साधकाला हा विषय किंवा मार्ग ह्याचे 'अनुकरण' करून चालणार नाही. तर हा विषय 'अनुसरून', त्याचे सदैव स्मरण ठेवले पाहिजे. यासाठी सदैव तत्पर असावे लागते की, आपण करीत असलेल्या साधनसिद्धतेचा हितसंबंध हितकारक होण्यासाठी, 'साधक' अवस्थेला काय पथ्य आहे? हे समजले पाहिजे. यासाठी प.पू. बाबांनी असे सांगितले, "कार्य जर करावयाचे असेल तर प्रथमत: 'निराकरण' सिद्ध व्हावयास पाहिजे, मग 'निवारण'; व यासाठी संकल्पाची गरज आहे. कारण जे साधन सिद्ध करावयाचे आहे ते सर्व जगाला उपयोगी व लाभदायक व्हावयास पाहिजे. उदाहरणार्थ, 'दोरा'. ह्याचा उपयोग मनुष्याच्या आधिव्याधी निवारणार्थ होतो, तसा तोच दोरा जनावराना गळ्यात बांधला, तर लाभ व्हावयास पाहिजे."

जे चराचरमय जग आपल्याला दिसते किंवा ज्याचा भास आपल्याला होतो, त्याची निर्मिती पाच तत्त्वानी झालेली आहे. जगाचे कार्य पाच तत्त्वावर अवलंबून आहे. त्या तत्त्वांचे कार्य व निसर्गातील पाच तत्त्वांचे कार्य एकमेकाना पोषक व्हावयास पाहिजे. तरच निसर्गाचे किंवा जीवनाचे कार्य सुख, शांती, समाधानात कार्यान्वित होईल. अन्यथा एक तत्त्व अधिक असेल व दुसरे कमी असेल, तर ह्या तत्त्वांच्या कार्यात बिघाड होईल. हे जन्माला येण्याचे कारण अणुरेणुपासून ब्रह्मांडापर्यंत अव्याहत चालू आहे. कारण ही पाच तत्त्वे एकमेकाना पोषक आहेत. जेव्हा ह्या तत्त्वात विषमता निर्माण होते, त्यावेळी ह्या सृष्टीवर किंवा मानवी जीवनात आपत्ती ओढवते. वास्तविक आपत्तीचा धर्म किंवा हेतू, जगात पीडा किंवा अशांतता निर्माण व्हावी; असा कदापीहि नाही. आम्ही 'मानव' जन्माला येतो, ती कृपा ईश्वराची आहे. पण जन्माला आल्यावर मानव हा 'मानव' असूनसुद्धा 'दानव' म्हणून जेव्हा जगू लागतो तेव्हा आपत्ती, संकट वाट्याला येतात. याला दोष स्वत:चे अज्ञान आहे; हे तो कबूल करावयास तयार नाही. ह्यासाठी श्रीगुरूंनी जी साधना औदुंबर येथे करण्यासाठी सांगितली होती, त्यात 'विमोचन' हे साधन सिद्ध झाले.



जन्मत: मूळ तत्त्वात जी 'धारणा' होते, त्यावेळी मानवाच्या फाजील ज्ञानाने त्यात बिघाड होतो; व त्यामध्ये कमी अधिक वाढ जेव्हा निर्माण होते, त्यावेळी आम्हा मानवाना मूळ धारणेची पुनश्च प्राप्ती करून देणे; याचा अर्थ 'विमोचन'.

पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश ह्या पाच तत्त्वानी परिपूर्ण असा निसर्ग, मानवाच्या कल्याणासाठी अव्याहत झटत असतो. मात्र त्याचे हे कार्य इतक्या शांतपणे चालू असते की, त्याची जाणीव आम्हा मानवाना सहजपणे होत नाही. जोपर्यंत ब्रह्मांडातील ही तत्त्वे समतोलपणे कार्य करीत असतात तोपर्यंत ब्रह्मांडात किंवा निसर्गात सुख, शांती, समाधान नांदत असते. परंतु ज्यावेळी ह्यातील कोणत्याही एका तत्त्वाचे समतोलत्व बिघडते त्यावेळी निसर्ग आपली अशांतता वादळ, पूर, भूकंप ह्या नैसर्गिक आपत्तीद्वारे प्रगट करतो. तसेच निसर्गातील पंचतत्त्वात ज्यावेळी पुनश्च समतोलत्व निर्माण होतें त्यावेळी इंद्रधनुष्याद्वारे तोच निसर्ग आपला आनंद व्यक्त करतो.

मनुष्य हा निसर्गाचाच एक घटक आहे. अर्थात जी पाच तत्त्वे ब्रह्मांडाची निर्मिती करण्यास कारणीभूत होतात, त्याच पंचतत्त्वानी पिंडाची निर्मिती झालेली असते. ज्यावेळी मनुष्याच्या जीवनातील ह्या पंचतत्त्वांचे समतोलत्व बिघडते त्यावेळी मनुष्याला जीवनात दु:ख, अशांतता, पीडा, असमाधान ह्या अवस्थांचा अनुभव येतो. देहातील ह्या पंचतत्त्वात झालेला बिघाड, कोणत्या तत्त्वाच्या कमीअधिकपणामुळे आहे? ते पाहून, त्याप्रमाणे इतर तत्त्वांचे समतोलत्व प्राप्त करून देणे, ह्याचा अर्थ 'विमोचन' होय. ही साधना श्रीक्षेत्र औदुंबर येथे सिद्ध झाली. हे साधन सिद्ध करीत असता, पाच घरी 'माधुकरी' मागण्याची सेवाही केली. 'माधुकरी' याचा अर्थ 'मागणे'. नित्य साधना, सेवा व त्यासाठी पाळावयाची पथ्ये ह्यामुळे देहातील पृथ्वी व आप तत्त्वात संतुलन निर्माण झाले. तेव्हा ही सेवा चालू असताना, निसर्गातील तीन तत्त्वांची म्हणजे तेज, वायु व आकाश यांची मागणी श्रीसद्गुरूंकडे केली; व अशा तऱ्हेने पिंडातील अशांतता, दु:ख दूर करण्यासाठी साधन सिद्ध केले. 'पिंडी ते ब्रह्मांडी व ब्रह्मांडी तेच पिंडी'; ह्या सिद्धांताप्रमाणे निसर्गातील

पंचतत्त्वांचे संतुलन राखण्यासाठी पृथ्वीवर श्रीशक्तिपीठाची पुढे स्थापना केली गेली.

मनुष्याच्या बुद्धीचा विकास होत असता, अज्ञानाचा व्याप अधिकाधिक वाढत आहे. त्यामुळे निसर्गाशी समतोलत्व न राखता, मनुष्य निसर्गाच्या विरुद्ध जाऊन, नैसर्गिक तत्त्वात प्रदूषणे निर्माण करण्यास कारणीभूत होत आहे. अशा प्रदूषणाद्वारे निर्माण होत असलेली अशांतता दूर करण्यासाठी व विश्वात तसेच मानवी जीवनात सुख, शांती, समाधानाचे इंद्रधनुष्य उमटविण्यासाठी, श्रीसद्गुरुकृपेने श्रीशक्तिपीठाची स्थापना गोमंतकात केली. ही 'शक्तिपीठाची' स्थापना जरी आज झाली असली तरी तिची कार्ययोजना श्रीक्षेत्र औदुंबरच्या सेवेपासून उदित झालेली होती.

# ७. मानवी जीवन - वंशविमोचन

विश्वाची धारणा तीन लोकात झालेली आहे; इहलोक, परलोक व स्वर्गलोक. मानव जन्माला येतो त्यावेळी त्याचे अस्तित्व, 'कर्म अधिक आत्मा' असे असते. पण जन्माला येतेवेळी तीन अधिक ऋणानुबंध जोडल्याशिवाय त्याला जन्माला येता येत नाही. म्हणजे जन्म घेण्यासाठी पाच तत्त्वांचा म्हणजे पाच ऋणानुबंधांचा हितसंबंध प्राप्त जन्माशी येतो. त्याचा अर्थ, जे कर्म 'अव्यक्त' असते ते जन्मप्राप्तीनंतर 'व्यक्त' होते. ही कर्माची व्यक्त अवस्था म्हणजे जीवन होय. 'जीवन' ह्यात मूळ शब्द आहे 'जीव'; म्हणजे जो जगणारा आहे तो! ह्यापेक्षा सुलभ अर्थ असा की, ज्याचे कार्य ह्या जगाशी संबंधित आहे तो 'जीव'; व त्याचे कार्य म्हणजे 'जीवन' होय. ते घेऊन मनुष्य जन्माला येतो; व शेवटच्या क्षणापर्यंत जगणे हे जरी भाग असते, तरी हा जन्म भोगण्यास आपला 'भाग' किती? हा प्रश्न आहे. जोपर्यंत भोग भोगून संपत नाही तोपर्यंत आत्म्याची सुटका होत नाही. यासाठी आम्हा मानवाना दोन भूमींचा विचार करावा लागतो; इहलोक व परलोक. ह्या दोन लोकामध्ये मनुष्य अडकला म्हणजे जीवनाचा 'प्रवाह' सुरू होतो. वास्तविक जीवाने जन्म घेणे हा 'प्रवास' आहे; म्हणजे जे जे कर्तव्य काही शिल्लक राहिले आहे, त्याची फेड करण्यासाठी आत्मा जन्म घेतो. पण जन्म प्राप्त झाल्यावर अज्ञानाने, कर्तव्यातून फेड करावयाची ती राहून, कर्माची 'उपाधी' लावून घेतो. त्यामुळे जो 'प्रवास' असतो, त्याचे रूपांतर 'प्रवाहात' होते; व तो गतीमध्ये सापडतो. वास्तविक 'गत' काळात काय घडले? त्याची पुनरावृत्ति पुन्हा जन्मप्राप्तीनंतर होऊ नये, म्हणून जन्म घेऊन कर्माची फेड करावयाची आहे; हे त्याला कळते तेव्हा श्रीगुरूंना त्याची प्रवाहातून सुटका करता येते. याचाच अर्थ 'सद्गती' असा आहे; व अशी सद्गती प्राप्त न होण्याने, अनेक जन्मपर्यंत इहलोक व परलोक याची यात्रा सुरू होते. त्यामुळे कर्माची वाढ इतकी होते की, एखाद्याला जन्म प्राप्त झाला की, कर्माची देवाण घेवाण सुरू होते, चुकत नाही; व ह्या जन्मात काही ज्ञान प्राप्त होण्याऐवजी, 'ज्ञानाची वाण' शिल्लक राहते. अशा अवस्थेत आत्म्याची स्थिती अधिक केविलवाणी होते; कारण

देहिक अवस्था इतकी जडवादी होते की, ह्या मनुष्याला दया, क्षमा, शांती हे शब्द उच्चारूनसुद्धा ऐकावयास येत नाहीत. अशी अवस्था प्राप्त होऊन, तो जेव्हा परलोकवासी होतो, त्यावेळी ही अवस्था जिवंत असते. तो मरतो; परंतु वासनेतून सुटका होत नाही. त्या वासना शिल्लक राहिल्यामुळे पुन्हा जन्म घेणे भाग पडते. अशा भवचक्रात जो आत्मा सापडला आहे, त्याची सुटका कधी शक्य आहे? व जर अशी सुटका व्हावी अशी इच्छा झाली तर नुसते देवदेवतार्जन, पोथीपाठ, पूजाअर्चा इत्यादी सेवा करून ती होत नाही. दिवसाकाठी एक तास आपण देवासन्निध बसतो. बाकी राहिलेल्या वेळात आपला सहवास, कर्माच्या वासनारूपी राक्षसाच्या सहवासात देवापेक्षा अधिक! ह्या 'वासनेतून' जेव्हा आपली सुटका होईल तेव्हा ईश्वराचा 'वास' व त्याचा लाभ कसा घेता येईल हे समजेल. याचे प्रात्यक्षिक श्रीगुरूंनी केवळ तत्त्वज्ञान सांगून दिले नाही; तर औदुंबर क्षेत्री शेकडो जीव-जीवात्मे, शेकडो वर्षे तिष्ठत राहिलेले प्रत्यक्ष मला दाखविले; व शेवटी "तुला जे कार्य करावयाचे आहे ते इहजगतासाठी पंचवीस टक्के व जे जीव परलोकात पुढील अवस्था प्राप्त न होण्याने तिष्ठत आहेत, त्यांची सुटका कशी करता येईल? ह्यासाठी पंचाहत्तर टक्के करावयाचे आहे"; अशी आज्ञा केली. "असा जो मार्ग त्याचा अर्थ 'वंशविमोचन'. आज जे लोक जन्माला आले आहेत, त्यांचा कुणीनाकुणीतरी ह्या अवस्थेत 'वंशज' म्हणून शिल्लक राहिला आहे. त्याला 'सद्गती' प्राप्त न होण्याने, तुम्हाला जो त्रास भोगावा लागतो आहे, त्याऐवजी सुख, शांती, समाधान, आदींची प्राप्ती होणे म्हणजे 'वंशविमोचन' होय. यासाठी पुढे तुला जे जग दिसते आहे, त्याना जे दुःख भोगावे लागते आहे, त्या दुःखाचे मूळ परलोकात आहे. त्याचे 'निवारण' परलोकाचा अभ्यास करून प्राप्त होईल; म्हणून जे साधन सिद्ध करावयाचे आहे त्या साधनाचा संबंध परलोकाशी असावयास पाहिजे."

एके दिवशी मी पहाटे नेहमीपेक्षा लवकर उठून, प्रातर्विधी उरकून, स्नानासाठी नदीवर गेलो. ते दृष्य अजून माझ्या डोळ्यासमोर 'आठवण' म्हणून आठवणीत शिल्लक आहे. नदीला घाट आहे. नित्य स्नानाला नेहमीच्या वेळेआधी गेलो असताना, त्याठिकाणी लाखो आत्मे माझ्या



येण्याची वाट पहात आहेत असे दिसले. मी गेल्यावर सर्वांनी गर्जना केली, "श्रीगुरुदेव दत्त! आम्हाला या नरकयातनेतून सोडवा. कर्माचे प्रायश्चित्त शेकडो वर्षे भोगत आहोत. एक ना एक दिवस ही सुवर्णसंधी येईल, ही श्रद्धा होती. शेवटी दत्तप्रभूंना दया आली. तुमचे आगमन झाले. जन्म कृतार्थ झाला. देवा! पुन्हा जन्म नको. देह असता तर जगाला देहाचे हाल पाहून दया येईल; पण आता देह नाही; यातना सगळ्या आत्म्याला. अशी यातना भोगता भोगता शेकडो वर्षे वाट पाहिली. आपले स्नान झाले. समोर गंगा वाहत आहे; पण त्यात स्नान करावे, एवढीसुद्धा पुण्याई आमची नाही. आपले स्नान झाले की, महाराजांचे तीर्थ आमच्यावर सिंचन करा. यापेक्षा अधिक मुक्ती कोणती? जे कार्य भगीरथाने केले तेच कार्य तुम्हाला करावयाचे आहे. त्यात आम्हाला सहभागी करा. तथास्तु! श्रीगुरुदेवदत्त!"

ही दिनचर्या नित्यनियमाने माझ्या हातून घडावी, असा संकेत श्रीगुरूंचा होता. याचा असा अर्थ होता की, माझे शरीर हे 'मध्यस्थ' होण्यासाठी अनुकूल व्हावयास पाहिजे, तरच 'परकाया प्रवेश' ही साधना साध्य होईल. मागे लिहील्याप्रमाणे, मला प.पू. हाजीमलंग बाबांनी पुढील आज्ञा दिली होती की, "तुझ्या मामांना भेटल्यावर, मी जे बोलतो ते उर्दू आहे, ते शिकून घे". पण एके दिवशी मी प्रार्थना केली की, "जरी मी उर्दू शिकलो तरी शिकण्यास वेळ लागेल, व ही भाषा शिकण्यासाठी वेळ कोठे आहे? त्यापेक्षा आपण जर मराठी बोलू लागलात तर ते काही अशक्य नाही; व हळूहळू मी उर्दू बोलू लागेन". ही प्रार्थना मान्य करून, एके दिवशी त्यांचे आगमन मामांच्या घरी झाले. त्यादिवशी त्यांनी उर्दूतच त्यांची इच्छा काय आहे हे मामांना सर्व सांगितले. "परलोकाचे ज्ञान व्हावे; व आम्ही विभूति ह्या कार्यात सहभागी होणार आहोत, ते कार्य भवितव्यात असे आहे. आज जे सर्व जग अस्तित्वात आहे ते अंधश्रद्धेचे अनुकरण करीत आहे. त्या आचरणात आम्हाला आमुलाग्र बदल करावयाचा आहे. हा बदल करणे, हे जगाच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. ही कार्ययोजना आम्ही विभूतींनी ठरवली नसून, ती 'आज्ञा' आहे. ह्या सृष्टीचा जो नियंता आहे, त्याची इच्छा अशी आहे की, ह्या जगाची अपक्रांती होऊ नये. मनुष्य कितीही अज्ञानी

म्हणून जन्माला जरी आला तरी 'ईशतत्त्व' सज्ञानी आहे. त्या तत्त्वाने कृपा केली तर हा भेद राहणार नाही; व नराचा नारायण होईल. आजच्या जगाचा उत्कर्ष इतका झाला असला, तरी मानव मागासलेला आहे; व तरीही ह्या तत्त्वाची प्राप्ती ज्याला करावयाची आहे, त्याने देवधर्म, जातपात, अमुक एका धर्माचा, ह्या विचाराप्रमाणे अनुकरण करून, ह्या जगाची उत्क्रांती होणार नाही. फक्त मानव व त्याचे जीवन म्हणजे 'मानवी जीवन'; अशी व्याख्या निर्माण झाल्याशिवाय, ह्या जगाला सुखशांती मिळणार नाही. मनुष्याला जन्म देतेवेळी देवाने आपल्यासारखाच जन्म, 'आकृती' म्हणून दिला. पण मनुष्य 'कृती' ही देवाची न करता दानवाची करतो, म्हणून जग दुःखात आहे. त्यामुळे शतकानुशतके मनुष्य-जन्म प्राप्त होऊनसुद्धा, तो गुलाम झालेला आहे! 'जन्म हा कर्माने होतो', ही गीता जोपर्यंत तो वाचत आहे तोपर्यंत त्याची सुटका नाही. ह्यापुढे तत्त्वज्ञानात असा बदल होणे आवश्यक आहे; 'मला जन्म प्राप्त झाला आहे तो धर्मासाठी, कर्मासाठी नव्हे. त्याची सेवा माझ्या हातून घडू दे. कर्माची गीता वाचत न बसता, माझ्या वाणीतून मी जगाच्या कल्याणाचे गीत केव्हा म्हणेन? ही तळमळ माझी आहे; व अशी कृपा परमेश्वराने करावी अशी सद्बुद्धी मला दे'. जगाच्या तत्त्वज्ञानात असा बदल व्हावा, अशी इच्छा आम्हा सर्व विभूतींची आहे. ह्यासाठी साह्य सर्वांचे आहे. जगाचे कल्याण व्हावे ह्या व्रताचे पालन तुम्ही करीत आहात; तेव्हा कोठलीही शक्ती ह्या कार्याच्या आड येणार नाही; हे लक्षात ठेवा. ही आज्ञा ईश्वराची आहे. त्यात जातीभेद, धर्म ह्याचे विष पेरू नका. जर याप्रमाणे आपण वागलो नाही तर हाच शाप आपल्याला भोगावा लागेल.''



# ८. कर्मविमोचन - गुरुअंशप्राप्ती

आता यापुढे दुसरा विषय अति महत्त्वाचा आहे. तो विषय 'कर्मविमोचन' असा आहे. कर्माचे भोगावे लागणारे परिणाम असे आहेत की, गेल्या काही शतकात ज्या 'मनुष्याची' निर्मिती झाली, ह्यात प्रामुख्याने जे जे दोष आढळले, त्यांचा विचार सुज्ञानी केला नाही. त्यामुळे 'सुखाची' प्रगती झाली, पण 'शांतता' निर्माण झाली नाही. त्यामुळे मनुष्याच्या एका मार्गाची प्रगती झाली, पण तो सुखी झाला का? सुखाच्या मार्गाच्या साधनांचा शोध लावला व सुखाचा शोध लागला, तरी मनुष्य सुखी झाला का? हाच प्रश्न आज जगासमोर उभा आहे. केवळ ऐहिक जीवनात सुखाची प्राप्ती अधिकाधिक वाढत चालली आहे त्याचे कारण, त्याचे मूळ, विश्वात अन्यत्र शोधून सापडणार नाही. त्याचे मूळ मनुष्यामध्येच आहे. बाजारात गेलो तर शांती, समाधान एक किलो मागून मिळणार नाही. ही अवस्था बाजारात विकत मिळत नाही. याचा शोध जर घेतला तर ह्या अवस्थेची कमतरता काया, वाचा, मन ह्या मूळ देहामध्येच आहे हे समजेल. आज लक्षाधीश माणसापेक्षा, गरीब हा गरीब नसून अमीर आहे. कारण त्याचे जीवन हे परिपूर्ण आहे; व जो लक्षाधीश आहे, त्याचे जीवन हे अपूर्ण आहे. आज जगाला ''काय पाहिजे आहे?'' असे विचारले, तर हे लोक सुखाचे पाढे वाचतील. तसेच अधिक ऐहिक प्राप्ती कशी होईल? यासाठी ह्या कार्याचा ते शोध घेत येतात; पण बहुसंख्य लोकात काय कमतरता आहे? त्याचा विचार कोणी करीत नाही. मूळ जन्माची धारणा होत असताना, काय कमतरता आहे ही अवस्था कोणालाही कळत नाही. विज्ञानी लोकानी सगळे शोध लावून, प्रत्येकाला 'मीटर' बसविले आहेत; पण स्वतःच्या जन्माचा हिशोब लावण्यास ते विसरले आहेत.

जो कोणी जन्माला येतो त्याला आपल्या जन्माचे इष्ट कार्य करण्यासाठी जसे काया, वाचा, मन हे आवश्यक आहेत; त्याचबरोबर स्थूल, सूक्ष्म व कारण देह यांची जोडही आवश्यक आहे. ह्या सहा माध्यमात जी क्रिया नकळत घडते, त्या क्रियेचा परिपाक झाला तर 'विचार'! व परिपाक न होणे ही क्रिया जर देहाने केली तर त्या

अवस्थेस 'विकार' असे म्हणता येईल. ही सहा माध्यमे, जन्म घेतेवेळी आपल्याला न मागता ईश्वर देतो. आपले कर्तव्य फक्त एवढेच आहे की, 'ज्या माध्यमाना देवाने दिले आहे, त्यांची किंमत अमोल आहे; व ती 'भेट' पुन्हा मिळणार नाही', या जाणीवेने त्या माध्यमांचा योग्य विनियोग केला पाहिजे. सर्व जीवनात क्षणिक भेटी असतात व गाठी पडतात. वास्तविक ज्याने जन्म दिला, त्याची फेड करण्याचे कर्तव्य म्हणजे 'ह्या बहुमोल जीवनाला जो साकार करतो, त्याच्या कृपेने ह्या जीवनाला आकार येऊ दे'; असा तळमळीचा सदैव ध्यास घेतला पाहिजे. याउलट तळमळ लागली आहे ती ऐहिक सुखांची! जे सुख इथेच ठेवून जायचे आहे, त्याचा ध्यास लागला आहे. पण 'शेवट' गोड व्हावा, अशी इच्छा सदैव ठेवावी.

देहाची सहा अंगे आहेत, त्यापैकी चार अंगांचा वापर ह्या जन्माचे सार्थक होण्यासाठी झाला पाहिजे. दोन अंगे गतजन्मी होती, आज आहेत; व पुढील जन्मी हीच दोन अंगे जन्म घेण्यासाठी लागणार आहेत. चार अंगे म्हणजे स्थूल देह, सूक्ष्म देह, काया व वाचा. ह्या चार अंगानी चार पुरुषार्थांची (धर्म, अर्थ, काम, मोक्ष) प्राप्ती झाली पाहिजे; व दोन अंगे म्हणजे मन व कारण देह, यानी ह्या जन्माची मुक्तता करावयास पाहिजे. असा हा एकंदर शरीराचा धर्म, निसर्गाने नेमून दिला आहे. आजच्या काही शतकामध्ये मनुष्याची अवस्था हीन पातळीवर वास करीत आहे; त्याचे आचार, विचार, उच्चार ह्यावर बंधन नाही; व खाणेपिणे, कपडालत्ता, ऐषाराम म्हणजेच जीवन, असे तो मानू लागला आहे. आज सभोवार बेफिकीरीने वागणारा मनुष्य, हा गतकाळात असणारा 'मानव' आहे का? असा प्रश्न सुज्ञासमोर आहे. हे दृष्य पाहिल्यावर जन्माची कीव येते. साधुपुरुषांनी आपल्या जीवनाचे बलिदान करून, जन्माला आलेल्याना सन्मार्ग दाखविला; व "ह्या मार्गाने गेले असता प्राप्त जन्माची सार्थकता होईल"; असे टाहो फोडून जगाला सांगितले. पण त्या काळात "आपण सुज्ञ आहोत"; असे म्हणणारे, आज पश्चात्तापाने उद्गार काढतात की, "त्याकाळात आम्ही अहंकाराने ह्या सत्पुरुषांची निंदानालस्ती केली. तरीसुद्धा ह्या संतपुरुषांनी आपला मार्ग सोडला नाही." आज ह्या मार्गदर्शनाची किंमत एवढी आहे की, दहा मनुष्यजन्म घेऊनसुद्धा, हा



वारसा आपण फेडू शकणार नाही. आजच्या सामाजिक परिस्थितीकडे पाहिल्यावर वाटते की, हा रोग क्षयरोगापेक्षाही महाभयंकर आहे; व तो वंशपरंपरा, देवधर्म, नीतिन्याय, राष्ट्र आदी समाजाची जी मौल्यवान तत्त्वे आहेत, त्या तत्त्वांचा बळी घेऊनच शांत होईल! पण केव्हा? ह्या प्रश्नात जग बुडले आहे; व दुसऱ्याला जो तरणोपाय सांगतो आहे, त्याच्या पायाशी तरी काय आहे? आमचा नाश! ही भीषण परिस्थिती पाहून, 'कर्मविमोचन' हे साधन श्रीगुरूंनी सिद्ध करण्यास सांगितले होते.

कोणीही मनुष्य जन्माला आल्यावर, त्याला काया, वाचा, मन ही त्रिपुटी असावयास पाहिजे. आत्म्याला हा जन्म प्राप्त करण्यापूर्वी, काया प्राप्त करावी लागते. कायाधारणेला आरंभ ह्या अस्थि, मांस, मज्जा, पेशी व तंतू यानी गर्भधारणेत होत असतो. प्राप्त जन्मातील अस्थींचा संबंध हा पूर्वजन्माशी असून, पूर्वजन्माला 'आकार' येण्यासाठी तो पाया आहे. (म्हणजे ह्या अस्थि गतजन्मात देवाच्या, मानवाच्या किंवा दानवाच्या असोत, त्यांची गरज अशी की, त्या पायावर जीवनाचे मंदिर उभे करावयाचे आहे). गर्भधारणेत जीवाची जोपासना ही फार महत्त्वाची आहे. जो आत्मा जन्माला येतो, त्याला पुढील पन्नास ते पंचाहत्तर वर्षे जगाव्या लागणाऱ्या जीवनाची तरतूद, नऊ महिने नऊ दिवसात करावयाची असते. त्याची जबाबदारी मातेच्या आहार, विचार, उच्चार यावर अवलंबून आहे. पूर्वीच्या काळी जन्माची धारणा ही संस्काराने होत असे; व आज ते संस्कार आपल्याला नको आहेत. त्यामुळे जन्म घेण्याची प्रवृत्ति जरी जीवाच्या ठिकाणी निर्माण झाली तरी संस्कारांच्या अभावी जे बीज मानवाच्या ठिकाणी धारण होणे आवश्यक आहे, त्या बीजाची धारणा होत नाही. आज कर्मामुळे जन्म प्राप्त होत आहे; व कर्माची धारणा देहात होत असली, तरी संस्कारातून धर्माच्या बीजाची प्राप्ती, जन्म घेतेवेळी व्हावयास पाहिजे. ती न होण्याने, 'वंशपरंपरा' ही आपल्या अज्ञानाने नष्ट झाली आहे. समाजात किंवा कुटुंबात लोक जन्माला येतात आणि जातात. पण गेल्या काही शतकात वंशपरंपरेचा जो वाटा आपल्या संततीमध्ये पहावयास मिळतो, त्यामुळे प्रत्येक पिढीत जन्माला येतेवेळी आचार, विचार व उच्चार हे भिन्न आढळतात. म्हणून मानवी जीवनात एकसूत्रीपणा सापडत नाही. त्याशिवाय जन्मप्राप्तीच्यावेळी वाचा व मन

यांचा संबंध उच्चार व विचाराशी होत असतो. ही संपत्ती आपण पुढच्या पिढीला प्राप्त करून द्यावयास पाहिजे. गतकालातील पिढयामधील हितसंबंध आज मनुष्याच्या हाडामांसाशी आहे, हे आधुनिक विज्ञानदेखील नाकबूल करीत नाही. याचा अर्थ वैज्ञानिकाना 'आनुवंशिकता' ही मान्य आहे. 'चांगल्या गुणानी जन्माला येणे', हे निर्माण करण्यासाठी 'सेवा' करावी लागते; पण पोषक नाहीत असे गुण निर्माण झाल्याने, आपण जगाचा 'हेवा' करतो आहोत. कारण जन्माची धारणा अस्थीवर अवलंबून असते. यासाठी श्रीगुरूंनी असा आशीर्वाद दिला की, ''भवितव्यात जन्माला येणारा मनुष्य हा 'अंश' म्हणून जन्माला येणे जरूर असून, 'वंश' म्हणून जन्माला येणे हिताचे नाही. यासाठी ज्या साधनाचा लाभ आम्हा सर्वांना झाला, त्या उपकाराची फेड कधीही करता येणे शक्य नाही.

मूळ मानवाची निर्मिती अशी होण्याने, पुढे समाजात त्याला भीषण अवस्था भोगावी लागू नये, म्हणून ह्या 'वंशविमोचन' साधनामुळे, जन्माला येण्याची मूळ अवस्था, हीच कृपाशीर्वादाने आता बदलली आहे. पूर्वी जन्माला येतेवेळी मूळ धारणा ही काया, वाचा व शेवटी मन अशी होती. म्हणजे ह्या अवस्थेत काया व वाचा प्रधान व मन गौण; अशी अवस्था होती. त्यामुळे जरी जन्माला आलो तरी आपली इष्ट कर्तव्ये आज कोणालाही कराविशी वाटत नसून, जास्तीतजास्त जीवनाचा उपभोग प्राप्त व्हावा, म्हणून 'दुसऱ्याचा भोग' चालू आहे. यासाठी मूळ धारणेत असा बदल केला आहे की, मनाची धारणा ही प्रधान करून, काया व वाचा ही गौण केली. पूर्वीच्या काळी सत्कर्म 'संचित' करणे, असे जे आपण म्हणत होतो, त्याऐवजी सत्कर्माचे 'सेवन' होऊन, ते शिल्लक न राहता, त्याचा सदुपयोग पुढच्या पिढीला जन्माला येण्यासाठी झाला पाहिजे. एकदा ह्या जन्मात गुरूंची भेट झाली आहे म्हटल्यावर, ती भेट जन्मोजन्मी 'सहाय्य' देणार आहे, एवढा आत्मविश्वास स्वतःच्या ठिकाणी निर्माण करावयास पाहिजे. देवधर्म, दानधर्म ही कर्तव्ये केवळ मुक्ती प्राप्त करण्यासाठी आहेत; असा संकुचित विचार न ठेवता, ह्या कर्तव्यामधून, दुःखी लोकाना संकटातून व अज्ञानातून मुक्त करावयाचे आहे, असा परोपकाराचा विचार आपण आता दृढ केला पाहिजे.



प्रथमावस्थेत आपण भक्तानी अडीअडचणीनिवारणार्थ ह्या कार्याचा लाभ विचारात घेतला. त्यावेळी 'सुखाचा लाभ कसा होईल'? हा विषय जमेस धरून, आपण वारंवार उपस्थित राहून, प्रश्न विचारीत होतात. पण त्यावेळी आपल्या जीवनातील प्राप्त सुखाचा विचार न करता, आपल्यामध्ये जन्म प्राप्त होऊनही, कोणत्या सुखांची उणीव आहे? याचा शोध घेण्यासाठी आपण आलात. गुरुमार्गामध्ये मनुष्य येतां तो अडचण घेऊन येत असला, तरी त्याच्या जीवनात 'चणचण' कशाची आहे? याचे ज्ञान गुरूंना असते; व त्यापरत्वे ते मार्गदर्शन सूचित करीत असतात. त्यामुळे भक्ताला जरी असे वाटले की, आपला प्रश्न 'निरर्थक' आहे; तरी त्या प्रश्नाच्या निमित्ताने जीवनाचा 'अर्थ' काय आहे? हे श्रीगुरूंना भक्ताला सांगावयाचे असते. ह्याचा अर्थ सुख न मागता, सुख प्राप्त करण्याचा मार्ग, हा आपणास मिळावा; व भवितव्यात आपल्या मुलाबाळानाही त्याचा लाभ व्हावा, असा दिव्यदृष्टीने आपल्याकडे पाहून श्रीगुरूंनी कृपाशीर्वाद दिला.

# ९. साधकाचे कर्तव्य - कर्मविमोचन

कार्यकेंद्रावर अडीअडचणीच्या निमित्ताने आपण जेव्हा उपस्थित राहिलात तेव्हा आपली अवस्था काय होती? हे गुरूंनी पाहिले. अडीअडचण ही क्षणिक असो किंवा गंभीर असो, त्यासाठी संरक्षण देऊन, वेळोवेळी आपत्तीचे निवारण श्रीगुरूंनी केले आहे. ह्या अडीअडचणींच्या निवारणार्थ, आपल्याला जी काही निश्चित 'सेवा' सुचविण्यात आली, त्यामुळे आपल्या जीवनात जी कमतरता होती, ती उणीव ह्या सेवेने भरून निघाली. आपल्या जीवनाचा उपभोग आपण घेत असूनसुद्धा, ह्या जीवनात कशाची उणीव आहे ह्याकडे आपण ढुंकूनही पाहिले नाही. याउलट आपल्यापेक्षा इतरांना काही ऐहिक सुखांची प्राप्ती अधिक झाली असून, त्या प्रकारचे सुख आपल्याला का मिळत नाही? ह्या विचाराने आपण कार्यकेंद्रावर आलात. अशावेळी ऐहिक सुखांची प्राप्ती कशी व केव्हा होईल? याचा जो विचार आपण करीत होतात, त्याऐवजी "माझ्यामध्ये काय कमी आहे?" ही विचारणा जर केली असतीत तर प्रश्नांची विचारणा करण्यापेक्षा आपल्याला अधिक लाभ झाला असता. गुरुमार्गात वेळोवेळी भक्तभाविक गुरुमाध्यमाचा लाभ घेण्यासाठी येतात, तेव्हा आपले कर्तव्य गुरुमार्गात काय आहे? व येणाऱ्या भक्तांच्या बाबतीत गुरूंचे कर्तव्य काय आहे? हे समजले पाहिजे. नाहीतर वेळोवेळी गुरुवाणीतून जे जे काही भक्तांच्याबद्दल निवेदन किंवा भाकीत बोलले जाते, त्याची प्रचीति न येण्यामुळे, बहुसंख्य लोक ह्या मार्गाला निष्कारण गालबोट लावतात. भक्त हा सज्ञानी पण नाही व अज्ञानी पण नाही; अशा अवस्थेत असतो. अशावेळी गुरूंनी आपले इष्टकर्तव्य करून, लहान-मोठा, गरीब-श्रीमंत, ज्ञानी-अज्ञानी याचा विचार न करता, स्पष्टपणे जे काही जीवनात कमी अधिक असेल ते सांगावयास पाहिजे. नाहीतर बहुमोल अशा जीवनाचा अपव्यय होऊन, 'ना घरका, ना घाटका' अशी स्थिती भक्तांची होत असते. जी काही प्राप्ती भक्ताना होणार असेल, ती 'देवाधीन' आहे. ते सामर्थ्य आपल्यापाशी नाही; म्हणून 'अमुक एक प्राप्त होणार आहे', असे आमिष दाखवून, भक्ताना भुरळ पाडणे गैर आहे. उलट, गुरुकृपाशीर्वादप्राप्तीचा मार्ग भक्ताला दाखविण्याचे कर्तव्य साधकाने प्रथमतः केले पाहिजे.



जगतात अन्यत्र अनेक साधक मार्गदर्शन करतात; व कार्यकेंद्रावर अडीअडचणीनिमित्त उपस्थित होत असता, आपल्या मनामध्ये बाहेर ज्या पद्धतीने कार्य चालते, त्याचे विचार असतात. पण हा मार्ग इतरांच्यापेक्षा सर्वस्वी भिन्न आहे. आपल्या अडीअडचणी ह्या भूत, भविष्य, वर्तमान ह्या तिन्ही काळावर अवलंबून नाहीत. म्हणून प्रथमतःच 'भविष्य सांगितले जात नाही'; असा स्पष्ट खुलासा केला. कारण जीवनात अडीअडचणी किंवा सुखदुःखे ही येतात तशीच जातात. पण अडचण येणे व जाणे ह्यांच्यामधला काळ हा पीडादायक आहे, असे आपण समजून चाललो आहोत. त्यामुळे ह्या काळात आपल्याला काय फायदा होतो आहे? याकडे आपण लक्ष देत नाही. वास्तविक संकटे किंवा दुःखे ही निवारण करणे, हे श्रीगुरूंना सहज शक्य आहे. पण आपण अडीअडचणीनी त्रस्त होतो, तेव्हाच 'गुरूंचा शोध' घेतो. वास्तविक हा शोध शोधून सापडणार नसून, शोधाऐवजी गुरुमार्गातून आपण काय बोध घ्यावयाचा? असा विचार केला, तर आपल्या जीवनात 'बोधामृताचा' वर्षाव होईल.

आपण भक्ताना जो गुरुमार्ग म्हणून सांगितलेला आहे, ते 'तत्त्वज्ञान' आहे. त्या तत्त्वज्ञानातून साधक अवस्थेमध्ये, या तत्त्वज्ञानाचे रूपांतर पुढे सिद्धसिद्धांतपद्धतीमध्ये व्हावयास पाहिजे. यासाठी 'तत्त्वज्ञान' हा विषय केवळ शाब्दिक असून चालत नाही. उदाहरणार्थ, 'वंशविमोचन' व 'कर्मविमोचन' हे दोन भिन्नाभिन्न विषय व त्यांचे कार्य, हे जरी तत्त्वज्ञानात निरूपण म्हणून सांगितले तरी प्रत्यक्षात त्यांचा लाभ, मानवी जीवनात घेता येत नाही. यासाठी तत्त्वज्ञानाचा शोध घेऊन, त्याचा बोध भक्तभाविकाना द्यावयाचा असतो. यामध्ये ज्याचा शोध आपण घेतला त्याबाबत, "ही साधना मी केली"; असे म्हणून चालत नाही. आज सृष्टीत अनेक शोध लावले गेले आहेत; परंतु हे शोध आज लागले नसून, काही हजारो वर्षापूर्वी तशा प्रकारचे शोध सिद्ध केलेले सापडतात. एखादे साधन आज सिद्ध करण्यासाठी, साधक अवस्थेत त्या साधकाची देहिक अवस्था व आत्मिक अवस्था, ह्या दोन अवस्था नामीतत्त्वाशी एकरूप झालेल्या असाव्या लागतात. ह्याचा अर्थ देहिक माध्यम हे 'मध्यस्थ' व्हावयास पाहिजे; असे प.पू. बाबांनी मला पूर्वी सांगितले होते. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे ह्या अवस्थेची प्राप्ती मला जेव्हा झाली

तेव्हा प.पू. बाबांनी मला असा इशारा दिला, ''या अवस्थेमुळे तुला भूत, भविष्य, वर्तमान हे समजू लागेल; परंतु हा लोभ क्षणिक असून, भवितव्यात अति महत्त्वाच्या कार्यासाठी तुझे देहिक माध्यम हे तयार व्हावयास पाहिजे. यासाठी ह्या तीन काळांचे कथन करण्याचे 'पाप' तू करू नकोस. कारण पुढे साधक अवस्थेमध्ये स्थळ, काळ, वेळ यांचे ज्ञान होण्याची अवस्था प्राप्त करावयाची आहे; ज्यामुळे जगाच्या कार्ययंत्रणेमध्ये अदलबदल करावयाचा आहे. असा अदलबदल जर सृष्टीत झाला, तरच मनुष्याला सुख, शांती, समाधान लाभेल. तेव्हा आज नुसते भविष्य सांगून एखादे भविष्य खरे करण्यापेक्षा, ते न सांगितलेले बरे!

गुरुमार्गात काय प्राप्त करावयाचे? याचे ज्ञान प्रथमतः होणे आवश्यक आहे. आपण 'दीक्षा' हा शब्द सर्वत्र ऐकतो. पण दीक्षेची जबाबदारी ही गुरूवर असते; व भक्तांचे कर्तव्य हे फक्त गुरुआज्ञेचे पालन करणे, असे असते. गुरुमार्गामध्ये ज्या दीक्षा - उपासना दीक्षा, नामस्मरण दीक्षा, अनुग्रह दीक्षा, गुरुदीक्षा, कारण दीक्षा व महाकारण दिशा; अशा आहेत, त्यांचे कार्य व त्या दीक्षेचा संबंध कोठे आहे हे समजले पाहिजे. ह्या दीक्षाविधीचा आरंभ अडीच हजार वर्षापूर्वी झालेला असून, वेळोवेळी जशी आवश्यकता भासली; त्याप्रमाणे त्या त्या दीक्षेची सिद्धता केली गेली आहे. श्रीगोरखनाथांचे देहिक माध्यम भस्मातून निर्माण झाले. म्हणजे त्यांच्या ठिकाणी काया, वाचा व मन अशा तीन तत्त्वांची उणीव होती. मीननाथांचा जन्म वासनेपोटी झाला असल्यामुळे, ''याला धुवून काढ''; अशी आज्ञा होताच गोरखनाथांनी मीननाथांचे कातडे वाळत घातले. जगातील पुढील कठीण काळामध्ये लोक अनाथ होऊ नयेत, म्हणून ईश्वराने नवनारायणांना जन्म देऊन, लोकाना सनाथ केले; व ह्या कार्यामध्ये अनेक प्रकारची साधनसिद्धता केली. ही सिद्धता पूर्वीच करून ठेवली आहे; व जशी वेळ येईल त्याप्रमाणे साधकाचे माध्यम कार्य करीत असते. आज अडचण निर्माण झाली की, मग आपण ईश्वर आहे की नाही याचा शोध घेतो. पण देव म्हणतो, ''तुला माझी आठवण आज आली आहे; पण तू जन्माला येण्यापूर्वी मो होतो, आज आहे व पुढेही तुला लागणार आहे.''



कार्यारंभी प.पू. हाजीबाबांची आज्ञा अशी होती की, ''जगापुढे कार्य कर''. त्यावेळी विचारणा अशी केली की, ''कार्य म्हणजे काय? साधक अवस्थेत काय प्राप्त होणे आवश्यक आहे, म्हणजे त्याला कार्य म्हणता येईल? 'कर्म' याचा पाच ऋणानुबंधांशी संबंध कसा आहे?'' कर्माचे जीवनातील कार्य व त्याची फलप्राप्ती, याचे ज्ञान साधकास होणे आवश्यक आहे. एखादेवेळी कर्माची अनिष्ट फलप्राप्ती होत असते. त्यावेळी हे समजले पाहिजे की, कर्म अस्तित्वात असूनही, त्या कर्माला कार्य करू देणे किंवा नाही, व तसेच त्या कर्माला इष्ट फल येईतोपर्यंत, त्या भक्ताला सेवा सूचित करणे महत्त्वाचे आहे. याचा अर्थ, साधक अवस्थेत कार्य आहे ते असे की, कर्मानुसार जे घडणार आहे ते घडू न देणे; किंवा कर्माची प्रवृत्ति जी असेल, त्याप्रमाणे कार्य होऊ न देणे. यासाठी भक्ताला कर्मवलयातून बाहेर काढून, गुरुवलयात धारण करावे लागते; व जी सेवा सूचित केली जाईल ती त्या भक्ताला झेपेल किंवा नाही, याचा विचार करणे आपले पहिले कर्तव्य आहे. कार्यकेंद्र हे 'सेवाधाम' असते. येणाऱ्या भक्ताला सेवेची गोडी लागली पाहिजे; तसेच 'सेवा' सूचित केल्यानंतर 'धाम' सुटता कामा नये; अशी जबाबदारी साधकाची आहे.

'कर्मविमोचन' हे साधन अति महत्त्वाचे असून, ते साधन असे आहे की, मनुष्याने जन्म प्राप्त केल्यानंतर त्याचा संबंध दोन जगांशी येत असतो; १) इहलोक, २) परलोक. जन्म घेण्यापूर्वी आत्मा व कर्म हे परलोकात असतात, व अशावेळी दोन अवस्थांचा विचार करून, जन्म प्राप्त होतो. पहिल्या अवस्थेमध्ये जन्म घेण्याची प्रवृत्ति आत्म्याला व्हावी लागते; व दुसऱ्या अवस्थेमध्ये गतकर्माच्या वासनेमुळे जन्म घेण्याची इच्छा होते. पहिली अवस्था ही आत्म्याला प्रवृत्ति होण्याने होते. त्यामध्ये आत्म्याचा हेतू असा असतो की, पूर्वजन्मात आपल्या हातून घडलेल्या चांगल्या वाईट कर्मानुसार, ह्या बंधनातून आपली सुटका व्हावी. ती सुटका जन्म घेतल्याशिवाय कोणालाही प्राप्त करून घेता येत नाही. दुसऱ्या अवस्थेमध्ये गतजन्मात केलेल्या इच्छावासनामुळे, मरणोत्तर जीवनात काही इच्छावासनांचा भोग अपूर्ण राहिला असेल, तर आत्म्याची जन्म घेण्याची सहज प्रवृत्ति नसून, कर्म हे त्याला वासनेमुळे जन्म

घेण्यास भाग पाडते. जेव्हा आत्म्यास परलोकातून इहलोकात यावे लागते तेव्हा तीन ऋणानुबंधांचा हितसंबंध त्याला जोडावा लागतो. हे तीन ऋणानुबंध जोडल्याशिवाय, त्याला जन्माचे कार्य 'कर्म' म्हणून करता येत नाही. यातील पहिला संबंध मातापित्याशी जोडावा लागतो; कारण जन्मप्राप्तीसाठी मातृपितृ हे माध्यम आवश्यक असते. ही देहाची धारणा म्हणजे काया, वाचा, मन किंवा 'पिंड', यांची धारणा होत असता, जे संस्कार होतील त्यावर कर्माचे कार्य अवलंबून असते. त्यावेळी होत असलेल्या संस्कारांचा किंवा इच्छावासनांचा 'ठसा' त्या पिंडावर असतो. अशा जन्माची धारणा ही मातृपितृ ऋणानुबंधातून जोडली गेल्यानंतर, इहजगतात जन्म देणाऱ्या या मातापित्यांचे जे आप्तस्वकीय, त्यांचा संबंध आपोआप किंवा नकळत व इच्छा नसूनसुद्धा जोडला जातो. त्याला शास्त्रात 'इतरेजन' असे म्हणतात. हा इतरेजनांचा संबंध, जन्मप्राप्तीच्यावेळी जीवाच्या धारणेला काहीही हितसंबंध जोडीत नसून, 'जीव घेण्यासाठी' यांची उपस्थिती ही 'अनावश्यक', म्हणजे न मागता आपल्या कर्मामध्ये समावेश म्हणून होते.

पूर्वकर्म हे काया, वाचा, मनाने घडलेले असते. त्या कर्माला जबाबदार आत्मा किंवा कर्म हे असते; व इहजन्मात या दोघांची उपस्थिती आवश्यक असते. परंतु जे दोन ऋणानुबंध मातृपितृ व इतरेजन हे जन्मप्राप्तीच्यावेळी जोडले जातात; त्यांचा 'कर्म' म्हणून आपल्या कर्मवलयात समावेश होत नाही. त्यामुळे जन्म हा कर्मानुसार व्यतीत होत असता, ह्या ऋणानुबंधांचा अडथळा, ते 'कर्म' ह्या अवस्थेत नसण्याने होत असतो; व ह्या ऋणानुबंधांची जीवनात मदत होण्याऐवजी, त्यांचा जीवनात अडथळा निर्माण होतो.

कर्मामध्ये तरतूद असूनसुद्धा व आत्म्याला आपली सुटका करून घेण्याइतके कर्म असूनसुद्धा, ह्या अगतिक ऋणानुबंधामुळे मोहाला बळी पडावे लागते. मातृपितृ व इतरेजन ह्या दोन ऋणानुबंधांचा हितसंबंध कर्म म्हणून आल्याशिवाय, त्याचा लाभ घेता येत नाही. हा लाभ होण्यासाठी, 'देवादिक' यांचा ऋणानुबंध जीवनात जोडला गेला आहे. ह्या ऋणानुबंधात आपल्या घराण्याच्या ज्या कुलदेवदेवता आहेत, त्यांची



उपासना ही पूर्वापार पद्धतीने केली असता, त्या सेवेचा लाभ म्हणजे हे दोन ऋणानुबंध, जे निमित्त म्हणून आहेत, त्यांचे रूपांतर कर्मात व्हावे, अशी तरतूद कुलाचार व कुलधर्म यांच्यात केलेली आहे. ह्या कुलाचारात कुलस्वामी व कुलस्वामिनी असे दोन देव आहेत. कुलदेवी हिचे कार्य आपल्या जीवनात आईचा ऋणानुबंध जोडण्यासाठी कारणीभूत होते; व कुलस्वामीचा ऋणानुबंध पित्यासाठी कारणीभूत होतो. अशी ही योजना शास्त्राने, मनुष्य जन्माला येण्यापूर्वी केलेली आहे. जन्माला येणारा जो कोणी मनुष्य आहे, त्याला आपले जीवन कर्माने व्यतीत करावे लागते; म्हणून त्याला 'नरजन्म' असे म्हणतात. पण जर योग्य संस्काराने हा पिंड जोपासला गेला तर 'नराचा नारायण' होणे काही अशक्य नाही. याची साक्ष म्हणून आपल्याला जन्म देतेवेळी देवाने इतके उपकार केले आहेत की, जर आपले शरीर निरखून पाहिले तर याचा बोध इतरानी देण्याची गरज नाही. डोक्यापासून पायापर्यंत असलेली माध्यमे की, ज्यांचा उपयोग आपण अहर्निश करून घेत असतो, ह्या प्रत्येक माध्यमांची दोन-दोन अंगे, आपण न मागता देवाने दिली आहेत. त्यांचा वापर करीत असता, 'आठवणीत ठेवा, उपयोग न करता परत पाठवू नका'; असा संकेत परमेश्वराने दिला आहे. यामध्ये आपल्या शरीराची उजवी बाजू ही 'ब्रह्मांड' व डावी बाजू ही पिंडाची आहे. ह्या दोन पिंडांचे पोषण होण्यासाठी अन्ननलिका व श्वासनलिका एकत्र दिल्या आहेत. याचाच अर्थ 'पिंडी ते ब्रह्मांडी व ब्रह्मांडी तेच पिंडी'. शरीराची जोपासना ही अन्न व पाणी हे अन्ननलिकेतून आणि आत्म्याचे पोषण हवा व आकाशतत्त्व हे श्वासनलिकेतून, ह्या धर्माप्रमाणे होत असते. ही चार तत्त्वे जोडल्यावर, शरीराच्या मध्यभागी 'तेज' हे प्रगट व्हावे, अशी धारणा आहे; म्हणजे 'नराचा नारायण' होण्याची क्रिया पूर्ण होते. पण आपण जन्माला येऊन, जीवाची जोपासना करावयाची सोडून, फक्त पिंडाला 'पोसला' आहे. अशी रचना विधात्याने आम्हा मानवांची केली असताना, ती ती स्थाने किंवा माध्यमे ह्यांचा यथायोग्य रीतीने सदुपयोग केला जात नाही. हा जन्म पुन्हा येईल, किंवा न येईल हे सांगता येत नाही. तेव्हा जे जे संस्कार होणे आवश्यक आहे ते ते संस्कार योग्य त्यावेळी करून घेणे, हा आम्हा मानवांचा धर्म आहे. अशा धर्माचे

पालन करण्यास आपण आधुनिक पद्धतीचा पेहराव व आचार, विचार, आहार यामुळे विसरलो, तरी श्रीगुरू हे आपल्याला विसरले नाहीत. जन्मप्राप्तीसाठी जरी इच्छावासना कारणीभूत झाली असली तरी पुढे क्रमप्राप्त असलेले मरण हे साधे मरण म्हणून न येता, 'अमर' ही अवस्था प्राप्त व्हावी; ही प्राप्ती गुरुआज्ञेशिवाय होत नाही. तेव्हा गुरुमार्गी होणे याचा अर्थ गुरूंच्या बंधनामध्ये 'जेविता खेळिता चित्त दत्तमय झाले'; असे व्हावयास पाहिजे. आम्हा मानवाना फाजील ज्ञानाच्या अट्टाहासामुळे, भोग भोगण्यासाठीच जन्माला आलो आहोत असे वाटते. पण आपण सुखात नांदावे, म्हणून आपण काहीएक साधना न करता, श्रीपंतांच्या आरतीप्रमाणे 'साधनसेवा काहीच नसता, दावियले निजधाम'; अशी जी अवस्था आम्हा भक्तांना आज प्राप्त करून दिली आहे, याचा अर्थ 'कर्मविमोचन' होय.

# १०. मानवी जीवन - पाच ऋणानुबंध

जो इतरेजनांचा ऋणानुबंध फेडावयाचा आहे, त्या ऋणानुबंधातून सुटका किंवा सोडवणूक प्राप्त करून घेणे, हे अधिक महत्त्वाचे आहे. कारण शंभरात एखाददुसऱ्याला हा ऋणानुबंध उपयोगी पडत असतो. वास्तविक हा ऋणानुबंध 'निंदकाचे घर असावे शेजारी'; ह्याप्रमाणे असून, ह्याचा लाभ करून घ्यावयास पाहिजे. यदाकदाचित देव भेटीला आला; व जर कर्मात भेट लिहीली असेल किंवा घडणार असेल तर हा ऋणानुबंध देवाला भेटू न देता, देवाला वाटेला लावेल. उदाहरणार्थ, आपल्याला अशी इच्छा झाली की, सत्यनारायणाची पूजा आपल्या घरी आपल्या हातून घडावी; पण ती पूजा, 'लोक काय म्हणतील?' हे विचारात घेऊन, आपण जाहीरपणे किंवा स्वेच्छेने करीत नाही. ह्या 'इतरेजनाना' घालवून न देता, त्यांची प्रेमाने बोळवण करण्यासाठी साधा उपाय शास्त्राने सूचित केला आहे, तो म्हणजे 'वास्तुशांत'! आपण राहत असलेल्या घराचे, वास्तूचे संरक्षण आपणास मिळाले पाहिजे. आज आपले घर व्हावे व लोकानी स्तुती करावी की, 'ह्याने घरदार केले'; अशी आपली भावना असते. घरासाठी लाख दीडलाख खर्च आपण करतो; पण एक 'वास्तुशांत' की, ज्याला जास्तीत जास्त पाचशे रुपये खर्च येईल, ती करत नाही; व जेव्हा त्या घरात आपण राहण्यास येतो तेव्हा 'शांत' झाली नसल्याने, तिची बहीण 'अशांती' ही आपल्या वाटयाला सदैव येत असते. मानवी जीवनातील पन्नास टक्के दुःखनिवारण, ह्या वास्तुशांतीने व्हावयाचे असते. पण ही वास्तूची स्थापना शास्त्रोक्त होत नाही. याचप्रमाणे आपल्या शरीराच्या ठिकाणीसुद्धा 'वास्तु' आहे; पण ती वास्तु आपल्या आचार, विचार व उच्चार यांच्या ठायी आहे. ती सदैव 'शांत' राहण्यासाठी नित्य साधना किंवा सेवा, ही कोणी सांगितली म्हणून करू नये, तर ही अवस्था उत्स्फूर्त व्हावयास पाहिजे.

प्रत्येक मनुष्य जन्माला येतेवेळी, ह्या पाच ऋणानुबंधांचे हितसंबंध कमीअधिक प्रमाणात असतात. मनुष्याच्या जीवनामध्ये जगण्यासाठी जी विसंगती दिसते, त्याचे मूळ कारण कोणास न समजल्यामुळे, सर्वांना एका पातळीवर आणण्याचा प्रयत्न आज भौतिकवाद करीत असूनही,

या भौतिकवादात मनुष्याचे जीवन एका पातळीवर येणे शक्य नाही. जीवनधारणा ज्या मूळ तत्त्वात झालेली आहे, तिची उत्पत्ति व कारण समजणे; आणि त्याप्रमाणे त्या जीवनाचा लाभ घेणे, हे कर्तव्य फक्त पारमार्थिक जीवनात मिळू शकते. याचे कारण वरील तीन ऋणानुबंधांची गरज जीवनात आहे व नाही. 'कर्म' हे जीवन जगण्यासाठी लागते, हे बरोबर आहे; व शास्त्राप्रमाणे कर्माचा उहापोह वारंवार केला गेला आहे. म्हणजे ह्या ऋणानुबंधांचा हितसंबंध जर आपल्या कर्मावर अवलंबून असेल तर त्याचा विचार जीवनात करणे अत्यावश्यक आहे. जन्मप्राप्तीनंतर आपल्या जीवनाची 'उपपत्ति' समजली, तर ह्या ऋणानुबंधांची फेड ही 'भोग' किंवा 'अडथळा' म्हणून आपल्याला भोगावी लागत नाही. जन्माची फेड कर्तव्य म्हणून करावयाची असते. हा सुलभ मार्ग शास्त्राने दाखविला असून, डोळे झाकून जर आपण जीवन जगलो तर आज जीवन जगण्यासाठी व त्या जीवनाचे समाधान मानण्यासाठी, प्रथमतः जीवन विकसित नाही. त्यामुळे ह्या विस्कळीत जीवनाचा लाभ घेत असता, त्या जीवनात सुख, शांति, समाधान आदींची प्राप्ती, नुसती अपेक्षा करून होणारी नाही. यासाठी जे प्राप्त जीवन आहे, त्याचा बारकाईने आपला आपणच बोध घ्यावयाचा असून, 'माझ्या जीवनात काय कमीअधिक आहे?' याचा विचार प्रथमतः करावा. आपल्या सभोवार मनुष्य सर्व सुखे उपभोगतो आहे हे पाहून, तशी सुखे आपल्याला प्राप्त होण्याची जरी इच्छा झाली तरी त्यांची प्राप्ती 'अनुकरण' करून, मनुष्याला कदापीहि न होता, उलट तो मनुष्य 'कर्जबाजारी' होत असतो.

आज प्रत्येकजण देवाधर्माचा विचार करून, त्याप्रमाणे धर्माचरण करीत आहे. गतकाळात खाण्यापिण्याची सुबत्ता होती; व वेळही भरपूर वाटयाला येत असे. त्याकाळात लोकानी ईश्वरभक्ती व धर्माचरण काही तपानी केले. परंतु त्याबद्दलचे यथायोग्य मार्गदर्शन न होण्यामुळे, जरी पन्नास-पन्नास वर्षे साधनसेवा केली गेली तरीसुद्धा त्या सेवेचा लाभ कुटुंबाला किंवा इतरेजनाना होऊ शकला नाही. उपासना मार्गामध्ये अचूक मार्गदर्शन होणे अत्यंत आवश्यक असते. 'गुरुमार्ग' हा अंधश्रद्धेचा मार्ग नसून, सखोल अशा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्याचा मार्ग आहे. जर त्याचा अभ्यास केला गेला असता तर आजची परिस्थिती पहावयास मिळाली



नसती. मनुष्य जन्म घेण्यापूर्वी फक्त कर्म अस्तित्वात असते. पण जन्मप्राप्तीनंतर कर्माव्यतिरिक्त अन्य तीन ऋणानुबंध हे आपल्या वाटयाला येत असतात. त्यांचा संबंध जीवनात आल्यावर, त्या ऋणानुबंधातील चांगले वाईट असे दोष, त्या व्यक्तीच्या वाटयाला येत असतात. हे दोष वेळीच विचार करून, त्यांचे विमोचन करणे आवश्यक असते. 'विमोचन' ह्याचा अर्थ 'निर्मूलन' करावयाचे असा नसून, ते ऋणानुबंध ईशकृपेने आपणास अनुकूल करून घ्यावयाचे, असा आहे. अशा ह्या ऋणानुबंधातील दोषांचे विमोचन न केल्यामुळे, त्यांची प्रखरता इतकी वाढते की, ह्या दोषांमुळे घराण्यात पुढे विद्यानाश, संपत्तीनाश, संततीनाश आदींचा समावेश होऊन, बघता बघता सर्वसामान्य माणसाची जीवन जगण्याची जी परिस्थिती असते ती न राहून, जन्माला येऊन 'ऋण भोगणे'; यासाठीच जन्म घेतला आहे काय? असे वाटू लागते. अशी ही साधने म्हणजे 'वंशविमोचन' व 'कर्मविमोचन' दुर्लभ असून, त्यांची प्राप्ती साधकाला करून घेण्यासाठी, सर्वसंगपरित्याग करावा लागतो.

गुरुमार्गामध्ये पुष्कळ लोक असे बोलताना दिसतात की, "मी बारा वर्षे तपश्चर्या केली;" पण प्रथमतः 'तपश्चर्या' ह्या शब्दाचा अर्थ समजून घ्यावा लागेल. बहुतांशी लोक आपल्या मनाने वर्षानुवर्षे सेवा करतात. त्या सेवेस 'तपश्चर्या' असे संबोधत असतात. वास्तविक अशी सेवा ही तपश्चर्या नसून, 'तप' आहे. ह्याचा अर्थ देवाचा किंवा गुरूंचा भक्त होण्याने, तो मनुष्य घरादाराला 'तापवत' असतो. तपश्चर्या ह्या शब्दाचा अर्थ न कळल्यामुळे, आपल्या समाजात अज्ञानाने, आपण आपल्या सेवेचा लाभ व्हावा, अशी इच्छा प्रगट करतो. तपश्चर्या म्हटल्यानंतर त्याचा अर्थ कळला, तर ऐकणाऱ्याला 'घाम' सुटेल; व या मार्गाला तो चुकूनही जाणार नाही. तपश्चर्या ह्याचा अर्थ 'गुरूंनी आज्ञा दिल्याप्रमाणे आचरण करणे'; असा आहे. माझ्या जीवनात मला तप करावयाचे नसून, माझ्या माध्यमातून तपश्चर्या घडवावयाची होती, म्हणून श्रीक्षेत्र औदुंबर येथे प.पू. साईबाबांनी जाण्यास सांगितले. तिथे गेल्यानंतर जी आज्ञा झाली, तिचा लाभ तुम्हा भक्ताना भवितव्यात व्हावा, म्हणून 'वंशविमोचन' व 'कर्मविमोचन' ही साधने तिथे सिद्ध केली.

# ११. प. पू. महंमद जिलानी बाबांचे आगमन-मरणोत्तर जीवन, कर्म

जीवनारंभी अनेक लोक मार्गदर्शनार्थ मला भेटावयास येत असत. पण ती भेट व्यक्तिशः अशी होती. ह्या भेटीचा लोभ वाढेल, म्हणून प.पू. हाजीबाबांनी अशी आज्ञा केली की, ''जे जगताला सांगावयाचे आहे त्यामध्ये व्यक्तीचा हितसंबंध असता कामा नये, तर सेवेचे रूपांतर कार्यामध्ये व्हावयास पाहिजे; व ही कार्यपद्धती, परमपूज्य महंमद जिलानीबाबा यांच्या कृपेने तू प्राप्त करून घे. ह्यासाठी तुला सेवा करणे भाग आहे. त्यांची भेट व दर्शन तू पूर्वी घेतलेले आहेस. त्यांची समाधी ही हिंदुस्थानात नसून, बगदाद येथे आहे. त्यांच्या दर्शनासाठी तू गेला होतास; पण त्यावेळी तुझ्या ध्यानीमनीसुद्धा आले नाही की, ह्या थोर विभूतीच्या कृपाशीर्वादाचा संबंध पुढे जीवनात येणार आहे.'' त्याप्रमाणे त्या आठवड्यात माझे पारायण संपल्यावर, गुरुआज्ञेप्रमाणे मामांच्या घरी गेलो असता, ह्या थोर विभूतींचे आगमन (संचार अवस्थेमध्ये) झाले. त्यावेळी प.पू. महंमद ज़िलानीबाबा यांनी असे सांगितले की, ''माझे आगमन ह्याचा अर्थ, ह्या कार्यार्थ परमेश्वराने माझी नेमणूक केली आहे. गुरुआज्ञेप्रमाणे श्रीक्षेत्र औदुंबर येथल्या वास्तव्याची मुदत पूर्ण होऊन आपण स्वगृही जाल; तेव्हा योग्य ते मार्गदर्शन, ज्याची भवितव्यात जगाला जरूर आहे, असे कार्य स्थापन करण्याची सूचना मी देईन. ह्या कार्यात महत्त्वाचा विषय वंशविमोचन व कर्मविमोचन हा आहे. त्याचा अभ्यास पूर्ण करून घ्यावयास पाहिजे. कोणाही व्यक्तीस शंकाकुशंका उरणार नाहीत, इतका हा विषय व्यापक आहे, त्याचा विचार करा. जन्माला येणाऱ्या प्रत्येकाच्या 'पाठिशी' देव हा आहेच; पण त्याचा विचार न करता, 'पोटाशी' जे कर्म आहे त्याचा विचार प्रत्येकजण करीत असतो. त्यामुळे आपण अभागी व अनाथ आहोत असा विचार करून, परमेश्वराला शिव्या देण्याव्यतिरिक्त अन्य कार्य जगतात कोणीही करीत नाही.''



प.पू. महंमद जिलानीबाबांचे आगमन झाल्यानंतर त्यांच्या आशीर्वादाने पुन्हा 'वंशविमोचन' याच्या अभ्यासास औदुंबर येथे सुरुवात केली. पूर्वी वर निवेदन केल्याप्रमाणे, जे असंख्य आत्मे पिशाच्च योनीमध्ये वावरत होते, त्याना देहधारणा करता येते; पण ही पिशाच्चयोनी पंचमहाभूत तत्त्वानी देहाची धारणा न करता, आम्हा मानवामध्ये काही अंशमात्र Ectoplasm म्हणून जे असते, त्याचा वापर करून घेऊन, आपला मृतदेह हा पुनश्च साकार करण्याचा प्रयत्न करते. त्याशिवाय आपल्या सभोवार काही आत्मे असे असतात की, ज्याना आपला देह साकार करता येत नाही. त्यांचे अस्तित्व वलयरूपाने असते. ते वलय दिसण्याची दृष्टि आपल्याला प्राप्त न झाल्यामुळे दिसत नाही. वास्तविक ज्या कोणाला बाधा झाली आहे, त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर, त्या बाधेची छटा दिसत असते; व त्यामुळे चेहरा जसा असतो त्यापेक्षाही उग्र व विद्रूप असा दिसतो. तेव्हा 'वंशविमोचन' हे साधन सिद्ध करतेवेळी असे व्हावयास पाहिजे की, जे आत्मे दृष्य आहेत व जे अदृष्य आहेत, त्या सर्वांना मुक्ती प्राप्त करून देणे, हे प्रथमतः प्राप्त झाले पाहिजे. काही आत्मे आपल्या दिवंगत शरीराचा भास लोकाना करून देऊन, आपली मुक्तता व्हावी ह्या हेतूने, इतरांच्या ठिकाणी जे Ectoplasm आहे त्याचा वापर करून, आपले अस्तित्व व्यक्त करतात. पण जे आत्मे वलयरूपाने अस्तित्वात आहेत, त्यांची पीडा, त्रास हे समजण्यापलीकडचे आहेत. कारण त्यांच्या इच्छावासना काय आहेत ह्या जर देहात संचार होऊन सांगितल्या गेल्या तर त्यांच्या निवारणार्थ मार्गदर्शन करता येते; पण जे वलयरूपाने आहेत, त्याना शरीरमाध्यमात प्रवेश करता येत नाही. तेव्हा वलयरूपाने ते आत्मे ज्याना पीडा करावयाची असते, त्यांच्या सभोवार विरुद्ध गतीने (Anticlockwise) फिरत असतात. ह्या पीडेमुळे त्या मनुष्याच्या आधीव्याधी निवारण करणे, हेही समजत नाही; व त्या आचारविचारांवा दुष्परिणाम त्या व्यक्तीवर होत असल्यामुळे, ती व्यक्ति पिशाच्चवत बोलूचालू लागते. याचा संपूर्ण अभ्यास करणे, हे भवितव्यात लोकांच्या हिताचे आहे. ह्या साधनाची प्राप्ती म्हणजे परमेश्वराच्या प्राप्तीपेक्षाही अधिक आहे; असे म्हणता येईल!

मरणोत्तर जीवनामध्ये जे जीवन आत्म्याला आहे, त्या जीवनाबद्दलचा अभ्यास आत्तापर्यंत कोणीही केलेला नाही. ही योनी 'पिशाच्चयोनी' म्हणून संबोधण्यात येते. 'पिशाच्च' म्हणजे मरणोत्तर ज्याच्या इच्छावासना शिल्लक राहिल्या आहेत तो आत्मा! तेव्हा ही योनी तर्कावर आधारलेली नसून, तिचाही अभ्यास शास्त्र म्हणून केला पाहिजे. मनुष्य जन्माला येतो; व तो मेल्यानंतर, बारा दिवसात सुतक पाळून व त्या व्यक्तीचे श्राद्धविधी करून, 'पिंडाला कावळा शिवला आहे', असे म्हणून आपण आपली सुटका करून घेत असतो. उदाहरणार्थ, एखादा मनुष्य पन्नास ते साठ वर्षे आयुष्य व्यतीत करतो. त्यामध्ये खाणेपिणे, कपडालत्ता, ऐषाराम ह्यामध्ये सबंध जीवनाचा समावेश करून, वासनामय जीवन जगतो. त्या व्यक्तीला मरण प्राप्त झाल्यावर, त्याचे विधी बारा दिवसात करून, केवळ 'कावळा पिंडाला शिवला आहे', ह्या भ्रामक कल्पनेने, त्या मनुष्याचे इहलोकी जीवन संपले; असे आपण म्हणतो. परंतु प्रत्येक आत्म्याचे जीवन पंचवीस टक्के इहलोकासाठी असून, पंचाहत्तर टक्के परलोकात असते. इहलोकीचे जीवन व्यतीत करून झाल्यावर, हा आत्मा मुक्त झाला असे म्हणणे चुकीचे होईल. कारण त्याला परलोकी जीवन आहे; व हे परलोकीचे जीवन, इहलोकी प्राप्त केलेले संस्कार, ज्ञान, धर्माचरण व त्यापरत्वे कर्म यावर अवलंबून असते. इहलोकात प्राप्त झालेले जे जीवन आहे, त्यापैकी परोपकारार्थ किती खर्च केले? यावर परलोकातले जीवन अवलंबून असते. असे जीवन इहलोकी, म्हणजे जे जग आपल्याला दिसते, त्याच्याशी पंचवीस टक्के हितसंबंधित असून, पंचाहत्तर टक्के जीवन हे पुढच्या जन्मीची 'ठेव' म्हणून वापरावयाचे आहे. याचा अर्थ न समजल्यामुळे, आत्म्याला सद्गती किंवा मुक्ती प्राप्त झाली आहे असे समजून, 'कैलासवासी' इत्यादी नावाने संबोधून, त्या व्यक्तीचा आदर करीत असतात. पण ह्या योनी पाच लोकामध्ये संचार अवस्थेमध्ये हिंडत असतात. प्रथमतः मरणोत्तर जीवनामध्ये हा पाच लोकीचा प्रवास सुरू होत नसून, परलोक व इहलोक ह्यामध्ये जी पोकळी (Vacuum) असते, त्यामध्ये आपल्या इच्छावासनेमुळे हा आत्मा हिंडत असतो. त्यास 'Earth bound spirit' असे म्हणतात. ह्यातून सुटका करून घेतल्याशिवाय, हा जो पाच लोकीचा प्रवास आहे त्याला आरंभ होत नाही. ह्यासाठी ह्या पाच लोकात, जी यात्रा मरणोत्तर जीवनामध्ये प्रत्येक



मनुष्याला 'प्रवास' म्हणून करणे क्रमप्राप्त आहे, त्याची तरतूद इहलोकीच्या जीवनात करावयाची असते.

प्राप्त जीवनात पुढील जीवनाची तरतूद, याबरोबरच ह्या जीवनामध्ये सुख, शांति, समाधान याचाही लाभ व्हावा, यासाठी काही मोठे धार्मिक कृत्य किंवा प्रखर अशी साधना अथवा देवदेवतार्जन करावे लागत नाही. आपले दैनंदिन जीवन व्यतीत करीत असताना, निदान झोपण्यापूर्वी जर जीवनाचे सिंहावलोकन केले की, 'आजचे जीवन इच्छानुरूप व वासनारूप किती खर्च केले?' तरी ते पुरे आहे. वास्तविक इच्छा होणे व वासना होणे, हे दोन्ही धर्म देहाला आहेत. पण कोणती वासना? व कोणती इच्छा? हे काही शिकलेल्या माणसालासुद्धा समजत नाही. हे दोन शब्द, यांचा अर्थ समजून त्याप्रमाणे वागल्यानंतर, इहजगतात व परलोकात काय घडले? हे इतराना किंवा गुरुमार्गामध्ये गुरूंना विचारण्याचा प्रश्न शिल्लक राहत नाही.

जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे जीवन, इहलोकात व परलोकात हितसंबंधित असते. इहलोकात जन्म झाल्यानंतर जे कर्म भोगण्यासाठी आपल्या वाटयाला येत असते ते कर्म परलोकात असून, त्याला आवाहन करावयाचे असते. आपण अडचणीत आहोत किंवा आपल्याला त्या कर्माची आवश्यकता आहे, म्हणून ते कर्म आवाहनीत होत नाही. अडचणी आल्यानंतर मनुष्य सर्व तऱ्हेचे प्रयत्न करतो; परंतु त्याचे लक्ष स्वतःच्या अडचणीवर असल्यामुळे, जरी त्यांच्या हातून सेवा होत असली तरी ती फक्त काया व वाचा ह्या माध्यमातून होते. मन त्या सेवेशी एकरूप होत नाही. कर्माची निर्मिती काया, वाचा व मन यांच्या एकरूपत्वातून होत असते. त्यामुळे आज ज्या कर्माची आवश्यकता आहे ते कर्म काया-वाचा-मनाचे एकरूपत्व झाल्याशिवाय आवाहनीत होत नाही; किंवा प्रवाहित होत नाही.

अशी ही जन्मप्राप्तीनंतर कर्माची देवाण-घेवाण चालू असते. त्या कर्माचे इष्ट फल प्राप्त व्हावे, अशी अपेक्षा धरली तरी केवळ कर्म आहे म्हणून त्याची प्राप्ती करता येत नाही. जोपर्यंत कर्म सुलभपणे कार्यान्वित होत असते तोपर्यंत कोणीही मनुष्य ह्या जीवनात काय आहे

याचा विचार करीत नाही. असे कर्म जे आपल्या जीवनात असून, त्या कर्माला कार्य आहे, परंतु ते कार्यान्वित होत नाही; याचा अर्थ अडीअडचण म्हणून विचारात घेतला जातो; पण ही अडचण जीवनामध्ये कर्मामुळे नसून, कर्माला कार्य करण्यासाठी जे माध्यम म्हणजे देह ते विकसित नसते; त्यामुळे कर्माला आपले फल, ही देहिक अवस्था अविकसित असल्याने देता येत नाही.

देहाची धारणा काया, वाचा, मनाने होत असते. पण जन्माचे कार्य होण्यासाठी, ह्या तीन अवस्थेत पाच कोश (अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय) अंतर्भूत असतात. या पाच कोशापैकी जीवनात पहिले तीन कोश; अन्नमय, प्राणमय, मनोमय यानी कर्माची इष्टक्रिया करावयाची असून, केलेल्या कर्माचे जे फल प्राप्त होत असते, त्या फलात सुख, शांती, समाधान प्राप्त करावयाचे असून, ती प्राप्ती विज्ञानमय व आनंदमय कोशांनी मिळवायची असते. ह्या दोन कोशांचे कार्य जेव्हा ह्या जन्मात होऊ लागते तेव्हाच ह्या कार्याला 'जीवन' असे म्हणतात. अन्यथा जीवन 'एकांगी' आहे ह्याची धारणा होत असताना काया, वाचा, मनाची निर्मिती ही पंचतत्त्वातून होत असते. असा देह प्राप्त होऊन, तो क्रिया करण्यास कार्यरूप होणे, यालाच 'चेतना' म्हणजे 'देहिकशक्ति' असे म्हणतात; व जो आत्मा देहामध्ये आहे त्या आत्म्याची जी शक्ति देहातून कार्यान्वित होत असते, त्यास 'आत्मिक शक्ति' किंवा 'चैतन्य' असे म्हणतात. ह्या दोन शक्तींचे कार्य एकाचवेळी देहातून होत असते. हे कार्य होत असले तरी जो जन्म कर्मामुळे, वासनेमुळे किंवा आत्म्यामुळे प्राप्त होत असतो, त्यातील कार्य, म्हणजे ज्या पूर्वकर्मामुळे हा जन्म प्राप्त झाला त्या कर्माची सुटका व्हावयास पाहिजे. जेव्हा देहिक शक्ति हे कार्य करीत असते तेव्हा ही क्रिया देहातून कार्यान्वित होत असली, तरी त्यामध्ये देह जरी कर्म करतो आहे तरी त्या क्रियेला 'कार्य' म्हणता येत नाही. ही जी क्रिया देहद्वारा होत असते व आपण जरी कर्म करतो आहे असे म्हणतो तरी त्या कर्मात फक्त कायेचा समावेश होत असतो. उदाहरणार्थ, आपल्याला तहान लागली आहे म्हणून चांदीच्या भांडयात पाणी प्यावयाचे सोडून, जर आपण चांदीच्या भांडयाचाच उपभोग घ्यायचे म्हटले, तर तहान भागणार नाही. त्याप्रमाणे



देह हा जरी जीवनभर क्रिया करीत असला तरी त्याची पूर्तता किंवा सुटका, ही कर्मापासून होण्यासाठी, त्या कर्मात आत्मा पूर्णतः असावयास पाहिजे. ह्याचा स्पष्ट अर्थ असा की, कर्म ही क्रिया देह करतो आहे म्हणजे कर्म घडेल असे नव्हे. तर त्या क्रियेत जोपर्यंत काया-वाचा-मन यांचा समावेश होत नाही तोपर्यंत कर्माची इच्छा किंवा वासना ही जरी देहाला झाली तरी ही इच्छावासनेची निर्मिती 'कर्म' म्हणून जमेस धरता येत नाही. जन्मप्राप्तीसाठी कर्माचा संचय करावयाचा असून, पुढे ह्याच कर्माला कार्य करावयाचे असते, तेव्हा आपल्या हातून घडलेले कर्म हे खरोखर घडते आहे की नाही? हा विचार करून, जीवन व्यतीत व्हावयास पाहिजे. ह्याचा अर्थ, ह्या जन्मात जी क्रिया करावयाची असते त्या क्रियेमध्ये विषय असावयास पाहिजे; व जो विषय आपणास प्राप्त करावयाचा असतो, त्यापरत्वे क्रिया करीत असता, ती क्रिया निरासक्त बुद्धीने जर झाली तर त्या क्रियेत अंतर्भूत झालेला विषय हा आपल्या नकळत कर्माची धारणा करून घेतो. उदाहरणार्थ, आपण नित्याच्या जीवनात जी कडधान्ये पाण्यात भिजत घालतो, त्या धान्याचे बीज यास 'मोड' यावयास पाहिजे; व मोड न आलेल्या धान्याला 'चाड' असे आपण म्हणतो. त्याचप्रमाणे आपण जीवन व्यतीत करतो; परंतु कर्माचा गतायुष्यातला विषय व आजच्या जीवनात नव्याने येणारा विषय यांचे साम्य न होण्याने, जीवनात सुख, शांति, समाधान आदींचा लाभ आपल्याला मिळत नाही. नवीन विषयाची धारणा व त्याचे कार्य अनुभवास येण्यास वेळ लागतो; पण तिथपर्यंत त्याची वाट बघावी, हे आपल्याला पटत नाही. म्हणून प.पू. साईबाबांनी सर्व भक्तास हे निवेदन केले आहे की, "श्रद्धा ही एका देवावर किंवा एका तत्त्वावर ठेवा; व त्याचे फल प्राप्त होण्यासाठी घाई करू नका. जे कर्म आहे, त्याचा निर्णय काय आहे? हे ज्ञान नाही; व कर्मातील विषय हा परिचित नसल्याकारणाने, तुमच्या मागण्याने कदाचित त्या कर्मात पीडा किंवा अडचणी निर्माण होऊ शकतील. तेव्हा सेवा केली म्हणजे लगेच आपण कर्माचे फल मागणे हिताचे नसून, त्या कर्माचे फल जेव्हा सद्गुरूंना आपल्याला द्यावयाचे असते तेव्हा त्या कर्माचे विमोचन करून, ते फल आपणास देत असतात. याचा अर्थ 'सबुरी' होय."

# १२. जीवन - एकोणीस माध्यमे

जन्माला येतेवेळी जीवन हे एकोणीस माध्यमातून व्यतीत करावयाचे असते. यापैकी पूर्वजन्मातील कर्म, ह्यातून सुटका होण्यासाठी नऊ माध्यमांचा, म्हणजे पाच कर्मेंद्रिये, दोन कोश, बुद्धि व स्थूल मन, यांचा समावेश होतो; व पुढील जन्माची तरतूद ह्यासाठी नऊ माध्यमांची, म्हणजे पाच ज्ञानेंद्रिये, तीन कोश, व चित्त, यांची जरूरी आहे. पण ह्या नऊ माध्यमांचा विकास होणे आवश्यक आहे. पहिल्या नऊ माध्यमात, कर्माचा उपभोग घेतल्यामुळे जीवन विकारमय बनते; व पुढील नऊ माध्यमांचा विकास करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे म्हटल्यावर, विकार हे प्रथम कमी केले पाहिजेत. परंतु याउलट सद्गुरुकृपेने परिस्थितीमध्ये बदल झाल्यावर, विकार अधिक बळावतात; म्हणजे संपूर्ण शरीर हे विकारमय होते. देहिक विकास होण्यासाठी, देहातील कोश महत्त्वाचे आहेत. पहिल्या दोन म्हणजे अन्नमय व प्राणमय कोशांचा धर्म वासना निर्माण करणे; व विज्ञानमय, आनंदमय कोशांचा धर्म इच्छा निर्माण करणे, असा आहे.

वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, प्राप्त जन्म हा भोग भोगण्यासाठी नसून, जन्म घेतल्यावर जीवनाचे सार्थक व्हावे, या हेतूने परमेश्वराने दिला आहे; परंतु आपण त्याचा वापर यथार्थ करीत नाही. ह्या अवस्थेला आपले अज्ञान कारणीभूत आहे. जीवनाची संपूर्ण धारणा व तिचे कार्य, हे पाच कोशावर अवलंबून आहे. अविकसित कोश हे नरजन्माची प्राप्ती 'कर्मपरत्वे' करण्यास कारणीभूत होतात; तर विकसित अवस्थेत हेच कोश प्राप्त जन्माला 'नारायण होणे', अशी अवस्था प्राप्त करून देतात. तेव्हा ह्या कोशांचे कार्य जीवनात किती महत्त्वाचे आहे हे साधकाने लक्षात घेतले पाहिजे.

आता सुरुवातीला अन्नमय कोशाचा विचार आपण करूया. ह्या कोशाचे कार्य, केवळ देहाचे पालनपोषण करणे असे नसून, मनुष्याला जगण्यासाठी म्हणून जे जे विषय लागत असतात, त्या सर्वांचा समावेश ह्या अन्नमय कोशात असतो. ही जाणीव हा कोश 'भूक' या क्रियेद्वारे मनुष्याला देऊन, त्याला जागे करीत असतो. पण व्यवहारात आपण



'भूक' या शब्दाचा वापर म्हणजे ज्या अन्नाची कमतरता शरीरात निर्माण झाली आहे, ते अन्न व पाणी यांची भूक, अशी अवस्था शरीरात निर्माण करतो. परंतु बाकी अन्य विषयांचीही गरज देहाला आहे, तिला 'भाक' असे म्हणतात. पण ही 'भाक' आपल्याला ऐकू न येण्यामुळे, फक्त भूक लागली आहे, एवढीच जाणीव होत असते. भाक हा गुणधर्म बुद्धीचा आहे. ती जाणीव आनंदमय कोशातून होत असते. पण त्यामध्ये बुद्धीचा अंतर्भाव होत असतो. ह्याचा अर्थ भाक निर्माण होण्याने आपण सज्ञानी होऊ शकतो; व ह्याचा लाभ जीवनात घेणे अत्यावश्यक आहे. ह्या जन्मात कर्माने आपले अन्न जे दिले आहे, त्यामध्ये इतरांचाही वाटा आहे; तो योग्य तऱ्हेने दिला गेला पाहिजे.

दुसरा कोश 'प्राणमय' कोश. हा कोश आपल्या ठिकाणी धारण झालेला आहे, परंतु त्याचे कार्य एकांगी नाही. मूळ कोश म्हणजे आत्मा ह्याठिकाणी असून, तो आत्मा 'चैतन्यमय' असतो; व बाकी कोशाना कार्यार्थ 'चेतना' निर्माण करून देत असतो. हे कार्य आपल्या नकळत दिवसरात्र होत असते. पण त्याचे हे कार्य म्हणजे केवळ प्राप्त झालेल्या जन्माचेच कार्य करावयाचे, असे नाही. हा कोश प्राप्त होणे याचा अर्थ म्हणजे जेव्हा मनुष्याची उत्क्रांती होत असते तेव्हा संपूर्ण शरीरात चौऱ्यांशी लक्ष योनी धारण होत असतात; व त्या योनीद्वारे मानवी जन्माचे कार्य करावयाचे असते, तेव्हा ह्या चौऱ्यांशी लक्ष योनी (organs) विकसित करणे, हा आम्हा मानवांचा धर्म आहे. ह्या कोशाच्या माध्यमातून, संपूर्ण शरीरभर कार्य चालू असते. ह्या माध्यमाचा विनियोग केवळ आपल्यासाठी नसून, इतरासाठीसुद्धा आहे; व त्याचा विनियोग, हा त्याचे गुणधर्म - दया, क्षमा, शांती यासाठी करावयाचा असतो. जगात आपणास मानवी जन्म प्राप्त झाला आहे म्हटल्यावर, 'मानवा' सारखे वागून, आपल्या सभोवार इतर जीवने जगतात आहेत त्यांचा 'मान' ठेवणे, हे आपले प्रथम कर्तव्य आहे. ह्यासाठी हा प्राण म्हणजे आत्मा, आपल्या हातून काहीतरी सत्कृत्य जन्मप्राप्तीनंतर घडावे, म्हणून जन्माला येण्यासाठी उत्सुक असतो. शेवटी अंतसमयी हा प्राण मूळतत्त्वात येतो. पण जर काही कारणामुळे वासना शिल्लक राहिली असली तर ती वासना पूर्ण होईतोपर्यंत त्याला गती नाही.

तिसरा कोश 'मनोमय'. या कोशातून जे कार्य आज होत आहे, ते म्हणजे अट्टाहास! 'जगाने आपल्या मनाप्रमाणे करावे'; असा वापर आपण ह्या कोशाचा करीत असतो. वास्तविक हा कोश ह्या जन्मात प्राप्त होणे हे दुर्लभ असून, हा कोश विकसित झाल्यावर, सदैव त्याच्या ध्यानीमनी असे विचार वास करावयास पाहिजेत की, 'जे का रंजले गांजले त्यासि म्हणे जो आपुले'. अशाप्रमाणे जो मनुष्य बोलण्याचालण्यात वागत असतो, त्याची मनोमय कोशाची प्राप्ती ही भूषणावह असून, ह्या कोशाचा विकास झाल्यावर, आपल्या नकळत ज्या क्रिया काया-वाचा-मनाने घडतात, त्यालाच 'सत्कर्म योगे वय घालवावे, सर्वामुखी मंगल बोलवावे'; असे म्हणतात. हा लाभ क्षणिक विषयाने जो आनंद प्राप्त होतो, त्या प्राप्तीपेक्षा कितीतरी पटीने मोठा असून, हा होणारा आनंद संपूर्ण काया, वाचा, मनाच्या ठिकाणी प्राप्त होतो. ह्या अवस्थेला 'सच्चिदानंद' असे म्हटले आहे.

चौथा कोश 'विज्ञानमय' कोश. जगात 'ज्ञान' ही एक अवस्था असून, त्या अवस्थेची प्राप्ती 'बोध' म्हणून घ्यावयाची असते. ह्या विज्ञानमय कोशाचा संबंध मोठा मेंदू व लहान मेंदूशी असतो. ह्या दोन्ही मेंदूंचे कार्य शरीरात ज्या रक्तवाहिन्या आहेत, त्यांच्याशी आहे. शरीराला स्पर्श होण्यापासून, एखादा आवाज आपण जो ऐकतो, त्याचे ज्ञान ह्या कोशातून होते. आता आपली देहिक माध्यमे म्हणजे पंचकर्मेंद्रिये व पंचज्ञानेंद्रिये ही यथोचित कार्य करीत असतात; म्हणून ह्या कोशाचे अस्तित्व समजत नाही. पण एखादा आंधळा किंवा एखादा बहिरा किंवा मुका, ह्या व्यक्तींना होणारी जाणीव, विज्ञानमय कोशामुळेच होत असते. एका इंद्रियाची त्याना कमतरता असली, तरी देहातील दुसरी अवस्था ही कार्य करीत असून, 'शोध' म्हणून ते कार्य जीवनात चालू असते.

हे कार्य आपल्या नकळत होते; नाहीतर आपण पेढयाच्याऐवजी विष खाल्ले असते. विषारी पदार्थ किंवा जी रानटी फळे आपण पाहतो, ज्यांचे ज्ञान आपल्याला नाही, ते आपण भक्षण करीत नाही. हे तारतम्य कशाने कळते? 'शोध' ही अवस्था अतिसूक्ष्म आहे; व ती अवस्था देहात आहे, म्हणून आपल्याला जगता येते. रोजच्या दिनचर्येमध्ये रात्री



झोपण्यापर्यंतचा काळ ह्या कोशावर अवलंबून आहे. जीवनामध्ये आपण उपभोग हा जडवादी तत्त्वांचा घेत असतो; त्यामुळे ईश्वरापर्यंत पोचणे किंवा देव आहे की नाही ह्या वादात आयुष्य फुकट घालवितो. ज्याप्रमाणे डोळे बंद केले तर जग अंधारात आहे असे वाटते; त्याप्रमाणे हा कोश विकसित नसल्यामुळे, जगाचा केवळ भास होतो. जेव्हा विज्ञानमय व आनंदमय ह्या कोशांचा लाभ आपण घेऊ शकू; त्यावेळी जग हे नश्वर आहे असे न म्हणता, जे जग आपल्याला दिसते आहे तोच ईश्वर आहे; असे आपण म्हणू लागू.

पूर्वी आपल्या पूजनादी विधीमध्ये देवाच्या मूर्ति, टाक, फोटो आदी पूजनार्थ होते. पण पूजन करणे म्हणजे काय करणे? याचा अर्थ न समजल्याने, अनर्थ ओढवला. ह्याला कारण देव नसून, आपण आहोत. देवाने जन्म देतेवेळी, लाख मोलाची माध्यमे, न मागता दिली. त्यांची किंमत लाख रुपयांपेक्षाही जास्त आहे. पण लाख रुपये कोठे आहेत? असे आपण मानू लागलो. प्राप्त जीवनाची किंमत लाखो रुपये आहे, हे समजू शकलो नाही; त्यामुळे जीवन प्राप्त होऊनसुद्धा, वाटयाला शेवटी राख येत असते. आपल्यासमोर जे जग आपल्याला दिसते ते जग दृष्य आहे व अदृष्य आहे. दुसरी बाजू आपल्याला अवगत होत नाही; व दृष्य बाजूच आपल्याला दिसते; त्यामुळे समोरचा मनुष्य आपल्याला फसवत आहे, हे मागाहून कळते. म्हणजे आपल्याला ईश्वर कसा सांभाळत आहे हे कळेल. घरात दोन मुले असून, त्यांचा सांभाळ आपल्याला करता येत नाही.

पूर्वी माझी श्रद्धा देव हा आपल्यासारखा सगुण स्वरूपामध्ये दिसेल अशी होती; पण काही अनुभवामुळे देवाचे अस्तित्व समजले. ते म्हणजे जसा वारा वाहतो; व आपल्याला जाणीव होते; त्याप्रमाणे वातावरणात आपल्या साधनेतून ज्या लहरी निर्माण होतात व त्यामुळे जो नाद होतो, याचा अर्थ ईश्वर! त्याची प्राप्ती केवळ पूजाअर्चा करून होत नाही; किंवा तो भेटत नाही. ही प्राप्ती मनोमय व विज्ञानमथ कोशांच्या विकासावर अवलंबून आहे.

पाचवा कोश आनंदमय कोश. याचा अर्थ अगदी सोपा आहे. त्यासाठी वेदान्त किंवा तत्त्वज्ञान सांगून चालणार नाही. रोजच्या व्यवहारामध्ये जीवन, 'शेवट गोड करी, मनुजा'; असे आहे. शेवटच्या क्षणाला आत्मा ज्या अवस्थेमध्ये परलोकात गमन करतो, त्यावेळी जर ती व्यक्ति 'वा.के.खा.' मध्ये गुंतली असली तर जन्मभर देवापुढे बसून तरी काय करणार? रोजचे जीवन आपण जगतो; पण ह्या कोशाचा वापर न करण्यामुळे, आपण दु:खी होत असतो. रोज सकाळी, दुपारी आपण जेवणास बसतो; त्यावेळी आपल्यासमोर जे ताट वाढलेले असते, त्यावेळी एक क्षण स्वत:ला विचारा की, ''आत्ता ह्यावेळी इतके चांगले जेवण किती लोकाना मिळत आहे?'' ह्याचे उत्तर तुम्हीच सांगू शकाल की, ''मीच भाग्यवान''. केवळ अज्ञानाने कर्माला शिव्या देणे योग्य नाही. कर्माला शिव्या जरूर द्या; पण ज्या कर्माचा उच्चार करतो आहोत, त्याला खरोखर 'शिवलात' का? की दुसऱ्याचे सुख पाहून कर्माला नावे ठेवता? कर्म काय आहे? याचा अर्थ अनेक जन्म घेऊनही समजणार नाही. फक्त तुमचे कर्म समजण्याअगोदर तुमचे वर्म काय आहे हे देवाला व गुरूंना समजते. त्याआधी कर्मामुळे जन्म प्राप्त झाला, तो जन्म कशासाठी आहे व कोणासाठी आहे हे स्वत:ला विचारा. आपल्याला शाप कोणीच देत नाही; कारण हा आनंदमय कोश सदैव चांगली इच्छा करणारा आहे; म्हणजे तो सदैव ''तथास्तु! तथास्तु!'' असे म्हणत असतो. तसेच जेवतेवेळी तो म्हणत असतो, ''उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म''. अशाप्रमाणे तुम्ही वागावे व स्वत:ला आनंद प्राप्त करून इतरानाही आनंद द्यावा, यासाठी आनंदमय कोश धारण झाला आहे.



# १३. गुरुमार्ग - साधनपद्धती

गुरुमार्गात आतापर्यंत हे विषय कोणी अभ्यासासाठी घेतले असतील किंवा नाही, ही एक समस्या आहे. कारण हा विषय एवढा सखोल आहे की, विषय धरावा तर आवरत नाही; व सोडून दिला तर साधनेत काही अर्थ उरत नाही. तर ह्या विषयाची गाठभेट व्हावी कशी? एखाद्या शास्त्राचा जेव्हा कोणी अभ्यास करतो, त्यावेळी प्रयोगशाळा निवडावी लागते; व आपला प्रयोग सिद्ध झाला की, त्याचे अनुमान काढावे लागते की, पुढे काय निर्णय घ्यावा? आयुष्यातला बहुमोल वेळ खर्च होऊ लागतो; व जगतात लोकाना अडचणी निर्माण होऊन, लोक दु:खी होतात, हे मी सभोवार पाहिले होते. एवढेच नसून, जगताला जे मार्गदर्शन करतात, त्या साधकवर्गासाठी तासन्तास आणि रात्रंदिवस मी खर्च केले. ह्या साधकाकडे अडीअडचण घेऊन कोणी आले, त्याला ''तुला करणी केली'', किंवा ''देवाचा शाप आहे, म्हणून सुख लागत नाही''; हे उत्तर त्यांच्याकडून मिळत असे. येणाऱ्या लोकात बहुसंख्य लोक करणीने पीडित आहेत, म्हणून सांगितले जात होते; परंतु 'करणी' म्हणजे काय? व ती 'करणी' कशी निवारण करावयाची ह्याचे उत्तर नाही; अशी परिस्थिति होती. आलेल्याना सुख मिळावे, ह्याऐवजी हे साधक म्हणा, बाधक म्हणा, ह्यांचा गल्ला दर आठवडयात भरतो आहे, पण कमी नाही; असे पहावयास मिळाले. जे लोक नाडलेले आहेत, त्यांच्याकडून हे लोक इतकी पैशाची मागणी करतात की, तो मनुष्य भयभीत होऊन, घरातील दागदागिने मोडून, ह्या लोकांच्या नादी लागतो; हे मी स्वत: पाहिले. जेव्हा ह्या मार्गाचा आरंभ गुरुआज्ञेने केला तेव्हा हा अभ्यास परिपूर्ण होता की, येणारे दु:ख याचे 'निवारण' करता येते. नुसते करणी केली; असे सांगून दु:ख दूर होत नाही. लोक जे दु:खात असतात, त्यांच्या दु:खाचे कारण काय? व त्यासाठी निराकरण काय? हे समजले पाहिजे; व ते शास्त्रशुद्ध असावयास पाहिजे. याचे नुसते ज्ञान होऊन चालत नाही; तर प्रत्यक्ष अनुभूती यावयास पाहिजे; म्हणून जी मी प्रयोगशाळा निर्माण केली, त्याचा अर्थ असा की, एखादा सिद्धांत सिद्ध करणाऱ्यास, त्याची अनुभूती आपण स्वत: घ्यावी लागते; व मग सिद्धसिद्धांत साधना हिचा उपयोग दुसऱ्यासाठी करावयाचा असतो.

ह्या साधनपद्धतीमध्ये दुसऱ्याच्या आयुष्याशी खेळ खेळावा लागतो; त्यामुळे सिद्धांत हा यशस्वी झाला तर बरे; नाहीतर सिद्ध करण्याचे साधनच आपल्या नाशाला कारणीभूत होत असते. आज तुम्ही सर्वजण 'सेवक' ह्या अवस्थेप्रत पोहोचले नसताना, तुमच्या माध्यमाचा लाभ इतराना होत आहे; त्याचा अर्थ असा की, तुम्ही जे दुःखी आहेत त्याना 'निराकरण' जे सूचित करता, त्यामध्ये निराकरण हे सिद्ध असून, त्याचे कार्य गुरुशक्तीने होत असते. ह्या निराकरणांची प्राप्ती नुसते नामस्मरण करून, किंवा गुरुचरित्र वाचून, अथवा अन्य सेवा करून होत नाही; व ह्या दुःखासाठी केवळ निराकरण सुचवूनही चालत नाही; तर निवारण करता यावे लागते. 'निवारण' ही अवस्था अशी आहे की, आपण जी साधना करीत असतो, त्याचा वाटा इतराना सुख लागावे म्हणून द्यावा लागतो. काही वेळा जो कोणी दुःखी म्हणून आलेला आहे, त्याचे दुःख निवारण होण्यासाठी, तुम्ही करीत असलेली साधना ही जरी बारा वर्षांची असेल तरी ते दुःख ही साधना घेऊन जाते. म्हणून प्रथमतः जी सेवा आपल्याला करावयाची आहे, ती सेवा आपल्या नामी तत्त्वाला मान्य असावी लागते. यासाठी जी सेवा आपल्याला करावयाची असते, तत्पूर्वी त्या विषयाला अनुरूप असा संकल्प करावा लागतो; व तो संकल्प सिद्ध करावा लागतो. म्हणजे दुःखनिवारणार्थ सिद्ध संकल्पाचा वापर करून, आपल्या साधनेची बचत करावी लागते. ह्या साधनेच्या आरंभी प.पू. बाबांची आज्ञा अशी होती की, "प्रथम ज्ञान करून घे, व नंतर साधना"; त्याप्रमाणे वंशविमोचन, कर्मविमोचन यामध्ये जीवनाची प्राप्ती कशी होते, जीवन कसे अविकसित असते; व पुढे साधनामार्गातून कसे विकसित करावयाचे असते, याचे अमृत बोधरूपाने प्राप्त झाले.

इहजगतामध्ये जीवन प्राप्त झाल्यावर बऱ्याच लोकाना असे वाटते की, पारमार्थिक जीवनाचा लाभ व्हावा; व जीवनाचे सार्थक व्हावे. अशी आकांक्षा मनाशी धरून, बहुतांशी लोक गुरुमार्गाचा अवलंब करावा, या इच्छेने गुरूंच्या शोधार्थ येतात. पण शेवटी हा मार्ग काय आहे हे न समजल्यामुळे, गुरूंचा शोध घेता घेता किंवा योग्य गुरू न सापडल्यामुळे, हे बहुतांशी लोक 'शोष' पडून, ह्या मार्गाचा नाद सोडून देतात. याचे कारण ऐहिक जीवन हे प्रापंचिक जीवन असून, त्या



जीवनातील इष्टकर्तव्ये पार पाडल्याशिवाय, पारमार्थिक जीवनाचा प्रारंभ होऊ शकत नाही. या जीवनामध्ये जशी जशी जन्माला येण्याची कर्तव्ये आपण पार पाडत जातो तसे तसे नकळत पारमार्थिक जीवनाच्या जवळ आपण जात असतो. या पारमार्थिक जीवनात ज्या देवदेवतांचा समावेश शास्त्राने केला आहे, त्या इष्टदेवतांच्या कृपेस पात्र व्हावे लागते. ही पात्रता आपल्या ठिकाणी आल्यावर, ह्याच देवदेवता आपणाला गुरू शोधून देत असतात. परंतु गुरुमार्ग हा ऐहिक सुखाचा मार्ग नसून, पारमार्थिक मार्गाची शिकवण देण्यासाठी आहे; हे न समजल्यामुळे, आपण गुरुमार्गी होतो, पण शेवटच्या क्षणापर्यंत 'आणा' हा शब्द संपत नाही; त्यामुळे पारमार्थिक जीवनाचा लाभ झाल्यावर, हा 'आणा' शब्द कमी करून, 'ठेविले अनंते तैसेचि रहावे'; या वचनाप्रमाणे समाधान मानून रहावे लागते. जेव्हा अशी परिस्थिती येते की, मागूनसुद्धा मिळत नाही; मग प्रत्येकाला हेच म्हणावे लागते, 'ठेविले अनंते तैसेचि रहावे'; पण तसे म्हणण्यापेक्षा समाधानाने जर हे म्हटले तर जीवनाचे सार्थक झाले असे म्हणता येईल.

जीवनारंभी मलासुद्धा आपल्यासारखीच गुरुमार्गाची शिकवण मिळावी, अशी आंतरिक इच्छा तीव्रतेने जाणीव देत होती. दरवर्षी नित्यनियमाने येणारी 'गुरुपौर्णिमा' याचे पूजन हा एक विधि आहे; पण हे अनेक ज्ञानी विद्वान लोक विसरतात. हा विधि करावयाचा असून, तो सोहळा नाही हे न कळल्यामुळे, बहुतेक साधक संबंध वर्षाची वाट पाहत बसतात की, माझे शिष्य ह्यादिवशी येऊन औपचारिकरित्या 'गुरुदक्षिणा' अर्पण करतील; व आपण त्याचा स्वीकार करू.

गुरुपौर्णिमेचा विधि हा शास्त्रीय पद्धतीने केला गेला पाहिजे. नाहीतर केव्हाही 'गुरू करता येतो' असे नाही. हा विधि होमहवनयुक्त करावा लागतो. ज्या देवदेवतांच्या आशीर्वादाची फलप्राप्ती करावयाची असते, त्या देवतांना आवाहन व स्थापना करून, त्याना उद्देशून हवन करावे लागते. या दिवशी जो गुरुमंत्र द्यावयाचा असतो, तो मंत्र स्वतः गुरूंनी सिद्ध केलेला असावा लागतो. यासाठी गुरूंनी तत्पूर्वी, बारा वर्षेपर्यंत दररोज ह्या मंत्राचे पुरश्चरण, निदान अकराशे वेळा केलेले असावे लागते.

गुरुपौर्णिमेस वर्षभर केलेल्या मंत्रसंख्येचे एक दशांश हवन करून, मग ह्या मंत्राची दीक्षा भक्ताना देऊन, मकरसंक्रांतीपर्यंत भक्तानी खाण्यातील एक फळ सोडावे लागते. मकरसंक्रांतीच्या दिवशी जो पुण्यकाळ असतो, त्यावेळी पुन्हा, भक्तानी घेतलेल्या मंत्राचे हवन, तीळ व तूप ह्या आहुतीनी करावे लागते.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी सूर्य कर्केला असतो; व मकर संक्रांतीच्या दिवशी संक्रमण होऊन, सूर्य मकर राशीला जातो; म्हणजे गुरुपौर्णिमेला जो विधि केला, त्याची सांगता संक्रांतीला होते. गुरुपौर्णिमेचे हवन, भक्तांचे काया-वाचा-मन म्हणजे 'जीव', ह्या अवस्थेला उद्देशून असते; व संक्रांतीचे हवन, 'शिव' ह्या अवस्थेला उद्देशून असते. अशा तऱ्हेने हा विधि शास्त्रोक्त पद्धतीने केला, तरच जीव हा गुरुकृपेने शिवरूप होतो. अन्यथा गुरुपौर्णिमा हा विधि न होता, समारंभ होतो.

मला आरंभी असे वाटायचे की, आपण गुरुमार्गाचा अवलंब करावा. पण एका वर्षी गुरुपौर्णिमेच्या दिवशी, पहाटे मला स्वप्नात आज्ञा झाली की, "तुझे गुरू ह्या जगतात जन्माला आले नाहीत, तेव्हा गुरूंचा शोध घेऊ नकोस. आज गुरुपौर्णिमा आहे; तेव्हा सायंकाळी तू श्रीभैरवनाथ यांच्याकडे ये. तेथे 'गुरू' ह्याचा सविस्तर अर्थ तुला समजेल". त्यादिवशी पाऊस पडत होता; तरीसुद्धा मीं नेहमीप्रमाणे डोंगरावर श्रीभैरवनाथांच्या देवळात जाऊन, स्नान वगैरे झाल्यावर, श्रीभैरवनाथांची पूजाअर्चा केली; व मनोभावनेने प्रार्थना करून, काही ध्वनि ऐकू येतो का याची एकाग्रचित्ताने मूर्तिसमोर डोळे बंद करून, वाट पाहत बसलो. त्यावेळी पूर्वीप्रमाणे ॐ कार म्हणण्याचा 'नाद' मला ऐकू येऊ लागला. त्याप्रमाणे मीही म्हणू लागलो. हळूहळू पाच स्थानातून हा ॐ कार माझ्याकडून श्रीभैरवनाथांनी म्हणवून घेतला. त्यानंतर शब्द ऐकू आले; "जो ॐकार तू आज म्हटला आहेस, तो पाच स्थानातून म्हणावयाचा असून, त्या स्थानातून 'स्वर' अशी संथा म्हणावयास पाहिजे. पुढे हा स्वर ह्या स्थानातून न उच्चारता, पाचही स्थाने सिद्ध झाली, म्हणजे एक सूर म्हणावा लागतो. त्यावेळी जो 'सूर' वाणीतून उच्चारला जातो तो उच्चार नसून, स्वरांचे रूपांतर 'निनाद' मध्ये होते; म्हणजे हा नाद 'सिंहनाद' असा होतो.



ही ओळख ब्रह्मांडाची आहे. आपण जेव्हा जन्माला येतो तेव्हा आपल्याला वाचा ही गर्भावस्थेत दिलेली असते; पण उच्चार करता येत नाही. तेव्हा डॉक्टर किंवा सुईण त्या बाळाला उलटा करून, त्याच्या ढुंगणावर थापट मारीत असतात. त्यामुळे ते बालक प्रथमतः वाणीने जो उच्चार करते, त्याचा अर्थ 'ॐकार' असाच आहे; पण त्या ॐकारात तीन तत्त्वापैकी उत्पत्ती तत्त्वाला आरंभ होतो. आज जो तू 'सिंहनाद' ऐकला आहेस, त्याचा अर्थ ॐकार ही साधना पूर्ण झाली; असे म्हणावे लागेल. भवितव्यात जगाला तारणारा एकच मार्ग, एकच मंत्र व एकच तंत्र आहे. ह्या मंत्राची त्रिपुटी असून, पुढे चौथी अवस्था तुला भवितव्यात प्राप्त करावयाची आहे; तेव्हा प्रयत्नांची केवढी पराकाष्ठा करावयास पाहिजे, हे मनाशी ओळखून पुढे चल. 'प्रकाश' म्हणजे ज्ञान देणारे तुझ्या पाठिशी आहेत. आजपासून हा कार्यारंभ कर. तो सिद्ध होण्यासाठी, सबंध आयुष्य जरी पुरले नाही तरी हरकत नाही. जेवढे आपल्या वाटयाला येईल तेवढे ज्ञान जगाला देऊन ज्ञानी कर; पण माघार घेऊ नकोस. पुढचे मार्गदर्शन तुला ज्यांच्या नावाने वडिलांनी 'फकीर' केला आहे, ते तुला सांगतील. तेथपर्यंत तुला गुरू नाहीत असे न म्हणता, गुरूच तुझा शोध घेत येतील! असा सुमंगल क्षण आयुष्यात येईल. आज पाच स्थानातून केलेला ॐकार ही भवितव्यात होणारी 'आकाशवाणी' असेल; व तो दिवस, याची तू व तुझे सहकारी वाट बघतील; पण एक लक्षात ठेव; ॐकार ही साधना व हा महामंत्र, भक्तांची संख्या वाढविण्यासाठी, त्याची सक्ती न करता, ज्याना ईश्वराबद्दल गोडी लागली आहे, त्यानाच भक्तिस्वरूपात दे. पण कोणालाही 'भक्त' न संबोधता, 'सेवक' म्हण; म्हणजे पुढील कार्य हे जगताच्या अंतापर्यंत चालू राहील. तथास्तु!"

पुढे माझे वास्तव्य श्रीक्षेत्र औदुंबर येथे असताना, मार्गदर्शनाप्रमाणे सेवा चालू असता, त्यादिवशी गुरुपौर्णिमा होती. पहाटेपासून पूजा-अर्चा, पारायण चालू होते. त्यादिवशी इच्छा अशी झाली की, काही उपदेश ग्रहण करावा; व अशी प्रार्थना मी श्रीदत्तगुरूंना केली असता, "आज रात्री बारा वाजता प.पू. हाजीमलंगबाबा हे 'मुलाखत' घेणार आहेत. तेव्हा तुझी इच्छा ते पूर्ण करतील"; असे शब्द ऐकू आले.

'मुलाखत' हा शब्द तेव्हा प्रथम ऐकला. अनेक लोक निरूपण, पुराण, कीर्तन आदी नावानी उच्चार करतात; व श्रोत्याना काही उपदेशपर बोध हा सांगत असतात. पण 'मुलाखत' हा शब्द मला परिचित नसल्यामुळे, त्या शब्दाचा अर्थ समजला नाही. शेवटी प.पू. हाजीमलंगबाबांचे शब्द ऐकू येऊ लागले! या मुलाखतीमध्ये विषय असा होता की, 'गुरुमार्ग व त्याची प्राप्ती कोणाला करता येते?' हा विषय त्यांनी त्यादिवशी सांगण्यासाठी घेतला. प्रथमत: 'मुलाखत' या शब्दाचा अर्थ असा की, साधकाला साधना करीत असता जी अनुभूति येते, तोच स्वानुभव आपल्या भक्तगणाना निवेदन करणे. त्यामध्ये अतिशयोक्ति असून चालणार नाही. जे जे काही सांगावयाचे असते, त्याचा अनुभव हा पूर्णपणे म्हणजे शंभर टक्के न सांगता, पंचाहत्तर टक्के समजेल अशा रीतीने सांगून, त्याचे कार्य जीवनात होईल, असे घडायला पाहिजे. नुसत्या शंकाकुशंका वाढीस लागतील, असे संभाषण करू नये. याचा अर्थ मुलाखत! म्हणजे प्रत्यक्षात ती ऐकत असताना, परमेश्वर आपल्यासमोर उभा आहे; असे वाटावयास पाहिजे. ही अनुभूति सांगत असताना, मोठे मोठे शब्द उच्चारले गेले, म्हणजे साधकाला ज्ञान होते असे नाही; तर सांगत असताना शब्द सर्वसामान्य माणसाला समजतील असे बोलावे; पण त्यात जिव्हाळा, प्रेम, आपलेपणा असावयास पाहिजे. नाहीतर 'एकादशीच्या घरी भिकारी गेला आणि दोघाना उपवास घडला'; असे निरूपण करून चालणार नाही.

वर सांगितल्याप्रमाणे गुरुमार्ग हा पारमार्थिक मार्ग आहे. याची भूक किती लोकाना या जगतात लागली आहे? त्यांचा शोध गुरुप्राप्ती होण्यासाठी आहे किंवा नाही याची खात्री व्हावयास पाहिजे. कारण केवळ ऐहिक जीवन याचा लाभ घेत असता, काही सुखांची कमतरता झाली की, मग मनुष्य देवाच्या व गुरूंच्या मागे लागतो. पण अनेक गुरू आपले कर्तव्य विसरून गुरू बनतात; व पुढे कालकालांतराने त्यांचे भक्त हेच त्यांचे गुरू बनतात. यासाठी 'आपणासारिखे करिती तात्काळ'; ह्या वचनाप्रमाणे, ऐहिक प्राप्तीच्या अभिलाषेने जरी भक्त गुरूंना भेटावयास आले तरी हे गुरूंना समजावयास पाहिजे की, ही भेट केवळ ऐहिक सुख प्राप्त करून घेण्यासाठी झालेली नाही. भेटणारी व्यक्ति हिला ज्ञान



नाही. परंतु गुरूंना हे समजले पाहिजे की, ही भेट साधी नाही, तर ही 'गाठभेट' आहे. म्हणजे 'गाठ' ही अवस्था परलोकाची असून; 'भेट' ही अवस्था इहलोकाची आहे. तर ह्या भेटीमध्ये, त्या येणाऱ्या व्यक्तीला आमिष दाखवून, त्याला 'वाटेला न लावता', त्याला 'वाट दाखवावी'; यासाठी गाठ पडली आहे; व पुढे हळूहळू त्याला गुरुमार्गाची गोडी लागेपर्यंत आपण सबुरी ठेवावी.

पारमार्थिक मार्ग व गुरुमार्ग हे दोन भिन्न असून, प्रथमावस्थेमध्ये पारमार्थिक अवस्था प्राप्त करून घ्यावयाची असते. जे प्राप्त जीवन आहे, त्या जीवनाला परम-अर्थ आहे. जन्म केवळ खाण्यापिण्यात खर्च न करता, हा जन्म सत्कारणी लागावा; अशी इच्छा निर्माण होणे, म्हणजे 'परमार्थ'. ह्या जीवनाचे सत्कार्य आपणाला समजत नाही; म्हणून ज्याचा उपयोग इतरासाठी करावयाचा आहे, ते जन्मकारण गुरुमार्गात समजते. यासाठी गुरुमार्गात गुरू सांगतील ती आज्ञा समजून, त्याप्रमाणे आचार, विचार, उच्चार याप्रमाणे वागावे लागते. याचा अर्थ 'Do and die and not question why!'

# १४. गुरुमार्ग - दीक्षा

अशा परिस्थितीत अनेक लोक गाठीभेटीसाठी येऊ लागतात; परंतु साधना करीत असतेवेळी जरी साधना सिध्द झाली तरी इतराना दीक्षा, कृपा, अनुग्रह करणे किंवा येताजाता नमस्कार करून घेणे, याहीपेक्षा ज्याचा लोभ आवरला पाहिजे, तो म्हणजे कोणी भक्तानी पैसे किंवा गुरुदक्षिणा ही ऐच्छिक म्हणून जरी दिली तरी त्याचा बारा वर्षे स्वीकार करता कामा नये. हे बारा वर्षे बंधन का आहे? तर दरवर्षी तीन ऋतु आपण सृष्टीमध्ये पाहत असतो, ते म्हणजे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा; ह्या तिन्ही काळात तीन तत्त्वे उत्पत्ति, स्थिती, लय ही कार्य करीत असतात. अशा तीन तत्त्वातून दरवर्षी आपली साधना सिध्द झाली, तर ती सुदृढ होण्यासाठी बारा वर्षे लागतात. ज्याप्रमाणे मनुष्यजन्मानंतर वय वर्षे बारा, ही अवस्था सज्ञान होण्याची असून, त्यावेळी शरीराच्या घटकांची निर्मिती पूर्ण होते; त्याप्रमाणे साधकाला आपल्या साधनेचा लाभ इतराना देण्यासाठी, ती सुदृढ होणे आवश्यक आहे. यापुढे जे कोणी दीक्षा घेण्यासाठी येतील, त्यावेळी त्या व्यक्तीचे 'विमोचन' प्रथमत: करणे आवश्यक आहे. जन्माला आल्यानंतर मनुष्य पाच ऋणानुबंध घेऊन येतो; पण जातेवेळी फक्त आत्मा + कर्म हे घेऊन जात असतो. तीच अवस्था जन्माला येण्यापूर्वी असते. मध्यंतरीच्या काळात तीन ऋणानुबंधांचे जर विमोचन केले नसेल तर आपण करीत असलेली कृपा ही आत्म्याला न मिळता, ती कृपा ह्या ऋणानुबंधांना अधिक प्रखर होण्यास कारणीभूत होते. यासाठी गुरुमाध्यमाला हे समजणे आवश्यक आहे की, दीक्षा घेणारा भक्त याचे विमोचन होणे अत्यावश्यक आहे. तोपर्यंत जरी दीक्षा घेतली असली तरी जी दीक्षा आहे तिचा 'उच्चार' तो करत असतो; तिचा 'कृपा' म्हणून तो स्वीकार करता होत नाही. जी प्रार्थना दीक्षांतविधीच्या वेळी दिलेली असते, त्यावेळी ती दीक्षा घेणारा जो कोणी असतो, त्याचे ऋणानुबंध कमी केल्याशिवाय, ह्या दीक्षेचा लाभ होत नाही; म्हणून हा विधि दीक्षा म्हणून होत असला, तरी तुमच्याबाबतीत ती 'शिक्षा' होऊ शकेल; कारण ह्या ऋणानुबंधांचे ऋण एवढे असते की, एकवेळ आपला जन्म फुकट गेला तरी हे



ऋणानुबंध कोणालाही फेडता येत नाहीत; तेव्हा आपण दीक्षा घेतली आहे, म्हणजे कृपेला पात्र झालो आहोत असे नसून, ती दीक्षा विमोचनासाठी आहे. ज्यावेळी तुमचे विमोचन होते; व ज्यावेळी फक्त आत्मा आणि कर्म शिल्लक राहते त्यावेळी दीक्षा म्हणजे आशीर्वाद, याची प्राप्ती झाली, असे म्हणता येईल.

देहिक माध्यम हे तीन माध्यमातून, दैनंदिन जीवनात कार्य करीत असते. ती तीन माध्यमे म्हणजे काया, वाचा व मन. दीक्षा ज्यावेळी द्यावयाची असते त्यावेळी ऋणानुबंधांची वलये कायेच्याभोवती फिरत असतात. अशी दीक्षा घेणारी व्यक्ति आपल्यासमोर उपस्थित असली, तर त्या व्यक्तीला दीक्षा देऊन, नामस्मरण करण्यास सांगावे लागते; व ह्या वलयातून विमोचन करून, गुरुवलयामध्ये धारण करावे लागते. यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या दीक्षा असून, त्या दीक्षांचा संबंध हा पूर्णपणे गुरुतत्त्वाशी जोडला जात नाही.

प्रथमत: दीक्षेचा संबंध, दीक्षा घेणाऱ्या व्यक्तीच्या घराण्यातील कुलदेवदेवता यांच्याशी असावयास पाहिजे. त्यानंतर त्याची उपास्यदेवता, हिचा समावेश दीक्षेमध्ये संकल्प म्हणून व्हावयास पाहिजे. या क्रियेमध्ये त्या व्यक्तीला कृपाशीर्वाद प्राप्त करून घेण्याची सवय, प्रथमत: करावी लागते. ह्यासाठी लहानपणी घरातील वडीलधारी माणसे याना नमस्कार करावयास सांगून, आपल्या वडील मंडळींनी आशीर्वाद दिला की, पुढे ह्याच आशीर्वादाच्या माध्यमातून, देवदेवता व गुरू हे आशीर्वाद देत असतात. वर्षानुवर्षे हा भक्तभाविक येत असला, तरी आशीर्वादाचा लाभ घेईतोपर्यंत, त्या व्यक्तीवर बारकाईने लक्ष ठेवावे लागते. आज जगतात गुरू म्हणणारे लोक व त्यांचा 'प्रचार' म्हणण्यापेक्षा 'पसारा', अधिक असतो. त्यापेक्षा गुरुमार्गात कोणी शहाण्याने पडू नये. ज्या भक्तभाविकाला गुरुदीक्षेचा लाभ झाला आहे, त्याच्या पूर्ण जीवनाचे कार्य होईतोपर्यंत, त्या व्यक्तीवर लक्ष ठेवून, त्याच्या देहाचा विकास कसा होत आहे? हे बारकाईने बघावे लागते. अन्यथा नुसती दीक्षा किंवा अनुग्रह घेऊन, गळयात बांधलेल्या खोडयाप्रमाणे त्याचे जीवन व्यतीत होत असते. अन्य गुरुमार्गात ज्या व्यक्तीने दीक्षेचा स्वीकार केला आहे, अशा व्यक्तीवर

काही बंधने सांगितली जातात. प्रामुख्याने ह्या दीक्षेचे बंधन आहारावर सांगितले जाते; व अमुक एक उपवास व सांगितलेले व्रत, म्हणजे नामस्मरणाची अमुक एक संख्या सांगितली गेली की, आपले कार्य संपले; असे समजून येणाऱ्या व्यक्तीला पारमार्थिक जीवनाचा लाभ झाला आहे, असे बहुतांशी साधक समजतात. ह्यामुळे दीक्षापरत्वे त्याचा जो विकास होणे अत्यावश्यक आहे तो सोडून, गुरुमार्ग हा केवळ बंधनात राहण्याचा मार्ग आहे, असे समजून बहुसंख्य लोक त्याचेच अनुकरण करीत असतात. वास्तविक ज्या व्यक्तीला गुरुमार्ग व दीक्षेचा लाभ घ्यावयाचा असतो, त्यावेळी त्या व्यक्तीला जीवनात काही 'सोडावे' लागते व 'मोडावे' लागते असे नाही; तर स्वाभाविक स्थितीत हे जीवन तो ज्याप्रकारे जगत असतो त्याचप्रमाणे त्याला बंधन न घालता जगू देणे; व दीक्षा दिल्यानंतर त्याच्या जीवनात आचार, विचार, आहारपरत्वे काय अदलबदल झाला? हे पहावे लागते. येणाऱ्या भक्तभाविकाला बंधनात घातले, तर ती व्यक्ति दिलेली दीक्षा प्राप्त करून घेण्यास पात्र की अपात्र आहे? हे समजणार नाही. जेव्हा ह्या गोष्टी अनुभवास येतील की, रोजचा आचार, विचार यामध्ये बदल झाला आहे; ह्याचा अर्थ येणारी व्यक्ति, हिच्या जीवनात दीक्षेचे कार्य सुरू झाले; हे समजावे. असे जर घडले नाही तर पुढची दीक्षा न देता, पहिल्याच दीक्षेची सेवा पुढे चालू ठेवा, असे सांगावे लागते.

दीक्षा देण्यामध्ये अमुक एक प्राप्त होईल, असे निश्चितपणे कोणालाही सांगता येत नसते. दीक्षा दिल्यानंतर जीवनाला आरंभ होतो तो स्थित्यंतर होण्यामुळे. ही स्थित्यंतरे प्रथमतः काया, वाचा, मन यामध्येच व्हावी लागतात; पण दीक्षा घेतल्यानंतर आपण काही वेगळ्या जगाचा अनुभव घेत आहोत; असे काही भक्तभाविक भासवतात. उदाहरणार्थ, स्वप्नामध्ये 'बाबा' आले, इथपासून ईश्वराचा साक्षात्कार झाला आहे; असे हे भक्तभाविक इतराना काहीप्रकारे भासवून, त्यांच्या श्रद्धाभक्तीत हे 'विष' पेरतात. त्यामुळे असे वाटू लागते की, दीक्षा घेतेवेळी आपण बरोबरच आलो, पण ह्याची फार पुढे प्रगती झाली आहे. असे समजून, स्वतःच्या जीवनात काही कमीअधिकपणा आहे; असे वाटू लागते. तर ही दक्षता साधकाने घ्यावयास पाहिजे की, गुरुमार्गात जेव्हा दहा व्यक्तींचा समावेश



होऊन एकाच प्रकारची साधना सांगितली आहे, तेव्हा त्या साधनेचा अनुभव दहापैकी नऊ लोकाना आला, म्हणजे दीक्षेचे कार्य आपल्या जीवनात कार्यान्वित होत आहे, असे निश्चित समजावे. त्यामध्ये एकाला अनुभव आला नाही, तर त्याचाही विचार करावा.

गुरुमार्गात मार्गदर्शन करणारे माध्यम एकच असते व साधनही एकच असते; म्हटल्यावर जर एखाद्या व्यक्तीला वेगळा अनुभव येऊन ती व्यक्ति, "मला अमुक एक होते; किंवा अमुक एक दिसते; अथवा अमुक एक विभूति माझ्यांशी बोलते"; असे सांगत असेल, तर त्या व्यक्तीच्या बाबतीत दीक्षापरत्वे काहीएक प्राप्त झालेले नसून, ही अवस्था 'Self - hypnotism' आहे, असे म्हणावे लागते. साधकाने ह्या माणसापासून एवढेच जाणावे की, 'सावधान'! हा 'खतरा' इतरासाठी तर आहेच, पण गुरू भेटूनही स्वतःचा सर्वनाश होतो. याचा बोध एवढाच घ्यावयाचा असतो की, 'गुरूचे गुरू कधीही होऊ नये'. म्हणजे इंग्रजीमध्ये म्हण आहे की, 'Do not be master of The Master.'

# १५. गुरुमार्ग - गुरुचरित्र

गुरुमार्गात आरंभ करण्यापूर्वी, ह्या ज्या मार्गाचा अवलंब आपणास करावयाचा असतो, त्या मार्गाचे पूर्ण ज्ञान होणे आवश्यक आहे. तर यापूर्वी सांगितल्याप्रमाणे, इहलोक व परलोक ह्या दोन्ही अवस्थांशी, मनुष्यजन्म हितसंबंधित असतो. ही क्रिया ज्या माध्यमातून घडत असते, ते माध्यम म्हणजे देह. याचा अर्थ काया-वाचा-मन. पण याहीपेक्षा अधिक खोलात अभ्यास करणे आवश्यक असते. ह्या देहाला 'पिंड' असे म्हणतात; व त्याची निर्मिती ब्रह्मांडासारखीच असते. अशा अवस्थेत तो 'जीव' म्हणून प्रथमावस्थेत जन्म घेता होतो; त्यास अनेक साधक 'आत्मा' असे म्हणतात; परंतु जीवाची 'उत्क्रांती-अपक्रांती', अशी पिंड व ब्रह्मांड यामध्ये क्रिया चालू असते. त्यामुळे जन्माला येतेवेळी येणारा मनुष्य जरी काया-वाचा-मन हे माध्यम घेऊन येतो तरी त्याच्या ठिकाणी 'आत्मा' हे तत्त्व धारण न होता, 'जीव' म्हणूनच तो जन्माला येत असतो. ज्याप्रमाणे काया-वाचा-मनांचा दीक्षापरत्वे विकास होणे हे महत्त्वाचे आहे; त्याहीपेक्षा अधिक दुसरी अवस्था, म्हणजे जी पिंडाच्या ठिकाणी धारण झालेली आहे, ती महत्त्वाची आहे. हा जो जीव चेतना म्हणून कार्य करीत असतो, हे कार्य काया-वाचा-मनाने न घडता, फक्त कायेने क्रिया घडत असते. ही जी क्रिया देह करतो, त्यालाच आपण 'कर्म' असे संबोधतो. पण कर्माची धारणा ही जोपर्यंत काया-वाचा-मनाचे एकरूपत्व होत नाही तोपर्यंत होत नसून, एखादी व्यक्ति 'कर्म घडले' असे म्हणत असली, तरी ते कर्म नसून, फक्त 'क्रिया' असते. त्याचप्रमाणे जो जीव जन्माला आला आहे, त्याच्या अस्तित्वामुळे, देहामध्ये चेतना निर्माण होऊन क्रिया घडते; पण त्यां पिंडाचा यथायोग्य विकास करणे म्हणजे प्राप्त झालेला जन्म, असे म्हणता येईल. जन्माला येतेवेळी तो 'जीव' म्हणून जन्म घेतो; व परत परलोकवासी होतेवेळी, त्या जीवाला 'शिव' ही संज्ञा प्राप्त करून घ्यावी लागते. ह्यासाठी इहजन्माचे ज्ञान होणे आवश्यक असते. परंतु ह्याचा अर्थ जन्माला येतेवेळी न समजल्यामुळे, जी जन्माची 'यात्रा' होती ती 'जत्रा' होत असते. अशावेळी जर गुरुभेट होऊन, गुरूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे आपले जीवन गुरुचरणी वाहिले असेल,



तर ही जत्रा न होता, ह्या जन्माचा 'प्रवास' सुरू होतो. यामध्ये प्र + वास म्हणजे वारंवार जन्माला येऊन, फक्त कर्माचा भोग याचा उपभोग घेणे, एवढेच कार्य आपल्या वाटयाला न येता, आपला 'वाटा' नकळत गुरूंच्या कृपाशीर्वादाने शिल्लक राहतो; व पुढील जन्मप्राप्तीच्या वेळेला इहजगतामध्ये जन्माला आल्यावर, गुरूंच्या कृपाशीर्वादाने ह्या वाटयाचा विनियोग जगाला 'प्रसाद' म्हणून, म्हणजे प्र + साद किंवा गुरुकृपा म्हणून होतो. याचा लाभ दीक्षाप्राप्तीचे वेळी दीक्षा घेणाऱ्या भक्तगणाला होत असून, नकळत गुरुकृपेचा लाभ होऊन, येतेवेळी जो भक्त जीव म्हणून जन्माला येत असतो, त्याचे स्थित्यंतर दीक्षेमुळे 'जीवात्मा' ह्या अवस्थेमध्ये होते. यासाठीच श्रीपंतांनी म्हटले आहे की, 'साधनसेवा काहीच नसता दावियले निजधाम'. याची प्राप्ती केवळ संतांच्या समागमामधून होत असते. याचप्रमाणे वेगवेगळया साधना व दीक्षापरत्वे त्या भक्तांचा विकास, 'आत्मा अवस्था' प्राप्त होईतोपर्यंत दीक्षा व साधनापरत्वे होत असतो. हा विकास होण्यासाठी प्रथमतः जी उपासना म्हणून करण्याची आज्ञा श्रीगुरूंनी केलेली असते, तिचा अवमान कदापीहि करू नये. पुढे जी दीक्षा प्रथमारंभी प्राप्त केलेली असते, त्या दीक्षेत भक्तांची अवस्था जशी असेल तसे साधकाचे साधन म्हणजे उपास्य दैवत, हे सगुण असावे लागते. ज्याप्रमाणे जीवनारंभी 'श्रीगणेशा' शिकल्यावर, विश्वविद्यालयात पदवीधर होण्यापर्यंत परीक्षा असतात. नुसत्या परीक्षेला बसून आपल्याला पदवी प्राप्त होत नाही. म्हणून अनेक भक्त पुस्तकात निर्गुण, निराकार, अनादी ॐकार हे शब्द वाचत असतात; व तशी क्रिया अथवा अवस्था आपल्याला का प्राप्त झाली नाही? ह्या संभ्रमात ते असतात. पण एखादी पदवी आपल्याला मिळावी अशी पात्रता नसणे, हीसुद्धा 'पदवी' च आहे; हे सुज्ञानी विसरता कामा नये.

वरील विषयात जीवाची धारणा ही काया-वाचा-मनामध्ये घडत असते; परंतु पुढे हाच जीव, आत्मा ह्या स्वरूपामध्ये कार्य करता होतो. अशावेळेला साधनेने, काया-वाचा-मन यांचा विकास होतो. म्हणजे जी एकोणीस माध्यमे व चौऱ्यांशी लक्ष योनी, ह्या काया-वाचा-मनामध्ये असतात, त्यांचा पूर्ण विकास होऊन, त्या साधकाचे माध्यम कार्य करण्यासाठी गुरुआज्ञेने सिद्ध होत असते. अशी सिद्धता प्राप्त झाल्यावर,

ज्या तीन अवस्था साधनेत सांगितल्या आहेत - साधक, सिद्ध, साध्य; ह्या अवस्थांचा लाभ त्याला होत असतो. ह्या अवस्थांचे कार्य असे की, साधक अवस्था ही इहलोकासाठी असून, दुसरी सिद्ध अवस्था ही परलोकासाठी व तिसरी साध्य अवस्था ही स्वर्गलोकासाठी आहे. हे कार्य क्रमशः प्राप्त करावयाचे असून, ज्याप्रमाणे बाल्य, तारुण्य, वार्धक्य ह्या अवस्था असतात, तशी आपली सेवा आज बाल्य स्वरूपात असून, जणू काही ती वृद्ध म्हणजे परिपक्व झाली आहे असे भासवून, साधनेची माकडचेष्टा साधकाने चुकूनही करू नये; कारण ह्या अवस्थांची प्राप्ती ही आपल्या मनाने करता येत नाही. ह्यातील दोन अवस्था ह्या नैसर्गिक असून, पहिल्या अवस्थेमध्ये (साधक) आपल्या मनाप्रमाणे गोष्ट घडते. पण पहिली अवस्था प्राप्त झाल्यानंतर, पुढील दोन अवस्था यांची प्रगती होण्यासाठी, त्या अवस्थेप्रमाणे आपले मन तयार करावे लागते.

जो कोणी जन्माला येतो त्यास चरितार्थ म्हणजे जीवन आहे. 'चरितार्थ' म्हणजे जगणे असा अर्थ नसून, ज्याला जगवायचे आहे त्या जीवनामध्ये 'चरित्र' असावयास पाहिजे. अन्यथा खाणेपिणे, ऐषाराम असे जीवन व्यतीत करून, त्या जीवनाला 'चरित्र' असे म्हणता येत नाही. जे कोणी सत्पुरूष ह्या जगात जन्माला आले, त्या सत्पुरुषांनी आपले जीवन जगताना दुसऱ्याला जीवन दिले. चरित्र म्हणजे जीवन ह्याचा असा अर्थ होतो. असे चरित्र प्रत्येक अवतारी पुरुषास आहे. त्यापैकी मी अभ्यासासाठी ज्यांचे चरित्र वाचावयास घेतले, ते म्हणजे 'गुरुचरित्र'. असे प्रत्येक सत्पुरुषाचे असते. त्यांच्या पश्चात भक्ताना जे त्या गुरुतत्त्वाचे अनुभव आले ते अनुभव म्हणजे 'गुरुचरित्र'. याप्रमाणे अनेक गुरुचरित्रे आहेत. प्रत्येकाने अनुभव एवढयासाठी घ्यावयाचा असतो की, भक्ति करीत असताना, ज्या 'लीला' (म्हणजे चमत्कार नव्हे) यांची अनुभूति येते, ती त्या अवस्थेची प्राप्ती होय. त्या अनुभूतीमुळे तो भक्त साक्षात्कारी व्हावा असा उद्देश नसून, 'अनुभूति' ही अवस्था आहे; पण ती अवस्था अनुभविण्यासाठी, बऱ्याच भक्तांचा वेळ खर्च होत असतो. वास्तविक चरित्रातील जो विषय वाचन केलेला असतो, त्या चरित्रात काय सांगितले आहे हे प्रथमतः बारकाईने पाहून, मग जो चमत्कार म्हणून लिहीलेला



असतो, त्या चमत्कारात विज्ञान काय आहे? हे शोधले पाहिजे. नुसते पाठांतर केले, तर पुढे गुरू व भक्त यामध्ये 'अंतर' पडते. यासाठी वाचन केल्यावर, जे वाचन केले आहे त्याचे मनन करावे. 'मनन' ह्या साधनेत 'मन' असावयास पाहिजे. नुसते मनन करून, भक्ताला मनाचा शोध लागणार नाही. 'थेंबे थेंबे तळे साचे'; अशी अवस्था साधना करीत असता भक्तांची असते. म्हणून वर्षानुवर्षे जरी कोणाचेही चरित्र वाचले तरी मनन करावयास पाहिजे. ज्याप्रमाणे आपल्याला 'भूक' सदैव लागते त्याप्रमाणे मन ही अवस्था प्रथमतः प्राप्त व्हावी लागते. मग 'मन' तयार होते. 'मन अवस्था' ही पोकळी आहे. ती पोकळी भरून काढावी; ही जाणीव होणे, हे कर्तव्य भक्तांचे आहे. मग ही पोकळी ऐहिक सुखाने भरून काढावयाची की, पारमार्थिक विषयाने भरून काढावयाची? हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

ह्याप्रमाणे नित्य दिनचर्या अशी होती की, सकाळी 'वाचन' व दुपारी 'मनन'. जे वाचनात आले त्यातील विषय गुरूंचा किती? व येणारे भक्त यांचा किती? हे अनुमान काढून, मग दुसरे दिवशी सकाळी स्नान झाल्यावर, कालचा विषय ज्याचे मनन केले आहे, तो 'विषय', याचा समावेश साधनेमध्ये करावयाचा; कारण तो विषय भवितव्यात जगाला लागणार आहे. केवळ कथाकीर्तनामध्ये सांगण्यासाठी हा विषय नसतो. जे बावन्न अध्याय गुरुचरित्रामध्ये आहेत, त्यांचा सारांश म्हणजे जगाचे कल्याण करण्यासाठी बावन्न प्रकार असून, बावन्न आठवडे म्हणजे एक वर्ष होते, म्हणजेच भक्त ज्यासाठी आपल्याकडे येतो, ती अडचण वर्षाच्या आत निवारण व्हावयास पाहिजे. यासाठी गुरुचरित्र हे बावन्न अध्यायांचे आहे, व ते पुन्हा पुन्हा वाचन करावयाचे असते. झाडाला प्रत्येक वर्षी नवी पालवी येते; व जीर्ण पाने गळून जातात. 'ज्ञान' हे 'जून' होऊन चालत नाही. जर आशीर्वादाचा लाभ इतराना झाला नाही तर ज्ञानाचे गळू हा आजार होतो; व भक्त आपल्याच भक्तीमुळे बेजार होतो; व ह्या भक्तीमध्ये काही अर्थ नाही; असे म्हणतो. 'भक्ती' चा कदापीहि कंटाळा येत नसतो. भक्ती ही क्रिया निसर्गाचा धर्म आहे. ऊन, पाऊस, थंडी कोणासाठी म्हणून नसते. ज्याला जे पाहिजे असेल ते त्यानी घ्यावे. ह्या मार्गदर्शनाप्रमाणे सेवा चालू होती.

# १६. गुरुमार्गदर्शन

प्रथमत: 'मार्गदर्शन' हा एक शब्द असावा, असे इतराप्रमाणे वाटत असे. एके दिवशी जेव्हा वर्ष झाले, त्यादिवशी गुरूंचे शब्द, सायंकाळी नदीच्या काठी बसलो असताना ऐकू आले. ते शब्द नसून आज्ञा होती! ''समोर जी नदी वाहत आहे, त्याला 'प्रवाह' म्हणतात. तो प्रवाह वाहत जाणारा आहे. त्याचा बोध झाला की, प्रवाह आहे त्याचा 'प्रवास' होईल. पुढे 'प्र' ह्या शब्दाला 'प्रेम' दिलेस तर 'वास' सदैव होईल; अन्यथा ह्या प्रवाहातून समुद्राकडे जाशील. जर समुद्राकडे गेलास तर पाणी खारट आहे. त्याचा उपयोग सृष्टीला नाही. सृष्टीला तहान लागली आहे. तेव्हा नीट विचार करून, ज्या नदीच्या 'काठावर' बसला आहेस तो विसरू नकोस. जो आज नदीचा काठ पाहतो आहेस, त्याची काठी तयार कर. पुढे जगात चालण्यासाठी तीच काठी उपयोगी पडेल. हे जग जसे दिसते तसे नसते, म्हणून आम्ही फसलो. त्याप्रमाणे फसू व हसू नकोस. आज एक वर्ष झाले. काय मिळविलेस? व काय घालविलेस? याचा आढावा उद्या सांग.''

दुसरे दिवशी सकाळी प्रश्न असा उभा राहिला की, काय सांगावे? कारण प्रपंच व परमार्थ यामध्ये कर्म श्रेष्ठ की, कर्तव्य श्रेष्ठ? असा संभ्रम डोळ्यासमोर उभा राहिला. शेवटी मार्गदर्शन गुरूंनी केले. 'मार्ग' हा एक भाग व 'दर्शन' असा दुसरा भाग. ज्यावेळी मनुष्य कर्माने जन्माला येतो त्यावेळी कर्माचे कारण हे परलोकात असते; व कर्माचे फल मिळत नाही. जेव्हा जन्माचा विकास होतो, तेव्हा कर्म आधीन होते. ह्या अवस्थेला गुरुमार्गामध्ये 'मार्ग' हा एक भाग व 'दर्शन' हा दुसरा भाग असे म्हणतात. 'दर्शन' होणे म्हणजे दिसणे असा अर्थ नसून, 'ज्ञान होणे' असा आहे. तेव्हा गुरुमार्गामध्ये 'मार्गदर्शन' याचा अर्थ, जे काही अज्ञात आहे ते ज्ञात असणे. याचे अस्तित्व साधकाला समजले पाहिजे. जो कोणी याचक आपले सुखदु:ख सांगत असतो, त्यावेळी दु:ख किंवा सुख हे किती व्यक्त आहे? व किती अव्यक्त आहे? हे समजून घेऊन, त्याला मार्गदर्शन म्हणून जी सेवा सांगितली जाईल, त्याचबरोबर आशीर्वाद हा लाभलेला असावयास पाहिजे; कारण



याचक आपले दु:ख निवारण व्हावे, म्हणून जर जन्मभर सेवा करीत बसला, तर त्याचा अर्थ त्या सेवेचे फल त्याला मिळत नसून, तो दु:खीच राहतो. दु:ख किंवा सुख ह्या दोन्ही अवस्था प्राप्त व्हाव्या, अशी जरी त्याची इच्छा असली, तरी जन्माला येतेवेळी दु:ख निर्माण व्हावे, हा काही कर्माचा धर्म नाही. जेव्हा जीवनात आपला विकास होण्याची वेळ येत असते, त्यावेळी जे आपण दु:ख म्हणून म्हणत असतो ते वास्तविक सुख आहे; कारण ते कर्मपरत्वे आलेले संकट हे आपल्याला जागे करीत असते; व त्यापरत्वे दृष्टि म्हणजे ज्ञान, ही अवस्था प्राप्त होऊन, 'जीवन म्हणजे काय?' हे तो याचक शोधू लागतो. अन्यथा जर सुखाची प्राप्ती होत राहिली तर मरणाच्या क्षणापर्यंत, प्राप्त झालेल्या दुर्मिळ जीवनाकडे तो दुर्लक्ष करतो. पण कर्मपरत्वे आलेल्या संकटामुळे, जेव्हा 'जीवन म्हणजे काय?' ह्या विचाराप्रत तो जातो, त्या क्षणी त्याचे वास्तव्य इहलोकात असूनही त्याचा लय होतो; व परलोक जीवनास आरंभ होत असतो. असे जीवन ह्या जन्मात अनुभवायचे आहे. पहिली बाजू कर्मपरत्वे असून, ते कर्म आपल्या जीवनात, 'जागे होणे' ही अवस्था प्राप्त करून देत असते; व त्यामुळे जी जीवनातली दुसरी बाजू की, हे जीवन 'केवळ स्वत:साठी नसून, इतरासाठीही आहे', हे कर्तव्य जीवनात निश्चित होते. याचा अर्थ प्रपंच व परमार्थ हे वेगवेगळे नसून, ज्याप्रमाणे देवाचे अस्तित्व, मूर्ति किंवा प्रतिमेत दिसते; पण आशीर्वाद हा न दिसता अनुभवास येतो; त्याप्रमाणे प्रपंच हा समोर दिसतो, पण त्यामध्ये परमार्थ हा अनुभवास येत असतो. ह्या अनुभवास 'कृपापात्र होणे', असे म्हटले आहे. अशी अवस्था गुरुकृपेने मिळवायची, एवढाच अर्थ 'मिळविणे' याचा नसून, आपले 'जीवन अधिक गुरुकृपा', याचा अर्थ 'मिळविणे' असा आहे; व 'घालविणे' याचा अर्थ व्यर्थ खर्च करणे असा नसून, गेल्या एक वर्षात जो काळ सेवेत व्यतीत झाला त्याचा लाभ पुढे मिळविणे, असा अर्थ आहे.

साधकाला गुरुमार्गात हे शब्द पूर्णत: समजणे व ज्ञात होणे आवश्यक आहे. 'काय घालविणे? व काय मिळविणे?' याचा अर्थ जर कळला नाही तर ऐकलेले शब्द हे शब्दच राहून, शब्दात काय संदर्भ आहे? याचा बोध घेता येत नाही. यासाठी साधनाकाळात साधकाला पूर्णपणे

जागरूक रहावे लागते. ह्या अवस्थेला 'जागृती' असे म्हणतात. तेव्हा पहिल्या वर्षात ज्याचा लाभ झाला तो असा की, बारा वर्षे सेवेत घालविली असता प्राप्त होणारे फल, बारा महिने म्हणजे एका वर्षात अनुभवास आले. असा सेवेचा लाभ, अनुभूति म्हणून जगाला सांगण्यासाठी आपल्याजवळ शिल्लक राहणे, याचा अर्थ 'कृपा होणे'; असा आहे. ह्या अवस्थेत काया-वाचा-मन यांचा समावेश होऊन, चौथी अवस्था म्हणजे 'गुरुभक्त', ही प्राप्त होत असते. 'गुरुभक्त' याचा अर्थ गुरूंच्या इच्छेप्रमाणे किंवा आज्ञेप्रमाणे वागणे. म्हणजे आचार, विचार व उच्चार यांची त्रिपुटी एक होऊन, गुरुआज्ञेप्रमाणे सदैव वागणे. गुरुमार्गात 'वागणे' याचा खरा अर्थ 'वाकणे' असा आहे. पण गुरुमार्गात ह्या मार्गाचे अनुकरण बरेच लोक करतात; व त्यावेळी ज्या शेपटया वास्तविक नसतात, त्या काही एक शिक्षण घेण्यामुळे आपण लावत असतो. त्यामुळे हळूहळू ज्ञान होण्याऐवजी, अज्ञान म्हणजे अहंकार, फाजील ज्ञानामुळे दृष्टोत्पत्तीस येतो. त्यामुळे जी पुढची अवस्था आपणास प्राप्त करावयाची आहे, तत्पूर्वी पहिली अवस्था प्राप्त करतेवेळी जे काही पथ्य असते, त्यात काही तथ्य नाही, अशी विचारसरणी ठेवल्यामुळे, पहिल्या अवस्थेचा 'श्रीगणेशा' लिहीता येत नाही; मग दुसरी अवस्था कशी व केव्हा प्राप्त होईल? हे सांगता येत नाही.

'जागृती' अवस्था याचा अर्थ पुस्तके वाचून लोक सांगत असले, तरी त्याचा अर्थ पुष्कळ प्रकारानी आहे. एक अर्थ म्हणजे ह्या शब्दाचा हेतू काय? याशिवाय सांगण्यासारखे, बोलण्यासारखे व वागण्यासारखे असे किती अर्थ आपण यातून काढू शकतो? हे अनुभविले पाहिजे. केवळ त्या पुस्तकाची बाजारात किंमत असेल ती देऊन, 'विकतचे श्राद्ध' घेण्यापेक्षा, ही अवस्था न समजणे हाच आशीर्वाद; हे समजणे उत्तम. कारण निवेदनात जो काही अनुभव लिहीला आहे त्याचा अर्थ स्पष्ट होणे, म्हणजे पुढील अवस्थेत जे जे काही अनुभविणे, व इतराना सांगणे; ही क्रिया दोन अंगी आहे. नुसती जागृती अवस्था प्राप्त होणे, हे कधीच शक्य नाही; व साधकाला स्वत:ला अनुभविता येत नाही. एक मूळ अवस्था प्रत्येकाला असतेच. गुरुमार्गी झाल्यावर जी मूळ अवस्था आहे त्यामध्ये स्थित्यंतर होणे, ही जागृती अवस्था असून, त्याचा अर्थ



पदोपदी अनुभवास यावयास पाहिजे; कारण मूळ अवस्थेत 'घडणे' ही क्रिया स्वाभाविक आहे. यापेक्षा वेगळे काही घडविणे; व ज्याचा लाभ इतराना होणे, याचा अर्थ म्हणजे जागृती अवस्थेत स्वत: जागे होणे, हीच अवस्था नसून, जी साधना आपण करीत असतो तिचा लाभ काया-वाचा-मनाला होत असतो. याचा अर्थ 'जागे होणे'; म्हणजेच 'जागृती'. ही पहिली अवस्था काया-वाचा-मनाच्या त्रिपुटीमध्ये होते; व नंतर ती साधनेत व्हावयास पाहिजे. म्हणजे जागृती ही अवस्था साधकाला व त्यानंतर तो करीत असलेल्या साधनेला प्राप्त व्हावयास पाहिजे. ह्या दोन अवस्था प्राप्त होणे आवश्यक आहे. नाहीतर भक्तभाविक गुरूंना भेटण्यासाठी आला, म्हणजे त्याचा त्रास नको, म्हणून काहीतरी सांगून त्याला वाटेला लावणे बरे नाही. यासाठी साधनेचा 'मार्ग' ही पहिली अवस्था व 'दर्शन' ही दुसरी अवस्था होय. जगाला पुष्कळ भूक लागली आहे. पुष्कळाना फक्त पोटाची भूक लागणे म्हणजे 'भीकेचे डोहाळे' असे म्हणतात. साधकाला 'भाक' लागते. ती भूक शमत नाही तोपर्यंत साधकाला शांति लाभत नाही. असे पुष्कळ साधक वाया गेले आहेत. त्यांच्या निष्ठेचे कौतुक वाटते. वास्तविक गुरुमार्गात असणे हा धोका आहे, हे विसरून चालणार नाही. ध्यानधारणा करीत असताना, कर्म आधीन होते; किंवा कर्माचे निवारण होते. पण 'धर्म' हा खोटे बोलत नाही व चालत नाही. धर्माला दांभिकपणा किंवा खोटेपणा चालत नाही. कारण धर्माची 'चाल' ही वेगळी आहे. धर्माची चाहूल लागली तर इतराना जागे करण्यापेक्षा, आपण स्वत: जागे होणे, ह्यात मोठेपणा आहे. ही जागरूक अवस्था प्राप्त करतेवेळी, साधनेत काया-वाचा-मन यांचा समावेश व्हावयास पाहिजे. 'काया' हे साधनेचे प्रमुख माध्यम आहे. त्यामध्ये पंचमहाभूततत्त्वे म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश; त्यानंतर 'वाचा' यामध्ये पंचप्राणकोश म्हणजे अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय; व त्यानंतर 'मन' यामध्ये पंचतन्मात्रे म्हणजे गंध, रस, रूप, स्पर्श, शब्द यांचा समावेश व्हावयास पाहिजे. म्हणजे ह्या पंधरा माध्यमांचे कार्य जीवनात व्हावयास पाहिजे. पुढे बुद्धि, मन (प्रज्ञा), चित्त, अहंकार अशी चार म्हणजे एकूण एकोणीस माध्यमे म्हणजे जीवन, अशी अवस्था प्राप्त व्हावयास पाहिजे. अन्यथा जीवाची धारणा फक्त

सात माध्यमात होते. बाकीची बारा माध्यमे असून नसल्यासारखी आहेत. यासाठी साधना करतेवेळी ईश्वराची आराधना करून चालणार नाही. ज्या माध्यमांची उणीव असेल, त्यांची प्रथमत: प्राप्ती करावयास पाहिजे. ही प्राप्ती झाली की, 'देव' हा विषय वेगळा नाही, हे कळून येईल. ज्यावेळी एकोणीस माध्यमे कार्यान्वित होतील त्यावेळी 'आत्मा' म्हणजे 'शिव' अवस्था प्राप्त होईल.

वरील अवस्था प्राप्त होण्यासाठी, नुसते चरित्र वाचून किंवा मनन करून चालणार नाही. म्हणून जीवनारंभी श्रीभैरवनाथांनी ॐकार करण्यास सांगितला; व असा आशीर्वाद दिला की, "भवितव्यात ह्या ॐकार साधनेमुळे 'पिंडी ते ब्रह्मांडी' म्हणजे काय? ह्याचे ज्ञान तुला व साधकाना होईल. त्यासाठी ॐकार हीच साधना असून, ह्या साधनेत पाच अवस्था आहेत. त्यापैकी तीन अवस्था ह्या पिंडाचे ज्ञान होण्यासाठी व दोन अवस्था ब्रह्मांडाचे ज्ञान होण्यासाठी असून, याप्रमाणे जी साधना मी शिकवितो आहे ती लक्षपूर्वक ऐक. जर का त्यापैकी एका अवस्थेत शास्त्रीय पद्धतीने चूक झाली तर भवितव्यामध्ये साधना सिद्ध होणार नाही. यासाठी साधना करतेवेळी लक्ष ठेवणे, ह्याचा अर्थ 'सिद्ध' होणे; असा आहे. तेव्हा पाच अवस्था, ही ॐकाराची पाच रूपे असून, ती रूपे भवितव्यात सहस्त्रावधी रूपे होतील. म्हणजे साधनारंभी जरी पाच लोकाना ह्या ॐकाराची संथा शिकविलीस तरी पुढे हजारो भक्त तयार होतील; असा माझा फक्त 'आशीर्वाद' नसून 'कृपाशीर्वाद' आहे." याचा अर्थ आशीर्वाद हा जरी प्राप्त झाला तरी तो दुसऱ्याना देता येत नाही. दुसऱ्याना देता येण्यासाठी कृपाशीर्वाद असावयास पाहिजे.




# १७. ॐकार साधना - अंगे

ॐकार साधना ही दिलेल्या अंगानी करण्याने, या साधनेची प्राप्ती होईल. एका अंगाने उच्चार म्हटला गेला, तर त्याचा लाभ हा शास्त्रीय दृष्टीने होत नाही.

**पहिली अवस्था :**

उच्चार मध्य लय

ह्या अंगानी म्हणतेवेळी, संथेने म्हणावयास पाहिजे. प्रथमत: उच्चार - मध्य - लय असा ॐकार म्हणताना, अडीच सेकंदात म्हणावा. जेव्हा साधकाची प्रगती दिसून येईल तेव्हा पाच सेकंदामध्ये; व तिसरी पायरी यामध्ये ही संथा दहा सेकंदात म्हणावी.





**दुसरी अवस्था :**

१) उच्चार मध्य लय
२) स्वर ताल लय

ह्या अवस्थेपासून प्रमाण (स्केल) व स्वर यानी संथा म्हणावी लागते. कारण ह्या संथेमध्ये ॐकाराचा ध्वनि आपल्या वाणीतून म्हटला असता, वातावरणात ध्वनि-लहरी-ध्वनि निर्माण होतो. हा ध्वनि आपल्या वाणीतून उच्चारला जाऊन, जेव्हा तो ऐकावयास येतो, त्यावेळी 'प्रतिध्वनि' ही क्रिया निर्माण होते. म्हणजे ध्वनि-लहरी-प्रकाश ही अवस्था. इथे 'प्रकाश' ह्याचा अर्थ उजेड असा नसून, प्रकाश ही अवस्था म्हणजे करीत असलेल्या साधनेची साधकाला 'जाणीव होणे'. ही क्रिया करीत असता, उच्चार हा पाच स्थानातून म्हणणे आवश्यक आहे; ती म्हणजे नाभीस्थान, हृदयस्थान, कंठस्थान, ललाटस्थान व ब्रह्मस्थान ही होत. ह्या पाच

स्थानातून साधना करतेवेळी उच्चार म्हणावा. अशा रीतीने साधना केली असता, पाच कोशांचा लाभ आपोआप होत असतो. ही पाच स्थाने व पाच कोश यावर आपले जीवन आधारलेले आहे. या साधनेतील अवस्था प्राप्त होण्यास वेळ लागतो. पण जेव्हा ती प्राप्त होते, म्हणजे पाच स्थाने व पाच कोश यांचा विकास होतो; तेव्हा साधकाला पन्नास टक्के प्राप्ती, साधना केली असता होत असते.





**तिसरी अवस्था :**

साधकाला ही अवस्था अत्यंत महत्त्वाची आहे. आपण जन्माला येतेवेळी जो स्थूल देह आणतो, त्याशिवाय आणखी दोन देह आहेत; पण आपल्याला ते दिसत नाहीत, म्हणून एकाच देहाची जाणीव होते. जेव्हा आपले इष्ट काम प्रयत्न करूनही होत नाही, तेव्हा आपण म्हणतो की, कर्माचे संकट आहे; पण देताना देवाने तीन देह दिले असताना, जर एकाच देहाने आपण प्रयत्न केले तर त्या ठिकाणी दोन देहांची कमतरता भासते, व आपण 'संकट आले', असे म्हणतो. एक देह हा जरी व्यक्त आहे तरी त्यामागे दोन देह अव्यक्त असतात; त्यांचा लाभ होण्यासाठी, साधनेचा मोक्ष किंवा सोक्ष म्हणजे ह्या अवस्थेतील साधना प्राप्त करावयास पाहिजे. पहिल्या अवस्थेत जो ॐकार केला, त्यामध्ये काया, वाचा ह्या माध्यमांची आवश्यकता होती. आता तिसऱ्या अवस्थेत उच्चार, आचार, विचार यांचा लाभ ह्या तीन देहाना प्राप्त करावयाचा आहे. यासाठी संथा ही काळजीपूर्वक विचारात घेऊन, उच्चाराचा शब्द शुद्ध स्वरूपात म्हटला गेला पाहिजे. ह्या दोन्ही अवस्था जेव्हा एकरूप होतील तेव्हा मन हे एकाग्र होईल. ह्या अवस्थेत जेव्हा तिन्ही देहाना साधनेचा लाभ होतो; तेव्हा नकळत 'अहं-आकार' ही अवस्था प्राप्त होते. म्हणून पहिल्या अवस्थेत स्थित्यंतर, त्यानंतर स्थिती व नंतर 'अवस्था' आहे. परंतु ही जी अवस्था आहे, तिचा अर्थ कोणालाही



सांगता येत नाही. म्हणजे साधना ही क्रिया आपल्या आचरणाने घडत असते. साधनेचा जो धर्म आहे तो आपल्या देहाच्या ठायी अनुभवास यायला पाहिजे. मूळ साधनेत 'धर्म' म्हणजे 'देव' नसून, 'देव' हे माध्यम मदत करीत असते. ज्यावेळी साधनेत तीन अवस्थांची प्राप्ती होते, तेव्हा त्याला 'साधक' असे म्हणतात.

पहिली अवस्था 'स्थित्यंतर'; म्हणजे आपला मूळ आचार, विचार, उच्चार यांचे एकरूपत्व होणे. त्यानंतर 'स्थिती' ही अवस्था प्राप्त होणे; म्हणजे आपले स्वतःचे सुख व दुःख ह्यापेक्षा इतराबद्दल प्रेम निर्माण करणे; व त्यानंतर साधनेतील 'अवस्था' म्हणजे जगावर परोपकार करणे. यासाठी श्रीगुरूंनी जी ॐकार साधना शिकविली आहे, त्याचा स्पष्ट अर्थ 'अहं, त्वं, इदम्' असा होय; म्हणजेच कृपेची प्राप्ती होणे.




**चौथी अवस्था :**

पहिल्या तीन अवस्थेत, काया, वाचा, मन यांचे एकरूपत्व होणे; व त्यानंतर पाच स्थाने व पाच कोश यांची प्राप्ती झाली. जन्माला येणारा जीव याचे कार्य केवळ खाणेपिणे असे नसून, जन्माला आल्यावर प्राप्त जन्माचा विकास होणे आवश्यक आहे. ॐकार साधनेच्या पहिल्या तीन अवस्थेत जीव, जीवात्मा यांची प्राप्ती होत असते. म्हणजेच जो आत्मा म्हणून आपल्यामध्ये आहे, त्याच्या अस्तित्वाची प्राप्ती आता होते. जे पंचप्राण आहेत ते केवळ अन्नमय कोश यामध्ये न राहता, ॐकार साधनेतून जीव, जीवात्मा व आत्मा ही क्रिया घडत असते; व पाच कोश यामध्ये 'चेतना' अवस्था न राहता, 'चैतन्य' अवस्थेची निर्मिती होते.

म्हणजे इहजन्मात जे कार्य आत्म्याला करावयाचे असते, ती त्याची इच्छा आता पूर्ण होत असते. यासाठी साधनेमध्ये उच्चार हा स्वरात म्हटला गेला पाहिजे; व 'स्वर' म्हणत असता, 'ताल' सांभाळला पाहिजे. हा ताल जर सांभाळता आला नाही तर पुढील अवस्था म्हणजे 'सूर', हा वाणीतून उच्चारला जाणार नाही. यासाठी संथा ही महत्त्वाची आहे.

ह्या अवस्थेत ॐकार उच्चार करीत असता, हा उच्चार वाणीने करावयाचा असतो. अन्यवेळी आपण बोलतो, चालतो किंवा एखादे गाणे गुणगुणतो, तेव्हा ही क्रिया ज्या देहाने उच्चारली जात असते, त्याला 'वाणी' असे म्हणता येणार नाही. ॐकार उच्चार वाणीने करीत असता, जी माध्यमे कारणीभूत होतात, ती येणेप्रमाणे; दोन ओठ, जीभ (जीभेचे टोक), टाळा, श्वासोच्छ्वास व स्वरयंत्र.

वरील माध्यमानी उच्चार करावयाचा असतो. सवयीने हळूहळू तो उच्चार आपल्या वाणीतून होणार आहे. ती वाणी म्हणजे आपण बोलतो तो शब्द; किंवा स्वरयंत्र याचा उपयोग केला असता, जो ध्वनि ऐकू येतो, तो ध्वनि नाही. वरील माध्यमांचा वापर प्रथमावस्थेत ॐकाराचा ध्वनि करण्यासाठी केला जातो. हळूहळू श्वास हा जेव्हा कंठातील स्वरयंत्रातून बाहेर निघतो; त्या क्रियेतून जो ध्वनि निघेल, त्यास 'ॐकार' म्हणतात. त्यासाठी वरील माध्यमे यांचा वापर कमीतकमी व्हावयास पाहिजे. ही साधना करण्यापूर्वी, आपले बोलणे इतराना समजण्यासाठी, ह्या स्वरयंत्राचा वापर जरी आपण करीत असलो, तरी त्या बोलण्यात 'स्वर' आहे असे म्हणता येत नाही. आपण व इतर आसमंतातील लोक, जे वेगवेगळ्या स्वरानी बोलत असतात, हे बोलणे देहिक क्रियेतून होत असते. ॐकाराचा उच्चार हा आत्म्याने करावयाचा असून, ती साधना आत्म्यासाठी आहे. जेव्हा साधनेस सामुदायिकरीत्या आपण बसू; त्यावेळी एका निश्चित स्वरावर आपल्या वाणीमध्ये अवधान असले पाहिजे. अशा रीतीने सामुदायिकरीत्या ॐकार केला असता, सर्वांचा एकच स्वर ऐकावयास यावयास पाहिजे. आपला स्वर हा इतराप्रमाणे जर मिळविता येत नाही, तर त्याचा अर्थ ॐकार साधना आपण देहाने करीत आहोत, हे सिद्ध होते. ॐकाराचा उच्चार करीत असता, स्वराचे अवधान जर



आपण ठेवले तर 'सूर' ही अवस्था सहज प्राप्त होत असते. चौथ्या अवस्थेत जे अंग स्वर-ताल-सूर म्हणून आहे; त्यामध्ये स्वर हा वाणीतून ध्वनित होणे, ही साधकाची देहिक अवस्था आहे. पुढे हीच अवस्था 'सूर' ह्या अवस्थेशी एकरूप व्हावयाची आहे. यासाठी स्वर व सूर हे इष्ट वेळात उच्चार करणे; म्हणजे ताल याने युक्त असा ॐकाराचा उच्चार केला असता, सूराचे रूपांतर 'आत्मा' ह्या अवस्थेमध्ये होत असते. ह्याचा अर्थ स्व-सूर! म्हणजे सृष्टीचे सौंदर्य याचे गान, सदैव सृष्टीमध्ये कार्यान्वित होत असते. अन्यथा आपण गाणे म्हणतो हा विकार देहाचा असून, आत्म्याचा ध्वनि हा विचार म्हणजेच इष्ट विकास याचा लाभ आपणास वरीलप्रमाणे उच्चार केल्यास होतो. ह्या अवस्थेत आपले प्राप्त जीवन 'वीणा' व्हावयास पाहिजे; म्हणजे सरस्वती किंवा ज्ञान होणे. यासाठी ही चौथी अवस्था अत्यंत महत्त्वाची आहे; हे सुज्ञ भक्तानी लक्षात ठेवले पाहिजे. केवळ ऐहिक जीवनाचा लाभ व्हावा यासाठी ॐकार साधना ही तीन अवस्थांनी सूचित केलेली आहे; व पुढील दोन अवस्था ह्या पारमार्थिक जीवनासाठी आहेत.

**पाचवी अवस्था :**

या अवस्थेची ओळख आता साधकाला होणे आवश्यक असून, साधनेचे मर्म म्हणजे 'सांगता' होणे; हा परिचय ह्या पाचव्या अवस्थेत ॐकार करताना अनुभवास यावयास पाहिजे. पहिल्या अवस्थेत 'ओळख' हा शब्द लिहीला आहे. 'ओळख' हा शब्द पूर्वजन्माशी सूचित आहे. कारण जे जे काही आपल्या हातून ज्ञानअज्ञानाने घडत असते, ते पूर्वसंचितावर अवलंबून असते; म्हणजे घडणारी घटना हिचा संबंध ओळख म्हणून असल्याशिवाय, तिची पुनरावृत्ति इहजन्मात होत नाही. त्याप्रमाणे पूर्वीच्या अनेक जन्मापैकी आपण काही एका जन्मात काही एक साधना केलेली असली पाहिजे. त्याशिवाय आज आपण ह्या गुरुमार्गात येत नाही. ह्याचा अर्थ इंग्लीशमध्ये 'Admission without permission!' म्हणजे काय? तर ह्या जन्मात आपली इच्छा देवाधर्माचे आचरण करावे किंवा करू नये, अशी असते. पूर्वजन्माप्रमाणे हा जन्म होतो; व ह्या जन्मात सभोवार जे जग दिसते, त्याप्रमाणे आपण वागावे असे वाटते;

परंतु तसे वागून जेव्हा शांतता प्राप्त होत नाही, तेव्हा आपोआप आपल्या नकळत आपले मन, आपण काय केले असता शांतता मिळेल? याचा शोध घेऊ लागते. याचा अर्थ वरीलप्रमाणे आहे. पाचव्या अवस्थेत साधना करण्यापूर्वी, चौथ्या अवस्थेत तीन देह म्हणजे तीन जन्म एकत्र येतात. ह्या तिघापैकी प्रत्येकाने काहीतरी सत्कृत्य केलेले असते. ते सत्कार्य ज्यावेळी आपण अडीअडचणीमध्ये येतो तेव्हा उपयोगी पडून, साधकाला ज्या सुख, शांती, समाधानाची उणीव भासते, ती उणीव भरून काढण्यासाठी, निश्चित मार्गाची दिशा दाखवित असते. अनेक लोकाना असे वाटते की, सत्कर्म खूप करावे म्हणजे आपली मुक्तता होईल; किंवा मुक्ती प्राप्त होईल. पण मुक्ती देवाने द्यावी; म्हणून नवससायास किंवा देवाप्रीत्यर्थ साधना करून, मुक्तता प्राप्त होत नाही. ही प्राप्ती देवाला प्राप्त करून मिळणारी नाही. ती प्राप्ती साधकाला आपली आपणच करावी लागते. यासाठी ह्या पाचव्या अवस्थेवर जीवनाचा निर्णय अवलंबून आहे; म्हणजे इंग्रजीत म्हटल्याप्रमाणे 'Hell or Heaven'; म्हणजेच करीत असलेल्या साधनेची 'सांगता' ह्या अवस्थेत आहे.

वर सांगितलेली ही अवस्था, हिचे महत्त्व देव प्रसन्न होणे किंवा मुक्ती प्राप्त होणे, यापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. ह्या अवस्थेत गुरुभक्ती करीत असता काय आहे व काय नाही याचा शोध आपला आपणच घेतला पाहिजे. हे एकच साधन आहे की, ज्यामुळे तीन अवस्थांची प्राप्ती होते; ती म्हणजे इहलोक, परलोक व स्वर्गलोक; म्हणजे पाच लोक होत. यांची प्राप्ती ह्याच जन्मात करता येत असून, 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे'; अशी अवस्था यामध्ये आहे. मागील चौथ्या अवस्थेत स्वर-ताल-लय अशी संथा होती; व आता पाचव्या अवस्थेत सूर-ताल-नाद ही संथा म्हणावयाची सवय करावी. यामध्ये देहिक व आत्मिक ह्या दोन्ही तत्त्वानी संथा म्हणावयाची असल्याने, गुरुमार्गातील ही साधना किती सूचक आहे हे कळले पाहिजे. एकवेळ लाख रुपये कमवाल किंवा गमवाल; परंतु ही जी साधना सूचित केलेली आहे, ती करीत असता, शंभर टक्के अवधान साधनेकडे असावयास पाहिजे; व ही साधना श्रीसद्गुरूंनी सूचित केली आहे म्हटल्यावर, ती प्राप्त



होईतोपर्यंत सेवेची पराकाष्ठा करावयास पाहिजे. ही साधना पुढील आयुष्यात किंवा अडचण निवारण झाल्यावर आपण करू, असे म्हणून चालणार नाही. याचे कारण या साधनेचा लाभ होण्यासाठी, आपले काया, वाचा, मन उत्सुक नसते. 'गुरूंची आज्ञा', म्हणून आपण साधनेला प्रवृत्त होत असतो; पण ही प्रवृत्ति, गतजन्मातील केलेल्या पुण्याईने उदित झालेली असते; व तिचा लाभ ह्या जन्मात होण्यासाठी पुनश्च तसे कर्म आपल्या हातून घडावे, अशी श्रीसद्गुरूंची इच्छा असते. जर आपण अडीअडचणींच्या सबबी सांगून, सेवा करण्यामध्ये दिरंगाई किंवा चालढकल करीत राहिलो तर पुनश्च तशी संधी किंवा योग प्राप्त होणार नाही; कारण गुरू व शिष्य यांच्यामध्ये हा खेळ, 'नाटक' म्हणून चाललेला असतो. आपल्या समोर जे काही घडते ते सर्व नाटक या स्वरूपामध्ये असते; पण ह्या घडणाऱ्या घटनेकडे 'टक' लावून पाहिले असता, सत्य वस्तुस्थितीचा अनुभव मागाहून येतो.

चौथ्या अवस्थेमध्ये 'स्वर' म्हणून आपण म्हणतो, त्याचा अर्थ शाब्दिक नसून, ह्या जगाचे जे कार्य अव्याहत चालू आहे, त्या कार्यामध्ये सृष्टीचा समावेश आहे. स्वराची उपपत्ति ब्रह्मांडाशी असून, ते ब्रह्मांड पृथ्वीप्रमाणे स्वत:भोवती प्रदक्षिणा करीत असते. त्यावेळी त्या फिरण्याने जी गति निर्माण होते, त्या गतीला 'नाद' असे म्हणतात. पुढे हा नाद सृष्टीकडे येतो; याचे कारण गुरुत्वाकर्षण हा धर्म पृथ्वीचा असून, पृथ्वीकडे हा नाद येऊ लागल्यावर, त्या नादातून पुढे सात स्वर निर्माण होतात. ह्या स्वराना 'सप्तलोक' असे म्हटले असून, पहिल्या स्वरात पहिल्या लोकाची प्राप्ती आम्हा मानवाना होत असते. इहजगतात जन्माला आल्यावर, बालक जो पहिला आवाज उच्चारते तो पर्यायाने पहिला स्वर आहे. त्या स्वराला 'रडणे', असे गोड कौतुकाने जन्मदाते आईवडील म्हणत असतात, ह्या रडण्याने आसमंतातील आप्तइष्ट जागे होतात; किंवा आई जागी होऊन, त्या बालकाची विचारपूस करू लागते. याप्रमाणे प्राथमिक अवस्थेमध्ये जो उच्चार म्हणजे 'रडणे' तेसुद्धा गाणे असून, वारंवार गुरूंना भक्ताचे रडगाणे ऐकावे लागते. पुढे मोठे झाल्यावर हेच बालक दुसरा स्वर म्हणजे 'कुरकुरणे', आदीचा उच्चार करते होते; व

त्यानंतर ते बालक सज्ञान होऊन अज्ञानी होते; म्हणून 'आणणे' हा स्वर म्हणू लागते. असे तीन स्वर प्रथमांगी काया, वाचा, मनाने उच्चारल्यावर, हा करीत असलेला उच्चार 'ओम्' आहे की, 'बोंब' आहे हे तुम्हीच ठरवावे.

पहिले तीन स्वर हे जर बिघडले तर, उच्चार म्हणजे 'उत्पत्ति', स्थिती म्हणजे 'कुरकुरणे' आणि लय म्हणजे 'रडगाणे', अशी अवस्था प्राप्त होऊन, आपण गुरूंच्या शोधात येतो. त्यावेळी प्रथमत: जी संथा जीवनारंभी बेसूर झाली आहे ती ठीक करणे, हे काम किती महान आहे? हे फक्त परमेश्वराला ठाऊक आहे; कारण सद्गुरुसेवेत 'ठाऊक काय आहे'? हे गुरूंना माहीत असते; परंतु भक्ताच्या ठिकाणी 'ठाव' केव्हा सापडेल? याचा नेम नाही. आज गुरुमार्गात आहे म्हटल्यावर, सूरात साधना किंवा आरती म्हणेल; पण गुरूंच्या मनाप्रमाणे 'वाकणे', हे त्याला पथ्य असल्यामुळे, जेव्हा त्याच्या मनाप्रमाणे घडत नाही तेव्हा हा भक्त 'असूर' होऊन, बाहेर 'सूर' शोधण्यासाठी पुनश्च जीवनास आरंभ करतो. पहिली अवस्था म्हणजे पहिला सूर, याची निर्मिती रडण्यामध्ये आहे; व आपण जन्म घेतेवेळी रडण्यासाठी आलेलो नाही; ही जाणीव ठेवून, जेव्हा आपण कृपेच्या शोधार्थ येतो तेव्हा हे 'रडगाणे' नसून 'राग' आहे, असे जगाला पटले पाहिजे. ह्या रागातून जेव्हा स्वराने व सूराने विश्वाचे गान भक्त गाईल तेव्हा ही सृष्टि धन्य होईल.



# १८. चांदण्यातील इंद्रधनुष्य

ॐकार साधना ही श्रीभैरवनाथांनी सांगितली. त्याचे महत्त्व सुरुवातीला वाटले नाही. औदुंबरला मी आलो असता, नित्यनियमाने प्रथमत: ॐकार करीत होतो; पण पुढे ही नित्याची साधना होईल, असे त्यावेळी वाटले नाही; पण त्यावेळी ॐकाराचे महत्त्व वेगळे वाटायचे. मग एके दिवशी लख्ख प्रकाश असा पडला की, जसा प्रकाश मागे मी अमावास्येला अनुभवला होता, तसे इंद्रधनुष्य हे चांदण्यात पाहिले. इंद्रधनुष्यात जे सात रंग असतात ते सूर्यप्रकाशात दिसतात. पण त्यादिवशी पौर्णिमा होती. माघ महिना होता. त्यादिवशी हाजीमलंगबाबांचा उरूस होता. त्यादिवशी सायंकाळी प्रार्थना केली असता, 'अभोगी' चे सूर ऐकू येऊ लागले; व हळूहळू आकाशात त्या सूरांचे रंग उमटले; व शेवटी हे इंद्रधनुष्य आहे, पण आकाशात पाहतो ते नसून, हे स्वरांचे आहे; ही जाणीव झाली. 'इंद्र' हा देवांचा राजा; स्वर हा गाण्याचा राजा; सूर हा धनुष्यातील बाण; तो सूर आकाशाकडे चालला आहे, असे दिसले. त्यावेळी हाजीमलंगबाबांचे शब्द ऐकू येऊ लागले, ''पाच पीरको याद करो''. याचा अर्थ पाच स्थानातून उमटणारे पाच स्वर व पाच स्वरांचा एकच राजा म्हणजे इंद्र किंवा आत्मा. आपल्याला जे दिसते ते एकशेऐंशी अंश जग आहे; पण प्रत्यक्षात आहे तीनशेसाठ अंश. परंतु प्रत्यक्ष एकशेऐंशी अंश दिसते, म्हणजे दर्शन होते; ते दर्शन पिंडाचे आहे व एकशेऐंशी अंश ब्रह्मांडाचे आहे. यासाठी एकशेऐंशी अंश जे दिसते ते धनुष्य होय. हा शब्द ध + मनुष्य असा आहे; व 'ध' च्या पुढे गुरू भेटल्याशिवाय जाऊ नकोस, असा इशारा त्यानी दिला. याचा अर्थ 'सा-प' हा जरी साध्य झाला तरी गुरूंची भेट होईल तेव्हा 'प-सा' ची प्राप्ती होईल. तोपर्यंत संयम ठेव. नाहीतर 'यम' वाट बघतोच आहे. त्याला चकविणे वाटते तितके सोपे नाही. ''आजचा दिवस उरूसाचा आहे. अल्लाकी दुवा है। सलाम आलेकुम!''

त्या रात्री झोप आली नाही. पहाटे तीन वाजेपर्यंत काहीतरी ध्वनि माझ्या कानाशी ऐकू येत आहे असे वाटले, म्हणून तीन वाजता उठल्यावर स्नानाला गेलो. तेव्हा स्नान झाल्यावर प्रात:स्मरण करीत असता, तोच

ध्वनि अधिक स्पष्ट झाला. त्याकडे लक्ष देऊन ऐकू लागलो; 'ध्वनि-लहरी-ध्वनि', असा शब्द समजला. याचा अर्थ काय आहे? म्हणून विचार करू लागलो. कारण भैरवनाथांनी ॐकार हा पाच स्थानातून शिकविला होता; व आज तर त्याचे रूपांतर ध्वनि-लहरी-ध्वनि, असे म्हणताना ऐकले. त्या म्हणण्याचा अर्थ 'संथा' असा आहे. भवितव्यात हीच संथा रोज ब्रह्ममुहूर्तावर म्हणावयाची आहे. ही संथा म्हणताना, देहातील पाच स्थानांचा समावेश होतो आहे की नाही? हे अनुभविले. ही पाच स्थाने आपल्या देहामध्ये आहेत, हे पहिल्यांदा समजले; व ह्या पाच स्थानांचा संबंध, करीत असलेल्या साधनेतून जोडावयाचा असतो, हे ज्ञात झाले. म्हणजे प्रथमत: नाभीस्थान व शेवटी ब्रह्मस्थान. देहात चौऱ्यांशी योनी असून, त्यांचे कार्य काया-वाचा-मनद्वारा होत असते. त्यावेळी पहिली योनी ही नाभीस्थानातून निर्माण होते; व अशा रीतीने ब्रह्मस्थानापर्यंत ह्या राहिलेल्या योनींचा समावेश होऊन, त्यांचा संबंध ह्या पाच स्थानाशी म्हणजे पाच कोशाशी आहे. त्या योनींचे कार्य, योनी आहेत म्हणून होणार नाही; तर आपण करीत असलेली साधना, त्या साधनेत ह्या योनी अंतर्भूत व्हावयास पाहिजेत. पूर्वी अनेकवेळा चौऱ्यांशी लक्ष योनी म्हणजे, मनुष्य जन्म हा चौऱ्यांशी लक्ष योनीमधून जन्म घेतल्यावर येतो, असे ऐकले होते; पण त्यादिवशी असे स्पष्ट कळले की, 'लक्ष' याचा अर्थ संख्यावाचक नसून, 'लक्ष दे'; असा आहे. तेव्हा गुरुमार्गामध्ये प्रथमत:च बोध झाला, असे म्हणता येईल. जसे शाळेत गेल्यावर प्रथमत: 'श्रीगणेशा' लिहीता बोलता येतो; त्याप्रमाणे साधकाला आपली साधना ही जी क्रिया, त्यातून 'क्रियापद' म्हणजे 'बोध होणे', आवश्यक असते. नुसते वर्षानुवर्षे साधनेच्या नावाखाली देहाने क्रिया करणे म्हणजे साधना नसून, त्या साधनेचे फल काय? हे साधकाला कळले पाहिजे. त्याप्रमाणे त्या दिवशी प्रथमत:च मनुष्यजन्म प्राप्त होतो, म्हणजे काय क्रिया घडते? व काय घडवावयाची आहे? हे स्पष्ट समजले. मनुष्याला येणारा जन्म हा नऊ महिन्यात होत असतो. ही क्रिया नऊ महिन्यात होते; पण त्या क्रियेचे 'पद' प्राप्त होणे, हे त्याच्या आचार, विचार व उच्चारावर अवलंबून आहे. ह्या क्रियेलाच 'पुण्य' असे म्हणतात. हा बोध झाल्यावर, डोळ्यासमोर लहानपणी जे



चित्र 'शेषशायी भगवान विष्णूंचे' पाहिले होते, त्यात त्यांच्या नाभीस्थानातून वेल येऊन, त्या वेलात शेवटी कमलामध्ये ब्रह्मदेव आहेत; असे चित्र होते. त्या चित्राची कल्पना त्याकाळी असे; पण प्रत्यक्ष आज त्याचा अनुभव अनुभवायचा आहे, अशी भूक जाणवली. नाभीस्थानातून आपला जो उदय झाला आहे, जन्म नव्हे, त्यात 'उदय' हे जन्माचे बीज असून, त्या बीजाला खतपाणी घालणे म्हणजे संगोपन करणे; हे आम्हा मानवांचे जन्मत:च इष्टकर्तव्य असून, त्यासाठी गुरूंचा उपदेश म्हणजे बोधामृत मिळाले असता, जन्माचे सार्थक होत असते. त्या बोधामृताने आपले जीवन हे 'ईश्वरमय' होते.

# १९. साधनेतील विष - विमोचन संकल्पसिद्धी

अशा साधना अवस्थेत दिवस जात होते. त्यावेळी असे विचार येऊ लागले की, आपण कोण? व आपले नाते ह्या जगाशी काय? म्हणून आपण ह्या ठिकाणी आलो? कशाला! हा खटाटोप आपण अंगावर घेतला? जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला जीवनात संग्राम हा आहेच. जय किंवा पराजय यापैकी एक अवस्था कुणाच्यातरी वाटयाला येणारच. भवितव्यात आपण करीत असलेली साधना, हिला दोन फले आहेत. एक स्वत:चा उद्धार किंवा जगाचा; म्हणून प्रश्नचिन्ह समोर उभे राहिले. अशी अवस्था कधीच झाली नाही; किंवा एक वर्षात हा प्रश्न जाणवला नाही. नुकताच हाजीबाबांचा उरूस झाला. त्यावेळी ''पाच पीरांची उपासना कर. ते तुझा व जगाचा सांभाळ करतील''; असे अभिवचन बाबांनी दिले होते. अशावेळी एखाद्या नदीमध्ये नावेची जशी अवस्था होते, त्याप्रमाणे माझी झाली. त्यावेळी मन एकाग्र होईना. नित्य सेवा चालू होती. पण जर मन एकाग्र होत नाही तर सेवेत व्यत्यय येणे, हा प्रमाद नकळत हातून घडत आहे म्हटल्यावर, मनाला खंत वाटू लागली. गेल्या आठवडाभराचे आचारविचार यांचे अवलोकन केले; कारण जी साधना आपण करतो, तिची प्रमुख अंगे आचारविचार ही आहेत. त्या अंगामध्ये आपले नामी तत्त्व अदृष्यरूपात वास करीत असते. अशावेळी त्याचा शोध घेतला पाहिजे; नाहीतर आपली साधना सिद्ध होणार नाही; व साधना सिद्ध झाली किंवा नाही हे जगाला काय माहीत? फक्त जगाला एवढेच ज्ञात होते की, मी औदुंबरला सेवेसाठी राहिलो आहे. अशावेळी खोटे बोलणे व वागणे हे मनाला पटेना. शेवटी चौथ्या दिवशी सायंकाळी देवळाच्या परिसराबाहेर जाऊन बसलो; व विचारमालिका सुरू झाली; पण काही मूळ अवस्थेचा निर्णय लागेना. त्यावेळी झोप लागली असे नाही, पण गुंगीत आहोत, अशा अवस्थेत एक दृष्य पाहिले की, कुणी एक यात्रिक ह्या तीर्थक्षेत्री आला आहे. आपल्या दिवंगत वडिलांची इच्छा म्हणून एकावन्न रुपये देवाच्या नावाने खर्च करावेत, म्हणून हा यात्रिक औदुंबर क्षेत्री आला. मी दररोज सायंकाळी नदीच्या दुसऱ्या तीरावर एक देवीचे देऊळ आहे, तेथे दर्शनासाठी जात



होतो. त्यावेळी ह्या यात्रिकाने देवळाच्या आसपास विचारपूस केली की, कुणी सेवेकरी सेवा करीत आहे का? तेव्हा पुजाऱ्यांनी माझे राहण्याचे ठिकाण त्याला दाखविले; व ''ते नदीच्या पलीकडे देवीच्या दर्शनासाठी गेले आहेत'', म्हणून सांगितले. तेव्हा ह्या यात्रिकाने वडिलांच्याप्रीत्यर्थ आणलेले एकावन्न रुपये माझ्या आसनाखाली ठेवले; व नमस्कार करून तो निघून गेला. हे दृष्य पाहताक्षणीच मी धावत देवळाकडे आलो; व माझ्या राहण्याच्या ठिकाणी जे आसन होते ते उचलले. त्याबरोबर जसा विंचू चावावा तसे दृष्य मला दिसले; व श्रीगुरूंचे शब्द ऐकू आले, ''हे पैसे नसून, साधनेत अडथळा निर्माण करणारे विष आहे. त्यापासून दूर रहा. कारण हे जे विष त्याचा 'विषय' साधनेत सिद्ध करावयाचा आहे. त्याची प्रचिती तुला दाखविली. आता जे विष आहे त्यांचा विषय सिद्ध कर. पुढे जगाला अमृत पाहिजे आहे. त्यासाठी जे विष प्रत्येकाच्या पिढयान्‌पिढयामध्ये आहे, त्या विषाचे विमोचन कर; म्हणजे भवितव्यात ह्या पिढयान्‌पिढया सुखी होतील''.

'विमोचन' हा विषय दोन प्रकारांनी करावयाचा असतो. पहिल्या प्रकारात जीवनात कर्मपरत्वे निर्माण होणारे दोष असतात. जीवनात ज्ञानअज्ञानाने घडलेल्या कर्मामुळे हे दोष निर्माण होतात; व ह्या दोषांचे विमोचन पश्चात्तापाने करता येते. जेव्हा दोषाची प्रखरता अधिक असते, तेव्हा ते कर्म शिल्लक रहाते; व पुढील जन्मात किंवा ज्या घराण्यात आपला जन्म झाला आहे त्या घराण्याला, ते कर्म दोष म्हणून भोगावे लागते. जेव्हा ही व्यक्ति दिवंगत होते तेव्हा त्या कर्माला कुणी वाली नसल्याने, ते कर्म वासनेच्या रूपाने शिल्लक राहून, त्या घराण्याच्या सर्व व्यक्तींच्याभोवती हिंडत असते. अशावेळी तो आत्मा ह्या कर्माशी संबंधित राहतो; व तो तें कर्म व त्यातील दोष कमी करू शकतो; पण त्यासाठी जन्म घेण्याची इच्छा किंवा वासना आत्म्याला होणे, ही अवस्था सहजासहजी प्राप्त होत नाही; कारण पुनश्च जन्म घेतेवेळी आत्मा सज्ञान होऊन असा विचार करता होतो की, कर्माचा जो भोग आहे तो काही कालपर्यंत भोगावा लागेल; परंतु राहिलेला काल म्हणजे आयुष्य यातून पुनश्च परलोकवासी झाल्याशिवाय सुटका नाही. असे जे कर्म, त्याच्या प्रखरतेवर दोषाची प्रखरता अवलंबून असते, व हे कर्म व

त्याचे अस्तित्व हे कुटुंबात अनुभवाला येते. असे जे दोषयुक्त कर्म ज्यामध्ये त्या संबंधित आत्म्याचा समावेश होत नाही, त्या कर्माचे विमोचन त्या कुटुंबामध्ये होत असलेला दानधर्म, व्रतवैकल्ये आदीनी होऊ शकते. अशा रीतीने जो दोष कुटुंबात किंवा वैयक्तिक जीवनात धारण झालेला असतो, त्या जीवनात अधिक चांगले कर्म करण्याने, ह्या दोषांचे विमोचन होऊ शकते; व त्या दोषपरिमार्जनार्थ वरीलप्रमाणे सेवा केली असता, त्याचा लाभ स्वतःला व कुटुंबाला होत असतो. विमोचन साधनातील हा पहिला प्रकार असून, ह्या अवस्थेमधले जीवन, जगतामध्ये पन्नास टक्के लोकाना अनुभवास येते.

विमोचनातील दुसरा जो प्रकार आहे, त्यामध्ये दोष किंवा कर्म हे इहलोकात वलयरूपाने राहून, त्याचा त्रास कुटुंबात किंवा घराण्यात होत असतो. ह्या कर्माचा प्रादुर्भाव हा जसा क्षयरोगी असतो, त्याप्रमाणे असतो. म्हणजे हा दोष त्या कुटुंबातील व्यक्तींची प्राणहानी करीत नाही; तर ज्या सुख-शांति-समाधानाची गरज आम्हा मानवाना असते, ते सुखात असूनही सुख हे अनुभविता येत नाही. याचे कारण ह्या प्रकारात कर्म अधिक आत्मा हे जन्म न घेता, वलयरूपाने कुटुंबाच्या सभोवार हिंडत असतात; व अशावेळी म्हटले तर सुख आहे, म्हटले तर नाही; अशी परिस्थिती असून, कुटुंबात जन्माला आलेली माणसे कतृत्ववान होतात, परंतु इहजन्मात आपले कर्तव्य काय हे विसरून, कुठूनही प्राप्त झालेल्या धनाचा क्षय होण्यासाठी, ह्या व्यक्तीचे जीवन हे व्यसनाधीन होत असते. ही पराधीनता निर्माण झाल्यावर, प्राप्त होणारी लक्ष्मी, हिचा विनियोग सत्कारणी होत नाही. पुढे हे दोष इतके तीव्र होतात की, प्रथमतः वंशातील संपत्ती व संतती आदींचा लाभ होण्याऐवजी, 'आपत्ती'चा लाभ होत असतो; व पुढे कालकालांतराने 'विद्या', हिचा मागमूसही कुटुंबात रहात नाही.

ही संकटे आपणच निर्माण केलेली असतात. जन्माला येतेवेळी शंभर टक्के कर्म देवाने दिलेले असते; त्यापैकी फक्त पंचवीस टक्के कर्माचा उपभोग जन्मामध्ये घ्यावयाचा असून, बाकीचे कर्म म्हणजे कर्तव्य इतरासाठी आहे; असा जीवनाचा अर्थ आहे. हे कर्तव्य करण्यात आपण



चालढकल करू लागलो, तर त्याचा परिणाम वरील दोषामध्ये होत असतो. कर्तव्यपरत्वे जीवन जर मनुष्य जगू लागला तर जीवनामध्ये 'संकट' म्हणजे काय? हा प्रश्न देवाला विचारावा लागेल. याउलट आज अशी परिस्थिती आहे की, 'मी जन्माला येतेवेळी जे काही आहे ते माझेच असून, तुझे जे काही आहे तेही माझेच आहे.' असे म्हटल्यावर जगावे कसे? जीवनात परोपकार हा धर्म असून, तो धर्म आज नैवेद्यालासुद्धा शिल्लक राहिलेला नाही. यावेळी परमेश्वर असे म्हणत असतो की, ''अरे प्राण्या, तुला जन्म दिला त्या जन्मात संकष्टीचे व्रत करावयाचे ते सोडून, संकटाचे व्रत घेतले आहेस, त्याला मी तरी काय करणार? जेव्हा तुझी कुठल्यातरी जन्मात गुरूंची गाठ-भेट होईल तेव्हाच हा दोष निवारण होऊ शकेल; कारण ज्या कर्मात वासनेने आत्मा अडकला आहे किंवा गुंतला आहे; त्याची मुक्तता ही सद्गुरूंशिवाय करता येत नाही.'' ह्या आत्म्याला इहजगतातून परलोकात इष्टस्थळी पाठवायचे असते. अशावेळी ज्यांना आपण 'सदगुरू' असे म्हणतो, त्यांचा अधिकार इहलोक, परलोक व स्वर्गलोक ह्यावर कार्य करता होईल, तेव्हाच आत्म्याची मुक्तता होईल. अन्यथा कुणीही सांगणे व त्याप्रमाणे घडणे, हे जगतात क्वचितच पहाण्यास किंवा अनुभविण्यास मिळते. बाकीचे 'गुरू' हे 'नामधारी' असून, त्यांच्या हातून हे कार्य लोककल्याण म्हणून करता येणे नाही. लोककल्याण म्हणजे आपल्यासमोर जे जग दिसते आहे, त्याचा उद्धार! पण यांच्याबाबतीत उद्धार म्हणजे इतरांचा पदोपदी 'उद्धार करणे', असे कार्य होत असते.

लोककल्याणाची भूमिका ही आपण स्वतःहून स्वीकारावयाची नसून, ते कार्य आपली पात्रता पाहून, आपल्यावर सोपविलेले ईश्वराचे कार्य, असा 'आदेश' असतो. ह्याठिकाणी 'आज्ञा' व 'आदेश' ह्यात जमीनअस्मानाएवढा फरक आहे. 'आज्ञा' ही आचरणात आणावयाची असून, 'आदेश' हा विचारात आणावयाचा असतो. तेव्हा जे जग आपण पाहतो ते जग आपल्या इच्छेप्रमाणे होण्यासाठी, जोपर्यंत ईश्वराचा आदेश मिळत नाही; तोपर्यंत आपण कार्य करतो आहोत, असे म्हणून चालणारे नसून, त्याचे फल हे सर्वस्वाने ईश्वराच्या आधीन आहे. अशी कार्यकारण भावना जेव्हा साधक-भक्त यांच्यात धारण होईल, तेव्हाच दुसरा भाग

जो विमोचनाचा आहे, त्याचा लाभ जगतातील दु:खी लोकाना मिळेल. अन्यथा धार्मिक विधि, तीर्थक्षेत्रे व तीर्थक्षेत्री राहणारे उपाध्ये यांचा 'उपाधी' हा त्रास, भक्तांच्यामागे लागतो. ह्यापेक्षा अधिक धर्म आहे असे म्हणता येणार नाही.

वरील दोषनिवारणार्थ उपाय असा आहे की, प्रथमत: ज्या आपल्या घराण्याच्या इष्टदेवदेवता आहेत; त्यांची कृपा आपल्यावर व्हावयास पाहिजे. ह्या कृपेला अनुसंधान म्हणून जो धार्मिक विधि शास्त्राने सांगितला आहे, तो विधि यथासांग करावयास पाहिजे. ज्या इष्टदेवता आपल्या घराण्याला असून, त्यांचे कुलधर्म, कुलाचार म्हणून सांगितलेले आहेत; त्या देवदेवता उत्पत्ति, स्थिती व लय अशा अवस्थेत जगतात वास करीत असतात. तेव्हा 'उत्पत्ति' ह्या अवस्थेमध्ये ज्या देवदेवता असतील, त्यांचा प्रथमत: विचार करून, त्या देवदेवतांना प्रसन्न करण्यासाठी काय काय धार्मिक विधि आहेत याचे शास्त्र साधकाला अवगत होणे आवश्यक आहे. अशा रीतीने पुढे गेलो असता 'स्थिती' अवस्था; व नंतर शेवटची म्हणजे 'लय', ह्या अवस्थेचे जे प्रधान दैवत असेल, त्याची कृपा व्हावयास पाहिजे; म्हणजे जो दोष कुटुंबात आहे त्याचे निवारण, ह्या तीन देवतांची कृपा होण्याने होत असते; व पुढे आत्म्याला सद्‌गती प्राप्त करून द्यावयाची असते; त्यासाठी सद्‌गुरूंची कृपा असावयास पाहिजे. इतके शास्त्र यामध्ये असल्याने, कर्मामध्ये जे दोष आहेत, त्यांचे अनुमान नुसते 'संकट आहे'; असे म्हणून चालणार नाही.

हा विमोचनविधि सिद्ध होण्यासाठी जो संकल्प करावयाचा असतो, त्या संकल्पात दोषांचे कारण स्पष्ट उच्चारले गेले पाहिजे. केवळ आपण करीत असलेली साधना यामध्ये देवदेवता व गुरुदेवता यांची कृपा आपल्याला प्राप्त झाली आहे, असे म्हणून चालत नाही. कारण पुढे ह्या कृपेने येणाऱ्या भक्तांचे विमोचन करावयाचे आहे म्हटल्यावर, हे साधन प्रथमत: 'शास्त्र' म्हणून उपयोगात आणावयाचे; व पुढे त्याचे 'शस्त्र' हेही उपयोगी पडले पाहिजे. अन्यथा नुसता संकल्प करून जर उच्चारला गेला तर इतरांचे विमोचन करण्याआधी, हा विधि करीत असलेल्या साधकाचे 'मोचन' होत असते. हा विधि बहुतांशी साधकाना



अवगत नसतो. यामध्ये जी साधना आहे ती करीत असता, प्रधान तत्त्व 'गुरू' असावयास पाहिजे; व गौण उपासना इष्टदेवदेवतांची करावी लागते. पुष्कळाना ह्या मार्गात 'साधना' व 'उपासना' याचा अर्थ न समजल्यामुळे, व दोन्ही क्रिया देहिक माध्यमातून करता येतात; म्हणून 'हा विधि करून पहा'; किंवा 'तो विधि करून पहा'; असे मार्गदर्शन ते करीत असतात. म्हणून हा विधि सूचित करण्याआधी, परमपूज्य हाजीमलंग बाबा यांनी सकाळी गुरूंची साधना व ॐकार अशी सेवा; व सायंकाळी इष्टदेवदेवता यांची उपासना करण्यास सूचित केले. त्याप्रमाणे रोज सायंकाळी मी औदुंबर क्षेत्री जी कृष्णा नदी आहे, त्या पलीकडे देवीचे देऊळ आहे; तेथे जात होतो. त्या देवीचे नाव 'भुवनेश्वरी'. आमच्या घराण्याची कुलदेवता व कुलदैवत हे कोल्हापूरची महालक्ष्मी व ज्योतिबा असे आहे; पण त्यावेळी रोज उठून कोल्हापूरला कसे जाणार? तेव्हा पर्याय असा सूचित केला की, जे देऊळ नदीच्या पैलतीरावर आहे, ती देवी हीच कुलस्वामिनी संबोधून, तिची उपासना सुरू कर. त्यासाठी श्रीदेवीमहात्म्याचा अध्याय व

॥ सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके ।
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते ॥

हा मंत्र अकराशे वेळा म्हणून मी परत येत असे. त्या सेवेत एकादशीचे महात्म्य अधिक आहे; म्हणून एकादशीचे स्तोत्र मी एकादशीच्या दिवशी म्हणत असे. ह्या दोन देवता म्हणजे 'उत्पत्ति' व 'स्थिती' यांची प्राप्ती करावयाची; व पुढे 'लय' ह्या तत्त्वाची देवता श्रीशंकर किंवा मार्कंडेय यांचे स्तोत्र व कवच आदी सेवा प्रामुख्याने करावी लागली. ह्या सेवेत ह्या तिन्ही देवतांचा नामनिर्देश करून, ह्या तीन देवता जेव्हा प्रसन्न झाल्या, तेव्हा चौथी शक्ति म्हणजे विमोचनाचा संकल्प सिद्ध झाला. यासाठी उपासना करण्यासाठी संकल्पाचा प्रथमत: उच्चार करावा लागतो; व उच्चार ज्या वाणीने म्हणावयाचा ती वाणी प्रथमत: सिद्ध होण्यासाठी ॐकार साधना, नंतर गुरुकृपा व नंतर इष्टदेवता, असा क्रम ह्या नित्य साधनेमध्ये सांगितलेला होता. त्यासाठी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत जो संपूर्ण वेळ सत्कारणी लागत असे; त्यामुळे आपण किती वर्षे सेवा

करीत आहोत व आजही चालू आहे, याचे अनुमान सांगता येत नाही. फक्त डोळ्यासमोर एवढेच अवधान होते; ते म्हणजे होणारा बोध. यात-

॥ सत्कर्म योगे वय घालवावे । सर्वामुखी मंगल बोलवावे ॥
॥ ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे ।
त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे ।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी ।
तेथे तुझे सद्गुरू पाय दोन्ही ॥

एवढेच चिंतन आयुष्यात करण्याचे कर्तव्य, ह्या जगात जन्माला येऊन करावयाचे आहे, हा बोध होता. यापेक्षा चिंता करून काहीएक पर्याय नव्हता; कारण करीत असलेली साधना, उपासना, बोध, बोधामृत, अवधान हे व्रत आपण घेतले आहे, यापलीकडे जग आहे किंवा नाही, याचा शोध घेतला नाही. "याचा शोध घेऊ नकोस. आज जगाला शोधण्यापेक्षा, साधना पूर्ण झाल्यावर जग तुला शोधत येईल", असे अभिवचन सद्गुरूंनी दिले होते. त्याची अनुभूति पुढे कार्यारंभ करतेवेळी आली. ती म्हणजे जो विधि जगासाठी सिद्ध केला होता, त्याची सिद्धता ही येणाऱ्या भक्तभाविकाना देऊन, त्यांना सुखी करणे. याचा अर्थ, हे कार्य म्हणजे शेतात धान्य पेरणे; व धान्य आल्यावर ते वेचण्यासाठी आहे, विकण्यासाठी नव्हे; असे अनुमान येणाऱ्या भक्तभाविकाना दिले पाहिजे. हा दुसरा संकल्प होता. पहिल्या संकल्पात साधनेत ज्याचा उच्चार केला त्याची सिद्धता असून, ज्या भक्तभाविकानी ह्या संकल्पाचा स्वीकार काया, वाचा, मनाने केला आहे, त्यांच्या दोषांचे निर्मूलन व्हावे, असा संकल्प द्यावा लागतो. पहिल्या संकल्पात आपण होतो व दुसऱ्या संकल्पात भक्तभाविकांचा समावेश होत असतो. ह्याचा अर्थ 'कृपा-आशीर्वाद' असा असावयास पाहिजे.



# २०.संकल्पाची भूमिका, साधना मार्ग,उपासना मार्ग

हे कार्य विचार करण्यापलीकडे आहे. ज्या दिवशी ह्या संकल्पाची भूमिका मला समजली, तेव्हा हे ज्ञान झाले की, जगतात जन्माला येण्यात सुख नसून, सुखासाठी जन्म येतो हेच मुळी अज्ञान आहे; कारण जन्म प्राप्त झाल्यानंतर, सुखाच्या पोटी आपल्या ठिकाणी हव्यास एवढा असतो की, शेवटपर्यंत हा हव्यास प्रत्येक मनुष्याला पुरून उरतो. ह्या उरण्यामुळे जरी जन्माला येणारा मनुष्य सुखी झाला असता तरी बरे झाले असते. पण हा अज्ञानाचा शाप असून, त्याचीच पुनरावृत्ति म्हणजे मनुष्य जन्ममरणाच्या बंधनामध्ये अडकलेला असतो. ह्या जीवनात बंधनरहित असा जन्म केव्हा प्राप्त होईल हे सांगता येत नाही; कारण जो कुणी जन्माला येतो, त्याचा विषय ऐहिक जगाचा विलास भोगणे हाच असून, ह्या व्यतिरिक्त जीवनात काही अन्य विषय असतील, असे वाटत नाही. मला प्रत्यक्ष मरणोत्तर जीवनामध्ये आत्म्याला काय अवस्था व यातना भोगव्या लागतात व त्याला प्राप्त होणारी गती काय आहे याचे ज्ञान झाले; पण हे न समजता, केवळ एकावन्न रुपये एवढया दक्षिणेवर, आपल्या वाडवडिलाना सद्गती प्राप्त होण्याची तरतूद पुरेशी आहे; असे त्यांचे वंशज मानतात. यापेक्षा त्या वंशाने 'श्राद्ध' हा विधि, केवळ वासनेपासून आत्मा मुक्त व्हावा म्हणून करावयाचा नसून, 'श्राद्ध' याचा अर्थ दिवंगत व्यक्तीबद्दल श्रद्धा, ही जर आपण ठेवू शकलो तर ह्या दिवंगत व्यक्तीला उत्तमप्रकारे सद्गती सहज मिळेल. जी व्यक्ति दिवंगत झाली आहे, तिने आपल्या संसारामध्ये आपल्या वाटयाला जे जे काही असेल ते ठेवून जाणे, हे कर्तव्य त्या जीवाचे आहे. पण आत्म्याला वासनेच्या पोटी जन्म घ्यावा लागतो; व जन्म प्राप्त होऊनही वासना संपत नाहीत. मग पुन्हा त्याचसाठी जन्माला येणे, हा क्रम जगतामध्ये वर्षानुवर्षे चालत आला, तर ह्या जगात शांतता कशी लाभावी? हा 'भस्मासूर' वासनेच्या पोटी जन्म घेतो आहे म्हटल्यावर, त्याची मुक्तता कधीही होणे शक्य नाही; असा विचार त्यादिवशीपासून नव्याने निर्माण झाला. त्याचे कारण हे जग आपण पाहतो आहोत ते सुखी नसून, ते सुख हा दुःखाचा पाया आहे. त्यावर सर्व जग उभे असून, हा

भस्मासूर केव्हा जगाचा अंत करील, हे सांगता येत नाही. त्यावेळी अशी भीषण कल्पना मनात रुजली की, जे जग आज आपण पाहतो आहोत, त्याहीपेक्षा अधिक प्रखरता कालांतराने निर्माण होईल; तेव्हा कोणत्या मार्गाने म्हणजे साधनेने, हे वासनेमधील बद्ध झालेले जीव आहेत, त्यांची सुटका सुलभ अशा मार्गाने होईल ही विवंचना मागे लागली. स्वीकारलेल्या मार्गापासून वंचित होणे, हे साधकाला किंवा गुरुभक्ताला भूषणावह नाही. म्हणून त्या दिवशी निश्चय करून, गुरूंच्या चरणावर लोक जो पंचामृताचा अभिषेक करतात, त्याऐवजी त्या दिवशीचा अभिषेक मी अश्रूनी केला की, "ह्यां जगाचे कल्याण करण्याचे सामर्थ्य माझ्यात नसून, जर आपली कृपा झाली तरच हा डोंगर बाजूला सारणे शक्य आहे!"

त्या दिवसापासून मार्गदर्शनाप्रमाणे सेवा ही 'दृष्टांत' म्हणून स्वीकार केली. आपल्या सभोवारचे जे जग इहलोकी वास करीत आहे, त्या जगाला पुनश्च सुखी पाहणे, हे आपले आद्य कर्तव्य असून, तोपर्यंत ती दृष्टि अंतर्मुख करणे व बाहेरची दृष्टि हिचा अंत करणे, अशी सेवा स्वीकारून, ज्यायोगे नितध्यास लागला आहे, त्यासाठी

कोटी ब्रह्महत्या हरिती करिता दंडवत ।
लोटांगण घालिता मोक्ष लोळे पायात ॥

अशी कृपा सद्गुरूंची आहे. परंतु नित्याच्या सेवेमध्ये ही आरती जेव्हा सर्व भक्त मोठयाने ओरडून म्हणत असतात, त्यावेळी ह्याचा अर्थ काय गोड आहे हे समजणे शक्य नाही; पण किती गूढ आहे हे मला समजले. त्यामुळे हे जग एवढे महान असून, ह्या जगाला आपण पुरे पडू की नाही हा संभ्रम वाटू लागला. पण कृपाशीर्वादाची ठेव आपल्याकडे आहे म्हटल्यानंतर, जग हे जरी महान असले, तरी आपण लहान होणे हे जगताच्या हिताचे आहे. ज्याप्रमाणे साखर ही घरात डब्यामध्ये असते, तेव्हा त्या साखरेचा स्वाद व गोडी मुंगी अनुभवते. परंतु हत्ती हा महान असून, दरवाजाच्याबाहेर डुलण्यासाठी त्याचा देखावा दिसतो; परंतु मेवा हा मुंगीला मिळत असतो. त्याप्रमाणे सेवा करीत असता, उपासना व साधना हे दोन्ही मार्ग कसे आहेत? तर साखर



ही 'उपासना'; व मुंगीला जी तिची गोडी मिळते ती 'साधना'; ही अवस्था भक्ताने सदैव लक्षात ठेवावी.

कर्तव्याची पूर्णता झाल्याखेरीज, 'साधना' मार्गाचा अवलंब करता येत नाही. जन्माला येतेवेळी आत्मा योनीमार्गातून येतो; परंतु मरणाचे वेळी त्याचे गमन 'योगी' म्हणून व्हावें. जन्माला आल्यावर, जीवाला ह्या जगात जागा असावयास पाहिजे. त्या जागेची तरतूद उपासना मार्गाने होते; व ह्या उपासनेत अन्न, वस्त्र, निवारा ह्यांची तरतूद करावी लागते. जीवन पूर्ण झाल्यावर विश्रांती मिळाली किंवा पूर्णविराम झाला असे आपण म्हणतो; ह्याचा अर्थ आपण 'जीव' म्हणून जन्माला येतो व शेवटी जाताना 'शिव' म्हणून जातो. ह्या शिवाचे गमन होते त्यावेळी जीवाचे रूपांतर 'बीजात' होते. यासाठी मनुष्याला पुढील जन्माची तरतूद करताना, योगी अवस्था म्हणजे 'बीजा' ची प्राप्ती करावी लागते.

साधनेचा मार्ग व उपासनेचा मार्ग याची ओळख श्रीगुरूंनी सांगितली. त्यामध्ये ह्या दोन साधना प्रत्येक मनुष्याला जन्माला आल्यावर प्राप्त होणे आवश्यक आहेत. कारण प्राप्त जीवनात कर्माची फेड करणे किंवा कर्तव्याची पूर्तता करणे, यांची जी आवश्यकता आहे, त्यासाठी जीवनात इहलोक व परलोक यांचा समावेश केला असता, सर्वांगाने प्राप्ती होते. पुन्हा जन्माला येणे ही अवस्था असून, पुढील जन्म येण्यासाठी इहजन्मात जे काही आपण करतो ते आपल्याला प्राप्त होण्यासाठी, सत्कर्म उपयोगी पडते. स्वर्गलोक ही अवस्था वेगळी नसून, जसे आपण आंब्याचे झाड लावल्यावर ते झाड आपल्याला फळे देते, ते म्हणजेच स्वर्गलोक आहे. ह्या जीवनात जन्मप्राप्ती झाल्यावर, साधना व उपासना ह्यात कृपाशीर्वाद व कृपा यांचा अंतर्भाव होत असतो. अशी अवस्था साधकाला प्राप्त व्हावयास पाहिजे; किंवा प्राप्त करणे आवश्यक आहे, तरच त्या व्यक्तीला 'साधक' असे म्हणता येईल. यासाठी नुसते वंशविमोचन हा विधि करण्याचे साधन प्राप्त करून चालणार नाही. जीवनात प्रत्येक क्षणी विमोचन आहे. यासाठी कठीणात कठीण व सोप्यात सोपे असे साधन आपल्यापाशी पाहिजे, तरच कार्य करता येते. कृपाशीर्वाद प्राप्त होण्यासाठी विलंब लागतो, म्हणून बरेच साधक मंत्राचा आधार घेतात; पण मंत्रात

जो उच्चार आहे तो सिद्ध करावयाचा असून, ह्या अंगानी एक साध्य होते व बाकीचे शिल्लक राहते. अशावेळी सुखाची प्राप्ती करून येणारा भक्त सुखी होत नाही. त्यासाठी समाधान ही अवस्था प्राप्त होणे आवश्यक आहे.



# २१. परलोकमार्ग

औदुंबरला ज्या परलोक मार्गाची ओळख झाली तो मार्ग किती खोल आहे हे मागाहून पटले. त्यावेळी साधारण दर पंधरा दिवसानी मी माझ्या मामांकडे जात होतो. ह्या मार्गाची नुसती ओळख होऊन चालणार नसून, ह्या मार्गाची सिद्धता की, ज्यामुळे त्याचा लाभ असंख्य लोकाना होऊ शकेल, असे साधन आपल्याला प्राप्त करावयाचे आहे, असे मनाशी निश्चित ठरविले. त्याप्रमाणे मामांच्या घरी गेल्यावर, हा विषय त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी घेतला. त्यावेळी मामांनी माझ्या विषयाबद्दल कुतूहल दाखवून म्हटले की, "असा विषय जर तुम्ही सिद्ध केलात तर भवितव्यामध्ये असंख्य लोकाना त्याचा लाभ होऊन, इहलोकात व परलोकात ज्या आत्म्यांचे वास्तव्य असते, अशाना मुक्ती व सद्‌गती प्राप्त होऊ शकेल; कारण कुटुंबातील व्यक्तीना, आत्म्याची मरणोत्तर जीवनामध्ये काय इच्छावासना आहे हे न समजल्यामुळे, त्या आत्म्याची पीडा कुटुंबाला होत असते. अशावेळी नुसती पीडा आहे, तिचे क्षालन होऊन चालणार नाही. नुसता कर्माचा होणारा त्रास निवारण करणे हे ठीक नसून, जो आत्मा आपल्या कृतकर्मामुळे पीडित झाला आहे, ती पीडा बाजूला गेली पाहिजे; व आत्म्यालाही सद्‌गती प्राप्त व्हावयास पाहिजे. यासाठी मरणोत्तर जीवन हे 'जीवन' असून, त्या जीवनात काय अंतर्भूत झाले आहे ह्याचा नुसता विचार करून चालणार नाही. जो आत्मा पिशाच्च योनीमध्ये वावरत आहे; अशाशी संपर्क साधल्याशिवाय, त्यांची इच्छा काय आहे हे अनुमानाने सांगून चालणार नाही''. हे मामांचे म्हणणे बरोबर होते. जे दृष्य मी औदुंबरला पाहिले, त्याप्रमाणे दिवंगत आत्म्याचा त्रास होऊ नये, म्हणून दानधर्म करणारे अनेक लोक असतील; ज्याना होणारा त्रास हा कशामुळे आहे हे निश्चित समजत नाही. त्या व्यक्तीना आपल्या घराण्यातील दिवंगत व्यक्तीना मुक्त करण्याचे कर्तव्य करावयाचे आहे, हे जर समजले तर निःसंकोच हा विधि तीर्थक्षेत्री करतील. पण होणारा त्रास समजत असूनही, आज काही एक करता येत नाही. ज्या परलोकवासी झालेल्या व्यक्तींच्या पीडा आपणास होतात, त्यासाठी शास्त्रात त्रिस्थळी यात्रा, दानधर्म, अन्नदान,

वस्त्रदान आदी विधि, याशिवाय नागबली, नारायण नागबली आदी विधि सांगितलेले असून, ह्या विधिमाध्यमातून अंशमात्र सुटका होते. जो आत्मा वासनावलयामध्ये बद्ध झालेला आहे, त्याची मुक्तता ह्या विधींनी होते; परंतु ते वासनावलय म्हणजे कर्म, हे शिल्लक राहून, त्याचे अस्तित्व कुटुंबाशी संबंधित राहते; व पीडा शिल्लक राहते. आत्म्याची मुक्तता ह्या विधींनी होऊ शकेल; पण आत्म्याचे जे कर्म अपायकारक म्हणून शिल्लक राहिलेले असते ते कर्म कुटुंबातील इतर व्यक्तींना भोगावे लागते; त्या कर्माचाही क्षय व्हावयास पाहिजे. ''असा थोर विचार करून; आपण आपले साधन सिद्ध करा''; असे माझ्या मामांनी सांगितले.

इतका विषय त्यांच्याकडून कळल्यानंतर, त्या विषयाची सिद्धता करण्याची जबाबदारी काय आहे ह्याचा विचार मी दिवसरात्र करू लागलो; कारण परलोकात काय आहे हे इहलोकात समजणार नसून, आपण परलोकवासी झाल्याशिवाय ते कळणार नाही. म्हणजेच ''स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही''; असे मी म्हणू लागलो. ही साधना 'लहान तोंडी मोठा घास' घेण्यापैकी प्रकार असून, तसे साधन पूर्वीच्या काळी कुणी केले होते काय? याचा विचार मी करू लागलो. विचार करता असे अनुभवास आले की, एखाददुसऱ्याने आपल्या दिवंगत व्यक्तींचा त्रास वाचविण्यासाठी वरील विधि केले असतील; पण आता हाच विधि सामुदायिक करावयाचा असून, जगतामध्ये जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपला वंश आहे. त्या वंशात चांगले व वाईट असे कर्म घडलेच असेल; तेव्हा ह्या साधनाचा लाभ सर्वांना व्हावयास पाहिजे म्हटल्यावर, साधना सिद्ध करतेवेळी, एका व्यक्तीचा समावेश ह्यामध्ये होऊन चालणार नाही; अशी दुसरी समस्या समोर उभी राहिली. त्यामुळे करीत असलेल्या साधनेमध्ये गोडी होती तेवढी न राहता, दिवसेदिवस मी हताश होऊ लागलो. एके दिवशी पहाटे तीन वाजता जाग आली. त्यावेळी साधारण पाच ते दहा आत्मे मला हाक मारीत आहेत, असा भास झाला; पण ही हाक दूरवर ऐकू येत होती. त्या दिशेने मी त्यांच्याजवळ गेलो. त्यांची ओळख व परिचय नव्हता; परंतु मरणोत्तर जीवनामध्ये त्यांची जी इच्छा होती, त्यामध्ये मी करीत असलेल्या साधनेचा हाच विषय त्यांनी सांगितला; व म्हटले की, ''त्यासाठी आमची जी



काही मदत आपल्याला लागेल ती आम्ही करू. कारण आज शेकडो वर्षे होऊन गेली. कोटयावधी आत्मे मुक्ततेसाठी व सद्‌गतीसाठी तिष्ठत आहेत. ह्याचा परिणाम इहजगतावर होत असून, त्याची जाणीव आम्हाला होत आहे; पण देह नसल्यामुळे व जन्म मिळत नाही म्हणून काही प्रयत्न करता येत नाही. यासाठी आपण जी साधना करणार आहात, त्यामध्ये आम्ही सहाय्य करू. इहजगतामध्ये जो जन्माला येणारा जीव आहे, त्या जीवाची उत्पत्ति कोशामधून होत असते. ह्या कोशामध्ये प्रमुख कोश 'अन्नमय' हा असून, ह्या कोशामुळे जन्माला येणारा जीव हा वासनेमध्ये गुंतलेला असतो; व ह्या वासनापरत्वे पुन्हा पुन्हा जन्म घेणे भाग पडते. जन्म हा जरी वासनामुळे होतो, तरी तो जन्म याचे रूपांतर, दिवंगत होण्यापूर्वी, 'वास' ह्या अवस्थेत व्हावयास पाहिजे; व ही अवस्था अन्नमय कोशापासून आनंदमय कोशापर्यंत धारण व्हावयास पाहिजे; तरच तो आत्मा सद्‌गतीपर्यंत जाऊ शकतो. अन्यथा केवळ खाणेपिणे, कपडलत्ता असे जे जीवन, ह्याचाच जर उपभोग आपण घेतला असेल, तर निश्चित मरणोत्तर जीवनानंतर ही उच्च अवस्था प्राप्त न होता, पिशाच्च म्हणून आपण मागे राहू.''

जन्माला येणारा प्रत्येक जीव याची धारणा कर्माने होत असते. अशावेळी कर्माचे रूपांतर अन्नामध्ये होत असते. ह्या सेवन केलेल्या अन्नातून वीर्य तयार होते; व ह्या वीर्यापासून मनुष्याच्या जन्माला आरंभ होत असतो. त्यावेळी योनीची धारणा होऊन, पुढे कालकालांतराने पूर्ण शरीर तयार होते. त्यामध्ये प्रथम अन्नमय कोश, ज्याची निर्मिती अन्नापासून होते; व पुढे आनंदमय कोशापर्यंत तो जीव कोश निर्माण करता होतो. हे कार्य गर्भावस्थेमध्ये होत असते. पुढे जन्माला आल्यानंतर वय वर्षे अठरापर्यंत सज्ञान होण्याची क्रिया, अन्नमय कोशापासून आनंदमय कोशापर्यंत करावयाची असते; कारण पुढे वय वर्षे अठरामध्ये जीव सज्ञान होतो. यामध्ये ज्ञानी होण्याची क्रिया अन्नमय कोशापासून सुरू झाली, तर त्याचा अर्थ ज्ञान झाले, म्हणजे 'ज्ञानी' नसून तो 'योनी' चा भोक्ता होतो. अशावेळी काया-वाचा-मनाला ज्ञान हे योनीचे होत असते, व कायेला ऐहिक सुखे भोगणे हेच कार्य, यापलीकडे ज्ञान होत नाही. पुढे ही योनी इतकी प्रखर होत असते की, केवळ

देहिक वासनेचा भोग भोगणे, यातच जीवनाचे स्वारस्य आहे; असे आबालवृद्ध समजू लागतात. बाल्यावस्थेत ज्ञानी होण्यासाठी जर आनंदमय कोशापासून विचार केला, व वय वर्षे अठरा ते एकवीसपर्यंत जर आपण अन्नमय कोशापर्यंत आलो, तर जन्मप्राप्तीमध्ये केवळ 'भोगी' न राहता, आपण 'योगी' अशी अवस्था सुलभपणाने प्राप्त करू शकतो. पण आज समाजात जीवनाचे गणित उलटे असून, जीवनारंभ हा अन्नमय कोशामुळे होण्याने, त्या कोशामुळे जन्म प्राप्त होणारा जीव, ह्याचा विकास न होता, विकार एवढा प्रबल होत असतो की, जीवन म्हणजे काय हे न समजून, 'इतरांचा जीव घेणे' म्हणजेच जीवन, असे प्रचलित समाजात अनुभवास येत असते. याचे कारण जे कर्म स्वत:ला जन्म प्राप्त होण्यासाठी लागत असते; त्याव्यतिरिक्त अन्य आत्मे किंवा त्यांचे कर्म, हेही ह्या अन्नमय कोशामुळे जन्माला येत असते. त्यावेळी हे कर्म व त्याबरोबरचा आत्मा, यांचीही धारणा शरीरात होते. जो श्वास आपण घेतो, त्या श्वासाबरोबर ह्या कर्माची किंवा आत्म्याची धारणा फुफ्फुसात होते. पुढे ते कर्म व आत्मा यांचे रक्तात रूपांतर होऊन, ते दोष किंवा इच्छावासना रक्तात सामावल्या जातात. पुढे ह्याच रक्ताने जीवनाची निर्मिती वीर्यामधून होत असते. त्यावेळी त्या वीर्यात जे दोष किंवा आत्मे असतात, त्यातील विषय जो स्वत:च्या हितासाठी नाही; त्याचा न मागता, अज्ञानाने आपण लाभ करून घेत असतो; व हे दोष ज्यांची निर्मिती वीर्याने झाली, ते वीर्य पुढे देहधारणा करते होते. देहात ज्या चौऱ्यांशी योनी (द्वारे) असतात, त्यांचा सहजधर्म जीवनात सुखशांति निर्माण करण्याचा असतो; परंतु धारण झालेल्या दोषातून देहाची निर्मिती झाली की, ह्या चौऱ्यांशी योनी मनुष्याला सुख असले, तरी त्याचा लाभ करून देत नाहीत; कारण प्राप्त सुखाचा लाभ होण्याऐवजी, ह्या योनीमध्ये जे दोष सामावलेले आहेत ते पुढे जीवनात प्रतिसाद देत असतात. तेव्हा ह्या योनीमाध्यमात असणारा दोष जोपर्यंत निघणार नाही तोपर्यंत देवाने जरी ऐरावताएवढे सुख दिले तरी तो जीव सुखाला 'साद' देणार नाही.

वरील जीवनउत्पत्तीमीमांसा आम्हा मानवांच्या कल्याणार्थ सांगितलेली आहे; पण आम्हास धर्माचरण करणे, आपल्या हिताचे नाही असे वाटते.



त्यामुळे जे आत्मे किंवा जे कर्म याचे विमोचन स्वत: करणे इष्ट आहे ते न करता; त्यासाठी गुरूंचा कृपाशीर्वाद अशा सुखप्राप्तीसाठी आपण खर्च करतो. त्यामुळे जरी कृपा झाली तरी ह्या कृपेचा वापर आपण दोषनिवारणार्थ करतो; म्हणून दिलेला कृपाशीर्वाद हा इतरांच्या कल्याणासाठी उपयोगी पडत नाही. यासाठी नुसती साधना ही देहिक माध्यमातून केली असता, त्याचे फल मिळणारे नसून, जर करीत असलेली साधना ही काया-वाचा-मनाने झाली; व ज्या पाच कोशात आत्म्याचे कार्य चालू आहे, त्याना कोश असे न संबोधता, 'पंचप्राण' असे संबोधले, तरच आपले हित आहे. हे पाच कोश बाह्य जीवनात दिसत नाहीत, पण त्यांचे कार्य अनुभवास येते; तेव्हा त्यांचा विचार करणे अगत्याचे आहे.

इहजन्मात प्रथमत: अन्नमय कोशाची निर्मिती होते. त्यावेळी अन्न म्हणजे आपण सेवन करतो ते नसून, मनुष्य जन्माला येतेवेळी व आल्यावर जे जे काही लागते, याचा समावेश 'अन्नात' होतो. अन्न, पाणी, व हवा हे यातील प्रमुख घटक असून, या सर्व घटकांचे ज्ञान मनुष्याला विज्ञानातून होते. ह्या विज्ञानातून इतके शोध लावले गेले आहेत की, जमिनीवर गाडया धावतात, पाण्यावर बोटी तरंगतात व हवेतून विमान वाहतूक चालू असते. पर्यायाने जमिनीवर ज्याचा जन्म होतो, व लयही जमिनीवर होतो, तो मनुष्य जीवन मात्र हवेमध्ये जगत असतो. ज्या पाण्याने तहान भागते ते पाणी इतराना देणे, हा उपकार न करता, इतराना 'पाणी पाजण्यासाठी' तो तत्पर असतो; म्हणून त्याला 'प्राणी' असे संबोधतात.

ह्या प्राण्याची प्रगती एवढी झाली की, अन्नमय कोशापासून ते विज्ञानमयापर्यंत. आनंदमय कोश हा जीवनाचे सार आहे; पण 'जगणे' याचे मर्म शास्त्रज्ञांना समजत नाही; असे जरी म्हणता आले नाही, तरी आज ते त्यांना नको आहे. पिंडाची निर्मिती ह्या चार कोशातून झालेली असून, ब्रह्म हे आनंदमय या एका कोशात आहे. ह्यासाठी बाल्यावस्थेत जीवनाची सुरुवात करीत असता, अन्नमयातून शरीराची वाढ व ज्ञानाची वृध्दी ही आनंदमयातून करावयाची आहे. आनंदमय

व विज्ञानमय या कोशात ज्ञानवृध्दी करावी; व अन्नमय, प्राणमय यानी जगावे कसे याचे ज्ञान मनोमय कोशात होत असते. म्हणून ज्ञानाची वृध्दी व आपली वाढ यांचे मीलन मनोमय कोशात व्हावे; म्हणजेच ज्याप्रमाणे गंगा ही स्वर्गातून आली असे म्हणतात, ती गंगा आनंदमय कोशातून व यमुना अन्नमय कोशातून येऊन, 'संगम' म्हणजे तृप्ति ही अवस्था मनोमय कोशात व्हावयास पाहिजे. जी साधना आपण करतो, त्याचा उद्देश देव भेटावा असा नसून, देवाने जो हा जन्म सोन्यासारखा दिला आहे, त्याचे मूल्य देवापेक्षा अधिक आहे. ह्या दुर्लभ जीवनाची माती व्हावयास नको; यासाठी पाच कोशांची प्रगती करून घेणे महत्त्वाचे आहे. अशी प्रगती झाल्यावर, शरीरात जागा शिल्लक राहता कामा नये. ह्या पाच कोशांनी विकसित होऊन, जी जागा व्यापली आहे, त्या जागेत 'एकतत्त्व नाम' अशा नामी तत्त्वाने वास केला की, मग पाप व पुण्य यांचा हिशोब कोण करू शकणार? ''पुण्याची गणना कोण करी?'' असे जे संतांनी सांगितले आहे, ह्याचा अर्थ अन्नातून म्हणजे पिंडातून जन्म घे; व इथून जातेवेळी ''अन्न हे पूर्णब्रह्म'' असे म्हणून जा; पण जातेवेळी इतराना जागे कर व जागा दे. याचाच अर्थ म्हणजे जीवनात मोक्षप्राप्ती होय.

'परलोक' याबद्दलचे तत्त्वज्ञान अभ्यासासाठी फार खोल आहे; व त्या ज्ञानातून प्रात्यक्षिक अनुभवास आले पाहिजे. साधनेमध्ये एक प्रश्न सुटत असतो व दुसरा प्रश्न समस्या म्हणून पुढे उभा राहत असतो. अशावेळी आपण जरी जगाला ज्ञान म्हणून हे शास्त्र सांगितले, तरी जोपर्यंत त्याची अनुभूति अनुभविता येत नाही, तोपर्यंत ते तत्त्वज्ञान बोलण्यासाठी बरे आहे; पण चालण्यासाठी फार अवघड आहे. यासाठी जे कोणी परलोकवासी झालेले आहेत, त्या आत्म्यांशी संपर्क साधावा किंवा जोडावा, असे जर साधन उपलब्ध करून घेतले, तर परलोकवासी जे आत्मे आहेत, त्यांची इच्छा काय आहे व मरणोत्तर जीवनामध्ये जीवन म्हणजे काय हे सांगता येईल. ते कल्पनेने सांगणे इतरांच्या हिताचे नसून, जगाला हे सत्य आहे; हे पटले पाहिजे. आज जगात अंधश्रद्धा ठेवणारे लोक फारच थोडे आहेत. पण सज्ञान होऊन ह्या मार्गावर विश्वास ठेवणारे बहुसंख्य लोक आपणास भेटतात. अशा लोकाना



हे जीवन किती मौल्यवान आहे हे समजले पाहिजे. कारण ह्या जीवनाची भूमिका, इहलोकात प्राप्त झालेल्या जीवनात व्यतीत करावयाची असते. पण जे जीवन प्राप्त जन्मामध्ये आपल्या वाटयाला येते, ते केवळ भोगून आपण संपवित असतो. ह्या जीवनापैकी काही जीवन पुढच्या पारलौकिक जीवनासाठी जर शिल्लक राहिलेले असेल, तर मरणोत्तर जीवनात उत्तम असे जीवन प्राप्त होत असते. ह्यासाठी कुणी 'मध्यस्थ' निर्माण करू शकलो, तर ह्या मध्यस्थामधून जे आत्मे परलोकाबद्दल ज्ञान सांगतील, त्याचा उपयोग इहजगतातील लोकाना ज्ञानी होण्यासाठी उपयोगी पडेल; असा मी विचार केला. वर्षानुवर्षे श्राद्धपक्ष इत्यादी विधि आपण करतो. ह्याचा अर्थ अनुकरण विधि असा असून, त्याचा लाभ कुणालाही होत नाही. पण ह्या कार्यासाठी मध्यस्थ तयार होणे आवश्यक असले, तरी आपल्या इच्छेने कार्य करणारा मध्यस्थ तयार होईल का? कारण 'मध्यस्थ' अवस्था हा धोका असून, कुणीही त्या वाटेला आपणहून जाणार नाही. याचे कारण असे की, आत्म्याला जे आवाहन आपण करतो, त्यामध्ये त्याचे आगमन त्याला स्वतःला करता येत नाही, तर ती जबाबदारी मध्यस्थाने स्वीकारावयाची असते. कारण जो आवाहन केलेला आत्मा आहे, त्याला पुनश्च परत पाठविणे म्हणजे 'पुनरागमनायच' करता येणे, आपल्या हिताचे आहे. आत्म्याशी केलेले हितगूज सांगण्यास व लिहीण्यास सोपे आहे; पण जेव्हा असे आत्मे वातावरणातून इहलोकाकडे येऊ लागतात, त्या त्यांच्या येण्याने इहलोकाकडे येण्याची दिशा जर समजली तर त्या दिशेने शेकडो आत्मे येऊ शकतात. मरणोत्तर जीवनानंतर जेव्हा शरीराचा त्याग करून आत्मा परलोकाकडे जात असतो, तेव्हा एक गती त्याला परलोकाकडे नेत असून, ज्या शरीराचा त्याने त्याग केला आहे, ते शरीर इहलोकामध्ये विलीन होत असते. याचा अर्थ पृथ्वीकडे 'Force of Gravity' असून, परलोकाकडे 'Etheric Force' आहे. तेव्हा जो आत्मा आवाहन होऊन आला व त्याने आपल्या प्रश्नांचे शंकानिवारण केले आहे, त्या आत्म्यास पुनश्च योग्य ठिकाणी जाणे आवश्यक असते. पण ही साधना अत्यंत अवघड अशी आहे. याचे कारण आपण करीत असलेली साधना, हिचे सामर्थ्य जर इहलोकात अनुभविता येत नाही तर ते सामर्थ्य परलोकात कसे उपयोगात येईल?

ह्याचा आपण सुज्ञपणे विचार करावयास पाहिजे. जे जग आपल्याला दिसते आहे हे पंचवीस टक्के असून, पंचाहत्तर टक्के जग परलोकात आहे. तेव्हा इहलोकात काही चमत्कार करणे सोपे आहे; परंतु परलोकात चमत्कार करणे हे हास्यास्पद असे असून, आत्म्याला आवाहन करून इहलोकाकडे बोलाविले असता, पुनश्च तो आत्मा परलोकाकडे जाईल, ह्याची शाश्वती नाही. कारण त्याला जी गती प्राप्त झाली आहे, त्यापेक्षा उच्च अवस्था प्राप्त व्हावी; अशी स्वाभाविक इच्छा, परलोकातील आत्म्याची असते; म्हणून अशा आवाहन केलेल्या आत्म्याला, मरणोत्तर जीवनामध्ये जी गती प्राप्त झाली आहे, त्यापेक्षा श्रेष्ठ अवस्थेत जावे, ही जी इच्छा असते, अशावेळी आपण जे साधन अंगीकारले आहे, त्यातील संकल्पामध्ये ह्याचा समावेश झाला असला पाहिजे. ह्या संकल्पाचा हेतु आपल्या हितार्थ नसून, ह्या पारलौकिक आत्म्यासाठी असतो. अशावेळी साधनेत दोन भाग, इहलोक व परलोक असे असून, त्यासाठी आशीर्वाद असावयास पाहिजे; नाहीतर ज्या आत्म्याला पुढची अवस्था प्राप्त होत नाही, तो न बोलावता इहलोकाकडे येऊन, इतराना त्रास देत असतो. अशा आत्म्यांचे जीवन काय व कसे आहे याचा सांगोपांग अभ्यास करण्यासाठी, प.पू. बाबांनी आज्ञा देऊन, इहलोक व परलोक ह्यासाठी एकच उपाय, म्हणजे 'निराकरण' सुचविले; व त्याप्रमाणे आज कित्येक वर्षे आपण जे कार्य करीत आलो आहोत, त्याचा लाभ बहुसंख्य लोकानी घेतलेला आहे. ही साधना अतिशय महत्त्वाची आहे. पण ते महत्त्व समजणे सर्वांना शक्य नाही; व कार्यात हा विषय जर सूचित केला तर कार्यार्थ तसे सेवक निर्माण होणे हे दुर्लभ आहे; म्हणून येणारा भक्त जो कुणी दुःखी आहे, त्याचा विश्वास ह्या मार्गावर बसावा, म्हणून आजपर्यंत हे कार्य निराकरण मार्गाने मी केले. तसेच भवितव्यात इतराना कार्याचा लाभ व्हावा, यासाठी जे सेवक कार्य करतील, अशा कार्याची योजना पूर्वीच करून ठेवली आहे; पण त्यासाठी सेवकाना माझ्यासारखी प्रखर साधना, उपासना, दीक्षा इत्यादी प्राप्त करून घ्याव्या लागणार नाहीत. जो कुणी दुःखी मनुष्य ह्या कार्याचा लाभ घेण्यासाठी येईल, त्यावेळी प.पू. बाबांच्या आशीर्वादाने त्याचे दुःख दूर व्हावे, यासाठी फक्त 'नामस्मरण' व 'निवारण' सांगण्यात येईल.



परलोकाचा अभ्यास करण्यासाठी ज्या मध्यस्थाची गरज होती; त्यासाठी माझी बहीण हिने ही 'मध्यस्थाची' जबाबदारी स्वीकारावी; व तिच्या माध्यमद्वारा मी कार्य करावे, असे ठरले. त्याप्रमाणे आज्ञेनुसार मी तिला औदुंबरक्षेत्री बोलाविले; व तिला ह्या साधनेची ओळख करून दिली. त्यावेळी तिला काहीही कल्पना नव्हती. इहलोक व परलोक म्हणजे काय हे सुद्धा तिला माहीत नव्हते; तसेच मलाही 'परकाया प्रवेश' म्हणजे काय अवस्था आहे हे माहीत नव्हते. माझी बहीण औदुंबरला आली, तेव्हा दुपारची महापूजा होऊन, आरतीस सुरुवात झाली होती. त्यावेळी ती शांत उभी होती. आरती होऊन मंत्रपुष्पांजलीच्यावेळी ती ओरडू लागली. काही लोक 'भूत आले आहे'; असे म्हणत पळू लागले. शेवटी हळूहळू देवापुढे गर्दी कमी झाली; व तीही शांत उभी राहिली. नंतर माझ्याकडे टक लावून पहात म्हणू लागली, ''भूताच्या वाटेला जाऊ नकोस. कधीकाळी ते 'कानफाटे' यांनी आम्हाला ओळखले होते. त्यावेळी त्यांचे सामर्थ्य एवढे होते की, कुठलाही आत्मा जर भूतयोनीमध्ये असेल तर त्याला ते मुक्त करीत असत; पण त्यानंतर तसा कुणीही साधक जन्माला आला नाही. तेव्हा आम्हाला मुक्ती केव्हा मिळेल हे सांगता येत नाही, अशी परिस्थिती होती. पण आज तो सुदिन आला आहे. पुन्हा आम्हा लोकाना मुक्त करणारा जन्माला आला आहे.'' जो संचार बहिणीमध्ये झाला होता, त्या आत्म्यास त्याचे नाव काय? गाव कुठले? ही माहिती मी विचारली. तेव्हा तो म्हणू लागला, ''तुम्ही बंगल्यावर चला. मी सगळे सांगतो. भाऊंना (म्हणजे माझ्या मामांना) मी ओळखतो.'' मग हा संचार निघून गेला. त्यावेळी माझ्या बहिणीला मी काय घडले ते विचारले. तिनेही जे पाहिले त्याचे वर्णन केले. मी जसे तिष्ठत असणारे आत्मे पाहिले होते, तसेच परलोकाचे वर्णन तिने केले. ''त्यावेळी तुला भय वाटले का?'' असे मी विचारताच ती म्हणाली, ''मी आरती ऐकत होते. हळूहळू आरतीचे शब्द ऐकू येण्याचे बंद झाले; व मी डोळे बंद करून वर वर चालले आहे, असा भास झाला. शेवटी जसे आपले जग आहे तसेच जग दिसू लागले.'' ''त्या जगात काय आहे?'' असा प्रश्न मी तिला विचारला.

"ह्या जगतात जो आपल्याला प्रकाश दिसतो, त्यामुळे वस्तुपदार्थाचे ज्ञान होते. ह्या प्रकाशामुळे आपली सृष्टि निर्माण झालेली आहे. परलोकात सात रंग असून, ते रंग इंद्रधनुष्याप्रमाणे आपल्याला भासतात. ह्याचा अर्थ जे सप्तलोक म्हणून आपण म्हणतो, त्यांची ओळख ह्या सप्तरंगामुळे कळते. प्रत्येक लोकामध्ये वेगवेगळ्या प्रकारचा रंग आहे. त्यामुळे आत्म्याला आपले स्थान कोणत्या रंगात आहे हे समजते. परलोकातील आत्मे इहलोकात येऊन, त्यांच्याशी विचारविनिमय झाल्यानंतर, ते आपापल्या ठिकाणी परत न जाता, प्राप्त झालेला जो रंग म्हणजे आत्म्याचे स्थान, त्यापलीकडे अधिक उच्च स्थान ते प्राप्त करून घेत असतात. म्हणजेच त्यांचा संबंध इहलोकाशी आल्यानंतर त्यांची अवस्था आपल्या कृपाशीर्वादाने बदलते;" असे तिने सांगितले.

इहलोकात जे जीव जन्माला येतात, त्याना वासनेमुळे स्वतःची उत्क्रांती करता न आल्यामुळे, तोच जीव पुन्हा पुन्हा जन्म घेतो; व ही जन्माला येण्याची सवय लागल्यावर, वरच्या लोकात काय आहे याचा विचार न करता, जन्माला येणेच महत्त्वाचे आहे; असे हे आत्मे समजू लागतात. म्हणून अशा जीवाना 'Earthbound spirits', असे म्हणतात. पण इहजगतात ध्येयवादी जीवन जगल्यावर, त्या कर्मानुसार त्या लोकाची प्राप्ती जीवास होते. ह्या सप्तवलयात जे काही रंग असतात, ते सामान्य माणसाला कळत नसल्याने, स्वर्गात पोकळी आहे, असे त्याला वाटते. पाऊस पडल्यानंतर उन्हामध्ये जे इंद्रधनुष्य दिसते, त्यातील सप्तरंगाप्रमाणे हे सप्तलोकांचे रंग असून, शास्त्राने त्यांचे नामाभिधान ॐ भूः,ॐ भुवः, ॐ स्वः, ॐ महः, ॐ जनः, ॐ तपः, ॐ सत्यम् असे केले आहे.

पहिल्या तीन अवस्थेतील जे आत्मे असतात, त्या आत्म्याना, ह्या तीन लोकात आपली उत्क्रांती प्रथमतः करून घ्यावी लागते; व ही उत्क्रांती इहलोकात धारण करावी लागते. जरी जीव हा कर्मपरत्वे जन्माला आला, तरी जन्माला येऊन कर्म भोगणे; असाच केवळ जन्माचा अर्थ नसून, कर्मपरत्वे जगत असता जर 'धर्माचरण' केले तर जरी तो जीव कर्मागाने जन्माला आला असला तरी धर्माचरणाने त्याची उत्क्रांती होऊन, त्याच्या अवस्थेत स्थित्यंतर होत असते. म्हणजे जीव, जीवात्मा व आत्मा



ही उत्क्रांत अवस्था इहलोकातच प्राप्त करावयाची असते; व तशी उत्क्रांती इहजन्मात झाली; म्हणजे जन्माला आलेला 'जीव', 'आत्मा' ह्या अवस्थेला पोचला, तर मरणोत्तर जीवनामध्ये परलोकामध्ये ॐ भूः, ॐ भुवः, ॐ स्वः ह्यांचा लाभ होत असतो. पहिल्या अवस्थेत म्हणजे 'ॐ भूः' लोकात त्या आत्म्याला प्रवेश मिळाला की, वर्षश्राद्ध झाल्यानंतर त्या आत्म्याचा प्रवेश दुसऱ्या लोकात होतो; व दुसरा व तिसरा लोक यामध्ये त्याचे अस्तित्व बारा वर्षेपर्यंत असते. पुढे चौथ्या अवस्थेत 'स्थित्यंतर' अवस्था असते. पृथ्वी व परलोक यामध्ये जी पोकळी आहे तिला 'Earthbound sphere' असे म्हणतात; व तिसऱ्या व चौथ्या अवस्थेमधील पोकळीला 'Horizon of spirit' असे म्हणतात.

असा हा परलोकातील प्रवास सुखकर होण्यासाठी, आपले इहजगतातील जन्माला येण्याचे कारण, याचे ज्ञान होणे आवश्यक असते. मग ज्या कर्तव्यार्थ जन्म घेतला आहे त्या कर्तव्याची पूर्तता करून, आत्मा परलोकी जात असतो. ही स्थिती सामान्य माणसाची नसून, योग्य संस्काराने अशा जीवनात 'पिंड', म्हणजे त्या जीवाची धारणा होते; व हे संस्कार मरणोत्तर जीवनामध्ये पुढच्या अवस्थेची प्रगती प्राप्त करून देतात. चौथा व पाचवा लोक म्हणजे ॐ महः, ॐ जनः याला स्वर्ग किंवा देवलोकांची अवस्था असे म्हणतात. याचा अर्थ जे देव आपल्या पूजनात आपण मानतो, त्यांचे अस्तित्व देवलोकात नसून, आत्म्यांचे बोलणेचालणे देवाप्रमाणे इहजगतात होत असते; व त्यांची इच्छा ही वासनारूपी नसून, इहजगतातील जीवन कर्तव्यार्थ व्यतीत करतेवेळी, जो विषय अपुरा राहिला आहे, त्याची पूर्तता करण्यासाठी हे आत्मे जन्माला येत असतात; व त्यामुळे सृष्टीवर देवाणघेवाण सुरू होते. पण गेल्या शंभर वर्षात ह्या आत्म्यांचे जगतात अस्तित्व असूनही व त्याना जन्म घेण्याची इच्छा असूनही, योग्य असे आचार, विचार व उच्चार हे आमच्यांमध्ये आज नसल्याने, हे आत्मे जन्म घेऊ शकत नाहीत. त्यामुळे 'Earthbound Spirits' यांच्यामध्ये स्थित्यंतर न होता, आत्म्याच्या वासना शिल्लक राहून, त्याना मुक्ती मिळत नसून, ह्या वासना 'बाधा' ह्या रूपाने आपल्या सभोवार हिंडत असतात. ही बाधा वासना पुरी करण्याची पराकाष्ठा करीत असते; व ह्या वासनेतून आपली वासना पुरी करण्याची पराकाष्ठा करीत असते; व ह्या वासनेतून

मुक्त व्हावे, अशी धारणा ह्या जीवांची असते. ह्याचे ज्ञान इहजगतातील लोकाना नाही. दैनंदिन जीवनात ह्या वासना ज्या वाढत आहेत, त्याचा शोध घ्यावयास पाहिजे. कारण आज प्रत्येकजण जन्माला आल्यानंतर, 'खा-खा' करू लागला आहे. इतके खाऊनही जीवाला समाधान नाही. याचा अर्थ आपण खात नसून, जे जीव वासनेमुळे आपल्या वाटयाला आले आहेत, त्यांची खाण्याची वासना आज इतकी तीव्र आहे की, हे जग जरी खाल्ले तरी तृप्तीचा ढेकर येणार नाही. ह्यासाठी सोपा उपाय म्हणजे देवधर्म जरूरीपुरता करावा. त्याचा अतिरेक होऊन, 'नको तो धर्म'; असे वाटता कामा नये.

पुढे भिलवडीत असताना, कै. आप्पा शेणोलीकर यांची 'मृतात्मा' म्हणून संचार अवस्थेत गाठ पडली. त्यावेळी त्यांचे म्हणणे असे होते, "मरणोत्तर जीवनामध्ये आत्म्याला जी अवस्था प्राप्त होते, तेथून सद्‌गती प्राप्त होणे हे सोपे नाही. जेव्हा मनुष्य इहजगतात मरतो, तेव्हा त्याचे श्राद्ध कुटुंबीय करीत असतात; परंतु ते श्राद्ध एकाचे नसून, त्यावेळी तीन आत्म्याना बोलावले जाते. म्हणजे पितृत्रयी ही श्राद्धाला उपस्थित पाहिजे; व असे श्राद्ध केले असता, जी पितृत्रयीच्या आधीची, मागील चौथी पिढी आहे, ती मुक्त होते. हा क्रम वेदशास्त्राने विधीमध्ये लिहीला आहे; व त्याप्रमाणे बहुतांशी लोक ह्या विधीचा अवलंब करतात. पण ह्या विधीमुळे किती आत्मे मुक्त झाले आहेत? हा प्रश्न आहे. यासाठी काही मार्ग गुरूंना विचारा; कारण जो श्राद्धविधि धर्मशास्त्राप्रमाणे तीर्थयात्रा, दानधर्म आदीनी केला जातो, हे केवळ अंधश्रद्धेच्या पोटी केले जाते; परंतु आवश्यक ते कार्य ह्या विधीमधून आज होत नाही."

त्याप्रमाणे प.पू. बाबांची आज्ञा अशी झाली, "जे कुणी दुःखी मार्गदर्शनार्थ आपल्याकडे येतील, त्यांचा उपयोग करून घे. त्यायोगे जे त्या घराण्यातील आत्मे मुक्त झालेले नाहीत, त्यांचा संबंध पुढील पिढयांच्या जीवनाशी ऋणानुबंधपरत्वे काय आहे हे आपल्याला कळले पाहिजे. यासाठी 'वंशविमोचन' हा विधि संकल्पाने सिद्ध करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे हा संकल्प तयार होऊन, सर्व भक्ताना द्यावयाची वेळ मी तुला सांगेन. पण तत्पूर्वी याचा लाभ तुझ्या मातृ व पितृ घराण्यातील



जे कुणी दिवंगत झाले आहेत, त्याना होतो की नाही हे पडताळून अनुभव घे; म्हणजे मग तो संकल्प इतराना देता येईल." त्याप्रमाणे माझ्या घराण्यात व आईच्या घराण्यात काय घडले आहे ह्याचा विचार केला. नुसते हे आत्मे मुक्त झाले; असे म्हणून विश्वास ठेवणे योग्य नाही. कारण दोन्ही घराण्यांची परिस्थिती अत्यंत बिकट होती. कर्मामध्ये तरतूद होती, पण घराण्यात दोष होते; त्यामुळे घराण्याचा उत्कर्ष झाला नाही. पण नंतर वंशविमोचनामुळे ह्या घराण्यात जेव्हा सुख, शांती ह्यांचा लाभ होऊ लागला, तेव्हा आपली साधना सिद्ध झाली; हे सिद्ध झाले.

पुढे गुरुआज्ञेप्रमाणे सेवा चालू होती. ही सेवा इतराना लाभदायक झाली असली, तरी ह्या सेवेमुळे त्यांची ऐहिक प्रगती जशी होते, तशीच पारमार्थिक प्रगतीसुद्धा व्हावी, हा अनुभवही यावयास पाहिजे होता. पण येणारे भक्तभाविक यांची विचारणा, जीवनातील प्रश्नाला उद्देशून चालू होती. मूळ विषय हा सुखाचा होता. त्याप्रमाणे बहुतांशी लोक "सुखाची प्राप्ती केव्हा होईल?" हे विचारीत असत. त्यावेळीसुद्धा येणारे जे भक्तभाविक होते, त्याना पारमार्थिक लाभ होण्यासाठी किंवा ओळख होण्यासाठी मार्गदर्शन केले गेले. पण मार्गदर्शन घेणाऱ्या भक्तभाविकांचे लक्ष, आपले जीवन कसे समृद्ध होईल याकडे असल्याने, मार्गदर्शन होऊनही त्याचा लाभ त्याना अनुभवाला आला नाही. त्यावेळी येणारे लोक व त्यांचे प्रश्न ह्यांची विचारणा काय होती व आपण भवितव्यात काय करणार आहोत ह्याचा मूळ विषयाशी मेळ जमेना. यामुळे हताश होऊन असे वाटू लागले की, इतराना ज्ञानी करण्यापेक्षा, ह्या मार्गाच्या वाटेला जाऊ नये. शेवटी एके दिवशी प.पू. बाबांनी असे सांगितले की, "जगामध्ये देव नसून दगड आहेत; असे जर तू मानलेस तर पूजा करण्यासाठी भक्तभाविक शिल्लक राहिला पाहिजे. ह्यासाठी आपले प्रयत्न हे ईश्वर प्राप्त करण्यासाठी नसून, लोकानी ईश्वरासारखे वागावे, ह्यासाठी केले पाहिजेत. हा विचार करून पुढे चल. पुढे कालकालांतराने हेच भक्त जेव्हा परमार्थाचा विचार करतील, तेव्हा त्याची किंमत आजच्यापेक्षा शतपटीने अधिक असेल. अशावेळी त्याना परमार्थाची भूक लागली आहे, हे तुझ्या अनुभवाला येईल; व त्यावेळीच त्याना हा मार्ग सूचित करणे योग्य आहे. अन्यथा ज्याना भूक लागलेली नाही

अशाना हा मार्ग शिकवूनही व्यर्थ जाणार आहे; कारण हा मार्ग पंचाहत्तर टक्के गुरुकृपेचा ठेवा असतो व ऐहिक पंचवीस टक्के; मिळून साधकाला शंभर टक्के सेवा करावयाची असते. पण येणारे भक्त सुखासाठीच येतात. म्हणून पंचवीस टक्के कृपेला पात्र होतात; व पंचाहत्तर टक्के कृपा ही शिल्लक राहते. कारण ही कृपा केवळ अनुकरण म्हणून प्राप्त होणारी नसून, त्यासाठी नित्य साधना ही जीवनात जोडली पाहिजे. ह्या साधनेत जी शिकवण दिली जात असते, त्याप्रमाणे आपले आचरण जर झाले तर ही कृपा पंचाहत्तर टक्के प्राप्त होते. अन्यथा गुरू भेटूनही न भेटल्यासारखे जीवन व्यतीत होत असते.

जीवनात अनेक विषय येतात व जातात. येणारे विषय किती व जाणारे विषय किती याचा जन्माला येऊन विसर पडतो. त्यामुळे कोणत्या विषयात काया, वाचा, मन यांची त्रिपुटी झाली आहे, ह्याची ओळख व्हावयास पाहिजे. अन्य विषय जे येणारे व जाणारे आहेत, त्या विषयांचे संस्कार झाले, तर ते पुढील जन्मात उपयोगी पडतील. अन्यथा 'नळी फुंकिली सोनारे', अशी आपली अवस्था होत असते. यासाठी मोजकेच विषय अभ्यासासाठी घेऊन, प्रथमत: काया-वाचा-मन हे एक होत आहे किंवा नाही, हे पडताळून पाहिले पाहिजे; कारण जेव्हा जीवनात 'ईश्वर' हा विषय प्राप्त करावयाचा असतो, त्यावेळी जीवनात मूळ काया, वाचा, मन ह्यांची त्रिपुटी जर झाली, तर 'ईश्वर' हा काय विषय आहे हे समजेल. ईश्वर म्हणजे काय? काया, वाचा, मनाची त्रिपुटी होऊन जेव्हा मनुष्य जगू लागतो, तेव्हा त्याच्या जगण्यात, वागण्यात किंवा बोलण्यात जी क्रिया आपण पाहतो त्या क्रियेस ईश्वर असे म्हणतात! यासाठी प्रथमत: जे भक्त तुझ्याकडे येतील, त्याना ऐहिकाची गोडी लागली पाहिजे. कारण 'ऐहिक' जरी विषय म्हटला तरी तो विषय ईश्वरापेक्षा मोठा आहे. यासाठी जे जे कोणी भक्त आपले दु:ख घेऊन येतील, तेव्हा त्या दु:खाचा विचार ईश्वराचा म्हणून कर; तेव्हाच या विषयातून प्रेम द्रवेल; व मग तो भक्त आपोआप ऐहिक न मागता, पारमार्थिक विषयाकडे वळेल. ह्यासाठी येणाऱ्या भक्ताना साधन हे सोप्यात सोपे असावयास पाहिजे. मग हळूहळू भक्तात जो बदल होत असतो, त्याचा अर्थ 'परम-अर्थ'! एवढा जरी जन्माला येऊन समजला तरी त्या भक्ताचे सार्थक होईल.''



# २२. औदुंबर सेवेची सांगता - 'स्वगृही' गमन

मी औदुंबरला आलो त्यादिवशी श्रावण प्रतिपदा होती; व पंचमीच्या दिवशी श्रीशेषाचे दर्शन पहाटे झाले. नेहमी घरची सवय होती त्यामुळे सकाळी उठण्यास उशीर झाला. स्नान, पूजा केली व प्रार्थना म्हणत असताना, मनाची द्विधा बाजू झाली. एक घर आठवू लागले; व त्यानंतर जी 'साधना' तिचा पत्ता नव्हता. साधना म्हणजे काय? केल्यावर काय प्राप्त होते? हे अज्ञात होते. त्यामुळे स्वाभाविक मनाचा कल घराकडे होता. आईवडील, भाऊबहिणी घरी होते. त्यांची आठवण होऊन, ह्या जगात आपल्याला सर्वकाही आहे व नाही; असे मन सांगू लागले. दु:ख म्हणावे तर दु:ख नाही; व सुख म्हणावे तर ते कशात आहे हे सांगता येत नव्हते.

पहिल्या दिवशी अशी जाणीव किंवा आज्ञा झाली असे आपण म्हणूया की, ''साधकाला जग उठल्यावर उठणे हे योग्य नाही. जग अंध:कारात आहे, त्याला जर जागे करावयाचे आहे तर झोपून कसे चालेल? यासाठी प्रथमत: वेळेवर उठण्यास शिक!'' त्याप्रमाणे पहाटे तीन वाजता उठू लागलो; कारण स्नानसंध्या, नामस्मरण आदी ब्रह्मकर्म हे ब्रह्ममुहूर्तावर व्हावयास पाहिजे. अशा क्रमाने चालत असता; दिवस, महिने, वर्ष संपले. ह्याप्रमाणे साधना चालू होती. आता ह्या जीवनाला आकार आल्यामुळे, जीवन व्यर्थ खर्च होणे, याची किंमत किती आहे हे कळू लागले. ह्या कार्यक्रमास 'दिनचर्या' असे म्हणतात. रोज नव्याने जगणे, बोलणे, व वागणे ह्यास दिनचर्या म्हणता येणार नाही. त्यामुळे जीवनाचा विषय किती? व काय साध्य करावयाचे आहे? याचा आराखडा मनाशी तयार केला; कारण 'साधना' केव्हा होईल? व त्याचा लाभ जगताला कसा होईल? ह्याचे गणित समजेना. शेवटी एक दिवस पहाटे उठल्यावर, महाराजांचे दर्शन घेतले व आसनावर येऊन बसलो; आणि डोळे बंद करून पाहू लागलो. पहाटेचा प्रकाश व क्षितीज दिसू लागले. आसमंतात जग नसून, सर्वत्र प्रकाश व सात रंगांच्या छटा वेगवेगळ्या दिसत असून, दिसत असलेला रंग केशरी व पुढे क्षितीजापर्यंत तांबूस, असा होता. हे पहात असताना कानाशी शब्द आले, ''अरे मुला, हा

रंग ब्रह्मांडाचा आहे. पुढे कालकालांतराने हा रंगीबेरंगी होऊन, त्या रंगातून पिंड निर्माण झालेले आहेत. हा जो रंग तुला दिसत आहे, त्याच्यात जेव्हा बदल होईल, तेव्हा हे गणित सुटेल. अन्यथा हे गणित नसून अगणित आहे. तेव्हा शोध घेऊन वेळ खर्च करू नकोस. तुला ह्या ठिकाणी जे बोलाविले आहे ते सेवेसाठी. सकाळी सूर्योदयापासून दुसऱ्या दिवशी जो आपण एक दिवस म्हणतो, त्याला अज्ञानी लोक 'दिवस' असे म्हणतात; पण साधक लोक ह्याला एक 'वर्ष' असे मानतात.''

हळूहळू साधना पूर्ण होण्याचे दिवस आले; असा भास होऊ लागला. महाराजांचे देऊळ आहे त्याठिकाणी मोठा औदुंबराचा वृक्ष आहे. एके दिवशी त्याच्या मुळाशी गणपती आहे, हे मी प्रत्यक्ष देवळात पाहिले; व आजही तो आहे. पण त्याशिवाय 'शुभशकुन' असे लोक म्हणतात, त्याप्रमाणे मला तीन औदुंबराची फुले दृष्टीस पडली. ती पाहून धन्य झालो असे वाटू लागले; कारण आपण जी सेवा करीत आहोत त्या सेवेचा प्रतिसाद महाराजांनी दिला, असे मी मानू लागलो; व त्या आठवडयात माझ्या मामांचा निरोप आला की, ''मला येऊन भेटून जा''. त्यांची श्रद्धा 'गीते' वर होती. ते स्वतः म्हणत असत; व घरातील सर्वांना शिकवीत असत. त्यांच्या निरोपाप्रमाणे मी त्यांच्या घरी गेलो; व दुपारी जेवण झाल्यावर मी व ते त्यांच्या मळयात गेलो; व जेथे ते नेहमी बसत असत, त्या विहिरीजवळ आम्ही दोघे बसलो. त्यावेळी त्यानी असा उच्चार केला की, ''।। यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।।''

त्यांची अशी वाणी मी प्रथमतःच ऐकली. कारण ते जवळजवळ पन्नास वर्षे गीता म्हणत होते. पण ह्यावेळी त्यांचा उच्चार ऐकून, माझी मति गुंग झाली. अर्धा तासपर्यंत ते व मी स्तब्ध बसलो. शेवटी ते उठून मला म्हणाले, ''दादा, आपली इच्छा असते वेगळी; व ईश्वराची असते वेगळी. आत्ता मी जे काही म्हणालो, त्याची मुळा आठवणही नव्हती. तुम्हाला सांगावयाचे वेगळे होते, पण झाले दुसरेच. मला जे स्वप्न गेल्या आठवडयात पडले ते तुम्हाला सांगावयाचे होते. ते असे की, पहाटे माझ्या स्वप्नात श्रीकृष्ण आले व म्हणाले, ''ईश्वराचे कार्य



आहे. त्या कार्यास कुणीतरी मध्यस्थ लागतो. हा मध्यस्थ म्हणजे ईश्वर नसून, तो ईश्वराचा संदेश घेऊन येतो. ह्यावर पूर्ण श्रद्धा ठेवली तरच ह्या जगाचा उद्धार होईल. जर 'संदेह' मनात निर्माण झाला तर जग बुडाले''; व मी जागा झालो. गेले चार दिवस, हा संदेश माझ्या कानाशी सारखा गुणगुणतो आहे; म्हणून तुम्हाला बोलावणे पाठविले''. मग मी त्याना गेल्या आठवडाभर माझी अवस्था काय झाली होती ते सांगितले. म्हणजे दोघानाही ईश्वराचा आदेश झाला, ही गोष्ट सत्य आहे.

त्याप्रमाणे मी औदुंबरास आलो; व एक आठवडाभर दुपारी ह्या जगाचा विचार करीत होतो. 'जग किती मोठे आहे? व ह्या जगाला आपण काय देणार?' असा प्रश्न उभा राहिला. जग हे विसाव्या शतकात असून, पुढे पुढे चालले आहे; त्यामुळे ह्या जगाचा देवावर, धर्मावर विश्वास कमी होत चालला आहे. त्याला परत कसे जागे करू शकू? हा प्रश्न उभा राहिला. निर्णय लागेना. विचारांची मालिका संपेना. शेवटी ह्या विचारांचा बळी घेतल्याशिवाय हे विचार थांबणार नाहीत; असे ठरवून, समोर कृष्णा नदीचा डोह होता त्यामध्ये तीन बुडया मारल्या; व काठावर येऊन उभा राहिलो. त्यावेळी पूर्वेकडे सूर्य उगवतो आहे असे दृष्टीस दिसले. मन म्हणू लागले, ''पश्चिमेला आता काळोख सुरू झाला आहे; त्याप्रमाणे भवितव्यात घडणार आहे, हे सत्य आहे. घाई करू नकोस. आपले कर्तव्य आपण करावे. त्याचे फल देव देणार आहे!'' त्यादिवसापासून विचार करणे हे सोडून दिले. कारण ''नुसता विचार करून क्रिया ही शून्य होण्यापेक्षा, विचाराची शून्य अवस्था प्राप्त करून घे. मग क्रिया ही किती गतिमान आहे हे समजेल. ह्या गतीवर जग चालले आहे. जग हे गतिमान आहे; पण ह्या जगाला 'मध्य' म्हणजे काय? व 'लय' म्हणजे काय? हे शेवटी कळेल. हे जग गतिमान आहे, त्याला हळूहळू कमी करावे लागते; व शेवटी लय व्हावा लागतो. म्हणजे गतीचे पूर्णत्व होते. ह्या गणिताने तुला जावयाचे आहे. ती शिकवण प.पू. बाबा देतील, त्याप्रमाणे वाग. माघ महिन्यात पंचमी आल्यावर, तू स्वगृही जा! तत्पूर्वी जी अमावास्या आहे, त्यादिवशी तुला ३५ वर्षे पूर्ण होत आहेत''; अशी आज्ञा झाली.

ती आज्ञा ऐकून विचार करू लागलो की, 'स्वगृही' म्हणजे काय? कारण औदुंबरला येण्यापूर्वी माझा संसार मी मोडला होता. बायको एकीकडे, मुलगा दुसरीकडे व मी तिसरीकडे; फकीराला तरी झोपण्यासाठी मशिद असते; पण मला हेही स्थान नव्हते. अशावेळी 'स्वगृही' हा शब्द कुणाला उद्देशून आहे? जन्माला आलो तेव्हा आपला संसार जोडला; पण ज्यावेळी साधना पूर्ण झाली त्यावेळी जगाचा संसार करावयाचा आहे, याचा बोध झाला. निरोप घेण्यापूर्वी "॥ जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले। तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा ॥" अशी वेदवाणी झाली; व बोध झाला की, "त्याचा अर्थ व्यावहारिक नाही. त्या वाक्यात सर्व जगाचे तत्त्वज्ञान आहे. 'जे का रंजले गांजले' म्हणजे इहलोक, 'देव तेथेचि जाणावा' म्हणजे परलोक, 'तोचि साधु ओळखावा' म्हणजे स्वर्गलोक. ह्याचा संबंध तिन्ही लोकात आहे. यासाठी इहलोकी ज्या व्यक्ति जिवंत आहेत, त्याना 'भूत' असे समज; कारण भूताची इच्छाशमन व शांति कधीच होत नाही; कारण त्याला आकार नाही. जसे जग बदलते तसा हे आपला आकार बदलतात. पुढे कार्यामध्ये ही भूते पळवून लावतील. जरी ह्या भूताना सोन्याचा डोंगर दिला तरी 'गुरूंनी काय दिले?' ह्या प्रश्नाची विचारणा हे लोक करतील. पण परलोकात जे कार्य आहे, ते कार्य शंभर टक्के होणार; कारण तेथील आत्मे पुढे जन्माला येतात. ह्या आत्म्याना काया, वाचा नाही. जसा आपण आकार देऊ तसा ते घेत असतात. वाणी नसल्यामुळे गायत्रीमंत्र किंवा 'श्रीराम जयराम जयजय राम', इतका मोठा मंत्र त्याना उच्चारता येत नाही; म्हणून एक अक्षर म्हणजे 'ॐ' हे त्याना म्हणता येईल; व त्याना ॐ कार शिकविल्यावर, तो ते म्हणतील. यासाठी ज्याना इहलोकी जन्म प्राप्त झाला आहे, ते काया, वाचा, मन यानी युक्त असे त्रिगुणी मानव आहेत. त्यानी मरेपर्यंत ॐ कार साधना केली पाहिजे. त्यामुळे पुनश्च जन्म घेतेवेळी, 'ॐ' हाच शब्द पुढे येतो; व जन्मत:च 'अहं-आकार' अशी अवस्था प्राप्त होत असते. मनाची धारणा ही इहजन्मातील संस्कारावर अवलंबून आहे. काया व वाचा यांच्यावर संस्कार झाले की, मनाची धारणा होत असते. एवढे महान कार्य तुला भवितव्यात करावयाचे असून, त्या कार्याची योजना ईश्वराने



आखली आहे. जरी जग पुढे गेले तरी ह्या जगाला ईश्वरापुढे नमावे लागेल. अजून पुढे 'जग' आहे. येथे आल्यावर नदीच्या पलीकडे जे मंदिर आहे ते तू पाहिलेस; ती जगत्जननी म्हणजे 'ज'; व 'ग' म्हणजे गणपती. त्याच्या वाटेस जाऊ नकोस. पुढे तो स्वत: होऊन तुला बोलावेल. तोपर्यंत ॐकार म्हणत रहा. हाच प्रसाद तुला तुझ्या वाढदिवसाला दिला आहे. हा दिवस अक्षय्य असून, आपण जगात साजरा करू."

पुढे पंचमीस सकाळी स्नानादी विधि करून, महाराजांसमोर बसून राहिलो. ह्या अडीच वर्षात काय घडले? याचा विचार करू लागलो. ह्या 'नंदनवना'मध्ये आपण तुळशी वेचल्या; व जग तुळशीचे नाव शेवटी घेते. एवढा जगात व आपल्यात फरक आहे. नित्य पूजनात तुळशीपत्र असल्याशिवाय, पूजा हा विधि होत नाही; व जग तुळशीपत्रावरसुद्धा वासना, इच्छा सोडीत नाही. ईश्वराने आम्हा मानवाना जन्म दिला व ज्ञानी केले; पण 'न' ची बाराखडी आपण विसरलो, म्हणून हा पुन्हा जन्म. नाहीतर एकाच जन्मात सोक्ष व मोक्ष आहे; पण मोक्ष आपल्याला विष आहे; व सोक्ष हा विषय आवडीचा आहे. त्याच्या मागे लागून शेवटी आपण फसतो.

त्यादिवशी वसंतपंचमीचा सण हा दिवस भाग्याचा होता. त्या दिवसात सर्वत्र निसर्गाला फुले व मग फळे असा बहर येतो. संगीतातसुद्धा 'वसंत' हा राग आहे. तो अत्यंत मधुर आहे; व तो राग आळवून, जेव्हा गायक 'बहार' गातात तेव्हा सृष्टीची पाऊले असे सूचित करीत असतात की, पुढील काळ हा सुखाचा आहे. त्यादिवशी माधुकरी न मागता, उपाध्यायांचे घरी महाप्रसादाचे जेवण जेवलो. ते जेवण व नेहमी माधुकरी आणून जे जेवण जेवत होतो, त्यात फरक काय हा समजला. माधुकरीचे जेवण हाच 'महाप्रसाद' होता. कारण त्यात 'वास' होता; व शेवटी जेवलो, त्यात 'वासना' होती.

वेळ फारच थोडा होता. त्यावेळी गाईपासून वासरू विभक्त करतात, तशी माझी स्थिती झाली. जन्म देणारी आई व सांभाळून नेणारी आई, ह्यातला फरक न समजता लोक म्हणतात, 'माझी माऊली'. पण जर 'पावली असेल' तर हा शब्द तोंडावाटे बाहेर पडतो, अन्यथा नाही. जन्म देणारी आई हे आपले जन्माचे ओझे नऊ महिने सांभाळते. पण

जी 'आई' आयुष्यभर सांभाळते, ते आपल्याला समजत नाही; कारण तो तिचा धर्म असतो. थंडी, पाऊस, ऊन हे निसर्गात बदल होत असतात; व त्यापरत्वे जगात शेकडो लोक आजारी पडतात व हैराण होतात. पण माझ्या माऊलीने गेल्या अडीच वर्षात माझा सांभाळ असा केला की, कोणतीही जगतील आई असे सांभाळू शकणार नाही. ह्या काळात सर्दी, ताप, पडसे ह्यापैकी एकालाही माझ्या बाजूला येऊ दिले नाही. का? तर माझी साधना चालू होती. अशा माऊलीचे उपकार कसे फेडू? हे आठवून रडू लागलो. शेवटी निरोप घ्यावयाची वेळ आली तेव्हा देवापुढे काय ठेवावे? लोक निमित्ताने दर्शनासाठी येतात व देवापुढे पै-पैसा ठेवतात; पण माझ्याकडे पैसे नव्हते. मग काय ठेवावे? शेवटी आठवले; एक दिवस वडील मला काय म्हणाले होते ते! लहानपणी मला जेवताना अतिप्रिय साखर होती. त्यावेळी त्यांनी सांगितले की, "नुसते गोड खाऊन मनुष्य गोड होत नाही. हलवाई दिवसभर मिठाई विकतो. त्याचे हात कधी गोड झाले आहेत का? याचा विचार कर व गोडाला विसरून जा. तरच आचार व विचार यात गोडी येईल!" हे शब्द आठवले. कारण येथून जाताना काय न्यावयाचे आहे? व येथे काय सोडावयाचे? पुढे जगाला आपली गरज आहे. त्यासाठी आचारात व विचारात अशी गोडी निर्माण व्हावयास पाहिजे की, आपल्याला जो कोणी भेटेल, त्याला क्षणभर तरी त्याच्या दुःखाचा विसर आपल्याला पाडता आला पाहिजे. तेव्हा मिष्टान्न खाणे सोडले पाहिजे. मग जगात कसे वागावे? तेव्हा असा बोध झाला की, "घरी गेल्यावर आप्त, इष्ट यांनी जेवावयास बोलावले, तर मिष्टान्न असले तरी त्याचा आदर कर. हे ब्रह्म आहे; ते गुरूंना अर्पण केल्यामुळे, ज्या मिष्टान्नाने एक आत्मा वासनेने तृप्त होतो, त्यापेक्षा अनंत आत्मे तृप्त होतील; असा प्रसाद घेऊन जा. हे ब्रह्म आहे; त्याचा अनादर करू नकोस; पण घेताना फक्त प्रसादाइतकेच घेतले तर ते ब्रह्म होईल. आकंठ खाऊन ब्रह्माची किंमत कमी करू नकोस."

शेवटी नवीन जगात पाऊल ठेवण्यासाठी, माझ्या मामांकडे गेलो. ह्या साधनेत त्यांनी बहुमोल मदत केली होती. तेव्हा त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी गेलो; व घरातील सर्व मोठयाना नमस्कार करून, मी पुण्यास येण्यासाठी निघालो.



# २३. श्री साई अध्यात्मिक समितीची श्रीसाईनाथ महाराज व पाच पीर यांच्याकडून स्थापना व विजयादशमीस कार्यारंभ

पुण्याहून औदुंबरला येतेवेळी मी ज्यांच्या घरी रहात होतो, तेथे सर्व पूजनातील फोटो होते. "मी येईतोपर्यंत तुम्ही त्यांची पूजा करा"; असे मी त्याना सांगितले होते. आल्यानंतर हेच फोटो आपण ठेवून गेलो होतो की, नवीन आहेत असा संभ्रम निर्माण झाला. पुढे एक दोन दिवसात ह्या फोटोंची प्रचिती त्या कुटुंबियाना आली हे कळले. त्यावेळी कार्याची स्थापना झाली नव्हती. फक्त सकाळी व सायंकाळी आरती मी एकटा म्हणत असे; व आलेल्या भक्ताना उदी देत असे. त्याप्रमाणे सकाळी व सायंकाळी लोक जमू लागले. त्यावेळी जे कोणी दुःख घेऊन येत, त्याना फक्त प.पू. बाबांचे श्रीफल पूजनार्थ देत असे. यापेक्षा काही प्रश्नांची विचारणा केली नाही. "प्रसाद पूजन अकरा आठवडे करून, नामस्मरण ।। ॐ श्रीसाईनाथाय नमः ।। एक माळ म्हणा; प.पू. बाबा तुमचे दुःख निवारण करतील"; असे सांगत असे. हा विश्वास संपादन केल्यावर प.पू. बाबांनी सांगितले, "आता समितीची स्थापना कर. यासाठी जी मदत लागेल ती पाच पीर करतील. लहानपणी तुला ज्यांनी फकीर केला आहे; ते हे सर्व कार्य करतील."

जगतात जे कोणी जन्माला येतात, त्यापैकी प्रत्येकाला अन्न, वस्त्र, निवारा यांची गरज लागते; असे आपण विचारात घेऊन, तसा प्रयत्न करीत असतो. अशावेळी आपल्या जीवनात त्यांची तरतूद काय झाली आहे? असा सुविचार कधीच आपल्याला करता आला नाही. आपल्या सभोवार जे जग दिसते, तशा प्रकारची सुखे, ऐषाराम आपल्याला प्राप्त होत नाहीत, त्यावेळी आपण जागे होतो. कारण इतराप्रमाणे आपण सुखी नाही, सुखासाठी प्रयत्न करूनही आपल्या वाटयाला सुख नाही; अशी भावना निर्माण झाल्यावर, मग हे जीवन काय आहे हे पाहू

लागतो. यामध्ये पहिला प्रयत्न म्हणजे भूत, भविष्य, वर्तमान ह्या तीन काळात सुखाची बाजू आहे किंवा नाही हे आपण पडताळून पाहतो; व ह्या तिन्ही काळात जाऊनसुद्धा सुख, शांति मिळत नाही म्हटल्यावर, म्हणजे दैवाने पाठ फिरविल्यावर, मनुष्य देवाच्या शोधात फिरू लागतो. त्यावेळी देव म्हणतो, ''अरे माणसा, तुला आज आठवण झाली. पण तुझ्या पूर्वजाना मीच अन्न, वस्त्र, निवारा दिला होता; व पुढेही मी देणार आहे. तुला माझी आठवण आता होते आहे.'' मूल जरी आईला विसरते तरी आई मुलाला विसरत नाही. त्याप्रमाणे देव हा आहेच; पण पाठिशी की पोटाशी हा प्रश्न आहे. जगात पुष्कळ लोक अडचण आल्यावर देवाचे खूप करतात. म्हणजे अडचण निर्माण झाली की, देवाचा धावा करतात; आणि ती निवारण झाली की, देवाची निरवानिरव करतात. जीवन हा कर्माचा खेळ आहे. ह्या खेळात जय-पराजय असे फासे पडतात; हे विसरून चालणार नाही. जीवनात येणारी अडचण ही जीवनातील अडचण म्हणून येत नसून, ती अडचण आपल्याला जागे करण्यासाठी येत असते. त्यावेळी आपण जर जागेवर असू तर देव आपल्याला हाक मारतो आहे हे समजेल. यासाठी जीवन म्हणजे काय? जन्म म्हणजे काय? हे समजले पाहिजे. नुसते जन्माला येणे हे सोपे नाही. जन्म घेतेवेळी नऊ महिने लागतात; पण जन्माला आल्यावर ह्या जन्माचे डोहाळे पुरविता पुरविता जीवन वाया जाते. ह्यासाठी सुज्ञानी निदान आपण जन्माला का आलो? व आपले कर्तव्य काय? हा विचार केला तरी पुष्कळ आहे!

जे लोक मला भेटण्यासाठी येऊ लागले, त्यांची रडकथा हीच होती; व प्रत्येकाला हा प्रश्न मी विचारीत असे. त्यावेळी ह्या लोकानी निवेदन असे केले की, ''देवळात होणारे कीर्तन, पुराण, प्रवचन आदी ऐकले आहे, पण तुम्ही जो प्रश्न आमच्यापुढे मांडला आहे, तसा कोणीही विचारला नाही. देवळात होणाऱ्या कीर्तनात देवाचा विषय असून, पुराणामध्ये ह्या व्यतिरिक्त अन्य प्रश्न कोणीही विचारला नाही''; असे उत्तर बहुसंख्य लोकानी दिले. त्यावरून हे अभ्यासावयास मिळाले की, समाजात देवाधर्माबद्दल श्रद्धा आहे; पण ही श्रद्धा कोरडी आहे. त्याच्या मुळाशी ओलावा नाही. म्हणजे केवळ जीवनात वेळ जात नाही, म्हणून



बरेच लोक देवतार्जनासाठी जातात; व त्याचे अनुकरण बाकीचे सर्व करतात; आणि हाच देव व धर्म असे म्हणतात. यासाठी निराकरणार्थ जे लोक येत होते त्याना त्यावेळी चार शब्द सांगण्यास, म्हणजे 'मुलाखत' ह्या विषयाला आरंभ केला.

जीवनारंभी मानवी जीवनात जे काही दुःख म्हणून असते, त्याच्या मुळाशी अज्ञान असते. ह्या अज्ञानामुळे कुणावरही श्रद्धा ठेवली जात नाही. निदान स्वतःवर तरी श्रद्धा आहे का? आपण जे काही करीत आहोत, त्यातून आपल्याला काय लाभ होणार आहे? याचा विचार कोणी करीत नाही. जे लोक मला भेटण्यासाठी येत होते, त्यातील नव्वद टक्के लोक, ''मला सुख पाहिजे आहे व ते कसे प्राप्त होईल?'' याची विचारणा करीत असत. त्यावेळी माझी परीक्षा होण्याची वेळ आली. कारण गेली अडीच वर्षे मी साधना केली; ह्या साधनेने सुख, शांतीची प्राप्ती होत नाही म्हटल्यावर, येणाऱ्या लोकाना काय द्यावे? व काय देऊ नये? असा प्रश्न उभा राहिला. कारण जगाला हे ज्ञात होते की, मानवी जन्म हा कर्मपरत्वे होतो; व कर्माची बरी वाईट फळे मानवाला भोगावी लागतात. यापेक्षा अधिक ज्ञानाची गरज नाही. अशा लोकाना हा मार्ग सुखाचा आहे की, हा 'फाशीचा मार्ग' आहे, हे कळले पाहिजे. यासाठी काही मार्ग आहे का? नुसते औदुंबरला राहणे सोपे होते. त्याहीपेक्षा अधिक बिकट असा मार्ग, जग पाहिल्यावर वाटू लागला; त्यामुळे झोप येईना. ज्या आनंदात मी होतो त्याहीपेक्षा विवंचना मागे लागली. औदुंबरला जी साधना आपण केली असे मी म्हणत होतो, त्या साधनेची प्रचिती येणाऱ्या भक्ताना यावयास पाहिजे. तरच आपण बोलतो ते सत्य झाले! गुरू आपल्या पाठिशी आहेत, हा विश्वास इतराना देणे सोपे आहे; पण त्याची अनुभूति यावयास पाहिजे; अशा अवस्थेमध्ये मी होतो.

रोज़ झोपण्याआधी प्रार्थना म्हणत होतो. पण त्या प्रार्थनेला प्रतिसाद मिळेना. काय चुकले आहे हे कळेना. सर्वस्व दिले; आता देण्यासाठी काय बाकी आहे? हाही विचार करू लागलो. शेवटी मति गुंग झाल्यावर विचारांची दिशा उलटी चालू लागली. यापेक्षा मरण बरे. नाही तो

उपद्व्याप केला असे वाटू लागले. शेवटी एके दिवशी सकाळी पूजा, आरती करून, गावाबाहेर विठ्ठलवाडी आहे, तेथे जाऊन बसलो. त्यावेळी तेथील नदीचा परिसर लोकाना जास्त माहिती नव्हता. त्याठिकाणी बसून शांतपणे विचार करू लागलो. गेल्या अडीच वर्षात कशाचाही मोह झाला नाही. पण उत्तर मिळेना. शेवटी गावात परत येतेवेळी आजूबाजूला आमराई होत्या; व माघ महिन्यात मोहराने झाडे फुलली आहेत हे पाहून उभा राहिलो; व विचार करू लागलो. काही दिवसानी ह्याच मोहराची फळे तयार होतील, व ती पिकलेली फळे जग खाईल. नुसता 'मोहर' पाहून, ''हा आंबा आहे''; असे जग म्हणणार नसून, 'आंबा' ह्याऐवजी तुला 'आबा' म्हणतील. जेव्हा आंबे पिकतात, तेव्हा आमराईचा मालक ते देवाला अर्पण करतो; व मग राहिलेले आंबे विकण्यास बाजारात जातो. तू एवढा शहाणा होऊन, तिन्ही लोकांचे ज्ञान होऊनही कोरडा राहिलास. गेली अडीच वर्षे सेवा केली म्हणतोस; तर 'सेवा कुणी केली?' हा प्रश्न आहे. सेवा करण्यासाठी पुढचा जन्म आहे. सेवा केली ही श्रीदत्तगुरूंनी, ती तुझ्या माध्यमातून. यासाठी इहजन्मी 'मेवा' तू खा; पण ''सेवा मी केली'' असे म्हणालास तर फल येणारे नाही. येणारे जग ''मेवा आहे का?'' ही विचारणा करते. त्याची गोडी लागल्यावर सेवेचा मार्ग दाखव. गुरुमार्गात जे जे आपण मिळवितो ती साधना 'गुरुदक्षिणा' म्हणून गुरूंना द्यावी लागते; तरच त्याचे फल आहे.

केवळ झाडाला आलेला मोहर याने मला जागे केले. त्यामुळे ही जाणीव झाली की, आपल्या हातून कार्य व्हावे, हा 'मोह' आवरला पाहिजे. अजून साधनेला फल यावयाचे आहे. ते आल्यावर मग 'गुरुदक्षिणा'; तोपर्यंत गुरुमार्गात दक्ष राहणे महत्त्वाचे आहे. त्याप्रमाणे विचारांची दिशा बंद करून, सकाळी उठल्यापासून रात्री झोपण्यापार्यंत, आपल्या हातून 'आचार' होतो किंवा नाही यावर बारकाईने लक्ष ठेवून वागू लागलो. त्याच रात्री प.पू. बाबांनी दर्शन दिले. रात्री एक ते दोन यावेळी जाग आली. मी ज्या ठिकाणी रहात होतो त्या ठिकाणी एकटाच झोपत असे. समोर मध्यभागी देवाचे स्थान होते. मी उठून हातपाय धुतले; व एकांतात बाबांसमोर बसलो. त्यावेळी प.पू. बाबांचा फोटो हा नेहमीप्रमाणे वाटेना. त्यात काहीतरी बदल झाला आहे, असे



वाटू लागले; पण खूण काही पटेना. शेवटी मी आदराने प.पू. बाबांना विचारणा केली की, ''बाबा, आज जो फोटो पाहतो आहे; व रोज पूजन करतो, त्यामध्ये फरक आहे का?'' तेव्हा ते म्हणाले, ''वेडया, फोटो तोच आहे. ज्याप्रमाणे कावीळ झालेल्या रोग्याला जग पिवळे दिसते; त्याप्रमाणे साधक अवस्थेत भास होतो. हा भास म्हणजे काय हे समजले पाहिजे. नाहीतर मृगजळाप्रमाणे आपली अवस्था होईल. गेल्या अडीच वर्षात माझा फोटो आहे तोच आहे. त्यात बदल केव्हा होईल? जेव्हा जगात बदल होईल तेव्हा; व हा बदल तू घडविलास तरच होईल; नाहीतर मी बाबा, तू काबा असे दोन्ही वेडे पीर जन्माला येऊन फुकट गेले. कारण ज्यावेळी मी होतो त्यावेळी हेच जग मला वेडा म्हणत होते; व आता तुला अतिशहाणा असे म्हणतील. यासाठी नेहमी 'मौन' पाळावे. भांग पिऊन बडबड करू नये. 'भांग' हा जगत्जननीच्या डोक्यात शोभतो. त्यामुळे डोकीत मधोमध बरोबर केसाचे दोन भाग केले जातात. एक उजवीकडे व दुसरा डावीकडे. याचा शोध नंतर लागेल. तोपर्यंत 'मौन' पाळ. 'मौन' याचा अर्थ बोलणे बंद असा नसून, खरे बोलणे व चालणे म्हणजे मौन. आता ह्या गप्पा खूप झाल्या. माझ्यावेळीसुद्धा असेच रिकामटेकडे खूप भक्त होते. भक्ती राहिली बाजूला. ब्रह्म म्हणजे काय? स्वर्ग म्हणजे काय? ह्या शंकाकुशंकानी मला वेडा केला. जरी ब्रह्म म्हणजे काय हे मी सांगितले असते तरी 'कुठाय'? म्हणून दुसरा प्रश्न विचारला असता. म्हणून जे लोक स्वत:ला ज्ञानी असे म्हणत, ते मला भेटण्यासाठी येत; त्यावेळी मीच त्याना उद्देशून म्हणत असे की, हे बघा ब्रह्म आले. घ्या दर्शन. त्याचा लाभ पुष्कळ होईल!''

अशी कानउघडणी केल्यावर, 'कार्य' म्हणजे काय हे समजले; व त्याची स्थापना म्हणजे काय करावयाचे? हा प्रश्न पुढे उभा राहिला. पुढे प.पू. बाबा मला म्हणाले, ''तुझ्या 'बा' ने 'दत्ता' हे नाव ठेवण्यापेक्षा, 'गधा' हे नाव शोभले असते. नाम मोठे व अक्कल शून्य. जे कार्य म्हणतोस ते नाथांनी स्थापन करून अडीच हजार वर्षे झाली. पुढे काळाचा महिमा आपल्या वाटयाला येतो. अशावेळी तेच कार्य पुन्हा उदित करावयाचे असते; म्हणून माझ्या वेळेला येणाऱ्या लोकाना हे कार्य म्हणजे

काय? हे समजावे, यासाठी मी धुनी पेटवून, त्यातील राख लोकाना 'उदी' म्हणून देऊ लागलो. म्हणजे ही उदी ग्रहण केल्यावर तरी जग जागे होईल; म्हणजे 'उदित' होईल. हीच क्रिया तुला आता करावयाची आहे. जे कार्य नवनाथांनी अडीच हजार वर्षापूर्वी स्थापन केले तेच कार्य पुन्हा करावयाचे. मनुष्याला जन्म हा एकदाच मिळतो. त्याची पुनरावृत्ति वारंवार होणे, म्हणजे जन्म नव्हे. तेव्हा ह्या विजयादशमीला कार्य सुरू कर; पण स्थापना नव्हे. ह्या दिवशी नवरात्राची सांगता आपण करतो. तो 'विजय' दशदिशाना होऊ दे.'' अशी आज्ञा झाल्यावर, 'श्री साई अध्यात्मिक समिती' ह्या नावाने ह्या शुभमंगल दिवसापासून कार्य सुरू केले!

समितीचे कार्य हे विजयादशमीला सुरू झाले. त्या कार्याचे ब्रीद काय? प.पू. बाबांनी असा बोध केला की, '' 'सर्वाभूति आत्मा एकच आहे'; ह्या तत्त्वाप्रमाणे आपण सर्वांनी वागले पाहिजे. समितीच्या मार्गदर्शनार्थ जे कुणी येतील, त्यावेळी सर्व भक्ताना हरीचे मुक्तद्वार असावयास पाहिजे. जगात जे धर्म व धर्माचरण लोक करीत आहेत, त्यात हा अधिक, हा कमी, असा भाव असता कामा नये. यासाठी पूर्वीच्या काळाप्रमाणे अनुकरण असून उपयोगी नाही. माझे स्थान सर्वांना दर्शनासाठी खुले पाहिजे. म्हणजे देव्हारा व इतर प्रकारानी आपण देवाची मांडणी करतो, ती मला नको आहे. जो जो कुणी ह्या जगातील मनुष्य मला भेटण्यासाठी येईल, तो जरी मोकळ्या मनाने आला नाही, तरी 'देव' हा संकुचित असता कामा नये. जगातील लोक दुःखी आहेत. त्या दुःखात वाटेकरी व्हा, वारकरी नव्हे; कारण 'वारकरी' ह्या लोकांचा कुलाचार महिन्यातून दोनदा, एकादशी व द्वादशी ह्या दिवशी चालू असतो. अशावेळी कुळाला शोभेल असे वागणे व दानधर्म करणे, अशी परंपरा होती; ती न राहून, देवाचे नाव घेऊन हे लोक फक्त 'चरत' असतात. तेव्हा येणाऱ्या भक्ताचे दुःख कसे कमी होईल याचा विचार प्रथमतः केला पाहिजे. नुसती गीता सांगून, पुढे हे लोक 'अंगाईगीत' गातील. यापेक्षा सोप्यात सोपा असा मार्ग लोकाना सूचित कर. ह्याप्रमाणे कार्याची योजना कर. शास्त्राने सांगितले आहे की, 'कुलोपासना, कुलधर्म, कुलाचार व मातृदेवोभव, पितृदेवोभव, आचार्यदेवोभव व अतिथीदेवोभव' ही



कर्तव्ये, नकळत आपल्या हातून घडली पाहिजेत. आपल्याला गोड खाण्याची वासना झाली; म्हणजे कुलधर्म नव्हे. देवाची भूक लागल्यावर कुलधर्म करावा. तो देवाला 'भाक' सांगून जागे करतो; व पर्यायाने आपण जागे होतो.''

वरीलप्रमाणे मार्गदर्शन झाल्यावर, हताश झालेले मन हे गुरुकृपेने कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यास तयार झाले. येणाऱ्या लोकाना श्रीगणेशापासून जीवनाचा आरंभ कसा करतात? ह्याची शिकवण 'मुलाखतीद्वारे' समजावून देऊ लागलो. त्यामुळे देवळातून दिलेला नारळ व आपण देत असलेले 'श्रीफल', यात काय फरक आहे? हे लोक समजू लागले. देवळातील नारळाच्या दुकानातील नारळ व आपण देत असलेले श्रीफल म्हणजे काय? देवासमोर नारळ ठेवला की, पुजारी तो परत देत असतो. कुणीही भक्त व पुजारी यांची देवाणघेवाण अशीच चालू असते. अशामुळे शेकडो नारळांचा बळी जातो; पण आपल्याला सुख, शांति लाभू शकत नाही. जेव्हा आपण देवापुढे नारळ ठेवतो, तो देवाला अर्पण करण्यासाठी, आपल्या ठायी भक्ती व श्रद्धा यांचा संगम व्हावयास पाहिजे; पण तो नारळ म्हणजे देवाचे काही देणे आहे; अशी भावना बहुतांशी लोकांची असते. वास्तविक पुजाऱ्याकडून येत असलेला नारळ हा 'प्रसाद' म्हणून स्वीकारला पाहिजे; व त्यानंतर जो प्रसाद आपल्याला मिळतो, त्या प्रसादाची 'साद', म्हणून आशीर्वाद हा देवाकडून मिळतो. ही क्रिया त्रिपुटी आहे; कारण देव, पुजारी, व भक्त यांची इच्छा देवाकडे आल्यावर एक व्हावयास पाहिजे. अन्यथा देवाच्या नावे खडे फोडणारे लोक पुष्कळ आहेत.

अडीअडचणीमुळे आलेला भक्त, याने आपले दुःख सांगितल्यानंतर, त्याला जे श्रीफल देण्यात येते ते प्रथम अभिमंत्रीत करावे लागते. नुसता नारळ पाण्याने ओला केला की, आपले कर्तव्य संपले नसून, वास्तविक ह्या दिवसापासून आपल्या कर्तव्यास आरंभ झाला. जो कोणी दुःखी आहे, त्यास जेव्हा आपले दुःख निवारण करता येत नाही, तेव्हा तो आपल्याकडे येऊन दुःख सांगू लागतो. त्यावेळी अकरा आठवडयाचे पूजन भक्ताने करावयाचे; असाच त्याचा अर्थ नसून, अपरोक्ष तो प्रसाद

आपण स्वीकारला आहे; ही भावना जेव्हा निर्माण होईल, तेव्हा भक्तास जे सुख तो मागतो आहे, त्याच्या इच्छेपेक्षा अधिक मिळते. म्हणून जो नारळ द्यावयाचा असतो, त्यास 'श्रीफल' असे म्हणतात. ह्या फलात दोन 'श्रीं' चा अंतर्भाव श्रीगुरूंनी केलेला असतो. एक म्हणजे 'लक्ष्मी'; ही प्राप्ती व्हावी अशी अपेक्षा भक्त ईश्वराकडे करीत असतो. दुसरी 'श्री' ही सरस्वती म्हणजे ज्ञान आहे; व हे ज्ञान साधकास व्हावयास पाहिजे. याशिवाय पहिली 'श्री' म्हणजे प्रपंच; व दुसरी 'श्री' म्हणजे परमार्थ; अशी ठेव आपणास न मागता मिळते. असे जे कार्य अपरोक्षपणे ज्या माध्यमातून चालू असते, त्याचा अर्थ 'श्रीफल' होय.

ह्या कार्यात मूळ विषय कर्माचा असतो. ज्यावेळी कर्म अनुकूल असते, तेव्हा सर्व सुखाची प्राप्ती होत असते; पण जेव्हा प्रतिकूल कर्म असते तेव्हा जीवन दुःख व अशांतीमय असते. अशावेळी प्रतिकूल कर्म म्हणजे कोणते कर्म घडले आहे हे आपणास कळत नाही; व गतजन्मात आपण पाप केले असेल, असा तर्क आपल्या बुद्धीत निर्माण होतो. अशावेळी कर्माचा शोध घेणे अत्यंत अवघड आहे. एकवेळ धर्माचे मूळ किंवा खूळ हे आपल्याला समजेल; पण कर्म म्हणजे काय? त्याची क्रिया म्हणजे दुःख, आपल्या वाटयाला येते; ते तरी का? हे जर समजू शकलो, तर जे कर्म प्रतिकूल आहे ते अनुकूल होणे, म्हणजे सुख असे म्हणता येईल! ही कर्ममीमांसा पूर्वी औदुंबरला सांगितली होती; त्याचा प्रत्यक्ष अनुभव भक्तांच्या जीवनात अभ्यासण्यास मिळाला. कर्ममीमांसा व त्याची महती आपण जन्माला येण्यापूर्वीच लिहीली गेली आहे; परंतु त्यावर तरणोपाय काय? हेही समजणे आवश्यक आहे.



# २४. विमोचने, दीक्षा, महारुद्र स्वाहाकार

यामध्ये प्रथमतः 'वंशविमोचन' या साधनाचा विचार करणे आवश्यक आहे. घराण्यातील तीन महत्त्वाचे दोष संपत्ती, विद्या, संतती यांचा नाश होण्यास जे कर्म कारणीभूत होते, त्या कर्मातील दोष ह्या साधनाने गेले पाहिजेत, हे समजले. जी भक्तमंडळी मार्गदर्शनार्थ येत होती, त्यांच्या कुटुंबात वरीलपैकी एकतरी दोष वंशात धारण होतोच, हे कळले. अशाप्रकारे दोष सर्वांच्या ठिकाणी आज आहेत; याचे कारण गेल्या शंभर वर्षात आपले आचार, विचार यांचा पत्ता नाही. अमुक जात, अमुक धर्म हा सांगण्यासाठी राहिला आहे. नित्याचरणात देव व धर्म आला असता, तर ह्या दोषांची मुक्तता झाली असती. आज जगण्यासाठी जो गुण लागतो तो सत्त्वगुण, याचा अभाव आहे. वास्तविक तो धर्म बोलण्यात व वागण्यात असावयास पाहिजे. निसर्गातील पक्षी व प्राणी हे आपापल्या धर्माप्रमाणे वागतात; व परमेश्वराने आम्हा मानवाना बुद्धि दिली, म्हणून त्या जीवनाचा खेळखंडोबा करणे, हे उचित नव्हे. आपण बाहेर जातेवेळी समाजाने आपल्याला मोठे म्हणावे, म्हणून चांगले कपडे परिधान करण्याची दक्षता घेत असतो; पण घराण्यात जी संतती होणार आहे, ती निरलस व सर्वगुणसंपन्न असावी, अशा विचारार्थ काय केले पाहिजे? ह्याचे ज्ञान आपल्याला नाही. जन्माला आल्यावर त्या जीवाची प्रगती व्हावी, यासाठी आपण देवाला विचारणा करतो; पण जो जीव जन्माला येणार आहे, त्याचे मातापिता ही खाण असते. जन्माला येणाऱ्या मातीत आचार विचारपरत्वे दोष असेल, तर त्याचप्रमाणे संतती जन्माला येईल. जी सुधारणा व्हावयास पाहिजे असे शास्त्रज्ञ म्हणतात, ती जीव जन्माला आल्यावर कशी होणार? समाजात जो डॉक्टर किंवा अलौकिक शास्त्रज्ञ आपण पाहतो, त्याच्या जन्माच्याआधी त्याचे मातापिता कसे वागले? की, ज्यामुळे मुलगा डॉक्टर झाला किंवा शास्त्रज्ञ झाला, हे पाहिले पाहिजे. आज जे जग आहे त्यात बदल झाला नाही; तर जो बदल झाला तो आम्हा मानवामध्ये झाला आहे. समाजात जे जे आपल्याला दिसते; व त्यात सुधारणा व्हावी असे आपण म्हणतो, त्या समाजाची रचना कशी झाली? यासाठी जो पाया आवश्यक आहे तो इतरांचा

न पाहता, आपल्या पायाखाली काय आहे हे पाहिले पाहिजे. तीच माती आकार घेऊन, पुढे आपली संतती निर्माण होते. जन्माला येतेवेळी संततीत जर कमीअधिक दोष असेल तर संपत्ती, जे जगण्याचे साधन आहे; त्या संपत्तीचा लाभ होऊनही, त्या संपत्तीपासून समाधान प्राप्त होत नाही.

समाजात अडचणी असतील; पण किती काळपर्यंत? ह्या अडचणी आपणास जागे करण्यासाठी असतात; पण संपत्तीचा मोह आज इतका वाढला आहे की, अडाणी मनुष्यापासून शिकलेल्या मनुष्यापर्यंत तृप्ती आहे का? ह्या मोहापायी जीव कसा जातो? व कसा जगतो? ही स्पर्धा चालू आहे. जर स्वत:ला शांती नाही तर विश्वात व्हावी कशी? 'शांती' बद्दल भाषणे देणारे पुष्कळ आहेत; पण भाषणे देणारा आपले कर्तव्य काय हे विसरून भाषणात व संभाषणात इतर विषय बोलतो; ज्यामध्ये प्रामुख्याने इतरांची निंदा असते. 'दया, क्षमा, शांती' हे शब्द नुसते बोलण्यासाठी राहिले आहेत. याचे कारण जन्माचे गणित चुकले आहे. ही चूक आज आपल्याला भोगावी लागत असून, पुढे ह्या परिस्थितीकडे दुर्लक्ष केले, तर आपल्याला जगणे अशक्य आहे. आज आपण संपत्ती प्राप्त कराल; पण पुढे ही संपत्ती आपल्या नाशाला कारणीभूत होणार असून, त्याचा दोष मुळाशी धारण होतो आहे.

जो आपला पाया देवावर, धर्मावर उभारला आहे; त्याची जागृती व्हावी; व सर्वांना सुख लाभावे, यासाठी ह्या समितीचे कार्य प.पू. बाबांनी सुरू केले. प.पू. बाबा काही शास्त्रज्ञ नव्हते; पण ह्या साध्या फकीराने सर्व जगाला तारावे, असा विश्वास सर्वांना दिला; व देत आहेत. ह्या जगाची रीत अशी आहे की, आपल्याला सर्वांनी मोठे म्हणावे; व त्यासाठी जगाची निंदा करावी. ह्या जगात साधुसंत येतात व जातात. येताना जगाला तारण्यासाठी येतात; व जाताना त्यांचा 'वास' भूतलावर अखंड असतो, म्हणूनच आजपर्यंत आपण तरलो आहोत.

वरील दोष पंचाहत्तर टक्के मानवामध्ये आहेत. बाकीचे जे पंचवीस टक्के सुख प्राप्त करते आहेत, त्यानी ज्याना दु:ख आहे त्यांच्याकडे सहानुभूतीने पहावे. त्यानी नुसती दारे बंद करून, ''सभोवारच्या जगाने



डोळ्यावर देवाधर्माची पट्टी बांधली आहे;'' असे म्हणणे हास्यास्पद आहे. धर्मशास्त्राने, जे दोष आहेत, त्यांचे निवारण व्हावे; अशी तरतूद केली आहे; पण त्यासाठी निराकरण करणारे लोक पाहिजेत. यासाठी जगाकडे धाव घेऊन, हे दु:ख दूर होणारे नाही. जर आपण मनोभावनेने काही ना काही देवाचे स्मरण केले तर आपले मरण चुकेल; व आपल्याला योग्य मार्गदर्शन करणारा 'साधक' भेटेल. जर आपण दुसऱ्यावर विसंबून राहिलो तर सर्वत्र 'बाधक' वाट पहात आहेत. ते आपल्या दु:खाचा व अज्ञानाचा बळी घेतील. ह्यासाठी ह्या मार्गात येण्यापूर्वी सज्ञान व्हा; व मार्गस्थ व्हा. नाहीतर मार्ग न समजल्यामुळे, आपले दु:ख व आपले कुटुंब म्हणजे पर्यायाने आपला वंश, ह्याचे विमोचन होण्याऐवजी आपला अस्त होईल.

त्याप्रमाणे जे जे कोणी मार्गदर्शनासाठी येत होते, त्याना 'निराकरण' म्हणजे काय ह्याची सविस्तर महती सांगून, 'वेळ येताच' म्हणजे प.पू. बाबांची आज्ञा जेव्हा होईल तेव्हा मी पुढील निराकरण सांगेन, असे सांगत असे. तत्पूर्वी वंशविमोचनाचा विधि कसा करावा ह्यासंबंधी विचारविनिमय पुण्यातील वेदशास्त्रसंपन्न गोगटे गुरुजी, जे त्यावेळी आपल्याकडे येत होते, त्यांच्याशी केला. त्यांचे मूळ गाव 'वाई' असे असून, त्यांचे वास्तव्य पुण्यास होते. त्यावेळी माझा विषय काय आहे? काय विधि करणे आवश्यक आहे? किंवा काय प्रायश्चित्त घेणे भाग आहे? हे त्याना सांगितले. त्यावेळी ते म्हणाले, ''मला एक महिना विचार करण्यास द्या. त्या मुदतीमध्ये आणखी जे कोणी विद्वान पुण्यात आहेत, त्याना मी जाऊन भेटेन; व मग आपण भेटू''. त्याप्रमाणे वंशविमोचनाचा आराखडा तयार झाला की, त्यामध्ये प्रधान आवाहन देवांना करून, मग पूजा-अर्चा व हवन आदी विधि होता. जो दोष घराण्यात आहे, त्यासाठी संकल्पयुक्त प्रायश्चित्त हवन करावयाचे असून, त्यासाठी सप्तपितृ व मातृ घराण्याचा उच्चार व्हावयास पाहिजे; व त्यांच्या आहुती तीळ व तूप यानी देऊन हवन करावयाचे; व पूर्णाहुतीने सांगता होऊन, हा विधि पूर्ण होतो. त्यावेळी जे भक्तभाविक उपस्थित राहतील त्यानी प्रायश्चित्त संकल्पाचा उच्चार करावयास हवा.

हा विधि झाल्याबरोबर सुखाचा पाऊस पडेल असे नाही. ह्या विधीमुळे, गतकाळात जे आत्मे परलोकवासी झाले आहेत, त्याना दोषमुक्त करून, पुढे ह्या आत्म्याना सद्गती मिळते. पण यामध्ये आपले आचारविचार यावर त्यांची मुक्तता अवलंबून आहे. नुसता वंशविमोचनाचा संकल्प घेतला, म्हणजे ते मुक्त होतील; असे जर कोणास वाटत असेल तर भगीरथाने जी तपश्चर्या केली तो वेडा होता, असे म्हणावे लागेल. त्याप्रमाणे पहिले वंशविमोचनाचे हवन कल्याणला हाजीमलंग ह्या डोंगरावर झाले. अशा तऱ्हेने पाच हवने तेथे झाली. याचे कारण अभ्यासण्यासारखे आहे. ते असे की, दोष अधिक कर्म यांचे विमोचन होऊन, नंतर ह्या विधीचा दोष कोणालाही लागू नये; कारण हा विधि पहिल्यांदाच आपण करीत होतो; व त्यावेळी दोषांचा उच्चार केला जात असतो, तो राहत्या वास्तूत होऊ नये. काही विधि असे आहेत, जे वास्तूच्याबाहेर करावे लागतात. त्याप्रमाणे पाच हवने केल्यानंतर, मग मुंबई, पुणे व गोवा ह्या तीन केंद्रावर हा वंशविमोचन हवन विधि केला गेला. पहिले हवन पुणे, मग मुंबई व मग गोवा ह्या क्रमाने करण्यात आले; कारण हा विधि तीनशेसाठ मैलामध्ये व्हावयास पाहिजे होता. आपली पृथ्वी ही तीनशेसाठ अंशामध्ये जन्माला आली. ह्या पृथ्वीच्या आसमंतात जी पोकळी आहे, त्या पोकळीत प्रथमतः आत्म्याचा प्रवेश होतो; व मग हे आत्मे आपआपल्या कर्माप्रमाणे गतीला जात असतात; व परलोकातील पाच लोकात ह्या आत्म्याना स्थान प्राप्त होत असते. यासाठी हा विधि मकर संक्रांत झाल्यावर करावयाचा असून, त्या विधीसाठी ग्रह हे अनुकूल पाहिजेत. प्रथमतः हा विधि जेव्हा करण्यात आला, त्यावेळी पृथ्वीची कुंडली हिंचा विचार केला गेला आहे. कारण त्यासाठी 'गुरू' हा सिंह राशीत असताना, ह्या राशीला 'शनि' यावयास पाहिजे. तेव्हा ह्या विधीस तीनशे साठ वर्षानी आरंभ झाला. कारण असा योग तीनशे साठ वर्षानी येतो. जगात खूप तीर्थक्षेत्रे आहेत; व त्याठिकाणी पुष्कळ व ज्ञानी असे उपाध्ये आहेत; परंतु कोणता विधि ह्या जगाला हितकारक होईल हे पहावे लागते; नाहीतर दर महिन्यात हा विधि होऊ शकतो. पण त्याचे हेतु वेगवेगळे असू शकतात. बरेच लोक ह्याला बळी पडतात. कारण इहजन्मात संतती प्राप्त न होणे, हा दोष



कमीपणाचा वाटतो; म्हणून तीर्थक्षेत्री जाऊन, जे सांगतील ते विधि हे लोक करीत असतात. त्यामुळे त्यांचे मनोगत जे 'अपत्य' व्हावे असे असते, त्याऐवजी 'आपत्ती' घेऊन ते घरी येतात. काही प्राप्त व्हावे, अशी इच्छा होणे स्वाभाविक आहे; पण ती इच्छा ईश्वराधीन असते. अशावेळी ईश्वराला प्रसन्न न करून घेता, वासनेला बळी पडून, तीर्थक्षेत्री जाऊन, आपत्ती घरी आणीत असतात. अशी चूक झाल्यावर, जरी तो भक्त गुरुमार्गी झाला तरी ह्या दोषापासून मुक्त होत नाही. यासाठी हा वंशविमोचन विधि केंद्रावरील जे येणारे भक्त व जे पुढे येतील त्यांच्यासाठी दरवर्षी करून, त्या विधीची सांगता एकवीस वर्षानी केली. त्यासाठी गुरुआज्ञेने संपूर्ण वर्ष, दर पौर्णिमेस मी श्रीनरसोबावाडी ह्याठिकाणी जाऊन, श्रीरुद्रदेवतेचे होमहवन करीत होतो. अकरा पौर्णिमेस हा विधि जेव्हा सिद्ध झाला, तेव्हा 'महारुद्र स्वाहाकार' याचे आवाहन केले गेले. यासाठी समस्त भक्ताना आमंत्रण देण्यात आले. कारण हा विधि पैसे आहेत म्हणून करता येत नाही. ह्या स्वाहाकारात ज्या शक्तीला आवाहन करावयाचे असते, तत्पूर्वी भक्तांचे काया-वाचा-मन, दीक्षा देऊन तयार करून घ्यावे लागते; कारण ती शक्ती भूतलावर आल्यावर, प्रत्येकाच्या ठायी अंशरूपाने राहिली पाहिजे. हा विधि जगतात शांति नांदावी म्हणून केला जातो, पण तो करण्यामध्ये काय पथ्य आहे? हे न समजल्यामुळे, शांति प्राप्त न होता, आज अशांति जगात पसरलेली आहे.

ह्या विधीच्या संदर्भात, वंशात कर्मविमोचन व ऋणमोचन हा विधि आहे. आपल्या घराण्यात वंश जन्माला येतो. ज्यावेळी जन्म प्राप्त होतो त्यावेळी पूर्वीची वंशाची कीड लागली, तर तीच परंपरा पुढे कर्म म्हणून आपल्याला भोगावी लागते. ही कीड गेल्याशिवाय संपत्ती, संतति आदी सुख प्राप्त होण्यापेक्षा न होणे बरे. एखादी संतति घराण्यात जन्माला येतेवेळी, जर पूर्वीचा दोष मुक्त झालेला नसेल, तर जन्माला येऊन न्यूनता पहावयास मिळते. अशा दोषामुळे विद्या नाही, संपत्ती नाही, अशी परिस्थिती येते. मग अशा लोकानी जगावे कसे? असा दोष जावा म्हणून डॉक्टरी शास्त्र उपाय करीत आहे; व शोधही लावीत आहे. पण तो किती? तर दहा टक्के. अशाने हे जग सुखी होईल का?

येणाऱ्या भक्ताना वंशविमोचनाचा लाभ दिल्यावर, त्याचबरोबर 'दीक्षा' याचाही लाभ जोडावयाचा असतो. त्यामुळे बऱ्याच भक्ताना हे कार्य कसे चालू आहे ह्याचा अचंबा वाटला. कारण विमोचन याचा संबंध दीक्षेशी कसा काय? अशी विचारणा केल्यावर, त्याना मुलाखतीद्वारे हे समजावून सांगितले की, जगात जो कोणी जन्म घेतो, त्याच्या काया-वाचा-मनात पोकळी नाही. दोष हे देहामध्ये कर्मरूपाने असतात; व कर्माचा अडथळा, म्हणजे देहाच्या गतीमध्ये मंदपणा किंवा अधिकपणा येतो. अशामुळे जरी सुख असले, तरी मन:शांति लाभत नाही. शांति व सुख यांची माध्यमे, म्हणजे काया, वाचा, मन; ह्यांची गति वेगवेगळी आहे. मनाची गति अधिक असून, कायेची कमी व मंद असते. अशावेळी शरीर गतिमान होणे, हे महत्त्वाचे आहे. यासाठी पहिले विमोचन व मग दीक्षा यामुळे हळूहळू प्रगति व मग गति, ही अवस्था प्राप्त होते. यामध्ये तीन विमोचने व तीन दीक्षा यांचा देहिक अवस्थेशी संबंध असतो; व पुढील दोन दीक्षा आत्म्यास असतात. जो आत्मा शरीरात धारण झाला आहे, त्याला योग्य मार्गाने वळण यावयास पाहिजे. देहिक अवस्था अधिक आत्मिक अवस्था म्हणजे मानव! बहुतांशी साधक फक्त स्थूल देहाचा विचार करतात. उदाहरणार्थ, अमुक जप केला, अमुक पारायणे केली, अमुक तीर्थयात्रा केल्या, म्हणजे पर्यायाने देहाने किंवा आत्म्याने जन्माला येतेवेळी पाप केले आहे; हीच भावना जमेस धरून, हे लोक साधना करीत असतात. यासाठी गुरूंचे कर्तव्य दोन्ही अंगानी युक्त पाहिजे. एक देहिक व दुसरे आत्मिक. ह्या दोन अवस्थेमुळे जीवन प्राप्त होते. यात एकाची प्रगति केली, तर दुसऱ्या अवस्थेची अधोगति ही नकळत भोगावी लागते. यासाठी गुरू हे माध्यम 'आई'सारखे आहे. आई ज्याप्रमाणे जन्माला येणाऱ्या बालकांचा सांभाळ करते, त्याप्रमाणे 'गुरू' असावयास पाहिजेत.

ह्या तीस वर्षात अनेक भक्त आले व गेले. त्यापैकी कुणाला काय मिळाले? ऐहिक प्राप्ति काय झाली? याची चौकशी केली नाही. आपले कर्तव्य हे पुढे जाण्याचे आहे, मागून बघण्यासाठी किंवा बोलण्यासाठी नव्हे. जो आला त्याला गुरुकृपेने काही प्राप्त झाल्याशिवाय राहिलेले नाही. पण 'कृपा झाली'; असे म्हणणारे किती? याचाही विचार मी



केला नाही. आपण आपल्या इष्टकर्तव्यास सदैव जागरूक राहणे; याचा अर्थ कृपेला पात्र होणे, असा आहे. ह्या तीस वर्षात माझा प्रवास सगळ्या हिंदुस्थानभर झाला. त्यावेळी अनेक पवित्र अशी स्थाने मी पाहिली. त्या ठिकाणी जे काही प्राप्त होण्यासारखे होते, ज्याचा लाभ ह्या कार्यास होईल, अशा पवित्र स्थानी मी जाऊन आलो. या भेटीत काय प्राप्त केले असेल? तर आपली साधना; ज्यामुळे पुरुषार्थ प्राप्त होतो. ह्या त्रिभुवनात तेहतीस कोटी देव आहेत. त्यापैकी किती देवात देवत्व आहे? हा प्रश्न आहे. बाकीचे नुसते नामधारी आहेत. आपल्यासारखे! म्हणजे आपण व देव सारखेच! याचा उपयोग स्वत:लाही नाही व इतराना म्हणावे तर लाज वाटते, अशी स्थिती आजमितीला आहे. म्हणून अडीच हजार वर्षानंतर नाथांनी 'साईनाथांचे' नाव अजरामर केले.

# २५. ॐकार सिद्धतेची वाटचाल, श्री पंतमहाराज यांची भेट

निसर्गात मानव व देव यांची ओळख सर्वांना आहे. पण नेमके कुणाला देव म्हणावे? व कुणाला मानव म्हणावे? हा वाद आहे, तो मिटणे शक्य नाही. जरी जग बुडाले तरी हा वाद मिटणे शक्य नाही. कारण ज्ञानी म्हणतात की, देव आहे व नाही. अज्ञानी म्हणतात देव आहे. यापैकी दोन्ही बाजूला सत्य आहे. ज्ञानी हा कल्पनेने 'देव नाही' असे म्हणतो. म्हणजे देव ही कल्पना आहे. ती वस्तुनिष्ठ अवस्था नव्हे व नाही; आणि जो अज्ञानी आहे तो अंधश्रद्धेने म्हणतो की, देव आहे व देवाने जग व्यापले आहे. ह्या वादातून खरे व खोटे ठरविण्यासाठी ह्यापैकी दोघानाही मेहनत करावयास नको. 'देव आहे' म्हटल्यावर सिद्ध करण्यास जन्म पुरणार नाही, हे ज्ञानी लोकाना कळते. त्यामुळे 'देव नाही' म्हटले की, आपले भागले असे त्याना वाटते. त्यामुळे अज्ञानी लोकांना नावे ठेवणे, एवढेच कार्य सुशिक्षितांचे राहिले आहे. परंतु एकच प्रश्न आहे की, 'ज्ञानी' व 'अज्ञानी' कुणाला म्हणावयाचे? हा प्रश्न जगभर आहे. मानव कितीही मोठा, श्रेष्ठ, ज्ञानी झाला, तरी 'मनाला शांति नाही'; असे म्हणणारे सर्व जग आहे. विज्ञानातून काहीही प्राप्त केले, तरी शेवटी 'मन' अवस्थेचा विचार करावाच लागतो. मनाला शांति पाहिजे; विज्ञान नको; की ज्यामुळे तर्कवितर्क निर्माण होऊन, आज मानवाचा शत्रू मानव झाला आहे. त्यापेक्षा 'मन म्हणजे मानव' व 'देव म्हणजे शांति'; एवढे प्राप्त करून घ्यावयाचे आहे. तेवढी साधनसेवा आपल्या सर्वांकडून घडावी; व सर्वांना सुखशांति प्राप्त व्हावी, अशी ईश्वराची इच्छा आहे. हे मार्गदर्शन आजपर्यंत सर्वांना केले. यात महत्त्वाचा विषय असा की, मला जी ॐकार साधना श्रीभैरवनाथांनी शिकविली होती, तिचा लाभ सर्व जगाला व्हावा, म्हणून ॐकार प्रथमतः सिद्ध व्हावयास पाहिजे; यासाठी 'कामकाज' म्हणजे जी 'ऐहिक प्राप्ति' ती बंद करावी, अशी आज्ञा झाली. म्हणजे सर्व केंद्रावर मी जे कामकाज करीत होतो, ते कामकाज सेवकांनी करावे; व मगच ॐकार सिद्ध करता येईल, अशी ही आज्ञा होती.



वर सांगितल्याप्रमाणे सर्व तीर्थस्थानाना जाऊन आलो होतो; याचे कारण साधकाला जी अनुभूति येत असते, त्यावेळी त्याच्या शरीरावर काय परिणाम होतात हे कळले पाहिजे. प्रत्येक स्थानावर ज्या शक्तीचे वास्तव्य असते, ती एका प्रकारची नसून, त्या शक्तीमध्ये त्रिगुणात्मक अवस्था असते. अशावेळी जेव्हा आपण सत्पुरुषांच्या समाध्या पाहतो, अशा ठिकाणी असलेले शक्तीचे वास्तव्य व देवळातील असलेल्या शक्तीचे वास्तव्य यात फरक असतो. देवळामध्ये जी शक्ति अनुभवास येते, तेथे दगडी किंवा पंचधातूची मूर्ति असते. मूर्ति जेव्हा स्थापन केली जाते, त्यावेळी जे मंत्र उच्चारले जातात, त्यामुळे त्या मूर्तीला देवत्व प्राप्त होते; व जे मंत्र आहेत, त्या मंत्रामधून तेथील जागृति ही पुन्हा पुन्हा करावी लागते; व साधकाला त्या शक्तीची प्राप्ति करावयाची असते, तीही मंत्रपठणातूनच होते. म्हणून जो दुःखी आहे, त्याला ह्या शक्तीचा लाभ होण्यासाठी बराच वेळ लागतो. याचे कारण असे की, जो मंत्रांचा उच्चार करावयाचा असतो, ते मंत्र त्रिगुणात्मक असून, त्यांचा उच्चार संख्यावाचक व्हावयास पाहिजे. म्हणजे अमुक एक दिवसामध्ये त्या मंत्राचा जप व्हावा लागतो. ह्या क्रियेस पुरश्चरण असे म्हणतात. ठराविक काळपर्यंत पुनश्चरण झाल्यानंतर हवनविधि करावा लागतो; तरच मंत्राची सिद्धता होते. नुसता मंत्राचा उच्चार करीत राहून, तो सिद्ध होत नाही. शेकडो देवळे आपल्याला दिसतात, परंतु त्यामध्ये देवत्व नसते. देवाची मूर्ति आहे; हे समाधान मानून, भक्त देवाची वाट बघत असतो. हा एक अभ्यास असून, दुसरा अभ्यास म्हणजे ज्या ठिकाणी कुणा सत्पुरुषाची 'समाधी' आहे, असे स्थान. ह्या ठिकाणी ज्या व्यक्तीची शक्ति अनुभवास येते, ती शक्ति त्या सत्पुरुषाच्या काया, वाचा, मन ह्यांची त्रिपुटी होऊन, त्यातून निर्माण होते. जी उपासना व साधना त्या साधकाने केलेली असते, त्या साधनेतून ही शक्ति निर्माण होऊन, आसमंतात त्या शक्तीचे वास्तव्य आपल्या अनुभवास येते. ही शक्ति प्राप्त करतेवेळी, साधनेतील थोडेबहुत बंधन असते. पण मग ह्या शक्तीचा वापर, कुणा साधकाला, जो दुःखी मनुष्य आहे, त्याला सुखी करण्यासाठी करता येतो. पण ह्या जगात जे जे सत्पुरुष जन्माला आले, त्यांचा जन्म स्वतःसाठी नसतो; हे सुज्ञाना समजत नाही. त्यामुळे कृपा प्राप्त होण्यासाठी, देवाला

नवस करतील, बकरे मारतील किंवा नवचंडीचे हवन करतील; पण अशा सत्पुरुषाला नमस्कार करणार नाहीत. कारण दिसायला तो आपल्यासारखा सामान्य मनुष्य दिसतो. त्याला जर जन्माची खूण म्हणून चार हात असते, तर जगाने त्याला जगू दिले नसते. अशा संतांना आपण जे पाहतो, त्यांचा जन्म आपल्यासारखा नसतो, त्या जन्माला 'अवतार' असे म्हणतात. जगामध्ये जो काही बदल कालपरत्वे होत जातो, त्याप्रमाणे त्या कालात ईश्वर त्यांच्या रूपाने अवतार म्हणून जन्म घेतो; व जी परिस्थिती जगात असते ती बदलून, जगाला सुख मिळावे, अशी योजना कार्य म्हणून करता होतो. असे लोक असामान्य आहेत, हे आपल्याला कळत नाही. शेकडो वर्षे, देव आहे असे आपण म्हणतो; व त्याची पूजाअर्चा मनोभावनेने करून, आपण उपासना किंवा साधना केल्यावर आपल्याला आशीर्वाद मिळतो; परंतु ह्या संतांकडून काहीएक साधना न करता, जो कृपाशीर्वाद मिळतो, त्याची किंमत जगाला नाही. देवळात देवाकडून फक्त कृपा मिळते; व तिचा लाभ एकाच पिढीला मिळतो. पण संतांची कृपा असतेच; त्याबरोबर जो आशीर्वाद मिळतो तो पिंडास मिळतो. म्हणजे घराण्यात पुढे प्रत्येक पिढीत जो वंश जन्माला येईल, त्याला हा आशीर्वाद केवळ नामस्मरण करण्याने लाभतो. एवढी तरतूद ह्या जगाची करून, ह्या सत्पुरुषांची समाधीस्थाने शेकडो वर्षे जागृत आहेत. त्यांची अनुभूति व प्रचीति आजपर्यंत आल्यावर असे म्हणावे लागते,

॥ तरीच जन्मा यावे, दास जगाचे व्हावे ॥

ह्या संतांच्या दर्शनार्थ गेल्यावर, संतांचे जग काय आहे ते समजते. 'गाणे' हा विषय आपण घेतो, त्यामध्ये काय काय आहे? प्रथम दिवसाकाठी किती प्रहर आहेत? त्या त्या प्रहरासाठी कोणता राग आहे? याची माहिती आवश्यक असते; व मग ते राग आळविताना निसर्गात काय रंग आहेत हे समजते. त्याप्रमाणे संतांची उपासना करण्यास सुरुवात केल्यानंतर, त्यांचा महिमा काय आहे हे समजते. प्रत्यक्ष 'ब्रह्म' ही अवस्था अनेक योजने दूर आहे; पण संतसमागम झाल्यावर आपणच ब्रह्म आहोत, असा अनुभव येतो. याचे कारण त्यांचा धर्म



'आपणासारिखे करिती तात्काळ' हा आहे. स्वत: देव व देवत्व म्हणजे काय? याबाबतची तपश्चर्या ते करतात, पण देवत्व आपल्याला अनुभविण्यास देतात. ज्याप्रमाणे गाय खाते गवत पण देते दूध! अशा अवस्थेचा तो अनुभव असतो. ह्यालाच 'अनुपम सुख' असे म्हणतात.

ह्या सुखाची प्राप्ति ही साधकाला अनुभविण्यास मिळते. बाकीचे नुसते मिटक्या मारीत बसतात; व थोरवी एवढी गात असतात की, जणूकाही परमेश्वरप्राप्ति झाली असे इतराना वाटावे. अशा वाटण्यास हरकत नाही; पण ज्या मार्गाची 'श्री' सुद्धा माहीत नसते, अशावेळी महती सांगून, एक तर येणारे भक्त यांची ते दिशाभूल करतात; किंवा अश्रद्धा निर्माण करण्यास कारणीभूत होतात. हे भूत जेव्हा अंगावर बसते तेव्हा भक्ताची नित्य साधना बाजूस राहून, महतीचा पोवाडा गाऊन, शेवटी हेच लोक पोबारा करतात. अशासाठी भक्ताची काय पातळी आहे त्याप्रमाणे वागावे.

जेव्हा मी अजमेरला ख्वाजा गरीब नवाज़ यांच्या दर्शनार्थ गेलो होतो, तेव्हा त्यांनी आज्ञा दिली की, "परत गेल्यावर पंत बाळेकुंद्रीकर यांना जाऊन भेट. त्यांचा वाटा ह्या कार्यात मोठा आहे. तो ते भेटल्यावर सांगतील." त्याच आठवडयात मी मुंबईस आलो; व अकस्मात श्रीपंतांची भेट होण्याचा योग आला. चांगले योग येण्यासाठी कुणीतरी व्यक्ति निमित्त म्हणून लागते. पण त्या व्यक्तीला हा योग आपल्यामुळे आला, असे वाटते. परंतु योग हा कुणामुळे आला हे निश्चित सांगता येत नाही. यासाठी साधकाने सदैव जागरूक असावे लागते. कारण योग हा दार बंद करून येणार नाही, किंवा 'योग येणार आहे' म्हणून पत्र येत नाही. ह्या तीस वर्षात ह्या कार्याकडे पुष्कळ लोक आले. ते ज्याना घेऊन आले ते अजून आहेत; व ज्यानी त्याना आणले ते बाहेर आहेत. म्हणून योग हा कुणा व्यक्तीमुळे घडत नसतो. तो पूर्वीच लिहीलेला असतो. आपण फक्त त्या योगाचे माध्यम असतो. त्याप्रमाणे श्रीपंतांची भेट झाली; त्यावेळी ते म्हणाले, "मुला! किती वाट पहात राहिलो आहे! जगाला ज्याची गरज आहे, ते देण्यासाठी मी थांबलो आहे. यासाठी येथे मुक्काम कर; व जी पोथी तू आणली आहेस, तिचे

पारायण माझ्यासमोर बसून कर. ते मला ऐकू देत. पुढे त्या पारायणाचे कार्य काय आहे हे समजेल.'' त्याप्रमाणे आज्ञा होताच दुसरे दिवशी श्रीनवनाथ पारायणास सुरुवात केली. ह्यापूर्वी मी ती पोथी वाचली आहे; पण ह्यावेळी हे वाचन नसून, काहीतरी अद्वितीय आपल्या जीवनात घडत आहे, हे जाणवले. 'पारायण' करण्यास सात दिवस लागतात, याला 'सप्ताह' म्हणतात; व यामध्ये फार मोठा फरक आहे. पारायण करण्यासाठी गुरूंची आज्ञा लागते; व कोणताही हेतू मनामध्ये ठेवून चालत नाही. याउलट सप्ताह ही सेवाच आहे; पण त्यामध्ये अनेक हेतू मनामध्ये असतात. अशावेळी आपण व परमेश्वर यामध्ये 'सेतू'ने आपले जीवन जोडावे लागते, मगच आपला हेतू साध्य होतो.

श्रीपंतांच्या आज्ञेने जे पारायण मी करीत होतो ते दिवसानुदिवस म्हणता म्हणता सात दिवसानी पूर्ण झाले. त्यादिवशी गुरुजींच्या घरी पारायणाची सांगता केली. त्यावेळी 'श्रीनवनाथ' पोथी व 'श्रीदत्तप्रेमलहरी' ह्या दोन पुस्तकांचे मनोभावे पूजन केले. त्यादिवशी श्रीपंतांनी अशी आज्ञा केली, ''ह्या पुस्तकात पंचवीसशे पदे लिहीलेली आहेत. तुला योग्य वाटतील ती पदे घेऊन, त्या पदाना चाली लाव''. वास्तविक 'संगीत' हा विषय माझा नव्हता व नाही; पण आज्ञेचे पालन हेच आपले कर्तव्य म्हटल्यावर, ते पुस्तक उघडून पाहिले; व पद व चाल म्हणू लागलो. 'आरती अवधूता' हे पद म्हटल्यावर, अष्टभाव जागे झाले की काय असे वाटू लागले. त्या दिवशी मी दहा पदाना चाली लावल्या; व ती पदे श्रीपंतांच्यासमोर बसून म्हटली; तेव्हा पंत काय आहेत हे समजले. नुसता 'अवतार' असे म्हणून चालत नाही. प्रत्येक सत्पुरुषाची सत्ता ह्या त्रिभुवनात वेगळी आहे; हे कळले. पंतांची पदे म्हणत असताना हे जाणवले की, त्यांच्याठायी 'शब्दब्रह्म' व 'नादब्रह्म' आहे; व जी पदे 'श्रीदत्तप्रेमलहरीत' आहेत, ती म्हणताना व ऐकताना 'मन' ह्या अवस्थेची जाणीव होते.

प.पू. बाबांच्या आज्ञेप्रमाणे मी बाळेकुंद्रीस जाऊन आलो. पूर्वी औदुंबरला अडीच वर्षे माधुकरी मागितली; त्याचा अर्थ आता समजला. नुसते तोंड किंवा हात ह्या माध्यमातून जग गोड होणार नाही. आपल्या



शब्दात व वागण्यात मधुरता पाहिजे. यासाठी पाच गृही माधुकरी मागत होतो. त्यावेळी अर्थ समजला नाही. पण पाच स्थानांचा संबंध पाच कोशाशी आहे व ते नुसते विकसित होऊन चालणार नाहीत, तर कोशांचे एकरूपत्व करून आरती म्हटली, तर 'नादा' ची प्राप्ति होते. 'नाद' याची उत्पत्ती व उपपत्ती साधकाला कळली पाहिजे. नुसता नाद म्हटल्यावर वाद निर्माण होतो. एक भांडे दुसऱ्या भांडयाला भेटले की, जो नाद होतो तो वादाचे मूळ आहे हे समजावे. 'नादा'ची उत्पत्ति ही ब्रह्मापासून झालेली आहे; व त्याची उपपत्ति म्हणजे 'शब्द'. जो आपण बोलतो तो शब्द वाणी म्हणून येतो. म्हणजे पिंडात वाणी ही निर्माण होते. ती वाणी ही अवस्था जर आपल्याला समजली तर वाणी हेसुद्धा ब्रह्म आहे. आपण जगतो म्हणजे काय? जे जे आपल्या सभोवार आहे, त्याला जिवंत करणे असा अर्थ होतो. जसा एक दिवा लागला की, असंख्य दिवे आसमंतात आपल्याला दिसतात, तसे आपले जीवन निर्माण व्हावयास पाहिजे. हे दिवे आपल्या जीवनात प्रज्वलित केले पाहिजेत. त्यासाठी रॉकेल किंवा तेल ह्यांचा वापर उपयोगी नाही, तर त्यासाठी निःसीम भक्ती आपल्या ठायी पाहिजे.

# २६. करणी, बाधा, ताह्मन

ह्याप्रमाणे कार्य सुरू होते. त्यामध्ये काही भक्त असे दुःख घेऊन येत होते की, ''मला कुणीतरी 'करणी' केली. त्यामुळे धंदा व्यापारात नुकसान होते.'' कुणी म्हणत, ''माझा आजार बरा होत नाही; म्हणजे कुणीतरी करणी केली.'' 'करणी', जादुटोणा इत्यादी नावानी लोक संबोधतात. पण कुणालाही करणी म्हणजे काय प्रकार आहे याचे ज्ञान नाही. आले दुःख की, त्याचा संबंध हे लोक करणीशी जोडतात. लोक मांत्रिकाकडे जातात; पण ज्याच्याकडे जातात त्याला तरी मंत्र येतो का? याचा विचार कोण करतो? देवाने बुद्धि हे माध्यम कशासाठी दिले? गाईला शिंगे असतात ती शोभेसाठी नाहीत; तर ती गाय त्यापासून स्वतःचे संरक्षण करत असते. आपण मात्र बुद्धि असून नसल्यासारखे वागत आहोत; व ह्या वागण्यातून स्वतःचे नुकसान करून घेत आहोत. पण बाहेरचे लोक ह्या परिस्थितीचा गैरफायदा घेत असतात; व कुणी दुःखी आला की, त्याला न पटणारी विधाने सांगतात. जो दुःखी आहे त्याचा विश्वास देवावर नाही इतका ह्या मांत्रिकाच्या सांगण्यावर बसतो; व 'कुणी करणी केली आहे'; हे खरे वाटते. पण खरा प्रकार माहीत नसतो. म्हणून मी 'करणी' चा अभ्यास सुरू केला. त्यामध्ये हे अनुभवास आले की, 'करणी' हा प्रकार सत्य आहे. परंतु खूप खर्चाचा आहे. ज्याच्यापाशी जेवणास पैसे नाहीत, तो दुसऱ्याचे वाईट व्हावे अशी जरी इच्छा झाली तरी काय करू शकणार? परंतु मांत्रिक लोक याबाबतीत व ज्याना करणी केली आहे त्याना मुक्त करण्यासाठी भरमसाठ पैसे उकळतात; व 'घरचे झाले थोडे, व्याह्याने धाडले घोडे'; अशा परिस्थितीप्रमाणे माणसे ह्या मांत्रिकाकडे खेटे घालत रहातात. जणू काही सुखाची खाण त्याला सापडली आहे; व ते सुख आपल्याला मिळणार आहे. परंतु हा केवळ खुळ्यांचा बाजार असतो. अशामुळे मनुष्य शेवटी त्रस्त होऊन देवाला शिव्या देतो. त्याऐवजी हातात जोडा घेऊन त्या मांत्रिकाला म्हणावे, ''इतरानी करणी केली नसून, तुझी करणीच अगाध आहे; कारण मला ज्ञान नसल्याने, तुझा फायदा झाला. त्यासाठी मी जोडा आणला आहे, त्याचा स्वीकार कर.''



'करणी' हा जो प्रकार आहे, त्यामध्ये पंचाहत्तर टक्के बाधा असून, बाधेमुळे त्रास होत असतो. याचे शास्त्रीय कारण असे की, ज्या आत्म्याची इच्छावासना शिल्लक राहिली आहे, असे आत्मे आपली इच्छावासना याची पूर्तता करीत असतात. पण हे कारण न समजल्यामुळे, ह्या त्रासाला आपण 'करणी' असे म्हणतो. याचे निवारण केवळ मांत्रिकाला भेटून होत नसते. कारण जी बाधा झाली असेल, त्या आत्म्याची इच्छा काय आहे? हे समजून घेतले पाहिजे. हे समजण्यासाठी दैविक उपासना केलेली असावी लागते की, ज्यामुळे ह्या आत्म्यांची इच्छावासना यातून त्याना मुक्ती मिळून, ते सद्‌गतीला जातील. ह्या बाधा अंगात येत नाहीत, पण त्यांचा उपद्रव असा असतो की, डॉक्टरी उपचार केले तरी रोग काय आहे? हेही कळत नाही.

असे अनेक लोक पीडित आहेत; त्यांच्या निराकरणाबाबत प.पू. बाबांना विचारणा केली. याचे कारण एका भक्ताला असा त्रास होता; व तो मी त्याला सांगितल्यावर तो म्हणाला की, अमुक हा त्रास आहे; असे पुष्कळानी सांगितले आहे. परंतु त्या त्रासातून कुणीही मुक्त केले नाही. उलट फक्त पैसे लुटतात. यासाठी विश्वास कुणावर ठेवावा? असे म्हटल्यावर मी त्याला सांगितले, ''दोन दिवसानी ये, तुझा त्रास निश्चित निवारण होईल.'' त्याप्रमाणे प.पू. बाबांना विनंती केली की, ''जे आत्मे मला दिसतात, ते मी सांगतो, पण सामान्य माणसाना ही दृष्टि नाही. तेव्हा ह्या सांगण्यावर विश्वास कसा बसावा? ह्यासाठी काही मार्ग दाखवा की, जेणेकरून ह्या जगाचा विश्वास बसेल.'' प.पू. बाबा हसले व म्हणाले, ''हे जग विचित्र आहे. 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध घाल'; अशा विचारसरणीचे हे जग आहे. ह्या जगाला भिऊन जाऊ नको. ह्या विश्वासावर काही जग चालणार नाही. ह्या लोकांची चाल वेगळी आहे; व जगाची गति वेगळी आहे. तेव्हा ह्या जगाला विश्वास दाखविला किंवा नाही दाखविला तरी ह्या जगाचा मार्ग वेगळा व आपला वेगळा. त्याना कुठूनतरी सुख पाहिजे असते; पण ज्याला ते सुख म्हणतात, ते दुःख आहे. पण ते मागण्यासाठी शहाणे लोकसुद्धा येतात. मग अशाना शहाणे कसे म्हणावे? पण निदान तुला तरी समाधान व्हावे, अशासाठी मी आशीर्वाद देतो की, जेणेकरून हे जग 'उणीवा'

काढीत बसणार नाही. तेव्हा ह्या पौर्णिमेला सकाळी स्नान झाल्यावर, एक वाटीभर उदी माझ्यापुढे ठेव; व पूजा कर. तो संपूर्ण दिवस ती वाटी माझ्यापुढे राहू दे; व दुसऱ्या दिवशी त्या उदीचा वापर करणी काढण्यासाठी कर.'' त्याप्रमाणे मी केले; व आज्ञेप्रमाणे ताह्मन घेऊन त्यामध्ये पाणी घातले; व वाटीतील चिमुटभर उदी पाण्यात टाकली. त्याबरोबर ती उदी पाण्यात मिसळली. प.पू. बाबा म्हणाले, ''जो कुणी भक्त करणीचा त्रास असलेला येईल, त्याला असे ताह्मन दाखव. त्या ताह्मनातील उदीमध्ये ती बाधा किंवा माकडचेष्टा, म्हणजे मंत्रामुळे जो त्रास होतो तो त्याला दिसेल. जी बाधा किंवा करणी ताह्मनात दिसेल, ती नंतर हळूहळू कमी होईल; व मग त्या उदीमध्ये माझे दर्शन घडेल. हे घडल्यावर बाधा गेली, असे निश्चित समजावे.'' त्याप्रमाणे मी त्या भक्तास बोलाविले; व प.पू. बाबांच्या आज्ञेप्रमाणे ताह्मनात बघण्यासाठी त्याच्यापुढे ठेवले व सांगितले की, ''ताह्मनात तुझी बाधा मोकळी होईल;'' व त्याप्रमाणे तो सुखी झाला; व तेव्हापासून आजतागायत हे कार्य सुरू आहे.



# २७. कार्याचा प्रचार - गोवा येथे कार्यारंभ

अशाप्रकारे वेळोवेळी जो कुणी मनुष्य अडीअडचण घेऊन येत होता, त्याचे दुःख निवारण होत होते. त्याप्रमाणे हळूहळू कार्याचा प्रचार होऊ लागला. त्यावेळी अनेक लोक ''अमुक ठिकाणी या'', ''अमुक गावी या'', अशी विनंती करू लागले. त्याचा मोह आवरला पाहिजे म्हणून प.पू. बाबांची आज्ञा झाल्याशिवाय कुठेही गेलो नाही. पहिली बारा वर्षे मुंबई, पुणे, दिल्ली आदी ठिकाणी कार्यार्थ गेलो; पण कुणाचाही नमस्कार घेतला नाही; किंवा गुरुदक्षिणा असेल ती प.पू. बाबांच्या पुढे ठेवावी, असे सर्व भक्ताना सांगण्यात आले. अनेकानी त्या काळात दीक्षा व नामस्मरण यांचा स्वीकार करावयाचा आहे, अशी इच्छा प्रदर्शित केली होती. शेवटी मी सर्वाना सांगितले की, प.पू. बाबांनी आज्ञा दिल्याशिवाय हा विधि करता येत नाही.

गुरुमार्गात येण्यापूर्वी प्रत्येकाची कुलस्वामी व कुलस्वामिनी असते. जरी त्या देवता प्रसन्न झाल्या नाहीत असे ते म्हणतात, तरी आपण 'गुरू' म्हणून ह्या देवतांना मान्यता दिली पाहिजे. यासाठी ''जेव्हा 'गुरुदीक्षा' हा विधि होईल तेव्हा त्या देवतांना आवाहन करून, मग हवनविधि झाल्यावर मुख्य दीक्षाविधि होईल, तोपर्यंत प.पू. बाबांचे नामस्मरण करीत रहा''; असे मी सर्वाना सांगितले.

यासाठी पहिले नवरात्रपूजन विधिपूर्वक केले. ह्या दहा दिवसात ब्राह्मण-सुवासिनी जेवावयास बोलाविले; व सकाळसंध्याकाळ नंदादीप अखंड ठेवला. ह्या नवरात्रात जो विधि असतो, तो केल्यानंतर श्रीमहाकाली, श्रीमहासरस्वती व श्रीमहालक्ष्मी ह्या देवतांनी संतुष्ट होऊन आशीर्वाद दिला. कारण जो कुणी दीक्षा घेईल, त्याला ह्या देवतांचा आशीर्वाद पाहिजे; असे सांगितल्यावरच दीक्षाविधि देण्याचे ठरविले. ह्यावेळी प्रश्न असा आहे की, दीक्षा म्हणजे काय? केवळ मानवी जन्म आहे, म्हणून दीक्षा घेऊन चालत नाही; तर मानवी जन्म विकसित होणे महत्त्वाचे आहे. यासाठी केवळ भक्त आहे व दीक्षा हवी आहे, म्हणून ती देणे योग्य नाही. तत्त्वज्ञान जे सांगितले जाते, त्याचा बोध झाला पाहिजे; व तो घेणे आवश्यक आहे. नुसते तत्त्वज्ञान ऐकून मोहित

होणे चूक आहे. म्हणून भक्ताला प्रथम 'जागे' करावयास पाहिजे. म्हणजे याचा अर्थ त्याच्या जीवनात दीक्षा धारण करण्यास जागा आहे किंवा नाही हे पाहिले पाहिजे. ती जागा काया, वाचा व मन ह्यामध्ये निर्माण व्हावी, यासाठी पाच दीक्षा व तीन विमोचने आहेत. ह्या आठ अंगानी देहिक माध्यम सिद्ध व्हावयास पाहिजे.

याप्रमाणे जे कुणी भक्तभाविक येत होते, त्यांचे वंशविमोचन करण्यात येऊन, मग पहिली दीक्षा 'उपासना' ही देण्यात आली. प्रथमतः 'उपासना दीक्षा' याचा अर्थ काय हे समजले पाहिजे. आपण जन्म घेतो तो 'इहलोक'; असे म्हणतात. नुसते जन्माला येणे सोपे आहे. परंतु 'जन्म झाला' म्हणून समाधान मानून चालणार नाही. ज्याप्रमाणे इहजन्मात अन्न, वस्त्र व निवारा याची सोय पहावी लागते, त्याप्रमाणे जो जीव जन्माला येतो, त्याचे जीवन घडावे लागते. यासाठी पहिली 'उपासना दीक्षा' आहे. याचा अर्थ 'उप + आसन' हे सिद्ध व्हावयास पाहिजे. ह्यानंतर दीक्षा क्रमशः आहेत; व त्यानुसार आपली प्रगति, म्हणजे ऐश्वर्य नव्हे, तर ज्या ठिकाणी ईश्वर आहे असा आचार, विचार हा दृढ झाला पाहिजे. मग हे समजेल की, ऐश्वर्य श्रेष्ठ की, ईश्वर श्रेष्ठ? नुसते वादविवाद मांडून चालणार नाही. पहिली बारा वर्षे दीक्षा सिद्ध करणे हे असून, पुढे बारा वर्षांनंतर त्याची सांगता करावी लागते. याचा अर्थ आपण सांगतो असा नाही. दीक्षेचे बीजतत्त्व असते. त्याचे कार्य होण्यासाठी जी गुरुआज्ञा होईल, तोच स्वाहाकार करावा लागतो. त्याप्रमाणे पाच दीक्षांचा स्वीकार भक्तभाविकानी केला ह्याची खात्री झाल्यावर, 'स्वाहाकार' म्हणजे दीक्षामाध्यमातून त्या शक्तीचे आवाहन करावे लागते. अशावेळी आवाहन केलेली शक्ति प्रगट होण्यापूर्वी, भक्तांची माध्यमे तयार करावी लागतात की; ज्याप्रमाणे पावसाचे आगमन होण्यापूर्वी शेताची मशागत करावी लागते; व पाऊस पडल्यावर बीज पेरावे लागते. असे केले तरच पाऊस आल्यावर ते बीज उदित होईल, नाहीतर पाऊस येऊन संपत्तीच्याऐवजी विपत्तीचे धनी आपण होऊ. अशी क्रमशः गुरुमार्गात दीक्षा असते. केवळ भक्त जमा करून, त्यांची बेरीज किती झाली याचा हिशोब करणे चूक आहे; हे साधकाला कळले पाहिजे. जीवनात प्रत्येक क्षण हा मोलाचा आहे. येणाऱ्या भक्ताला हे शास्त्र समजत नाही.



कारण जगतात अनेक छंद आहेत; त्यापैकी ईश्वरसेवा हाही एक छंद आहे. पण हा छंद जर गवसला तर जीवनात स्वानंद होईल; नाहीतर फंदात पडाल व हे भूत डोक्यावर बसेल. यासाठी देवाला हाक मारावयाच्या आधी भाक मागा. दुसऱ्याचा हेवा करू नका. कारण देव दिसत नाही. तो कुणाच्याही रूपाने येतो व जातो; व शेवटी, आपले काय चुकले? हा प्रश्न उभा राहतो. भक्तिमार्गात काटे पुष्कळ आहेत. ते मोजता मोजता कोट होतात. यासाठी शहाण्याने अवधान प्रथमतः ठेवले पाहिजे.

वर लिहिल्याप्रमाणे पाच दीक्षा आहेत. वास्तविक दीक्षा ही एकच; पण ती साधकाला धारण करता येणार नाही, म्हणून त्याचे पाच भाग केले. शरीराचे पाच भाग करून, पाच कोशातून त्याची विभागणी केली आहे. त्याप्रमाणे पाच दीक्षा क्रमशः दिल्या जातात. त्यासाठी गुरूंनी सदैव दक्ष रहावे लागते; व दीक्षा घेणारे जे भक्त असतात, त्यांच्याकडे लक्ष ठेवावे लागते. कारण भक्तांची संख्या वाढली की, दक्षिणेचा लोभ वाढतो. त्याकडे लक्ष न देता, आपल्या माध्यमातून ती दीक्षा प्रवाहित होते आहे की नाही हे पहावे. याशिवाय दीक्षा घेणारा भक्त याचे काया, वाचा, मन ही त्रिपुटी असते. अशावेळी दीक्षेचा संबंध प्रथमतः कायेशी यावयास पाहिजे; व त्यासाठी जी 'संकल्प' दिला जातो तो सिद्ध असावा लागतो. संकल्प म्हणजे 'उच्चार'; त्यामागे शक्तीची धारणा असावयास पाहिजे. नुसता उच्चार करून चालणार नाही; व नुसती शक्ति असूनही चालणार नाही; तर युक्ती असावयास पाहिजे. ही शक्ति धारण झाली, म्हणजे दीक्षा प्राप्त होते. त्यासाठी उच्चार स्पष्ट असावयास पाहिजे. संकल्प हा रामायण म्हणून उच्चार झाला, तरी रामायणात 'राम' आहे किंवा नाही हे अनुभवास यावयास पाहिजे; नाहीतर 'जयराम' व्हावयाचा.

पिंड म्हणजे मानव व ब्रह्मांड म्हणजे निसर्ग; याप्रमाणे ह्या विश्वाची धारणा झाली आहे. मानव याचा अर्थ काया, वाचा, मन म्हणजे 'प्रतीक'; व ब्रह्मांड याचा अर्थ उत्पत्ति, स्थिती, लय म्हणजे 'प्रतिमा'. ह्या दोन्हीचा संबंध जेव्हा जगतात होतो, त्यावेळी जगात 'प्रतिभा' उदयास येते. त्यावेळी ह्या जगाचा धर्म चेतना व चैतन्य या माध्यमातून होऊन, जगाची धारणा संपत्ति ही होते. अन्यथा नुसते जन्माला येऊन जन्म व्यर्थ खर्च होणे, ह्यासारखे पाप नाही. यासाठी गुरुमार्गात दीक्षापरत्वे

प्रतिभेचा उदय जीवनात व्हावयास पाहिजे. ते जर प्राप्त झाले नाही तर आपले जीवन 'चैतन्यमय' नसून 'चेतनामय', म्हणजे नुसताच जीव जगतो आहे, असे म्हणावे लागते. अशा प्रकारे जीवन व्यर्थ जाऊ नये, म्हणून प.पू. बाबांनी पाच दीक्षांचे कार्य म्हणजे काय आहे हे सांगितले. त्याप्रमाणे सर्व भक्ताना क्रमशः पाच दीक्षा देऊन व त्यापरत्वे नामस्मरण करून घेतल्यावर, ह्या पाच दीक्षापरत्वे विकसित झालेले पाच कोश, यांचा संबंध एकमेकाशी जोडला जाऊन, अशा अवस्थेचा उपयोग इतराना व्हावा, अशी इच्छा प.पू. बाबांनी व्यक्त केली. त्याप्रमाणे तीन दीक्षांचा संबंध काया, वाचा, मनाशी झाला, तेव्हा ॐकार साधना सुरू केली. प्रथमतः 'ॐ' हा श्रीभैरवनाथांकडून शिकलो होतो. पण प.पू. बाबा म्हणाले, "नुसते असे शिकून चालणार नाही. ह्या ॐकाराचा संबंध विश्वाशी आहे, विश्वाची निर्मिती ॐकारातून झालेली आहे. तेव्हा हा ॐकार सिद्ध होणे आवश्यक आहे. तशी वेळ येईल त्यावेळी तू तयार रहा. आज नव्हे, जेव्हा मला वाटेल की, जगाला त्याची गरज आहे; अशावेळी मी आज्ञा देईन. त्यावेळी जरी तुझ्या पाठिशी हजारो भक्त जमा झाले; व लक्षावधी संपत्ति तुझ्यापुढे आली तरी शब्दाला जाग; तरच जग जागे होईल. हीच जीवनातील कसरत आहे. तुझा लोभ जगावर आहे की, गुरू काय सांगतात त्याचा लाभ घेणे हिताचे आहे, ते त्यावेळी ठरव."

हा प्रसंग ऐकण्यासाठी व वाचण्यासाठी बरा आहे; पण त्या दिवसापासून मी जागरूक झालो. ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीस 'तुझे मरण अमुक दिवसानी आहे'; हे ऐकल्यावर जशी त्याची स्थिती होते तशी माझी झाली. "काय दिव्य सांगणार आहेत?", हा विचार करताना पूर्वाश्रमीचे जीवन आठवले. त्यावेळी मी नोकरीत होतो. त्यावेळी अशीच आज्ञा झाली की, "नोकरी सोड". ही आज्ञा ऐकल्यावर, "पुढे कसे जगावे? यापेक्षा देवाज्ञा बरी"; असे त्यावेळी वाटू लागले होते. पण आता मनाची दृढता निश्चित झाली की, मनाला कशाचेही दुःख मानावयाचे नाही. आज्ञा होताच ती आज्ञा पूर्ण करावयाची, अशी प्रतिज्ञा मी केली. भक्त येत जात होते; व अन्य ठिकाणी केंद्रे कार्यार्थ चालू केली होती. त्यावेळी पुणे, मुंबई व दिल्ली ह्या ठिकाणी कार्य चालू होते.



पुढे गोवा स्वतंत्र झाल्यावर, गोव्याला जावे असे वाटू लागले. पण त्यावेळी असा योग घडून आला की, गोवा बघण्यासाठी म्हणून मी गेलो. कार्याची ओळख व्हावी असे मनात नव्हते. त्यावेळी श्रीपंतांचा उत्सव होता. त्या उत्सवासाठी म्हणून मी बाळेकुंद्रीस गेलो. त्यावेळी एक गोव्याचे रहिवासी जे मुंबईस रहात होते ते ह्या उत्सवासाठी म्हणून बाळेकुंद्रीस आले असताना, माझी त्यांची भेट झाली. त्यांच्या बोलण्यात हा विषय आला. मुंबईस त्यांचा छंद भविष्य सांगण्याचा होता. जेव्हा माझी त्यांची भेट झाली, तेव्हा मी भविष्य सांगत नसून, लोकांचे भविष्य घडवितो; असे त्याना सांगितले. हे ऐकल्यावर त्यानां नवल वाटले. "इतके वर्षात 'भविष्य सांगतो', असे म्हणणारे लोक आपल्याला भेटले, पण भविष्य घडविणारा कुणीही भेटला नाही", असे ते म्हणाले. उत्सवाचे चार दिवस संपल्यावर, "पुढील कार्यक्रम काय आहे? पुन्हा आपली भेट केव्हा?" इत्यादी विचारणा त्यानी केली. त्यावेळी मुंबईचे एक पंतांचे भक्त तेथे होते. माझ्या मनात गोव्यास जावयाचे आहे असे सांगितले; तेव्हा ते ऐकून ते म्हणाले की, "माझी गाडी घेऊन गोव्याला जा; व बरोबर ह्याना घेऊन जा. कारण ते गोव्याचे रहिवासी आहेत". त्याप्रमाणे ठरले. पण त्यावेळी श्रीपंतांनी उत्सवासाठी बोलाविले होते. तेव्हा "त्यांची आज्ञा महत्त्वाची, ती झाल्यास पुढील कार्यक्रम ठरवू". येवढे बोलून, मी ज्यांच्याकडे रहात होतो तेथे आलो. श्रीपंतांचे देऊळ लहान आहे; पण आजूबाजूला आमराई मोठी आहे. जसे रम्य असे क्षेत्र 'औदुंबर' होते, तशी 'बाळेकुंद्री' त्याक्षणी भासली. असे वाटले की, आपली मुलगी लहान असते व हळूहळू मोठी होते. तिचे लाड आईवडील पुरवितात, त्याला 'माहेर' म्हणतात; व दुसरे स्थान बाळेकुंद्री; त्याचा अर्थ 'सासर' असावा असे वाटू लागले. पण माहेर व सासर याचा अर्थ काय? हे समजणे आवश्यक आहे. त्याचा अर्थ शाब्दिक नाही. शब्दांची कसरत कुणालाही करता येते; कारण आपण नेहमी म्हणतो की 'गोड बोलावे'; पण जगतात हे आडनावसुद्धा नाममात्र आहे; मग गोड बोलणे हे बाजूला राहिले.

संतांची भाषा वेगळी असते, हे त्यावेळी समजले. त्या रात्री जेवणखाण झाल्यावर, मी देवळाच्या कट्टयावर बसून होतो. गोव्याला जाऊ की नको? हे पंतांना विचारावयाचे होते; पण सकाळी पंतांचा फोटो उग्र

वाटला; त्यामुळे विचारण्याचे धारिष्ट होईना. त्यावेळी बारा वाजून गेले होते. अशावेळी मोगऱ्याचा वास आला. उत्सव जेव्हा होतो तो महिना आश्विन, तेव्हा मोगऱ्याची फुले मिळणे कठीण. पण अजून मला आठवत आहे की, त्या रात्री आसमंतात मोगऱ्याचा सुगंध पसरला होता. तो वास घेत घेत माझी तंद्री लागली; व शब्द असे जिव्हाळ्याचे ऐकले, "मुला, जागा हो. नवीन प्राप्त करावयाचे आहे. त्यासाठी त्या प्रांताची माहिती पाहिजे. जी आज्ञा तू मागतो आहेस, तो प्रांत गोवा आहे. हा प्रांत इतराप्रमाणे नाही. उठता बसता ह्याना देव लागतो. त्यांची श्रद्धा देवाबद्दल आहे; पण ती पाहून किळस येते. तुला जो मोगऱ्याचा वास आला त्याचा अर्थ 'मोग' म्हणजे प्रेम; पण देवाबद्दल नाही. ते मोग केव्हा समजते? जेव्हा देवाकडून काही मागावयाचे असते अशावेळी ते मोगात येतात; नाहीतर विसरून जातात. यासाठी पहिल्यांदा मोग, प्रेम संपादन कर; व मग कार्याला आरंभ कर."

त्याप्रमाणे गोव्यात प्रवेश केला. त्यावेळी गोवा फारच लहान होते. तेथे एका हॉटेलात उतरलो. त्यावेळी मुंबईस माझ्याकडे येणारे भक्त नोकरीच्या निमित्ताने आले होते. त्यांची माझी गाठ पडली तेव्हा त्यानाही आश्चर्य वाटले. त्यानी घरी बोलाविले व गोव्यात कार्य सुरू करा; अशी इच्छा प्रगट केली. त्यावेळी मी सांगितले की, "मी ताबडतोब कार्य सुरू करीन; पण जर येथील देवतांनी आज्ञा दिली तर, कारण मी गोवा बघण्यास आलो आहे, तेव्हा पुन्हा प.पू. बाबांची आज्ञा घेऊन मग येईन." याप्रमाणे गोवा व देवस्थाने याना भेट देऊन, मी परत पुण्यास आलो; व गोव्याला कार्य सुरू करावयाचे आहे हे विसरून गेलो.

त्या मध्यंतरी सहा महीने लोटले. चैत्रपाडवा झाला; व त्याचदिवशी रात्री देवी मला बोलावते आहे, असे स्वप्न पडले. स्वप्नामध्ये एक सुवासिनी मला बोलावते आहे, भव्य मंदिर व एका बाजूला ब्राह्मण बसला आहे; व सप्तशती वाचत आहे व तोंडाने म्हणत आहे, हे दृष्य मी पाहिले. त्यावेळी पहाटेचे तीन वाजले होते. दुसरे दिवशी प.पू. बाबांच्या फोटोसमोर प्रार्थना केली की, "आरंभापासून माझी उपासना 'पुरुष' ह्या माध्यमातून होते आहे. माझे वडील दत्ताची उपासना करीत होते; व मी त्याच पंथातून चाललो आहे. काल रात्री जे स्वप्न पाहिले



त्यामध्ये 'प्रकृती' म्हणजे देवीचे दर्शन घडले; व ती मला गोव्यास बोलावीत आहे असे दिसले. ही कोण?" तेव्हा प.पू. बाबा म्हणाले, "मूर्खा! तुझी ती आई! आईला विसरून कसे चालेल?" त्याबरोबर औदुंबरची आठवण झाली. रोज सायंकाळी नदीच्या पलीकडे जे देवीचे देऊळ होते, त्या देवळात जाऊन मी जप करीत असे. तेव्हा स्वप्नात पाहिलेली देवी व ती देवी एकच आहे. "त्यावेळी 'जग' म्हणजे काय? याचा अर्थ तुला विचारला होता. 'ज' म्हणजे जननी; व 'ग' म्हणजे गणपती म्हणजेच ॐकार. आता योग्य वेळी तुला बोलाविले आहे, तेव्हा तू अवश्य जा. पुढील साधना ह्यावर अवलंबून आहे." त्याप्रमाणे मी गोव्यास गेलो. गोव्यात शेकडो देवळे आहेत. त्यापैकी प्रमुख देवता कोण? म्हणून मी विचारणा केली. त्यावेळी श्रीशांतादुर्गा व श्रीमंगेश ह्या प्रमुख देवता आहेत, असे कळले. गोव्याला जाण्यापूर्वी, आपल्या इकडे 'कौल' लावण्याचा प्रकार आहे, त्याप्रमाणे 'प्रसाद' घेण्याची पद्धत आहे. गेल्यावर "श्री देवीला जर आपले म्हणणे मान्य असेल तर प्रसाद होतो; व जर मान्य नसेल तर होत नाही;" असे मला एका अनुभवी माणसाने सांगितले. आता आपल्याकडे जो कौल होतो तो प्रसाद गुरव सांगत असतो; व त्याप्रमाणे देवाला प्रार्थना करतो. यामध्ये गुरवाचा भाग किती? व देवाचा भाग किती? अशी शंका माझ्या मनात आली. कारण देवाचा वारसा हक्क ह्या पुजाऱ्याकडे किंवा गुरवाकडे चालत आलेला आहे. तेव्हा 'देवाचे सांगणे', ही परंपराही चालत आली आहे; व ती परंपरा मला नको होती. कारण तसे भक्त व देव मी बरेच पाहिले होते. पूर्वी एकदा हा खेळ काही भक्तासमवेत मी पुण्याला केला होता. जेव्हा नवरात्र बसते, त्या दिवसात घरोघरी घागरी फुंकणाऱ्या बायका असतात. त्याशिवाय गावची देवीची जत्रा असते. त्या दिवशी भक्तांच्या 'अंगात येते', हे खरे आहे की खोटे आहे ह्याची परीक्षा मी घेतली होती; कारण 'अंगात येणे' ही एकप्रकारे भीति बहुसंख्य लोकाना असते. त्यामुळे ह्या भक्ताचे गोड कौतुक होत असते. देव राहिला बाजूला; व ह्या भक्ताचे म्हणणे म्हणजे अंगात आलेली देवी किंवा देव असे समीकरण ठरलेले आहे. तेव्हा प्रसाद घेणे हे गैर नाही; पण त्या भक्ताला देवाची काय खूण आहे? म्हणजे इष्ट प्रसाद झाला असे म्हणावयाचे? हा प्रश्न आहे.

त्याप्रमाणे दोन्ही देवळात गेलो. श्रीशांतादुर्गेच्या देवळात तिच्या पायाखाली एक तांब्याचा पत्रा आहे. त्यावर 'श्रीयंत्र' म्हणजे देवीची प्रतिमा मी पाहिली; व दर्शनाचे वेळी मनोभावनेने तिला विनंती केली की, "मी जे कार्य तुझ्या कृपेने हाती घेतले आहे ते योग्य असेल तर सांग. नाहीतर तुझे असंख्य भक्त तुझ्याकडे येऊन प्रसाद लावतात; व 'प्रसाद झाला', म्हणून समाधान मानून घरी जातात. पण मला संमती पाहिजे आहे. कुणी लोक डोक्यावरचे फुल पडले किंवा अन्यप्रकारे ही संमती समजतात. मला निश्चित खूण पाहिजे; कारण जे कार्य आहे, ते 'मी करणार'; असे मी म्हणून चालणार नाही. त्या कार्यात तू सहभागी व्हावयास पाहिजेस, नाहीतर मी हे कार्य करणार नाही". दर्शनाचे वेळी मी विडा नारळ देवीपाशी ठेवला होता; त्यावेळी पुजाऱ्याने मला बोलावून म्हटले, "प्रसाद न्या". तेव्हा मी म्हणालो, "माझे व देवीचे संभाषण काय झाले? हे तुम्हाला माहीत नाही. नुसती घाई करू नका. मला जो प्रसाद पाहिजे आहे तो देवीकडून, तुमच्याकडून नव्हे"; व मी सभामंडपात बाजूला बसून राहिलो. असाच प्रसाद म्हणून 'खारका' मी औदुंबरला घेतल्या होत्या; पण त्यावेळी ज्ञान नव्हते. आज माझ्यासमवेत जे आले होते, त्यांची देवी शांतादुर्गा आहे; हे मला ठाऊक होते. त्यानाही मी का थांबलो आहे हे कळेना. त्यांचे उपाध्येही बरोबर होते. त्यानीसुद्धा "काय इच्छा आहे?" हे विचारले. ज्यावेळी देवळात गेलो त्यावेळी देवीला अभिषेक चालू होता; व नंतर महापूजा होणार होती. महापूजा झाल्यावर माझ्या अंगावर शहारे येऊ लागले. तशी अवस्था पूर्वी मला येत होती; व त्यावेळी श्रीबहुचराईचा संचार मला होत होता. तशी अवस्था पुन्हा व्हावयास लागली, म्हणून मी भिऊ लागलो, व देवीचा निरोप घेऊन पणजीला आलो; व ज्यांच्याकडे जेवणास बोलाविले होते, त्यांच्याकडे गेलो. त्यांच्या पूजनात प.पू. बाबांचा फोटो व शांतादुर्गेचा फोटो होता. त्यादिवशी आरती झाली; व मग जेवून हॉटेलवर गेलो. दुसरे दिवशी निराश होऊन बाळेकुंद्रीस आलो. जे सांगणे श्रीदेवीस केले होते ते श्रीपंतांना सांगितले. तेव्हा पंतांनी सांगितले, "जो तू प्रसाद मागितला आहेस तो प्रसाद, आज देवी देणार नाही. कारण तो पारमार्थिक असून, बहुसंख्य लोक तिच्याकडे येतात, त्यावेळी ऐहिक मागतात. पण आपल्याला ऐहिक नको आहे. यासाठी थांब. देवीची



कृपा आहेच. त्याशिवाय तू गोव्याला गेला नाहीस. ती शक्ति आहे. तिचा लाभ नंतर होईल; त्यावेळी ह्या देवता गुरुशक्तीमध्ये विलीन होतील. सध्या ह्या ठिकाणी जे नामस्मरण करीत आहेत, त्याचा अर्थ तरी ह्या लोकाना समजला आहे का? कारण कोणतीही गोष्ट ज्ञानी होऊन केल्यास, त्याचे फल आपल्याला मिळते. नाहीतर अज्ञानामुळे भोपळा प्राप्त होतो. ह्या नामस्मरणाचा अर्थ मागाहून कळेल. तू गोव्याला कार्य सुरू कर. मूल लहान असताना म्हातारपण येणार नाही. जर लहानपणी म्हातारे झालो असे भासविले तर ती नक्कल आहे."

त्याप्रमाणे गोव्याला जाणे येणे सुरू होते. पुण्यापासून तीनशे मैलावर गोवा आहे. एवढा प्रवास व प्रवासास साधन नाही, अशी परिस्थिती होती. पहिल्यांदा मुंबईचे एक भक्त यांची गाडी घेऊन मी जात होतो. पण कुणाला चांगले बघवत नाही; व देवदर्शनाआड येणारे लोक या जगामध्ये आहेत. त्यावेळी प.पू. हाजीमलंगबाबांचा उरूस ठरला होता; व त्या उरूसास शेकडो भक्त येणार होते; पण आयत्यावेळी ह्या भक्ताच्या पुतण्याने मी नेत असलेली गाडी खोलून ठेवली; व मला निरोप पाठविला की, गाडी पंधरा दिवसानी तयार होईल. मग काय करावे? दोन दिवसानी उरूस होता. त्यावेळी मी मुंबईला होतो; व तेथील उरूस झाल्यावर गोव्याला जाणार होतो. मग विचार केला की, आपल्याला गाडी घेणे आवश्यक आहे. प्रत्येक वेळेला लोकावर हे कार्य अवलंबून असून चालणार नाही. आपण प्लेनने गोव्याला जाऊ; व मग गाडी घेण्याचा विचार करू, नाहीपेक्षा रेल्वेने जाऊ. त्याप्रमाणे गोव्यास गेलो; व उरूस झाला. त्यावेळी प.पू. हाजीबाबा म्हणाले, "बच्चा डरो मत, पुढील उरूसास तुझ्या गाडीतून तू ये. हम कोई भिखारी नही है ये मालुम होना चाहिए!" त्याप्रमाणे गाडी घेतल्याशिवाय परत पुण्याला जावयाचे नाही; असे मनाने ठरविले; व गाडीच्या शोधात लागलो. शब्द म्हणजे ब्रह्म आहे. एकेवेळी ब्रह्म खोटे ठरेल, पण विभूतींचा शब्द खाली पडणार नाही; याची साक्ष अनुभवास आली. त्यावेळी माझ्यापाशी शंभर रुपये सुद्धा नव्हते व गाडीची किंमत पंचवीस हजार रुपये होती; पण जीवनाला आरंभ मी असा केला की, सोने नसेल तर पितळ घालणारा मनुष्य मी नाही; हा माझा बाणा होता. तो बाणा, याला कारण देव आपल्या पाठिशी आहे, हा दृढ विश्वास!

# २८. घालीन लोटांगण, वंदीन चरण, डोळ्यानी पाहीन रूप तुझे

ह्या काळात गोवा ते दिल्ली आदी ठिकाणी कार्यार्थ जाऊन आलो. पुष्कळ अनुभव जमेस धरून, गुरुलीला अगाध आहे हे कळून चुकले. गुरूंनी साधकाची परीक्षा घेतली, तर 'मी-मी' म्हणणारे साधक काही सबबी सांगून, गुरूंच्यापासून बाजूला होतात. कारण गुरुमार्गामध्ये आल्यानंतर, हा मार्ग 'गुरू' होण्यासाठी नाही. 'गुरू' म्हटल्यावर आपल्यासमोर कुणी एक व्यक्ति आहे, असे लोक म्हणतात; पण गुरू याचा अर्थ 'ज्ञान' असा आहे. हे ज्ञान सर्व चराचरामध्ये भरलेले आहे. त्यासाठी साधकाला दृष्टि लागते. त्याशिवाय सृष्टि काय आहे याचा बोध होत नाही. ह्याठिकाणी दृष्टि म्हणजे डोळे असा अर्थ नव्हे. म्हणून संतांनी म्हटले आहे की, ''घालीन लोटांगण, वंदीन चरण, डोळ्यानी पाहीन रूप तुझे''. आपण 'घालीन लोटांगण' म्हणतो, ही पहिली अवस्था असून, त्याचा अर्थ साधकाला न समजता तो पुढे जातो. जो जन्म आपल्याला प्राप्त होतो, त्या जन्माचे दान देऊन, दास व्हावे लागते. ह्यावेळी कर्मात सुख आहे की दुःख आहे? आदीचा लवलेश राहता कामा नये; म्हणजे जन्म घेतल्यावर, त्या जन्माचे आपण मालक होतो. जोपर्यंत प्राप्त जन्माची मालकी होत नाही तोपर्यंत त्या जीवनाला दान देण्याचा अधिकार प्राप्त होत नाही; व तो झाल्यावर मग 'दास' ही अवस्था प्राप्त होते. पहिल्या अवस्थेस केवळ एक जन्म नव्हे, तर जन्मोजन्मी प्रयत्न करून त्याची प्राप्ती होते. जे फूल देवाला वाहवयाचे असते, त्यावेळी फुलास पाय लागू नये, कुणी सुवास घेऊ नये, आदी बंधने आहेत. त्या बंधनास अनुसरून आपण आचरण केले, तर वाहिलेले फूल म्हणजे जीवन, हे 'निरमलय' होते. त्यासाठी पहिल्या अवस्थेत गुरुमार्गात आचार, विचार, उच्चार हा गुरुआज्ञेने केला पाहिजे. ह्या मार्गात अट्टाहास चालणार नाही. अट्टाहास हा एक प्रकारचा गर्व आहे. तो गर्व कर्मागी असतो; व त्या कर्माचा प्रसाद म्हणून मनुष्य जगाला मुकतो. यासाठी आपल्या मनात जरी असंख्य विचार आले तरी त्या



विचाराना कार्यान्वित करता कामा नये. म्हणजे कर्माचे बरेवाईट परिणाम यापासून बचाव होतो. त्यासाठी दीक्षेचा लगाम पाहिजे; लेझीम नको. ह्या अवस्थेत गुरू भक्ताचे रक्षण करीत असतात. अनेक लोकाना 'रक्षण' याचा अर्थ अजूनही समजला नाही. रक्षण याचा अर्थ प्रत्येक क्षणी गुरूंची कृपा असणे. त्या कृपेने प्रत्येक क्षण जो ह्या जीवनात आहे, व त्याच्या जोडीला कर्म आहे, त्यापासून ''रक्ष रक्ष परमेश्वर''; असे होत असते. असे जीवनाला जो अभय देतो तोच परमेश्वर; पण आपण प्रत्येक क्षणी त्याला विसरतो. तरी तो आपले जीवन सांभाळतो. यासाठी आपले जीवन निर्दोष व्हावे, म्हणून सर्व अवतारी पुरुष प्रयत्न करीत असतात; पण आपण 'उतराई होणे', हेच कर्तव्य विसरून गेलो.

ह्यानंतर दुसऱ्या अवस्थेत 'वंदीन चरण' आहे. पहिल्या अवस्थेत 'दास' झाल्यावर दृष्टीला काय दिसते? हे जग तुझे व माझे नाही. ह्या जगात जन्माला आलो कर्म भोगण्यासाठी; पण तुझी भेट झाली. तू व मी हे द्वैत संपले. ह्या जगात असताना, वासनांचा खेळ चालू राहतो. पुढे 'खेळ' संपतो; पण वासना शिल्लक राहते. त्यासाठी पुन्हा पुन्हा जन्म. यापेक्षा असे जीवन तुझ्या कृपेने प्राप्त होऊ दे की, माझ्या जीवनात तुझा 'वास' पाहिजे. म्हणजे लहान मोठे जेव्हा मला वंदन करतील, त्यावेळी त्याना मी न दिसता, तू दिसला पाहिजेस; म्हणजे पर्यायाने तुझे चरण दिसले पाहिजेत; आणि पुढील जन्मीही तुझे वंदन करण्यासाठी म्हणून आपल्या चरणापाशी, तुझ्या सत्संगतीमध्ये सदैव ठेव. कारण मला जन्माला येतेवेळी जी दृष्टि तू दिली आहेस, तिचा वापर मी न केल्यामुळे, मला तू दिसत नाहीस. एवढेच नव्हे तर माझा आत्मा तो तूच परमात्मा आहेस; एवढेसुद्धा ज्ञान मला नाही. ह्याचा तरी लाभ ह्या जन्मी होऊ दे; अशी माझी इच्छा आहे. निदान तुझ्या चरणी हे जीवन वाहीन एवढीच प्रार्थना आहे.

तिसऱ्या अवस्थेमध्ये, 'डोळ्यानी पाहीन रूप तुझे' हा साधकाचा 'अहंकार' आहे. डोळे केवढे लहान व रूप किती पटीने मोठे आहे. तुझी माया विराट आहे; पण मी प्रेमाने म्हणत असतो 'डोळ्यानी पाहीन रूप', पण हे खरे नव्हे; कारण तू अरूप आहेस. माझी दृष्टि संकुचित

आहे. त्यातून ही दृष्टि फसवू शकते; कारण सोने व पितळ ह्यांचा रंग एकच पण गुणधर्म वेगळा. असा वेगळेपणा माझ्या वाटयाला देऊ नकोस. सत्य काय, असत्य काय ह्याचा अर्थ न समजल्यामुळे, जीवनात अनर्थ झाला. वारंवार मी जन्माला येतो; व तू जन्म देतोस. असे जन्म किती घेतले त्याचा हिशोब नाही. तेव्हा असा एकच जन्म दे की, जन्मोजन्मी मी जन्म घेतला, त्याचे पारणे मला फेडू दे. एवढीच तळमळ लागून राहिली आहे. तू दाता आहेस. जे जे कुणी मागतात त्याना तू देतोस; पण शेवटी हे सर्व तुझ्याशिवाय व्यर्थ आहे. तुझ्या भजनात, तुझ्या आरतीत किंवा तुझ्या नामस्मरणात अमृतमय अवस्थेमध्ये मला राहू दे.



# २९. लंडन येथे कार्य करण्याची आज्ञा व लंडन येथील कार्य

ह्या तीन अवस्थेत आपले जीवन खर्च व्हावे, अशी भूक लागली होती. त्यावेळी वरील प्रार्थना प.पू. पंतांना केल्यावर त्यांनी आशीर्वाद दिला की, ''तुझ्या वाणीने माझी पदे तू म्हणशील, त्यावेळी आंधळा हा डोळस होईल, मुका बोलू लागेल; व जो 'भूक' म्हणतो आहे तो 'भाक' मागेल. ह्या तीन अवस्था म्हणजे काय? हे पुढे तुझा तूच बोलशील. सध्या मध्यरात्रीचा समय आहे. थोडयाच दिवसानी उष:काल तू पाहशील. तेव्हा तू जग पाहून ये. मग आपल्या भारतभूमीत काय कमी आहे व काय जास्त हे समजेल.''

थोडयाच दिवसात लंडनला बोलावणे आले. एक वर्ष विचार केला की, आपला मार्ग व त्यांची दिशा वेगळी आहे; कारण परधर्म व संस्कृती भिन्न. त्यांचा धर्म व संस्कृती समजून घ्यायची की, आपला धर्म व संस्कृती इतराना समजवायची? कारण जर आपण समझोता केला, तर आपले तत्त्वज्ञान बदलले व जगाचेही बदलले; असा संघर्ष चालू होता. शेवटी बाबा म्हणाले, ''तू जेव्हा नोकरी सोडलीस तेव्हा तुझ्या भाऊबंदानी काहूर माजविले होते की, तू नोकरी सोडलीस किंवा धरलीस तरी 'बुवाबाजी' चालली आहे. त्यावेळी तुझ्या माध्यमातून मी बोललो होतो की, वेळ आल्यावर तुम्हाला दिसेल व कळेल की, परदेशात जाऊन मी कार्य करीन. त्यावेळी फक्त नोकरी सोडलीस; पण कार्य म्हणजे काय? हे नात्यातील लोकाना समजले नाही. तेव्हा तू विचार करीत बसू नकोस. लंडनला बोलावणे आले काय वा न आले काय? तू लंडनला जाऊन ये. त्यासंबंधी बोलून काही उपयोग नाही.''

ही आज्ञा शिरसावंद्य मानून, मी जाण्याची तयारी केली. जसे जसे दिवस जवळ येऊ लागले, तसे हे जग काय आहे? हा विचार करू लागलो. कारण पहिली भाषा! ते बोलतात ती त्यांची मातृभाषा होती; व माझे शिक्षण अवघे चार इयत्ता झालेले; त्यात काय इंग्लीश बोलणार व लिहीणार? नाही म्हणण्यास 'तर्खडकरांचे ग्रामर' पाठ होते. त्यावर

आपली मदार. भाषेचा उच्चार समजत नव्हता. त्यामुळे गेल्यावर ह्या इंग्लीश लोकाशी कसे बोलायचे? कसे वागायचे? कुणाची तरी शिकवणी ठेवली असती, पण आपला विषय जगापेक्षा वेगळा! कारण जोपर्यंत सुख असते, तोपर्यंत देव आठवत नाही; व दया त्याहून आठवत नाही. तेव्हा आपला विषय 'दैविक'. तो मार्ग म्हणजे काय? कारण ह्या देशात ह्या मार्गाचे धिंडवडे काढणारे साधक आहेत. फक्त पेहराव बदलला की दैवी मार्ग सुरू होतो; असे पश्चिमात्त्यांचे मत आहे. त्यामुळे हा मार्ग जरी खरा वाटला तरी त्यावर शंभर टक्के विश्वास कितीजणांचा? व अशा जगात जाऊन कार्य करावयाचे म्हटल्यावर, दिव्य वाटू लागले. अशी माझी विचारधारणा झाली. शेवटी आज्ञेचे पालन करणे हेच आपले कर्तव्य समजून; मी जाण्यास तयार झालो. जाण्याच्या दिवशी विमानतळावर शेकडो भक्त हजर होते. पण मी स्वत: गैरहजर होतो. त्याआधीच मी लंडनला पोहोचलो होतो; कारण माझ्याबरोबर मीच होतो. अनेक लोक परदेशात जातात, पण आपली स्वत:ची किंमत विकली जाणे, याचा अर्थ 'परदेशगमन'. पण मला परदेशात 'गमभन' शिकवायचा होता! त्यासाठी ओळख पाहिजे. इकडे शेकडो लोकाना मी माहीत होतो. पण नव्याने आरंभ करावयाचा तो कसा? काही चमत्कार करून की, तत्त्वज्ञान म्हणून काही आधिदैविक मार्गाने भूतभविष्य सांगावे; हेही जमत नव्हते; व प.पू. बाबांना चमत्काराची बाजू मान्य नव्हती. ह्या अनेक विषयात माझे मन गर्क होते. एकूण प्रवास चौदा तासांचा होता. त्यावेळी विमानात बसून जेव्हा मुंबई सोडली, म्हणजे जमिनीवरून न चालता आकाशामध्ये चाललो, तेव्हा "वाचलास तर नाव होईल व जमिनीवर आलास तर फजिती होईल"; असे कानाशी कुणीतरी हसत आहे, असे वाटू लागले. त्यावेळी हाजीबाबांचा शेर मला आठवला; "याद है तो बाद है, भूल गये तो बरबाद है". ह्या चौदा तासात प.पू. विभूतींचे शब्द कानी आले की, "जीवन म्हणजे काय? एवढाच विषय तू बोल; व त्याची प्रचीति तू दाखवशील, तरच नावलौकिक होईल. नुसते लंडनला जाऊन आलो, असे म्हणून चालणार नाही."

एकंदर एक वर्ष मी लंडनला राहिलो. ह्या काळात अनेक संस्थाना भेटी दिल्या. त्यांचे सार्वजनिक कार्य पाहिले. लांबून नव्हे, तर प्रत्यक्ष



ते कार्य कसे करतात? हे अभ्यासिले; व आपल्याकडे कार्य म्हणजे स्वत:चा स्वार्थ, याव्यतिरिक्त अर्थ नाही; असे मला वाटू लागले. अध्यात्मिक संस्थेपासून अनाथाश्रमापर्यंत सर्व कार्य येथील लोक करतात; व येथील नागरिकांचा मुख्य धर्म असा की, कुणालाही नावे ठेवणे हे गैर व पाप असून, आपल्याला जे कार्य करता येत नाही ते हे लोक समाजकल्याणाचे कार्य करीत आहेत, तेव्हा त्याना मदत करणे हे आपले कर्तव्य आहे; व त्याना मदत करणे हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे; अशा भावनेने ह्या संस्थाना मदत केली जाते; व त्यामुळे अशा संस्थाना आर्थिक मदतीची गरज भासत नाही. त्यामुळे ह्या संस्था नि:संकोचपणे कार्य करू शकतात. प्रत्येक क्षेत्रात असे कार्य होत असते. उदाहरणार्थ, नाताळ हा मुख्य सण आहे. त्यावेळी हा वैयक्तिक सण म्हणून साजरा करीत नाहीत; तर इतराना ह्या सणाची मदत आर्थिक म्हणून होत असते. प्रत्येक ठिकाणी खरेदी चालू असते. अशावेळी जो खर्च केला जातो, त्यावेळी खर्चाचा वाटा म्हणून काही रक्कम संस्थेला देतात. आपल्याकडे मागितल्याशिवाय मदत मिळत नाही. कारण इतराना मदत करणे, ही संकोचाची भावना आपल्यामध्ये आहे. याशिवाय कुणाचेही उपकार ते ठेवणार नाहीत. माझ्या अनुभवात काही गोष्टी आल्या, त्या नमूद करणे माझे इष्ट कर्तव्य आहे; म्हणून मी लिहीत आहे. जगात पुष्कळ 'फुकटे' आहेत; पण काय फुकट घ्यावयाचे व काय विकत? याला मर्यादा आहे. येथे इतरांचे पैसे बुडवतील, पण देवाचे नाही. देवाला भजणारे पुष्कळ आहेत; व देवाकडून घेणारेही पुष्कळ आहेत; पण देवाला देणारे मी ह्या देशात पाहिले. त्यावरून देव ही कल्पना नसून, देव प्रत्यक्ष आहे; हे ह्या माणसांच्या कृतीवरून समजते. उदाहरणार्थ, एक मनुष्य मला भेटण्यासाठी स्कॉटलंडमधून लंडनमध्ये आला; व आल्यावर आपल्या कौटुंबिक अडीअडचणीसंबंधी एक तासभर विचारणा करता झाला. माझे सांगणे ऐकून घेऊन, गुरुदक्षिणा म्हणून पंधरा पौंड माझ्या टेबलावर न मागता ठेवले. वास्तविक मला ही अपेक्षा नव्हती. त्याने असा प्रश्न विचारला की, "इकडे आल्यावर तुझे जीवन कशाप्रकारे चालले आहे? लंडन हे शहर महाग असून, ज्या ठिकाणी तुझे वास्तव्य आहे, तो भाग धनिक लोकांचा आहे. एवढा

रोजचा खर्च कोण करते?'' इत्यादी चौकशी माझ्याबद्दल त्याने केली. त्यावेळी मी असे सांगितले की, ''पैसे मिळविण्यासाठी या देशात मी आलेलो नाही. तर जेणेकरून ज्ञान प्राप्त होईल व इतर देशामध्ये स्नेहसंबंध वाढेल, ह्या हेतूने व मानवी जीवनाची मूलभूत तत्त्वे, यांची शिकवण शिकण्यासाठी मी आलेलो आहे.'' हे ऐकून त्याला धन्यता वाटली. एवढेच नव्हे तर डोळ्यात पाणी आले. तो म्हणाला, ''इतक्या लांब, आपला देश, आपला धर्म यांचा योग्य प्रचार करण्याचे कार्य तुझ्यासारखे लोक करीत आहेत, याचे नवल वाटते. तू जे काही निराकरण सांगितले आहेस, त्याप्रमाणे मी आचरणात आणून, माझे काम निवारण झाले की, मी तुला भेटावयास येईन किंवा टेलिफोन करीन.'' वास्तविक लंडनपासून एडिंबरो हे खूप दूर आहे; पण हा मनुष्य निश्चित मनाने मला भेटावयास आला; व आपली अडचण याला भेटल्यावर निवारण होईल, एवढा आत्मविश्वास घेऊन तो गेला. दोन आठवडयानंतर दुपारी माझ्या नावाने टेलिफोन आला. ''मी अमुक ठिकाणाहून अमुक व्यक्ति बोलतो आहे. माझे काम घरासंबंधी होते, त्यावेळी तू सांगितले होतेस की, जे घर तुला घ्यावयाचे आहे ते मला विचारल्याशिवाय घेऊ नकोस. तर आता त्याप्रमाणे तीन घरे मी व माझ्या बायकोने पाहिली आहेत. तेव्हा या तिन्हीपैकी तू सांगशील ते मीं विकत घेणार आहे.'' यावरून हे दिसले की, परदेशात श्रद्धा असते; पण दृढ श्रद्धा ही मला ह्या देशात अनुभविण्यास आली. कारण मी सांगेन ते घर ह्या व्यक्तीला विकत घ्यावयाचे आहे म्हटल्यावर, विचार करणे हा माझा धर्म आहे. त्याप्रमाणे मी अमुक एक नंबर सांगितला; व ते घर पुढील आठवडयात त्याने घेतले; व कागदोपत्री रजिस्ट्रेशनही झाले. त्याप्रमाणे मला फोनवर त्याने ही आनंदाची बातमी सांगितली; व मीपण आशीर्वाद दिला. वास्तविक त्याचे व माझे संभाषण टेलिफोनवर झाले होते; व हा विषय येथे संपलेला होता. दुसरे दिवशी सकाळी माझ्या नावे एक रजिस्टर पत्र आले. त्या पत्रात एकशेएक पौंड म्हणजे आपल्याकडील दोन हजार रुपयाचा चेक, त्याने पत्रासोबत पाठविला होता; व पत्राबरोबर अभिनंदन व दिलेल्या आशीर्वादाबद्दल मन:पूर्वक आभार त्याने मानलेले होते. वास्तविक जेव्हा प्रश्न विचारण्यासाठी तो आलेला होता, तेव्हा जी



रक्कम गुरुदक्षिणा म्हणून दिलेली होती, तीच अधिक होती. त्यामुळे जे काम झाले त्याचा मोबदला पुन्हा मिळावा, अशी अपेक्षा माझी नव्हती. परंतु इतक्या लांबून आवर्जून आपल्याला काय मदत केली आहे? त्याचे मूल्य ओळखून, त्याने ही रक्कम मला पाठविली होती.

लंडनला जाण्यापूर्वी भारतामध्ये वीस वर्षे कार्य मी करीत आलो आहे. परंतु आपल्या अडचणी निवारण झाल्या आहेत; म्हणून सांगण्यासाठीसुद्धा किंवा कबूल करण्यासाठीसुद्धा इकडे लोक येत नाहीत. काही सण, गुरुपौर्णिमा व उरूस आदी महत्त्वाचे दिवस इकडे आपण साजरे करीत असतो; पण ह्या सणाबद्दल आगाऊ निवेदन काढूनसुद्धा, त्यादिवशी न येणारे अनेक लोक आढळतात; कारण ह्या दिवशी न जाणो, आपल्या हातून काही गुरुदक्षिणा देण्याचा लाभ गुरूंना होईल! हे पाप चुकूनही घडू नये, म्हणून हे लोक दक्षता बाळगत असतात. असा अनुभव स्वदेशात; पण परदेशात हा आला! यामागे लिहीण्याचा उद्देश असा आहे की, केवळ पैसा मिळविणे हे कार्य नसून, त्या कार्यात ज्यांचा समावेश होतो, त्या व्यक्तींनी कार्याबद्दल किती जागरूक रहावे? हे अनुभवास आले. वास्तविक कार्य हे कुठल्याही व्यक्तीसाठी नसून ते जगासाठी आहे; म्हटल्यावर आपण जसे अडचणीत आहोत, तसे अडचण निवारण झाल्यावर, त्याचा लाभ इतर दु:खिताना कसा मिळेल? याचा विचार हे लोक करीत असतात.

वरील काही अनुभव माहिती होण्यासाठी लिहीले आहेत. त्याशिवाय तेथील एक संस्था अशी आहे, जिचा अभ्यास 'परलोक' आहे, असे ते म्हणतात. परलोक म्हणजे मेल्यानंतर जीवाचे काय होते? त्या जीवाला मेल्यानंतर काही कार्य आहे किंवा नाही? याचे संशोधन तेथे चालू आहे. यासाठी इहलोकाशी ते आत्मे हितसंबंधित आहेत किंवा नाहीत? हे पाहण्यासाठी तेथील मध्यस्थ ह्या लोकाशी संबंध जोडतात. तो जोडला जातो किंवा नाही? व हे आत्मे सप्तलोकातून येतात किंवा नाही? याचे संशोधन चालू आहे. पण असे आत्मे जरी परलोकातून येण्यासाठी सदैव उत्सुक असतात, तरी त्यावेळी जो आत्मा आला आहे, त्याचे परलोकातील निश्चित स्थळ आपल्याला समजले पाहिजे. कारण बऱ्याच वेळा हे आत्मे काहीही सांगून, ''मी अमुक आहे'', असे भासवितात;

व त्यांची निश्चित दिशा समजत नाही. म्हणून आपण त्या आत्म्याला 'विभूति' असे म्हणतो. 'विभूति' हा शब्द उच्चार करताना सोपा आहे; पण ही अवस्था म्हणजे स्व-इच्छेने ते इहलोकात येण्यासाठी उत्सुक नसतात. एखादा मध्यस्थ, ज्याला काही जगाचे कल्याण व्हावे अशी त्याची इच्छा असली, तरी हे त्याने ठरवून चालत नाही. ज्याना 'विभूति' म्हणतात त्याना हे सत्य पटले पाहिजे की, ह्या मध्यस्थाकरवी लोककल्याणाचे कार्य हा विषय काया, वाचा, मनाने होत आहे. तसे असेल तरच ह्या विभूति इहलोकात येतात. 'विभूति' हा आत्माच आहे; पण त्याचे स्थान स्वर्गलोकात आहे. परंतु त्यासाठी इहलोकात व परलोकात इच्छावासना शिल्लक राहता कामा नयेत. 'विभूति' हा शब्द आपण सहज उच्चारीत असतो, पण त्यांचे स्थान पाचव्या लोकापासून सातव्या लोकापर्यंत आहे. म्हणून मध्यस्थाचे माध्यम योग्य आहे किंवा नाही? हे ते पडताळून पाहतात.

जगात पुष्कळाना 'संचार' होतो. तो खरा किंवा खोटा हा वाद आहे. फक्त 'अंगात येणे' म्हणजे संचार, असे लोक म्हणतात; पण संचार येण्यासाठी मध्यस्थाचा आचार देवाप्रमाणे व्हावयास पाहिजे. ज्याप्रमाणे आपण देवाला नैवेद्य दाखवतो, तेवढीसुद्धा इच्छा आपल्यापाशी शिल्लक राहता कामा नये. त्यामुळे 'संचार' म्हणून जे कुणी आपल्या भक्ताना उघडे नागडे करतात; तो संचार नसून, 'हिंसाचार' आहे हे निश्चित समजावे.

असा संचाराचा एक दाखला वर सांगितला. त्याशिवाय 'परकाया प्रवेश' म्हणून एक साधना आहे. ही साधना काय आहे? याचे बऱ्याच लोकाना ज्ञान होत नाही. 'परकाया प्रवेश' म्हणजे 'कर्णपिशाच्च'; असे अनेक लोक संबोधतात. परकाया प्रवेश म्हणजे पहिल्या लोकापासून सातव्या लोकापर्यंत व त्याशिवाय जे आत्मे पृथ्वीच्या जवळ आहेत, त्यांच्याशी संपर्क साधणे. ह्यामध्ये पहिली अवस्था 'जीवात्मा' असून, जशी जशी आपली प्रगती होईल तशी 'आत्मा' व 'परमात्मा' ह्या अवस्थांची प्राप्ति किंवा लाभ होतो; म्हणजे परकाया प्रवेशामध्ये तीन अवस्था असतात. तेव्हा याची जाणीव व्हावयास पाहिजे की, या माध्यमात जीवाचा प्रवेश झाला आहे की, कुणी परमात्मा याचा प्रवेश झाला



आहे. बहुतेक लोक पहिल्या अवस्थेला बळी पडतात; कारण पहिल्या अवस्थेतील जीव व आत्मा याना त्रिकाल भाकीत सांगता येते. तेव्हा लोकांचा विश्वास ह्या अवस्थेवर बसतो; व त्या अवस्थेलाच आपण 'विभूति' म्हणतो.

'परकाया प्रवेश' व 'संचार' ह्या अवस्था भिन्न आहेत. परकाया प्रवेशामध्ये जो आत्मा इहजगतात येतो तो निश्चित काही एका कार्यार्थ प्रवृत्त झालेला असतो. त्याच्या इच्छावासना तृप्त झालेल्या नाहीत, म्हणून तो येत नाही. गतजन्मात काही कार्य शिल्लक राहिले असेल, तर तो इहजगतात येतो. अशावेळी त्याला परलोकात कुठली अवस्था प्राप्त झाली आहे? हे समजले पाहिजे. त्याच्या स्व-इच्छेने त्याला येता येत नसून, त्याला 'मध्यस्थ' म्हणजे 'मिडियम' मिळावयास पाहिजे; तरच आपले इष्टकार्य तो आत्मा करू शकतो. दिवंगत झाल्यावर परलोकात जे स्थान आपल्याला प्राप्त होते, हे स्थान आपल्याला जीवन असतेवेळी असलेला आपला आचार, विचार व आहार यावर अवलंबून आहे. केवळ देवाच्या मागे लागलो, म्हणजे तो आपल्याला मुक्त करतो; हे खोटे आहे. देवाची मदत आपल्याला लागते. परलोकात एकंदर सात लोक आहेत. त्यांची प्राप्ति देव करून देणार नाही; तर त्यासाठी नित्य आचार, विचार व ज्या धर्मात आपण जन्माला आलो, त्यापरत्वे आपला आहार, यावर अवलंबून आहे. पण समजा आहार योग्य नसला तरी चालेल, कारण आहाराचा संबंध अन्नमय कोशाशी येतो. पण बाकीचे चार कोश ह्यांचा संबंध मरणोत्तर जीवनाशी आहे. यासाठी जन्माला आल्यावर मरेतोपर्यंत खा-खा करू नये. जे आपण खातो त्यामध्ये वासना तीव्र असते. ती हळूहळू वयोमानाप्रमाणे कमी करून, एवढी कमी करावी की, आपण जगण्यापुरते अन्न खावे; व त्या खाण्यात वासना तिळमात्र असता कामा नये. त्याऐवजी 'वास' असला पाहिजे. म्हणजे खाद्यपदार्थांचा नव्हे. 'वास' याचा अर्थ आपण जे जे अनुभविले, त्याचे समाधान होय. ते जर प्राप्त झाले तर पुढची अवस्था प्राप्त होते. नाहीतर आत्मा हा 'श्राद्ध' करण्यासाठी मागे उभा असतो.

जेव्हा लंडनला जाण्याचे ठरवीत होतो, तेव्हा असा विचार आला होता की, आपण तिकडे गेल्यानंतर काय करावयाचे? तेथे करमणूक

म्हणून शंभर टक्के जीवनाचा अपव्यय होतो. पण अभ्यास करावयाचा म्हटले, तर आयुष्य पुरणार नाही; असे हे शहर आहे. जगतात पुष्कळ मोठी शहरे आहेत. मुंबई, कलकत्ता, टोकियो, न्युयॉर्क इत्यादी; पण त्या शहराना आपले म्हणता येत नाही. कारण युगायुगाप्रमाणे आपल्यामध्ये अदलबदल झाला. सांगण्यासारखी संस्कृति कुणाहीपाशी नाही; हे डोळे उघडे ठेवले तर कळून येईल. आज हिंदुस्थानात पुष्कळ शहरे आहेत, पण तेथे राहणाऱ्या समाजाची 'संस्कृति' काय आहे? हा प्रश्न पडतो. अर्धा भारतीय, अर्धा परदेशी असा आचारविचार म्हटल्यानंतर काय संस्कृति म्हणून सांगावयाची? असे आज आपण अनुकरण केले आहे; व ह्या जीवनाला 'आधुनिक जीवनाबद्दलचा स्वाभिमान' असे म्हणतात. पुष्कळसे भारतीय भारताच्या बाहेर जातात; व गेल्यावर 'आपण भारतीय आहोत'; असे म्हणण्यास त्याना कमीपणा वाटतो.

एका प्रसंगाची ओळख मुद्दाम लिहीतो आहे. कारण आपल्या नित्य जीवनामध्ये जे आपण वागतो, तसे वागू लागलो, तर त्या जीवनाला 'मागासलेले लोक', असे आपलेच बांधव म्हणतात. इंग्लंडला गेल्यावर सहा महिन्यानी मला भारतीय हायकमिशनरनी जेवावयास बोलाविले. माझ्याबरोबर आणखी काही भारतीय व्यक्ति होत्या. ज्या ठिकाणी मी राहत होतो, ते घर एका भारतीय माणसाचे होते. त्यालाही जेवणाचे आमंत्रण होते. त्या गृहस्थाने मला असे विचारले की, ''आपण हायकमिशनरकडे जेवावयाला जात आहोत; तेव्हा तुम्हाला पाश्चिमात्त्य पद्धतीने जेवण्यास जमेल काय?'' मी म्हणालो, ''जेवायला गेल्यावर पाहू.'' त्या दिवशी पाच भारतीय व आठ इंग्लीश अशा सर्वांना आमंत्रण होते. आम्ही सर्व गेलो. जेवण भारतीय पद्धतीचे होते. कारण मी शाकाहारी आहे म्हटल्यावर, ज्यानी जेवावयास बोलावले होते, त्यानी हॉटेलमध्ये शाकाहारी जेवणाची ऑर्डर दिली होती. वास्तविक हा विषय खासगी आहे. पण आत्मनिवेदन लिहावयाचे म्हटल्यावर, सर्व वृत्तांत लिहीणे भाग आहे. कारण प.पू. बाबांनी परदेशात पाठविले होते ते मजा करण्यासाठी नसून, आपले लोक परदेशात गेल्यावर आपला देश, धर्म, न्याय, नीति ह्याला कशी मूठमाती देतात? हे शिकण्यासाठी होते. असो.



पुढे जेवणासाठी टेबलावर बसल्यावर, ज्यानी जेवणास बोलाविले होते, त्यानी अपरोक्ष असा प्रश्न विचारला की, ''आपण काय घेणार?'' सहा महिन्यात ह्या प्रश्नाला मी वाकब झालो होतो. तेव्हा मी म्हणालो, ''आपण सर्वजण आपल्याला पाहिजे ते घ्या. मला मात्र ॲपलज्यूस द्या.'' हे ऐकल्यानंतर, जे भारतीय होते त्यांचा चेहरा बघण्यासारखा झाला. एकतर जेवण शाकाहारी; व दुसरे काहीजण मी 'फ्रूट ज्यूस' म्हटल्यावर त्यांचा चेहरा होता की नव्हता असा झाला, कारण मद्य व मांसाहारी जेवण म्हटल्यावर, भूक नसेल तो मनुष्य जेवावयाला बसतो. मग माझ्यासारख्या 'सोवळ्याला' पाहुणा म्हणून जेवायला बोलावणे हे पाप आहे. ज्या देशामध्ये आपण राहतो तेथील रहिवासी कसे वागतात हे तरी आपण शिकावे. ते राहिले बाजूला. ज्यानी जेवणासाठी बोलाविले होते, त्याना निश्चित हे समजले की, मी लंडनला येऊनसुद्धा भारतीय आहे! त्यानी बाकीच्या मंडळीना विचारले, ''तुम्ही काय घेणार?'' पंगत की संगत? असा प्रश्न निर्माण झाला. त्यांच्यापैकी जे खरे इंग्लीश होते त्यानी सांगितले की, ''जे ड्रिंक भागवत घेतील ते आम्ही घेऊ''; व बाकीचे ज्यानी इंग्लीश माणसाचा पेहराव केला होता, त्यानी सांगितले की, ''आम्ही 'व्हिस्की' घेणार आहोत''. त्याप्रमाणे ऑर्डर देण्यात आली. फुकटचे मिळाल्यावर पिण्यात व खाण्यात काही बंधने असतात; ह्याचा त्याना विसर पडला. कारण व्हिस्कीचा धर्म असा आहे! आपण कोण आहोत ह्याचा विसर पडणे, याचा अर्थ 'व्हिस्की'; व तीच जास्त झाली की, 'रिस्की'! जे जेवण मागविले होते ते 'थ्री कोर्स' होते; व वेटर ते आणून देत होते. पण आपल्याला जेवणासाठी कोणी बोलाविले आहे? ह्या जेवणासाठी कुणाला निमंत्रीत केले आहे? व ज्याना निमंत्रीत केले आहे, ती व्यक्ति भारतातून इतक्या दूर ज्या उद्देशाने आली आहे, तो विषय ग्रहण करावा, ह्या सर्वांचा या लोकाना विसर पडला. त्यामुळे आपण इंग्लंडमध्ये नसून भारतातच आहोत, याची मला साक्ष पटली. हे भारतीय पाच हजार मैलावरील इंग्लंडमध्ये नसून, मुंबईत असल्याप्रमाणेच वागताना पाहून, त्यांची कीव आली. अशा प्रकारची आपली कीर्ति आज परदेशात असून, सामाजिक दृष्टया इतके खाली आपण गेलो आहोत.

वास्तविक आपण जन्माला येऊन भारतीय आहोत; हे आपल्याला भूषण आहे. आपला हा देश यामध्ये काय कमी आहे? निसर्गाची देणगी आपल्याला मिळाली असूनही त्याकडे डोळे झाकून, आपण जीवन जगत असतो. इंग्रजानी शंभर वर्षे आपल्यावर राज्य केले; पण आपला आचार विचार त्यानी घेतला नाही. आपण मात्र त्यांच्याप्रमाणे वागणे म्हणजे संस्कृती; या नावाखाली आज बाटलेले आहोत. त्यामुळे 'धोबीका कुत्ता, ना घरका ना घाटका'; अशी आपली अवस्था झालेली आहे.

आपले घर याला वास्तु म्हणतात. धर्मशाळेला वास्तु म्हणत नाहीत. घराच्या चार भिंती आपले जीवन घडवितात. आपले जीवन हा आपला धर्म आहे. त्या धर्माप्रमाणे वागणे, ही शिकवण त्या वास्तूने मिळते. त्यासाठी वास्तूची शुद्धता जेवढी आपण टिकवू, तेवढे आपले आचार व विचार पोषक राहून, आपल्याला व आपल्या कुटुंबियाना सुख, शांति, समाधान मिळत असते. हे जीवन आपल्याला रोजचे आहे; म्हणून त्याची किंमत वाटत नाही.

परदेशात वास्तूची प्रतिष्ठा नसते. त्यामुळे प्रत्येकजण कशा पद्धतीने वागतो? हे तिकडे पाहून आल्याशिवाय समजणार नाही. बाप-मुलगा, नवरा-बायको ही नाती रक्ताची असावयास पाहिजेत. ती नाती आज तेथे भाडोत्री झाली आहेत; व त्याचा 'प्रतिसाद' आपल्याकडेही जवळजवळ उमटला आहे. याचे कारण प्रेम ही भावना नाही. इतरावर प्रेम करण्यासाठी व दुसऱ्याने आपल्यावर करण्यासाठी, दोघानाही पोषक असा आचार व विचार व्हावयास पाहिजे. यासाठी आपल्या धर्मामध्ये आचार व विचार याला देवापेक्षा जास्त महत्त्व होते. आज मात्र प्रत्येकजण आपापल्या इच्छेप्रमाणे वागू लागला आहे. आज जी जागतिक अशांतता आहे, तिचे मूळ कारण आपल्यामध्ये आहे.

वरील घटनेनंतर सबंध वर्षात मी कुणाहीकडे जेवावयास गेलो नाही. नाही म्हणायला एका जर्मन फॅमिलीकडे दर बुधवारी मी जात होतो. ती बाई मला प्रथम भेटावयास, त्यांच्या भारतीय मित्राच्या सांगण्यावरून आली. त्या दिल्लीतील भक्ताने तिला लिहीले होते की, "माझे गुरू तिकडे आले आहेत; तेव्हा तू त्यांचा फायदा करून घे." त्यानी पत्रात



लिहीले होते की, "माझा व माझ्या गुरूंचा परिचय आज दहा वर्षे आहे. हिंदुस्थानातून पुष्कळ लोक तिकडे येतात; व अध्यात्म म्हणजे काय? ह्या विषयावर बोलतात. पण त्यातले खरे किती? व पैसे मिळविण्यासाठी गेलेले किती? हा प्रश्न आहे; कारण अध्यात्म हा आज पैसे मिळविण्याचा धंदा झालेला आहे. परंतु माझे गुरू तसे नसून, अत्यंत सोप्या पद्धतीने हा विषय व हा मार्ग याचे विवेचन करून, ते नित्य साधना सूचित करतात; व ही साधना आपण नियमाने करावयाची असते. तेव्हा तू त्यांना भेट व नवऱ्याची ओळख करून दे. म्हणजे आज मला जी शांति प्राप्त झाली आहे, तशी तुला प्राप्त होईल. ही व्यक्ति लंडनला आहे व पत्ता असा आहे." अशा आशयाचे पत्र तिला भारतातून आले; व मलाही त्यानी तसे कळविले.

परंतु पत्र येऊन भेट होण्यास पंधरा दिवस गेले; कारण ती दोघे ज्या ठिकाणी राहत होते तो भाग लंडनमधील 'सुस्वागतम्' म्हणता येईल असा होता. त्यामुळे तिला संकोच निर्माण झाला की, जो पाहुणा आपण आपल्याकडे बोलावणार आहोत, त्याचा आचारविचार कसा असेल? अशा संभ्रमात एक आठवडा गेला. शेवटी तिने निर्णय घेतला की, आपण जाऊन येऊ; कारण तोपर्यंत भारतातून दुसरे पत्र आले होते की, "माझ्या गुरूंची भेट घेतलीस का?" त्यामुळे आता तिला भेटणे भाग होते. त्याप्रमाणे तिने फोन केला व मी तिला बोललो की, "तू मला भेटण्यास संध्याकाळी सहा वाजता ये." त्याप्रमाणे ती आली; व माझ्या खोलीच्या दारावर तिने टॅप केले. मी तिला होकार दिला; व तिच्या स्वागतासाठी दरवाजाजवळ गेलो. दार उघडल्यावर ती म्हणाली की, "मला डी.बी. भागवत यांना भेटावयाचे आहे." तेव्हा मी म्हणालो, "तुला ज्या व्यक्तीला भेटावयाचे आहे ती तुझ्यासमोर उभी आहे." हे ऐकून तिला एवढा आनंद झाला की, तिला संकोच आवरला नाही. त्याक्षणी तिने मला मिठी मारली; व मी व ती एकमेकाकडे बघत राहिलो. मग मी म्हणालो, "आपण बसू या." तेव्हा ती म्हणाली, "डियर दादा, आपण सर्वकाही घरी बोलू. जर तुला काही भेटी आज नसल्या, तर आपण माझ्या गाडीतून घरी जाऊ." लंडनमध्ये असंख्य गाडया आहेत, पण माझ्या वाटयाला एकही आली नव्हती. तिची गाडी

पहिल्यांदाच बसावयास मिळाली. माझा पेहराव तिला इतका आवडला की, तिने दहा वेळा त्याचे वर्णन केले. आम्ही जात असता, तिने मला विचारले, "लंडनमध्ये किती ठिकाणी हिंडलास व काय काय पाहिलेस?" मी तिला सांगितले, "मला लंडन पाहण्यापेक्षा खूप बोलायचे आहे; व त्यासाठी मी लंडनला आलो आहे." हे ऐकून तिला आश्चर्याचा धक्का बसला; कारण हजारो प्रवासी लंडन पाहण्यासाठी येतात; व मग तिखटमीठ लावून लंडनचे वर्णन करतात. पण मीच तिला असा परदेशीय भेटलो की, ज्याला लंडन पहावयाचे नव्हते. तेवढयात तिचे घर आले. जाताना गाडी चालत होती, त्यापेक्षा माझे डोके याची गति अधिक होती. याला कारण भारतात शेकडो लोकाना मी भेटत होतो, पण आजची भेट वेगळी होती. देवालासुद्धा मी भ्यालो नाही; पण आज होणारी ही जर्मन दांपत्याची भेट वेगळी होती!

गाडीतून उतरून लिफ्टने आम्ही पाचव्या मजल्यावर गेलो; व घरात प्रवेश करण्यापूर्वी कुणाशी आपली भेट होणार आहे? ही आतुरता मनात होती. लागलीच तिने अशी काही हाक मारली की, किती जन्माच्या आपल्या भेटी झाल्या आहेत, असे वाटू लागले. तिचा नवरा जवळ येऊन उभा राहिला व म्हणाला, "माझे नाव 'मायकेल'; व तुझे नाव माझ्या बायकोने आत्ता ओरडून सांगितले आहे; माय डियर दादा!" तिने हा उच्चार केला त्यात सर्व काही आले. मनुष्याने जन्माला येऊन हेच मिळवायचे आहे की, परदेशातसुद्धा आपली किंमत कळली पाहिजे. आपल्याकडे भक्तांच्या वागण्याचे दोन प्रकार असतात, हे तेव्हा कळले. तोंडापुरते "दादा" पण चिंतनात सुखाचा पाढा; व त्या सुखाची प्राप्ति बाबा व दादा केव्हा करून देतील? तेव्हा खरे; असा अनुभव मला नवीन नव्हता. पण एवढया प्रेमाने हाक मारण्याचेसुद्धा धारिष्ट पाहिजे. परदेशामध्ये स्वतःच्या नवऱ्यासमोर दुसऱ्या व्यक्तीला 'माय डियर' असे संबोधणे एवढे सोपे नाही. यावरून आपले मन व त्याची प्रगति किती झाली आहे? याचे अनुमान कळते.

शेवटी आम्ही तिघानी एकमेकाना सांगितले की, आपली ही भेट देवाने घडविली आहे; तेव्हा ह्या भेटीत संकोच नको. ती दोघे मला म्हणाली की, "तू मनमोकळेपणाने येथे राहिलास, तर आम्ही आमचे



भाग्य समजू." त्यादिवशी रात्री दोन वाजेपर्यंत आम्ही बोलत होतो. त्यानंतर जेवणाचा विषय निघाला. तिने जेवण तयार केले होते. "मी मांसाहारी नाही, फक्त शाकाहारी जेवतो"; असे सांगितल्यावर ती दोघे हसू लागली; कारण शाकाहार म्हणजे भरपूर भाजीपाला व त्यात मटण किंवा मासे असा त्यांचा समज होता. मागाहून त्याना कळले की, शाकाहारी जेवण म्हणजे काय? व मग त्या दोघानी माझी माफी मागितली, व म्हणाले, "पुढच्या वेळी आपण सर्वजण शाकाहारी जेऊ; व तू येथे आहेस तोपर्यंत दर बुधवारी येथे ये; व तुला जे काही सांगावयाचे आहे ते मनमोकळेपणाने बोल." मागाहून मला हे समजले की, ती दोघे पदवीधर आहेत. मायकेलचा विषय राजकारण व बायकोचा विषय तत्त्वज्ञान हा होता. त्यामुळे वर्ष केव्हा संपले हे मला कळले नाही.

सुटीच्या दिवशी म्हणजे शनिवारी व रविवारी, मी बाहेर जाऊन येत असे. त्यामुळे लंडनमध्ये काय पाहण्यासारखे आहे हे कळले. मुख्यत्वे बागा व म्युझियम्स पाहण्यासारखी आहेत. तसेच जुन्या काळातील पेंटींगस्‌ही पाहण्यासारखी होती. माझा मूळ स्वभाव चित्रकला शिकण्याचा होता. घरच्या परिस्थितीमुळे मला शिकता आले नाही. पण मग शिकलो ह्या जगापासून; कारण जग ही रंगभूमी आहे. ह्या भूमीत नानाविध रंग आहेत; पण भूमि मात्र एकच आहे, त्याचा पत्ता ह्या रंगीन लोकाना लागत नाही, म्हणून हे जग दुःखी आहे; असे आपण मानतो.

"मूळ रंग तीन असून, त्यापासून सात रंग तयार होतात. हे रंग सहसा आपल्याला दिसत नाहीत. पण ह्या तीन रंगातच विश्वाचे कार्य चालू आहे. प्रातःकाली जो रंग क्षितीजावर आपल्याला दिसतो तोच रंग बारा तासानी पुन्हा दिसतो. ह्या रंगालाच उदय व अस्त असे म्हणतात. जो रंग 'उदय' म्हणून असतो, त्याचा अर्थ 'स्थिती'; व अस्त म्हणजे सायंकाळ, ह्याचा अर्थ 'उत्पत्ति' होय. जन्माला आल्यावर उत्पत्ति + स्थिती = लय, म्हणजे जीवन," असा अर्थ त्या दांपत्याला सांगितला. 'विश्वाची निर्मिती व कार्य, व जन्माला आल्यावर आपले कार्य काय?' एवढा विषय त्यांच्यासमोर मांडला. मायकेल व सिल्व्हा अभ्यासू होते.

जेव्हा मी त्यांच्या घरी गेलो तेव्हा एक कपाट नानाविध विषयांबद्दलच्या पुस्तकानी भरलेले पाहिले. त्यात पॉल ब्रन्टनची वेदाबद्दलची पुस्तके व चिन्मयानंद यानी लिहीलेली पुस्तके मी पाहिली. तेव्हा त्यापेक्षा काही वेगळेपणा आपल्यात दिसला पाहिजे; तेच तेच बोलू लागलो, तर तेच तत्त्व आहे; असे लोक समजतील. यापेक्षा जगाला काही नवीन शिकवावे; असे ठरवून घरी आलो.

दुसरे दिवशी गुरुवार होता. सकाळी पूजा झाल्यावर प.पू. बाबांना म्हणालो, ''येथील जग निराळे आहे. मला आपण परत बोलवा. इकडील आचार, विचार व भाषा ही आपल्याला अवगत होणारी नाही. लंडनचा देखावा मला समजला.'' 'झाकली मूठ' म्हणून आपण परत जावे, असा विचार करीत, प.पू. बाबांसमोर बसून अक्षरश: रडलो. ह्यामध्ये सकाळचे दहा वाजून गेले होते. शेवटी नाश्ता करून मी बाहेर पडलो; व असे मनाशी ठरविले की, खूप दूर जाऊन बाबा काय म्हणतात याचा विचार करू. तेवढयात बाहेरच्या रस्त्यावर सिल्व्हा मला भेटली व म्हणाली, ''मायकेल काही कामानिमित्त पॅरिसला गेला आहे; व सायंकाळी येणार आहे. 'मधल्या वेळात तू दादांना जाऊन भेट, त्यांची निश्चित गाठ पडेल' असे त्याने सांगितले.'' ती आल्यामुळे मला माझा प्रोग्रॅम बदलावा लागला; व मी व सिल्व्हा एका बागेत गेलो. ती बाग भव्य होती; व सर्वत्र हिरवेगार होते. जातानाच जेवणापायी वेळ जाऊ नये, म्हणून तिने जेवण बरोबर घेतले होते. शेवटी तिनेच कालचा विषय काढला. मी म्हणालो, ''सिल्व्हा, तुझ्या घरी तत्त्वज्ञानावरची असंख्य पुस्तके आहेत; तेव्हा तूच एखादा विषय काढ, मग मी बोलेन.'' तेव्हा ती म्हणाली, ''आजपर्यंत शेकडो पुस्तके वाचून, डोक्याचा खेळखंडोबा झाला. तेव्हा तू काहीतरी बोलून, माझे समाधान होईल असे सांग. हॉटेलमध्ये जे मेनुकार्ड असते ते आता आम्हाला नको आहे. आम्हा दोघांची पार्श्वभूमि तयार आहे. देव व धर्म खोटे आहेत, असे आम्ही मानत नाही. परंतु 'देव' म्हणजे काय व कुणाला म्हणावयाचे? धर्म म्हणजे काय? ह्या जगात धर्माच्या नावाखाली विडंबन चालले आहे; व अजून देव म्हणजे काय व धर्म म्हणजे काय याचे उत्तर मिळत नाही. ज्या तत्त्वज्ञानाचे वाचन आम्ही दोघानी केले आहे, त्या लेखकानी या मार्गाला स्वत:



वाहून घेतलेले आहे. परंतु आमच्यासारख्या सामान्य माणसाना त्या तत्त्वज्ञानाची प्रचीति आल्यावर, आम्ही त्याला सत्य म्हणू. पुष्कळसे लोक भारतातून येतात व व्याख्याने देऊन, ''हा मार्ग गूढ आहे;'' असे मत प्रतिपादन करतात; त्यामुळे त्यांच्याशी ह्या विषयाबद्दल बोलणे, हे विष वाटते रागावू नकोस. आमची श्रद्धा आहे व नाही; अशा संभ्रमात आम्ही आहोत. कारण आमचे व आमच्यासारख्या इतरांचे जीवन तुला माहीत नाही. दुसऱ्या महायुद्धात आमचे आईवडील बॉम्बहल्ल्यात बळी पडले; व शेवटी आमचे संगोपन 'रेडक्रॉस'मध्ये झाले. त्यामुळे मला व मायकेलला आई व वडील म्हणजे काय व त्यांचे प्रेम म्हणजे काय हे माहीत नाही. फक्त रेडक्रॉस कॅम्पमध्ये प्रार्थना रोज म्हणत असू. प्रार्थना झाल्यावर धर्मगुरू म्हणायचे, ''लढाई लवकर संपेल; व देव तुमचे रक्षण करेल.'' ह्या विश्वासावर आम्ही आजपर्यंत जगत आहोत. लंडन हे गाव आमचे नाही. आम्हाला आमचे जन्मगाव ठाऊक नाही; व जरी ठाऊक झाले तरी त्याठिकाणी आता कोण आहे? केवळ जगण्यासाठी लंडन हे शहर आम्ही पसंत केले. तेव्हा आमचा देश हा देवाला माहीत; व आमचे दु:ख देवाला माहीत. म्हणून तू इकडे आलास व आम्हाला भेटलास; त्यामुळे आम्ही जन्मभर देवाचे ऋणी आहोत. एवढे मोठे जग! ह्या जगात दुसरे महायुद्ध झाले. पण आमचे रक्षण देवाने केले. त्यामुळे दर रविवारी चर्चमध्ये जाणे, हा आमचा धर्म आहे व कर्तव्य आहे; असे समजून आम्ही जगतो आहोत. ह्या जगात मला कुणीही नाही; व मायकेललाही कुणी असेल असे वाटत नाही. म्हणून पहिल्या दिवशी तू जेव्हा भेटलास तेव्हा 'माया' म्हणजे काय हे कळले. मायेचे विवेचन पुस्तकात सांगितले आहे; पण माया म्हणजे काय हे तू भेटल्यामुळे समजले.''

इतक्या आशेवर मनुष्य जगू शकतो, हे मी ह्या दिवशी समजलो. सायंकाळी मी घरी परत आलो; व सिल्व्हा आपल्या घरी गेली. पण त्या दिवसापासून हा विचार करू लागलो की, हे जग म्हणजे काय आहे? व ह्या जगाची खोली नीट समजली पाहिजे. लोक एकमेकाना भेटतात. पण त्या भेटीत काही जीवनातील गणित सामावले आहे; हे कुणालाही समजत नाही. त्यामुळे एकमेकाना भेटूनही त्याची किंमत शून्य असते.

पुढील आठवडयात मी त्यांच्या घरी गेलो. जेवणामध्ये फक्त शाकाहारी पदार्थ केलेले होते. आपल्या इकडे काही गैर आचाराने वागणे, याला भूषण म्हणतात. पण त्या दोघानी मांसाहारी असूनही, केवळ माझ्या संगतीमध्ये आपले जीवन व्यतीत व्हावे, म्हणून शाकाहारी जेवण पसंत केले. ह्यावरून हे सिद्ध होते की, निश्चय ठरला की, व्यसने आपल्या आधीन होतात.

ह्याप्रमाणे दिवस चालले होते. त्याना मी आपल्या समितीचे कार्य म्हणजे काय? याची ओळख करून दिली. प्रत्येक जन्माला येणारा मनुष्य, याचा विकास होणे आवश्यक आहे; व तो विकास होण्यासाठी केवळ पूजापाठ करून चालत नाही. त्यासाठी नित्य पंधरा मिनीटांच्या साधनेची आवश्यकता आहे. ती साधना प्रामाणिकपणे केल्यावर, आपण हळूहळू देवापाशी जाऊ. देवाकडे नव्हे! कारण देवाकडे शेवटी नाईलाजास्तव आपण जातो. हे म्हणण्यामध्ये खूप अंतर आहे. कारण एक अवस्था अनंत आहे; व दुसरी अवस्था अंताची आहे. हे समजून घेऊन जो कुणी साधना करतो, त्यालः देवाची भेट इहजगतात होते. जशी आपल्याला देवाची मदत लागते, तशी मदत आपण इतराना करणे म्हणजे काही कमीपणा नाही; उलट आपली मदत इतराना उपकृत होते. एवढे ज्ञान व साधना मी भारतात सगळ्याना शिकवित आहे; व परदेशी आल्यावरही तीच साधना सांगत आहे. चमत्कार वगैरे मला वर्ज्य आहे. चमत्कार करणे म्हणजे चमत्कारिक वागणे व बोलणे; असे मी मानतो. त्याचा काही उपयोग नाही. जन्माला आल्यावर प्रत्येकालाच 'मरण' आहे. पण जोपर्यंत आपल्याला जाणीव आहे तोपर्यंत 'शरण' जाणे हे आपले कर्तव्य आहे.

एवढा विषय नानाविधरूपाने व दाखले देऊन, त्याना समजावून, त्या उभयताना 'सेवक' म्हणून तयार केले; व आज ती दोघेही सेवकाचे कर्तव्य पार पाडीत आहेत; याबद्दलचा अभिमान वाटतो. इंग्लंडला जाऊन पैसे मिळविले नाहीत, पण माणसे जोडली; त्यामुळे त्याना माझी व मला त्यांची आठवण सदैव होते. ही कृपा प.पू. बाबांची म्हणावी लागते.



जवळजवळ एक वर्षानंतर मी भारतात येण्यासाठी तयारी केली; व याकाळात सर्व जग पाहिले म्हणालात तरी चालेल. कारण लंडन शहरात जगातील सर्व लोक, त्यांची भाषा व चालीरीती ह्या पाहिल्या. एकूण सर्वकाही पाहिले. दुरून डोंगर लहान दिसतो; पण चढण्यासाठी तो फार मोठा असतो. 'कार्य' हा शब्द अगदी लहान आहे. म्हणजे तो दोन अक्षरी शब्द आहे. देहाने जेव्हा क्रिया होते, त्याचा अर्थ कार्य असे लोक म्हणतात; पण 'कार्य' हा शब्द सागरासारखा आहे. ते करीत असताना आपण संपून जाऊ; पण कार्याचा उगम केव्हा व कुणी केला याचा अंत लागत नाही. मग जो 'अनंत' आहे, त्याचा अंत कधीही लागत नाही हे म्हटल्यावर, 'मी हे केले'; असे म्हणणे व्यर्थ आहे. जो करविता व घडविता, तो तोच आहे. फक्त आपले कर्तव्य एवढेच की, आज्ञा पालन करणे. आपण अधिक शहाणे आहोत; म्हणून त्याचा अर्थ किंवा अनर्थ आपण लावतो; पण अधिक शहाणपण तरी दिले कुणी? याचा अर्थ समजला पाहिजे. नुसता वाद करून शहाणपण येत नाही. यासाठी ह्या जगात आपण कुणीही नाही; हे जेव्हा स्वतःला समजेल, तेव्हा जग म्हणजे काय? हे समजेल. पण नुसता फाजील गर्व, आपल्याच नाशाला कारणीभूत होतो. जेव्हा इतराना दुःख द्यावयाचे असते तेव्हा आपल्याला काही साधना करावी लागत नाही. पण नुसते गोड बोलावे, यासाठी आपल्याला साधनेची बंधने पाळावी लागतात; तरच जग सुखी होईल. असे तत्त्व आपल्या आचारात यावयास पाहिजे. एवढे शिकून मी भारतात परत आलो. इकडे असताना 'मन व विचार' याचा अभ्यास 'साधना' म्हणून मी केला होता; पण 'आचार' हा महत्त्वाचा कार्यभाग जीवनात आहे, हे बाहेर गेल्यावर समजले.

# ३०. हिंदुस्थानात पुनरागमन व पुनश्च कार्यास सुरुवात; पुढील कार्यासाठी प.पू. बाबांचे मार्गदर्शन

हिंदुस्थानात परत आल्यावर असे ठरविले की, पुन्हा 'कामकाज' म्हणजे ऐहिक प्रश्न सोडविणे, यापेक्षा वेगळे कांही द्यावे. जगाला काहीही दिले, तरी हे जग 'पुरे' हा दोन अक्षरी शब्द, आपला जरी अंत झाला तरी उच्चारणार नाही. तेव्हा ऐहिक बाजू पंचवीस टक्के व पारमार्थिक पंचाहत्तर टक्के, असे दिले पाहिजे. त्याचीच गरज विश्वाला आहे; व त्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत, असा विचार केला. नुसते जग पाहून आलो; हे म्हणणे जगाला पटले, तरी मला ते पटेना. कारण महत्त्वाचे कार्य अजून बाकी आहे; ते कार्य हाती घ्यावे, अशी तळमळ लागून राहिली. तशी प्रार्थना करून, मार्गदर्शनाबद्दल प.पू. बाबांना विनंती केली. तेव्हा प.पू. बाबा म्हणाले, "तुझे पाच पीर काय म्हणतात? हे विचार. नुसती माझी आज्ञा हवी, असे म्हणून तळमळत राहू नकोस; तर 'तळमळ' ह्या शब्दाचा बोध घे. आज जगाला तळमळ आहे सुखाची. हे डोहाळे आहेत भीक मागण्याचे. ते डोहाळे पुरविणे म्हणजे कार्य नव्हे, हे लक्षात घे. 'कार्य', 'कार्य' म्हणून तू म्हणत आहेस; पण बाळ जर अजून अंगावर मुतत आहे, तर त्याची मुंज आत्ताच नको. मी त्याबद्दल नंतर सांगेन. आजपर्यंत जे कार्य आपण करीत होतो ते वाया गेलेले नाही; पण जोपर्यंत चाड शिल्लक आहेत तोपर्यंत त्याचे मोजमाप करू नकोस. पुढील टप्पा महत्त्वाचा आहे; त्यासाठी शंभर टक्के भक्त पाहिजेत. नुसती भक्ती असे म्हणून सक्ती करणारे नको आहेत; तरच पुढील मार्ग सूचित करीन. नुसत्या अडीअडचणी विचारणारा समाज आता नको आहे. कारण माझ्यावेळेला जग निराळे होते; व आजचे जग वेगळे आहे. 'गुरुचरित्राचे पारायण कर. तुझी संकटे दूर होतील'; हे ऐकून ज्या भक्तांचा पारा चढतो, ते लोक देवाची सेवा करतील? त्यापेक्षा देव नसला तरी त्याना चालेल. दोन वेळेला जेवावयाला मिळते आहे, मग अधिक त्रास कशाला घ्यायचा? आजची वेळ भागते आहे, पुढचा विचार पुढे करू; असे जग जन्माला येणार आहे. त्या जगाला सोपा मार्ग दाखविणे, हाच आजचा परमार्थ आहे.



माझी आज्ञा होईतोपर्यंत, आहे तेच कार्य चालू राहू देत. ह्या काळात लोकसंग्रह करणे आपले कर्तव्य आहे. जे लोक येतील त्यांचा कमीपणा दाखवून, नावे ठेवून, ते बाजूला जातील असे वर्तन घडू नये. कारण लोकाना संग्रहित ठेवणे हा आपला ठेवा आहे!"

त्याप्रमाणे कामकाज नित्यनियमाने होत होते. त्यामध्ये भक्तांच्या दुःखाचे कारण सांगून, त्याला निराकरण व जीवनाचा धर्म म्हणजे काय? आदी मुलाखती चालू होत्या. पुष्कळ वेळा असे वाटे की, सर्व भक्ताना एकत्र आणून 'सेमिनार' घ्यावे; व निरनिराळे विषय यांची ओळख न सांगता, एकाच विषयाला प्राधान्य द्यावे, जेणेकरून भक्ताना एकाच पातळीवर सर्व विषय समजतील. पण नुसती इच्छा असून चालणार नव्हती. सर्व इच्छा प.पू. बाबांच्या आधीन होत्या. त्याप्रमाणे मी वाट बघत होतो. या काळात बारा वर्षे गेली. ही वर्षे फुकट गेली नाहीत; तर मुख्य साधना ही सिद्ध व्हावयास पाहिजे; असा संदेश प.पू. बाबांचा मिळाला. पूर्वाश्रमी जी सेवा मी करीत होतो ती सेवा माझ्यापुरती होती. पण आता जगाला साधना शिकवायची होती, ती म्हणजे 'ॐकार साधना'. पूर्वी लिहील्याप्रमाणे 'ॐकार' हा श्रीभैरवनाथांनी शिकविला; व 'ॐकार साधना' ही जगाला शिकवायची आहे; यामध्ये फरक काय? हा प्रश्न उभा राहिला. "त्यासाठी 'कामकाज' म्हणजे ऐहिक प्रश्न हे बंद करावयास पाहिजेत, तर पुढील मार्गाचा प्रवास सुरू होईल"; असे प.पू. बाबांनी स्पष्ट सांगितले. ह्या कालात दोन तपे सेवा झाली होती; व भारतभर समितीचे कार्य परिचित झाले होते. "ॐकार साधनसिद्धता यामध्ये ज्या पुण्य विभूतींचा आशीर्वाद आहे, त्यांचा समावेश ह्या कार्यात आहे. तेव्हा त्यांची आज्ञा महत्त्वाची आहे"; असे प.पू. बाबांनी सांगितले. त्या दिवसाची व वेळेची मी वाट पहात होतो. तो सुदिन आला. त्यावर्षीची गुरुपौर्णिमा मुंबईस झाली. असंख्य लोक जमा झाले होते; व मी आरती म्हणत होतो. ह्यापूर्वी मी आरत्या म्हटल्या असतील. त्या आरतीमध्ये देव होता, पण देवत्व म्हणजे काय हे ह्यादिवशी आरती म्हणत असताना समजले. आपण ह्या जगात आहोत की, वेगळ्या जगात आहोत हे समजेना. आजूबाजूला भक्त होते व आरतीही म्हणत होते; पण त्यादिवशी आरतीमधील 'आर्तता' म्हणजे काय हे समजले.

आरती संपल्यावर तीर्थप्रसाद घेऊन लोक घरी गेले. पण माझी स्थिती वेगळी झाली; कारण प.पू. बाबांची आज्ञा अशी झाली की, "आज दिवसापर्यंत हे जग आपले नाही. नव्याने जगाची निर्मिती करावयाची आहे. त्यासाठी उद्यापासून सर्व केंद्रावरील कामकाज तू बंद करावयाचे आहे; व नवीन जगाला तू आरंभ कर. नवीन जग सोपे नाही, हे मागाहून समजेल."

तो दिवस गुरुपूजनाचा ता. ३० जून १९७७ हा होता. त्यादिवसापासून वेगळी किरणे दिसू लागली. म्हणजे आपली दिशा भिन्न आहे हे कळले; व आता ऐहिक जगातून पारमार्थिक जगात प्रवेश करावयाचा आहे, हा निश्चय केला.

पुढे पुण्यास आल्यावर, नित्य साधना झाल्यावर, राहिलेला वेळ खोली बंद करून विचार करू लागलो; पण मनाशी योजना कशी आखावी? हे गणित काही निश्चित होईना. शेवटी नवरात्र उजाडले. देव बसविले; व सकाळ सायंकाळ पूजा, आरती, साधना करीत होतो. पंचमीच्या दिवशी पहाटे श्रीदेवीचे दर्शन झाले. पूर्वी एकदोनदा देवीचे दर्शन अगदी सौम्य व सुंदर असे पाहिले होते; पण त्यादिवशी देवीचे रूप अक्राळविक्राळ व रागीट दिसले. म्हणजे ती श्रीमहाकाली असावी, असे वाटले. दसऱ्याच्या दिवशी प.पू. बाबांचे मार्गदर्शन, असे झाले की, "ती शक्ति आहे. तिची स्थापना तुला पुढे करावयाची आहे. त्याआधी आज जी शक्ति प्रसन्न झाली आहे, ती 'लय' आहे. तिला पचव; म्हणजे मग मी सांगेन."

त्याच दिवशी मी आजारी पडलो. अन्न पचेना. उलटया होऊ लागल्या. शेवटी दवाखान्यात गेलो; व आठ दिवसानी परत आलो. विश्रांती घेऊन, दिवाळी झाल्यावर गोव्याला आलो. तेथेही कामकाज बंद केले; व "नियुक्त सेवकानी कामकाज करावे, अशी आज्ञा प.पू. बाबांची आहे; तिचे पालन सर्वांनी करावे," असे मी सांगितले. "पुढील कार्य जगाच्या हितासाठी मला करावयाचे आहे; तेव्हा मी कामकाज न करता, जे कुणी सेवक आहेत ते करतील;" असे सांगून मी पुण्यास आलो.



जी स्थिती मी दसऱ्यापूर्वी अनुभविली होती, त्याचे पडसाद उमटू लागले. शेवटी हताश होऊन प.पू. बाबांना विनंती केली की, "जे कार्य आपणास करावयाचे आहे ते ह्या जन्मात होईल की नाही, ह्याची खात्री मी सांगू शकत नाही. अजून आरंभ झाला नाही तर मी आजारी पडलो; व मरतो की जगतो अशी स्थिती माझी झाली. अशी अवस्था कुणाच्याही वाटयाला येऊ नये. झाले कार्य ह्याला मी हात जोडतो." असा विचार करीत मी पुण्यास होतो. पण मी जरी गप्प बसलो तरी प.पू. बाबा गप्प बसले नाहीत. अशी आज्ञा झाली, "मी सांगतो आहे त्याचा फक्त विचार करू नकोस. सामर्थ्य मी देणार आहे. आजारी पडलास तरी मरणार नाहीस हे निश्चित; आणि जर मरण आले तर कर्माने मरू नकोस; धर्माने मर. ह्यातच जीवनाची सार्थकता आहे. हताश होऊ नकोस. चोरसुद्धा चोरी करतेवेळी, हातात शस्त्र असल्यावर भीत नाही. मग तू का भितोस?"

हे ऐकल्यानंतर निर्णय असा घेतला की, शेवटपर्यंत, जीवात जीव आहे तोपर्यंत प.पू. बाबांची आज्ञा होईल त्याप्रमाणे वागणे. 'आज्ञा होईल त्याप्रमाणे वागणे आपले कर्तव्य आहे'; ह्या आत्मविश्वासाने आजच्या दिवसापर्यंत मी उभा आहे.

यानंतर प.पू. बाबांचे मार्गदर्शन असे झाले; "यापुढील कार्य हे जगाला तारण्यासाठी असून, त्यासाठी तारकमंत्र सिद्ध झाला पाहिजे. तुला लहानपणी जो ॐकार श्रीभैरवनाथांनी शिकविला आहे, ही साधना जगाला पेलणारी नाही; कारण यात आचार, विचार व मग उच्चार आहे. आजचे जग स्वार्थासाठी बापालासुद्धा 'बाप' म्हणणारे नाही. मग ॐकाराचे पथ्य ह्या लोकाना कसे सांभाळता येईल? तू जो ॐकार शिकला आहेस ते लय तत्त्व आहे; म्हणजे नाद! त्यातून नाद-सूर-स्वर ह्या क्रमाने साधना ही सोपी करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रथमत: ॐ हा जो नाद आहे तो शब्दरूप व्हावयास पाहिजे; म्हणजे तो सर्वांना म्हणता येईल. यासाठी संक्रांतीपूर्वी तू नरसिंहसरस्वतीला भेटण्यासाठी वाडीला जा. कारण हा ॐकार फक्त ह्या स्वामींपाशी आहे. त्याचा जन्म दत्तप्रभूंच्या आशीर्वादाने झाला आहे. जन्म झाल्यावर आपली

मुले रडतात; पण ह्याचा जन्म रडण्यासाठी नसून, जगाला हसविण्यासाठी आहे; व तुझ्याही बाबतीत दत्तप्रभूंनी तुझ्या वडिलांना आशीर्वाद दिला, तेव्हा तुझा जन्म झाला. इतकी साम्यता तुझ्या व स्वामींच्या जन्मामध्ये आहे. फक्त काळ वेगळा आहे. तेव्हा हा जो ॐकार त्याच्यापाशी आहे, त्याची मागणी तू केलीस, तरच प्राप्त होईल. नुसते 'ॐ' असे म्हणून चालणार नाही; व दुसऱ्याला प्राप्त होणेही शक्य नाही. यासाठीच तुला 'कामकाज बंद ठेवावे'; असे सांगितले. कारण ऐहिक प्राप्ति हे संन्याशाला विष आहे; व जो ॐकार ते जन्मतः घेऊन आले तो त्यांच्यापासून त्यांच्या कृपेशिवाय प्राप्त होणार नाही. यासाठी ऐहिक प्राप्तीचा लोभ ठेवलास, तर ॐकाराच्या ऐवजी बोंबाबोंब होईल, हे लक्षात घेऊन वाडीला जा. आम्ही सर्व विभूति त्या दिवसाची वाट पाहू. तथास्तु, तथास्तु, तथास्तु! ह्या जन्मात तू चिरंजीव होशील.''



# ३१. ॐकार साधनसिद्धता - श्री नृसिंहसरस्वती यांचे मार्गदर्शन

त्याप्रमाणे मी वाडीला गेलो. जाताना इच्छा ही होती की, काम हे ह्याचवेळी व्हावे; पण तें काम सामान्य नव्हते. वाडीच्या हद्दीत गेल्यावर, जी ॐकार साधना मला स्वामींकडे मागावयाची होती, ते बाजूला राहून त्यांनीच मला असा प्रश्न केला की, ''ॐकार म्हणजे काय? त्याचे स्वरूप पूर्ण ओळख; व मग विचारणा कर. प्रथमतः ॐकार म्हणजे काय? हा प्रश्न विचारला आहे, त्याचे रूप पाहून घे. नुसता ॐकार व त्याची साधना असे म्हणू नकोस. ही वीज आहे. तेव्हा एका क्षणात आहे आणि नाही, अशी अवस्था करून घेऊ नकोस. जरी तुझ्या पाठिशी विभूति आहेत, तरी हा निसर्ग आहे. त्याचा अभ्यास केल्याशिवाय पुढील पाऊल टाकू नकोस. तत्पूर्वी लोकाना काय सांगावयाचे हे ठरव. मात्र 'पूर्णविराम' होईतोपर्यंत मौन धरले पाहिजे. जगाच्या कल्याणासाठी ह्याची आवश्यकता आहेच; पण तो प्राप्त करण्याचे गणित मी सांगेन. त्याप्रमाणे एक वर्षभर दर पौर्णिमेला इकडे ये. इथे उपस्थित झाल्यावर, निसर्गाला जो सांभाळतो तो रुद्र याची प्रतिष्ठापना करून, त्याचा उच्चार होमहवनयुक्त विधीने केला पाहिजे. त्यासाठी एक वर्षभर जे ब्राह्मण लागतील ते नुसते वैदिक असून चालणार नाहीत, तर ते याज्ञिक असावयास पाहिजेत. त्याप्रमाणे प्रथमतः तयारी कर; कारण ज्या ब्राह्मणांचा ह्या साधनेत समावेश होईल त्यानी ह्या कालावधीत फक्त घरचे देव यांची पूजाअर्चा करावयाची असून, इतर कोणतेही विधि करावयाचे नाहीत. याचे कारण वाडीत जे ब्राह्मण आहेत, त्यांचा पेशा भिक्षुकीचा आहे. त्याना वर्षभर भिक्षुकी बंद ठेवावी लागेल. त्याना वर्षभरचा जो खर्च लागेल, तो तू कर. ह्याप्रमाणे सर्वांना विचारणा कर; म्हणजे मग मी शुभदिवस तुला सांगेन. त्यादिवशी प्रथमतः तू व तुझे शिष्य ह्याना कायिक व वाचिक प्रायश्चित्त घेणे भाग आहे.''

वरीलप्रमाणे सर्व पूर्वतयारी झाल्यावर, प.पू. स्वामींनी आज्ञा दिली. त्याप्रमाणे साधनेचा आरंभ २२ डिसेंबर १९७७ रोजी झाला. त्यावेळी हवनास ज्या देवदेवतांना आवाहन केले होते, त्या येणेप्रमाणे - ग्रहमंडळ,

श्रीपंचमुखी हनुमान, श्रीमहालक्ष्मी, श्रीमहासरस्वती, श्रीमहाकाली, श्रीवास्तुदेवता, श्रीनवनाथ आदी विभूति, ब्रह्मा-विष्णू-महेश व पंचतत्त्वात्मक देवता यांचा समावेश; व मुख्य श्रीरुद्र, श्रीगणपती आदी देवतांचे पूजन-अर्चन; व शेवटी हवन व पूर्णाहुति. अशाप्रकारे प्रत्येक वेळेला हवन ह्या विधिप्रमाणे होत होते; व त्यानंतर अन्नदान, द्रव्यदान हे विधि होत होते.

याप्रमाणे पहिले हवन झाल्यावर, पुढील योजनेचा नकाशा प.पू. स्वामींनी दाखविला; व आज्ञा अशी झाली, "हा नकाशा प.पू. बाबा व विभूतींना दाखव; कारण ह्या नकाशामध्ये तीन लोक आहेत. तेव्हा हे काम एकट्याचे नाही. आपण पूजनासाठी आवाहन करतो ते देवदेवतांना असते; व सुपारी हे त्या देवदेवतांचे प्रतीक समजून, सर्व विधि होत असतो. अशा विधीची सिद्धता शास्त्र, मंत्र व तंत्र यानी युक्त असेल, तर सिद्धता होत असते. तेव्हा जो नकाशा दिला आहे, त्याप्रमाणे पुढील पौर्णिमेपासून कार्याला सुरुवात कर. प्रथमत: ॐकार साधना तू मागितलीस, त्यावेळी मी 'नाही' म्हणालो होतो. याचे कारण गेल्या पाचशे वर्षात अनेक लोक येऊन गेले. प्रत्येकाचा प्रश्न स्वत:चे कसे होईल? परंतु परमार्थ जोडण्यासाठी ऐहिक सोडावे लागते, हे कुणालाही माहीत नाही. ऐहिक म्हणजे केवळ पै-पैसा नव्हे; तर साधकाने आपली नाव निशाणी विसरावी लागते. म्हणून मी 'नाही' म्हणालो होतो. पण तू जे काही मागितलेस ते स्वत:साठी नाही; त्यात सर्व जगताचा उद्धार आहे; म्हणून मी तयार झालो. तेव्हा मी जो नकाशा दिला आहे, हा आपण म्हणतो तसा नाही. हा नकाशा सिद्ध करीत असताना, आपल्या जीवनाची 'नशा' उतरली पाहिजे."

वाडीहून पुण्याला गेल्यावर नंतर दिल्लीला गेलो. ह्या प्रवासात हा विचार करीत होतो की, हा नकाशा म्हणजे काय असेल? जगात पुष्कळ नकाशे पाहिले आहेत; पण हा नकाशा काही वेगळा असेल, असे अनुमान मी काढले. कारण त्याबाबत कल्पना किंवा तर्क करून उपयोगी नव्हते.

शेवटी हा नकाशा स्वप्नात पाहिला. त्यावेळी आग्रा येथील हॉटेलात होतो. साधारण पहाटे तीन वाजले होते. त्यावेळी जगाचे गणित प.पू.



सलीमबाबांनी सांगितले, "हे जग किती अंशाचे आहे?" मी म्हणालो, "तीनशेसाठ अंशात आहे". "हे जग पाहिले तर महान आहे व लहानही आहे. आपल्याला जी साधना सिद्ध करावयाची आहे, त्यासाठी महान जग उपयोगी नाही. लहान जग म्हणजे 'मिनिअेचर' असावयास पाहिजे. मुंबई ते गोवा हे अंतर तीनशे साठ मैल आहे; याचा अर्थ तीनशे साठ अंश आहे असे जमेस धर, म्हणजे हे गणित सुटेल. ह्या तीनशे साठ मैलाचे पाच भाग कर. म्हणजे जी सिद्धता करावयास आपल्याला स्वामींनी सांगितली आहे ती सिद्ध होईल. त्यासाठी जे सहाय्य हवे ते पाच पीर करतील. ही साधना सिद्ध करण्यापूर्वी, वीस वर्षे तू ज्यांना पाच पीर म्हणून संबोधित होतास; व बऱ्याच वेळा प.पू. साईबाबांनी 'तुझे पाच पीर काय म्हणतात?' असे विचारले होते, ती वेळ आता आली आहे. म्हणजे ह्या पाच केंद्राना तू पाच पीर असे म्हण. ह्या पाच विभूति परलोकवासी होऊन शेकडो वर्षे झाली आहेत. ते पाच आत्मे जे ह्या जगतात 'अवतार' म्हणून जन्माला आले होते; व त्यांचे जीवन ईश्वरमय झाले; असे पाच आत्मे म्हणजे विभूति, ही साधना सांभाळतील. असे पाच पुण्य आत्मे ह्यांची स्थापना स्वर्गलोकात कर; व इहलोकात ह्या पाच पीरांना मुंबई ते गोवा ह्या पाच ठिकाणी उपस्थित करून, उपासना सुरू कर."

"ॐकार ह्या विषयात अ, उ, म अशी तीन अक्षरे आहेत; व प्रत्येक अक्षर तीन अंगानी युक्त आहे. ह्या तीन अक्षरांच्या तीन प्रदक्षिणा होतील. यामध्ये अ + उ = ओ; म्हणजे आपल्याला कुणी हाक मारली की, आपण ज्याप्रमाणे होकार देतो, त्याप्रमाणे आपल्या आत्म्याने अ + उ = ओ म्हणजे होकार दिला, हे झाल्यावर मग म + अर्धी मात्रा = अहंब्रह्मास्मी; 'मीच तो आहे', अशा रीतीने ही सिद्धता होईल".

"हे होण्यासाठी ॐकार साधनेस जे भक्त उपस्थित होतात, त्यानी वरीलप्रमाणे, म्हणजे जी अंगे सांगितली आहेत त्याप्रमाणे, उच्चार हा आस्थापूर्वक म्हटला पाहिजे. ॐकार साधनेत तीन अक्षरे म्हणजे तीन लोक आहेत; व जगाच्या तीन अवस्था उत्पत्ति, स्थिती, लय आहेत. यांचा संबंध उच्चार, मध्य, लय व स्वर, ताल, लय यांच्याशी असून,

तीन लोक व तीन अवस्था मिळून सहा होतील. त्यापैकी पाच विभूति म्हणजे पाच केंद्रे व शिल्लक राहिलेले एक साईनाथ यांनी मिळून ॐची निर्मिती करावयाची आहे; व मग त्याची स्थापना करावयाची आहे. त्या निर्मितीस 'शक्तिपीठ' असे म्हणतात. पण हे सगळे सांगितले ते निर्माण करण्यासाठी, कमीतकमी एक वर्ष पाहिजे; किंवा कदाचित जन्मसुद्धा पुरणार नाही. ''यासाठी पथ्य काय?'' असे तू विचारशील. तर यामध्ये स्थळ, काळ, वेळ याचे अनुमान अचूक साधले गेले पाहिजे. एक तास आधी किंवा एक तास पुढे; असे म्हणून सिद्धता होणार नाही. हे अनुमान समजण्यासाठी, ऐहिक बंद करून, शंभर टक्के पारमार्थिक अवस्था असली पाहिजे. जेव्हा एखादी अवस्था आपण सिद्ध करतो, तशी अवस्था मागे किंवा पुढे घडली असेल, किंवा घडणार असेल, ते कळले पाहिजे. यासाठी कुठल्याही लोभात पडू नकोस; तरच कार्यसिद्धि होईल. हे काम तुझ्या एकटयाने होणार नाही. ज्याप्रमाणे पाऊस थेंबाथेंबाने भूतलावर येतो व मग त्याची नदी व सरोवर तयार होते; त्याप्रमाणे प्रथमत: सर्वांना ॐकार म्हणण्याची सवय करावयास पाहिजे. प्रथमत: ॐकाराचा उच्चार होणार नाही. तर जो शब्द उच्चारला जाईल, त्यातून ध्वनि निर्माण झाला पाहिजे. त्या ध्वनीतून लहरी निघाल्या पाहिजेत. अशी साधना सर्व केंद्रावरील भक्तानी करून, ॐकार म्हटला पाहिजे. म्हणजे त्याचा अर्थ 'अ' हा सिद्ध होईल.''

यानंतर साधनेचा भाग म्हणून 'अ' म्हणजे ॐकार हा सर्वांना शिकविला; व ध्वनि-लहरी-ध्वनि, अशी साधना लोक करू लागले. त्यावेळी ''पहिले अक्षर 'अ' हे सिद्ध करण्यासाठी तू वाडीला ये''; असे स्वामींनी सांगितले. त्यावेळी एकोणीसशे अठ्याहत्तर सालातील गुरुपौर्णिमा होती. त्यावेळी अशी आज्ञा होती, ''मागील हवनविधिप्रमाणेच सिद्धतेची क्रिया करावयाची आहे. परंतु ह्यावेळी पौर्णिमेआधीचे दोन दिवस व नंतर तीन दिवस असे एकूण पाच दिवस व पाच रात्री वाडीस राहिले पाहिजे. ह्या पाच दिवसात वाडीची मर्यादा ओलांडता कामा नये. याशिवाय ह्यावेळी ज्या ऐहिक जीवनाचा लाभ तू लोकाना दिलास, त्यासाठी जी साधनसिद्धता तू औदुंबर येथे केलीस, त्यांचा लाभ 'गुरुदक्षिणा' म्हणून मला दे; व मग तू ॐकार साधना म्हणजे



'अ' याला सुरुवात कर. हे करीत असताना लोक तुझ्या दर्शनासाठी आले, किंवा त्यानी पूज्यभावनेने दिलेल्या गुरुदक्षिणेचा स्वीकार केलास, तर पुढील साधनेत अडथळा निर्माण होईल, याची दक्षता बाळग.''

त्यावेळी जे भक्तभाविक वाडीला आले होते, त्यानी दीक्षा घेतलेली होती; व आतापर्यंत ह्या दीक्षेने ऐहिक लाभ त्याना झाला होता. त्या दीक्षेचा मोबदल्यात सर्वांना पुढील साधना याचा स्वीकार करावयाचा आहे; त्यासाठी सर्वांनी घाटावर स्नान करून, प.पू. स्वामींच्या पादुकांपुढे विडा, दक्षिणा व श्रीफल ठेवून, हवनास उपस्थित रहावे. अशी विनंती मी सर्वांना केली. त्यावेळच्या आनंदाचे वर्णन करता येत नाही. सर्वांना काही हे दृष्य पाहण्याची दृष्टी प्राप्त झाली नव्हती. पण मला जे दृष्य दिसले, त्याचे वर्णन मी लिहीतो आहे. सर्व भक्त गुरुजींच्या घरी जेव्हा आले, तत्पूर्वी त्यानी गंगेत स्नान केले होते. त्याचा परिणाम म्हणून काय दृष्य दिसले असेल? तर सर्वांना स्थूल देह नाही. हे पाहून मला रडू आले. ह्या जगात जन्माला येऊन सर्वांना हे जग पाहण्याचा मोह अनावर होत असतो; व ह्याच देहात इच्छावासना शिल्लक राहिलेल्या असतात. तो देह दिसत नाही. मग ह्या सर्वांना काय द्यावयाचे? असा प्रश्न डोळ्यासमोर उभा राहिला. तेवढयात गुरुजींची हाक मला ऐकू आली की, ''दादा, तयारी झाली का?'' तेव्हा मी मूळ अवस्थेत येऊन ''होय'' म्हणालो.

# ३२. ॐकार - 'अ' तत्त्व सिद्धता

त्याप्रमाणे विधीचा आरंभ झाला. वेदमंत्रांचा 'शब्द' ऐकू येऊ लागला. जीवनात इच्छा अशी होती की, केव्हा ना केव्हा असे मंत्र आपण ऐकू. आवड अशी होती की, आपण खूप शिकावे, संस्कृतचा अभ्यास करावा. परंतु ईश्वराची इच्छा वेगळी होती; त्यामुळे मला शिकता आले नाही. पण आजचा दिवस श्रीज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे, 'सोनियाचा दिवस अमृते पाहिला'; तशी माझी स्थिती झाली. श्रीक्षेत्र नरसोबाची वाडी व तेथील विद्वान ब्राह्मण, हे ॐकार साधनेला सिद्ध झाले आहेत; यापेक्षा जगात सुख काय आहे? असा विचार केला. ह्या जन्मात हे पुण्य आपल्या हातून घडावे, हा संकेत ईश्वराचा आहे. तेव्हा प.पू. स्वामींनी आज्ञा दिल्याप्रमाणे एक वर्ष, अथवा बारा वर्षे सेवा करू. जरी यात लोक सहभागी झाले नाहीत तरी प.पू. बाबांनी दिलेले घर आपण विकू, पण मागे फिरणार नाही; असा विचार मनाशी केला, व हवनास बसलो.

त्यादिवशी सर्व देवदेवतांचे पूजन केले. त्यावेळी पाटावर एकच देवी पाहिली ती म्हणजे श्रीमहासरस्वती; म्हणजे प्रथम अक्षर 'अ' हे सिद्ध होण्यास आरंभ झाला, हे निश्चित झाले. अक्षरांची ओळख 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत आहे; 'ज्ञ' म्हणजे श्रीगणपती. याचे दर्शन प्रथमतः ह्या हवनास झाले; व अशी जाणीव झाली की, "पुढे आज्ञा होईल तेव्हा श्रीगजाननाचे दर्शन तुला घडेल."

पहिले हवन व दुसरे हवन यात फरक काय आहे? वास्तविक पाहणाऱ्याला सारखाच विधि होता. पण पहिले हवन आम्ही तिघानी केले. यादिवशी पुढील कार्याचा आरंभ झाला. त्यासाठी आम्ही तिघेही ऐहिक प्राप्ति करीत नव्हतो. मी कामकाज बंद केले होते; व दीपक व लक्ष्मणराव याना "पै-पैसा न मिळविता मला मदत करा", असे प.पू. हाजीमलंगबाबांनी सांगितले होते. त्याप्रमाणे त्या दोघानी नोकरी न करता आज्ञेचे पालन केले.



हवन झाल्यावर प्रथमतः गोव्यास गेलो. पहिल्या हवनानंतर दत्तजयंती होती. गोव्याला आल्यानंतर सुखटणकर यांचे घरी काही एक मुदतीपर्यंत भिक्षा मागून आम्ही जेवण जेवावयाचे व साधना करावयाची, हा क्रम चालू होता. त्यावेळी जरी आम्ही ॐकार म्हणत होतो तरी ती साधना ॐकाराची नव्हती. ज्याप्रमाणे एखादे लहान मुल "आई", "बाबा" वगैरे बोलू लागते, तशा प्रकारची स्थिती सर्व भक्तांची होती. त्यावेळी अकरा वेळा 'ॐकार,' अकरा वेळा 'श्रीनवनाथायनमः' व अकरा वेळा 'ॐ श्री साईनाथाय नमः', अशी साधना होती. ह्या साधनेतून कशाची प्राप्ति होणार आहे? याचा मागमूस नव्हता; म्हणजे आपल्या जीवनाला आकार आला नव्हता. आपण जन्म घेतो तो जन्म कर्मासाठी, म्हणजे ऐहिक सुखासाठी आहे; पण जन्माला येऊन पारमार्थिक जीवन प्राप्त झाले पाहिजे म्हटल्यावर, पारमार्थिक जीवनाला आकार नव्हता. "ऐहिक जीवनात जशी पंधरा माध्यमे आहेत तशी परमार्थात पंधरा अंगे आहेत. त्यांची ओळख मी मागाहून तुला सांगेन. तोपर्यंत हवनाची व्यवस्था तू कर. जन्माला येऊन, पै-पैसा याची प्राप्ति भूषणावह नाही. 'ॐ भवति भिक्षांदेही'; असे ज्यावेळी साधक मागतो, त्यावेळी परमार्थ सुरू होतो"; अशी आज्ञा झाली.

आज्ञेप्रमाणे एकूण नऊ पौर्णिमेला हवन झाल्यावर, नऊ पौर्णिमेची सांगता, ही महारुद्र स्वाहाकारामध्ये झाली. ह्या नऊ पौर्णिमेला वेगवेगळे अनुभव मी अनुभवू शकलो. कुणी म्हणतात अनुभव, कुणी म्हणतात प्रचीति, कुणी म्हणतात सांगता; म्हणजे काय? हे उत्तर निश्चित सांगता येत नाही. म्हणजेच साखर गोड आहे, पण त्याचा अनुभव खारट की तुरट आहे, असे सांगण्यापैकी आहे.

आज आत्मनिवेदन लिहावे म्हणून आज्ञा झाली आहे. म्हणून सर्व काही लिहीणे भाग आहे. ऐकताना हे खरे की खोटे आहे? हा वाद आहे. ज्याप्रमाणे 'कोंबडी जाते जीवानिशी, पण खाणारा म्हणतो कोंबडी वातड आहे'; त्याप्रमाणे साधना सिद्ध करणे हे सोपे नाही. मनासारखे सुख प्राप्त होण्यासाठी कर्म असून, ते कर्मसुद्धा आधीन होत नाही; तेव्हा साधना ही किती अवघड आहे? याचा आढावा घ्यावा लागतो. असो.

त्याप्रमाणे पहिल्या पौर्णिमेला 'अ' ह्या अक्षराचा आरंभ केला. त्या दिवसापासून माझे शरीर झिजू लागले. त्याला कोणी 'आधीव्याधी' असे म्हटले, तरी तो आजार नव्हता. गुरुमार्गात आजार होणे हे गालबोट गुरूंना आहे. म्हणून आचार हा महत्त्वाचा आहे. त्या आचाराची सवय मला नव्हती. ॐकार साधना सिद्ध करण्यासाठी आपला आचार हा पिंडाप्रमाणे आहे, तो बदलून जेव्हा ब्रह्मांडाचा आचार शिकू लागलो तेव्हा ह्या नऊ पौर्णिमेमध्ये कितीतरी आजार झाले. औषधोपचार चालू होते. पण प्रश्न असा होता, दवा की दुवा? शेवटी मी शरण आलो की, "मला आधी दुवा पाहिजे; व मग दवा पाहिजे." शरीराचा धर्म आहेच व त्याला जगविणे भाग आहे; तेव्हा दवा हा आवश्यक आहे; पण प्रथम दुवा हा पाहिजेच. त्याप्रमाणे आजपर्यंत साधना चालू आहे. जसे जसे आपण क्षितीजाजवळ जातो तसे पुन्हा क्षितीज पुढे आहेच; असे दिसते. त्याप्रमाणे साधनेला अंत नाही. ती अनंत आहे म्हणून अंध:कार नाहीसा होतो. म्हणजे जगाचे अज्ञान दूर होते. आज शेकडो शोध लागले आहेत, व पुढेही लागतील; पण जेव्हा आपण बोध घेऊ तेव्हा ह्या शोधामागे 'साधना' आहे हे समजेल. आपली साधना प्रापंचिक असून, ईश्वराची साधना विश्वाची चालू आहे; म्हणून श्रीज्ञानेश्वरांनी म्हटले आहे ते 'पसायज्ञान' आहे. त्याऐवजी आपण म्हणतो की 'पसायदान'; म्हणजे पोटासाठी पाहिजे आहे. ज्यादिवशी आपण जगासाठी मागू त्यादिवशी आपण धन्य होऊ.

शेवटी ह्या नऊ पौर्णिमेचा विधि यथायोग्य झाल्यावर, आम्ही तिघेजण फत्तेहपूर सिक्रीला गेलो. प.पू. सलीमबाबांचे दर्शन घेऊन, "पुढील आज्ञा काय आहे?" असा प्रश्न विचारला. तोपर्यंत सर्व केंद्रावर ॐकार साधना चालू होती. तेव्हा आज्ञा अशी झाली की, "नऊ पौर्णिमेला हे होमहवन विधि झाले, त्यामुळे मूळ ॐकाराचे स्वरूप बदलले. ॐकाराचे मूळ तत्त्व रवी आहे. तो सामान्य माणसाला पेलणार नाही; तेव्हा त्याचा प्रकाश चंद्रावरून घेतला पाहिजे. चंद्राची कला ही प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत वाढणारी आहे. हा निसर्गाचा धर्म आहे. त्या धर्माप्रमाणे साधकाला जावे लागते. एकंदर नऊ पौर्णिमेला आपण हवन केले, म्हणजे नऊमध्ये तीन भाग केले. हे तीन लोकांचे झाले. त्या प्रत्येक



भागात उत्पत्ति, स्थिती व लय ह्याप्रमाणे तीन अवस्था एकरूप होऊन, ब्रह्मांड म्हणजे ॐकार होतो. इहलोकामध्ये जेव्हा लय अवस्था असते, तेव्हा परलोकामध्ये उत्पत्ति असते; व स्वर्गलोकात लय अवस्था असते, तेव्हा इहलोकाची अवस्था उत्पत्ति असते. अशी ब्रह्मांडाची रचना आहे. हे तीन एकरूप झाले म्हणजे स्थिती अवस्था निर्माण होते. त्याची गरज जगताला आहे. आज सर्वत्र अशांतता आहे. घरीदारी शांती नाही. म्हणून श्रीज्ञानेश्वरांनी म्हटले आहे, 'तीन एकवटले'. म्हणजे ह्या काळात जेव्हा तीन स्थिती एक होतील, ती अवस्था श्रीगुरुकृपेनेच होईल. यासाठी श्रीगुरूंना परमेश्वर मानून, त्यांची पूजा-अर्चा करावी; परंतु गुरूंचे स्तोम किंवा थोतांड माजवू नये. पहिले चरण व मग शरण; ह्या दोन क्रिया आम्हा मानवांच्या हातून घडल्यावर, तिसरे जग म्हणजे 'मानवता', ह्या युगाचा जन्म होईल. यासाठी पुन्हा वाडीस जावयाचे आहे. तेथे देव आहे पण दिसत नाही. फक्त पाऊले म्हणजे पादुका दिसतात. भक्ताने त्या चरणाला शरण जावे. कारण त्या पादुकांमध्ये सर्वकाही आहे. पाहिले तर सर्वकाही आहे; नाहीतर काही नाही. जर प्रेमाचा अभाव असेल तर जन्म प्राप्त होऊनसद्धा तो प्रेतवत आहे. पुढील काळ अत्यंत कठीण आहे. तेव्हा प्रलयाची चाहूल नंतर लागून त्याचा उपयोग नाही. पाऊस पडतो आहे तेव्हा धान्य पेरावे. खाणारे मागून येतील. त्यांची वाट साधकाने पाहू नये."

इतके मार्गदर्शन झाल्यावर मी पुण्याला आलो; व मग वाडीस जाऊन, तेथील विद्वान गुरुजी वेदमूर्ती श्री. सोलापूरकर याना भेटलो. "पुढील आज्ञा श्रीमहारुद्र स्वाहाकार करावा अशी आहे; पण ह्याची जाहीरात होता कामा नये. ज्याची इच्छा असेल, तो न बोलावता येईल;" असे मी त्याना सांगितले. ह्या विधीसाठी कशाची जरूरी आहे त्याची यादी घेऊन मी परत आलो व तयारीस लागलो. सर्वसाधारणपणे त्या गुरुजीनी सांगताना "हे शक्य असेल तर आणा" असे लिहिले होते; पण जेव्हा वाडीला परत गेलो तेव्हा नेलेले साहित्य पाहून तेथील लोक असे म्हणाले की, "गेल्या शंभर वर्षात असा विधि ह्या क्षेत्री झाला नाही; व खरोखरीच जगाच्या कल्याणासाठी असा विधि कुणी केला नाही." अनेक विधि मनुष्य करतो, पण ते इतरासाठी नव्हे; तर स्वत:च्या

कुटुंबाच्या कल्याणासाठी; पण हा महारुद्र स्वाहाकार विधि जगासाठी होता; व पहिल्या दिवसापासून शेवटच्या दिवसापर्यंत, सर्व लोक स्वाहाकाराचा लाभ व लोभ घेत होते. शेवटच्या दिवशी सांगितल्याप्रमाणे श्रीमहारुद्र स्वाहाकार पूर्ण झाला. त्यादिवशी वाडीतील सर्व लोकाना महाप्रसाद व यथोचित द्रव्य देऊन, मी पुण्यास आलो. त्यावेळच्या आनंदाचे वर्णन करता येत नाही.

नंतर प.पू. बाबांसमोर बसलो होतो. जसे एखाद्याला अचानक लाखो रुपयांची धनप्राप्ति होते, तसे मला झाले. त्यावेळी प.पू. बाबा म्हणाले, "महत्प्रयत्नानी तुला जी साधना प्राप्त झाली आहे, तिचा विनियोग जगतासाठी व्हावयास पाहिजे; नाहीतर तुला ही साधना पचणार नाही. जरी तुझ्या माध्यमातून ही ॐकार साधना प्राप्त झाली आहे, तरी तिचे वाटेकरी तीन लोकात व्हावयास पाहिजेत. म्हणजे वंशविमोचन हे काय? हे जगताला समजेल."

हे ऐकून मी थक्क झालो. "जेवढे काम सोपे होते, त्यापेक्षा अतिअवघड कार्य आपणास करावयाचे आहे, ते समजून घे". असे शब्द ऐकू आले. "नऊ पौर्णिमेला हवनादी विधि झाला आहे; म्हणजे 'अ' अक्षर सिद्ध झाले आहे. त्यापुढे 'म' पर्यंत जावयाचे आहे. तत्पूर्वी 'उ' अक्षर सिद्ध करावयाचे नसून, ह्या तीन अक्षरातील जो 'अ' प्राप्त झाला आहे, त्याची प्रचीति भक्ताना आली पाहिजे; म्हणजे 'म' ची प्राप्ति होईल." हे कोडे काही समजेना. 'अ' अक्षर सिद्ध कर व 'उ' ची प्रचीति जगाला आल्यावर, 'म' ची प्राप्ति होईल; असे सांगितले व आपण ऐकले. ह्याचा अर्थ काय? हा प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला. दिवसामागून दिवस जात होते; पण उत्तर सापडेना. शेवटी गोव्याला गेलो; व "यंदा नवरात्र गोव्याला कर"; अशी आज्ञा झाली. त्याप्रमाणे मी ह्या वर्षी गोव्याला नवरात्र करणार असे सांगितले.



# ३३. 'उ' तत्त्वाची सिद्धता, शिरोडा येथील ज्ञानयज्ञ, 'श्रीसाई शक' प्रतिमा

गोव्याला देवळांचा सुकाळ आहे. पण बोलके देव किती? चालणारे देव किती? व न बोलता, न चालता कार्य करणार देव किती? असे प्रश्नावर प्रश्न उभे राहिले. ह्या प्रश्नानी वेडा होण्याची वेळ आली. जे कठीण होते ते आपण केले; त्यापेक्षा कठीण प्रश्न मार्गी लावावयाचा, ही जबाबदारी आपल्यावर आली. जीवनारंभी आज्ञेप्रमाणे औदुंबरला गेलो. दुसऱ्यावेळी वाडीला गेलो; व आज्ञा पालन केली आता तिसऱ्या वेळी आज्ञा अशी झाली की, "जे सिद्ध केले आहेस, त्याचे वाटे तीन लोकात कर. एवढे गणित समजले, पण हे गणित सामान्य नाही. त्याचा अर्थ 'अगणित' आहे. हे गणित शांततेने सोडविले पाहिजे. घाई केली तर फट्दिशी ब्रह्महत्या होईल; व भूत आपल्या डोक्यावर बसेल." मी गुरुमार्गात आल्यावर शांत झालो. पूर्वी एवढा शांत नव्हतो. पण त्याहीपेक्षा शांत झाल्याशिवाय हे 'अगणित' सोडविणे शक्य नाही. गुरुमार्गात प्रत्येक गोष्ट आपल्या मनाप्रमाणे घडणे, म्हणजे गुरुमार्ग नव्हे; कारण हा मार्ग ब्रह्मांडाचा आहे; व आपला जन्म पिंडात झाला आहे; तेव्हा स्वाभाविक पिंडाप्रमाणे इच्छा होणे हा देहाचा धर्म आहे, तो घडू न देणे, म्हणजे गुरुमार्ग. तेव्हा आज्ञा ही महत्त्वाची. म्हणजे गुरूंची इच्छा काय आहे? त्याप्रमाणे आपण वागले पाहिजे, हे ठरवून मी गोव्यास राहिलो.

"नवरात्रीपूर्वी तू भक्तासाठी संमेलन घे"; अशी आज्ञा झाली; व "ते गोव्यात घे;" म्हटल्यावर जागा शोधू लागलो. पणजीची जागा पुरणार नाही; म्हणून मग शिरोडा येथे देवीची धर्मशाळा पसंत केली. पहिले संमेलन सप्टेंबर १९७९ मध्ये झाले; व त्याला पंचाहत्तर भक्त हजर होते. विषय 'जीवनउत्पत्ति' असा होता. अशा रीतीने मुलाखती घेण्याची ती पहिलीच वेळ; पण हे संमेलन यशस्वीपणे पूर्ण झाले; व आलेल्या भक्तांनी अशी विचारणा केली की, 'पुन्हा केव्हा यावयाचे?' तेव्हा मी म्हणालो, "पुढचे पुढे पाहू".

सर्व भक्त वेगळ्या आनंदात परत गेले; व मी घरी परत आलो. पण आलेल्या दिवसापासून दसरा होईपर्यंत, वेगळ्याच अवस्थेत होतो. त्यामध्ये खूप विचारांचे मंथन झाले की, यापुढे जगाला काही वेगळा मार्ग सुचविला पाहिजे.

नवरात्रीमध्ये पूजा, आरती व स्वत:साठी मुलाखत असे दिवस आनंदात गेले. त्यावेळी पुढची दिशा काय आहे हे कळले. वाडीला 'अ' हे अक्षर सिद्ध केलेले आहे; त्या अक्षराला जोड 'उ' ह्या अक्षराची पाहिजे, म्हणून 'ज्ञान'; म्हणजे 'उ' तत्त्व ह्यासाठी प्रथमत: संमेलन झाले. म्हणजे 'उ' तत्त्वाला आरंभ झाला. "जर 'उ' म्हणजे ज्ञान, हे शिकविले नाहीस तर लोकाना अ + ज्ञान असे प्राप्त होईल. तेव्हा नुसते 'अ' अक्षर सिद्ध होऊन चालत नाही. 'उ' म्हणजे 'ज्ञान' ह्याचा लाभ झाला, तरच मनुष्य सज्ञान होतो. ह्यासाठी दरवर्षी संमेलन घे. सकाळी व दुपारी ॐकार साधना व मुलाखत असा क्रम ठेवून, तू भक्ताना ज्ञानी कर. जीवनाबद्दलचे अज्ञान हा शाप आहे. सर्व साधकानी आजपर्यंत हेच केले आहे; व हे शास्त्र न समजता ॐकार साधना लोकाना सांगितली आहे."

एकूण आठ संमेलने झाली. ह्या संमेलनात जो महत्त्वाचा विषय होता तो म्हणजे शक्तिपीठ! जन्माला येणाऱ्या प्रत्येकाला जन्म म्हणजे काय हे समजले पाहिजे. म्हणजेच पिंडाची ओळख झाली पाहिजे. ह्यासाठी आठ संमेलने भक्तासाठी घेतली गेली; व 'ब्रह्मांड' म्हणजे काय याची प्रचीति साधनेद्वारे समजली पाहिजे; याची शिकवण दिली गेली. नुसते ब्रह्मांड असे म्हणून शाब्दिक विवेचन न करता, त्याची प्रचीति आली पाहिजे. यामध्ये पिंडाची अंगे उच्चार - मध्य - लय व ब्रह्मांडाची अंगे स्वर-ताल-सूर ही असून, ही दोन्ही सिद्ध झाल्याशिवाय ॐकार निर्मिती होत नाही; व अशी षटकोनी आकृती तयार झाल्यावर, शक्तीला आवाहन करावे लागते. म्हणजे प्रथमत: पीठ तयार पाहिजे. हे पीठ सहा अंगानी युक्त आहे; व ही सहा अंगे स्केलमध्ये म्हणावी लागतात. तत्पूर्वी पिंडाची शुद्धता झाली पाहिजे. त्यात एकही दोष राहता कामा नये, तरच पिंड तयार होतो; व मग ब्रह्मांडाला आवाहन करावे लागते.



ह्याप्रमाणे नित्य साधना सर्व केंद्रावर चालू होती. नवरात्रीमध्ये श्रीमहालक्ष्मी, श्रीमहासरस्वती व श्रीमहाकाली यांचे पूजन मांडले होते. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, "आम्ही तीन शक्ती स्व-इच्छेने एकत्र येऊ व एकरूप होऊ, तेव्हा शक्तिपीठाची स्थापना होईल; व ह्या शक्तिपीठात आमची त्रिभुवनात असलेली शक्ति एकरूप होईल, तरच भवितव्यात ह्या जगाला सुख, शांति व समाधान यांचा लाभ होईल. त्याप्रमाणे आम्ही दसऱ्याला गुरुशक्तीमध्ये विलीन होऊ." असे आश्वासन त्यांनी दिले व पुढे सांगितले की, "भवितव्यात वेगळा मार्ग शोधून काढून, त्याचे फल कुणालाही मिळणार नाही. कारण चालू काळात श्रीगुरू हाच परमेश्वर, तुम्ही सर्वानी मानला पाहिजे. आम्ही व गुरू हे वेगळे नाही. आज जगतात आम्ही देवदेवता व गुरू वेगळे आहोत, असे अज्ञान भक्तामध्ये आहे. त्यामुळे गुरुभेट होऊन व त्यांनी दीक्षा देऊन, नराचा नारायण होण्यासाठी आशीर्वाद दिला आहे; तरीसुद्धा जग अज्ञानाने देवाला शोधीत आहे. पण भवितव्यात जगाला मार्गदर्शक असा एकच गुरुमार्ग शिल्लक राहिला असून, त्या मार्गानेच जाणे हिताचे आहे." असे आश्वासन सर्व देवदेवतांनी दसऱ्याला दिले. म्हणून 'श्रीसाईशक' याची घोषणा दसऱ्याच्या दिवशी केली.

'श्रीसाईशक' या शकाचा आरंभ १९८२ साली दसऱ्याला झाला; व त्याची खूण म्हणून चांदीची 'श्रीसाईशक' प्रतिमा (मुद्रा) तयार करून, सर्व भक्ताना पूजनासाठी दिली; व अजूनही देत आहोत. ही प्रतिमा किंवा मुद्रा म्हणजेच देव! कारण आज जे देव आपल्याला पूजनात आहेत, त्या देवदेवतांच्या प्रतिमा पूजनात ठेवण्याची आपली इच्छा असूनही, भवितव्यात त्या मिळणार नाहीत; यासाठी ह्या तीन प्रतिमामध्ये तिन्ही शक्तींचा समावेश झालेला आहे; व याहून वेगळा देव आहे; असे मानून आपण भक्त वेगळे होऊ नका. ज्याअर्थी देवदेवतांनीच असे ठरविले की, आपण एकत्र येऊन एकच शक्ती ह्या जगाला तारणारी निर्माण झाल्याशिवाय, ह्या जगाला सुखशांति लाभणार नाही; तेव्हा सुज्ञानी असा विचार करावा की, आपल्याच अज्ञानाने आपले जीवन दु:खमय होणार आहे. तुम्हाला सुख लाभावे, म्हणून तुमच्या जन्माआधीच ही

योजना देवांनी केली आहे. ती प.पू. साईबाबा व दादा यांनी निर्माण केली नसून, ही योजना पंचवीसशे वर्षापूर्वीची आहे. जे शक्तिपीठ आज आपल्याला दिसते आहे, त्या शक्तीची स्थापना श्रीनाथांनी केली आहे. तेव्हा ही शक्ति अनादी, अनंत आहे; व त्या शक्तीची सेवा करणे हा आम्हा मानवांचा धर्म आहे.

आज जगात पुष्कळ धर्म असून, त्यापरत्वे कर्म, त्याचे तत्त्वज्ञान न समजण्यापलीकडे आहे; व आज जगतात परिस्थिती अशी आहे की, जगण्यासाठी धर्म कोणता? तेव्हा प.पू. साईबाबांनी म्हणजे श्रीदत्तप्रभूंनी अवतार घेऊन, असा सिद्धांत मांडला आहे की, 'साई' म्हणजे 'मानवता', हाच आजचा श्रेष्ठ धर्म आहे; व ह्या धर्माला साधना कोणती? तर ॐकार साधना! हाच उपाय जन्माला येण्यासाठी व तरण्यासाठी असून, त्याप्रमाणे वागणे म्हणजेच मोक्ष व मुक्ती. श्रीसाईशक प्रतिमेवर जे प्रतिक आहे, ती दोन पाऊले आहेत. याचाच अर्थ मोक्ष व मुक्ती. ह्यापेक्षा अधिक गरज कशाचीही नाही.

जी आठ संमेलने घेतली गेली, त्यामध्ये अशी शिकवण दिली गेली की, जीवन म्हणजे काय? व जन्माला येऊन केवळ सुख भोगणे व देवाकडे अधिक सुख मागणे, हे अज्ञानीपणाचे लक्षण असून, जीवनाचे कार्य अधिक काही आहे; व ते मिळविण्यासाठी आम्ही मानवानी सदैव प्रयत्नात राहणे, म्हणजे जीवनाची सार्थकता आहे. अशा प्रकारे हा ज्ञानयज्ञ होऊन, आठव्या संमेलनात शक्तिपीठाचे आवाहन केले गेले; व त्यानंतर पर्वरीला 'साईधाम' बांधण्यासाठी भूमिपूजन पाडव्याला केले गेले. ह्या काळापर्यंत ॐकार साधनेतील जो 'उ' म्हणजे 'ज्ञान होणे; म्हणजे काय?' हे सर्वांना समजले होते. त्यामुळे सर्वजण उत्साही होते.



# ३४. शक्तिपीठ स्थापनेचा आरंभ - 'उ' तत्वात गजाननाची प्राप्ती

शक्तिपीठ म्हणजे काय? ज्याप्रमाणे देवदेवतांच्या प्रतिमा व टाक असतात, किंवा जीवनात अडचण आली म्हणजे देवतांचे यंत्र करतात, तसे शक्तिपीठ आहे काय? अशी विचारणा पुष्कळानी केली. पण त्यावेळी खुलासा केला नाही. कारण जेव्हा साधक एखादी साधना सिद्ध करतो, त्यावेळी ते साधन सिद्ध होईपर्यंत, साधकाने मौन धरावे लागते. आपल्या मुलाला किंवा पत्नीलाही सांगता कामा नये. कारण सिद्धता होण्यापूर्वी साधनेचा उच्चार केला गेला, तर त्याचा परिणाम काय होईल ते सांगता येत नाही. साधनेपूर्वी संकल्प करावा लागतो. तो संकल्प सिद्ध झाल्याशिवाय इतराना सांगितला, तर विकल्प होतो. म्हणून साधकाने ही जबाबदारी सांभाळली पाहिजे. त्याप्रमाणे शक्तिपीठाची स्थापना होईतोपर्यंत, नित्य साधना भक्तानी चालू ठेवावी, अशी विनंती सर्व केंद्रावर भक्ताना केली होती. ह्या मुदतीमध्ये गोवा ते मुंबई अशी पाच केंद्रे, गणिताप्रमाणे जमेस धरली होती. पण अनेकानी नाना तऱ्हेचे प्रश्न व शंका विचारल्या की, "वं. दादा मुंबईला का येत नाहीत? व सारख्या गोव्याला भेटी का चालू आहेत?"

शक्तिपीठाची स्थापना होईतोपर्यंत, मला स्थळ, काळ, वेळ आदी गणित सांभाळावयाचे होते. पण त्यावेळी गेल्या वीस वर्षापासून येणारे अनेक भक्त यांचा प्रश्न असा होता की, "आम्हाला वं. दादांना त्रास द्यावयाचा नाही; फक्त एकच प्रश्न विचारावयाचा आहे." तो प्रश्न इतका सामान्य असावयाचा की, "मुलीचे लग्न केव्हा होईल? मुलाला नोकरी आहे; पण चांगली नोकरी केव्हा मिळेल?" हे प्रश्न जरी मी सोडविले असते किंवा नसते तरी काही नुकसान झाले नसते. पण मी जे कार्य प.पू. बाबांच्या आज्ञेने हाती घेतले होते, "ते कार्य यथोचित चालू आहे का?" याबद्दल कोणीही विचारणा केली नाही, याबद्दल दु:ख वाटते. कारण तुमच्या जीवनात पुढे मागे प्रश्न निर्माण होतील, पण प.पू. बाबांची कृपा आपल्या पाठिशी आहे; असा विश्वास आल्यावरच

मी कामकाज बंद केले; व दुसऱ्या साधनसिद्धतेच्या कामाला लागलो. तेव्हा आपल्या पाठिशी कृपा आहे, आपले प्रश्न प.पू. बाबा व वं. दादा पाहून घेतील; असा विश्वास तरी आपण निर्माण करावयाचा होता! मला जे काम प.पू. साईबाबांनी सांगितले होते, ते कार्य पंचवीसशे वर्षे थांबले होते. तुमचा प्रश्न वैयक्तिक होता; पण प.पू. बाबांचा प्रश्न जगासाठी होता. गुरुमार्गात शेकडो भक्त येतात व शेकडो जातात. 'सबुरी' कोणी ठेवावयाची? हा प्रश्न आहे; कारण आज गुरुमार्ग हा 'कामापुरता मामा', असा होऊन बसला आहे. पण अशी अवस्था भक्तांची होऊ नये, व त्यामुळे पुढील कार्यात अडथळा निर्माण होऊ नये, म्हणून आधीच सर्व भक्तांच्या सुखाची सोय प.पू. बाबांनी केली होती. ती म्हणजे 'तीन प्रतिमा'. ह्या प्रतिमा भक्ताना दिल्यानंतर, शक्तिपीठाचे आवाहन केले. ह्या आवाहनात तुम्हा भक्ताना काही करावे लागले नाही. फक्त तीन प्रतिमांचे मूल्य तुम्ही भक्तानी दिले आहे. पण मला प्राप्त जीवनाला मुकावे लागले असते. यापेक्षा अधिक लिहीणे योग्य नाही.

'साईधाम' ची योजना चालू होती. त्या काळात मला अशी आज्ञा झाली की, "ॐ मध्ये तीन अक्षरे म्हणजे तीन शक्ति ह्या त्रिभुवनात ज्या आहेत, त्यापैकी दोन सिद्ध झाल्या आहेत; व 'म' म्हणजे तिसरे अक्षर सिद्ध करावयाचे आहे. त्यासाठी तू तयार रहा." नेहमीप्रमाणे मी गोव्याला होतो. त्यादिवशी आरती व नित्यसाधना झाल्यावर आज्ञा अशी झाली की, "उदईक सकाळी तू रत्नागिरीला जा. गेल्यावर पुढील आज्ञा होईल, त्याप्रमाणे तू कर." त्याप्रमाणे मी इतर भक्तासमवेत रत्नागिरीला गेलो. तेथे आपले केंद्र होतेच. तेथे दुपारी एक भक्त जे आपल्याकडे येत होते, त्यानी "सायंकाळी माझ्या घरी या व आरती करा," अशी विनंती केली; व ते आपल्या गावी गेले. सायंकाळी त्यांच्या घरी गेलो व आरती झाली. सर्व भक्तानी तीर्थप्रसाद घेतला. मी प.पू. बाबांसमोर बसलो होतो, तेवढ्यात त्या गावचे देवस्थानचे मालक जे आरतीला आले होते, त्यानी विचारणा केली. ते म्हणाले, "मला एक प्रश्न विचारावयाचा आहे. आपली परवानगी असेल, तर विचारणा करणार." तेवढ्यात प.पू. बाबा म्हणाले, "हा प्रश्न सामान्य नाही; म्हणून खोल विचार कर. ह्या गावची स्थिती बिकट आहे. हा



प्रश्न एकाचा नाही तर पंचक्रोशीचा आहे." हे ऐकून मी जागा झालो. तोपर्यंत माझी स्थिती वेगळी होती. पूर्वी ज्याप्रमाणे पुण्य विभूतींचा संचार होत होता त्याप्रमाणे माझी अवस्था झाली.

तेव्हा आलेल्या देवस्थानच्या मालकाना मी काही प्रश्न विचारले की, "इतके पुरातन देवालय असून, त्या देवाची कृपा समस्त गावकऱ्यावर नाही. त्यामुळे गावाची भरभराट होत नाही. सर्वजण कष्ट करीत आहेत, पण त्याचे फल मिळत नाही; याचे कारण मूळ जे देवस्थान आहे, त्याठिकाणी देव नाही. मला दिसत आहे एक देऊळ व दोन देव. असे का? तेव्हा ह्या देवळाचा काही इतिहास माहिती असेल तर सांगा." तेव्हा ते म्हणाले, "पहिली इथे श्रीलक्ष्मीनारायणाची मूर्ति होती. पुढे काही अंतरावर एक गाव असून, तेथील देवळात देव नव्हता. त्यासाठी त्या गावातील लोकानी आमच्या देवळातील मूर्ति चोरून नेली; व त्या मूर्तीची स्थापना आपल्या गावी केली. तेव्हा आमचे देऊळ ओस पडले. काही वर्षानी 'पेशवे' याना असे समजले की, रत्नागिरीजवळ शिरगाव आहे. त्याठिकाणी एक बांधलेले देऊळ असून, ते देऊळ ओस पडले आहे. पेशव्यांची भक्ती गणपतीवर होती. त्यामुळे ह्या देवळात जो गणपती आज आहे, त्याची स्थापना पेशव्यांनी करून, देवस्थानासाठी काही देणगी दिली; व आपण ज्या घरात बसला आहात, ती वास्तूही पेशव्यांनी दिली आहे. असा इतिहास मला माहीत आहे. पुढचे काय ते आपण पहा."

हे ऐकून मी रत्नागिरीला आलो. दुसरे दिवशी केंद्रावर आरती केली. पुष्कळ लोक दर्शनासाठी आले होते. त्यावेळी मी त्या लोकाना न भेटता, एका खोलीमध्ये बसून होतो; व माझ्यासमवेत जे सेवक आले होते त्याना, "कामकाज तुम्ही करा, मी खोलीत बसतो; व कामकाज संपल्यावर मला भेटा," असे सांगितले. त्या खोलीत बसून मी ॐकार साधना सुरू केली. परंतु पूर्वीसारखी साधना होईना. बराच वेळ बसून काही उत्तर सापडेना. मग आपल्या हातून काय घडले आहे? याचा शोध घेऊ लागलो. शेवटी असे दृष्य पाहिले; - शिरगावचे गणपतीचे देऊळ व त्या देवळात एक स्त्री गणपतीला म्हणत आहे, "माझे देऊळ सोड. तुझी येथे गरज नाही. जेथून आलास तिकडे जा. आज अनेक वर्षे लोक दुःखी आहेत; त्याना सुखी कर." हा आवाज स्त्रीचा आहे;

तेव्हा ही स्त्री सामान्य नसून, प्रत्यक्ष लक्ष्मीनारायण आहे; हा पुढे सर्व खुलासा झाला. जे दृष्य मी पाहिले होते ते कधीही पाहिले नव्हते. प.पू. बाबांची प्रार्थना करून, 'काय आदेश आहे?' याची मी वाट पहात बसलो. तेव्हा प.पू. बाबांनी असे सांगितले की, "गोव्याला तुला सांगितले होते की, उदईक रत्नागिरीला जा. तेथे गेल्यावर पुढील कार्यक्रम काय आहे? हे समजेल. तेव्हा ॐकार साधनेत जे 'म' तत्त्व म्हणजे गजानन हा कमी आहे; त्याची प्राप्ति होण्याची वेळ आली आहे. तेव्हा जे देऊळ लक्ष्मी मागत आहे, ते तिला दे; व गणपतीला आपल्याबरोबर घे. हा बालरूपी गणपती तुला सांभाळावयाचा आहे; व ॐकारातील 'म' तत्त्व सिद्ध झाल्यावर, म्हणजे 'म' तत्त्वाची साधना सिद्ध झाल्यावर, शक्तिपीठाची स्थापना आपल्याला करावयाची आहे." हा आदेश ऐकून मी थक्क झालो. देवातसुद्धा भांडण आहे. मग मानवाच्या हाडामासात जे कुभांड रुजले आहे, त्याचा अंत लागणे शक्य नाही; हे सत्य आहे.

ह्या इष्टदेवतेची संभावना करून, मी गोव्याला श्रीगजाननासमवेत परत आलो. दुसरे दिवशी सकाळी मी नेहमीप्रमाणे आरती केली; व साधनेत बदल केला. जे नामस्मरण ॥ॐ श्रीसाईनाथाय नमः ॥ म्हणत होतो, त्याऐवजी ॥ ॐ नमः शिवाय ॥ हे पंचाक्षरी नामस्मरण म्हणू लागलो; व तशी विनंती सर्व कार्यकेंद्रावरील भक्ताना केली. "॥ ॐ नमः शिवाय॥ हे नामस्मरण शंकराला उद्देशून नाही. 'म' हे अक्षर लय तत्त्वाचे कारक आहे. लय म्हणजे शून्य अवस्था; म्हणजे पूर्णत्व. ते प्राप्त होण्यासाठी पाच कोशांचा समावेश करावयास पाहिजे. यासाठी नाभीस्थानापासून ब्रह्मस्थानापर्यंत ॐकार व नामस्मरण ही साधना केली पाहिजे. ज्यावेळी ही पाच स्थाने शुद्ध होतील, तेव्हा अ + उ + म = ॐ, हे अक्षर सिद्ध होईल. तेव्हा ॐकार साधना संपली असे म्हणू नकोस. पुष्कळाना ॐकार साधना म्हणजे काय? हे समजत नाही; व समजणे शक्य नाही. ज्याप्रमाणे आपली ताकद असेल, तेवढे सागरात पोहावे. जसा सागराचा अंत लागत नाही, तशीच ही साधना आहे."

ह्याप्रमाणे साधना चालू होती. माझ्यासमवेत जे कोणी भक्त साधना करीत होते, अशावेळी ह्या भक्ताना जरी विचारले असते तरी अनुभव



काय आला? हे त्यानाही सांगता येण्यासारखे नव्हते. पण मला वेगवेगळे अनुभव व प्रतिसाद मिळत होता. हे जरी खरे तरी जसे जसे दिवस जाऊ लागले व नियोजित दिवस जवळ येऊ लागला, तसा मी भयभीत होऊ लागलो. कारण अमुक एक साधना ठरविली जाते, तेव्हा ते शक्तीला आवाहन असते; व ती शक्ति केव्हा प्राप्त होईल हे सांगता येत नसते. ही निसर्गाची ठेव आहे. अमुक वेळातच सिद्ध होईल, असे सांगता येत नाही. कारण ती कुणाची नोकर नाही. जो पाऊस पडतो तो निसर्गपरत्वे असतो. पण वेधशाळेलासुद्धा अचूक सांगता येत नाही की, अमुक दिवशी पाऊस पडेल. त्याचप्रमाणे साधना आपल्या आधीन नाही. त्यासाठी साधकाला स्थळ, काळ, वेळ आदीनी सिद्ध व्हावे लागते. निसर्गामध्ये पाऊस येण्यापूर्वी ढग येतात, किंवा आंब्याच्या झाडाला मोहोर येण्यापूर्वी सुवास येतो, तशी माझी स्थिती झाली; कारण पुढे शक्तिपीठाची स्थापना करावयाची होती; व त्यासाठी साईधामचे काम अमुक दिवसात पूर्ण व्हावयास पाहिजे होते. म्हणून ती वास्तु केव्हा तयार होते? इकडे माझे लक्ष होते. 'साईधाम' बांधणे सोपे नाही. एक घर आपल्या मनासारखे होत नाही; व हे तर साईधाम! - तमाम भक्तांचे निजधाम होते. ही जबाबदारी साधी नव्हे. आज जी वास्तु बांधून झाली आहे, ती जर बांधली गेली नसती तर ज्या शक्तीचे आगमन होणार होते व तिची स्थापना शक्तिपीठ म्हणून करावयाची होती, त्याऐवजी माझा बळी ह्या शक्तीने घेतला असता. असे दिव्य शक्तिपीठ आहे. 'शक्तिपीठ' ही चार अक्षरे असली, तरी त्यात आठ दिशा सामावलेल्या आहेत. म्हणजेच 'जयजयकार'. ही साधना आपण सर्व भक्ताना केवळ श्रीसाईबाबांचे दास झालात म्हणून मिळाली. आपण एखाद्या वस्तुपदार्थाला गती देऊ शकतो; पण गतीला 'प्रतिमा' बनविणे, हे इहजगतातच नव्हे, पण स्वर्गलोकातही कठीण आहे. अशी साधना प.पू. बाबांनी आम्हा भक्ताना शिकविली आहे.

पुढे साईधामचे काम पूर्ण झाले; व शक्तिपीठाची स्थापना चैत्रपाडव्याला करावयाची असल्याने, सर्व केंद्रावरील भक्ताना आमंत्रित केले गेले. प्रथमतः असे वाटले की, साईधामची वास्तु सिद्ध करण्यासाठी विद्वान ब्राह्मणाना बोलवावे. पण मागाहून लक्षात आले की, आपली केवढी

चूक आहे! 'साईधाम' ही वास्तु बाबांची आहे. त्याचे 'निजधाम' व्हावयास पाहिजे. तेव्हा ही वास्तु ते स्वत:च सिद्ध करतील. तेव्हा त्या विचाराबद्दल मी प.पू. बाबांची क्षमा मागितली; व 'पणजी केंद्र' हे 'साईधाम'मध्ये आले; व ॐकार साधनेची जी सांगता 'म' ह्या शब्दाने करावयाची होती, त्याची तयारी साईधाममध्ये साधनेद्वारा सुरू झाली.

रत्नागिरीला जाऊन आल्यावर, आता निश्चित साधना सुरू झाली, हे कळू लागले. जसा मुलगा झाल्यावर त्याचे गोड कौतुक आपण करतो, पण त्याला दाढीमिशा आल्यावर, तो प्रौढ झाला आहे असे आपण समजतो; त्याप्रमाणे आपली साधना प्रौढ झाली आहे, असे वाटू लागले, व 'म' तत्त्व कोठे साध्य होईल? असा विचार मनात येऊ लागला. नरसोबाची वाडी, गोवा, रत्नागिरी (शिरगाव) की गोकर्ण? कारण एकदा मी फिरावयास मांडवी पुलावर गेलो होतो; त्यावेळी अकस्मात आकाशांत ढग जमा झाले; व वीज चमकू लागली. मी परत येतेवेळी एका भक्ताकडे थांबलो. खूप पाऊस व वीजेचा गडगडाट झाला. त्यावेळी मी आकाशात जो वीजेचा चकमकाट पाहिला तो ॐकार स्वरूपात होता. त्यावेळी असे वाटले की, ह्या ॐकाराची दिशा गोकर्णला आहे. पूर्वी पुराणात रावणाने श्रीशंकराला प्रसन्न करून, आत्मलिंग म्हणजे ब्रह्मांड मिळविले होते; व त्याचे हरण श्रीगणपतीने केले. ते लिंग म्हणजे गोकर्ण. तेव्हा निश्चित ह्या ठिकाणी ते असेल, असा तर्क मी शोधू लागलो. शोध हा गुरुमार्गात शाप आहे. 'बोध' घेणे म्हणजे कृपाशीर्वाद घेणे; म्हणून मी बोधाची आज्ञा काय आहे? त्याची आतुरतेने वाट पाहू लागलो. तेव्हा "गोकर्णात जे आत्मलिंग म्हणजे ब्रह्मांड आहे, त्याची बारा अंगे होऊन बारा स्थाने आहेत, ती आपल्याला नको आहेत; कारण ॐकार साधनेत बारा अंगे आहेत; तशीच आपल्याला प्राप्त झाली पाहिजेत. पण ती बारा अंगे स्वर, सूर यामध्ये एकरूप झालेली आपल्याला पाहिजेत. हे 'म' तत्त्व म्हणजे 'वाणी'! ह्या तत्त्वामध्ये स्वर व सूर यांचा संगम व्हावयास पाहिजे. तर येणाऱ्या भक्ताला शंभर टक्के आशीर्वाद मिळेल. हे तत्त्व गोरखनाथांपाशी आहे; तेव्हा बत्तीस शिराळ्यास तू जा"; असे प.पू. बाबांनी सांगितले.



# ३५. 'कर्म-आधीन' अवस्थेची प्राप्ती

यापूर्वी मी दोनदा बत्तीस शिराळ्यास गेलो होतो; पण त्यावेळी नाथांचे देवस्थान आहे, आपण पाहून येऊ; म्हणूनच केवळ गेलो होतो. तरीसुद्धा त्याठिकाणी गेल्यावर पूर्वीची स्मृती जागी झाली की, 'ह्या देवापाशी आपले पुढील कार्य अवलंबून आहे'. पुन्हा बोलावणे आल्यावर आपण येऊ, असा विचार करून परत आलो होतो. पुन्हा एकदा कऱ्हाडला असताना श्रीनाथांचे बोलावणे आले, "तू येऊन जा". त्याप्रमाणे मी काही भक्तमंडळीसमवेत गेलो होतो. त्यावेळी सर्वांच्या वतीने एक श्रीफल श्रीनाथांचे पुढे ठेवून, मी प्रार्थना करीत होतो. प्रार्थना करून मी डोळे उघडण्यापूर्वी, तेथील पुजाऱ्याने मी ठेवलेले श्रीफल देण्यासाठी उचलले; व माझ्याबरोबर आलेल्या एका भक्ताने माझ्यापुढे होऊन, ते श्रीफल स्वत: घेतले. माझी प्रार्थना होण्यापूर्वी पुजाऱ्याने ते श्रीफल उचलले; व त्या भक्ताने ते घेतले, हा अपमान किंवा प्रमाद घडला होता. मी डोळे उघडतो तोच लक्षावधी गांधीलमाशांचा तांडा त्या भक्ताकडे धावून आला; व तो भक्त सैरावैरा इकडे तिकडे धावू लागला. आणखी जे भक्त होते, ज्याना "माझ्याबरोबर येऊ नका", असे मी सांगितले होते, त्यांच्याही मागे ह्या माशा लागल्या. कारण आज्ञा नसताना हे भक्त मागाहून आले होते. शेवटी मी व तेथील मठाचे महंत यांनी प्रार्थना केल्यावर, ह्या माशा शांत झाल्या. हा प्रसंग घडून आज काही वर्षे झाली; पण त्याचे महत्त्व मी आज लिहीत आहे. त्या केवळ माशा नव्हत्या, तर पुढील कार्य किती बिकट आहे? याची जाणीव श्रीनाथांनी दिली. ती अशी की, "जे कोणी भक्त ह्या मार्गाला अपात्र असतील, त्याना प्रथमत: सिद्ध कर. नाहीतर 'कर्मरूपी माशा' ह्या लोकांचे चावे घेतील. तेव्हा ह्या भक्ताना 'कर्मआधीन' अशी अवस्था प्राप्त व्हावयास पाहिजे; व त्यानंतर मी तुला बोलावणे करीन."

जी साधना त्यावेळी केली जात होती, त्या साधनेत कर्म आधीन व्हावे असा विषय नव्हता. फक्त कर्माचे विमोचन व्हावे, असा आशीर्वाद होता. म्हणजे जे कर्म प्रतिकूल आहे, त्या कर्मास अनुकूल करणे; असे कार्य जीवनात व्हावयास पाहिजे, ही साधना सिद्ध झाली; पण आता कर्म आधीन व्हावे, यासाठी साधना सिद्ध करावयास हवी होती,

तरच त्याचे इष्टफल ठरविता येईल; असे म्हटल्यावर पुन्हा अवघड मार्ग शिल्लक राहिला आहे, तेव्हा काय करावे हे समजेना; व हताश झालो. त्यावेळी संमेलने चालू होती; व मग दिवसरात्र "अहं, त्वं, इदं" असे शब्द कानाशी ऐकू येऊ लागले. पण म्हणजे काय? याचा अर्थ समजेना. आज मी सगळ्याना 'अहं', 'त्वं', 'इदं' म्हणजे काय? हे सांगू शकतो. पण त्यावेळी हे शब्द मला समजले नाहीत. मग इतराना काय सांगणार? हा प्रश्न होता. ज्याप्रमाणे स्थित्यंतर, स्थिती व अवस्था हे शब्द यांचा अर्थ नंतर समजला; व मागे लिहीला आहे त्याप्रमाणे वरील 'अहं, त्वं, इदं' याचा अर्थ समजावयाचा होता, व समजला म्हणजे आपण सिद्ध करू, असा विचार मी करीत होतो. मग श्रीनाथांनी सांगितले की, वरील अवस्था प्राप्त होण्यासाठी, जे 'भक्त' आहेत त्यांचे 'सेवक' व्हावयास पाहिजेत. "सोने घ्या"; म्हटल्यावर वेडेसुद्धा लोभाने "होय" म्हणतील; पण "माती घ्या"; म्हटल्यावर कोण माती घेईल? असा प्रश्न उभा राहिला. म्हणजे भक्त ह्या अवस्थेतून सेवक ह्या अवस्थेत स्थित्यंतर व्हावयास पाहिजे; तेव्हा मी तरी 'सेवक' आहे किंवा नाही? अशी शंका येऊ लागली. आज आपण केवळ भक्ती करीत आहोत, म्हणून भक्त आहोत असे नाही. मातीचे रूपांतर प्रथमतः लोखंडात व्हावयास पाहिजे, तेव्हा ह्या लोखंडाचे 'सोने' होईल. नुसती माती असून उपयोगी नाही. 'परीस' हा लोखंडाचे सोने करतो; पण त्यावेळी माती ही लोखंड झाली पाहिजे. 'लोखंड' याचा अर्थ काय? 'लो-खंड' म्हणजे लोककल्याणाच्या सेवेमध्ये खंड पडता कामा नये. अशी धारणा जेव्हा भक्ताची होते, तेव्हा त्याला 'सेवक' असे म्हणता येईल.

इतका विषय गोव्याला गेल्यानंतर समजला; व पुढचा मार्ग काय? म्हणून प.पू. बाबांना विचारले. त्यावेळी दीपावली होती. पाडव्याला केंद्रावर आरती झाली. भक्तानी आजूबाजूला आरास केली होती; व सर्वत्र पणत्या लावल्या होत्या. तेव्हा प.पू. बाबांनी विचारले की, "ज्या सगळ्या पणत्या लावल्या आहेत, त्यामध्ये पाणी किती आहे? व तेल किती आहे? व ज्या पणत्या पेटवल्या आहेस, त्यापैकी शिल्लक किती आहेत? हे मनाशी विचारून पहा; मग पुढचे साधन मी तुला सांगेन. नुसती 'दीपावली' असे म्हणून चालणार नाही, तर ती आपल्याला पावली का? हा विचार करावा लागेल".



पुढे 'कर्म-आधीन' ही अवस्था कशी प्राप्त होईल? व त्यासाठी काय प्रयत्न केले पाहिजेत? म्हणून मी विचार करू लागलो. त्यानंतर मी माझ्या गुरुबंधूना घेऊन दिल्लीला गेलो होतो. त्यावेळी ध्यानीमनी नसताना, ह्या प.पू. विभूतीचे आगमन झाले. त्यादिवशी पहाटे मी उठलो; व कुणीतरी हाक मारीत आहे, असा भास झाला. पुन्हा झोप येऊ लागली, पण ती झोप नव्हती. त्या गुंगीमध्ये मी जी समाधी पाहिली, तशी जगात कोठेही नाही. कारण जगतात ज्या समाध्या आहेत त्या समाध्यावर चबुतरा बसविलेला असतो. हा चबुतरा दगडी किंवा संगमरवरी असतो. पण मला जे दर्शन झाले ती समाधी मातीची आहे; व तशी जगात एकच आहे. "तेथे दर्शनार्थ तू ये", असा आवाज ऐकला. मग मी उठून स्नान, आरती वगैरे झाल्यावर सर्वांना घेऊन ह्या ठिकाणी गेलो; पण वाट सापडेना. विचारता विचारता एकाने सांगितले, "सरळ जा. उजव्या बाजूला वळा व मग डाव्या बाजूला वळा". वास्तविक हे वाक्य कुणालाही सरळ वाटेल; पण मला त्या वाक्यात काय गूढ आहे? हे समजले. कारण मी दिल्लीला येण्यापूर्वी, "कर्म-आधीन करून घे व मग मी बोलाविन"; असे श्रीगोरक्षनाथांनी सांगितले होते ते आठवले.

मग आम्ही सर्वजण ह्या दर्ग्यात गेलो. तेथील मुजावराने ज्याप्रमाणे सांगितले होते, तसे पूजासाहित्य आणविले; व मनोभावनेने पूजा केली. त्यानंतर प्रार्थना काय म्हणावी? असा प्रश्न निर्माण झाला. कारण मुजावर जी प्रार्थना म्हणत होते ती प्रार्थना ऐहिक होती; म्हणून मी गप्प बसलो. तेव्हा समाधीतून निरोप आला, "तू ज्या कामासाठी आला आहेस ते काम पूर्ण होईल; असा माझा आशीर्वाद आहे, तेव्हा तू परत जा. माझे कार्यातील आगमन नेहमीप्रमाणे नाही. थोडया काळात हे साधन सिद्ध व्हावयास पाहिजे. ज्याप्रमाणे देवाचा भंडारा असतो, त्यात कुणीही येऊन जेवून जातात. त्यात भूक देवाची आहे की पोटाची आहे? ह्याचा विचार कर. परलोकात जे आत्मे आहेत ते अगणित आहेत. तेव्हा प्रथमतः ज्यांचे वंशविमोचन व दीक्षा झाली आहे, अशा आत्म्याना ही साधना सांग; व मग बाहेरच्याना. जे लोक परलोकवासी होतात, त्यावेळी प्रेत दहन करण्यासाठी नेतात. त्या प्रेताचे तोंड समोर असते; व दहन

करून लोक मोकळे होतात. जो विधि शास्त्राने सांगितला आहे, त्याला किंमत न देता, नको ते विधि अज्ञानाने आपण करीत असतो. त्यामुळे आत्मा परलोकी गेला, तरी कर्मातून त्याची सुटका होत नाही. वास्तविक ह्या विधीचा उहापोह करणे गैर आहे. पण कर्माधीन होणे म्हणजे काय? ही शंका विचारात घेतली जाते. मुख्य दहनविधि जो आहे तो करण्याने पुढील मार्ग सुलभ होत असतो. म्हणजे जेव्हा पुन्हा जन्मप्राप्ति होते; व तीन ऋणानुबंध जोडले जातात, त्यावेळी गतजन्मातील हा शेवटचा संस्कार यथायोग्य होण्यामुळे, पुढील जन्मी हे तीन ऋणानुबंध कर्माशी एकरूप न होता, ते 'कर्तव्य' म्हणून जोडले जातात. हे कर्तव्य दानधर्म व देवाची सेवा करण्याने मोकळे होते. अन्यथा हे कर्तव्य म्हणून न राहता, 'कर्म' म्हणून भोगावे लागते. यासाठी महारुद्र स्वाहाकार झाल्यावर जे वंशातील दोष विमोचित केले गेले; त्याचे प्रायश्चित्त म्हणून श्रीपंतांकडे 'अन्नदान' ही योजना कार्यान्वित केली आहे. त्यामध्ये आपल्याकडील भक्तांच्या नावे काही रक्कम जमा केली गेली; व बाकीची जबाबदारी प.पू. पंतांनी घेतली. याशिवाय जे आत्मे अजून कर्माधीन आहेत, त्यांचा त्रास आपल्याला होऊ नये, म्हणून तीन शेष आज पूजनात आहेत; व ते पूजन 'साईधाम' मध्ये होत असून, आज्ञा होईल तेव्हा ते बत्तीस शिराळा येथे विसर्जन करू''; असे प.पू. कुतुबुद्दीनबाबांनी सांगितले. त्याप्रमाणे सर्व भक्तांचे जीवन जे कर्माधीन होते, ते कृपेमुळे कर्म-आधीन झाले; व त्याची सांगता बत्तीस शिराळे येथे श्रीगोरक्षनाथांचे पवित्र क्षेत्री झाली. त्यावेळी मी जरी कराडला होतो तरी आजारी असल्याने हॉस्पीटलमध्ये होतो; पण हा विधि पूर्ण झाला, म्हणजे वंशविमोचन हा विधि परिपूर्ण झाला, तरी अजूनही ह्या विधीचा त्रास केव्हा केव्हा होत आहे.



# ३६. साधनेतील बदल

पुढे प.पू. नाथांच्या आज्ञेप्रमाणे, साधनेत बदल केला. पूर्वी जी ॐकार साधना सर्व भक्त करीत होते; व नामस्मरण ज्या पद्धतीने करीत होते, त्यामध्ये पाच स्थाने म्हणजे कोश, यांचा समावेश होता. जेव्हा पाच स्थाने म्हणजे पाच कोश एकमेकाना पूरक झाले, त्यावेळी कंठस्थान ह्याला प्रधान मानून, त्याचा जो स्वर आहे, त्या स्वरात सर्व साधना म्हटली गेली पाहिजे. देह व आत्मा म्हणजे पिंड व ब्रह्मांड यांची गती भिन्न आहे. म्हणून श्रीपंतांनी एका पदात म्हटले आहे की, 'गुरुविणे नाही गती'; म्हणजे गुरू असल्याशिवाय, ही साधना प्राप्त होत नाही. पिंडाला निश्चित गती नाही; पण ब्रह्मांडाला गती निश्चित आहे; तेव्हा आपण करीत असलेली साधना, पिंडाप्रमाणे होता कामा नये. जर आपण पिंडाच्या गतीप्रमाणे साधना करू लागलो तर प्रगतीऐवजी आपली अधोगती होईल. म्हणून आपण भक्ताना ह्याचे ज्ञान होणे आवश्यक आहे; व त्याकडे बारकाईने पाहून, साधना केली पाहिजे. जी साधना आपणास शिकविली आहे, त्या साधनेच्या सिद्धतेसाठी जरी विलंब झाला तरी हरकत नाही; पण जे साध्य होईल, ती दुसरी अवस्था आहे. पहिली अवस्था 'साधक' अशी होती. आता 'सिद्ध' अवस्था जी प्राप्त झाली, त्यासाठी आपण भक्ताना काही तप किंवा तपश्चर्या करावी लागली नसून, केवळ गुरुमार्गाचा स्वीकार केलात, म्हणून त्याचा लाभ आपणास झाला. अन्यथा ही अवस्था ह्या जन्मात प्राप्त होणे कठीण आहे.

जीवनारंभी श्रीभैरवनाथांनी, ''तबला शिकून घे; नाहीतर तुझ्या जीवनाचा तबेला होईल; व मग म्हणशील की, देवाला भेटून जन्म व्यर्थ गेला''; असे सांगितले होते. असा जन्म व्यर्थ जाऊ नये, म्हणून पहिल्या अवस्थेत 'ताल' हा सांभाळला पाहिजे. कारण जीवनात ताल सांभाळणे कठीण आहे; व जेव्हा आपण पंचवीस वर्षाचे होतो तेव्हा त्याला 'गधे पंचविशी' म्हणतात; कारण जीवनाचा ताल सांभाळणे कठीण होते. जे कंठस्थान आहे, त्यात दोन आवाज आहेत. पहिला आवाज पिंडाचा आहे; व दुसरा ध्वनि आत्म्याचा आहे. पिंडाने साधनेत जरी लक्षावधी नामस्मरण केले, तरी परलोकात गेल्यावर त्या नामस्मरणाचे

स्मरण राहत नाही. म्हणून मोजकीच साधना, पण ती आत्म्याने केली, तर ह्या जीवनाची उतराई होते. कारण त्याला उत्तर देण्यासाठी आत्मा असतो. पण पिंडाने जरी लक्षावधी जप केला तरी परलोकात जातेवेळी असे उत्तर मिळते की, 'खाली उतर'; म्हणजे 'पुन्हा जन्माला जा'. यासाठी सुज्ञानी साधनेचे ज्ञान करून घेतले पाहिजे. 'साधना' हा तीन अक्षरी शब्द आहे. इहजन्मात ह्या 'तीन' चा अर्थ समजला, तर तीन लोकांची प्राप्ति सहज होते.

या साधनेमध्ये प्रथमत: 'उच्चार' हा महत्त्वाचा आहे. सर्वाभूती आत्मा एकच आहे; पण जन्म प्राप्त झाल्यावर, जे द्वैत आपल्याला दिसते, हे अज्ञान आहे. 'मी अमुक एकाचा आहे'; येथपासून द्वैत सुरू होते. जात-पात, धर्म-पंथ, गुरुमार्ग व शेवटी देव यामध्ये आपला उच्चार, मग आचार व ह्याप्रमाणे विचार, हे भिन्नाभिन्न होतात; व झाले आहेत. जगात जे जीव आहेत, त्यामध्ये सर्वश्रेष्ठ असा हा 'नर' आहे. ह्या नराचा शेवटी 'नारायण' होतो; पण केव्हा? हे वाक्य नुसते म्हणून चालत नाही. आपल्या आचारविचारात जर बदल झाला तरच ते सत्य होईल; व ह्यासाठी एकच मार्ग ह्या जगात आहे; व तो म्हणजे गुरुमार्ग! ह्या मार्गात काय शिकवण आहे? तिचा अभ्यास केला पाहिजे. हा मार्ग देव भेटण्यासाठी नाही. देव हा आपल्यापाशीच आहे. त्याची ओळख इतराना होण्यासाठी, आपले आचरण बदलले पाहिजे. ते बदलण्यासाठी काही मंत्र तंत्र नाही. आपल्यापासून इतराना दु:ख होते; त्याऐवजी 'जगाला आनंदी करावयाचे आहे', असा विचार निर्माण केला, तर त्यासाठी साधना आहे. म्हणजे, मला इतराकडून काय फायदा होईल? असा विचार सोडून, धनप्राप्तीचा हव्यास सोडला, तर जगाला सुखी करता येईल. जोपर्यंत हा लोभ आहे तोपर्यंत हे जग आपल्यापासून अनेक योजने दूर आहे. मग नराचा नारायण न होता, आपले रामायण होईल. यासाठी काही महामंत्र, महाभारत किंवा रामायण वाचून न बघता, 'आपण कसे वाचू?' हा बोध घेतला पाहिजे.

सुमारे चाळीस वर्षापूर्वी प.पू. बाबांनी आज्ञा दिली, म्हणून हे कार्य सुरू झाले; व त्यावेळी, जे भक्त कार्यात येतील, त्यांच्याप्रीत्यर्थ 'प्रार्थना' लिहून दिली. ती प्रार्थना आपण सर्वजण सकाळी व सायंकाळी म्हणत



आहोत. ह्या प्रार्थनेचा अर्थ काय? हे समजले पाहिजे. नुसती पोपटपंची आता नको आहे. त्या प्रार्थनेत जो विषय आहे, त्याचे मनन व चिंतन व्हावयास पाहिजे. त्यापैकी एक वाक्य आपण अभ्यासासाठी घेतले, तर हा जन्म पुरणार नाही. 'तुझे आहे तुजपाशी'; पण अज्ञानाने आपण वाट चुकलो आहोत.

श्रीनाथपंथामध्ये एकच वाक्य आहे; व ह्या वाक्यात सर्व काही आहे. ते म्हणजे 'अलख निरंजन'! ह्या दोन शब्दात दोन अर्थ आहेत; एक पिंड व दुसरे ब्रह्मांड व तिसरे आपण, ज्यानी ह्या दोन तत्त्वाना जोडणे, म्हणजे 'नाथपंथ'; नाहीतर अनाथपंथ आपल्या वाटयाला आलाच आहे.

इतके साधनेबद्दल सांगितल्यावर, हे लक्षात येईल की, जी साधना आपण करीत आहोत, ती इतकी विशाल व विराट आहे की, तिचा अंत लागत नाही. पण आपल्या पाठिशी अनंत आहे म्हटल्यावर, साधनेची गोडी लागली पाहिजे. शास्त्रीयदृष्टया ह्या साधनेचा जर आपण विचार केला, तर ह्या जन्मात आपण 'जन्म' घेऊन, जन्माचे उतराई होऊ; व इतरांचे कल्याण करू, असा विश्वास प.पू. बाबांना आहे, पण आपल्याला नाही. बाहेरचे जग हे मृगजल आहे, हे जेव्हा पटेल तेव्हा 'जन्म वाया जाऊ नये', याचा नितध्यास लागेल. पण आज प्राप्त जन्माची किंमत स्वत:ला नाही व इतराना नाही; म्हणून जन्मभर चिंता करून, शेवटी आपला जन्म 'चिता' होणार. अशी नरजन्माची कहाणी आहे. यासाठी वारंवार गुरू अवतार घेतात; व जे जे आपल्याला पोषक आहे ते सांगत असतात; कारण हा जन्म वाया जाऊ नये, ही भक्ताची चिंता गुरूंना असते.

तेव्हा श्रीनाथांनी ॐकार साधनेचे गणित सूचित केले. हे जरी गणित अवघड आहे, तरी साधकाला निश्चित साधनेचे फल मिळेल; व याशिवाय आपण जी साधना ह्या जन्मामध्ये करीत आहोत, ती साधना पुढील जन्मी आपल्याला समजेल. ह्या साधनेमध्ये संथा प्रमाणबद्ध आहे; व म्हणून ह्या साधनेचा लाभ इहजन्म व परलोकासाठी आहे. संथा म्हणजे संथपणे उच्चार, विचार व आचार; याचाच अर्थ प.पू. बाबांनी सांगितलेली सबुरी. आपण आंबा खाण्याची इच्छा व्यक्त करतो, पण अज्ञानामुळे

कैरी खातो; व ती आंबट आहे असे म्हणतो. ही चूक आपली आहे. आपल्या बागेतील आंब्याच्या झाडाची मालकी आपली आहे; पण फळे आपली नाहीत. जेव्हा निसर्ग ह्या कैरीला आंबा म्हणेल, तेव्हा ते फळ गोड होईल. त्याप्रमाणे कर्म आपले आहे; पण त्या कर्माचे फल देणे, हा धर्म आत्म्याचा आहे. पण हे न समजल्याने, 'कर्मदशा' आहे; असे लोक म्हणतात. साधनेत जी अंगे सांगितली आहेत, ती जर आपल्याला समजली, तर साधना अंगावर येत नाही. ज्यावेळी आपण मार्गदर्शनाप्रमाणे साधना करू त्यावेळी ती साधना 'रंगातीत निजरंग रंगूनी', अशी होते. चित्रकलेमध्ये तीन रंग आहेत; व ह्या तीन रंगांचे सात रंग होतात, म्हणजे इंद्रधनुष्य; पण हे सात रंग साधकाला समजले नाहीत, तर काळा रंग तयार होतो. काळा रंग हा अशुभ आहे; पण साधना पूर्ण झाल्यावर, त्याच रंगाचा पांढरा रंग होतो, हा अनुभव येतो. यासाठी श्रीनाथांनी ॐकार साधनेची बारा अंगे सुचविली; व त्यापरत्वे साधना करीत असता, ती प्रमाणबद्ध व्हावयास पाहिजे; असे सुचविले.

साधनामार्गात खूप लोकाना असे वाटते की, 'आपला विकास झाला आहे'; त्यामुळे असे लोक बोलताना, चालताना आपण जगापेक्षा वेगळे आहोत; असे वागत असतात. पण 'विकास' याचा अर्थ ह्या लोकाना समजला नाही. विकाराची कास सोडली पाहिजे, तरच आपला विकास होतो; हा एक अर्थ व दुसरा अर्थ असा की, जीवनात जे काही विषय आहेत, त्या विषयाना सोडून श्रीगुरूंची कास धरली, म्हणजे आस ठेवली; म्हणजे विकास होतो. ज्याचा विकास झाला आहे, त्याला हे सांगावे लागत नाही. ज्याप्रमाणे सूर्य उगवला, हे सांगावे लागत नाही; त्याप्रमाणे आपल्या जीवनात अंधःकार आहे, तो जाऊन त्या ठिकाणी प्रकाश निर्माण झाला पाहिजे. याचा अर्थ, 'विकास' झाला.

जरी नाथांनी ही दीक्षा सांगितली होती, तरी सामान्य भक्ताना ती शिकविण्यासाठी प.पू. पंतांची आज्ञा पाहिजे, असे प.पू. बाबांनी सांगितले. "कारण सामान्य जनाना शिकविण्याची साधना, शब्दरूपात पाहिजे. तुला जी साधना श्रीभैरवनाथ, प.पू. गोरक्षनाथ व मागाहून श्रीनृसिंहसरस्वती यांनी शिकविली, ती नादरूपात आहे. त्या नादाचे रूपांतर शब्दरूपात



व्हावयास पाहिजे. याचा अर्थ 'लहरी' रूपामध्ये, साधनेचा लाभ भक्ताना करून द्यावयाचा आहे. हे होण्यासाठी येणाऱ्या भक्तांची 'लहर' न सांभाळता, आपण साधनेशी एकनिष्ठ रहावयास पाहिजे. जेव्हा कार्यारंभ झाला तेव्हा येणारे भक्त, आपल्या सवडीप्रमाणे येत होते. त्यावेळी कार्यार्थ लोकसंग्रह करावयाचा होता. आता आलेल्या भक्ताची सवड न पाहता, 'सवय' कशी लागेल? ह्याचा विचार करणे आवश्यक आहे. यासाठी ह्या थोर पुरुषाचा समावेश साधनेत करावयाचा आहे म्हटल्यावर, महत्त्वाची तीन अंगे ब्रह्मांडाची; व सहा अंगे पिंडाची, त्यांचा लाभ होण्यासाठी, ह्या थोर पुरुषाचा आशीर्वाद पाहिजे."

जेव्हा आज्ञा झाली तेव्हा प.पू. बाबांच्यासमोर, पर्यायाने शक्तिपीठासमोर श्रीफल ठेवले; व जो संकल्प सांगितला होता तो घेऊन बाळेकुंद्रीला पंतांकडे गेलो. ह्यावेळचे पंत व पूर्वीचे पंत हे वेगळे होते. त्यादिवशी मी बेळगावला सकाळी साधना करून, विश्रांती घेत पडलो होतो. इतरत्र कुणीही नव्हते. अशावेळी झोप नव्हती, तर ती 'झेप' होती. ह्यामध्ये श्रीगोरक्षनाथांचे बत्तीस शिराळे मी पाहिले; व नाथ मला म्हणत आहेत, "मला पंतांकडे जावयाचे आहे", असे जाणवले; तेव्हा मी म्हणालो, "ह्यावेळी बेळगावला गाडी नाही; मग कसे जावयाचे?" त्यावेळी गोरक्षनाथांनी प्रत्यक्ष कृती दाखविली की, एक पाऊल शिराळ्यामध्ये व दुसरे बाळेकुंद्रीत आहे! हे दोघामधील अंतर फार थोडे आहे, हा व्यावहारिक अर्थ झाला. पण मागाहून हे समजले की, ही साधना इहलोकासाठी व परलोकासाठी आहे; म्हणजे पंतांनी इहलोकाची जबाबदारी घेतली आहे; व परलोकाची जबाबदारी श्रीनाथांनी घेतली; म्हणून दोघांची भेट बाळेकुंद्रीला झाली; आणि परलोकासाठी स्वामी आहेत; असे साधन भवितव्यात घडवावयाचे आहे, म्हणून ॐकाराची जी अंगे सांगितली आहेत, त्याचा अर्थ पंतांनी जो सांगितला तो असा की, "पूर्वीच्याकाळी वारकरी जे बारा वर्षे तीर्थयात्रा करीत होते, त्यावेळी वेळ भरपूर होता; व आता वेळ थोडा आहे; म्हटल्यावर आत्म्याची मुक्तता 'वायुगमन', म्हणजे विमानाने केली पाहिजे. येथे 'वि-मान' याचा अर्थ फार वेगळा आहे. आपण नेहमी विचार करतो की, काय होईल? व कसे होईल? पण याचा शोध न घेता, तू गुरुमार्गी झाला आहेस; तेव्हा काहीएक

विचार न करता, जे गुरू करीत आहेत, त्यात आपले कल्याण आहे; असा विश्वास निर्माण कर. 'वि' म्हणजे काही विचार न करता, गुरू जी आज्ञा देत आहेत, ते 'मान'! असे 'विमान' ह्या साधनेने हे जग सुखी होणार आहे. संतांची भाषा अशी आहे. त्यामध्ये जे विज्ञान आहे हे आपल्याला समजेल, तेव्हा आपण धन्य होऊ.''

''ॐकार साधनेत नऊ अंगे आहेत. म्हणजे तीन देह आहेत; व प्रत्येक देहात काया-वाचा-मन आहे. ह्या नऊ माध्यमानी ॐकार साधना केली असता, एकाच जन्मात ब्रह्मप्राप्ति होते. यासाठी तीन यज्ञोपविते आहेत. त्या प्रत्येक यज्ञोपवितात तीन दोरे आहेत; व प्रत्येक दोरा तीन धाग्यापासून बनविलेला आहे. म्हणजे प्रत्येक यज्ञोपवितात नऊ दोरे आहेत; व तीन यज्ञोपवितांचे सत्तावीस दोरे होतात. म्हणजेच सत्तावीस नक्षत्रे किंवा निसर्ग निर्माण झाला आहे. मराठीत जी म्हण 'सूताने स्वर्गाला जावयाचे', ही म्हण खोटी नाही; तर ह्या म्हणीचा अर्थ समजला पाहिजे''. असा बोध प.पू. पंतांनी बाळेकुंद्रीला केला; व त्यानंतर बेळगावला संमेलनामध्ये ॐकार साधना नऊ अंगानी शिकविली.

त्यावेळी एक भक्त, जे शिराळ्यापाशी मांगले येथे राहतात; व नित्याने शिराळ्यास जातात, त्यांच्याबरोबर श्रीनवनाथांना असा निरोप पाठविला की, ''जी साधना आपण दिली आहे, ती करणे अतिशय अवघड आहे. त्यात एक जरी उच्चार चुकीचा झाला, तर आपण सांगितलेली साधना फुकट जाणार आहे. तेव्हा आपणच जर कृपा केलीत तर ते शक्य आहे. बहुतेक भक्त आपल्याकडे येतात, त्याना ऐहिक पाहिजे आहे; व ही साधना तर केवळ पारमार्थिक आहे; म्हणजे ऐहिक जीवनाचा संन्यास घ्यावयास पाहिजे, तरच पारमार्थिकाची प्राप्ति होईल. तेव्हा मी विचार करू लागलो की, आपण जन्माला आलो, ते कार्य सुलभ व्हावे म्हणून; व मीच जर साधना अवघड केली तर त्यास अपवाद होईल असे जग म्हणेल. यासाठी आपण तिघांनी मिळून एक मार्ग सुचविलात तर सर्वांचे कल्याण होईल.''

त्याप्रमाणे पंतांचा निरोप आला की, ''सर्व भक्ताना इकडे घेऊन ये. मी व गुरू गोरक्षनाथांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे, जी साधना आपण



करीत आहोत, ती कल्पना नसून, प्रत्यक्षात ही साधना चैतन्यमय आहे; तेव्हा तिची अनुभूति मिळावयास पाहिजे. कारण निसर्गामध्ये ऊन, पाऊस, थंडी हे ॠतूंचे कार्य चालू असते; व आपण त्या वातावरणात वावरत असतो; त्यावेळी ह्या ॠतूंचा अनुभव आपल्याला अनुभवता येतो, तसेच साधनेमध्ये आहे. जे नित्याचे जीवन आहे, त्यापेक्षा असे वेगळे जीवन की, ज्या जीवनात जिवंतपणा आहे; असे जीवन म्हणजे 'साधना'. ती नित्यनियमाने केली पाहिजे. एकदम प्राप्त होणारी नाही. ऐहिक जीवन हे एका क्षणात, भिकाऱ्याला लक्षाधीश करते. पण पारमार्थिक जीवन हे जर अचानक प्राप्त झाले तर आपण कैलासवासी होऊ. यासाठी हा विषय शास्त्रीय दृष्टीकोनातून समजून घे; कारण तुला जेव्हा ॐकार साधना श्रीभैरवनाथांनी शिकविली व तू शिकलास, ते जग व आजचे जग हे वेगळे आहे. तू ज्यावेळी साधना शिकलास, त्यावेळी 'ज' म्हणजे जगत्जननी व 'ग' म्हणजे गजानन असा अर्थ होता. आज पन्नास वर्षात जग बदलले आहे. आजच्या जगाचा अर्थ असा आहे की, हे जग 'अर्ध्या हळकुंडाने पिवळे' होणारे आहे. यामध्ये 'ज' म्हणजे जन्माला येणे, व 'ग' म्हणजे गतीने वागणे व बोलणे. हीच दोन भूषणे आज आम्हा मानवांची आहेत. त्यामुळे परमेश्वर आहे किंवा नाही, हा प्रश्न आहे; पण हे समजते केव्हा? आपण जेव्हा 'क' व 'ग' ह्या बाराखडया विसरू, तेव्हा जीवनाचा अर्थ काय आहे? हे समजेल. जन्माला येऊन चार पुरुषार्थांची प्राप्ति करून घ्यावयाची आहे. ते म्हणजे अर्थ, धर्म, काम, मोक्ष. यांची प्राप्ति करून घेणे, हे आपले आद्यकर्तव्य आहे. जो कुणी जन्माला येतो, तो स्वत:साठी नाही. जन्माला येणे हे निमित्त आहे. एक जन्माला येऊन सज्ञान झाला, तर बेचाळीस पिढया सज्ञान होतील; व एक जन्माला येऊन जर व्यर्थ गेला तर भावी पिढयाना, त्याहीपेक्षा कमी प्रतीचा जन्म मिळतो. जन्म घेणे ही खाण आहे. त्या खाणीतून सोने किंवा रत्ने निर्माण झाली पाहिजेत. पण हे जर समजले नाही तर यामध्ये काहीही सापडत नाही.

गुरुमार्गात ज्या साधना आहेत त्या अनेक प्रकारच्या आहेत. नुसते मी साधना करीत आहे; असे म्हणून चालणार नाही. पहिली अवस्था म्हणजे जे नामी तत्त्व साधनेमध्ये आहे, त्याची ओळख करून घेतली

पाहिजे. उदाहरणार्थ 'श्रीराम', 'ॐ नमः शिवाय' ह्या नामस्मरणामध्ये नामी तत्त्व कोणते आहे हे साधकाला समजले पाहिजे. 'नामी' यामध्ये 'ना' म्हणजे ज्या देवाचे नाव आपण घेणार आहोत त्या परमेश्वराचे नाव; व 'मी' म्हणजे स्वतः! असे नाम घेतेवेळी अहं, त्वं की, इदं हे कळले पाहिजे. कारण जी नावे देवाची आहेत, त्यात तीन अवस्था - उत्पत्ति, स्थिती, लय - आहेत. ह्या जर म्हटल्या गेल्या, तर नामी तत्त्व सिद्ध होते. नुसते संख्येने नामस्मरण म्हणून, ते सिद्ध होणार नाही. ह्यासाठी निर्गुण अवस्था पाहिजे; व तिची म्हणण्याची संथा शिकली पाहिजे. पुष्कळाना असे वाटते की, देवाचे नाव उठता बसता घ्यावे. पण जे नाव आपण घेणार आहोत ते नाव चैतन्यमय असावयास पाहिजे; व देहाचा धर्म काय आहे? हे पाहिले पाहिजे. उदाहरणार्थ, आपल्याला एखादे फळ, फूल यांचे झाड लावावयाचे असेल, तर ते झाड जमिनीच्या पृष्ठभागावर लावले, तर त्याला फुले, फळे येणार नाहीत. तर ते झाड जमिनीत रुजले पाहिजे; म्हणजे त्या झाडाची वाढ होईल. अन्यथा ते झाड आपल्याला झाडून टाकेल. त्याप्रमाणे आपल्या नामी तत्त्वाचे बीज मनाच्या ठिकाणी रुजले पाहिजे. मग त्याला फुले व फळे येतील.''

ही ओळख झाल्यानंतर, 'नामी तत्त्व' म्हणजे काय? हे कळले. त्याचप्रमाणे हे की, जी ॐकार साधना आपण करीत होतो, तो नुसता ध्वनि असून, तो ॐकार नव्हे. ''एकमेकावर भांडे आपटले, तरी ध्वनि होतो. ध्वनि काढण्यासाठी माध्यम पाहिजे; व त्याला प्रवाहित करण्यासाठीही माध्यम पाहिजे. अशी दोन माध्यमे पाहिजेत, तर ध्वनि निघेल; त्या ध्वनिमधून लहरी निघतील; व पुन्हा ध्वनि मिळेल;'' असे गणित प.पू. बाबांनी सांगितले. एखाद्या अडाणी माणसाला गणित सांगितल्यावर, तो जसा मूढ होतो, त्याप्रमाणे मी झालो. कारण पहिला जो ॐकार मी शिकलो, तो ध्वनि नव्हता: तो 'नाद' होता! तेव्हा ध्वनि व नाद यातला फरक काय आहे हे त्यावेळी पहिल्यांदा समजले. तो म्हणजे ध्वनि हा पिंडाचा आहे; व नाद हा ब्रह्मांडाचा आहे, हा बोध झाला. हे जग निर्माण झाले आहे, त्या जगाची निर्मिती ब्रह्मांडातून झाली आहे; तेव्हा ह्या जगाला सुखाचा मार्ग सांगून उपयोगी नाही; तर ब्रह्मांडाची ओळख करून दिली पाहिजे.



# ३७. साधनेचा अर्थ, इहजन्माचे गणित, सत्कर्म

पिंडाची ओळख ही वस्तुपदार्थाने होते; पण ब्रह्मांडाची ओळख होण्यासाठी काय आहे? हा प्रश्न दोन वर्षे माझ्यासमोर होता. शेवटी मी प.पू. पंतांना म्हणालो की, ''आपण सर्व दिलेत; पण 'तूप' कशात आहे? व कसे काढावयाचे? हे जर सांगितले नाहीत, तर आपली साधना व्यर्थ होणार.'' त्यावेळी मी बेळगावला पंधरा दिवस होतो. पण काही थांग लागेना. शेवटी पंतांकडे गेलो. त्यांनी विचारणा अशी केली, '' 'साधना' ह्या शब्दात दोन अर्थ आहेत. ते तुला समजले काय? मग पुढचा मार्ग मी सांगेन. त्यासाठी तू गोरक्षनाथांना पत्र पाठव व त्याचे उत्तर आल्यावर तू इकडे ये''. त्याप्रमाणे मी गोव्याला गेलो; व गोरक्षनाथांना प्रार्थना केली की, ''साधनेमध्ये दोन अर्थ आहेत, ते काय? हे सांगा.'' तेव्हा त्यांनी सांगितले की, ''पहिला अर्थ असा; ज्यालाः काही इच्छा झाली आहे, ती इच्छा पूर्ण करण्यासाठी आपण जो प्रयत्न करतो, त्याला 'साधना' असे म्हणतात. ही साधना बहुतांशी लोक करीत असतात; व शेवटी लाभ झाला की, साधना सोडून देतात. दुसरा अर्थ असा आहे की, 'साधना' मधील 'सा' म्हणजे इहलोक, 'ध' म्हणजे परलोक व 'ना' म्हणजे स्वर्गलोक. ह्या तिन्ही लोकांची ओळख, जन्माला आल्यावर आपल्याला करावयाची आहे. ती ओळख 'स्वर' ह्या माध्यमातून करावयाची आहे. जेव्हा आपण आपली साधना 'शब्दाने' न करता 'स्वराने' करू, तेव्हा 'नाद' ऐकू येतो. हा नाद म्हणजेच तिन्ही लोकांची प्राप्ति. याचा अर्थ ह्या तिन्ही लोकांचा जो सांभाळ करतो, तो म्हणजे 'नाद' किंवा 'ब्रह्म'. असा साधनेचा दुसरा अर्थ आहे. एकूण सात स्वर आहेत. पहिले दोन इहलोकासाठी, पुढचे दोन परलोकासाठी व राहिलेले तीन हे स्वर्गलोकासाठी आहेत. असे साधनेत सात सूर आहेत. ह्या सूरानी भजन, आरती व नामस्मरण करू, तेव्हा ह्या तीन माध्यमातून साधक सिद्ध होतो; व साधना 'साध्य' झाली असे म्हणतो. पण अजून जर 'सा' सापडत नाही तर आपल्याला देव भेटला आहे, असे म्हणणे हा केवळ भास आहे.''

वरील बोध जेव्हा मला झाला, तेव्हा मी आशा सोडली; कारण जी साधना म्हणून म्हणत होतो ती माकडचेष्टा असून, ते अंग पिंडाचे आहे, ब्रह्मांडाचे नव्हे; असे वाटू लागले. यापेक्षा त्या वाटेला न जाणे बरे; कारण वरील साधनेत जर काही चूक घडली, तर सर्व साधना व्यर्थ गेली असे होईल. दुधाची बासुंदी झाली; येथपर्यंत सर्व सिद्ध झाले; पण नकळत मिठाचा खडा जर दुधामध्ये पडला तर काय उपयोग? म्हणून ह्या मार्गात 'अवधान' महत्त्वाचे आहे.

"आपण अधिकारी झालो आहोत, म्हणजे आपल्याला सर्व करण्याची मुभा आहे, असे पुष्कळाना वाटते. त्यामुळे कार्यारंभी विचार हे साधनेला पोषक असतात. पण शेवटपर्यंत ते टिकत नाहीत; कारण इतरानी आपल्या साधक अवस्थेचा गौरव केला, तरी आपण कुठे आहोत हे लक्षात येत नाही. ही वेळ साधक अवस्थेत अत्यंत महत्त्वाची असून, त्यावेळी साधकाने स्वत:ला सांभाळले पाहिजे.

वास्तविक आपल्या सभोवारचे जे जग आहे, त्याला सतत उणीव आहे. याचक कधीही 'मला अमुक प्राप्त झाले आहे'; असे म्हणून समाधानी होणार नाही. अशावेळी साधकाने हे ओळखले पाहिजे की, 'हा हव्यास आहे, अभ्यास नव्हे'. गुरुमार्गात समाधानी असणे, याचा अर्थ आपला विकास झाला आहे; व अभ्यासाने हे कळले पाहिजे; नाहीतर आपली साधना आपल्याला दुरावते. आपण एखाद्या धातूला आकार देतो. तो जर बिघडला तर पुन्हा जोडता येत नाही. तद्वत साधनेने जो आकार प्राप्त होतो, तो बिघडला, तर ह्या जन्मात पुन्हा आकार येत नाही; म्हणून साधकाने साधनेमध्ये, 'अवधान अवस्था' टिकविली पाहिजे. श्रीगुरू हे कुणाचे नोकर नाहीत; तेव्हा आपण गेल्याबरोबर ते आशीर्वाद देतील, हे शक्य नाही. आपण गुरूंना भेटत असतो; व ते आपल्याला भेटत असतात. ही जी भेट होते, त्यावेळी आपण म्हणतो की, 'कृपा झाली'. पण श्रीगुरू आपल्याशी हसले, बोलले, ती कृपा नव्हे; तर आपण गुरुमार्गी होतो, त्यावेळी ते पाठिशी राहून अवलोकन करीत असतात; कारण जीवन हा पल्ला खूप मोठा



आहे. तेव्हा ह्या जीवनात ईश्वर केव्हा आहे? नश्वर केव्हा आहे? हे ते पडताळून पाहत असतात. आपल्या मनासारखे झाले की देव आहे; मनासारखे झाले नाही की नश्वर; असा खेळ आपल्या जीवनात सदैव चालू असतो. अशावेळी जे 'गुरू' आहेत ते मूर्खपणा करीत नाहीत; तर कर्म अनुकूल करून देतात. त्या कर्माने सुख भोगावयाचे की, गुरुमुख ओळखावयाचे? हे स्वत:चे स्वत: ओळखले पाहिजे. त्यानंतर गुरुकृपा व त्यानंतर कृपा-आशीर्वाद असे दोन शब्द आहेत. 'कृपा' म्हणजे जी अडचण आहे ती निवारण करा; म्हणजे एकाच जन्माची तरतूद; व कृपाशीर्वाद म्हणजे अनेक जन्मात आपण आपल्या गुरूंचे दास होणे; असा अर्थ आहे.


वरील अर्थ ज्यावेळी भक्ताना समजेल, त्यावेळी भक्त हा भक्ती करू लागेल. 'सक्ती' हा सोपा मार्ग आहे; हा सोडून 'भक्ती' ह्या कठीण मार्गाचे पाऊल आपण उचलतो, त्यावेळी आपल्याला हे समजते की, आपल्या विकासास आरंभ झाला. 'विकास' ह्यामध्ये दोन शब्द आहेत. 'वि' म्हणजे विचार किंवा विकार. ह्या अवस्थेत विचार असेल, तर 'कास' गुरूंची धरावी. कारण 'कासव' हे मंद गतीने चालत असते. पण आपल्याला जलद गतीने सर्व हवे असते. भक्त जे जे मागतो ते त्याला एका क्षणात हवे असते, पण तसे गुरूंनी दिले, तरी त्याचा सांभाळ करणे, अति अवघड आहे. यासाठी कासवाच्या गतीने गुरू देत असतात. जोपर्यंत आपला आचार व विचार हा उच्चाराशी एकरूप होत नाही, तोपर्यंत साधना करणे भाग आहे. यासाठी जन्मही पुरत नाही; कारण 'साध्य' हे मागाहून आहे. त्याआधी साधना ही श्रेष्ठ आहे, हे आपण विसरतो; कारण नित्य मीठभाकरीच्याऐवजी मिष्टान्न मिळाले, तर बरे वाटते. त्याप्रमाणे काही एक 'साधना' न करता, जर ऐश्वर्य मिळाले तर त्याचे अपचन होते; व ऐश्वर्य लयास जाते; म्हणून 'साधना' ही नित्यनियमाने करणे, हे साधकाचे कर्तव्य आहे. जर साधनेला 'नियम' नसेल तर ती साधना होत नाही. गुरुमार्गात जी साधने असतात, ती 'नियमात' बसवावी लागतात. जो नियम पिंडाला असतो, त्याप्रमाणे आपण वागणे, ह्याला साधना म्हणता येत नाही. ब्रह्मांडाला जो नियम

आहे तो जर आपण शिकलो, तर त्याला साधना म्हणता येईल. ह्यासाठी भक्ताच्या कल्याणाप्रीत्यर्थ, गुरू हे साधना नियमात बसवितात. म्हणजे तिचा लाभ इतराना होतो व होईल. ह्यासाठी जरी वेळ लागला तरी नियमाचे उल्लंघन साधकाने करू नये. जर नियमात साधना केली तर तिचा लाभ अपेक्षेच्या पलीकडे असतो. जर नियम नसेल तर आपले आयुष्य व्यर्थ खर्च होते. याचा विचार साधकाने केला पाहिजे.'' असा गुरुपदेश प.पू. पंतांनी केला. त्याप्रमाणे तीन वर्षे मी आटोकाट प्रयत्न केला. जी बारा अंगे ॐकाराची आहेत, त्यातील तीन अंगे जरी भक्तानी आत्मसात केली; व इतराना शिकविली तरी प्राप्त जीवनाचे सोने होईल. ही तीन अंगे अधिक नऊ, म्हणजे एकूण बारा अंगे आहेत. पण ती सिद्ध करण्यासाठी माझे प्राण पणास लागले; व पुन्हा जिवंत झालो. पण अजून काही भक्त जागेवर जिवंत नाहीत, याचे दुःख वाटते. कदाचित ही साधना फुकट आहे, म्हणून तिची किंमत इतराना समजत नाही. माझे शरीर सर्व रोगानी पछाडले आहे. पण त्यांच्यावर मात करीत आहे, ते केवळ ॐकार साधनेमुळे! त्याची प्रचीति आणखी काय पाहिजे? स्वतःला रोग करून घ्यावयाचा; व मग 'साधनेमुळे' तो बरा होतो की नाही? हा अनुभव घ्यावयाचा; व त्याची प्रचीति इतराना सांगावयाची, असा क्रम चालू आहे.

इहजगतात जन्माला आल्यावर, त्याचे गणित समजणे आवश्यक आहे. जन्माला येतेवेळी कर्माची बाजू शंभर टक्के असते; व त्या कर्मपरत्वे इहजन्मात केवळ सुखाचा लाभ घेणे, हे हिताचे नाही. आज जे सुख आपल्याला प्राप्त होते ते पूर्वकर्मानुसार मिळते. ते सुख एकाचे नसून, त्या कर्मात इतरांचाही समावेश आहे, हे आपण विसरतो; व म्हणून श्रीगुरू हे कर्माचे गणित समजावून सांगत असतात. जीवनात सुखाची प्राप्ति पंचवीस टक्के, शांतीची प्राप्ति पंचवीस टक्के; व समाधान अधिक नित्य साधना मिळून पन्नास टक्के, असे गणित आहे. जीवनात कितीही सुखाची प्राप्ति झाली, तरी समाधानाची प्राप्ति होणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण हे समाधान पुढील जन्मात आपले सत्कर्म होणार आहे. ही अवस्था साधनेमुळे प्राप्त होते.









सुख = नव्वद अंश
शांति = नव्वद अंश
समाधान, साधना } = एकशेऐंशी अंश
एकूण तीनशेसाठ अंश

असे परिपूर्ण जीवन असून, जे जीवन आपण कार्यान्वित करतो ते दोनशेसत्तर अंश आहे; व साधनेसाठी नव्वद अंश कर्म व्यतीत होणे, म्हणजे 'सत्कर्म' होय. देवाची पूजा, आरती म्हणजे सत्कर्म नव्हे; ती अंगे आहेत. ह्या अंगानी युक्त अशी क्रिया जेव्हा काया करते, त्यावेळी आपल्याला 'समाधान' ह्या अवस्थेचा लाभ होतो; म्हणजेच सत्कर्म जन्माला येते. तेव्हा प्रत्येक क्रिया ही काया-वाचा-मनाने केली असता, आपल्याला सुख-शांति-समाधान आदींचा लाभ होतो. नुसते सुख मागून मिळत नाही; व समाधानही मिळत नाही. यासाठी साधकाने ज्ञानी होऊन, साधना करावयाची असते. नुसते 'गुरुमार्गात बारा वर्षे आहोत', असे म्हणणे चुकीचे आहे. गुरुमार्गाचे लक्षण काय? हे समजणे आवश्यक आहे. इहजन्मात ऐहिक सुखांचीच प्राप्ति होणे, हा सत्कर्माचा गैरवापर असून, वास्तविक जे प्रतिकूल कर्म आहे, त्याला अनुकूल करणे; व जे अनुकूल झाले आहे, त्या कर्माचा विनियोग, जीवन साकार होण्यासाठी झाला पाहिजे. प्रातःकाली आपण जागे होतो, ती जाग झोपेतून उठण्यासाठी नसून, आपले जे अज्ञान असते, त्यापरत्वे आपण तसे कर्म पुन्हा करू नये, म्हणून देव आपल्याला उठवितो. आपण सकाळी केवळ चहासाठी उठतो; पण ही 'चाह' देवासाठी आहे की, पेयासाठी आहे? याचा विचार करणे आपले इष्टकर्तव्य होय!


प्रातःकाली आपल्याला देवाने उठविले आहे; ही जाणीव झाल्यावर, आपले कर्तव्य काय? चोवीस तासांचा दिवस असतो. असे तास, दिवस, वर्षे संपतात; व आपले जीवन क्षणभंगूर आहे, हे शेवटी पटते; पण


त्याचा त्यावेळी उपयोग काय? परंतु ही जाणीव झाली, तरी हरकत नाही. जरी जीवनाचे सार्थक ह्या जन्मी झाले नाही तरी जीवनाला आकार प्राप्त झाला आहे, याचे समाधान मानले पाहिजे; कारण हाच आकार, पुढील जन्मी आपल्याला प्राप्त होतो.

आपण 'सदा सर्वदा' हा श्लोक रोज म्हणतो. त्या सर्व ओळी लक्षात ठेवून, त्यातील जो 'गुरुमंत्र' आहे, त्याचे स्मरण ठेवले पाहिजे. ह्याच शब्दाना 'ओवी' असे म्हणतात. याचा अर्थ 'सत्कर्मयोगे वय घालवावे' असा आहे. त्यायोगे जीवनाचा विकास खालीलप्रमाणे होतो:-




विकास - ॥ बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले ॥




तीन गति एक होऊन, चौथी अवस्था प्राप्त होणे, म्हणजे नराचा नारायण होणे होय.



# ३८. अवधान, ध्यान, चिंतन अवस्था

जीवनामध्ये संकटे आल्यानंतर, आपण उपाय योजना करतो. परंतु पुढे निर्माण होणाऱ्या परिस्थितीपूर्वीच, त्यासाठी कृपाशीर्वादरूपी उपाय-योजना करणे, याला 'तरणोपाय' असे म्हणतात. अशी तरतूद ईश्वरी संदेशातून होत असते; मानवी बुद्धीतून नाही. जो जीव पिंडात जन्माला येतो, त्याला ब्रह्मांडात जाण्यासाठी, म्हणजे इहलोक, परलोक व स्वर्गलोक यासाठी एक मार्ग असावा; व जगतात जन्माला आलेले जीव, मानवतेच्या भावनेतून एकत्र येण्यासाठी, एक प्रार्थना असावी; अशी प.पू. साईनाथ महाराजांची इच्छा होती. त्यासाठी लागणारी ॐकारशक्ति, श्रीनृसिंह सरस्वतींच्या रूपाने भूतलावर अवतीर्ण झालेली होती. ती शक्ति प्राप्त केल्यानंतर, त्या शक्तीमध्ये, त्रिगुणात्मक रूपाने अस्तित्वात असलेल्या देवदेवता ह्या एकरूप झाल्या; व मगच शक्तिपीठाची स्थापना करण्यात आली. परंतु ही शक्तिपीठाची स्थापना करताना, जी दिव्यं प्रचीति मी अनुभविली, तिचा विचार आज आला, तरी हातपाय कापू लागतात.

शिरोडयाला सेमिनार घेत असताना, ''ह्या जगताचे भविष्य काय?'' असा प्रश्न मी प.पू. बाबांना विचारला. त्यावेळी प.पू. बाबांनी सांगितले की, ''योग्य वेळेला मी ते दिव्य, तुझ्या माध्यमातून करून घेईन. फक्त तुझी तयारी असू दे; कारण ही शक्तीची स्थापना साधी नाही. जे जग म्हणजे पिंड आहे, त्याचे रूपांतर ब्रह्मांडात करणे सोपे नाही. ही साधना आहे. त्यामध्ये मूळ विषय असा आहे की, पिंड अधिक ब्रह्मांड मिळून शक्तिपीठ तयार होते. यासाठी जो साधक हे कार्य करील, त्याला आचार, विचार, उच्चार ह्या ज्या देहाच्या क्रिया आहेत, त्या क्रियेला मुकावे लागेल. ही जर तयारी असेल तर आपण दोघे मिळून शक्तिपीठाची स्थापना करू. जो 'पिंड' हा तू आहेस, व 'ब्रह्मांड' मी आहे; म्हणजे तू चेतना व मी चैतन्य मिळून 'हिरण्यगर्भ', म्हणजे शक्तिपीठ तयार होईल. अशी विश्वाची रचना करावयाची आहे. आजच्या दिनी जे भक्त आहेत, त्याना कल्पना येणार नाही. त्यांच्या पुढील पिढयाना याचे सुख मागाहून कळेल. असे दिव्य आजपर्यंत कुणी केले नाही. रस्त्याने चालत असता, जर पायात काटा बोचला तर हे भक्त ''आई''!

म्हणतात. मग जे 'आवाहन' तू म्हणतोस, त्याची कल्पनाही करवत नाही. गारेचा पाऊस आपण पाहतो. अशी गार आकाशातून खाली येत असता, तिचा प्रहार सहन होत नाही; मग 'वीज' म्हणजे ब्रह्मांडाचे 'बीज' खाली आल्यावर, तुझी अवस्था शून्यवत होणे, हे स्वाभाविक आहे!'' पण आता सर्व काही पूर्ण झाले. ह्या चैत्र पाडव्याला (१९८६) तीन प्रदक्षिणा पूर्ण केल्या; व त्यानंतरच शून्यवत अवस्थेतून, पुनश्च मूळ अवस्था प्राप्त झाली. याला तीन वर्षे लागली. असा सुखसोहळा पाहण्यासाठी व ऐकण्यासाठी उत्तम आहे; परंतु हे दिव्य देवांनीसुद्धा केले नाही, कारण ह्या जगाचे काय होईल? व काय होणार आहे? ही काळजी देवालासुद्धा नाही. ती प.पू. बाबांना आहे. ह्या जगात अनेक लोक देवाचे भक्त असतील, पण माझ्या बाबांचे भक्त ह्या जन्मात होणे, यासारखे भाग्य नाही! म्हणूनच पदात म्हटले आहे; 'मेरे साईबाबा की महिमा निराली!' काय पुण्य आपण केले? की, या जन्मात त्यांची भेट झाली! आता मागण्यासारखे काहीही नाही. अज्ञानामुळे सर्व विश्व जगत आहे; पण इतराना जगू देणे हा मानवाचा धर्म आहे, तोच नेमका आपण विसरलो आहोत. तरण्या पोरापोरींनी एकमेकावर मोहीत होणे, म्हणजे 'प्रेम' नव्हे. 'प्रेम' ही अवस्था आहे. जेव्हा पूर्ण देहामध्ये उच्चार, आचार, विचार यातून चौथी अवस्था निर्माण होईल, ती चौथी अवस्था म्हणजे 'प्रेम'; व जोपर्यंत एकमेकाला केवळ देहिक आकर्षण आहे तोपर्यंत ती अवस्था प्रेम नसून 'प्रेत' आहे. प्रेताशी जीवन जगणे व व्यतीत करणे; या जीवनात सुख-शांति कशी मिळेल? जन्माला येऊन हे मिळवायचे नाही. प्रेम कसे प्राप्त होईल? याचा नितध्यास लागला पाहिजे.

मी साधना ही म्हातारपणी केली नाही. सर्वापेक्षा मी अधिक देखणा होतो. सर्वगुणसंपन्न असताना, ह्या जगाच्या नादी लागलो नाही. आपली 'नांदी' सद्गुरुकृपेने कशी होईल? म्हणून वाट पाहिली; व जगाला वाट दाखविली, म्हणजे मार्ग दाखविला; व त्यासाठीही प.पू. बाबांची आज्ञा होईपर्यंत थांबलो. ह्याचा अर्थ 'सबुरी'! प.पू. बाबांच्या प्रेरणेने शक्तिपीठाचे कार्य शंभर टक्के झाल्यावरच, त्यांचा 'संदेश' जगताला 'शिलालेख' म्हणून दिला. प.पू. बाबांच्या कृपेने आज ह्या जन्माचा परीस झाल्यावर, सोन्याचा लोभ ठेवण्यापेक्षा, प.पू. बाबांचा 'सोन्या' होणे, हे शतजन्मापेक्षा श्रेष्ठ आहे!



साडेतीन हजार वर्षापूर्वी श्रीनवनारायणांनी कृष्णा व पंचगंगा नदीच्या परिसरातील बत्तीस शिराळे, या गावी एक यज्ञ केला होता. त्यानंतर हजार वर्षांनी श्रीमच्छिंद्रनाथ व श्रीगोरक्षनाथ संचार करीत असता, त्या मंगल ठिकाणी आले. त्यावेळी श्रीमच्छिंद्रनाथांनी, श्रीगोरक्षनाथांना याच पुण्यस्थळी तपश्चर्या करण्याची आज्ञा दिली; व स्वत: दक्षिण भारताच्या संरक्षणार्थ, श्रीरामेश्वरक्षेत्री प्रयाण करते झाले. श्रीगोरक्षनाथांनी गुरू श्रीमच्छिंद्रनाथांना तपश्चर्येचे स्वरूप विचारले, त्यावेळी श्रीगुरूंनी त्यांना अवधान, ध्यान व चिंतन, या तीन अवस्थांची दीक्षा दिली. प्रत्येक अवस्था सिद्ध करण्यासाठी, श्रीगोरक्षनाथांना बारा वर्षे लागली. अशा तऱ्हेने छत्तीस वर्षांच्या कालावधीनंतर, पुनश्च श्रीमच्छिंद्रनाथ व श्रीगोरक्षनाथ यांची, या पावन स्थळी भेट घडली. त्यावेळी श्रीमच्छिंद्रनाथांनी श्रीगोरक्षनाथांना जगाच्या अंतापर्यंत याच स्थळी राहून, तृषार्त आत्म्यांची सेवा करण्याची आज्ञा दिली. तसेच बत्तीस शिराळ्यापासून ते दक्षिण भारताचा रामेश्वरापर्यंतचा संपूर्ण परिसर, त्यांच्या संरक्षणकवचाखाली जतन करण्याची जबाबदारी, त्यांच्यावर सोपविली. 'बत्तीस शिराळे' ही मूळ बत्तीस गावे. त्याठिकाणी आजही 'अनंताचे व्रत', श्रीशेषपंचमीला केले जाते. 'अनंत' म्हणजे ज्यास अंत नाही.

आजही रोज शेकडो आत्मे, ज्याना त्यांचे वंशज प्रयाग, काशी, गया या त्रिस्थळी, अंत्यविधीनंतर अनाथ अवस्थेत सोडतात; त्या आत्म्याना श्रीगुरू गोरक्षनाथांच्या कृपाशीर्वादाने, सनाथ अवस्था म्हणजे 'मुक्ती' प्राप्त होते. हे आत्मे कर्मपरंपरेतून मुक्त होण्यासाठी, श्रीशेषपंचमीला नागाच्या रूपात, हजारोंच्या संख्येने 'बत्तीसशिराळे' येथे उपस्थित होतात. या आत्म्याना सद्गती प्राप्त व्हावी; व त्यांचे भवितव्यातील जीवन सार्थकी लागावे, म्हणून श्रीगुरू गोरक्षनाथ त्याना अवधान, ध्यान व चिंतन या अवस्थांची दीक्षा देतात. 'अवधान' याचा अर्थ असा की, सद्गती प्राप्त झाल्यानंतर, पुनश्च कर्मवलयाच्या मोहात गुंतून न पडता, गुरुवलयाच्या तेजात जीवन कृतार्थ व्हावे, म्हणून 'गुरुअंश' बनून जन्माला यावे! परंतु ही दीक्षा प्राप्त झाल्यानंतर, आपल्या जन्मउत्पत्तीचा निर्णय त्या आत्म्याने घ्यावयाचा असतो. पुढे जन्मप्राप्तीनंतर त्या आत्म्यास 'ध्यान' अवस्थेची प्राप्ति होईल; त्यावेळी त्याने हे ध्यानात

ठेवणे आवश्यक आहे की, गुरुकृपेने जो नरदेह प्राप्त झाला आहे, त्या नरदेहाला 'नारायण' ही अवस्था प्राप्त व्हावी; व जीवन कृतार्थ व्हावे; म्हणून सदैव 'चिंतन' या अवस्थेचे अवधान, त्याने ठेवणे आवश्यक आहे. म्हणजेच जन्मातील मूळ कारण उदित होऊन, जीवन हे केवळ स्वत:पुरतेच खर्च न होता, इतराप्रीत्यर्थ ते व्यतीत होईल. अवधान, ध्यान व चिंतन या तीन दिव्य अवस्थांची, आपल्या काया-वाचा-मनाच्या ठिकाणी जपणूक व्हावी म्हणून, व श्रीगुरूंनी नेमून दिलेली नित्याची ॐकार साधना, जास्तीतजास्त कार्यान्वित व्हावी म्हणून, साधनेची बारा अंगे व या तीन अवस्था, यांचा विचार आस्थेने करणे आवश्यक आहे. अशी अवस्था भवितव्यात पुनश्च प्राप्त होईल असे नाही. म्हणून जी साधना आपल्याला शिकविली आहे, तिची दक्षता पाळली पाहिजे; व साधनेतून क्रमाक्रमाने प्राप्त होणाऱ्या अवस्थांचा सखोल अभ्यास साधकाने केला पाहिजे.

**अवधान अवस्था**

गुरुमार्गात ही अवस्था प्राप्त होणे, हे दुर्मिळ आहे. कारण जन्म घेतल्यावर, कर्माची उपाधी मागे लागते. या कर्मातून आपली व आत्म्याची सुटका व्हावयास पाहिजे, म्हणून आपण गुरुमार्गी होतो. अशावेळी सुखाची प्राप्ति व्हावी, अशी अपेक्षा न ठेवता, गुरूंची प्राप्ति केव्हा होईल? असा ध्यास लागला पाहिजे. नुसते खाणेपिणे, कपडालत्ता, ऐषआराम आदीनी जीवन व्यर्थ खर्च न होता, जीवनास निश्चित आकार यावयास पाहिजे. तो आकार फक्त गुरू देत असतात. गुरुमार्गामध्ये 'गुराखी' व 'गुरू' हे दोन शब्द आहेत. एक फक्त गुरे राखतो; व दुसरा मार्ग! जन्माला येऊन तो जन्म वाया जाऊ नये, तर इतराना त्याचा उपयोग व्हावा, ह्या तळमळीने जे वाट दाखवितात, त्यांना 'गुरू' असे म्हणतात. ह्या गुरूंनी स्वत:चे जीवन, तन-मन-धन भक्तासाठी खर्च केले पाहिजे. ज्या ज्या अडचणी भक्ताच्या जीवनामध्ये घडतात, त्या न सांगता, जी अडचण ज्या कर्माने निर्माण झाली आहे, अशा 'कर्माचे विमोचन' करून, त्या भक्ताला अभयदान द्यावे लागते. नुसते दु:खाचे निवारण, हे रस्त्यावर बसणारे ज्योतिषी सांगू शकतात. अशावेळी जरी भक्ताची पातळी अज्ञानाची असते, तरी त्या भक्तास सखोल ज्ञानाचा लाभ देताना, ऐहिक सुखासाठी



जन्म नाही; हे दाखवून दिले पाहिजे; व मग हळूहळू भक्ताची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलू लागते. हे जीवन क्षणिक आहे. जे जे काही प्राप्त करावयाचे आहे, त्याचा लाभ जन्मोजन्मी असावयास पाहिजे. नुसता लोभ असून चालणारा नाही. ही अवस्था इहजन्माची आहे. या इहजन्माचे ज्ञान व लोभ आपल्याला होतो, तो न वाढविता, आपण जसे जसे मार्गात जाऊ तसा तसा लोभ कमी करून, गुरुमार्गात लाभ कसा होईल? हा विचार केला पाहिजे. म्हणजे "मी जगात आहे, पण माझे जग इहलोकात नाही;" असे बोलणे व वागणे म्हणजे **'अवधान अवस्था'**. इहलोकातील कर्तव्य करीत असता, त्यात आपला विषय न राहता, फक्त 'वास' राहिला पाहिजे. म्हणजे 'कर्माचा विषय भोगणे न राहता, धर्माने कर्माला मुकणे'; ही अवस्था प्राप्त होते. म्हणजे स्वाभाविकच इहजन्मात, पुढील जन्म म्हणजे परलोक, ह्याला आरंभ होत असतो. अशावेळी आपण ॐकार साधना जरी करीत असलो, तरी ह्या अवस्थेत फक्त 'अ' हे सिद्ध होते. कारण 'अ' म्हणजे विश्वाची उत्पत्ति होय. अशावेळी आपला आत्मा हा जन्म घेतो; व गुरुमार्गी झाल्यावर, तो आत्मा ॐकाराची 'अ' ही अवस्था प्राप्त करता होतो. म्हणून ही साधना करीत असता, शंभर टक्के अवधान ठेवले पाहिजे.

**ध्यान अवस्था**

पूर्वी अनेक जन्मात अनेक कर्मे आपण केली आहेत; म्हणून पुन्हा ह्या जन्मी जन्म घेतला आहे. पण त्या जन्माची स्मृती आपल्याला नाही; म्हणून पुन्हा पुन्हा तेच पातक किंवा प्रमाद, आपल्या हातून घडत असतात; व पुन्हा पुन्हा सुखाचा लोभ वाढत असतो. म्हणून पुन्हा जन्म! हे रहाटगाडगे चालू आहे; पण कोणत्यातरी जन्मात, आपण काही पुण्यकर्म हे निश्चित केले आहे. त्या कर्माची फेड म्हणून ते कर्म आपल्याला गुरुमार्गी करते. पण त्यावेळी गुरूंची आठवण होत नाही, म्हणून एखादे संकट आपल्या जीवनात निर्माण होते. त्यावेळी आपल्याला सुख कसे लाभेल? म्हणून आपण गुरूंना भेटतो. वास्तविक ते दु:ख नसते; तर आपल्याला जागे करून, आपण जागेवर यावे, म्हणून कर्माने आपल्यावर उपकार केलेले असतात. त्यावेळी पुनश्च तशी कर्मे आपल्या हातून घडू नयेत, म्हणून श्रीगुरू वंशाचे व कर्मांचे विमोचन

करून, त्याऐवजी दीक्षा देत असतात. वास्तविक वंशात व कर्मात जे जे काही दोष असतात ते दोष जाऊन, जीवन हे निर्दोष व्हावे; अशी गुरूंची इच्छा असते; व पुढील जन्माची तरतूद, ते करून देत असतात; पण आपण, आपल्या सभोवार जे जग दिसते, तसे जीवन आपण उपभोगावे, म्हणून ह्या विमोचनाला व दीक्षेला किंमत देत नाही. ज्यावेळी ही जाणीव होईल, तेव्हा त्याचे मूल्य काय आहे? हे कळेल. हा जन्म वारंवार येत नसतो. पुन्हा जन्माला येण्यासाठी, काही शेकडो वर्षे लागतात. म्हणून ज्ञानी पुरुषानी, ''जीवन व्यर्थ खर्च करू नका;'' असे वारंवार सांगितले आहे. तर ह्या जीवनाचा आपण उपभोग घेऊन, इतराना त्याचा उपयोग व्हावा, ह्याकडे लक्ष द्यावे. वास्तविक जन्माला येतेवेळी, हे जीवन 'वना' सारखे होते. गुरू भेटल्यावर, त्याचे 'नंदनवन' झाले. हा धर्म गुरूंचा आहे. पण आपण कर्माधीन आहोत; म्हणून गुरूंनी काय दिले आहे? हा प्रश्न आपल्यापुढे उभा असतो. ज्यावेळी 'कर्माधीन' अवस्था संपते, त्यावेळी 'धर्माधीन' अवस्था सुरू होते; व जीवन हे इतरासाठी आहे; याचा बोध होतो. म्हणून पुन्हा पुन्हा जन्माला येऊन कर्माधीन होण्यापेक्षा, जन्म घ्यावयाचा आहे, पण तो गुरुकृपेने 'धर्मासाठी'; हेच वचन आपण पाळले पाहिजे. एखादे वेळी आपले 'जेवण' विसरले पाहिजे; कारण त्यापेक्षा 'जीवन' अधिक मोलाचे आहे, असा ध्यास लागला पाहिजे. आपण जी ॐकार साधना करीत असतो, त्या साधनेत जो शब्द 'उ' असा आहे, त्याची प्राप्ति 'ध्यान' अवस्थेमध्ये होते. आता गुरूंपाशी आपण काही मागावयाचे नसून, आपला जन्म जो व्यर्थ गेला असता तो गुरुकृपेने अर्थपूर्ण झाला आहे, तेव्हा ह्या जन्माची 'दक्षिणा' गुरूंना द्यावयाची आहे. ही दक्षिणा म्हणजे आपण 'दक्ष' राहणे; हे आपल्या हिताचे आहे; व जो वंश जन्माला येतो तो वंश न राहता, आता 'गुरुअंश' म्हणून बनला आहे; म्हणून भवितव्यामध्ये 'संतति' ही अवस्था प्राप्त न करता, 'संपत्ति' म्हणून जन्म घ्यावयाचा आहे, म्हणजेच 'न संपणारी संपत्ति' असा कृपाशीर्वाद गुरू देतात.

### चिंतन अवस्था

ही अवस्था काय आहे हे ज्ञानी माणसालासुद्धा समजत नाही. 'इहलोकात' जन्माला येणे, म्हणजे भाग्यवान होणे, असा अर्थ आहे.



त्रिभुवनात इहलोकाइतका श्रेष्ठ जन्म नाही. कारण जीवाला आपला विकास जन्म झाल्यावर करता येतो. अन्यथा दुसरे लोक, हे नुसते जिवंत आहेत. पण त्या ठिकाणी जीव जरी धारण होतो तरी उत्क्रांती इहलोकात होत असते. याला शास्त्रीय कारण असे की, ह्या सृष्टीवर पाच तत्त्वे आहेत. जीवाची धारणा होण्यासाठी देह पाहिजे; व तो देह पाच तत्त्वानी होतो. म्हणजेच देह अधिक जीव म्हणजे जीवन; असा अर्थ आहे. हा जीव जेव्हा जन्माला येतो, त्यावेळी देह हा नव्याने धारण होतो; पण जीव किंवा जीवात्मा किंवा आत्मा हा पूर्वीचा असतो. असे जीवन जीवाने भोगलेले असते, पण त्याचा लाभ देहाला होत नाही. म्हणून जन्मप्राप्तीनंतर देहाला लोभ असतो; व जीवाला किंवा आत्म्याला लाभ कसा होईल? याबद्दल चिंता असते. म्हणजे पर्यायाने हे द्वैत चालू असते. जर गुरू भेटले नाहीत; तर चिंता करून, 'शेवट गोड करी दत्ता' याच्याऐवजी चिता ही क्रमप्राप्त आहे. तेव्हा गुरुमार्गात हे द्वैत जाऊन, अद्वैताचे ज्ञान झाले पाहिजे. ''कोणते जीवन क्षणिक आहे म्हणून त्या सुखाचा ध्यास लागला आहे?'' हा प्रश्न स्वत:ला विचारून पहा. मग सुखाचा ध्यास लागण्यापेक्षा, 'सुखाचा घास' हे सुख गुरू देतात. म्हणजे 'शेवटी जीवन गोड होईल'; असा आशीर्वाद मागणे आपले कर्तव्य आहे; ते सोडून आपल्याला 'जैसी करणी तैसी भरणी', असे जीवन प्राप्त होते. कारण जन्माला आल्यावर, सभोवार आपले आप्त व सोयरे जवळीक साधतात; व शेवटी आपल्याला त्याना सोडावे लागते. कारण परलोकामध्ये कुणीही आपले नाही. म्हणून श्रीपंतांच्या पदात 'एकलाचि येणे व एकलाचि जाणे' हा बोध केला आहे; व 'गुरुमार्ग हा भला' असे सांगितले आहे. परलोकात आत्म्याना देह नाही. फक्त देहाला आपली व इतरांची ओळख असते. अशावेळी परलोकात फक्त आत्मा व त्याचे कर्म अस्तित्वात असते. जर सत्कर्म केले असेल तर ते बरोबर परलोकात येते; व बाकीचे वासनारूपी कर्म इहलोकात असते. ते 'वासनारूपी कर्म' इहलोकात आहे, म्हणून जन्म. जेव्हा सत्कर्म घेऊन आपण जाऊ, त्यावेळी पुनर्जन्म आपल्याला येतो; हे जेव्हा आपल्याला समजेल तेव्हा 'चिंतन अवस्था'! म्हणजे पूर्वीच्या अनेक जन्मात आपण जन्माची उतराई होत नाही; ती व्हावी म्हणून चिंतन! 'चि' म्हणजे 'चिरंजीव'; व 'तन' म्हणजे कारण

देहाची प्राप्ति व्हावी; असा आशीर्वाद गुरूंच्याकडून घेऊन, 'परलोकवासी' हा प्रवास आत्म्याचा सुरू होतो. चिंता व चिता असे जीवन न राहून, 'चिंतन' म्हणजे आत्म्याचे कार्य - दया, क्षमा व शांति ही त्रिपुटी ज्याच्या आचारात व विचारात अनुभवास येते; तो आत्मा, परमात्मा होतो. एवढी तरतूद केल्यावर, श्रीपंतांचा बोध आहे; 'साधन सेवा काहीच नसता, दावियले निजधाम'; असे जीवन होते. शेवटी हे चिंतन सदैव असावे; 'दया करी श्रीगुरुदत्ता, दुर्गुण काढू मी न शके, क्षमा करी रे अनंता'. ह्या साधनेत अवधान, ध्यान व चिंतन यांची त्रिपुटी झाल्यावर, तो साधक 'सच्चिदानंद' होतो; व त्यानंतर जीवनात देणे व घेणे इत्यादी न राहता, "लेणे काय आहे?" असा प्रश्न ईश्वर आपल्याला विचारील!



# ३९. श्री साई स्वाध्याय मंडळ, मारुती स्तोत्र

वरील विषयाचे ज्ञान आपण भक्ताना व्हावे; तसेच आपल्या जन्मकारणाचे व जीवनातील कर्तव्याचे ज्ञानही व्हावे, म्हणून वेळोवेळी शिरोडा-गोवा येथे साधनासंमेलने घेतली गेली. आम्ही मानव जरी जन्म प्राप्त करते होतो, तरी जीवन जगणे ही कला आहे; व तिचा लाभ गुरुकृपेशिवाय प्राप्त होत नाही. प्रत्येक मनुष्याच्या सुख, शांति, समाधानाबद्दलच्या अपेक्षा असतात; परंतु ह्या अपेक्षांची फलप्राप्ति का होऊ नये? याचे शास्त्रीय कारण कुणीही विचारात न घेता, ह्या सुखांची प्राप्ति होत नाही, म्हणून स्वत:च्या जीवनात व समाजात अशांतता निर्माण करण्यास, आपण कारणीभूत होत आलो आहोत. त्यामुळे ह्या जगात, काही सुखाचा मार्ग आपल्याला प्राप्त व्हावा, म्हणून ज्ञानी होण्याऐवजी, मनुष्य अज्ञानी मार्गाचा अवलंब करून, अधिकाधिक अज्ञानी होत चालला आहे. अशा ह्या मानवी जीवनात, निश्चित असा मार्ग आम्हा मानवाना मिळावा, म्हणून प.पू. बाबांनी वेळोवेळी मार्गदर्शन, कृपाशीर्वाद म्हणून दिले आहे. हा कृपाशीर्वाद म्हणजे आजपर्यंत हजारो वर्षापासून अवतारी पुरुषांनी, मानवी कल्याणासाठी केलेल्या सिद्धसाधना होत. त्यांची प्राप्ति सर्वसामान्य मनुष्यास सुलभपणे व्हावी, म्हणून एखाद्या 'मध्यस्थ' माध्यमातून, अशी कार्ययोजना ईश्वर करीत असतो. ती कार्ययोजना त्या मध्यस्थ व्यक्तीच्या विचारातून निर्माण झालेली नसते; परंतु अशा कार्यात, मानवी जीवनामध्ये सुख-शांति-समाधानाचा लाभ व्हावा; अशी योजना असूनसुद्धा, अज्ञानामुळे मनुष्य ह्या मार्गाला दुरावतो.

अशा योजनेपैकी वंशविमोचन हे साधन अत्यंत महत्त्वाचे असून, त्या साधनाचा लाभ आपण भक्तानी घेतलेला आहे. मानवी जीवनात 'विद्यानाश' व 'संपत्तिनाश' हे प्रामुख्याने निर्माण होणारे दोष असून, एका पिढीत काही व्यक्तीस विद्याविद्यार्जन व ऐश्वर्य यांची सुलभपणे प्राप्ति होते; तर काहीना त्या प्राप्तीस मुकावे लागते; व पुढे कालकालांतराने हे दोष वाढीस लागून, कुटुंबात ऐपत असूनसुद्धा, विद्याविद्यार्जन घेता येत नाही; तर काही वेळा विद्याविद्यार्जन प्राप्त होऊनसुद्धा, कौटुंबिक कर्तव्ये पार पाडण्याची ऐपत उरत नाही. अशा

दोषांचे निवारण पूजा, पाठ, नवससायास इत्यादीनी होत नाही. केवळ गुरुकृपाशीर्वादाचा लाभ झाला, तरच ह्या दोषापासून कुटुंबाची मुक्तता होत असते; व आपण प्राप्त जीवनांबद्दल सज्ञानी होऊन, आपल्या काया-वाचा-मनाच्या ठिकाणी, केवळ गुरू हेच तत्त्व ह्या जगात साक्षी आहे; अशी नितांत आदराची ठेव प्राप्त होते. ही अमोल ठेव प्रत्येकाच्या जीवनात व आपल्या कुटुंबातील पिढयान्पिढयामध्ये सदैव वास करीत रहावी, याची साक्ष म्हणून श्रीसाई स्वाध्याय मंडळ ही संस्था, अक्षय्य तृतीया श्रीसाई शके ३ (सन १९८५) या शुभदिनी स्थापन केली.

जगतामध्ये संस्था स्थापन करण्यासाठी, लोक पैसा जमा करतात. श्रीसाई स्वाध्याय मंडळ या संस्थेचे हे वैशिष्टय आहे की, आपणापैकी प्रत्येकाने ह्या संस्थेचा सभासद व्हावयाचे आहे; पण ते पैशाने नव्हे, तर ज्या श्रीगुरूंना आपण काया-वाचा-मनाने मानले आहे, ती अमोल ठेव म्हणजे 'श्रद्धा', ही आपण वर्गणी म्हणून द्यावयाची आहे. श्रीसाईनाथ महाराजांचा कृपाशीर्वाद व आपण भक्तानी त्यांच्या चरणी अर्पण केलेली श्रद्धा, यातून 'श्रीसाई स्वाध्याय मंडळ' ही संस्था जे कार्य जगतात करेल, ते कार्य म्हणजे खऱ्या अर्थाने 'लोककल्याण कार्य', असे म्हणता येईल. अशा अलौकिक तत्त्वावर स्थापन झालेली संस्था, ही जगतामध्ये अखंडपणे कार्य करीत राहील; व त्या कार्याचे ब्रीदवाक्य, 'जे का रंजले गांजले, त्यासि म्हणे जो आपुले' असेच असेल. आपण सर्व भक्तभाविक, ज्याना श्रीगुरुकृपेने आपल्या जीवनात स्थित्यंतर करवून घेऊन, व आपल्या काया-वाचा-मनाचा विकास होऊन, 'ज्ञान' अवस्थेचा लाभ झाला आहे; त्या काया-वाचा-मनाच्या ठिकाणी -

॥ आस एकच माझी निववावी गुरुदेवा ।
जन्मोजन्मी घडावी तव चरणांची सेवा ॥

- हाच भाव जन्मोजन्मी वास करीत रहावा, अशी प.पू. बाबांचे चरणी प्रार्थना!

प्रत्येक भक्ताच्या कौटुंबिक व सामाजिक कर्तव्याची पूर्तता करवून घेण्यासाठी, श्रीसाई स्वाध्याय मंडळाची स्थापना झाली. तसेच प्रत्येक भक्ताचा देहिक व आत्मिक विकास व्हावा, म्हणून पुढे नित्यसाधनेमध्ये 'श्री भीमरूपी' या स्तोत्राचा समावेश, श्रीगुरुआज्ञेने करण्यात आला. परंतु या स्तोत्राचे महत्त्व काय आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे.

हे स्तोत्र प.पू. रामदासस्वामींनी लिहीले आहे. ते महाराष्ट्रातील एक थोर संत होऊन गेले; व त्यांचे निवासस्थान साताऱ्याजवळील 'सज्जनगड' ह्या डोंगरावर आहे. त्यांचे उपास्यदैवत श्रीरामप्रभु होते. श्रीरामदासांनी अध्यात्मावर महत्त्वाचे लिखाण केलेले असून, त्यात 'श्रीदासबोध', 'मनाचे श्लोक' इत्यादींचा समावेश आहे. त्यामध्ये 'भीमरूपी' हे स्तोत्र, श्रीरामाच्या आज्ञेने त्यांनी लिहीले आहे. त्याकाळी व आजही त्याची गरज आहे, हे समजून माझ्या वडिलांनी मला वय वर्षे आठ, यावेळी हे स्तोत्र नित्यनियमाने म्हणण्यास सांगितले होते; व त्याप्रमाणे मी हे स्तोत्र नियमाने म्हणत आलो; व आजही म्हणतो आहे. शक्तिपीठ स्थापनेची तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर, प.पू. साईबाबांची आज्ञा अशी झाली की, "हे नुसते स्तोत्र नसून, त्यात जीवनाचे शास्त्र, शस्त्र व अस्त्र आहे; ते तू सर्वांना 'दीक्षा' म्हणून सांग. मग त्यातील गूढ अर्थ काय आहे हे समजेल."

आजपर्यंत आपण 'ॐकार साधना' करीत आलो; पण वाणीची सिद्धता झाल्याशिवाय, त्याचे फल स्वत:ला व इतराना मिळत नाही. ह्या स्तोत्रात मूळ जे बीज आहे ते 'वायु' आहे; म्हणून ह्या स्तोत्राचा समावेश नित्य साधनेत करण्याची आज्ञा, चैत्र प्रतिपदेला झाली. ह्या स्तोत्रातील गूढ अर्थ काय आहे? तो आपण भक्तास समजला, म्हणजे जीवनाचे सार्थक होईल. नुसते ढोलके वाजवून देव भेटत नाही. त्यासाठी ध्यास लागला पाहिजे.

श्रीनवनाथांचे दैवत मारुती हे आहे. त्याशिवाय माझ्या घरी पूजनात जी मारुतीची मूर्ति आहे ती पाच पिढयांची असून, ती मूर्ति माझ्या पणजीशी बोलत असे; व आता माझ्या माध्यमातून, ज्या स्तोत्रावर माझा दृढ विश्वास, श्रद्धा व भक्ती आहे, त्या स्तोत्राचा गूढ अर्थ त्यांनीच लिहून घेतला, ह्या भावनेने मी त्यांचा सदैव ऋणी आहे. जे काही जगाला कमी होते, ते मी दिले आहे. यापेक्षा देव किंवा ब्रह्म वेगळे नाही, हे आपण लक्षात ठेवावे. गेली चाळीस वर्षे जे कार्य माझ्या

हातून घडले, त्यासाठी प.पू. साईबाबांचा आशीर्वाद पाठिशी होता. पण ज्या वाणीद्वारा ॐकार व भीमरूपी स्तोत्र मी म्हणत आलो, त्यामुळेच त्या वाणीमाध्यमातून, हे कार्य सुलभपणे जगताला परिचित झाले. तेव्हा जीवनात काही मंत्रांचे पठण केले नाही तरी चालेल; पण नित्यनियमाने 'श्रीभीमरूपी' स्तोत्र म्हटल्यास, त्याचा लाभ आपला देहिक व आत्मिक विकास होण्यास निश्चितच होईल; असा माझा दृढ विश्वास आहे.

जगतामध्ये जे धर्म आहेत, त्या प्रत्येक धर्मामध्ये 'उपनयन' अथवा 'अनुग्रह दीक्षा' सांगितलेली आहे. केवळ आपण हिंदु धर्मामध्ये आहोत, म्हणून त्या धर्माप्रमाणे मौंजीबंधन, उपनयन किंवा अनुग्रह दीक्षा ही सांगितली आहे असे नाही. जेव्हा बालक सज्ञान होते, त्यावेळी त्याचे आचार व विचार यावर संस्कार होणे अत्यावश्यक आहे; व त्यामुळेच त्याचे पुढील आयुष्य, उत्तम तऱ्हेने साकार होत असते. प्रत्येक मानवाला जन्माला येतेवेळी, पाच कोशांची प्राप्ति होत असते; पण ह्या पाच कोशांचा विकास करणे, हे कर्तव्य आपण विसरतो. त्यामुळे देह जरी प्राप्त झाला तरी त्याचा इष्ट विकास न होण्यामुळे, जन्मकर्म व जन्मजन्मांतर यातील जे कर्म आहे ते अनुकूल न होता, पीडादायक होते. ही पीडा आपण अज्ञानाने, संकट किंवा दुःख आहे, असे समजतो. ह्या पाच कोशांचा यथोचित विकास होण्यासाठी, श्रीसद्गुरूंनी पाच दीक्षा गुरुमार्गामध्ये सांगितल्या आहेत, त्या येणेप्रमाणे; - उपासना दीक्षा, नामस्मरण दीक्षा, अनुग्रह दीक्षा, गुरुदीक्षा व कारण दीक्षा. ह्या दीक्षा क्रमशः आपल्याला घ्यावयाच्या असतात. त्यामध्ये 'अनुग्रह दीक्षा' ही महत्वाची आहे. कारण त्यामध्ये पहिल्या दोन दीक्षा, म्हणजे उपासना व नामस्मरण, ह्या अंतर्भूत होतात. म्हणून ही सर्वश्रेष्ठ दीक्षा आहे. पुढील ज्या दोन दीक्षा आहेत त्या आपल्या नित्य साधनेमध्ये, आपल्याला सिद्ध करावयाच्या आहेत. यासाठी श्रीगुरूंनी शिकविलेली नित्य साधना, अत्यंत आस्थापूर्वक केली पाहिजे. कारण ही सेवा काया-वाचा-मनाने केल्यानंतर, तिचा लाभ म्हणजे पुढील दोन दीक्षा व कारण-महाकारण ह्या अवस्था, आपल्याला प्राप्त होतात.



समितीचे कार्य व त्याची स्थापना, यामध्ये वैयक्तिक जीवनाचा समावेश होऊ न देता, ज्या सेवकाना सेवा करावयाची आहे, त्यानी आपली वैयक्तिक भूमिका विसरून, समितीचे कार्य लोकाना समजावे, यासाठी 'निराकरण' आणि 'निवारण' ही साधने सिद्ध केली. ह्या निराकरणात जगातील दुःखात दुःखी असलेल्यानाही सहभागी करावे; अशी योजना कार्यारंभीच केली. आज समितीची कार्यकेंद्रे गोव्यापासून कलकत्त्यापर्यंत, म्हणजे जवळजवळ हिंदुस्थानभर व परदेशातही कार्य करीत आहेत. पण ही सिद्धता झाली, त्यावेळी 'कार्य' म्हणून योजना अस्तित्वात होती; व त्या योजनेमागे सर्व थोर विभूतींचे आशीर्वाद होते; पण कार्यार्थ केंद्रे नव्हती. तसेच आपण जन्म घेतल्यावर, जीवनाचे सार्थक व्हावे; व जीवन केवळ व्यर्थ खर्च होऊ नये, म्हणून नित्य उपासनेत ॐकार साधना व श्रीसद्गुरुनामस्मरण, मी स्वतः प्रत्यक्ष अनुभूति घेऊन सिद्ध केले. गेल्या पन्नास वर्षात, ह्या साधनांची सिद्धता, प्रत्येक भक्तासही अनुभवास आली आहे. पन्नास वर्षापूर्वी जी आजची परिस्थिती आहे, हिचे अवलोकन करून; निराकरण, निवारण व वैयक्तिक साधना सिद्ध केलेली आहे.

मानवी जीवनात जे दुःख म्हणून जाणवते, त्याचे मूळ कारण कर्मात आहे. हे कारण समजून, त्याचे निवारण कसे करता येईल? याचा अभ्यास अनेक दुःखी लोकांच्या जीवनातून करण्यास, मी दोन तपे खर्च केली; व शेवटी 'निवारण' याचा शोध, श्रीगुरुकृपेने लावला. कार्यारंभापासूनच गुरुकृपेने मानवी जीवनातील दुःखपरंपरा नाहीशी करण्यासाठी, एकच 'रामबाण उपाय' असावा, ही माझी तळमळ होती. या इच्छेला श्रीगुरूंनी प्रतिसाद दिला की, "ह्या जन्मात जो कुणी कर्माने किंवा धर्माने दुःखी झाला आहे, त्याचा शोध घेऊ नकोस. तो शोध कुणालाही लागणार नाही. शेवटी आपली पुण्याई खर्ची पडेल. यापेक्षा त्या पुण्याईने जगाला कसे सुखी करता येईल? असा सुविचार ठेवून, जो कुणी समितीच्या मार्गदर्शनार्थ आला आहे, त्याला त्याच्या दुःखाचे कारण काय? हे सांगण्याचे पाप करू नकोस. त्यापेक्षा त्याला पुनश्च तशी कर्मे न करण्याची सुबुद्धी व्हावी, अशी प्रार्थना शिकव." यासाठी आवश्यक अशी प्रार्थना, "हे भगवंता नारायणा" ही प.पू. बाबांनी

पूर्वीच दिलेली होती. या प्रार्थनेत सर्वकाही म्हणजे कुलाचार, कुलधर्म, कुलोपासना, वास्तुदेवता, उपास्य देवता, याशिवाय गेल्या सात पिढयातील वाडवडिलांची सद्गति, यांचा समावेश केलेला आहे. इतकी तरतूद व सिद्धता असल्यानंतर, आलेल्या भक्ताला 'निवारण' ऐवजी 'निराकरण' सांगणे, म्हणजे ज्या घडलेल्या पूर्वकर्मामुळे तो आज दु:खी आहे, त्या कर्माचा पुनश्च उच्चार करणे होय. त्यामुळे प.पू. बाबांच्या आशीर्वादाने, हे घडून गेलेले कर्म पुन्हा जागे करणे, असा त्याचा अर्थ होतो. म्हणून श्रीगुरुकृपेने, 'निवारण साधन' हे सिद्ध केले. येणाऱ्या भक्ताला आशीर्वादाची गरज आहे. त्यासाठी आपली जी रोजची साधना आहे, त्यातील वाटा इतराना देऊन, त्याना सुखी करण्याचे कर्तव्य, भवितव्यात सेवकानी करावे, यासाठी प.पू. साईबाबांनी, 'गुरुबीजाची' धारणा, प्रत्येकाला करून दिली आहे.




# ४०. शुभ ताऱ्याचे आगमन, महाकारण दिशा, बीज दीक्षा

वीस शतकापूर्वी जी परिस्थिती जगात निर्माण झाली होती, तशी वेळ आताही आली आहे की; आज ह्या जगाला तारणारा कुणीही नाही. पूर्वीच्या काळी परमेश्वर अवतार घेत होता. पण आता अवतार घेऊन, त्यावर विश्वास ठेवून, 'हा परमेश्वर आहे'; असे मानणारे लोक फारच थोडे आहेत. ह्या जगाचे कार्य अव्याहत चालू रहावे, यासाठी आवश्यक अशी वेळही आता आली आहे. पन्नास वर्षापूर्वी म्हणजेच कार्यारंभी, प.पू. जगद्गुरू श्रीसाईनाथमहाराजांनी जी 'दैनंदिन प्रार्थना' सुचविली होती; त्या प्रार्थनेत जे 'बीज' आहे ते म्हणजे भवितव्यात अवतीर्ण होणारे 'मानवता युग' होय. जगात जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमध्ये हा गुरुमंत्र जर धारण झाला, तर पुढील काळात सुख-शांति-समाधानाची भरभराट प्रत्येक व्यक्तीमध्ये व्हावी, अशी ईश्वराची इच्छा आहे.

भगवान येशू ख्रिस्ताच्या जन्माच्यावेळी, एक तारा त्या काळात लोकाना दिसला; व त्या दिशेला लोक शोधण्यासाठी गेले असता, तो तारा 'यशदायक' आहे असे जाणवले; म्हणून त्यावेळी जन्माला आलेल्या बालकाचे नाव 'येशू' असे ठेवले; व पुढे त्या बालकानेच लोकाना धर्म शिकविला. विश्वकल्याणाची जन्मत:च तळमळ असली, तर निसर्गसुद्धा साधकाला शंभर टक्के सहकार्य देतो. कारण निसर्गाचा धर्मच मुळी जनकल्याण हा आहे. याची प्रचीति २० जून १९८५ रोजी सर्वाना आली. तत्पूर्वी सर्व भक्तास 'महाकारण दिशा' देण्याचा विधि प.पू. बाबांनी केला होता. त्यावेळी जी दिशा म्हणून दाखविली होती; त्या दिशेने तो यशदायक तारा पुनश्च पृथ्वीकडे आला; अन्यथा असंख्य गॅलेक्सीप्रमाणे तो आपल्यापासून अनेक योजने दूर राहिला असता. हा तारा नवग्रहापेक्षा अनेक पटीने मोठा असून, त्याच्यामुळे नवग्रहांचा परिणाम मानवी जीवनावर न होता, त्या ताऱ्याचा प्रभाव जीवनामध्ये प्रत्येकास अनुभवास येईल; व असा अनुभव प्रत्येक भक्तास मिळावा, म्हणून सर्व कार्यकेंद्रावर 'बीज दीक्षा' दिली गेली. बीज दीक्षा म्हणजे

'उपनयन विधि'. मुलांची मुंज ही जी आपण करतो, त्यापेक्षा या दीक्षेचा लाभ होणे, हे हजार पटीने श्रेष्ठ आहे. कारण हा शुभयोग सुमारे अडीच ते तीन हजार वर्षांनी आला. दिलेल्या आकृतीप्रमाणे हा तारा नभोमंडळात असेल. तो अनेक योजने दूर असल्यामुळे, त्याचे अस्तित्व डोळ्यानी दिसणे अशक्य असून, ते अस्तित्व लहरींच्या स्वरूपात समजणार आहे. प.पू. बाबांच्या आज्ञेचे पालन केल्याने, सर्वांचे हित साधणार आहे. ह्या ताऱ्याचे अस्तित्व पंधरा वर्षे राहणार असून, जी शक्ति ह्या ताऱ्यापासून पृथ्वीकडे येईल, त्या शक्तीचा लाभ, 'सूर' ह्या माध्यमातून ॐकार साधना केली असता, प्राप्त होईल. ह्या शक्तिमाध्यमातूनच भवितव्यामध्ये जगतात, 'मानवता युगाची' निर्मिती होणार आहे. प.पू. बाबांच्या संकेतानुसार, या दिवशी सर्व भक्तभाविकाना 'बीज दीक्षेचा' लाभ करून देण्यात आला.




जन्माला आल्यानंतर जीवाच्या ज्या चार अवस्था आहेत - जीव, जीवात्मा, आत्मा व परमात्मा - त्यांचा यथोचित विकास व्हावा; व त्याद्वारे देहातील पंचकोशातील दोष नाहीसे होऊन, नराचा नारायण होऊन, अखिल विश्वात सुख-शांति-समाधानाचे बीज रुजावे, म्हणून भूतलावर शक्तिपीठ स्थापन केले गेले. तसेच निसर्गातील पंचमहाभूततत्त्वांचा



समतोल रहावा, व सप्तलोकातील आत्म्याना आत्मोद्धाराची दिशा दिसावी, म्हणून जगन्नियंत्याने या दिव्य ताऱ्याच्या रूपात, निसर्गातही एक शक्तिपीठ स्थापन केले.

निसर्गात चेतन, अचेतन व आत्मिक अशा तीन शक्ति आहेत. ह्या शक्तींचे कार्य जीवनात भिन्नाभिन्न आहे. म्हणून ॐकाराची दीक्षा देऊन, आपणास नित्य साधना शिकविली आहे. या साधनेत पिंड व ब्रह्मांड ह्या शक्तींचा समावेश आहे. परंतु ह्या दोन शक्ति आत्म्याशी एकरूप झाल्याशिवाय, आत्म्याचे इहजगतातील कार्य काय आहे? हे आपल्याला समजत नाही; व जो कुणी जन्माला येतो, त्याला जीवनाचे सार्थक करता येत नाही.

विज्ञानाच्या अतिरेकामुळे, निसर्गात उत्पन्न होणाऱ्या उत्पातांचा दुष्परिणाम, जगतातील जीवमात्रांच्या जीवनात होऊ नये, म्हणून परमेश्वराला निसर्गातील शक्तिपीठाची योजना कार्यान्वित करावी लागली. आज तेच 'हिरण्यगर्भातील' शक्तिपीठ, अखिल विश्वाचा सांभाळ व पालनपोषण करीत आहे; याहून आम्हा मानवांचे अन्य महद्‌भाग्य कोणते?

शक्तिपीठ स्थापनेनंतर, १९८५ च्या नोव्हेंबर महिन्यात, कराड येथे एक सेवक संमेलन घेतले गेले. त्यात जे साधन सिद्ध झाले, तो विषय तत्पूर्वी बारा वर्षे आधी, मी साधनेमध्ये घेतला होता. हा अत्यंत महत्त्वाचा विषय असून, परलोकातील आत्म्याना सद्‌गति कशी मिळेल? व त्यासाठी काही साधना सिद्ध होते की नाही? हा प्रश्न प.पू. बाबांना मी विचारला होता. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, "भवितव्यात हेच साधन आपल्याला सिद्ध करावयाचे असून, त्यामध्ये धर्म किंवा पंथ, यांचा संबंध येता कामा नये. आज शेकडो वर्षापासून, हे शास्त्र धर्माचरणात सांगितले आहे. परंतु त्याचा लाभ घेण्यासाठी व देण्यासाठी, परलोक व इहलोक कार्यक्षम नाहीत. जी ॐकार साधना, भक्तभाविक करीत आहेत, त्यांच्या देहिक माध्यमाचा उपयोग, ह्या सिद्धतेसाठी होईल. त्यासाठी प्रथमतः काया-वाचा-मन, हे एक होणे आवश्यक आहे. त्यानंतर पेशी (Cells), हॉर्मोन्स व योनी (Organs) हे एक होतील; व त्यातून द्रव पदार्थ (Ectoplasm) द्रवेल. ह्या द्रवाच्या माध्यमातून, ह्या आत्म्यांची

मुक्तता होईल. यापुढील ॐकार साधना ही अवधान ठेवून, काळजीपूर्वक केली पाहिजे. नुसती देहिक क्रिया करून उपयोग होणार नाही. आता गुरुमार्गात श्रीगुरूंकडे काही मागावयाचे शिल्लक नसून, आपण स्वयंस्फूर्तीने इतराना काही द्यावयाचे आहे; व तो म्हणजे 'कृपाशीर्वाद'; असा विचार सर्व भक्तानी आता दृढ करावयाचा आहे. त्याचा लाभ इहलोक व परलोक याना होईल.'' असा शुभसंदेश प.पू. साईनाथ महाराजांनी देऊन, नित्यसाधनेत म्हणावयाच्या ॐकार व नामस्मरणाचे कार्य काय आहे ते स्पष्ट केले.



# ४१. श्री साईनाथमहाराजांनी स्पष्ट केलेले ॐकार साधनेचे कार्य

ॐकार :-


ॐकारामध्ये काया-वाचा-मन हे एकरूप होणे आवश्यक आहे. तसेच ॐकाराच्या प्रत्येक उच्चारापूर्वी 'पॉज' घेऊन, मग सुरुवात करावी. 'पॉज' हा साडेतीन सेकंदांचा असून, त्यामध्ये प्राणायाम होतो. त्यामुळे शरीर हे निरोगी राहून, शांत राहते. काया व वाचा यांच्या गतीबरोबर, मनाची अवस्था यावयास पाहिजे. अशी त्रिपुटी झाली, तरच 'एक्टोप्लाझम' हे द्रव, आपल्या माध्यमातून बाहेर येऊ लागते. विचार-अविचार यामुळे मनाची गती वाढली, तर हे कार्य होत नाही. यासाठी प.पू. बाबांनी आशीर्वादाने, आपल्या सर्वांच्या देहिक माध्यमात, काया-वाचा-मन हे एक होणे; या साधनाचा लाभ आपल्याला करून दिला आहे. ही अवस्था साधकाला दुर्मिळ अशी आहे; हे साधकानी लक्षात घेतले पाहिजे. तसेच साधकाच्या शरीरातील पंचकोश, हेही एक व्हावयास पाहिजेत. त्यासाठी ह्या पाच स्थानातून, पूर्वी ॐकार करवून घेतला. ही पाच स्थाने एक होऊन, ह्या एकरूप अवस्थेतून, उच्चार करावयाचा आहे. यासाठी ॐकाराची अंगे लक्षात घेऊन, कंठस्थानातून ही साधना केली गेली पाहिजे; व स्वर, ताल, लय यांचा उपयोग केला गेला पाहिजे.

ॐकार साधनेचा तपशील

उच्चार :- अ + उ + म = ॐ
उ + अ + म = ओहोम् (चूक)

पहिले अक्षर 'अ' याने उच्चार केला असता, 'ओम्' होतो. 'म' उच्चार करू नये. 'लय' इथे आल्यानंतर, 'म' चा आपोआप उच्चार होतो. 'उ' ने सुरुवात केल्यास, 'ओहोम्' असा चुकीचा उच्चार होतो.


संथा :- काया - वाचा - मन - देहिक स्थिती.
अंगे :- उच्चार - मध्य - लय (Perfection)
स्वर - ताल - लय (Rhythm)
प्रमाण :- उच्चार - मध्य - लय १० सेकंद
(Scale)





ॐ म्हणतेवेळी आवाज कायम ठेवावा. आवाज कमीअधिक करणे चुकीचे आहे. याचा अर्थ Voice पाहिजे, Volume नको.

**थांबणे (Pause) :-**

ॐ उच्चार दहा सेकंद केल्यावर, एक सेकंद थांबावे. हात पुन्हा जागेवर दीड सेकंदात न्यावा; म्हणजे नैसर्गिक श्वास घेण्यास जो वेळ लागतो, त्या वेळेत हात जागेवर न्यावा. पुढील 'ॐ' कार सुरू करण्यापूर्वी, एक सेकंद थांबावे; म्हणजे एकूण पॉज् साडेतीन सेकंद व हाताची क्रिया नव्वद अंश असावी.








ॐकार साधनेस बसतेवेळी, सहजासनामध्ये सरळ बसावे. मान सरळ ठेवावी. शरीर मोकळे असावे. अधिक ताठ बसू नये. श्वास-उच्छ्वास ही क्रिया नैसर्गिक झाली, तरच प्राणायाम होईल. म्हणून या साधनेत श्वास नाकाने दीड सेकंदात घेऊन, दहा सेकंदात तोंडाने ध्वनित करून सोडला असता, नैसर्गिक प्राणायाम होतो; व शरीराचे गुणधर्म सुधारण्यास मदत होते. म्हणजेच कफ, पित्त, वात हे समतोल होऊन, त्यामुळे श्वसनक्रिया, पचनक्रिया व रक्ताभिसरण ह्या क्रिया व्यवस्थित होतात.


**न्यास :-**

ही क्रिया बाह्यांगाने आपण करीत असलो, तरी त्याचा संबंध शरीराच्या अंतर्गत रचनेशी असतो. शरीरातील अंतर्गत माध्यमे म्हणजे श्वसनक्रिया, पचनक्रिया व रक्ताभिसरण. ह्या क्रिया विसंगत असतील, तेव्हा शरीरातील कार्यात बिघाड होत असतो; व त्यामुळे रक्तदाब, हृदयविकार, आम्लपित्त, बद्धकोष्ठ इत्यादी रोग शरीरात होत असतात. ही शरीरातील अंतर्गत माध्यमे, एकमेकाला पूरक असून, त्यांचे कार्य एकमेकावर अवलंबून आहे. ह्या माध्यमाना पूर्ववत क्रिया करण्यास वाव देणे; किंवा त्यासाठी व्यायाम देणे, म्हणजे 'न्यास' होय. म्हणून न्यास करतेवेळी, वरीलप्रमाणे ॐकार साधनेची अंगे, ही काळजीपूर्वक विचारात घेऊन, त्यांचे अवधान सांभाळले पाहिजे. अशा रीतीने न्यास केले असता, शरीर निरोगी राहून, एक्टोप्लाझमचा पुरवठा अधिक होत असतो. न्यास ही देहिक क्रिया असून, त्यामुळे शरीरातील अंतर्गत रचनेस आकार प्राप्त होतो. यासाठी न्यास पाच प्रकारानी करावयाचे असतात. न्यास ही क्रिया दोन हातानी करीत असता, ॐकार उच्चाराने जे स्पंदन (Vibrations) शरीरात धारण होते; ते स्पंद लहरींच्या रूपाने, दोन्ही हातांची बोटे व तळवे यामधून उत्सर्जित होतात. त्यावेळी न्यासाची क्रिया देहाला जाणवली पाहिजे. यासाठी हात अंगावरून फिरवीत असता, त्याचा स्पर्श मोरपिसासारखा असावयास पाहिजे. तरच ॐकार ध्वनि म्हटल्यावर, त्या उच्चाराने शरीर कंपायमान होते. हाताची बोटे सरळ ठेवावयाची असून, शरीराशी समांतर ठेवावीत.

प्रमाण (Scale) - पंधरा सेकंद





**श्रीसद्गुरुनामस्मरण :-**

हे साधन पाच कोशाशी संबंधित आहे; व कंठातून जो उच्चार होतो तो 'आवाज' असा नसून, 'ध्वनि' असा आला पाहिजे. ह्या पाच कोशांचा विकास झाला, याचे अनुमान म्हणजे कंठातून होणारा उच्चार, 'ध्वनि' असा ऐकू येतो. हा ध्वनि पिंडाचा असून, त्यातून ध्वनि-लहरी-ध्वनि, हे अंग अनुभवास येते. अशावेळी स्वर-ताल-लय याचे अवधान अति महत्त्वाचे असून, स्वर व लय हे सारख्या प्रमाणात उच्चारले गेले पाहिजेत; व हार्मोनियममधील जो स्वर आपल्याला ऐकू येतो, त्या स्वराच्या गतीशी आपला उच्चार व लय एकरूप व्हावयास पाहिजेत; व हा ध्वनि 'उच्चार-मध्य-लय' ह्या अंगानी, म्हणजे 'ध्वनि-लहरी-ध्वनि', असा स्पष्ट उच्चारला गेला पाहिजे. ही अवस्था पिंडाची असून, त्याच क्रियेतून भवितव्यात, ब्रह्मांडाची प्राप्ति व्हावयास पाहिजे. यासाठी जो उच्चार ध्वनि असा आहे, तो वरील अंगांचे अवधान ठेवून 'ध्वनित' केला, तर हेच साधन ब्रह्मांडाचे झाले! ह्यायोगे पाचही कोशांचे एकरूपत्व



जेव्हा होते, तेव्हा हे कोश 'पंचप्राण' होतात. ह्याच अवस्थेस 'पाचामुखी परमेश्वर'; असे म्हणतात. श्रीसद्गुरुनामस्मरण म्हणजे ॥ॐ श्री साईनाथाय नम:॥ ही नऊ अक्षरे संथेने म्हटली, तरच त्यांचा लाभ अधिक प्रभावी होतो. ही संथा काळजीपूर्वक म्हणून, उच्चार स्पष्ट केला गेला पाहिजे. यातून देहिक व आत्मिक प्रगति आपल्या नित्य साधनेत करावयाची असते.

| संथा:- | उदात्त | अनुदात्त | स्वरित |
|---|---|---|---|
| | स्वर | ताल | लय |




**व्यक्ताव्यक्त ॐकार :-**

ही क्रिया दोन्ही हातानी करावयाची असते. शरीरातील अशुद्ध रक्त, हृदयाकडून फुफ्फुसाकडे शुद्ध होण्यासाठी येते. जो श्वासोच्छ्वास आपण करतो, त्यामध्ये श्वास म्हणजे ऑक्सीजन शरीरात घेणे, व उच्छ्वासामध्ये कार्बन डायॉक्साईड सोडणे, ही क्रिया होत असते. अशावेळी श्वास घेणे; व थांबणे, ही क्रिया साडेतीन सेकंदामध्ये करावयाची असून, श्वास नाकाने घ्यावयाचा आहे; व श्वास सोडण्याची क्रिया तोंडातून दहा सेकंदामध्ये, ॐकाराचा उच्चार ध्वनित करून केली असता, हा व्यायाम अतिशय शास्त्रोक्त असा होतो; व रक्ताभिसरण आणि श्वसनक्रिया यामधील अनियमितपणा दूर होतो. त्यामुळे जे एक्टोप्लाझम शरीरात निर्माण होत असते, त्याची निर्मिती संपूर्ण शरीरामध्ये होऊ लागते. ह्याच अवस्थेला 'अहंकार' म्हणजे 'अहम् आकार' असे म्हणतात.

**धारणा ॐकार :-**

ह्या अवस्थेत उजवा हात हृदयस्थानावर मूठ घट्ट न करता, हळूवारपणे चार बोटे एकत्र व अंगठा वर, अशी मुद्रा करून ठेवावा. ॐकाराचा उच्चार अवधान ठेवून करीत असता, ज्या लहरी निर्माण होतात त्या

# ४२. सुज्ञ भक्तानो जागे व्हा!

कोणताही विषय व्यक्त करण्यास शब्द लागतो. पण शब्दामध्ये काय 'शब्द' आहे? हे वाचणाऱ्यास समजता कामा नये. उलट त्याची स्थिती बदलली गेली पाहिजे. ज्ञान हे प्राप्त होणे अत्यावश्यक आहे. पण ते ज्ञान इहजगताला तारणारे पाहिजे. शब्दांची कसरत करून, पुष्कळ ग्रंथ लिहीले जातात; व त्या ग्रंथाना 'सुबोध' म्हटले जाते. पण तो वाचणाऱ्याला ग्रंथी आल्या, म्हणजेच ग्रंथातील ज्ञान जर कुणाचे अज्ञान होणार असेल, तर लिहीणे योग्य नाही. माझ्या आसपास शेकडो विषय डुलत होते; पण तरीही मी 'आज्ञेची' वाट पाहिली; व मग लिहीण्यास आरंभ केला. त्यामध्ये इहजगताला तारण्यासाठी काही मार्ग आहे का? ही विचारणा विचारात घेऊन, समितीची कार्यपद्धती काय आहे? व भक्तांचे कर्तव्य काय आहे? हा प्रश्न जगासमोर मांडला. जग ही भूमिती आहे, तो सोंगटयांचा पट नाही, हे साधकाने लक्षात घेतले पाहिजे. कोणताही विषय शब्दानी मांडल्याशिवाय, व्यक्त होत नाही. पण त्या शब्दातून आपला वास न येता, श्रीगुरूंचा यावयास पाहिजे. आजपर्यंत तीस वर्षात जे जे आवश्यक होते, तेवढेच लिहीले. ते वाचता वाचता आपण संपून जाऊ; पण शब्द हे 'ब्रह्म' राहिले पाहिजेत. मनाला एकदा गति मिळाली की, पुढे सद्‌गति मिळावयास पाहिजे. नुसती गति मिळून इतराना बोध झाला नाही, तर त्यापरत्वे दुर्गति होता कामा नये. यासाठी थोडके बोलावे व लिहावे. पण त्यासाठी विचार हे वर्षानुवर्षे बुद्धी, मन यात राहून उपयोगी नाहीत. बुद्धीतील विचार मन व त्यानंतर अंत:करणात रुजावे लागतात. यासाठी चिंतन करावे लागते, नुसती चिंता उपयोगी नाही; कारण त्यामुळे मनुष्याचा शेवट चितेमध्ये होतो. ह्या तत्त्वांचा विचार सदैव करणे; म्हणजे ईश्वरभक्त! नश्वरभक्त पुष्कळ आले व गेले; याची गणती नाही. आजचा विचार ही पुढची 'नांदी' आहे. त्याच्याआधी ह्या जगाचा मोह टाकून न देता, 'नांदी' हे तत्त्व सिद्ध होण्यासाठी, व जगाला जागे करण्यासाठी, नाद पाहिजे! पण ऐहिक सुखाचा नाद एकदा लागला की, मरेपर्यंत हा नाद सुटत नाही; व शेवटी त्या नादाचे रूपांतर वासनेमध्ये होते. जन्माला येऊन 'वासना'




ही पाहिजेच; पण शेवटी 'वास' राहिला पाहिजे; म्हणून 'शेवट गोड करी'; हे मागणे साधक मागत असतो.

गुरुमार्गात अनेक लोकांच्या गाठीभेटी होतात; पण कुणालाही निश्चित हे सांगता येत नाही की, हा जो कुणी गुरुभक्त भेटण्यास आला, त्याचा हितसंबंध गुरूंशी काय आहे? तर येणारे जे भक्त आहेत, त्यामध्ये चार प्रकारचे वर्ग आहेत: जो कुणी जन्माला येतो, त्याला काया, वाचा व मन यांचे बंधन असल्याशिवाय, जन्माला येता येत नाही. अशावेळी गुरूंच्या भेटीला आरंभ होतो. कारण कर्माची गाठ, ही प्रत्येकापाशी आहे. त्या कर्माच्या गाठीमुळे, गुरूंची गाठ पडते. पहिल्या अवस्थेत जेव्हा आपण कायिक असतो, अशावेळी अनुकूल व प्रतिकूल असा कर्माचा खेळ चालू असतो. अशावेळी या खेळाचा खंडोबा झाला की, तो जागा होतो; व त्यावेळी कर्म म्हणजे काय? ह्या कर्माशी आपला संबंध काय आहे? व ह्या कर्मातून आपली सुटका झाल्याशिवाय, आपल्याला सुख लाभणार नाही; असे सिद्ध झाल्यावर, पहिला मार्ग 'भूत-भविष्य'; ह्या मार्गाकडे आपण जातो. आपल्याला ही कला अवगत नसल्याने, आपण ज्योतिषाकडे जातो; व आपले भविष्य विचारतो. वास्तविक जो त्रास झाला आहे तो ग्रहामुळे नव्हे, तर कर्माने झाला आहे. जे जे कर्म आपल्याला अनुकूल नसेल, त्याला अनुकूल करून घेणे; असा जीवनाचा अर्थ आहे. पण प्रत्येकजण आज अनर्थाने वागू लागला आहे, त्यामुळे जे जे आपल्याला प्राप्त होते ते सुख पूर्वजन्मावर अवलंबून आहे; हे आपण विसरतो.

आजचा हा जन्म म्हणजे काया-वाचा-मन, हे जीवन भोगण्याचे माध्यम आहे. तेव्हा आपल्याला दु:ख झाले आहे, म्हणून त्याचे निवारण कसे होईल? ह्या विचाराने, अनेक मार्गांचा अवलंब केल्यानंतर, 'गुरूंचा' शोध आपण घेऊ लागतो. आज ह्या जगात, प्रत्येकाला सुख पाहिजे. पण ज्या सुखाची अपेक्षा आपण करतो, ते सुख कष्ट न करता, आपल्याला कसे प्राप्त होईल? असा विचार प्रत्येकाच्या ठिकाणी वास करीत आहे. अशावेळी गुरुभेटीस आल्यावर, जी आपण सुखाची याचना करतो, त्याची किंमत किती आहे? असा प्रश्न आपण स्वत:शी कधीच करीत

संथपणे संपूर्ण शरीरात सामावणे, ही क्रिया व्हावयास पाहिजे. अशा रीतीने ॐकार साधनेतील लहरी, यांचा समावेश संपूर्ण शरीरात होतो. ही अवस्था जेव्हा लहरींच्या रूपाने शरीरात निर्माण होते, तेव्हा 'समाधान' ही अवस्था व्यक्त होते. ह्याच क्रियेला, 'साधकाला नामीतत्त्वाची कृपा होणे'; असे म्हणतात.

संथा :- उच्चार मध्य लय
स्वर ताल लय




ह्या साधनेमध्ये ॐकार व नामस्मरण कंठस्थानातून म्हणावयास पाहिजे. यासाठी सर्वांच्या सोयीचा स्वर, म्हणजे हार्मोनियममध्ये वाजविला जाणारा 'काळी एक' आहे. ह्या स्वरात परिपूर्ण साधना म्हणावयाची असून, त्याचे अनुसंधान लक्षात घेतले पाहिजे. नुसते साधनेस उपस्थित राहून व ''मी साधना केली;'' असे म्हणून काहीही साध्य होणार नाही. यासाठी पहिले अनुसंधान, 'स्वर' या अंगाचे ठेवले पाहिजे.

श्रीसाई अध्यात्मिक समितीच्या मार्गदर्शनार्थ, आजपर्यंत ज्या पुण्य विभूतींच्या आशीर्वादाचा लाभ ह्या कार्यपद्धतीस झाला आहे, त्यात हाजी हजरत ख्वाजा मोईनुद्दीन किश्ती (अजमेर) यांच्या आज्ञेनुसार, मला श्रीक्षेत्र बाळेकुंद्री येथे जाण्याचा योग आला; व त्यानंतर श्रीपंतमहाराजांच्या पदामधील अवीट गोडी व त्यातील 'शब्दब्रह्म' अनुभवास आले. ह्या घटनेस पंचवीस वर्षे पूर्ण झाल्यानंतर, त्यापुढील सिद्धता, म्हणजे श्रीनाथपंथातील सिद्धसाधने यांचा लाभ पुढील काळात सुलभपणे सर्वांना व्हावा, यासाठी ही सिद्धसाधने एकोणीसशे पंचाऐशी (१९८५) च्या मकर संक्रांतीचे दिवशी श्रीगोरक्षनाथांच्या आशीर्वादाने, श्रीपंतमहाराजांच्या पदामध्ये सामावण्यात आली! तेव्हापासून 'आरती' हा नित्यसाधनेचा एक



प्रमुख भाग झाला आहे. आता प्रत्येक कार्यकेंद्रावर होणाऱ्या नित्य आरतीतूनच, आपला देहिक विकास होत आहे. आरती ही साधना 'स्वर-ताल-लय' व 'उदात्त-अनुदात्त-स्वरित', यानी युक्त असली पाहिजे. आरती या शब्दामध्ये 'आर्त' हा मूळ धातू असून, ईश्वराबद्दलची आर्तता म्हणजे 'आरती' होय. अशी आर्तता आपल्या देहिक माध्यमातून व्यक्त झाली पाहिजे. नित्य ॐकार साधनेतून देहातील एकोणीस माध्यमे उदित झाली, तरच ही आत्म्याची आर्तता व्यक्त होईल. म्हणून ॐकार म्हणत असताना, 'स्वर-ताल-लय', 'उच्चार-मध्य-लय', 'उच्चार-आचार-विचार' व 'सूर-नाद-निनाद' ही बारा अंगे विचारात ठेवून, पूर्ण अवधानाने नित्य साधना केली गेली पाहिजे.

नाही. दैनंदिनी जेव्हा आपण बाजारात जातो, त्यावेळी प्रत्येक वस्तूची किंमत दिल्याशिवाय, आपल्याला ती वस्तू मिळत नाही; हा विचार आपण सुज्ञपणे करतो. गुरुमार्गात आल्यावर जे सुख आपल्याला मिळते, ते सुख आपल्याला आशीर्वादाने मिळते. हे जे सुख आपल्याला गुरू देतात; व प्राप्त होते, ते सुख पैशानी मोजता येत नाही; तर जे सुख आपल्याला मिळाले आहे, त्याच्या मोबदल्यात आपण सेवा करावयाची असते. ही व्यावहारिक देवाण-घेवाण गुरुमार्गात आहे. अशा सुखाचे आपण वाटेकरी होतो; पण सुखाच्या मोबदल्यात आपण सेवा केली नसल्याने, ती सेवा आपल्या माध्यमातून झाल्याशिवाय, आत्मा आपल्याबरोबर येत नाही; व आपण सेवा करू, त्या सेवेत आत्मा म्हणजे चैतन्य असल्याशिवाय, पुढील जन्मांची तरतूद होत नाही! जगात जो मनुष्य दुसऱ्याकडून पैसे घेतो, ते पैसे त्याला परत करावे लागतात; हा व्यवहार आहे. पण जीवनातील हा व्यवहार, म्हणजे प्राप्त झालेल्या सुखाप्रीत्यर्थ सेवा करणे; हा आपण विसरलो आहोत. म्हणून आपल्याला कितीही धनप्राप्ति झाली, तरी आज सुख-शांति-समाधान नाही. आज आपल्याला देवधर्म नको आहे. फक्त दिवसरात्र चैन करावी, असा जीवनाचा धर्म बनला आहे. ह्या आपल्या विचारआचारामुळे निसर्गसुद्धा कोपला आहे. कितीही ऐहिक प्राप्ति मिळाली, तरी त्या प्राप्तीमध्ये यश व 'यशाचा अंश म्हणजे ईश्वर', हा नसल्याकारणाने, जे जीवन आपण जगतो आहोत, त्या जीवनात अपेक्षा, उपेक्षा ही सदैव नांदते आहे. अशा जीवनाला 'जीवन' म्हणता येणार नाही. तेव्हा सुज्ञ भक्तानो जागे व्हा!

वर्षानुवर्षे, मनुष्य चोवीस तास आपले जीवन व्यर्थ खर्च करीत आहे. ह्या पन्नास वर्षात, कुणी मानवाने काही पुण्य केले असेल, असे वाटत नाही. दैनंदिन जीवनात सकाळपासून झोपण्यापर्यंत जुगार, क्लब, रेस आदींचा षोक आपल्याला लागला आहे. पण शेवटी 'शोक' करावा लागतो; व एवढे मौल्यवान जीवन प्राप्त होऊनही, ह्या जीवनात 'शेवट गोड करी', असे म्हणता येत नाही. कुणीही जन्माला यावे; व कुणीही मरून जावे, असे जीवन आज प्राप्त झाले आहे. आजचे जीवन संपूर्ण ईश्वरवादी असे नको आहे. जसे प्रत्येकजण आपल्या पोटासाठी मिळवितो,



त्याप्रमाणे कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने जर 'श्रीसद्‌गुरुनामस्मरण' केले तर आजची समस्या मिटेल. हे जग आपण पाहत आहोत, ह्या जगाचा निर्विवाद आपण बळी घेणार आहोत. पूर्वी हीच जगाची अवस्था प.पू. बाबांच्यावेळी झाली होती; तेव्हा प.पू. बाबांनी उपदेश करून, हे जग शंभर वर्षे जगविले. पण "आता त्यापेक्षाही दिवस अतिशय वाईट आले आहेत; व पुढे येणार आहेत"; अशी सूचना प.पू. बाबांनी केली, तेव्हा या जगाचा कसा सांभाळ करता येईल? या तळमळीने मी अस्वस्थ झालो. ही तळमळ सर्व भक्तानी आपल्या जीवनात ठेवावी; व आपले जीवन पारमार्थिक व्हावे; अशी मी प.पू. बाबांच्या चरणी प्रार्थना केली.

# ४३. श्रीशेष पंचमी, ज्योतिष्मती अवस्था, हिरण्यगर्भ अवस्था

पुढे मुंबईला साधना संमेलन आयोजित केले होते. त्यावेळी श्रीशेषपंचमीचा दिवस होता. संचार अवस्थेची अनुभूति मला श्रीशेषांनीच दिली होती; व पूर्वी लहानपणी मी सातारला डोंगरावर श्रीभैरवनाथांच्या सेवेस जात असता, तिथे श्रीशेषांचे दर्शनही झाले होते. या गोष्टीस साठ वर्षे झाली असता, प.पू. साईनाथांच्या आज्ञेने, या श्रीशेषपंचमीस, सर्व कार्यकेंद्रावरील भक्तांच्या नित्य साधनेत बदल केला; तो यासाठी की, पाच कोश व त्यातील पंचप्राण एक केले असता, त्या अवस्थेला 'ज्योतिष्मती' असे म्हणतात. पारमार्थिक मार्गात ही अवस्था परमोच्च आहे. मला या अवस्थेचा लाभ, श्रीऔदुंबरक्षेत्री झाला होता. तरी या अनुभूतीचे संक्रमण भक्त माध्यमात होऊन, जगाचा सांभाळ करावयाचे कार्य, आता कार्यान्वित होऊ लागले आहे.

आज आम्हा मानवांची, हजारो वर्षापासून अधोगती चालली आहे; व शेवटी जो मानव होता तो आता दानव झाला आहे. दैनंदिन जीवनात खाणेपिणे, कपडालत्ता आदी सुखांची अपेक्षा धरून, आपण सुखी कसे होऊ? हे दुःख समाजात आहे. याचे मूळ कारण, जीवनाचे ज्ञान आपल्याला नाही. हजारो वर्षापासून साधुसंतांनी जी शिकवण आम्हाला दिलेली आहे, तिचा विसर आज आपल्याला पडला आहे; म्हटल्यावर आपण सुखी कदापीहि होणार नाही. सुखप्राप्तीसाठी अनेक प्रयत्न अपयशी झाल्यावर, आपण जागे होतो; तेव्हा देव काय म्हणतो आहे? किंवा साधुसंत काय म्हणत आहेत? याचा विचार करू लागतो. अशावेळी देवधर्म व त्याचे आचारविचार हे लांब दूर आहेत, असे वाटू लागते. जेव्हा आपल्याला काही करावयाचे होते, ती वेळ निघून गेली; व आता आपण मानवी जीवन जगत नसून, दानवी जीवन जगत आहोत. जे प्रेम सर्वाभूती होते, ते प्रेम आता पैशावर राहिले आहे. अशावेळी ह्या बिकट परिस्थितीमध्ये आपल्याला मार्ग कोण दाखविणार? असा प्रश्न आहे. "जरी आपण मानवाचे दानव झालो आहोत, तरी परमेश्वर



बदललेला नाही; तेव्हा देवाला शरण गेल्यावर तोच मार्ग दाखवील;" असे अनेक वर्षापासून संतांनी सांगितले आहे; व म्हणूनच श्रीसाईबाबांनी अवतार घेतला. जो मार्ग अवघड होता, तो सोपा केला; इतकेच नव्हे तर नाथांची परंपरा आपल्या साधनेत समाविष्ट केली. ही परंपरा म्हणजेच आज जे आपण करीत आहोत ते अनुष्ठान! ह्या अनुष्ठानामध्ये श्रीआदीनाथ ते श्रीसाईनाथ हे सिद्ध आहेत; म्हटल्यावर जे आपण अनुष्ठान करू किंवा म्हणू, हे अनुष्ठान स्वर, ताल, लय आदीनी युक्त असे म्हटले असता, आपल्याला जीवनात, प्रापंचिक व पारमार्थिक अशा जीवनाचा लाभ होतो. आज आपण साधक आहोत, पुढे सिद्ध होणार; व साध्य आपल्याला ह्याच जन्मी मिळणार; यासाठी प.पू. साईनाथ महाराजांनी या श्रीशेषपंचमीच्या दिवशी सर्वांना शुभाशीर्वाद दिला.

जगताचा सांभाळ करावयाचा, म्हणजे प्रथमतः आपला विकास झाला पाहिजे; व त्यासाठी जी साधना वेळोवेळी आपल्याला आज्ञेनुसार शिकविली आहे, तिची उजळणी करावयास पाहिजे. कारण साधना ही देवाप्रीत्यर्थ नसून, आपली प्रगति किती झाली आहे? याचा अंदाज साधकाला आला पाहिजे. प्राप्त जन्म हा अविकसित होता; त्याचा विकास होणे, म्हणजे जो 'जीव' जन्माला येतो, त्याचे स्थित्यंतर 'आत्मा' असे व्हावयास पाहिजे; व त्यापरत्वे इतराना शिकवण द्यावयास पाहिजे. आपण जेव्हा गुरुआज्ञेनुसार साधना करू तेव्हा 'कारण अवस्था' म्हणजे दीक्षा सिद्ध होईल. आपल्याला कारण दीक्षा दिली, म्हणजे प्रत्यक्षात त्या दीक्षेची ओळख करून दिली. त्यानंतर साधना सात प्रकारानी, म्हणजेच सात माध्यमातून करावयाची आज्ञा झाली, तेव्हा ही साधना सिद्ध झाली. सात प्रकारे साधना केली, तेव्हा एक आवर्तन झाले; व अशी तीन आवर्तने म्हटली गेल्यावर, 'महाकारण दीक्षा' व अशी एकवीस आर्वतने झाल्यावर, ॥ॐ श्री साईनाथाय नमः॥ हे नामस्मरण सिद्ध झाले. याच साधनेच्या क्रमातून आपण गेलो असता इहलोक, परलोक व स्वर्गलोक यांची प्राप्ति आम्हा मानवाना होईल. यासाठी नित्य साधना ही देवासाठी नसून, आपल्याचसाठी आहे; हे लक्षात घेऊन, साधनेकडे अधिक लक्ष द्यावे; अशी आपणा सर्वास विनंती. कारण ह्या साधनेचे संधान, पुन्हा कोणत्याही जन्मात प्राप्त होणार नाही! नित्य साधना ही केवळ

आपल्याचसाठी असली, तरी केलेल्या साधनेचे फल इतराना प्राप्त झाले पाहिजे; हा इच्छित हेतू मनाशी बाळगून, साधना करावी. "गुरुआज्ञा आहे"; असे आज्ञेचे ओझे आपल्यावर आहे, असे समजून साधना कदापीहि करू नये. तशी जर साधना केली तर त्या साधनेचा परिणाम, म्हणजे आपण अधिक दुःखी व पर्यायाने जगही दुःखी होईल.

कार्यकेंद्रावर येणाऱ्या प्रत्येक भक्तांची अडीअडचण समजावून घेऊन, त्याच्या दुःखाचे निवारण होण्यासाठी, निराकरण सूचित करावयाचे कार्य, गुरुआज्ञेने मी जरी करीत होतो, तरी एक विचार मनात सारखा येत असे की, ही अडीअडचण क्षणिक सुखाची प्राप्ति करून देण्यासाठी आहे. भक्ताच्या जीवनात व त्याच्या कुटुंबातील पुढील अनेक पिढयामध्ये, चिरंतन सुख-शांति-समाधान नांदावे, म्हणून काही शाश्वत असे निराकरण असावयास हवे. कार्यारंभी ईशचिंतनाची गोडी समाजाला लागावी, म्हणून आरती व कामकाज ही साधनमाध्यमे, गुरुआज्ञेने मी अंगीकारली. त्यानंतर श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथे दर पौर्णिमेला, असे अकरा पौर्णिमेला रुद्र हवन; व त्यानंतर महारुद्र स्वाहाकार केला गेला. त्याआधी पाच वर्षे मी कामकाज बंद करून, माझी वैयक्तिक साधना सुरू केली. या साधनेचा विषय, अखिल विश्वाला चिरंतन सौख्य लाभावे, हा होता. त्यानंतरच आपणा सर्वांना सुख-शांति-समाधान लाभावे, म्हणून तीन प्रतिमा दिल्या गेल्या.

आज भूगर्भात जे शक्तिपीठ स्थापन केले आहे, त्यातील शक्तीला आवाहन, श्रीक्षेत्र नरसोबा वाडी येथे जेव्हा 'श्रीमहारुद्र स्वाहाकार' केला गेला, त्यावेळी केले गेले होते. पुढे ही शक्ति गुरुरूप झाली; व त्या शक्तीमध्ये देवादिकांची शक्ति विलीन झाली; तेव्हा शक्तिपीठाची स्थापना केली गेली. ह्या आद्य शक्तिपीठामध्ये प्रतीक-प्रतिमा-प्रतिभा अशा शक्ति अधिष्ठित करण्यासाठी, पाच वर्षांनी गोवा कार्यकेंद्रावर नवरात्र पूजन केले गेले. हे पूजन प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत चालू होते. ह्या तीन शक्ति जेव्हा एक झाल्या, तेव्हा 'प्रकाश' म्हणजे 'हिरण्यगर्भ', ही अवस्था 'उदयाला' आली. आता तुमच्यापाशी ज्या तीन प्रतिमा आहेत, त्या जेव्हा नित्य साधनेने एकरूप होतील, तेव्हा तुम्हाला 'प्रकाश' ही अवस्था



प्राप्त होईल. त्यासाठी त्या विजयादशमीला प.पू. साईनाथमहाराजांनी सर्व भक्तभाविकास असा आशीर्वाद दिला की, "जगाला जेव्हा प्रकाशाचे अस्तित्व समजेल, तेव्हा अंधार म्हणजे अज्ञान, लयाला जाईल."

अनादीकालापासून आपण देवाला मानीत आलो आहोत; व आपल्यापाशी देवाच्या प्रतिमा पूजनामध्ये आहेत. आपल्या पूर्वजानी ह्या मूर्तींची स्थापना केली, म्हणून आपण ह्या प्रतीकाना 'देव' असे संबोधतो. वास्तविक ह्या प्रतिमामधील देवत्व लयाला गेले आहे. कारण आपल्याला मंत्र, तंत्र व यंत्र ह्याचा उच्चार करता येत नाही. जर आपल्याला उच्चार म्हणता आला नाही, तर देवाचे देवत्व आपल्याला अनुभविण्यास दीर्घकाळ लागेल; व ही त्रिपुटी जर आपल्याला अवगत झाली तरच देवाचा 'प्रसाद' मिळेल. आपल्या घरोघरी जे देव आहेत, ते अशा प्रकारचे आहेत. 'देव' म्हटल्यावर आपल्यापाशी भाव पाहिजे. नुसते पूजापाठ इत्यादी जे आपण करतो, ते कर्म आपल्याकरवी 'उपचार' म्हणून होते. त्या कर्माने काही इष्ट फल द्यावे असे नाही. वास्तविक देवाची प्रतिमा व तिची स्थापना, आपल्या जीवनात बोलतीचालती व्हावी, अशी जर का आपली इच्छा असेल, तर त्यासाठी तपश्चर्या करावी लागते. केवळ दुकानातून पैसे देऊन, आपण देवाच्या मूर्ति आणतो, म्हणून ती मूर्ति देवाची नाही. ती केवळ एका धातूची असेल. याव्यतिरिक्त त्यास अन्य अर्थ नाही; असा अनुभव मी स्वतः घेतला आहे. म्हणून प.पू. बाबांना अशी प्रार्थना कार्यारंभी मी केली होती की, "येणारे जे भक्त आहेत त्यांच्या घरी एकतरी प्रतिमा असू दे; की ज्यामुळे त्यांचे जीवन सुखी होईल." पण कार्यारंभी 'प्रतिमा' म्हणजे काय? हे समजले नाही.

आज कार्य करता करता सदतीस वर्षे झाली; व ह्या सदतीस वर्षात जे काही गुरुआज्ञेचे पालन मी केले, त्यामुळे या तीन प्रतिमा आपल्याला देऊ शकलो. ह्या तीन प्रतिमामध्ये महाकारण ही प्रतिमा अशी आहे की, ज्यामध्ये आपले गुरू व त्यांचे गुरुतत्त्व आहे. सोने हा धातू अतिसूक्ष्म आहे; व गुरूंची कृपा सूक्ष्मातून येत असते; म्हणून 'महाकारण प्रतिमा', प्रत्येकाकडे असावयास हवी. 'महाकारण' ही पारमार्थिक प्रतिमा आहे; व बाकी दोन प्रतिमा ह्या प्रापंचिक आहेत.

पूर्वीच्या काळी आपल्या देव्हाऱ्यात जे देव असावयाचे, त्यामध्ये एकतरी प्रतिमा किंवा टाक सोन्याचा असावयाचा. त्या काळात लोक जे आचरण करीत होते, ते केवळ भावनेने. आज आपण विज्ञानी आहोत. विज्ञानामुळे सोन्याची अतिसूक्ष्म तार काढता येते; तेव्हा आपण जी उपासना किंवा साधना करू, तिचे माध्यम म्हणून महाकारण प्रतिमा आहे. आज घरोघरी असणारे जे देव आहेत, ते लयाला गेले आहेत; म्हणून आपल्याला देवाचे आचरण करूनसुद्धा, सुख-शांति मिळत नाही; व म्हणून श्रीजगद्गुरूंनी, आपल्या सामर्थ्याने ह्या प्रतिमा सिद्ध केल्या. "त्यांचा अनादर होऊ नये, असे आचरण सर्व भक्तानी ठेवले पाहिजे. कारण जरी आपल्याला त्यांचा लाभ आज नसेल, तरी पुढील पिढीला त्यांचा लाभ निश्चित होणार आहे;" असा संदेश प.पू. बाबांनी दिला.



# ४४. गुरुमार्ग - सेवकाचे कर्तव्य

एकीकडे येणाऱ्या भक्ताच्या आत्मिक विकासासाठी, गुरुआज्ञेने मी तीन प्रतिमा दिल्या; व त्यावेळी 'कामकाज करणे', ही सेवा मला बंद करावी लागली. परंतु प्रश्नार्थ येणारा भक्त हा गरजू असतो. तो जी अडचण घेऊन येतो, ती अडचण हेच त्याचे सर्वस्वी जीवन आहे; असे त्याला वाटत असते. अशावेळी "मी कामकाज करीत नाही;" म्हणून त्याला निराश करून परत पाठविणे, हेही मला योग्य वाटेना. त्यावेळी प.पू. गुरुआज्ञेने मी सेवक माध्यमे तयार करू लागलो; व आजही समितीच्या सर्व कार्यकेंद्रावर, पूर्वीइतकेच सहजपणे भक्तभाविक 'कामकाज' साधनेचा लाभ घेत आहेत.

जगातील गुरू व भक्तांचे कर्तव्य काय आहे? हे आपल्याला समजत नाही; व त्यामुळे अनेक भक्त गुरुमार्गी होऊनसुद्धा, ह्या मार्गाला वंचित होतात. कारण जो आपला जन्म आहे, त्यामध्ये गुरूंचे स्थान देवापेक्षाही अधिक आहे. आपण अनेक जन्म घेऊन, ह्या जगात सुखदुःखाचे वाटेकरी होतो. त्यातून आपली सुटका कशी करावी? हे भक्ताना न समजल्यामुळे, पुन्हा जन्म व पुन्हा मरण, हा फेरा सदैव चालू असतो. अशावेळी पश्चात्ताप होऊन, एखाद्या जन्मात सत्कृत्य घडल्यामुळे, ह्या जन्मी पुन्हा गुरूंची भेट होत असते. ती भेट सुख भोगण्यासाठी नसून, जो जन्म आपल्याला प्राप्त झाला आहे, त्यापेक्षा अधिक चांगला जन्म पुन्हा मिळावा, किंवा जन्मालाच येऊ नये; अशी तरतूद करण्यासाठी, गुरूंची भेट ह्या जन्मात होत असते. सामान्यपणे आपण ह्या जगात वावरत असतो. त्यामुळे इतराना जे सुख मिळाले आहे असे आपल्याला दिसते, तसे सुख आपल्याला मिळावे, अशी अपेक्षा प्रत्येकाची असते. यासाठीच गुरूंच्या शोधासाठी आपण जातो. जगतात आपण जन्माला आल्यानंतर, आपले कर्तव्य काय? हे आपण विसरतो. तरी जन्माचे कारण गुरू आपल्याला निवेदन करतात. त्याकडे लक्ष देऊन, त्याप्रमाणे आपले आचरण घडले पाहिजे. ते जे सांगतात ते लक्षपूर्वक विचारात घेऊन, त्यावर लक्षपूर्वक विचार केला पाहिजे. कारण वारंवार गुरूंची भेट होत नाही. जेव्हा आपण अनेक जन्म घेतो, त्यातील कुठल्यातरी जन्मामध्ये

गुरुभेटीची तरतूद केलेली असते; व ह्या जन्मात आपल्याला काही एका अडचणीमुळे, म्हणजे एका निमित्ताने, गुरूंची भेट होत असते. अशी भेट अत्यंत अमोलिक आहे, हे आपण विसरल्यामुळे, 'अधिक सुख प्राप्त करण्याचा मार्ग म्हणजे गुरुमार्ग', असा समज अनेक लोकांचा होत असतो.

आपण सर्वजण अडीअडचणी घेऊन गुरुसन्निध येतो. त्यावेळी गुरूंनी जो आशीर्वाद दिलेला असतो, तो जतन करून, जो आशीर्वाद दिला आहे तो द्विगुणित करणे, हे भक्तांचे कर्तव्य आहे. कारण तो आशीर्वाद केवळ आपल्यापुरता नसून, आपल्या घराण्यातील अनेक पिढयाना पुरेल असा असतो. पण आपण तो आशीर्वाद द्विगुणित करण्याऐवजी, शंकाकुशंका निर्माण करून, जो आशीर्वाद प्राप्त झाला आहे, त्याबद्दल श्रद्धासबुरी न ठेवता, "असे का?" "असे कशाला?" इत्यादी प्रश्न जीवनामध्ये निर्माण करतो. त्यामुळे गुरूंबद्दलची श्रद्धा शंभर टक्के जोपासली न जाता, त्याऐवजी अश्रद्धा निर्माण होऊ लागते; व त्यामुळे आपली अडचण जरी निवारण झाली, तरी दुसरी अडचण आपल्या जीवनात निर्माण होत असते. एकदा गुरूंनी आपल्या जीवनामध्ये, कसे जगावे? कसे बोलावे? व कसे आचरावे? हे शिकविल्यानंतर, पुन्हा पुन्हा प्रश्न विचारून, दिलेल्या आशीर्वादास आपण मुकतो; व वेळोवेळी गुरू भेटोत वा न भेटोत, पण त्यांनी आपल्याला आशीर्वाद दिलेला आहे; हे आपण निश्चितपणे विसरतो; व "मला गुरुभेट झाली नाही;" असे भक्त म्हणतात. त्यामुळे भक्ताची श्रद्धा आशीर्वादावर आहे की, गुरुभेटीवर आहे? असा प्रश्न निर्माण होत असतो.

या जगतात गुरूंचे कार्य, हे जगाचे कल्याण होण्यासाठी असते. त्यामध्ये द्वैतभाव किंवा वैरभाव असू शकत नाही. 'कार्य' जन्माला येते, त्यासाठी गुरूंना अनेक जन्म जन्माला येऊन, प्रत्येक जन्मामध्ये दीर्घ तपश्चर्या करावी लागते. केल्या गेलेल्या तपश्चर्येमुळे, ह्या जगाला सुलभ असा मार्ग ते शिकवितात. ह्या शिकवणीच्या मागे किंवा आशीर्वादामागे, अनेक जन्मांची पुण्याई असते; हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. गुरूंचे जीवन व आपले जीवन सारखेच आहे असे वाटले, तरी आपला जन्म व गुरूंचा जन्म, यामध्ये जमीनअस्मानाएवढे अंतर आहे.



गुरुकार्यामध्ये जो आशीर्वाद मिळतो, तो भक्ताना एकदाच मिळतो. त्याची साक्ष म्हणून, भक्ताना पुन्हा पुन्हा दर्शन देऊन, जो आशीर्वाद आहे, तो ते स्वेच्छेने साकार करीत असतात. तेव्हा अशावेळी 'गुरू मला भेटावेत', हा अट्टाहास उपयोगी नाही. यासाठी गुरुभक्तानी शंकाकुशंका निर्माण न करता गुरुमार्गी होणे, हे आपल्या सर्वांनाच हितावह आहे. गुरू व भक्त यांची देवाण घेवाण सतत चालू असते. तेव्हा गुरुभेटीमध्ये आपल्याला काय मिळाले? व काय मिळाले नाही? हे भक्तानी स्वत: मुमुक्षू होऊन पहावे; म्हणजे ह्या जगतात जे नाही, ते सुख गुरूंनी दिले आहे; असे मागाहून समजेल. गुरू व भक्त म्हणजे जीव व शिव, यांचा जीवनामध्ये संगम चाललेला असतो. या संगमामध्ये आपण इतराना न्हाऊ घालणे, हे आपले आद्यकर्तव्य आहे. पण त्या संगमामध्ये आपल्या आचारविचारानी गलिच्छता निर्माण करू नये. तरच जन्माला येऊन जन्म म्हणजे काय? हे आपल्याला समजेल; व इतराना त्याचा लाभ आपण देऊ शकू. अन्यथा 'जन्माला आला व निघून गेला'; असा अर्थ जीवनास प्राप्त होईल.

वरील विचार मला सुचले; कारण मी गुरुआज्ञेने काही एका कारणपरत्वे कार्यकेंद्रावरील 'कामकाज' करणे बंद करून, सेवक माध्यमाना नियुक्त केले; त्यावेळी काही भक्तांच्या मनात अशी शंका येऊ लागली की, "दादा आम्हाला आता कधीच भेटणार नाहीत काय?" परंतु मी गुरुआज्ञेचे निष्ठेने पालन करीत होतो; व "तुला जगाचा सांभाळ करावयाचा आहे"; अशी गुरुआज्ञा झाल्यावर, त्यासाठी काहीतरी निश्चित असे साधन अवलंबिणे आवश्यक होते. जगताचा सांभाळ करावयास जेव्हा 'हिरण्यगर्भ शक्तीला' शक्तिपीठात स्थापन होण्यास आवाहन केले, तेव्हा ही शक्ति सामान्य जनात प्रवाहित होऊन, भक्तांच्या कुटुंबाचे अनेक पिढयापर्यंत कल्याण व्हावे, म्हणून या शक्तिपीठाच्या क्रमांक्रमाने प्रतिकात्मक प्रतिमा सिद्ध करून, त्या सर्व भक्ताना दिल्या. प्रत्येक प्रतिमा सिद्ध होण्यापूर्वी, भक्ताना जी दीक्षा द्यावयाची होती, त्यासाठी प्रथमत: मला वैयक्तिक साधना करणे आवश्यक होते. याचा अर्थ मी भक्ताना भेटू इच्छित नव्हतो असा नव्हे. आज घरोघरी या प्रतिमा नांदत आहेत; त्यावेळी तुम्हा भक्ताना जी बंधने नाहीत, त्याहून अधिक शास्त्रशुद्ध बंधने मला

पाळणे आवश्यक होते; म्हणूनच मी कामकाज बंद करून, सेवक माध्यमे तयार केली.

आता सेवकाचे कर्तव्य काय? याचा विचार करणे, आज अत्यावश्यक आहे. कार्यार्थ जे कुणी भक्त मार्गदर्शनासाठी येत असतात, त्याना योग्य मार्गाने कार्याची ओळख करून दिली पाहिजे. अशावेळी 'येणारा हा नवीन व आपण जुने', असा भेद विचारात घेणे गैर आहे. येणारा हा आपल्याला भेटण्यासाठी येत नाही. तो देवाला भेटण्यास येतो; व तत्पूर्वी त्याच्या हातून, काही ना काही सेवा घडलेली असते. फक्त त्याला योग्य दिशेने नेणे, हे आपले कर्तव्य आहे. पण आपण नेहमी अशी वागणूक इतराना देतो की, जसे काही आपल्याला सर्वस्व मिळालेले आहे. वास्तविक येणाऱ्या नवीन भक्ताची श्रद्धा जी असते, तेवढीही श्रद्धा आपली नसते. देवावर श्रद्धा आहे याचे प्रतीक, आपल्या आचरणातून व उच्चारातून कळले पाहिजे. ज्याअर्थी 'तुझे-माझे' आपण बोलतो, त्याअर्थी आपला विकास शून्य आहे; व मग आपली प्रगति कशी होणार? हा प्रश्न प्रामुख्याने आपल्यासमोर आहे; याचा विचार केला पाहिजे. इतकी वर्षे आपण ह्या गुरुमार्गात आहोत म्हटल्यावर, आपला जर योग्य तो विकास झाला नाही तर गुरुमार्गाला गालबोट लागेल.

आज अनेक वर्षे मी हे कार्य जतन केले आहे. त्याची साक्ष म्हणजेच सर्व भक्तभाविक श्रद्धेने येतात. आपले दुःख निश्चित निवारण होणार आहे; एवढा आत्मविश्वास त्यांचा ह्या कार्याबद्दल आहे, जेवढा देवाबद्दलही नाही. अशावेळी त्यांची श्रद्धा वाढीला लागेल, असे आचरण सर्व सेवकानी ठेवले पाहिजे. नुसते कामकाज करणे, आरती करणे व साधना करणे, म्हणजे 'सेवक' नव्हे. संतांनी सेवकाची व्याख्या अशी केली आहे की, आपले आचार, विचार, उच्चार हे लोण्यापेक्षा मऊ असावयास पाहिजेत. "जे का रंजले, गांजले त्यासि म्हणे जो आपुले;" हे व्रत आपले आहे. ते नुसते तोंडाने म्हणून चालणार नाही. तुम्हाला काही एक साधना सिद्ध करावयाची नसून, जी साधना सिद्ध आहे, तिचा लाभ इतराना व्हावा; व तो होण्यासाठी आपले वर्तन यामध्ये ओलावा व आपुलकी पाहिजे. हीच साधना आज सेवकासाठी आहे. अन्यथा बाहेरचे जग व



तुम्ही, ज्याना गुरूंचा लाभ झाला आहे, यामध्ये फरक काय? हे सदैव आपल्या चिंतनात ठेवले पाहिजे. बाहेरचे जग अज्ञानी आहे; म्हणून त्याच्या हातून पाप घडत आहे; पण गुरूंनी आपल्याला सज्ञान केल्यावर, आपले आचरण अयोग्य प्रकारचे घडले, तर त्याला कोठल्याही मार्गात विमोचन नाही. कारण तुम्ही जे कर्म करीत आहात, त्याचे ज्ञान गुरूंनी दिले आहे; व जर आपण तेच कृत्य पुन्हा केले तर आपले कर्म आपल्याला भोगणे भाग आहे. यासाठी 'सेवक अवस्था' अत्यंत नाजूक असून, ती 'सुळावरची पोळी' आहे; हे समजून तुम्ही सर्वांना सुखी करणे, हे कर्तव्य ओळखावे, अशी देवाची इच्छा आहे. याचा अर्थ थोडक्यात असा की, आपण आपल्याला गुरुमार्गात विरले पाहिजे. अंशमात्रही शिल्लक राहता कामा नये. ही जबाबदारी माझी एकटयाची नसून, ती आपणा सर्वांची आहे; हे कदापीहि विसरून चालणार नाही.

# ४५. गुरुमार्ग - कुलधर्म - कुलाचार

आज जगात प्रत्येक मानवाला, इहजन्मामध्ये सुख-शांति-समाधानाची उणीव आहे. भौतिक शोध लागून जी प्रगति झाली आहे, ही प्रगति शास्त्राची झाली आहे; पण मानवी जीवनाची प्रगति होण्याऐवजी, ते गतिमान होऊन, जीवन हे सुखाच्या अभावी दुःखमय झाले आहे. त्यामुळे प्रत्येकजण प्रयत्नशील आहे की, केव्हा आपल्याला सुख-शांति मिळेल? केवळ हा विचार करून चालणार नाही; किंवा शास्त्रज्ञाना विचारून चालणार नाही. कारण आम्हा मानवांचे गणित, जन्मापासून चुकले आहे. गेल्या शंभर वर्षात आपली अपक्रांति चालू आहे; व आज अशी वेळ आली आहे की, आम्हा मानवांचे काय होणार? शास्त्रज्ञ चंद्रावर गेले; पण स्वतःचा शोध अजून त्यांना लागला नाही. जेव्हा आपला शोध आपणच घेऊ, तेव्हा सुख आहे की नाही? हे समजेल. कारण ह्या सुखाच्या मागे कोण आहे? तर आपले 'संस्कार'! आजच्या जगात संस्कार हा विधिपूर्वक न करता, संस्कार हा केवळ एक फॅशनेबल विधि झाला आहे. त्यामुळे आम्हा मानवांचा जन्म, बाराव्या दिवशी उदित न होता, त्याचे 'बारावे' करावे लागते. अशामुळे जरी आपण सुखाची अपेक्षा केली, तरी सुख मिळणार नाही; मग आपली बुद्धी जागी होते की, सर्वांना सुख प्राप्त झाले, पण मला नाही; व मग आपण शोधाशोध करू लागतो. जन्माला येतेवेळी जे संस्कार आहेत, त्या संस्काराना मानणे, हा समाजात कमीपणा आहे. म्हणून आपण त्यांची टाळाटाळ करीत असतो; व शेवटी आपले जीवन टाळ कुटीत असते. अशावेळी कुणाला जाऊन भेटावे? व कोण निश्चित मार्ग सांगेल? ह्या संभ्रमात आपण असतो. अशा संभ्रमित अवस्थेतील मानवाला, योग्य ते मार्गदर्शन करावे, या सद्हेतूने व प.पू. बाबांच्या आज्ञेने, बारा वर्षापूर्वी, 'गुरुप्रसाद' हा बहुमोल ग्रंथ लिहिण्याचे भाग्य मला प्राप्त झाले. आजच्या जगाची गरज; व पुढच्या पिढयाना निश्चित मार्ग समजण्यासाठी योग्य मार्गदर्शन, या ग्रंथातून केले गेले आहे. गतकाळात आपले पूर्वज काय करीत होते? व आपल्याला काय करणे इष्ट आहे? हे समजून घेऊन, पुढील काळात आपण काय कर्तव्य केले असता आपला व आपल्या वंशाचा



उद्धार होईल? ह्याचा विचार आस्थापूर्वक करणे, आपले कर्तव्य होय! 'गुरुप्रसाद' ही श्रीगुरूंची भेट, म्हणजे प्रत्येक कुटुंबाने जतन करावयाची आधुनिक 'गीता' आहे. प.पू. बाबांच्या आज्ञेने व श्रीसद्गुरूंच्या लेखणीने, माझ्या हातून या बहुमोल ग्रंथाचे लेखन जगत्कल्याणार्थ व पुढील पिढयाना सज्ञान करण्यासाठी झाले; याहून अधिक पुण्य ते काय?

दरवर्षी चैत्रापासून फाल्गुनापर्यंत, घराण्यात कुलधर्म व कुलाचार काय करावेत? असा प्रश्न आज आपणा सर्वांपुढे आहे. वास्तविक गुरुमार्गी झाल्यावर, जे मार्गदर्शन गुरू करीत असतात, त्याप्रमाणे आपण 'वाकून' त्याचे आचरण करणे, म्हणजे कुलधर्म व कुलाचार आहे. परंतु त्याप्रमाणे आपण वागत नाही; व काहीतरी निराळेपणाने वागणे म्हणजे गुरुमार्गी; असा अर्थ आपण लावून, तसे इतराना भासवितो. पण हा अर्थ आपल्या अनर्थाचा पाया आहे; हे आपण विसरू नये. कारण आता आपल्याला ज्या तीन प्रतिमा सिद्ध करून दिल्या आहेत, त्यांची सिद्धता आपल्या स्वतःवर अवलंबून आहे. भक्ताचे कल्याण व्हावे; अशी इच्छा गुरूंची असते; म्हणून श्रीगुरू आपल्या कल्याणासाठी, सोप्यातसोपी सेवा आपल्याला सांगत असतात; पण त्याकडे दुर्लक्ष करून, आपल्याला सुख का मिळत नाही? म्हणून आपण प्रश्न विचारतो. याचे उत्तर प्रश्नावर अवलंबून नाही, तर गुरुमार्गाची अवहेलना आपण करीत असतो, म्हणून आपल्याला सुख मिळत नाही; असे त्याचे उत्तर आहे.

जो कुणी जन्माला येतो, त्याच्या घराण्यात ज्या देवदेवता आहेत, त्यांचा कुलधर्म व कुलाचार, प्रत्येकाने केला पाहिजे. प्रत्येक पिढीत हा कुलधर्म व कुलाचार जर आपण केला, तर दुःख आपल्या वाटयाला येणार नाही. म्हणून आपल्या पूर्वजानी आपली सोय अशी करून ठेवली होती की, ज्या देवदेवता आहेत, त्यांच्याप्रीत्यर्थ प्रत्येक पिढीत, निदान लघुरुद्र व नवचंडिका हवन केले गेले पाहिजे; तरच ह्या देवता सिद्ध होतील. तसेच दानधर्म व 'परोपकार्य' झाले पाहिजे; तरच सुख-शांति-समाधान अक्षय्य राहील.

आज आपल्याला देव नको आहे. दुःख झाल्यावर आपण "देवा" म्हणून हाक मारतो; पण "ओ" ऐकू येत नाही. कारण 'देव मानणे', हा धर्म आपण विसरलो आहोत. म्हणूनच जगतामध्ये आज अशांति

आहे. हा सर्व विचार करून, पुढील पिढयांचे भवितव्य प.पू. साईनाथ महाराजांनी जाणले. मला आज्ञा देऊन, मी करीत असलेले 'कामकाज' बंद केले; व ''जगाला सुख देण्यापेक्षा, सुखाचा मार्ग सांग''; असे सांगितले. त्याप्रमाणे आपण भक्तांचे वंशविमोचन करून व दीक्षा देऊन, आपल्या घराण्यातील पिढयान्पिढया असलेल्या दोषातील कीड धुवून काढली; म्हणून आज आपण येथे उपस्थित आहोत. नाहीतर इतराप्रमाणे आचारविचार ठेवून, आपण देशोधडीला लागलो असतो. मी जे कामकाज बंद केले, ते मला विश्रांती पाहिजे होती म्हणून नसून, आपण भक्तास सुख-शांति-समाधान याचा लाभ होण्यासाठी, जो आशीर्वाद द्यावयाचा, त्याची सिद्धता करण्यासाठी, कामकाज बंद करून, बारा वर्षे मी मार्गदर्शनाप्रमाणे, अव्याहत साधना करीत होतो. ती साधना अमुक ठिकाणीच सिद्ध होईल असे नसून, ह्या सिद्धतेसाठी स्थळ-काळ-वेळ याचा विचार, सूक्ष्मात सूक्ष्म दृष्टीने ठेवून, कार्य सिद्ध करावे लागते. अशी सिद्धता केल्यानंतर, आपल्याला दिलेल्या तीन प्रतिमांचे एकरूपत्व करून देण्यात आले आहे. हे एकरूपत्व म्हणजे प्रत्यक्ष देवाचे आगमन किंवा दर्शन, हे आपल्याला न मागता मिळाले आहे. असे दर्शन घडण्यासाठी, जरी आपण जन्मोजन्मी सेवा केली असती, तरी हे भाग्य कुणालाही लाभले नसते. तेव्हा जो कुलधर्म-कुलाचार दरवर्षी करावयाचा असतो, तो कोणत्याप्रकारे करावा? असा प्रश्न शिल्लक उरत नसून, गुरुआज्ञेप्रमाणे आपण आचारविचार ठेवाल, तेव्हाच हा कुलधर्म-कुलाचार होईल.

प्रत्येक घराण्यात, प्रत्येक पिढीत, निदान एक लघुरुद्र व एक नवचंडिका हवन प्रत्येकाने करावयास हवे. हे विधि करण्यासाठी आपल्यापाशी पैसे नाहीत; असे आपण म्हणत असलो, तरी चैनीसाठी आपल्याजवळ पैसे आहेत; असे पहावयास मिळते. ब्राह्मण-सवाष्ण जी जेवावयास पाहिजे, त्याऐवजी इष्टमित्र बोलावून, त्यांच्यासमवेत आपला आहारविहार बिघडला आहे; याची दक्षता आपण ठेवत नाही. तसेच आपल्या वंशजानी ज्या घराण्यात आपल्याला जन्म दिला, त्यांचे ऋण फेडण्यासाठी तीर्थक्षेत्री जाऊन, दानधर्म करण्यासाठी आपल्यापाशी पैसे नाहीत; ही सबब आपण सांगता; पण दर महिन्याला नाटक-सिनेमा यासाठी आपला किती खर्च होतो? याचा आपण सुज्ञपणे विचार करीत



नाही. ज्या प्रतिमा आपल्याला मिळालेल्या आहेत, त्यांचा कुलधर्म-कुलाचार म्हणून कोणताही उपचार शिल्लक राहिला नसून, प्रतिदिनी ॐकार साधना किंवा श्रीसद्गुरुनामस्मरण किंवा श्रीनवनाथ अनुष्ठान, यापैकी एक जरी आपण केलेत, तर ह्या प्रतिमांची सिद्धता आपल्या अनुभवास येईल. नुसत्या प्रतिमांचा स्वीकार करून, त्यांचा लाभ आपल्याला मिळेल असे नाही. जेव्हा आपण 'लोभ' सोडाल तेव्हा आपल्याला 'लाभ' म्हणजे देवाची 'कृपा' प्रत्ययास येईल.

गुरुमार्गात जे कुणी गुरुमार्गी होतात, त्यांचा योगक्षेम गुरू वाहतात. शास्त्राने शास्त्रमीमांसा, म्हणजे प्रत्येक घराण्यात कुलधर्म-कुलाचार म्हणून लघुरुद्र व नवचंडिका हवन करावे, असे सांगितले असले, तरी श्रीगुरुकृपेने श्रीक्षेत्रनरसोबावाडी येथे महारुद्र स्वाहाकार जो केला गेला; व त्याची 'सांगता' म्हणून जो प्रसाद म्हणजे तीन प्रतिमा आपल्याला प्राप्त झाल्या, यापेक्षा कुलधर्म-कुलाचार म्हणून वेगळा विधि, आपल्याला सांगण्यासाठी शिल्लक राहिलेला नाही. याशिवाय आपण भक्तांचे कर्तव्य काय? हा प्रश्नही श्रीगुरूंनी सोडविला आहे. आपण भक्तानी सहानुभूतीने श्रीसाई स्वाध्याय मंडळाची स्थापना केली आहे. तेव्हा दरवर्षी आपण जो कुलाचार कुलधर्म आपल्या ऐपतीप्रमाणे करता, ती रक्कम श्रीसाई स्वाध्याय मंडळात स्वेच्छेने जमा केल्यास, त्याचा लाभ जगतातील जे दुःखी आहेत, त्याना सहाय्य करण्यासाठी करता येईल. यामुळे या पैशाचा विनियोग, समाजामध्ये इष्ट ते कार्य होण्यासाठी होऊन, त्या कार्यामुळे जो आपणास व आपल्या कुटुंबीयास आशीर्वाद मिळेल; यापेक्षा अधिक पुण्य ते काय? असा सुविचार आपण सुज्ञ भक्तानी करावा; व जे समितीचे कार्य प.पू. जगद्गुरू साईनाथ महाराज यांनी स्थापन केले आहे, त्या कार्याला हातभार लावण्याचे कर्तव्य, आपल्या या आचरणाने, आपल्या हातून पार पडावे; अशी प.पू. बाबांच्या चरणी प्रार्थना.

प्रत्येक कुटुंबाने करावयाचा कुलधर्म-कुलाचार याचे विवेचन मी जरी केले असले, तरी तुम्हा सर्वाना ज्या प्रतिमा पूजनार्थ दिल्या आहेत, - श्री साईशक, कारण, महाकारण व नारायणी - त्या प्रतिमासंबंधी सखोल विवेचन करावयाचे मी मुद्दामच राखले होते. तरी आता श्रीसद्गुरूंच्या या अमोल भेटीचे, सज्ञान होऊन तुम्ही स्वागत करावे; म्हणून मी तत्संबंधी लिहीत आहे.

# ४६. प्रतिमा - श्री साईशक (ज्ञान), कारण (भक्ती), महाकारण (सेवा), नारायणी (जीवनसार्थकता)

कार्यारंभी जे जे भक्त मला भेटण्यासाठी येत असत, त्याना जन्माचे कारण समजत नव्हते, किंबहुना आजही ते सर्वांना माहीत नाही. यामुळे जीवनातील दुःखाची कारणमीमांसा अज्ञात राहिली. केवळ आपण दुःखी आहोत, एवढया सबबीवर ते कार्यार्थ इकडे आले. त्यावेळी जे मार्गदर्शन झाले, त्यात दोन भाग - १) दुःखाचे कारण काय? म्हणजे 'निराकरण' व २) ते दुःख कसे दूर होईल? यासाठी 'निवारण'. ह्या दोन मार्गातून 'सेवा' असा तिसरा मार्ग. ह्या मार्गाने जाण्यासाठी, ज्ञान व भक्ती पाहिजे. नुसता देव आहे, म्हणून त्याला भजणे गैर होय. यासाठी जसे दुःखाचे कारण म्हणून निवारण सांगितले; त्याप्रमाणे जी आपण सेवा म्हणून म्हणतो, तिचा अर्थ काय आहे? हा भक्ताना समजला पाहिजे, ह्यासाठी संमेलने घेतली गेली. 'सेवा' हा शब्द दोन अक्षरी आहे. परंतु अजून त्याचा अर्थ लागला नाही; व लागू नये. अशी सेवा व तिचा अभ्यास, गुरुआज्ञेने मी सतत करीत होतो. त्यात प्रामुख्याने 'ॐकार साधना' व 'गुरुनामस्मरण' हे सिद्ध झाले; व भवितव्यात कुणालाही कष्ट पडणार नाहीत, असा सोपा मार्ग सिद्ध करून, त्याची 'सांगता' एकोणीसशे सत्याऐशी (१९८७) साली, दीपावली म्हणजे वर्षपाडवा किंवा बलिप्रतिपदेला गोवा येथे झाली. या गुरुकार्याचा वृक्ष मोठा आहे; पण त्याचे फल म्हणजे 'सांगता', ही आंब्याप्रमाणे मधुर आहे. फल अधिक मधुर आहे म्हणून कार्य संकुचित नाही. या कार्याची सांगता म्हणजेच प्रतीक, हे चार प्रतिमांच्या रूपात, तुम्हा सर्व भक्तांच्या घरोघरी आज नांदत आहे; यातच सर्व मानवी जीवनाचे सार्थक आहे. या तीन प्रतिमांच्या रूपात ज्ञान (श्रीसांईशक), भक्ती (कारण) व सेवा (महाकारण), प्रत्येक भक्ताच्या हृदयी वास करीत रहावी; म्हणजे त्याची जी जीवनसार्थकता होईल तीच 'नारायणी', म्हणजे चौथी प्रतिमा होय; व त्यावेळी भक्त माध्यमातून 'हेचि ज्ञान देगा देवा तुझा विसर न व्हावा'; असे अमृतबोल घरोघरी ऐकू येतील.



आपल्या पूजनार्थ ज्या देवाच्या प्रतिमा आज आहेत; व ज्यांचे पूजन आपण सर्व भक्त करीत आहात, त्याबद्दलचे मार्गदर्शन तपशीलवार केले; तेव्हा श्री जगद्गुरू साईनाथ महाराज यांची आज्ञा अशी झाली की, "जो कुणी माझा भक्त असेल; त्याने तीन प्रतिमा पूजनार्थ घ्याव्यात; कारण ह्या तीन प्रतिमामध्ये जे सिद्ध केलेले तत्त्व आहे, हे नवनाथादी परंपरेपासून आहे. त्याचा लाभ कसा होईल? तर 'जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव'; असा त्याचा लाभ होणार आहे."

ह्या प्रतिमा आपल्यावर सक्ती करून त्या घ्याव्यात, असे सांगण्यात आलेले नाही; व भवितव्यात सांगणारही नाही. जी गोष्ट ईश्वराच्या कृपेने मला प्राप्त झाली, ती प्राप्ति सर्वांना लाभावी, अशी इच्छा माझी आहे; म्हणून ज्यावेळी दीपावलीला प्रतिमा देण्याचे कार्य सिद्ध झाले, तेव्हाच प्रतिमा आपल्याला देण्यात आल्या. जीवनामध्ये अडीअडचणी कधीही संपणाऱ्या नाहीत. आपले आयुष्य संपले, तरी अडचणी शिल्लक राहतात. त्या राहू नयेत, म्हणून देवाधर्माला आपण शरण जातो; पण त्यापेक्षा नित्याची प्रार्थना व ह्या प्रतिमांचे पूजन महत्त्वाचे आहे. सोने हे पिवळे आहे, म्हणून आपण मौल्यवान मानतो; पण त्यापेक्षा ज्या कुटुंबात ह्या प्रतिमा आहेत, ते कुटुंब जगापेक्षा अधिक सुशोभित होईल; असा माझा आत्मविश्वास आहे. म्हणून -

॥ ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे<br>
त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे ।<br>
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी<br>
तेथे तुझे सद्गुरू पाय दोन्ही ॥

असा प्रतिसाद आपल्याला मिळेल.

आता आपण भक्ताना, ज्या तीन प्रतिमा देण्यात आलेल्या आहेत, त्या प्रतिमा म्हणजे काय? त्यांच्यामागे परंपरा काय आहे? त्या सोने-चांदीच्या का केल्या? आपल्या प्रत्येकाकडे पूजनात देवदेवतांच्या मूर्ति व टाक असूनसुद्धा, ह्या प्रतिमा पूजनासाठी का दिल्या गेल्या? याचा आस्थापूर्वक विचार करणे आवश्यक आहे.

कार्यारंभी मी जेव्हा भारताचा प्रवास केला, अनेक तीर्थक्षेत्रे व देवळे पाहिली, त्याचप्रमाणे अनेक भक्तांच्या घरातील देवदेवतांच्या मूर्ति व प्रतिमा पाहिल्या, त्यावेळी असे अनुभवास आले की, ह्या देवदेवतांच्या प्रतीकामध्ये देवत्व शिल्लक राहिलेले नाही. आज देवतार्जन म्हणून जो काही पूजाविधि होतो, तो केवळ रूढीपरंपरेप्रमाणे केलेले अनुकरण; व औपचार म्हणूनच होत असल्याने, त्या देवतार्जनातून जे सुख-शांति-समाधान प्राप्त झाले पाहिजे, ते प्राप्त होत नाही. त्यामुळे प्रत्येकजण आज काही ना काही दुःखाने, पीडित व गांजलेला आहे. अशी परिस्थिती अनुभवास आल्यानंतर, मी प. पू. बाबांकडे अशी विचारणा केली की, "ह्या दुःखी लोकाना काही एक निश्चित मार्ग व सेवा सांगितली पाहिजे; जेणेकरून ते सुखी होतील, असा प्रसाद आपण द्यावा". प.पू. बाबा म्हणाले, "तुझी त्यांच्या दुःखाबद्दलची तळमळ मला समजते; पण त्यासाठी योग्य वेळ आली की, तुला काय करावयाचे? ते सांगेन. तोपर्यंत तुला सांगितलेल्या मार्गाने, त्यांच्या अडीअडचणीबद्दल मार्गदर्शन कर." त्याप्रमाणे मी आज छत्तीस वर्षे कार्य करीत आलो.

प.पू. बाबांच्या आज्ञेप्रमाणे, आपण भक्ताना प्रथमतः ज्या तीन प्रतिमा दिल्या गेल्या, त्यापैकी पहिली प्रतिमा 'श्री साईशक', दुसरी प्रतिमा 'कारण' व तिसरी प्रतिमा 'महाकारण' होय.

**श्रीसाईशक प्रतिमा :**

ही प्रतिमा घेण्यापूर्वी, आपल्याला पाच दीक्षा, म्हणजे क्रमशः उपासना दीक्षा, नामस्मरण दीक्षा, अनुग्रह दीक्षा, गुरुदीक्षा व कारणदीक्षा ह्या देऊन, आपल्याकरवी श्रीसद्गुरुनामस्मरण करून घेतले गेले; व त्याप्रमाणे आपण करीत आहात. हे नामस्मरण मी जीवनारंभापासून आजपर्यंत केले असल्याने, ते नामस्मरण आज सिद्ध आहे. त्या नामस्मरणाची सिद्धता, आपल्याला व आपल्या भावी पिढयाना हितकारक व्हावी, म्हणून त्या नामस्मरणाचे प्रतीक म्हणून श्रीसाईशक प्रतिमा आहे. ह्या व्यतिरिक्त या प्रतिमेचा लाभ असा आहे की, आपल्या कुटुंबामध्ये गेल्या सात पिढीत, ज्या कोणी व्यक्तीनी 'गुरू' केला नसेल, किंवा नामस्मरणाचा उच्चार केला गेला नसेल, तर गतकालामध्ये ह्या ज्या व्यक्तीनी सद्गुरुतत्त्वाचा



लाभ घेतला नाही; अशानाही ह्या प्रतिमेमुळे पुण्याचा लाभ मिळणार आहे. याशिवाय भवितव्यात, भावी पिढयांचीही तरतूद, ह्या प्रतिमेमध्ये केलेली आहे. भावी कालामध्ये योग्य तो गुरू व त्यांचे मार्गदर्शन मिळणार नाही; म्हणून तीही तरतूद ह्या प्रतिमेमध्ये केलेली असून, भावी पिढयाना फक्त सद्गुरुनामस्मरण म्हणजे ॥ ॐ श्रीसाईनाथाय नमः॥ म्हटल्यावर, इष्ट ते सुख-शांति-समाधान, सहजगत्या प्राप्त होणार आहे. इतका सुलभ मार्ग आपणा सर्वासाठी श्रीसद्गुरुकृपेने सिद्ध केला आहे.

**कारण प्रतिमा :-**

ह्या प्रतिमेचा संबंध घराण्यातील दिवंगत व्यक्तींशी आहे. जे कोणी गेल्या सात पिढयामध्ये धर्माचरण करू शकले नाहीत; किंवा ज्ञानअज्ञानाने ज्यांच्या हातून पातक-प्रमाद घडले आहेत; व त्यामुळे ह्या दिवंगत व्यक्तींच्या इच्छावासना शिल्लक राहून, आपल्याला जो त्रास होत आहे की, ज्यामध्ये विद्यानाश, संपत्तिनाश व संततिनाश असे प्रामुख्याने तीन दोष कुटुंबात शिल्लक राहिलेले असतात; अशा दोषांचे परिमार्जन केल्याशिवाय, भावी पिढयाना विद्या-संपत्ति-संतति यांचा लाभ होणार नाही. यासाठी प.पू. बाबांच्या आशीर्वादाने, जे काही विधि केले गेले, त्यामध्ये प्रामुख्याने वंशविमोचन, कर्मविमोचन व ऋणमोचन हे करण्यासाठी, श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथे अकरा पौर्णिमेला होमहवनादी विधि करण्यात आले; व मागाहून त्या विधींची सांगता म्हणून, 'महारुद्र स्वाहाकार' करण्यात आला. हा विधि सामान्य माणसाला करता येत नाही. त्या विधीसाठी साधारण अडीच लाख रुपये खर्च केले आहेत; तेव्हा पुन्हा तो विधि होणे शक्य नाही. ह्या विधीसाठी जी शक्ति म्हणजे रुद्रशक्ति, हिला आवाहन केले होते; व तिची मनोभावनेने सेवा करून, त्या शक्तीची धारणा भावी पिढयासाठी आशीर्वाद म्हणून रहावी, म्हणून 'साईधाम' मध्ये शक्तिपीठाची स्थापना, प.पू. बाबांच्या मार्गदर्शनाप्रमाणे केली आहे. म्हणजेच भावी पिढयांची तरतूद, तुम्ही न मागता, प.पू. साईनाथ महाराज यांनी केलेली आहे; की ज्यामुळे जो कोणी जीवनात दुःखी आहे, तो इथे आल्यानंतर निश्चित सुखी होईल, असा माझा आत्मविश्वास आहे.

**महाकारण प्रतिमा :-**

ह्या प्रतिमेमध्ये दोन शब्द आहेत; 'महान' व 'कारण'. महान म्हणजे 'मोठे' असे आपण म्हणतो; पण 'महान असले तरी लहान आहे'; याचा अर्थ कळला पाहिजे. ज्याप्रमाणे वडाचे झाड मोठे, महान व भव्य असते; पण त्याचे बीज अतिसूक्ष्म व लहान असते. ते जर मनोभावनेने पेरले, तर त्या बीजाचा कल्पवृक्ष निर्माण होतो; जेणेकरून तमाम वाटसरूना, त्याच्या छायेमध्ये सुखाचे क्षण अनुभविता येतात.

त्याप्रमाणे आपण जे नामस्मरण नित्य करतो; ते जरी लहान असले तरी ते महान आहे. तेव्हा आपली दृष्टि लयास जाऊन, त्या नामस्मरणामध्ये काय आहे? हे विचारण्यापेक्षा, स्वत:लाच प्रश्न विचारावा की, "त्यात काय नाही?" मग याचे उत्तर तुम्ही स्वत:च देऊ शकाल. असे हे बीज पेरण्यासाठी महाकारण प्रतिमा आहे; की ज्यायोगे वंशपरंपरेने भावी पिढया सुखात नांदतील; असा आशीर्वाद प.पू. बाबांनी दिला आहे. ज्याप्रमाणे घर बांधावयाचे झाल्यास जागा लागते; किंवा काही गोष्ट करावयाची झाल्यास स्थळ, काळ व वेळ पहावी लागते; त्याप्रमाणे आपण जे नामस्मरण करीत आहोत, ते सुरक्षित राहून, त्याचा लाभ भावी पिढयाना व्हावा, म्हणून ही प्रतिमा आहे. आज नित्याने जी सेवा आपण कराल, तिचा अंतर्भाव ह्या प्रतिमेमध्ये होऊन, कालांतराने ही प्रतिमा तुमच्या भावी पिढयांशी बोलू लागेल.

अशा तीन प्रतिमा आपणा सर्वांना मिळाव्यात, म्हणून गेली तीस वर्षे माझे प्रयत्न चालू होते. त्या प्रयत्नाना यशस्वीरित्या यश येऊन, आज हा प्रतिमारूपी प्रसाद, भक्तभाविकांच्या घरोघरी पोहोचला आहे. "यापेक्षा आनंद काय आहे?" असा प्रश्न मी स्वत:ला विचारतो.

प्रतिमांचा विषय हा अतिगहन असून, त्यांचे कार्य त्यापेक्षाही गहन आहे. कारण अनेक शतकात हा विषय कुणीही अभ्यासासाठी घेतला नाही. आजपर्यंत जे कोणी ह्या मार्गात आले, त्यानी येणाऱ्या भक्तांचे



भविष्य सांगणे, एवढेच कार्य केले आहे; त्यामुळे कुणीही भक्त अडचणीत आला की, ह्या मार्गाकडे त्या दिशेने पहात असतो; त्यामुळे 'आपण जन्माला का आलो? व आपले कर्तव्य काय?' हा प्रश्न कुणीही विचारात घेत नाही. एखाद्या साधकाला 'दिव्य दृष्टि' प्राप्त झाली आहे; म्हणजे काय? तर आलेल्या भक्ताच्या भविष्याचे कथन करणे किंवा अद्‌भूत सांगणे, म्हणजे 'दिव्य दृष्टि' का? हा प्रश्न फार मोठा आहे; व यामुळे समाज सज्ञान होण्यापेक्षा, जास्त अज्ञानी होत चालला आहे. त्यामुळे वर्तमानपत्रात अमुक एकाचे नाव आले की, "ती व्यक्ति असामान्य झाली आहे;" असे म्हणावे लागते. विज्ञानयुगामध्ये आपण सज्ञान होण्याऐवजी, अधिक अज्ञानी झालो आहोत; याचे कारण मूळ विषय ह्या 'पुराण' आहे; असे म्हणणारा वर्ग समाजात वावरत आहे. पण त्याना ज्ञान आहे का? हा प्रश्न आहे. जगतात अनंत विषय आहेत. त्यांचा शोध लागणे हे अशक्य आहे. एखाद्याने एक विषय अभ्यासासाठी घेतला; व तो त्या विषयात पारंगत झाला, तर त्या विषयात इतर विषय शोधणे, हे गैर आहे. त्यामुळे सध्या 'अंधश्रद्धा' हा विषय, सर्वतोपरी विचारात आहे. ह्या विषयाचे मूळ कोठे आहे? त्याचा शोध लागत नाही. याउलट जे लोक 'अंधश्रद्धेचा' पाठपुरावा करतात, त्यांचीच श्रद्धा आंधळी आहे; असे म्हणावे लागते. म्हणून 'खरे आणि खोटे', असा वाद चालू आहे. एका रुपयाच्या दोन्ही बाजू आहेत, न पेक्षा रुपया खोटा आहे, असे म्हणावे लागेल; व ह्या जगात तसे म्हणणे हा गुन्हा आहे. तेव्हा ज्याच्या वाटणीला जी बाजू येईल ती खरी आहे, असे म्हणून गप्प बसले पाहिजे. एखाद्याची श्रद्धा आहे, ती खोटी आहे; असे म्हणता येत नाही. 'अश्रद्धा व श्रद्धा', हे विषय प्रत्येकाने अनुभविल्याशिवाय, त्याचे उत्तर चूक की बरोबर हे ठरविता येत नाही. ह्या जगात जे लोक सज्ञानी आहेत असे भासते, ते खरे अज्ञानी आहेत; व जे लोक 'अज्ञानी' आहेत, त्याना 'सज्ञानी' असे म्हणावे लागेल. कारण बहुश: लोक पुस्तकी ज्ञानी आहेत; त्याना पुस्तकाचे ज्ञान, म्हणजे चैनीने जगणे; असा अर्थ समजला आहे. परमेश्वराने हे जीवन आपल्याला का दिले आहे? हा मुख्य प्रश्न बाजूला ठेवून, आपण जगतो आहोत.

आपण भक्ताना ज्या प्रतिमा दिल्या आहेत, त्यांचे कार्य आपल्या

स्वत:वर अवलंबून आहे. ज्या भक्तानी तिन्ही प्रतिमा घेतल्या आहेत, त्या प्रतिमामध्ये ईश्वर किंवा परमेश्वर, हा सगुण आहे की निर्गुण आहे हे ठरविणे चुकीचे आहे. जो कोणी 'परमेश्वर' आहे, त्याचा अनुभव घेतल्याशिवाय, तो नश्वर आहे की, ईश्वर आहे? हे समजणार नाही. तेव्हा "तीन प्रतिमा मिळाल्या आहेत, म्हणजे सर्वस्वाने आपण सुखी होणार आहोत;" असे भविष्य भवितव्यात वदविणे, योग्य होणार नाही. प.पू. जगद्गुरू साईनाथमहाराज यांनी जो कृपाशीर्वाद दिला आहे, त्या आशीर्वादात, 'जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव', ह्याप्रमाणे घडणार आहे; व ही जबाबदारी साधकाची नसून, भक्तांची आहे; हे भक्ताने विसरता कामा नये. जेव्हा भक्त अनन्यभावाने प्रतिमांचे पूजन व त्याबरोबर आपला आचारविचार करेल, त्याप्रमाणे त्याचे फल आपणास मिळेल. ह्याव्यतिरिक्त ह्या प्रतिमांचे महात्म्य एवढे आहे की, जे देव आपण पूजनासाठी मांडतो, त्या देवामध्ये, तीन तत्त्वापैकी एकही तत्त्व सध्या शिल्लक राहिले नाही; मग देव आपल्या इच्छा कधी व कशा पूर्ण करेल? हे तुम्हाला व तुमच्या देवालाच माहीत! याकरिता प.पू. बाबांनी तीन तत्त्वांची सांगोपांग ओळख करून दिली आहे. एवढेच नव्हे, तर जे तत्त्व निर्गुण निराकार होते, ते तत्त्व सगुण साकार करून, आपल्याला कृपाशीर्वाद म्हणून दिलेले आहे. ह्या प्रतिमामध्ये उत्पत्ति, स्थिती व लय म्हणजे त्रिगुण तत्त्व आपल्याला मिळाले आहे. त्या प्रतिमांचे कार्य आपल्याला समजावे, म्हणून 'नारायणी', अशी चौथी प्रतिमा 'अधिक' महिन्यामध्ये (पुरुषोत्तम मास) सिध्द केली. कारण 'अधिक' महिन्याचे महात्म्य अधिक आहे; हे आपल्याला समजत नाही. 'अधिक मास' हा दर तीन वर्षानंतर येतो. असे बारा 'अधिक' महिने म्हणजे छत्तीस वर्षे झाल्यानंतर, ही 'नारायणी अवस्था' उदयास आली; व 'श्रीशक्तिपीठ' हे छत्तीस वर्षानंतर सिध्द झाले. अशा दोन प्रतिमा आपणास मिळाल्या आहेत. त्यांचा उदय आपल्या भावी पिढयात होणार आहे. यासाठी श्रध्दा व सबुरी आपण भक्तानी ठेवली पाहिजे. अनेक भक्ताना असे वाटते की, आपल्यापाशी तीन प्रतिमा पूजनात ठेवल्या आहेत; म्हणजे आपला योगक्षेम, त्या प्रतिमा वाहतील. परंतु असे नाही. तो एक कृपाशीर्वाद आहे. त्या कृपाशीर्वादाने, आपल्याला जे कर्म दुःख



म्हणून भासते, त्या दुःखाचे परिमार्जन व्हावे, म्हणून आपणाला त्या प्रतिमा दिल्या आहेत.

जो कुणी जन्माला येतो तो निर्दोष जन्माला येत नाही. तेव्हा आपले दोष आपणच निवारण करण्यास शिकले पाहिजे. कारण पुढच्या काळात 'गुरू' हे तुम्हाला भेटणार नाहीत. गुरुअवस्था समाजामध्ये निर्माण करण्यासाठी, त्या व्यक्तीला आपले जीवन देवास वहावे लागते. परंतु आजकाल जे कुणी 'गुरू' म्हणून समाजात वावरत आहेत, ते 'खाबुनंदन' आहेत; व पुढच्या काळात, ते ह्याहीपेक्षा अधिक प्रबल होतील. तर हा धोका भवितव्यामध्ये, तुमच्या कुटुंबीयानी सांभाळला पाहिजे.

आपणा सर्वास ज्या चार प्रतिमा दिल्या आहेत, त्या म्हणजे; १) श्रीसाईशक, २) कारण, ३) महाकारण, ४) नारायणी. जोपर्यंत आपला वंश ह्या जगतात जन्माला येतो आहे, तोपर्यंत ह्या प्रतिमा तुम्हा भक्ताना प्रसाद देतील. ह्या प्रसादामध्ये ऐहिक व पारमार्थिक, अशा दोन्ही सुखांचा ठेवा, श्रीसद्गुरूंनी ठेव म्हणून ठेवला आहे. तेव्हा परमेश्वरापाशी मागण्यासारखे काही शिल्लक राहिले नाही. जसे आपल्याला डोळे हे देवाकडे मागितल्यानंतर मिळत नाहीत; त्याकरिता डोळे असून डोळसपणे वागलो नाही, तर दुःखाला कारण आपणच आहोत, हे विसरता कामा नये. आपण सर्व भक्ताना चार प्रतिमा मिळाल्या आहेत; त्यांचे कार्य जीवनात कार्यान्वित होण्यासाठी, जो महामंत्र पुढे लिहीला आहे तो आपण पूजनादी विधि केल्यानंतर, एकवीस वेळा, प्रतिदिनी घरातील प्रत्येक व्यक्तीने म्हणावयाचा आहे. जे सद्गुरुनामस्मरण आपण करीत आहात, ते आपला विकास व्हावा म्हणून आहे; व जो महामंत्र दिला आहे तो जीवन व्यर्थ जाऊ नये, तर जीवनाचा इतराना उपयोग व्हावा, म्हणून दिला आहे.

**महामंत्र :-**

॥ सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणी नमोऽस्तुते ॥

कार्यारंभी जेव्हा मी सेवेसाठी, अडीच वर्षे श्रीऔदुंबर क्षेत्री राहिलो

होतो, तेव्हा नित्यनियमाने, तेथेच नदीपलीकडे असलेल्या श्रीभुवनेश्वरीच्या देवळात सूर्यास्तापूर्वी जात असे; व तेथे श्रीदेवी महात्म्याचे पठण करून, ह्या महामंत्राचे अनुष्ठान करीत असे. अशी सेवा रोज अव्याहत चालू होती; व आजही करीत आहे. भक्ताला महामंत्र पठण करण्यास सांगण्यापूर्वी, त्या मंत्राची सिद्धता करणे आवश्यक असते. वास्तविक तुम्हाला या प्रतिमा दिल्या, त्याआधीही मी स्वत: या महामंत्राचे पठण करीत होतोच; परंतु तुम्हाला त्यावेळी हा महामंत्र म्हणण्यास सांगण्याची अनुज्ञा मला नव्हती. कारण उच्चारलेल्या शब्दातून, जी शक्तीची वलये तयार होतात, ती वलये धारण करून घेण्यास, माध्यमाची आवश्यकता असते. नाहीतर ज्या वाणीद्वारा ही शक्ति उच्चारित होते, त्या वाणीवरच शक्तीचा आघात होण्याचा संभव असतो. म्हणून प्रथमत: श्रीनारायणी प्रतिमा तयार केल्या; व त्या सिद्ध झाल्यानंतरच, श्रीगुरुकृपेने पावन झालेल्या ह्या महामंत्राचा समावेश, नित्य साधनेत केला गेला.

सध्या जे जग आहे ते 'यंत्रयुगाचे' आहे; व एखादे यंत्र तयार करणे, म्हणजे किती अवघड असते, हे आपल्याला माहीत आहे. आपल्याला दिलेल्या प्रतिमा हेही यंत्र आहे; पण त्यामागे 'मंत्र' आहे. तरीही यंत्राचे साहित्य आहे, म्हणून जसे यंत्र होत नाही; तसा मंत्र आहे, म्हणून प्रतिमा तयार करता येत नाहीत. बाजारात शेकडो यंत्रे तयार मिळतात. पण त्यामागे शक्तीचे कार्य नसल्याने, अशा यंत्राचा उपयोग, जीवनात होत नाही. तेव्हा प्रथमत: मंत्र सिद्ध करावा लागतो; व मग यंत्र किंवा प्रतिमा तयार होतात; म्हणून आपल्याला ज्या प्रतिमा मिळाल्या आहेत, त्यामागे गुरुशक्ति आहे, हे विसरता कामा नये.

तुम्हाला जी चौथी प्रतिमा दिली गेली, तिचे नाव 'श्रीनारायणी प्रतिमा', असे आहे. जो कुणी जन्माला येतो, त्याचे जीवन 'नरा'प्रमाणे असते. पण केवळ खाणेपिणे, असे जीवन व्यर्थ न घालविता, त्या जीवनात 'नारायण' निर्माण झाला पाहिजे. अशी अवस्था फक्त श्रीगुरू निर्माण करू शकतात. पण हा योग सर्वांना लाभत नाही. म्हणून आपल्या कुटुंबात ह्या प्रतिमांची जरुरी आहे.

पूर्वी आपल्या देवात ज्या मूर्ति होत्या, ते देवाचे प्रतीक होते. असे



देवत्व सगुण व आकाररूप असून, त्या प्रतिमाना वेगवेगळ्या मंत्रानी सिद्ध करावे लागत होते; पण आपल्याला ज्या प्रतिमा मिळालेल्या आहेत, त्या निर्गुण आहेत. त्यामुळे कोणताही मंत्र म्हटला तरी चालेल; अशा ह्या प्रतिमा आहेत. त्याना अमुक एक धर्म किंवा कर्म पाहिजे असे नाही. जो कोणी ह्या जगात जन्माला येतो; व ज्याला उच्चार करता येतो, त्याला कोणत्याही मंत्रोच्चाराने, पाहिजे ते फळ मिळेल; असा सोपा मार्ग प.पू. जगद्‌गुरू साईनाथमहाराजानी दाखविला आहे.

वास्तविक पाहता ह्या प्रतिमा, 'वं. दादांनी दिल्या आहेत', म्हणून त्याचा स्वीकार आपण भक्तानी केला. याव्यतिरिक्त त्यांचा अर्थ आपल्याला समजला नाही. आपल्याला चार प्रतिमा दिल्या आहेत, त्या कशासाठी? आपल्याजवळ पैसे आहेत; व त्या घेण्याची ऐपत आहे, म्हणून आपण त्या घेतल्या आहेत का? तर, महत्त्वाचा विषय आपण समजून घ्या; तरच भवितव्यात त्याचा लाभ आपल्या कुटुंबीयाना होईल. तुम्हा भक्तांच्या घराण्यातील जे देव आहेत, व ज्यांची आपण पूजाअर्चा करतो; असे देव हे पितळेचे किंवा तांब्याचे आहेत; त्याचे तत्त्व म्हणजे काय? हे समजून घेतले पाहिजे. केवळ देवामध्ये पूजनासाठी मांडले आहेत, म्हणून त्याना 'देव' म्हणून संबोधणे, हे अज्ञान आहे; व त्यामागे अंधश्रद्धा आहे. यासाठी सर्व भक्ताना विनंती अशी की, ज्या प्रतिमा आपल्याला दिल्या आहेत, व त्यामागे जो विषय आहे, तो जर समजला नाही तर हा विषय हे 'विष' आहे.

अनादीकालापासून, 'देवाचे प्रतीक' म्हणजे 'प्रतिमा', असे आपण समजत आलो. परंतु त्याचप्रमाणे आपल्याला या प्रतिमा दिल्या आहेत असे नाही. तर प्रथम 'देवाचे प्रतीक' म्हणजे काय? हे समजले पाहिजे. विश्वाची धारणा तीन तत्त्वामध्ये झाली आहे. ती तत्त्वे म्हणजे उत्पत्ति, स्थिती व लय. त्यामध्ये जरी स्थिती ही अस्तित्वात असते, तरी त्यामध्ये स्थित्यंतर करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, आपल्या घराण्यात एखादे बालक जन्माला येते. त्या बालकावर जर संस्कार झाला नाही, तर त्या बालकाला बोलता-चालता येत नाही; तसेच त्याच्याशी आपण जो विषय बोलतो, तो जर त्याला समजला नाही, तर ते बालक जन्माला

येऊन किंवा जन्म घेऊनसुद्धा, निरुपयोगी होते. हा संस्कार जो आपण करतो, ती अवस्था बालकाचे 'स्थित्यंतर' असे होय. नुसते बालक आहे, म्हणून आपल्या घरी जर त्याला सांभाळले, तर ते बालक 'हाडामांसाचा गोळा', म्हणून आपले जीवन व्यर्थ खर्च करील. ही जशी स्थित्यंतर होण्याची अवस्था त्या बालकाची आहे, त्याप्रमाणे आपल्या जीवनात तीन गुण आहेत. त्या गुणांचा विकास झाला पाहिजे. म्हणजे असे की, 'उत्पत्ति अवस्था' ही जी स्थिती आहे, त्यामध्ये संस्कार झाल्यानंतर, स्थित्यंतर होते. म्हणजे 'स्थिती अवस्था', ही आपण प्राप्त करून घेतो. त्या अवस्थेप्रत पुन्हा संस्कार केल्यानंतर, तिसरी अवस्था म्हणजे 'लय अवस्था', प्राप्त होते. याप्रमाणे प्रत्येक अवस्थेमध्ये स्थित्यंतर करणे अत्यावश्यक आहे. हे जे संस्कार आपण आपल्या देहावर, म्हणजे जीवनावर करून घेतो, त्यामुळे जी जी स्थित्यंतरे आपल्याला पहावयास व अनुभविण्यास येतात, त्या संस्कारामुळे आपण या जगात राहून, सुखाची पाऊलवाट अनुभवितो. हा संस्कार होताना, पूज्य भावना असल्याशिवाय, स्थितीचे स्थित्यंतर अनुभवास येणार नाही. उदाहरणार्थ, आपल्या जीवनामध्ये जे बालक असते, त्या बालकाबद्दल मोह व माया आहे; म्हणून आपण त्या बालकाला सज्ञान करू शकतो. असे बालक भवितव्यामध्ये, आपल्या कुटुंबाचा आधार बनते. त्याचप्रमाणे आपल्याला ज्या प्रतिमा दिल्या आहेत, त्या देवाचे प्रतीक म्हणून नव्हे; तर आपल्याठायी देवाबद्दल श्रीगुरूंनी जो भाव निर्माण केला आहे, त्या भावनेला जो प्रतिसाद मिळतो, त्या प्रसादास 'प्रतिमा' असे म्हटले आहे.

आपल्याकडील तीन प्रतिमामध्ये सृष्टीचे गुणधर्म आहेत. म्हणून जशी सृष्टि आपल्याला दिसते, तसे आपले आचार, विचार व उच्चार हे इतराना अनुभवास यावयास पाहिजेत. जगामध्ये जो कोणी जन्माला येतो, त्या व्यक्तींचे भिन्नाभिन्न गुण म्हणजे आचार, विचार व उच्चार हे समपातळीवर नसल्याने, कुटुंबात म्हणजे जगात, अशांतता सदैव आहे. अनेक वर्षापासून आपण देवधर्म व पुण्यसंचय जरी केला आहे; तरी त्या आचारामध्ये 'देव' नसून, दुसऱ्याबद्दल 'द्वेष' दिसून येतो. त्यामध्ये जरी आपण स्वतःला 'देवाचे भक्त' असे म्हणतो, तरी मनामध्ये 'हेवा' हा असतोच. या सर्व कारणास आपणच कारणीभूत आहोत. कारण



गुरुमार्ग हा केवळ जीवनातील अडीअडचणी निवारण करण्यासाठी नाही; तर गुरुमार्गामध्ये जीवनाची शिकवण शिकायला मिळावी; म्हणून तो आहे, हे आपण विसरतो. गुरुअंकित झाल्यानंतर, जो जीवनाचा आराखडा आपले गुरू सांगतात, त्याप्रमाणे आपले जीवन व्यतीत व्हायला पाहिजे. वास्तविक, जीवनात ज्या अडीअडचणी निर्माण होतात, ती अडचण नसून, जन्माला आपण का आलो आहोत? हे आपल्याला समजावे; व त्याप्रमाणे आपला आचार-विचार व्यतीत व्हावा, अशी इच्छा ईश्वराची असते. पण त्याउलट आपला विचार अन्य दिशेने जात असल्याने, आपण सर्वजण दुःखी म्हणजे अज्ञानी आहोत; असे म्हणावे लागेल. या सर्व विचारांचा सांगोपांग विचार करून, 'हे जग कसे सुखी करता येईल?' असा प्रश्न माझ्यासमोर कार्यारंभी होता; व आजही आहे. त्यासाठी, निश्चित एक गुरू केल्याशिवाय, ही सुखाची दिशा प्राप्त होत नाही.

जे आज आपले जीवन आहे, त्यात काय अधिक आहे व काय कमी आहे असा विचार चुकूनही कुणी करीत नाही. जन्माला येऊन, दोन टोके एकत्र करून, "आपण का सुखी नाही?" असा प्रश्न आपण इतराना विचारीत असतो. अनादीकालापासून धर्म-रूढी-परंपरा आणि योग्य ते संस्कार, यांचा विचार व आचरण आपण सदैव करीत असतो. ही स्थिती आजची नव्हे. त्यामध्ये स्थित्यंतर केल्याशिवाय आपल्याला जगता येणार नाही, असा सुविचार, कुणीही मनुष्य कदापीहि करीत नाही. पिढयान्‌पिढया तेच तेच करणे म्हणजे धर्माचरण; हे एक टोक; व दुसरे टोक म्हणजे देवाला, धर्माला न मानणारा एक वर्ग आज समाजात प्रचलित आहे की, ज्या व्यक्तींना 'सोयर-सुतक' याचा अर्थही न समजता फक्त सुख पाहिजे; असा वर्ग आपल्या सभोवार वावरत आहे. भवितव्यामध्ये ही पिढी समाजाची शत्रू होणार आहे; हे आपण विसरलो आहोत. यासाठी प.पू. जगद्‌गुरू श्रीसाईनाथमहाराज यांच्या आज्ञेप्रमाणे, ह्या जगाचा जीवन जगण्याचा मूळ धर्म बदलला पाहिजे; असा विचार मी केला. तसेच या जगाला जगण्याचा मार्ग दाखविला पाहिजे; अशी शिकवण श्रीसद्‌गुरूंनी दिली आहे; असे असताना, काहीतरी जगात कार्य निर्माण केल्याशिवाय, हे जग एकाच मार्गाने जाणार नाही, म्हणून

'श्रीसाई अध्यात्मिक समिती' हिची स्थापना, तीस वर्षापूर्वी करण्यात आली; व त्यापरत्वे मानवी जीवनाचा कार्यारंभ सुरू केला. जो कोणी जन्माला येतो, त्याच्या जन्माचे काही 'कारण', हे निश्चित असले पाहिजे. कुणीही कारणाशिवाय इहलोकामध्ये जन्माला येत नाही; व जात नाही. असे 'कारण' सर्वांना विदीत व्हावे, म्हणून 'निराकरण'. ज्यामध्ये कारण आहे, त्याचे निरसन व्हावे; म्हणजे निराकरण. हे निराकरण जेव्हा आपल्या जीवनात आचार, विचार व उच्चार यामध्ये व्यतीत होईल, तेव्हा जीवनामध्ये जे कारण आहे ते समूळ नष्ट होऊन, जो आपला आचार व विचार देवाप्रीत्यर्थ केलेला असतो, तो आचार, 'प्रतिमा' म्हणून आपल्यासमोर उभा राहतो. यासाठी जी प्रतिमा आपल्याला दिली आहे ती 'कारण प्रतिमा' आहे. त्याचे प्रतीक आपण गुरुहस्ते घेतले आहे. जन्माचे कारण व गुरूंचा कृपाशीर्वाद, अशा दोन्ही अंगानी ही प्रतिमा सिद्ध आहे. 'कारण प्रतिमेमध्ये' अनंत विषय असून, 'कारण प्रतिमा' हाच प्रामुख्याने महत्त्वाचा विषय आहे, हे कुणाच्याही लक्षात येत नाही. प्रधान प्रतिमा ही 'कारण' प्रतिमा होय. आपणास दोन हात व तिसरे मस्तक, यापैकी एक जर काही नसेल, तर जसे आपले जीवन व्यर्थ होते; त्याप्रमाणे कारण, श्रीसाईशक व महाकारण प्रतिमा या घेतल्या नाहीत, तर जीवन हे व्यर्थ आहे. याचे कारण, या तीन प्रतिमामध्ये विश्वाचा जो धर्म आहे तो सामावलेला आहे. उत्पत्ति, स्थिती व लय ही तत्त्वे एकरूप झाल्यानंतर, विश्वाचे कार्यकारणभाव निर्माण होतात. त्याप्रमाणे या तीन प्रतिमा किंवा उत्पत्ति, स्थिती व लय, ह्या त्रिपुटीचे कार्य व कार्यकारणभाव, म्हणजेच 'श्रीनारायणी प्रतिमा' ही होय.



# ४७. कर्मयज्ञ - धर्मयज्ञ - मानवता

पूर्वीच्या काळी देव्हाऱ्यामध्ये जे देव आपण पूजनास मांडीत होतो, त्या प्रतिमामध्ये वरीलपैकी एकच तत्त्व असावयाचे. त्यामुळे इतर दोन तत्त्वे ही गौण असल्यामुळे, जरी आपण वर्षानुवर्षे देवतार्जन केले, तरी त्याचे फल अपेक्षेप्रमाणे मिळत नव्हते व नाही. तेव्हा या तीन प्रतिमा 'श्रीसाईशक,' 'कारण' व 'महाकारण' म्हणजे उत्पत्ति, स्थिती व लय; ही त्रिपुटी झाल्यानंतर, त्या प्रतिमाना देवत्व प्राप्त झाले आहे. त्या देवत्वाला, आपल्या जीवनामध्ये इष्ट कार्य करावयाचे आहे; म्हणून चौथी प्रतिमा, म्हणजे 'श्रीनारायणी' ही होय. तिला जे इष्ट कार्य करावयाचे आहे, त्यासाठी प.पू. श्रीसाईनाथमहाराज यांनी पूर्वीच आशीर्वाद दिला आहे. तो म्हणजे ''जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव.'' हा अनुभव घेण्यासाठी प्रत्येकाने, जो महामंत्र दिला आहे, त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही; कारण हा महामंत्र मी स्वतः औदुंबरक्षेत्री म्हणत होतो; व अजूनही गेली सदतीस वर्षे, मी तो नित्यनियमाने म्हणत आहे. त्या महामंत्रात काय आहे? व काय नाही? ही शंका काढून, काहीही समजणार नाही. प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय, दुःख किंवा सुख हे दुरून अनुभविता येत नाही. साधकाला जी जी साधना श्रीगुरू देत असतात, त्यामागे भक्तांचे कल्याण निश्चित लिहीलेले असते. जरी भक्त अज्ञानी असला, तरी गुरू हे सज्ञानी आहेत; त्यामुळे त्यांचा अधिकार आपल्यावरच नव्हे, तर विश्वावर असतो; म्हणून हे विश्व चाललेले आहे. आज भौतिक विचारामुळे, अध्यात्मिक विचार करण्याची पातळी आपल्यापाशी नाही. जी गोष्ट आपण प्रत्यक्ष पाहतो, त्यावरच विश्वास ठेवणे, असे आजचे जग आहे; त्यामुळे श्रद्धा व सबुरी ही कुणाहीपाशी नाही. जो विश्वास आहे तो फक्त पै-पैशांवर असून, त्यामागे मनुष्य धावत आहे. पण जीवनात हे केवळ मृगजळ असून, त्या पाण्याने जीवनाची तहान भागणारी नाही. हे विश्व कितीही जरी शास्त्राप्रमाणे पुढे गेले, तरी एक वेळ मागे वळून पहावे लागेल. ही पाहण्याची क्रिया जेव्हा आपण करू, तेव्हा 'अध्यात्म' म्हणजे काय? हे कळेल. भौतिक शास्त्राचा आधार घेऊन, ह्या विश्वात 'प्रेरणा' म्हणून काही शक्ति

आहे, याचा मागमूस लागणार नाही. भवितव्यामध्ये असे जग चालले तर, या विश्वाचा ऱ्हास होईल. यासाठी, तसे घडू नये म्हणून, प.पू. श्री साईनाथमहाराजांनी चौथी प्रतिमा 'श्रीनारायणी' म्हणजे 'प्रेरणा' ही निर्माण करून, सर्व भक्ताना दिली आहे. याचा अनुभव आज जरी आपल्याला मिळाला नाही, तरी कालांतराने हा अनुभव सत्य आहे; असे आपल्या अनुभवास येईल.

आज आपण आपल्या स्वत:पुरताच विचार करीत आहोत. परंतु आपल्या घरी जी मुलेबाळे आहेत, त्यांची तरतूद पै-पैशानी केली, तरी ती तरतूद निरंतर अशी ठेव नाही. जर आपण सुज्ञपणे जगाचा म्हणण्यापेक्षा, स्वत:च्या कुटुंबाचा विचार केला, तर जसे सुख आज आपण उपभोगित आहोत, तसा लाभ भवितव्यामध्ये आपल्या मुलाबाळाना मिळाला पाहिजे, ह्या सदिच्छेने, ही 'प्रेरणा' म्हणजे 'श्रीनारायणी', ही सांभाळली पाहिजे; तरच भवितव्यामध्ये सुख-शांति-समाधान हे न मागता, घरच्या घरीच मिळू शकेल. तसेच आपल्या कुटुंबाचा उच्चार, विचार व आचार यांचे अधिष्ठान, 'श्री साई शक प्रतिमा' यामध्ये एकरूप होण्याने, तोच परमेश्वर भवितव्यामध्ये आपल्याला तारणार आहे. यासाठी जी आपली देवाबद्दल, धर्माबद्दल अंधश्रद्धा आहे, ती न ठेवता, स्वत: देवाबद्दल आदरभाव निर्माण करा. तो भाव वाया जाणार नसून, त्या भावाचे मूल्य भावनेत होईल; व हीच भावना विश्वकल्याणास उपयोगी पडेल.

जो कोणी या जगात जन्माला येतो, त्याला देवापाशी काही मागावयाचे नसून, जन्माला येतेवेळी ती संपत्ति, तुम्हाला एकोणीस माध्यमांच्या रूपाने न मागता दिली आहे. ती संपत्ति आपल्याला समजत नाही, म्हणून आपल्यावर आपत्ति ओढवते. वास्तविक जो जन्म आपल्याला प्राप्त झाला आहे, त्यामध्ये परिपूर्णता असल्याशिवाय, देव जन्माला पाठवीत नाही. असे असताना, जी संपत्ति दिली आहे, तिचे ज्ञान करून घेतले पाहिजे. हे ज्ञान शाळेत व विश्वविद्यालयात मिळणारे नाही. जे ज्ञान शाळेत व विश्वविद्यालयात मिळते, त्या ज्ञानाने आपली उपजीविका होते; म्हणजे ते ज्ञान पंचवीस टक्के आहे, असे गृहित धरले पाहिजे.



पंचाहत्तर टक्के ज्ञान हे आपणास नसल्याने, आपला जन्म केवळ अज्ञानाने, व्यर्थ खर्ची पडतो; व शेवटी अंतकाळी आपण काय मिळविले? व काय घालविले? याचा हिशोब लागत नाही. आज जरी जन्म घेतला तरी पुन्हा जन्माला यावयाचे आहे, हे आपण विसरतो. त्यामुळे जरी जन्म प्राप्त झाला असला, तरी पुढच्या जन्माची तरतूद, आपणच केली पाहिजे, हे विचारात न घेता; खाणेपिणे, कपडालत्ता, ऐषाराम यामध्ये जीवन खर्च होते. आज आपल्याला जो जन्म प्राप्त झाला आहे; त्यात जी सुखे आपण उपभोगतो, ते सुख तुमचे नसून, ती पुण्याई वाडवडिलांची आहे; किंवा पूर्वीच्या अनेक जन्मात तुम्ही सत्कृत्य केले असल्याने, आज जो काही जन्म सुखावह आहे, तो त्या सत्कृत्यांचे फल म्हणून आहे. असा कर्माचा खेळ अहर्निश चालू आहे. म्हणून जन्माचे ज्ञान होणे अत्यावश्यक आहे. हे ईश्वराला ज्ञात आहे, म्हणून अवतारी पुरुषांना तो जन्माला पाठवितो; व त्यांचे आगमन भूतलावर होते. ते कार्यार्थ आयुष्य वेचित असतात. त्यात त्यांना आपला मोठेपणा, आदर, नावलौकिक व्हावा; अशी इच्छा कधीही नसते, तर जगाचा कसा उद्धार होईल? जग कधी ज्ञानी होईल? ही तळमळ त्यांना असते. जे आपण दु:ख म्हणून भोगतो, त्याचे कारण 'अज्ञानाचा शाप', म्हणजे 'Curse of Ignorance' आहे. वास्तविक जे समितीचे कार्य चालू आहे, यामध्ये तीन यज्ञ गेली पस्तीस वर्षे चालू आहेत. त्यामध्ये एक 'कर्मयज्ञ', दुसरा 'ज्ञानयज्ञ' व तिसरा 'धर्मयज्ञ' होय. जेव्हा तुम्ही अडीअडचणी घेऊन गुरूंकडे येता; व समितीच्या कार्यकेंद्रावर विडा, सुपारी, नारळ व दक्षिणा ठेवता; त्यावेळीच तुमचे चांगले-वाईट कर्म, हे गुरूंना 'गुरुदक्षिणा' म्हणून नकळत समर्पित करता. आता जे कर्म की, ज्याच्यामुळे आपल्या जीवनामध्ये सुख आहे की दु:ख आहे हे न समजल्यामुळे, ते कर्म गुरूंना समर्पित केल्यावर, ''माझे काय होणार?'' व ''मला सुख लाभेल किंवा नाही?'' हे प्रश्न गौण आहेत. वास्तविक त्या क्षणापासूनच 'ज्ञानयज्ञाला' आरंभ होतो. त्या यज्ञाची पूर्णाहुति केल्याशिवाय, आपल्याला सुख-शांति-समाधान मिळत नाही. पण हे कर्तव्य आपण विसरत आहोत. म्हणून श्रीपंतांनी एका पदात म्हटले आहे, ''क्षणोक्षणी विसरतो तुजला परि राखिसी निशीदिनी मजला.''

असे वचन दिल्यानंतर, 'धर्मयज्ञ' सुरू होतो. पण ह्या यज्ञाचा मागमूससुद्धा आपल्या आचारविचारात दिसत नाही.

जी कर्मे तुम्ही सद्गुरूंना दिली आहेत, त्या कर्मात काय आहे हे विचारामध्ये घेणे गैर आहे. कारण हे कर्म तुम्ही निरपेक्ष बुद्धीने, गुरूंना गुरुदक्षिणा म्हणून दिले आहे; तेव्हा ह्या कर्माचा विचार करून, 'माझ्या नशीबात काय आहे?' याचा विचार करणे, म्हणजे आपण निःस्वार्थ नसून स्वार्थी आहोत. जगामध्ये जो कोणी स्वार्थ म्हणून मागतो, त्यावेळी त्याचा एक स्वार्थ पूर्णत्वास जाईल; व दुसरा स्वार्थ त्याची भरपाई करील. म्हणजे जे आज दिले ते उद्या निघून गेले; असे जीवन सदैव चालू आहे. 'लक्ष्मी येते व जाते', असा हा खेळ जीवनामध्ये असू नये, यासाठी गुरूंनी कर्मयज्ञामध्ये, तुमचे कर्म तुमच्यापासून नकळत हिरावून घेतले आहे; व त्याच्याऐवजी तुम्हाला तीन प्रतिमा देऊन, कर्माची भरपाई केलेली आहे. फक्त आपले कर्तव्य एवढेच राहिले आहे की, त्या प्रतिमाना श्रद्धा, भक्तीने पूजनास मांडून, काहीएक अपेक्षा न ठेवता, जर त्यांचे पूजन केले, तर अपेक्षित सुख, तुम्हाला न मागता मिळेल. या प्रतिमांचे पूजन केल्यानंतर, तुमच्या ज्ञानअज्ञानाने असे काही मागितले गेले, तर जे कर्म आपण गुरूंना दिलेले असते, त्या कर्माचे आवाहन आपण नकळत करता. त्या कर्माचे आगमन तुमच्या जीवनामध्ये पुनश्च झाले, म्हणजे ते अधिक प्रखर होते. कारण ते नको असलेले कर्म, गुरूंच्या झोळीमध्ये, 'दक्षिणा' म्हणून तुम्हीच दिलेले असते. ह्या कर्मावर आपला काहीएक हक्क नाही; म्हणून ते कर्म आवाहनीत केल्यानंतर, आपले जीवन अधिक दुःखी होते. यासाठी वेळोवेळी जी निवेदने, आपल्याला ज्ञानी करण्यासाठी लिहीली गेली आहेत, ती वारंवार वाचून, त्यांचे मनन करून, आपल्याला काय ज्ञान होते? त्याची दक्षता घ्यावी; तरच जी निवेदने लिहीली गेली आहेत, ती ईश्वराची वचने म्हणजे 'Ten Commandments' आहेत, ह्याची प्रचिती येईल.

आता चौथी प्रतिमा म्हणजे 'नारायणी'; हाही धर्मयज्ञ आहे. म्हणजे 'जे का रंजले गांजले, त्यासि म्हणे जो आपुले'; या वचनाप्रमाणे आपले आचरण व त्याप्रमाणे विचार, आपल्या जीवनामध्ये सदैव वास करीत



राहिला पाहिजे. देवाने किंवा गुरूंनी, तुमची पात्रापात्रता न पाहता, जशा ह्या प्रतिमा तुम्हाला दिल्या आहेत, तशीच आपणही इतरांशी वागणूक ठेवली पाहिजे. ह्या प्रतिमा पूजनात केवळ 'देव' म्हणून ठेवण्यासाठी नाहीत. त्या प्रतिमा आपल्या आचरणामध्ये येऊन, आपले देहिक प्रतिक, याची प्रतिमा बनली पाहिजे. कारण जो अडथळा कर्मामध्ये होता, ते कर्म लयास गेले आहे म्हटल्यानंतर, कर्माची आगंतुक निर्मिती आपण जर करीत बसलो तर आपले जीवन हे 'जीवन' न राहता, ते 'वन' होईल. यासाठी सुज्ञ भक्तानी या तीन यज्ञांचा म्हणजे प्रतिमांचा बोध घ्यावा. यात -

'श्रीसाईशक' प्रतिमा म्हणजे कर्मयज्ञ,<br>
'कारण' प्रतिमा म्हणजे ज्ञानयज्ञ,<br>
'महाकारण' प्रतिमा म्हणजे धर्मयज्ञ,<br>
'नारायणी' प्रतिमा म्हणजे मानवता;

असा अर्थ - परमअर्थ सामावलेला आहे.

वरील चार लक्षणे तुमच्याकडे आहेत; म्हणून "तुम्ही लक्ष दिल्यास लक्षाधीश व्हाल", असे अभिवचन देवाने दिले आहे; ते असे -

दत्तगुरुभजनी मन रंगले।<br>
गुरुभजनी मन पूर्ण रंगले ।।

दत्तचि चालता दत्तचि बोलता।<br>
जेविता खेळिता चित्त दत्तमय झाले ।।१।।

दत्त सर्वकाम जन वन धाम।<br>
दत्त आत्मरामरूपे जगचि भासले ।।२।।

दत्त योगज्ञान दत्त ध्यानमौन।<br>
सर्व दत्तचरणमय स्वयंसिद्ध ठेले ।।३।।

# ४८. श्री सद्‌गुरुकृपाशीर्वादाचे बीज रुजविणारे श्रीसाईनाथ महाराजांचे कार्य

आज आम्हा भक्तभाविकांच्या जीवनात, सुख-शांति-समाधान निर्माण करणारी; व मागील तसेच पुढील अनेक पिढयात श्रीसद्‌गुरुकृपाशीर्वादाचे बीज रुजविणारी, 'श्रीसाई अध्यात्मिक समितीची' स्थापना होऊन जरी छत्तीस वर्षे पूर्ण झालेली असली, तरी ही कार्ययोजना विश्वनियंत्याच्या मनात, विश्वाच्या उत्पत्तीआधीच, निर्गुण निराकार रूपात प्रसवली होती. या निर्गुण निराकार कार्ययोजनेला साकार करण्यासाठी, अनेक अवतारी सत्पुरुषांनी भूतलावर जन्म घेऊन, आपले जीवन कार्यार्थ वेचले. परंतु निश्चित असा सोपा, सुलभ मार्ग सामान्य जनाला दाखविण्याऐवजी; धर्म-शास्त्र, पोथी-पुराण, व्रत-वैकल्ये, यज्ञ-याग इत्यादी अवडंबरे माजवून, परमेश्वरप्राप्तीचा मार्ग अधिक बिकट करून ठेवला.

श्रीसाईनाथांनी श्रद्धा, सबुरी व मानवता, यांची शिकवण समाजाला दिली; व तीच तत्त्वे अंगीकारलेली 'श्रीसाई अध्यात्मिक समिती', उदयाला आली. मानवाच्या अज्ञानामुळे कुटुंबात व समाजात निर्माण झालेले असमाधान, अश्रद्धा दूर करण्यासाठी, समितीचे कार्य कार्यान्वित झाले. देवदेवतांचे कृपाशीर्वाद, अवतारी पुरुषांची पुण्याई व वाडवडिलांचे सत्कर्म, स्वत:च्या जीवनात धारण करण्यास, ज्यावेळी सामान्य मानवाचे सामर्थ्य अपुरे पडले, त्यावेळी हे पूर्वसंचित व मानवी जीवन यांची सुसंगती साधावी, म्हणून श्रीसाईनाथांनी माझ्या माध्यमातून, भक्तजीवनात तीन विमोचने व पाच दीक्षा देऊन, वंशाचे 'गुरुअंशात' स्थित्यंतर केले. तसेच मानवी जीवनाचे ज्ञान होऊन, जीवनातील विसंगती दूर व्हावी, म्हणून वेळोवेळी सेमिनाररूपी ज्ञानयज्ञ घडविले. या ज्ञानयज्ञातून, जीवाचे परमात्मा अवस्थेत स्थित्यंतर होण्यासाठी, जी साधना आवश्यक आहे, त्या साधनेची ओळखही करून दिली.

जीवाला जन्मकारणाचे ज्ञान झाल्यावर, तो जीव, 'जीव' न राहता, 'नर' अवस्थेचा अनुभव अनुभवितो. या अवस्थेत केवळ स्वत:चा आत्मिक विकास व्हावा म्हणून साधना केली, तर त्या साधनेचा लाभ स्वत:पुरताच मर्यादित राहतो; व मृत्यूनंतर हा लाभ, 'पुण्याई' या स्वरूपात, वलयरूपाने वातावरणात विलीन होतो. परंतु स्वत:च्या आत्मिक विकासाबरोबरच,



जनकल्याणार्थ जीवन वेचण्याची तळमळ जर साधकाने ठेवली, तर ज्याप्रमाणे आकाशात सूर्यनारायणाच्या आगमनाने अवघी सृष्टि प्रकाशमान होते; तद्वत साधकाच्या साधनेतून निर्माण झालेल्या तेजोवलयामुळे, त्याचे स्वत:चे व इतरांचे जीवन सुवर्णमय होते. 'श्रीसाई अध्यात्मिक समितीच्या' उभारणीतील, हे एक महत्त्वाचे अंग होय. समितीने गेल्या छत्तीस वर्षात, जगतातील दु:खी जीवांची दु:खे, निराकरण रूपात स्वत: भोगली; व त्यांच्या दु:खात सहभागी होताना, त्याना केवळ अपरिमित सुखाचा चिरंतन ठेवा, 'ठेव' म्हणून दिला आहे.

विश्वाची उत्पत्ति ज्या तीन तत्त्वातून झाली आहे, ती तीन तत्त्वे, उत्पत्ति, स्थिती व लय, ॐकार साधनेत सामावून, भक्ताना नित्य उपासनेचा सोपा श्रीगणेशा, श्रीगुरूंनी प्राप्त करून दिला. तसेच या तीन तत्त्वांचे प्रतीक म्हणून श्रीसाईशक, श्रीकारण व श्रीमहाकारण ह्या तीन प्रतिमा नित्य पूजनार्थ दिल्या. या तीन प्रतिमामध्ये नरजन्माचे ज्ञान, जीवाचे जन्मकारण व जीवनाची सार्थकता सामावलेली आहे. ज्या भक्तभाविकांच्या नित्य पूजनात, या तीन प्रतिमांचा समावेश आहे, त्याना चौथी प्रतिमा, म्हणजेच 'श्रीनारायणी' प्रतिमेचाही लाभ झाला आहे.

निसर्गातील प्रत्येक घटक आपले आयुष्य, हे इतरांच्या कल्याणार्थ वेचित असतो. पशु-पक्षी, वृक्ष-लता, डोंगर-नद्या, ऊन-पाऊस या सर्वांचा उपयोग कल्याणकारीच आहे. मात्र आज आपण मनुष्य जरी याच निसर्गात जन्म घेते झालो आहोत, तरी आपल्या बुद्धिमाध्यमाच्या दुरुपयोगामुळे, स्वत:चे व इतरांचे अकल्याण, केवळ स्वार्थापायी करीत आहोत. श्रीसाई अध्यात्मिक समितीच्या शिकवणीत, परमार्थ व स्वार्थ या दोहोंचा सुंदर संगम अनुभवास येतो. 'स्वार्थ' म्हणजे स्वत: प्राप्त केलेल्या जीवन माध्यमाचा निश्चित अर्थ; व 'परमार्थ' म्हणजे इतरांचे जीवन सुखमय बनविण्यासाठी करावयाचा जीवनाचा सदुपयोग; म्हणजेच परम अर्थ होय.

नरजन्माचे कर्तव्य ज्यावेळी जनहितार्थ कार्यान्वित होते, त्यावेळी 'नर' ह्या अवस्थेचे, 'नारायणी' या अवस्थेत स्थित्यंतर होते. आम्हा भक्तभाविकांच्या जीवनात, ही नारायणी अवस्था उदित व्हावी, म्हणून आपणा सर्वास 'नारायणी प्रतिमा' देण्यात आली. ही परमपवित्र नारायणी अवस्था सामान्य भक्ताला सहज प्राप्त व्हावी, म्हणून माझ्या माध्यमातून श्रीगुरूंनी अहोरात्र कार्य केले आहे; हेच माझे सद्‌भाग्य होय. आपल्यापाशी

नित्य पूजनात असलेल्या तीन प्रतिमा, म्हणजे श्रीगुरूंची काया, श्रीगुरूंची वाणी व श्रीगुरूंचे मन आहे; या भावनेने या प्रतिमा जपावयास पाहिजेत. वास्तविक श्रीगुरूच या तीन प्रतिमांच्या स्वरूपात, प्रत्येक भक्ताच्या घरी वास करीत आहेत; ही ओळख आपल्याला ज्यावेळी होईल, त्यावेळी आपल्या जीवनात 'गुरुपौर्णिमा' उदयाला येईल; व नारायणी प्रतिमेचे महत्त्व व महात्म्य आपल्याला समजेल. या नारायणीत अखिल विश्व सामावलेले आहे. 'ना' म्हणजे नाद; विश्वाच्या उत्पत्तीचे प्रमुख सूत्र, म्हणजेच उत्पत्ति अवस्था, 'रा' म्हणजे राग; जीवनाचा स्थायी सूर, म्हणजेच स्थिती अवस्था, 'य' म्हणजे लय अवस्था; नरजन्माची परिपूर्णता! या तिन्हीचे एकरूपत्व अस्तित्वात असणे, म्हणजे 'णी'; ही चौथी अवस्था होय. अशी ही नारायणी आज जगत्कल्याणार्थ, इहजगतात श्रीसद्गुरुकृपेने अवतरली आहे; व आपल्या कृपाशीर्वादात सर्व भक्तभाविकाना धन्य करीत आहे!

श्रीसाई अध्यात्मिक समितीच्या स्थापनेचे एक कर्तव्य, या नारायणी प्रतिमेच्या रूपात, आज घरोघरी नांदते आहे. या सुवर्णयोगाचे वर्णन शब्दाने करणे अपुरे होईल. श्रीसाई अध्यात्मिक समितीने, भक्ताना आजमितीपर्यंत काय दिले? याचे सिंहावलोकन करावयाचे झाल्यास, असे म्हणावे लागेल की, 'श्री' म्हणजे सरस्वती व लक्ष्मी या दोहोंचा वरदहस्त प्रत्येक भक्ताला प्राप्त व्हावा, म्हणून विमोचनाद्वारे कुटुंबातील वंश, कर्म व ऋण यातील संपत्ति, संतति व विद्यानाशाचे दोष विमोचित केले. 'साई' म्हणजे सामान्य जनाला सोपी साधना शिकवून, त्यातून 'ई'श प्राप्तीचा सुलभ मार्ग दाखविला. आत्म्याची उन्नति होण्यासाठी, दीक्षाद्वारे अवधान, ध्यान व चिंतन या अवस्था साधक माध्यमात रुजविल्या; व 'श्रीसाई स्वाध्याय मंडळ' स्थापन करून, 'प्रापंचिक' व 'अध्यात्मिक' जीवनातील कर्तव्याची ओळख करून दिली. 'समिती' चे कार्य, हे समाजाभिमुख, मित्रत्वाचे, विश्वबंधुत्वाचे व तितीक्षेचे, म्हणजे दया-क्षमा-शांति व सबुरीचे कार्य आहे.

मानवी जीवनामध्ये जे पाच ऋणानुबंध असतात, त्यापैकी चार ऋणानुबंध आपल्या जीवनात अस्तित्वात असून, देवादिक हा ऋणानुबंध जीवनाबाहेर असतो. हे ऋणानुबंध जीवनाशी हितसंबंधित असून, त्यांच्या अनुकूल-प्रतिकूलतेवर, जीवनातील सुख-शांति-समाधान अवलंबून आहे.



ज्यांची प्रखरता अधिक असेल, ते ऋणानुबंध अनुकूल करून घेणे, यासाठी मानवी प्रयत्न अपुरे पडतात; व केवळ श्रीसद्गुरूंची कृपा झाली, तरच हे कार्य होऊ शकते. ते होण्यासाठीच, आपण भक्ताना प्रतिमा दिलेल्या आहेत. त्यापैकी 'श्रीसाईशक' प्रतिमा, ही मातृपितृ ऋणानुबंधासाठी; 'कारण' प्रतिमा इतरेजन ऋणानुबंधासाठी; 'महाकारण' प्रतिमा जन्मजन्मांतर ऋणानुबंधासाठी; व या तीन प्रतिमांचे एकरूपत्व असलेली चौथी 'श्रीनारायणी' प्रतिमा, ही जन्मकर्म ऋणानुबंधासाठी आहे; व त्यामुळे आपले जीवन परिपूर्ण, म्हणजे तीनशेसाठ अंश बनते. हे जे तीनशेसाठ अंशाचे कृपाशीर्वादाचे वलय आपल्या जीवनात धारण करून दिले आहे, त्याला कार्य करू देणे, हे आज आपले कर्तव्य आहे; हे आपण लक्षात घेतले पाहिजे. ज्या जन्मकर्म ऋणानुबंधापरत्वे 'पुनरपि जननं, पुनरपि मरणं'; ही अवस्था आपल्या जीवनात होती; त्यामध्ये स्थित्यंतर होऊन, नराचा नारायण होणे, हा कृपाशीर्वाद श्रीसद्गुरूंनी ह्या प्रतिमा सिद्ध करून, आपणास दिला आहे.

आपल्या जीवनात प्रापंचिक व पारमार्थिक अशा दोन बाजू असून, पारमार्थिक जीवन प्राप्त होण्याची तरतूद, श्रीगुरूंनी करून दिली; जेणेकरून जरी अडचण उपस्थित झाली, तरी ती निवारण करण्याचे कार्य आपणच करावयाचे आहे; तरच जी ऋणानुबंधांची समतोल अशी अवस्था आपल्या जीवनात धारण झाली आहे, ती जतन होईल.

यासाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शन केले गेले -

| ऋणानुबंध | प्रतिमा | मंत्र | निराकरण |
|---|---|---|---|
| मातृपितृ | श्रीसाईशक | ।।ॐ श्री साईनाथाय नमः ।। | कौटुंबिक सुखशांति |
| इतरेजन | कारण | ।।ॐ नमः शिवाय।। | वास्तूदोष, संतति इ. |
| जन्मजन्मांतर | महाकारण | ।।श्री नवनाथ अनुष्ठान।। दहा नावे | पारमार्थिक उन्नति |
| जन्मकर्म | श्रीनारायणी | ।।सर्व मंगल मांगल्ये...।। | विवाह जमण्यात अडथळा |

प्रत्येक ऋणानुबंध, त्यासाठी दिलेली प्रतिमा व मंत्र, याबद्दलचे मार्गदर्शन केले गेले. हे मंत्र म्हणजे 'शस्त्र' आहेत हे जरी खरे, तरी त्या मंत्रांचा शास्त्रपरत्वे उच्चार झाला तरच ते शस्त्र असून, ह्या चार मंत्रामध्ये सर्व आधीव्याधींचा समावेश झालेला आहे. या मंत्रांचा योग्य उच्चार कारणपरत्वे करून, प.पू. बाबांच्या आशीर्वादाची याचना करून, केवळ 'उदी' च्या सहाय्याने, आपणच आपली कोणतीही अडचण दूर करू शकाल, याबद्दल मला खात्री आहे.

पुढे मी गोव्याला गेलो असता, चंपाषष्ठीला श्रीखंडोबाच्या नवरात्राची सांगता करण्यात येऊन, नित्य साधनेतही थोडा बदल करण्यात आला; व त्यानंतर मकर संक्रांतीला प.पू. बाबांनी भक्ताना असा संदेश दिला, "केवळ वर्षारंभ म्हणजे नवीन वर्ष, म्हणून आपण हा दिवस साजरा करतो. त्यापेक्षा विश्वात काहीतरी निश्चित नव्याने उदयाला येत असते. संक्रांत म्हणजे संक्रमण. गेल्या वर्षात जे काही वाईट घडले, त्याची पुनरावृत्ती न व्हावी, म्हणून हा सण साजरा करावयाचा असतो. ह्या सणाचे महत्त्व असे की, समाजात हा सण जरी घरोघरी साजरा होत असतो, तरी हा सण व्यक्तीशः स्वतःच्या जीवनाचे सिंहावलोकन करण्यासाठी आहे. या दिवशी रवी एका राशीतून दुसऱ्या राशीमध्ये गमन करतो. म्हणजे पुढच्या राशीला भरभराट, सुख, शांती, समाधान हे लाभावे, यासाठी मागील राशीत जे आपल्या हातून नकळत दुर्विचार, अविचार घडले असतील, त्यांची पुनरावृत्ति होऊ नये, म्हणून हा काळ 'संक्रमण' म्हणून साजरा करीत असतात; म्हणजेच थोडक्यात जुन्या संगती, दुर्व्यसन, ज्याच्यामध्ये काया, वाचा, मनाचा उत्कर्ष होण्यास अडथळा येत असतो, तो येऊ नये, म्हणून हे जे सर्व त्याज्य आहे, त्याचे विसर्जन होऊन, नव्याने आपल्या जीवनाला हितकारक असेल, तेवढेच विचार व आचार आचरणात आणावेत; याचा अर्थ 'मकर संक्रांति'.

या दिवशी, त्या दिवसाचे प्रतीक म्हणून तीळ व गूळ हा वाटावयाचा असतो; याचे कारण स्वतःच्या जीवनात, दुर्गुणाना थारा तिळमात्र राहू नये, म्हणून तीळ; व जीवन संपूर्णतः गोड व्हावे, म्हणून गूळ! याचा अर्थ 'तिळगूळ घ्या व गोड बोला'; असा आहे. या दिवशी आसमंतात



जे जग आहे ते जग, आपले मित्र व्हावयास पाहिजे; जेणेकरून मानवी जीवन सुखशांतीने व्यतीत होईल.

'मन' आहे तो 'मानव'. त्याअर्थी सगळे जग आपले मित्र असून, कोणीही आपले हितशत्रू नाहीत. हितशत्रू हे आपले आपणच असून, जीवनात योग्य काळ व अयोग्य काळ, याचा विचार, जन्माला येऊन आपण कधीही करीत नाही. त्याचा विचार व्हावा, यासाठी यादिवशी देवाला गोड नैवेद्य, म्हणजे गुळाची पोळी करतात. या पोळीमध्ये दोन पापुद्रे असतात; व मध्ये गूळ असतो. या मिश्रणामध्ये सलोखा वाढावा, शत्रू व मित्र एक व्हावेत; व हा पदार्थ खात असताना, तोंड नुसते गोड न होता, तोंडात जी वाणी आहे, त्या वाणीने नकलीपणा सोडून, गोड बोलावे; असा अर्थ आहे."

# ४९. श्रीसाई शक ७ चैत्रप्रतिपदा, शक्तिपीठ व नारायणी संगम, श्री पंतमहाराजांकडे कार्यार्थ आशीर्वाद, कुंडलिनी विज्ञान

आज हे समितीचे कार्य स्थापन होऊन, चाळीस वर्षे झाली. त्यापैकी गेली पाच वर्षे, ही सुवर्णाक्षरानी लिहावीत, असे कार्य गेल्या पाच वर्षात झाले आहे. पाच वर्षापूर्वी प.पू. बाबांच्या आज्ञेने गोव्यात 'साईधाम' बांधण्यात आले; व त्याचवेळी श्रीशक्तिपीठाची स्थापना साईधाममध्ये करण्यात आली. बहुसंख्य भक्ताना ''साईधाममध्ये शक्तिपीठ स्थापना केली आहे;'' एवढेच माहिती आहे. परंतु त्यामागील परंपरा किती वर्षापासूनची आहे, हे कुणालाही माहीत नाही. जो कुणी मनुष्य जगतात जन्माला येतो, त्याला काया-वाचा-मन असल्याशिवाय, जीवन जगता येत नाही. त्याप्रमाणेच देवाला प्रतीक, प्रतिमा व प्रतिभा असल्याशिवाय देवाचे अस्तित्व अस्तित्वात दाखवता येत नाही.

आज आपणा भक्तांच्या घरी तिन्ही प्रतिमा व चौथी प्रतिभा म्हणजे 'नारायणी', ही पण आहे. परंतु जेव्हा आपल्याला या प्रतिमा मिळाल्या, तत्पूर्वी त्या प्रतिमा, चाळीस वर्षापूर्वी सिद्ध करण्यात आल्या होत्या, तरी त्या आपण भक्ताना तेव्हा दिल्या गेल्या नाहीत; कारण आपल्या घरी आज ज्या प्रतिमा आहेत, त्यांचे मूळ शक्तिपीठात आहे. तेव्हा प्रथमत: 'साईधाम' बांधावे लागले; व त्यानंतर शक्तिपीठाची स्थापना करण्यात आली. जी शक्ति शक्तिपीठात स्थापन करण्यात आली, तिचे आवाहन, श्रीक्षेत्र नरसोबाची वाडी येथे दर पौर्णिमेला लघुरुद्र हवन करून, करण्यात आले. अकरा पौर्णिमेनंतर, बाराव्या पौर्णिमेला महारुद्र स्वाहाकार करण्यात येऊन, ती शक्ति साईधाम-गोवा येथे शक्तिपीठामध्ये स्थापन करण्यात आली. त्यानंतर आपण भक्ताना या तीन प्रतिमा, म्हणजे श्रीसाईशक, कारण व महाकारण म्हणजे उत्पत्ति, स्थिती व लय; देण्यात आल्या. जर साईधाममध्ये शक्तिपीठ स्थापन झाले नसते, तर तुम्हा भक्ताना ज्या प्रतिमा दिल्या गेल्या आहेत, त्या देण्यात आल्या नसत्या. म्हणजेच पर्यायाने, आपल्या घरी न मागता, देवाचे आगमन झाले आहे. असे म्हटल्यानंतर, त्या 'प्रतिमांचे' मूल्य किती आहे? हे सुज्ञ भक्तानी



समजून घ्यावे; व ज्या प्रतिमा आपण घेतल्या आहेत, त्यांचे फल मिळण्यासाठी म्हणून आपणास 'साधना', म्हणजे औपचारही शिकविला आहे. त्यामध्ये ॐकाराची बारा अंगे व संथेने सद्‌गुरुनामस्मरण, हे करण्यासही शिकविले आहे. पण त्याकडे दुर्लक्ष करून, प्रापंचिक अडचणी कशा सोडविता येतील? हा प्रश्न प्रामुख्याने आपण विचारीत असता. त्यापेक्षा जी साधना शिकविली आहे, त्याप्रमाणे आपण जर साधना केलीत, तर निश्चित शंभर टक्के सुख, अधिक प्राप्त होईल.

चैत्र प्रतिपदा श्रीसाईशके ७ या दिवशी, शक्तिपीठातील शक्तीत, 'नारायणी' म्हणजे 'प्रतिभा', हिचा संगम म्हणजे एकत्रीकरण करणे, हा विधि केला गेला. हे अवधान लक्षात ठेवून, आपण भक्तानी जरी लाखो रुपये खर्च केले, तरी ज्या प्रेमाने जगद्‌गुरू श्रीसाईनाथमहाराज यांनी आशीर्वादाची भेट पाठविली आहे, तिचे मूल्य होणार नाही. त्याशिवाय या पाच वर्षात, समितीच्या कार्यार्थ काही कार्य व्हावे, म्हणून श्रीसाई स्वाध्याय मंडळ स्थापन केले गेले आहे. ही स्थापना होऊन आज चार वर्षे होत आहेत. या मुदतीत समाजामध्ये ज्या संस्था पैशाअभावी कार्य करू शकत नाहीत, अशाना साडेतीन लाख रुपये देणगी म्हणून या स्वाध्याय मंडळाने दिली आहे. तसेच आपल्याला आपल्या परंपरेचे ज्ञान व्हावे; व गुरुमार्गात सज्ञान होऊन आपण जीवन जगावे, म्हणून 'गुरुप्रसाद' हा ग्रंथ लिहीला गेला. हा ग्रंथ लिहीण्याचा उद्देश असा की, अनादीकालापासून देवदेवतार्जन व धर्माचरण कशाप्रकारे होत होते ते या ग्रंथात नमूद केले गेलेले आहे. भवितव्यामध्ये ही निराकरण पद्धती आपल्याला अवलंबिता येणार नाही, म्हणून सोप्यात सोपा असा कुलधर्म-कुलाचार आपल्याला सूचित करण्यात आला; ज्यायोगे समाजाला उपयोग होऊन, आपल्या कुटुंबीयाना जो कृपाशीर्वाद मिळेल तो आशीर्वाद देवदेवतार्जनापेक्षा अधिक आहे! प.पू. बाबांनी या शुभदिनी आपणा सर्वाना असा आदेश दिला की,

''॥ सत्कर्मयोगे वय घालवावे। सर्वामुखी मंगल बोलवावे ॥ असे जीवन आपण व्यतीत करावे.''

चैत्र प्रतिपदेचा शुभदिवस गोव्यात श्रीसाईधाम येथे साजरा करून, मी बेळगावला प.पू. श्रीपंतमहाराज यांच्याकडे आलो. सकाळी आरती करून, सर्व भक्तांच्यावतीने, त्यांच्या पायाशी एक प्रार्थना सादर समर्पण

केली; व कार्यार्थ त्यांचे आशीर्वाद मागितले.

**प्रार्थना :**

"आज आम्ही गुरुभक्त, पुण्य विभूति यांचे चरणी, विनम्र भावनेने अशी प्रार्थना करीत आहोत की, आम्हा मानवाना प्राप्त जन्माचे ज्ञान व्हावे, व प्राप्त जन्मात सुख-शांति-समाधान लाभावे; तसेच आपण जो मानवी जीवनाचा उद्धार व्हावा, म्हणून हे कार्य स्थापन केले आहे; त्या कार्यात प्रत्येकाचा अंशमात्र भाग आहे; हे जाणून, परोपकाराचे इष्ट कर्तव्य आमच्या हातून यथोचितपणे पार पडावे; अशी शिकवण अनादी कालापासून आजपर्यंत वेळोवेळी अवतार घेऊन, आम्हा मानवाना आपण दिलीत; परंतु इहजन्मात जे कर्तव्य आम्हा मानवाना करणे भाग आहे, त्याचा विसर पडल्यामुळे, आजची जगाची परिस्थिती फार बिकट झाली आहे. त्यामध्ये आवश्यक तो बदल घडविणे, हे आपल्या कृपाशीर्वादाशिवाय होणे शक्य नाही. तरीसुद्धा आपण विभूतींनी कृपावंत होऊन, सोप्यातसोपा असा मार्ग, आम्हा मानवाना सूचित केला आहे. अशा मार्गाचे पालन व कर्तव्य, आमच्या हातून नि:संकोच घडत रहावे; व आम्हाला तशी शक्ति आपण द्यावी; व ह्या सुखशांतीचा लाभ, आमच्या जीवनात होऊन, ईश्वरप्रणीत मानवी जीवन, आदींचा लाभ घडत रहावा, अशी आपल्या चरणी प्रार्थना!

आज दिवसापर्यंत मानवी कल्याणासाठी, जी साधने प.पू. साईनाथ महाराजांनी शिकविली आहेत; त्याबद्दल आम्ही जन्मोजन्मी त्यांचे ऋणी राहू. पुनश्च तसा अपराध व प्रमाद आमच्या हातून घडू नये, अशी सद्बुद्धी प.पू. जगद्‌गुरू श्रीसाईनाथ महाराज, श्रीनवनाथ आदी विभूति व देवदेवता यांनी आम्हाला व आमच्या भावी पिढयाना द्यावी; अशी अनन्यभावनेने प्रार्थना करीत आहोत."

वरील प्रार्थना बेळगावला प.पू. श्रीपंतांचे चरणी ठेवून आलो. त्यानंतर मुंबई येथे साधक अवस्थेतील पुढील मार्गदर्शनाप्रीत्यर्थ संमेलन घेतले गेले.

जगतामध्ये बहुसंख्य लोक 'कुंडलिनी विज्ञान', या विषयाबद्दल उत्सुक असतात. परंतु तेवढेच या विषयाबद्दलचे अज्ञान आहे. परमेश्वराने आम्हा मानवाना निर्माण करतेवेळी, कोणतीही माध्यमे उदित करावी, असे कार्य



आपणासाठी ठेवलेले नाही. असे जर असते तर आपण जन्माला येऊन सज्ञानी झालो नसतो. तेव्हा "कुंडलिनी जागृत करावयाची आहे"; असे जे लोक म्हणतात, याबद्दल अज्ञान खूप आहे. जीवन आठ दिशेला आहे. त्यापैकी एक दिशा ज्ञात आहे. बाकीच्या सात दिशा अज्ञात असतात. त्या गुरुकृपेने ज्ञात होणे, म्हणजे 'कुंडलिनी जागृती' होय.

देहामध्ये असंख्य रक्तवाहिन्या आहेत. त्यापैकी तीन नाडया, म्हणजे इडा, पिंगला, सुषुम्ना या होत. ह्या नाडया जीवनामध्ये प्रमुख असून, त्यांच्यामुळे पचन, श्वसन व रक्ताभिसरण ह्या तीन क्रिया जीवनात अव्याहत चालू असतात. ते कार्य होण्यासाठी, मनुष्याला आपणहून काहीएक प्रयत्न करावा लागत नाही. त्यामध्ये जर आपल्या आचारविचारामुळे बिघाड झाला तर आपण त्याला 'आजारपण' असे म्हणतो; व त्यावर आपण औषध चालू करतो. पूर्वीच्या काळी असे आजार जर झाले तर औषधोपचार न करता, प्रथमत: 'लंघन' करीत; म्हणजे जो आजार आहे, तो आपोआप बरा होत असे. पण आज लंघन किंवा उपवास केव्हा केला जातो? जेव्हा आपली अन्नसेवन करण्याची इच्छा नाहीशी होऊन, पोट बिघडते तेव्हा! त्याआधी आपण पोटाकडे लक्ष न देता, ती 'मोट' आहे असे समजून, अन्न 'सेवन' न करता, नुसते आत ढकलतो; व त्यामुळे पचनक्रिया बिघडते; व अन्नपचन होत नाही. त्यामुळे रक्ताभिसरण जरी झाले तरी रक्त शुद्ध न होता, त्या रक्तात अधिक बिघाड, म्हणजे कार्बन डायॉक्साईड ($CO_2$) निर्माण होतो; व नंतर श्वसनक्रिया (श्वास घेणे व देहाबाहेर सोडणे) ही जेवढी पाहिजे तेवढी होत नाही. त्यामुळेही नको ते रोग उदाहरणार्थ, दमा, क्षय, रक्तक्षय, रक्तदाब, हृदयविकार इत्यादी उद्‌भवतात. यासाठी जरी औषधोपचार केला गेला, तरी आपले शरीर निकोप न राहता, केवळ औषधाने आपण जगतो. यासाठी कुंडलिनीचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

मानवाचे शरीर पंचभौतिक तत्त्वानी निर्माण झालेले आहे. जरी बाह्य देह दिसला, तरी अंतर्गत कार्य इतके विलक्षण आहे की, तो विचार केल्यानंतर मति गुंग होते. देहाची प्रामुख्याने तीन द्वारे आहेत; ज्यांच्यामुळे अंतर्गत कार्याला चालना मिळते. ती तीन द्वारे म्हणजे डोळे, कान व जिव्हा. ही तीन माध्यमे जर आपणास नसती, तर आपण जगलो

नसतो. या तीन माध्यमांचा संबंध इडा (कान), पिंगला (डोळे) व सुषुम्ना (जिव्हा) या नाडयांशी आहे. या नाडया शरीरामध्ये पाठीला जो कणा आहे, त्यामध्ये वेणीच्या रूपाने अस्तित्वात आहेत. त्यांचा संबंध शरीरातील मोठया व लहान मेंदूशी आहे. त्यामुळे आपण चलनवलन करीत असतो. अशांचा योग्य वापर केला गेला, तर आपल्या कुंडलिनीचा सदुपयोग आपणास होईल. अन्यथा खाणेपिणे, कपडा-लत्ता, ऐषाराम यातच जीवन व्यतीत होईल. तेव्हा साधकाने, जी संपत्ति देवाने दिली आहे, ती म्हणजे डोळे, कान व जिव्हा यांचा योग्य तो वापर केल्यानंतर, हा अनुभव आपणास येईल.

माझा स्वत:चा वैयक्तिक अनुभव असा आहे की, मी गेल्या पन्नास वर्षात सिनेमा, नाटक, टि.व्ही. पाहिला नाही; व पाहतही नाही. जे मी वाचतो तेसुद्धा संतवाङमयच असते. मी फक्त शास्त्रीय संगीत ऐकतो. वर्तमानपत्रसुद्धा मी वाचत नाही. त्यामुळे फालतू चर्चा करण्याचा प्रसंग माझ्यावर येत नाही. मी जेवण जेवतो, ते जेवण तुम्ही कुणीसुद्धा जेवणार नाही, एवढे सात्त्विक असते; व आज अनेक वर्षे दीड पोळी व अर्धी वाटी भात, एवढाच आहार मी घेतो. त्यामुळे माझी तिन्ही कार्ये नि:संकोच कार्य करीत असतात. हे बंधन मी स्वत:ला का घालतो? तर या तीन माध्यमातून, जी शक्ति अनाठायी खर्च होते असते, ती मी कार्यार्थ वापरत असतो. असे जर तुम्ही केलेत, तर तुम्हाला स्वत:चे प्रश्न सोडविता येतील; व दुसऱ्यालाही मदत करता येईल.

काल २४/८/८९ रोजी प.पू. श्रीसाईबाबा यांचे आगमन झाले; व त्यांनी आपणा सर्वांना आशीर्वाद दिला आहे. तेव्हा भवितव्यात या तीन माध्यमांचा गैरवापर न करता, देहामध्ये इडा-पिंगला-सुषुम्ना यांचे कार्य उदयास यावयास पाहिजे. म्हणजेच 'कुंडलिनी जागृत झाली', असे म्हणता येईल. अन्यथा कुंडलिनी असूनसुद्धा नसल्यासारखे आपण आज जगतो आहोतच. अशासाठी डोळे, कान व जिव्हा यांचा अतिरेक न करता, जीवनात राहिलेला वेळ नामस्मरण व चिंतन करण्यात जर व्यतीत करते झालात, तर 'विश्वशांति' होण्यास विलंब लागणार नाही.



# ५०. विमोचन साधना - इहलोक व परलोकाचा विचार

'विमोचन' हा शब्द उच्चारल्याबरोबर अंगावर थरकाप उमटतो, अशी ही अत्यंत बिकट अशी साधना आहे. यासाठी गुरुमार्गात किंवा अन्य ठिकाणी, या साधनेच्या वाटेला कुणीही जात नाही. कारण हे साधन साधकाला जर सिद्ध करता आले, तर जगाचे कल्याण होईल, नाहीतर साधकाला प्राणास मुकावे लागेल; इतकी ही प्रखर साधना आहे. हे साधन करीत असताना, दोन्ही जगांचा प्रथमत: विचार करावा लागतो. पहिले जग म्हणजे इहलोक; व दुसरे जग म्हणजे परलोक.

प्रथमत: इहलोकाचा विचार करू या. जे कोणी दु:खी आहेत, त्यांच्या दु:खाचे कारण, त्यांचे कर्म अनुकूल असत नाही, व त्यासाठी त्याना जी सेवा आपण सांगतो, त्याआधी त्यांच्या देवदेवतांचा आशीर्वाद आपल्याला घ्यावा लागतो. उदाहरणार्थ, एखाद्याने आपल्या घराण्याचा कुलधर्म, कुलाचार बारा वर्षे केलेला नसतो; व त्यामुळे तो कार्यकेंद्रावर येऊन, आपण दु:खी आहोत असे सांगतो; त्यावेळी त्याचे दु:ख निवारण व्हावे, म्हणून जो प्रसाद अकरा आठवडे पूजनास दिला जातो, ते पूजन तो करीत असताना, त्याच्या देवदेवतांनी हे निराकरण मान्य करावे लागते. म्हणजे त्याचे दु:ख हा 'दैविक कोप', असे म्हणता येईल. दुसरी बाजू; एखादा मनुष्य दु:खी आहे, इतका की, त्याला सुख देण्यासाठी, त्याच्यापाशी अनुकूल कर्म शिल्लक नसते. अशावेळी गुरूंना जरी दु:ख भोगावे लागले; किंवा हालअपेष्टा सोसाव्या लागल्या, तरी गुरुभक्तांचे कल्याण व्हावयास पाहिजे. तिसरी बाजू; जो मनुष्य दु:खी आहे तो पूर्वजन्मी जर अन्य धर्माचा असेल, व ह्या जन्मी त्याचा धर्म भिन्न असेल, तर ह्या जन्मी अनेक देवदेवतांचे पूजन करूनसुद्धा, त्याचे फल त्याला मिळत नाही. यासाठी गुरूंना आपल्या साधनेतून त्याचे जीवन 'दत्तक' घेऊन, त्याला सुखी करावे लागते. असे करण्यासाठी साधकाची पुण्याई खर्ची पडते. आज ह्या जगात असे कोण आहे की जो, दु:खी आहेत त्यांच्यासाठी आपली पुण्याई खर्च करेल? एकवेळ

पै-पैशाने मदत करता येईल, पण स्वत:ची पुण्याई कुणीही खर्च करणार नाही. यासाठीच कुणीही साधक, या मार्गाच्या वाटेला गेलेला नाही. विमोचनाच्या या विधीला, 'कर्मविमोचन' असे म्हणतात.

दुसरा भाग म्हणजे जे कुणी आत्मे, मरणोत्तर जीवनामध्ये इहलोकात पिशाच्चांच्या रूपाने वावरत असतात, त्याना मुक्ती देणे; किंवा सद्गती देणे. त्यामुळे तो जीव, पुढच्या जन्मासाठी पुढे जातो. अशावेळी जो कोणी आत्मा इहलोकातून मुक्त करावयाचा आहे, त्यासाठी परलोकामध्ये त्यास जागा-पत्ता असावयास पाहिजे. तो आत्मा उत्पत्ति, स्थिती, लय या सृष्टीतील तीन अवस्थेत बद्ध आहे. त्याची जर गुरुकृपेने मुक्तता झाली, तर त्याच्या जन्माचे स्थित्यंतर, म्हणजे विमोचन करता येते. नाहीतर अनेक जन्मपर्यंत तो आत्मा इहलोकात तिष्ठत राहतो; व बाधक म्हणजे पिशाच्च होऊन, लोकाना शारिरीक व मानसिक भोग भोगावयास लावतो. यासाठी प्रथम गुरुआज्ञेने नुसते साधन सिद्ध करून, म्हणजे बाधा काढून चालत नाही, तर वरच्या म्हणजे भू:, भुव:, स्व:, मह:, जन: या लोकावर सत्ता असावयास पाहिजे. म्हणजे तो आत्मा, आपल्या कर्मानुसार, पुढील अवस्था प्राप्त करता होईल.

काही आत्मे, ज्यांच्या मरणोत्तर जीवनानंतर इच्छावासना शिल्लक राहिल्या आहेत, किंवा ज्यानी धर्मबाह्य आचरण केलेले आहे, त्यांच्यासाठी शास्त्रात नारायण नागबळी, त्रिपिंडी इत्यादी विधि सांगितलेले आहेत. परंतु हे विधि करण्याने, तो आत्मा मुक्त होत नाही. कारण आज हे विधि करणाऱ्यांचे, व या विधींचे, पावित्र्य शिल्लक राहिलेले नाही. केवळ बाजारी स्वरूपात हे विधि केले जातात; त्यामुळे ते आत्मे मुक्त व्हावयाच्या ऐवजी, या विधीने अधिकच बद्ध होतात; व पुन्हा जगताला त्रास देत असतात. हे सर्व विधि करीत असताना, ज्या जीवात्म्याला मुक्तता मिळते, त्या विधीला 'वंशविमोचन' असे म्हणतात.

तिसरी अवस्था अशी आहे की, गुरुमार्गी होण्यापूर्वी भक्ताचे विमोचन करणे भाग आहे. कारण जो जन्म झाला आहे, त्यामध्ये 'कर्माधीनता' असल्याने, तो विकसित नाही. त्याला प्रथमत: विकसित करणे, व विकसित झाल्यावर, त्याला योग्य त्या दीक्षा देऊन त्याला 'मानव' करणे,



म्हणजेच प्रथमत: जन्माला येतेवेळी तो 'जीव' म्हणून येतो; व त्यानंतर गुरुसंस्काराने त्याचा 'आत्मा' बनतो. यासाठी गुरूंना केवढे दिव्य करावे लागते, याची तुम्हीच कल्पना करा. नुसते 'गुरू करणे' हे सोपे आहे. परंतु 'जगाचे गुरू होणे'; ही 'सुळावरची पोळी' आहे, हे भक्ताने विसरता कामा नये. आज जगतामध्ये जे 'गुरू' म्हणून आहेत, ते गुरू लोकाना फसविण्याचा सोपासा मार्ग अनुसरताना दिसतात. यापेक्षा योग्य गुरू भेटेपर्यंत 'सबुरी' राखणे, हे उत्तम होय.

जन्माला येताना आपल्यापाशी जन्मकर्म व जन्मजन्मांतर, हे दोन ऋणानुबंध असतात. जन्माला आल्यानंतर त्यात अधिक दोन ऋणानुबंधांची जोड होते. ते म्हणजे मातृपितृ व इतरेजन. देवादिक ऋणानुबंधाचे वलय त्याच्यापासून दूर असते. ते नित्य उपासनेतून व गुरुआज्ञेने शिकविलेल्या साधनेतून, जोडावयाचे असते. ही जोड करून घेण्यासाठीच, आपल्याला तीन प्रतिमा देण्यात आल्या आहेत; व इहजन्मी नव्याने प्राप्त केलेल्या ऋणानुबंधातील प्रतिकूलता, आपल्या नित्य साधनेच्या आड येऊ नये, म्हणून या ऋणानुबंधांचे कर्मात रूपांतर करून, त्याना कार्यार्थ गुरुकृपा प्राप्त करून दिली आहे. हा विधि जरी सोपा वाटत असला, तरी प्रत्यक्षात हे दिव्य साधन, फक्त श्रीगुरूच करू शकतात. या साधन सिद्धतेलाच 'ऋणमोचन' असे म्हणतात. जीवनामध्ये एखादे धर्मबाह्य कर्म आपल्या हातून घडते; व त्याबद्दल जेव्हा पश्चात्ताप होतो; तेव्हा आपण 'प्रायश्चित्त' घेतो. असे प्रायश्चित्त सदैव घेऊन चालत नाही. प्रायश्चित्त हे जीवनात एकदाच घेता येते. त्यासाठी सुज्ञ मानवाने कर्म करण्यापूर्वी, विचारपूर्वक कृत्य करावे.

जन्माला येऊन याप्रमाणे आपले जीवन व्यतीत करणे, म्हणजे सुख-शांति-समाधानाचा अभाव असणे. यामध्ये अनेक प्रयत्न करूनही लाभ मिळत नाही. कारण विमोचन झालेले नसते. विमोचन झाल्यावर, ऋणानुबंधात बदल गुरू करतात. त्यामुळे न मागता, सुखाची प्राप्ति होते. तो बदल साधकाने लक्षात ठेवला पाहिजे. यामध्ये जर बिघाड झाला, तर तो पूर्ववत करता येत नाही. यासाठी 'लोभ' सोडला पाहिजे; व त्याऐवजी 'लाभ' कसा होईल? असा विचार सदैव ठेवला पाहिजे;

तरच 'गुरुकृपा' म्हणजे काय हे समजेल. हा जो बदल गुरूंनी केला आहे, तो न दिसण्यासारखा आहे. परंतु अनुभवाने हे समजेल की, आपल्या जीवनात जे विमोचन झाले आहे, याचे उदाहरण, म्हणजे आपले इष्टमित्र, नातेवाईक आपल्यापासून दूर जातात. जन्मप्राप्तिपूर्वीचा आत्म्याचा विषय, जन्मानंतर आल्याचे उद्दीष्ट (object), प्राप्त व्हावयास पाहिजे; तरच जीवनाचे मर्म समजेल; व मग इतरेजनाना त्याचा लाभ होईल. अशा प्राप्त झालेल्या जन्मास, 'मानवी जन्म' असे म्हणतात.

कर्म ही क्रिया जरी देह करतो, तरी त्यापरत्वे कर्म घडेल, असे नव्हे. तर ह्या क्रियेमध्ये, जोपर्यंत काया-वाचा-मन यांचा समावेश होत नाही, तोपर्यंत कर्माची इच्छा किंवा वासना, ही जरी देहाला झाली, तरी ही इच्छावासनेची निर्मिती, कर्म म्हणून जमेस धरता येत नाही. जन्मप्राप्तिसाठी कर्माचा संचय करावयाचा असतो. म्हणून पुढे याच कर्माला 'कर्म' करावयाचे असते; तेव्हा आपल्या हातून घडलेले कर्म, हे खरोखर घडते आहे की नाही, हा विचार करून, जीवन व्यतीत व्हावयास पाहिजे. याचा अर्थ, या जन्मात जी क्रिया करावयाची असते, त्या क्रियेमध्ये विषय असावयास पाहिजे; व जो विषय आपणास प्राप्त करावयाचा असतो, त्यापरत्वे क्रिया करीत असता, ती क्रिया निरासक्त बुद्धीने जर झाली, तर त्या क्रियेत अंतर्भूत झालेला विषय, हा आपल्या नकळत कर्माची धारणा करून घेतो.

भक्ताना जीवनामध्ये जी अडीअडचण निर्माण होत असते, त्याचा अर्थ, पूर्वजन्मी पातकप्रमाद घडले आहेत असे नव्हे; तर जीवनात जी उणीव निर्माण झाली आहे, त्यासाठी सत्कर्म असावयास पाहिजे, यासाठी अडचण निर्माण झाली आहे; याचा कोणीही विचार करीत नाही. जेव्हा केंद्रावर तुम्ही कार्यार्थ येता, तेव्हा तुम्हाला 'प्रसाद' दिला जातो, तो आपले काम व्हावे म्हणून नव्हे, तर प्रसाद दिल्यानंतर जी सेवा सांगितलेली असते, ती आज्ञा आहे हे आपण विसरतो, पण ह्या आज्ञेप्रमाणे दिलेल्या मुदतीपर्यंत सेवा केली, तर त्या सेवेचा लाभ 'सत्कर्म' म्हणून आपल्याला उपयोगी पडतो. पण ते न करता, अनेक भक्त अडचण आली, म्हणजे चिंताग्रस्त होऊन हताश होतात. त्यामुळे सेवेमध्ये जे अधिक कर्म जोडलेले



असते, ते कारण नसताना खर्ची पडते; व इष्टसुखप्राप्तिसाठी विलंब लागतो. यापेक्षा उत्तम मार्ग म्हणजे आपल्याला जे दुःख आहे ते कार्यकेंद्रावर जाऊन सांगणे; व त्यासाठी जे निराकरण सांगितले आहे, ते केले असता, कर्माचा अपव्यय होत नाही; व प्रामाणिकपणे जर अकरा आठवडे सेवा आपण केलीत, तर त्याचा लाभ जन्मभर होईल. म्हणूनच जे दुःख गुरूंना निवेदन केले आहे, त्याबद्दल 'चिंता करू नको काही, सद्गुरूसी शरण जाई'; असे वागले पाहिजे. तरच कर्माचा अपव्यय होणार नाही. ते कर्म प्रापंचिक व पारमार्थिक जीवनास उपयोगी आहे; म्हणून जी आज्ञा आहे, त्याप्रमाणे वागणे; हे भक्तांचे कर्तव्य आहे.

# ५१. वाणी-जीव, जीवात्मा, आत्मा-प्रज्ञा अवस्था - श्री साईनाथ महाराजांचा आशीर्वाद!

वाणी म्हणजे कंठ. ही प्रत्येक प्राणीमात्राला मिळालेली ईश्वरी देणगी आहे. तरीही मनुष्य व इतर पशुपक्षी, यांच्या आवाजातील एक महत्त्वाचा फरक, म्हणजे आवाजाला उच्चारित करून, विचाराना साकार करण्यासाठी, मनुष्य नैसर्गिक पाच माध्यमांचा वापर करतो. ही नैसर्गिक पाच माध्यमे म्हणजे ओठ, जीभ, टाळा, स्वरयंत्र व श्वास होय. यातील स्वरयंत्र व श्वास ही दोन माध्यमे, श्रेष्ठ माध्यमे आहेत. श्वासोच्छ्वास म्हणजे प्राण. प्रत्येक श्वासोच्छ्वासाला एक प्रमाणबद्ध लय असते. ही लय प्रमाणबद्ध नसली, तर शरीरातील नैसर्गिक क्रियेमध्ये, अडथळे उत्पन्न होतात. हृदयविकार, रक्तदाब, दमा इत्यादी आजार उद्भवतात; म्हणून शरीराला निरोगी राखण्यासाठी, नियमितपणे प्राणायाम करणे आवश्यक आहे.

मानवी देह हा पंचमहाभूततत्त्वापासून साकार झालेला असतो. या पंचतत्त्वांची तन्मात्रे, मानवी देहात वास करीत असतात. त्यांचे समतोलत्व व समन्वय राखण्यासाठीही, नियमित प्राणायामाची आवश्यकता असते. मानवी देहातील पंचकोश, यातून जीवनातील प्रत्येक क्रिया कार्यान्वित होत असते. मनुष्याच्या आचार, विचार व उच्चाराची परिपक्वता व शुद्धता, या कोशांच्या परिपक्वतेवर अवलंबून आहे; व कोशांची परिपूर्णता, प्राणायामावर निर्भर आहे. म्हणून मानवी जीवनात, प्राणायाम हा अतिशय महत्त्वाचा मानला जातो. विशेषतः ध्यान, चिंतन, योग करणाऱ्या साधकाला, प्राणायामाचे वलय, जीवनातील सार्थकता साधण्यास उपयोगी पडते. साधकाला 'देवाची भाषा' समजली पाहिजे. कारण नित्य जीवनात जे इष्टमित्र, आप्त आपल्याशी बोलतात, ती भाषा शाब्दिक आहे. त्यामध्ये 'संकेत' नाही. पण ईश्वराची भाषा अशी आहे की, त्यामध्ये संकेत आहे. तो समजण्यासाठी, आपली साधना शंभर टक्के व्हावयास पाहिजे. म्हणजे स्वर-ताल-लय अशा अंगानी जर साधना केली तर आपले शरीर मध्यस्थ (Medium) बनते. त्यामुळे लहरींच्या रूपाने जो संकेत आहे, तो आपल्याला समजतो. यासाठी प्रथमतः साधना



सिद्ध करणे आवश्यक आहे. तर "देव आपल्याशी बोलेल", असे म्हणता येईल. कारण देव हा दृश्य नाही; व अदृश्यही नाही; पण गोविंद (नाद) आहे.

भारतीय संगीताची शास्त्रोक्त उभारणी, प्राणायामावर आधारलेली आहे. संगीतातील आलाप, राग व एकूणच संगीत हे शास्त्र, प्राणायामाने सिद्ध झालेले आहे. ठराविक अंतराने (pause) श्वास घेणे; व घेतलेला श्वास, संथ लयीत सोडणे; यालाच प्राणायाम असे म्हणतात. संगीतातील सातापैकी पाच प्रमुख स्वर सा, रे, ग, म, प हे पाच कोशाना पूरक आहेत. म्हणूनच पाच स्वराना उच्चारित करून, पाच कोशातून केलेला प्राणायाम, ही सर्वश्रेष्ठ साधना होय. 'सा' हा स्वर, अन्नमय कोशावर नाभी स्थानातून नियंत्रण ठेवतो. तर 'रे' स्वराचे हृदयस्थान, प्राणमय कोशात स्थित आहे. 'ग' स्वर मनोमय कोशाला, कंठस्थानातून जागृत करतो; तर 'म' स्वराने विज्ञानमय कोश, ललाटस्थानातून कार्यान्वित होतो. 'प' ह्या स्वराने आनंदमय कोश, ब्रह्मस्थानात उल्हसित होतो; व साधकाचा पूर्णतः विकास होतो. प्राणायामाच्या वेळी घेतलेला श्वास, प्रथम अन्नमय, प्राणमय व मग मनोमय कोशात धारण होतो; व तेथील अशुद्धता दूर करताना, कंठातून हळूहळू उच्चारित होतो; त्यावेळी विज्ञानमय व आनंदमय या दोन कोशाना, सुखाची अनुभूति येते. साधनेतील समाधान व आनंद, हे विज्ञानमय व आनंदमय या कोशात सामावून राहतात; व साधकमाध्यमाच्या वाणीतून गुरुकृपेचे अमृतबोल व्यक्त होतात. 'सा - रे' व 'म - प' या चार स्वरांचा मध्य म्हणजे 'ग', याचे स्थान कंठ आहे; व कंठातून निघालेला उच्चार, मनातील भाव भावना व्यक्त करीत असतो. म्हणून ह्या मध्य स्वराला व कंठस्थानाला जीवनात अतिशय महत्त्व आहे. आपण नित्य व्यवहारातसुद्धा जे सहजोद्‌गार व्यक्त करतो, ते या कंठस्थानातूनच. म्हणूनच उच्चाराची माध्यमे, या स्थानाशी निगडीत असतात. ज्यावेळी कंठ स्थानातील 'ग' हा स्वर परिपूर्ण असतो, त्यावेळी त्यास 'गुंजारव' म्हणतात.

कोणत्याही शब्दाला, उच्चार - मध्य - लय या तीन अवस्था आहेत. ज्यावेळी उच्चारित शब्द, या तिन्ही अवस्थेतून व्यक्त होतो, त्यावेळी

उच्चारलेल्या शब्दाला आकार येतो. अन्यथा उच्चारलेला शब्द फक्त 'आवाज' म्हणून ओळखला जातो. पशुपक्ष्यांचा स्वरोच्चार हा आवाज असतो; तर मनुष्याचा स्वरोच्चार हा शब्द व भाषा यानी समृद्ध असतो. कारण मानवी शब्दोच्चार हा तीन अवस्थेतील, व पाच माध्यमातील, आविष्कार असतो. या आविष्कारातूनच मनुष्याचा स्वभावधर्म पारखला जातो. म्हणून कोणताही उच्चार करताना, तो अवधानपूर्वक केला गेला पाहिजे; तरच साधकाचा विकास होईल; व त्या विकासाच्या प्रकाशात इतरांची जीवने 'ज्योतिर्मय' बनतील.

जगतामध्ये बहुसंख्य लोक जे जन्माला येतात, तो जन्म आत्म्याचा नसून, जन्म झाल्यानंतर त्या जीवाचे स्थित्यंतर जर झाले तर त्या जीवाचे आत्म्यामध्ये रूपांतर होते; असा नियम आहे. परंतु जेव्हा अडीअडचणी-परत्वे श्रीसद्गुरूंची भेट होत असते, ती भेट अडचण निवारण करण्यासाठी म्हणून नव्हे, तर जो जीव जन्माला येतो, त्याचे स्थित्यंतर व्हावे, म्हणून तो जीव अडचण निर्माण करतो. यासाठी कार्यकेंद्रावर जो प्रसाद किंवा आशीर्वाद आपणा भक्ताना दिला जातो, तो तुमची अडचण निवारण करण्यासाठी म्हणून दिला जात नाही, तर तुमच्या जीवनात स्थित्यंतर व्हावे, म्हणून दिला जातो. ही स्थित्यंतरे जीव, जीवात्मा, आत्मा अशी व्हावयास पाहिजेत. त्यासाठी जी साधना, आरती व वर्षाकाठी जे संमेलन होते, त्याचे तुमच्यावर संस्कार होऊन, तुमच्या ठिकाणी जो जीव आहे तो आपणहून स्थित्यंतर करवून घेत असतो. हेच स्थित्यंतर जर ह्या जन्मात झाले नाही तर अनेक जन्मपर्यंत पुन्हा होत नाही. याचे कारण पुन्हा गुरूंची भेट होण्यास, अनेक जन्मपर्यंत वाट बघावी लागते.

पण असे स्थित्यंतर होण्याने, मरणोत्तर जीवनामध्ये तो आत्मा परलोकात जातो; व तिथे 'आत्मा' म्हणून राहतो; व जेव्हा जन्म घेण्याची इच्छा होते, त्यावेळी तो परत 'जीव' म्हणून इहलोकात येत नाही, तर जो जीव 'आत्मा' झाला आहे, तो 'आत्मा' म्हणूनच जन्माला येतो. अशा आत्म्याला निश्चित कार्यकारण असते. पण जो जीव म्हणून इहलोकात येतो; व परलोकात जातो; तो जरी जन्माला आला तरी त्याला जीवनामध्ये



सुख-शांति-विद्या-संपत्ति प्राप्त करण्यासाठी, अधिक कष्ट पडतात. असे होऊ नये, म्हणून ह्या जन्मात जेव्हा गुरुभेट होत असते, त्यावेळी आपल्याला काय प्राप्त झाले हा विचार न करता, गुरूंनी काय प्राप्त करून दिले याचाच विचार करावा.

आज श्रीसद्गुरूंनी तुम्हा भक्ताना, 'प्रज्ञा' अवस्थेचा लाभ करून दिला आहे. ही अवस्था साधकाला प्राप्त करण्यासाठी, अनेक जन्म घेऊनसुद्धा प्राप्त होत नाही; इतकी ही अवस्था दुर्लभ आहे. त्याचे कारण साधकाने प्रथमत: आपली पंचमहाभूततत्त्वे, पंचतन्मात्रे, पाच कोश, बुद्धी, मन, चित्त, अहंकार यांचा विकास केल्यावर, जेव्हा कुंडलिनी जागृत होते, त्यावेळी 'प्रज्ञे'ला आरंभ होतो. ही अवस्था सांभाळण्यास अतिकठीण आहे. कारण आपल्या सभोवार जे जग दिसते, त्याचा लोभ आपल्याला होतो; त्यावेळी गुरुकृपेने काय लाभ झाला आहे हे विसरता कामा नये. हा लाभ अतिप्रयत्नाने आपल्याला होतो. तेव्हा ह्या अवस्थेमध्ये सर्वात महत्त्वाचे पथ्य असे आहे की, जगाचा 'लोभ' सोडला, तरच ही अवस्था म्हणजे जन्मोजन्मीचा 'लाभ' तुम्हाला होऊन, जगालाही तुम्ही हा 'लाभ' देऊ शकाल. आज ही जी अवस्था श्रीसद्गुरुकृपेने तुम्हाला प्राप्त झाली आहे, त्याकडे कुणीही दुर्लक्ष करू नये.

प्रज्ञावस्थेचे जतन करण्यासाठी साधकाने आचार, उच्चार याकडे लक्ष द्यावयास पाहिजे. कारण जर एखाद्याचे कल्याण आपण करू शकलो नाही, तरी दुसऱ्याला शाप देऊ नये; कारण आता तुमची साधना सिद्ध झाली आहे म्हटल्यानंतर, तुमच्या वाणीतून जगाचे कल्याण व्हावयास पाहिजे. त्याशिवाय तुमच्या उच्चारामध्ये, फाजील गर्व किंवा अहंकार असता कामा नये. जर तुम्ही लीन वागलात तर तुमची प्रगति अधिक होईल. बोलण्याचालण्यामध्ये देखावा असता कामा नये. जे खरे असेल, त्याप्रमाणेच साधकाचा आचार, विचार व उच्चार हा असावयास पाहिजे; तरच त्याला 'गुरुभक्त' असे म्हणता येईल!

आजपर्यंतच्या संमेलनामधून जे जे विषय आपल्या अभ्यासात आले, ते पुस्तकात जरी आपण वाचले तरी ते सिद्धांत आहेत, हे आपणास कळत नाही; व नुसते वाचन करणे म्हणजे अभ्यास नव्हे. वाचन

केल्यानंतर, त्या सिद्धांताची अनुभूति आपणास आली, तर असे म्हणता येईल की, जे लिखाण आहे, त्यामध्ये सत्य काय आहे हे आपणास समजते. तेव्हा साधना संमेलनात जे विषय सांगितले गेले, त्या गोष्टी नव्हेत; किंवा इतिहास नव्हे, हे ध्यानात घ्यावे. प्रत्येक संमेलनात तुमच्याकडून दहा दिवस जो अभ्यास गुरूंनी करून घेतला, त्याचे विस्मरण होता कामा नये. कारण जो आपला जन्म होतो, हा दुर्लभ आहे. तेव्हा त्याप्रमाणे वागून, जीवनाचा अपव्यय करणे, ह्यासारखे पाप नाही. पूर्वपुण्याईने आपणास गुरू भेटतात. अशी संधी आयुष्यात एकदाच येते. त्यासाठी त्यांच्या ज्ञानाचा लाभ आपण करून घेतला पाहिजे. तरच आपण 'गुरुमार्गी' झालो, असे म्हणता येईल. केवळ गुरुपूजन करून गुरुदक्षिणा देणे; म्हणजे आपले कर्तव्य संपले; असे जे लोकाना वाटते, हा औपचार आहे. त्यापेक्षा तुमच्या जीवनात बदल किंवा स्थित्यंतर झाले, तर असे म्हणता येईल की, आपण गुरुमार्गी आहोत. आपण जर त्याप्रमाणे आचार, विचार केला नाही तर कुणीही आपल्याला गुरुमार्गी आहोत, असे म्हणणार नाही. जीवनात गुरू एकदाच भेटतात. त्यावेळी संपूर्ण जीवनाचे अवलोकन गुरू करतात. जीवनात जेव्हा अडीअडचणी येतात तेव्हा त्याचा विचार आपण स्वतः असा करावयास पाहिजे.

आता प्रत्येक अडीअडचणीचे वेळी गुरूंना प्रश्न न विचारता, आपल्यामध्ये काय कमी अधिक आहे? अशी विचारणा स्वतःला स्वतःच करावी; म्हणजे गुरू जी शिकवण आपणास देतील, त्याचा लाभ भवितव्यात आपणास व आपल्या कुटुंबीयास होईल. यासाठीच दरवर्षी साधना संमेलन घेतले जाते; तरीही अजून जेवढे भक्त प्रश्न विचारण्यासाठी येतात, तेवढे संमेलनास उपस्थित रहात नाहीत; नाहीतर वर्षातून तीन संमेलने घेतली गेली असती. यावरून असे दृष्टोत्पत्तीस येते की, भक्ताना ज्ञानाची जरूरी नसून, 'प्रश्न लवकर कसे सुटतील?' असाच प्रश्न आहे. जीवनात एक प्रश्न सुटला की दुसरा उभा राहतो; असे म्हटल्यावर, तुम्ही ज्ञानी कसे होणार? हा प्रश्न गुरूंना राहतो. ''प्रथमतः तुम्ही ज्ञानी व्हा. म्हणजे तुम्ही निरंतर सुखी व्हाल;'' असा आशीर्वाद प. पू. बाबांनी आज आपणास दिला आहे.



# ५२. श्री साईनाथमहाराजांच्या कृपाशीर्वादाची प्रेरणा-परमार्थ युगाचा उदयकाल— 'श्रीसाई शक' !

['आत्मनिवेदनाचा' हा बावन्नावा अध्याय म्हणजे पंचवीसशे वर्षापूर्वी श्री नाथांनी सुरू केलेल्या जगत्कल्याणाच्या कार्याची वं. दादांनी, श्री साईनाथमहाराजांच्या कृपाशीर्वादाने केलेली महन्मंगल सांगता आहे. श्री साईनाथमहाराजांच्या कृपाशीर्वादाच्या प्रेरणेने सुरू होणाऱ्या 'परमार्थ' युगाचा उदयकाल आहे. ह्या परममंगल सुवर्णयुगाची सुरवात वं. दादांनी १९८२ सालच्या 'विजयादशमी'ला, 'श्रीसाई शक १' ह्या जगद्गुरू श्री साईनाथमहाराजांच्या प्रेममंगल नावाने केली आहे. ह्यावेळी वं. दादांनी कृतार्थ होऊन, गुरुप्रेमाच्या गहिवराने ओथंबून केलेले निवेदन आणि त्यांच्याच प्रेरणेने 'श्रीसाई शक' याबद्दल लिहीलेले परमार्थ विवेचन, या बावन्नाव्या अध्यायात उद्धृत केले आहे.]

**वंदनीय दादांचे 'श्रीसाई शक'स्थापनेवेळचे निवेदन-मुंबई केंद्र 'श्रीसाई शक ०१', विजयादशमी — ता. २७-१०-८२**

''जगताच्या सुख-शांती-समाधानाचा आणि कल्याणाचा विचार करून, या कार्याला आरंभ केला. त्यामध्ये दोन उद्देशांगे होती. आम्हा प्रत्येक मानवाला जे जे काही ऐहिक म्हणून प्राप्त करावयाचे असते, त्यासाठी अगणित कष्ट करून, आपण ते काही ना काही एक प्रकाराने प्राप्त करते होतो. त्यामध्ये कमतरता किंवा अधिकता ही आपापल्या प्रत्येकाच्या परिश्रमाप्रमाणे, त्याला ती सुखे आणि दुःखे ही प्राप्त होत असतात. पण अशी ही आजच्या भौतिक युगामध्ये आम्हा मानवांच्या जीवनाची नित्याची जरी गरज असली तरी आणि सद्गुरुकृपाशीर्वादाने या गरजेची जरी पूर्तता झाली तरी प्राप्त झालेल्या सुखातील सुख हे अनुभविण्यासाठी, कुठल्यातरी एखाद्या महान अवतारी परंपरेच्या पुरुषाचा आपल्या पाठीशी कृपाशीर्वाद असल्याशिवाय, आपल्याला प्राप्त झालेल्या सुखाचे क्षण, हे आपण अनुभवू शकत नाही. त्या कार्यपद्धतीमधला हा दुसरा कार्यभाग

म्हणजे तुम्हा भक्ताना, ऐहिक जीवनात ज्या ज्या काही उणीवा आहेत त्या प्राप्त करून देत असताना, अधिक प्रधान म्हणून जी गरज आहे ती पारमार्थिक जीवनाची आहे; आणि अशा जीवनाची ओळख आणि अशा जीवनाचा लाभ, तुम्हा भक्ताना, तुम्ही आपली दु:खे निवारण करून घेत असतानाच तुम्हाला तो प्राप्त व्हावा; ह्या उद्देशाने हे कार्य, मी सत्तावीस वर्षे करीत असताना, आज नुकतेच जे काही शिरोडयाला संमेलन झाले; या संमेलनामध्ये तुम्ही काही अनुभवते झालात; आणि मी व्यक्तिश: काही गोष्टी अनुभविता झालो. यामध्ये तुमच्या प्राप्त झालेल्या जीवनाबद्दल तुम्ही किती उतराई व्हावे? आणि तुमच्या प्राप्त जीवनाची उतराई होण्यासाठी, माझा जो काही इष्टसंकल्प या कार्यारंभी होता तो माझ्या जीवनामध्ये मला किती साकार करता आला? अशा दोन गोष्टींचा किंवा दोन विचारांचा समन्वय, समाधान म्हणून मी मिळविता झालो. आता तुम्हाला समाधान किती झाले? आणि मी समाधानी किती आहे? हा प्रश्न प्रत्येक भक्ताला आपल्या नित्याच्या जीवनातल्या आचारविचारावरून ठरवायचा आहे. आजपर्यंत आपण ह्या गुरुपरंपरेमध्ये आपली जीवने व्यतीत करते झालो आहोत. भवितव्यामध्येही ह्या गुरुकृपाशीर्वादाच्या मार्गाशिवाय भवितव्यातील काळ हा जरी बिकट असला किंवा जरी अधिक बिकट येणार असला तरी जोपर्यंत आपल्याला आपल्या सद्‌गुरूंचे अभयदान आहे तोपर्यंत आपल्याला, येणाऱ्या परिस्थितीचा काडीमात्र विचार करण्याचे कारण नाही.

आज दहा दिवस, तुम्हा भक्ताना, नव्या युगाच्या कार्याच्या आरंभाची ओळख म्हणून, तुम्हाला नवरात्र-महोत्सव हा बाबांच्या आज्ञेप्रमाणे करायला सांगून, आज त्याची सांगता 'सीमोल्लंघन' म्हणून आपण करणार आहोत. म्हणून आज दिवसापासून, आपण एका नव्या युगाला प्रारंभ करणार आहोत. आपण भक्तानी निवेदन केलेल्या निवेदनातील महत्त्वाच्या आणि भवितव्यामध्ये आपल्या कल्याणाच्या ज्या काही योजना आहेत त्या आस्थेने विचार करून, ह्या वर्षी आपण नव्या युगाचा कार्यारंभ करण्यासाठी जो हातभार लावलात, त्याबद्दल तुमचे आभार मानावेत आणि मानण्यासाठी माझ्याकडे शब्दच नाहीत. हे सगळे ऋण जे आहे ते जसे माझे तुमच्यावर आहे; आणि तसे तुम्ही आज्ञापालनाचे जे काही



ऋण आहे तेही माझ्यावर ठेवता, तेव्हा तुमचे ऋण मी फेडू शकत नाही, आणि माझे ऋण तुम्ही फेडू शकत नाही. पण ह्या नव्या युगाची नांदी, आज विजयादशमीच्या दिवशी श्री साईनाथमहाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त आपण कार्यान्वित करीत आहोत.

आपल्यावर इंग्रज लोकांचे राज्य झाले; म्हणून आपण इसवी सन १८००, १९०० आणि म्हणता म्हणता आज १९८२ साल; आपण मानतो. शालिवाहन राजा होऊन गेला; तेव्हापासून त्याच्या युगाला सुरवात झाली. आज मराठी महिन्याप्रमाणे, 'शालिवाहन शक' आपण विचारात घेतला. मुसलमानी धर्मामध्ये महंमद पैगंबर जन्माला आले; तेव्हा 'हिजरी' सन सुरवात झाला. अशा सगळ्या गोष्टी होत असतानासुद्धा, एक अनादी कालापासूनची परंपरा आहे. आज आपण प्रत्येक भक्त जे उपस्थित आहात ते गोत्र लावता. या गोत्राचा नामनिर्देश का व्हावा? प्रथमत: आज जशी तुमची प्रत्येक ठिकाणी विश्वविद्यालये आहेत; पुणे युनिव्हर्सिटी आहे; कोल्हापूर युनिव्हर्सिटी आहे; मराठवाडा युनिव्हर्सिटी आहे; तशी त्या अनादी कालामध्ये अशी ही गुरुपीठे होती; आणि त्या त्या पीठामध्ये जे काही विद्याविद्यार्जन आपण केले, तर त्यात आज जशी मुंबई युनिव्हर्सिटी किंवा पुणे युनिव्हर्सिटी आपण म्हणतो; तसे ज्या ऋषींच्या आश्रमात म्हणजे विद्यालयात, आपल्या विद्याविद्यार्जनाचा कार्यभाग आपण पूर्ण केला; अशी ती ऋषीजनांची कुटुंबपरंपरा जी आहे ती गोत्र म्हणून नामनिर्देश करीत आपण आलो. तसा इ. स. १९८२. हे आपण आता कशावरून लावले? तर हे एक कालाचे कालमापन आहे. म्हणजे येशू ख्रिस्त जन्माला आल्यानंतर, त्यांनी ज्यावेळी धर्मप्रचाराच्या कार्याचा आरंभ केला, त्या कालापासून त्याचे अनुयायी आज जगतामध्ये किती आहेत? व तो काल किती झाला? तर १९८२ वर्षे झाली. तशी महंमद पैगंबरांची आहेत, तशी शालिवाहनाची आहेत. म्हणजे ह्या ज्या काही गोष्टी अनादी कालापासून सज्ञानाने आपण आपल्या विचारात घेतल्यात; तर ज्या सद्‌गुरूंच्या कृपाशीर्वादाने आपली जीवने भवितव्यासाठी साकार झाली, त्यांचा 'श्रीसाई शक' असा आपण का सुरू करू नये आज? मला सर्वांच्याकडून उत्तर पाहिजे. (या वेळी जमलेल्या भक्तभाविकांनी उत्स्फूर्त होकार दिला.)

तर आज माझे आणि आपणा सर्वांचे जे परमपूज्य सद्गुरू आहेत; त्यांच्या कृपाशीर्वादाची प्रेरणा म्हणून मी आज दिनी 'श्रीसाई शक १' असा चालू करतो; आणि हा चालू केलेला शक भवितव्यामध्ये शतशः लोकांच्या कल्याणाचा आदर्श ठेवा निर्माण व्हावा, अशी तुमच्याजवळ आणि श्री सद्गुरू साईनाथमहाराजांच्याजवळ प्रार्थना करतो!

आपण कागदपत्र लिहीता; तर प्रत्येक ठिकाणी 'श्रीसाई शक' लिहा. इसवी सन लिहीण्यामध्ये आतापर्यंत जर तुम्हाला संकोच वाटला नाही तर आपल्या सद्गुरूंच्या नावाने एक नवीन 'युग' किंवा 'शक' आपण निर्माण करीत आहोत; आणि त्याचा भवितव्यात आपल्याला लाभ म्हणून जगतातल्या दुःखी लोकाना द्यावयाचा आहे. तर नव्या युगाची नांदी म्हणून आज सर्वांनी 'श्रीसाई शक १' असा जयजयकार करा. म्हणा, 'श्रीसाई शक १.''

यावेळी वं. दादांच्या समवेत, जमलेल्या सर्व भक्तानी 'श्रीसाई शक १' असा जयजयकार केला!

त्यानंतर वं. दादांनी जमलेल्या सर्व भक्तभाविकाना खालील प्रार्थना म्हणावयास सांगितली; व सर्वांनी ही प्रार्थना वं. दादांच्या समवेत गहिवरून म्हटली.

प्रार्थना :

''असा जो परमपूज्य बाबांचा भवितव्यासाठी 'कृपाशीर्वाद', तो आम्ही भक्तानी अंगीकारून, पुढील कार्याची योजना म्हणून या शकाचा स्वीकार आज केला आहे.''

''सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज की जय!
श्री गुरुदेव दत्त! सदानंदाचा येळकोट!
सच्चिदानंद सद्गुरू श्री पंतमहाराज की जय!
卐 श्री गुरुदेव दत्त!'' 卐



श्रीसाई शक १
विजयादशमी,
बुधवार, २७-१०-८२

## ।। श्रीसाई शक ।।

विजयादशमी एक शुभ दिन! साडेतीन अलभ्य मुहूर्तातील एक शुभ मुहूर्त! श्री साईनाथांच्या पुण्यस्मरणाचा एक आगळा दिवस! सीमोल्लंघनाचा एक अप्रतिम काळ! या दिवशी परमार्थाच्या प्रांतात सीमोल्लंघन करून, एका आर्त शिष्याने एका अविश्रांत गुरूला एक आगळी भेट दिली. 'श्रीसाई शक'!

गुरू कोण आणि शिष्य कोण? हाही एक प्रश्नच. कारण दोघेही एकाच प्रेमाचे दोन भाग, एकाच तळमळीचे दोन प्रवाह, एकाच तेजाचे दोन आविष्कार!

एका प्रेमाने दुसऱ्या प्रेमाला दिलेले गाढ आलिंगन; एका तळमळीतून दुसऱ्या तळमळीत निर्माण झालेली एक अनावर आर्तता; एका तेजाने दुसऱ्या तेजाला दिलेला तेजस्वी नजराणा; 'श्रीसाई शक'!

यापूर्वी अनेकानी शक निर्माण केले. महंमद पैगंबरांचा हिजरी शक, येशू ख्रिस्तांचा ख्रिस्ती शक, विक्रमांचा शक, शालिवाहन राजाचा शक, पण हे सर्व शक मानवी होते आणि स्वतःच्या धर्मापुरते होते. यात स्वत्व होते पण मानवता युगाची प्रेरणा नव्हती. 'श्रीसाई शक' हा याहून वेगळा शक आहे. हा देवदैविक शक आहे. गुरुशक्तीच्या असामान्य आविष्काराचा हा शक आहे. हा सर्व मानवतेचा अवर्णनीय शक आहे. हा एकदाच येणारा आणि चिरकाल राहणारा शक आहे. परमार्थाच्या अनभिषिक्त सम्राटाचा हा शक आहे.

श्रीसाई शकात काय नाही? अनादी अनंत कालातील गुरुपरंपरा त्यात आहे. गुरुशिष्यांच्या आर्त प्रेमाची नितांत तळमळ त्यात आहे. नाथ, सुफी आणि दत्त परंपरेची सांगता त्यात आहे. लोककल्याणाची असीम कळकळ त्यात अंतर्भूत आहे. त्यात तेज आहे, ओज आहे, भक्ति आहे, युक्ति आहे, वेद आणि वेदान्त आहे. ॐ काराचा नाद आहे, रुद्रशक्तीची साद आहे. युगायुगातील संतपुण्याईला पृथ्वीतलावर

खेचून आणून, पृथ्वीला नंदनवन बनविण्याची इच्छा आणि शक्ति त्यात आहे. मुख्य म्हणजे त्यात आई आहे. महाकारणाचे स्तन्य पाजून, लोककल्याणार्थ भक्ताना जोपासणारी गुरुमाऊली त्यात आहे. 'श्रीसाई शक' — मानवी कल्याणाची एक अपूर्व नांदी. निसर्गमय जीवन जगण्याची पुनश्च सुरवात. जात, पंथ, श्रेणी, धर्म यांचा लोप होऊन, आशीर्वादमय मानवता धर्माच्या उदयाचा सुकाळ. शांती, सुबत्ता, प्रेम आणि भक्ति यांचा सुंदर समन्वय. महाकारणाची तेजस्वी सुरवात.

'श्रीसाई शक' — गुरुकार्याच्या जाणिवेने प्रेरित होऊन, गुरुप्रेमाची साक्ष ठेवणाऱ्या शककर्त्या दत्तगुरूला, माझ्या प्रेमळ गुरुमाऊलीला, माझे शतशः प्रणाम! भक्तांच्या पेशीपेशीतून गुरुप्रेमाची ज्योत पाजळणाऱ्या, त्यांच्या जीवनाचे सर्वार्थाने सार्थक करणाऱ्या, त्यांच्या जीवनाला सुबक आकार देऊन साकार करणाऱ्या, माझ्या शककर्त्या तेजमाऊलीला माझे अखंड वंदन! ॐ काराला आकार देऊन, त्याच्या नादातून नादब्रह्म निर्माण करणाऱ्या माझ्या सद्गुरूंना, त्यांच्या ॐ काराचे निरंतर विनम्र अभिवादन!

हे शककर्त्या दत्तगुरो, गुरुप्रेमाचे अमृत बरसणाऱ्या या सोनियाच्या दिनी, तुझ्या नितांत सात्त्विक प्रेमात निरंतर डुंबणाऱ्या तुझ्या ॐकाराचे तुझ्या चरणाशी एकच मागणे —

"दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ॥
जो जे वांछील तो ते लाहो। प्राणीजात ॥
हेचि ज्ञान देगा देवा, तुझा विसर न व्हावा ।
गुण गाईन आवडी तेचि माझी सर्व जोडी ।
नलगे मुक्ति धनसंपदा, गुरुसंग देई सदा ॥"

आत्मनिवेदन

pg·12 गुरु का अर्थ

सातारा –

pg 16, 17

19, 20

pg 25 – औदुंबर

31, 30

33

36

39

40

43

44

47

48

66

68

67

---

82

83

84

85

ગુરુપ્રસાદ

pg. 33 - મહાલક્ષ્મી પીઠ

- નાથપંથ, દત્તપંથ શ્રી ગોરક્ષનાથજી ને
સિદ્ધસિદ્ધાન્ત પદ્ધતિ को સમાજોપયોગી બનાયા

- સાઈનાથ 1918 મે સમાધિસ્થ - 1951 મે
દાદા જન્મ 1952 મે શિરડી ગયે ઔર ઇસ
વિશાલ સત્ર કી શુરુઆત કી।

181 - આપ જબ સંસાર મે જન્મ લેતે હૈ - સુખ તથા
સત્કર્મ કી મીમાંસા

179 & 180 ; 176, 177, 168,

સાતારા

કોલ્હાપુર

શ્રી દત્તક્ષેત્ર નરસોબા વાડી

કુરાડ

શ્રી ઔદુંબર ક્ષેત્ર

149-150 નરસોબાવાડી

ॐ